# एकनाथदर्शन खंड २ रा

## ( भागवतखंड )

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र.



REFBK-0011014

...नाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद

12 DEC 1975

दा. क.
99098

2

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचना** :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुमार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

5 APR 1977

[क्र. मा प.]

2

॥ श्री ॥

# एकनाथदर्शन

## खंड २ रा

## (भागवतखंड)

मराठी ग्रंथ संग्रहालय ... चारित्र
अनुक्रम ...३९२२७...
क्रमांक ...७०७५... नों. दि. २१९

: संपादक :

श्री. बळवंत गिरिराव घाटे
बी. ए. एल्एल्. बी.

REFBK-0011014

: प्रस्तावना :

माननीय श्री. न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ
राज्यपाल, पूर्व पंजाब, चंडीगड

ग्रा. क्र. ११०१४

मूल्य सहा रुपये

नाथषष्ठी
शके १८८२

* * *

दि. ८ मार्च
सन १९६१

: प्रकाशक :

**श्री. बळवंत गिरिराव घाटे**, बी. ए. एल्‌एल्. बी.

अध्यक्ष, एकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद

[ सर्व हक्क एकनाथ संशोधन मंदिराचे स्वाधीन ]

: मुद्रक :

**रा. गो. पाटील**

ज्ञानेश्वरी प्रेस

८३८ सदाशिव पेठ, भाऊमहाराजबोळ, पुणें २

# एकनाथदर्शन खंड २ रा




— श्री एकनाथ महाराज —

**श्री एकनाथ महाराजांचे चरणीं समर्पण**

शब्दज्ञानें पारंगत । जो ब्रह्मानंदें सदा डुल्लत ।
शिष्यप्रबोधनीं समर्थ । तो मूर्तिमंत स्वरूप माझें ॥

ए. भा. ११-१०२८

# अनुक्रमणिका

## प्रास्ताविक


| क्र. | विषय | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | संपादकाचें हृद्गत | श्री. बळवंत गिरिराव घाटे, बी. ए. एल्एल्. बी. | ५ |
| २ | एकनाथ संशोधन मंदिर, संक्षिप्त इतिवृत्त | ,, | १३ |
| ३ | प्रस्तावना | माननीय श्री. न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ, राज्यपाल, पूर्व पंजाब | १७ |
| ४ | पुरस्कार | पूज्य आचार्य विनोबा भावे | २३ |
| ५ | नाथभागवत प्रशस्तिकाव्यें | संग्रहित | २४ |
| ६ | श्री एकनाथी भागवताची विषयसूची | संपादकीय | १ |
| ७ | नाथभागवतांतील कांहीं परमार्थपर व्याख्या | ,, | ५७ |


## लेखमाला


| क्र. | विषय | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | तुका म्हणे भागवत । केलें श्रुत सकळां ।। | ह. भ. प. प्रा. श. वा. तथा सोनोपंत दांडेकर, एम्. ए. | १ |
| २ | नाथभागवताची अपूर्वता | ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर | २३ |
| ३ | नाथभागवतांतील अद्वैतसिद्धांत | ह. भ. प. रंगनाथ महाराज परभणीकर | ३५ |
| ४ | श्रीएकनाथ महाराज व भागवत धर्म | ह.भ.प. श्रीकृष्णदास लोहियामहाराज | ४१ |
| ५ | भागवताची वाटचाल | डॉ. शं. गो. तुळपुळे, एम्. ए., पीएच्. डी. | ५९ |

| क्र. | विषय | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ६ | श्रीएकनाथांची मायेची कल्पना व तिच्या निरसनाचे उपाय | डॉ. सौ. शरयू बाळ, एम्. ए., पीएच्. डी. | ७७ |
| ७ | एकनाथी भागवतांतील मंगलाचरणें | डॉ. वि. म. कुलकर्णी, एम्. ए., पीएच्. डी. | ९१ |
| ८ | नाथांचा कर्मयोग | डॉ. श्री. रं. कुलकर्णी, एम्. ए., पीएच्. डी. | १०१ |
| ९ | नाथभागवतांतील स्त्रीदर्शन | प्रा. पां. ना. कुलकर्णी, एम्. ए. | ११३ |
| १० | श्री एकनाथी भागवत आणि वर्णाश्रम धर्म | महामहोपाध्याय य. मा. कस्तुरे, वेदान्ततीर्थ | १२९ |
| ११ | नाथभागवतांतील नैतिक मूल्यें | श्री. भा. पं. बहिरट, एम्. ए. | १४९ |
| १२ | यदु-अवधूत-संवाद आणि त्याची फलश्रुति | श्री. ह. रा. बोडस, एम्. ए. बी. टी. | १५९ |
| १३ | स्वधर्मानुष्ठानाची आवश्यकता | प्रा. पां. कृ. सावळापूरकर, एम्. ए. | १७५ |
| १४ | संतसंग महत्त्व | वे. शा. सं. आत्मारामशास्त्री जेरे | १८५ |
| १५ | भिक्षुगीता व तिची फलश्रुति | पं. द. वा. जोग, उपनिषदतीर्थ | १९३ |
| १६ | श्री नाथांची गुरुभक्ति | ह. भ. प. र. ह. कोटणीस | २०३ |
| १७ | एकादश स्कंधाचें महत्त्व | ह. भ. प. रा. बा. चातुर्मास्येमहाराज | २१५ |
| १८ | भागवत आणि भक्तियोग | ह. भ. प. शंकर महाराज खंदारकर | २२३ |
| १९ | साधकावस्थेंतील पथ्यें | श्री. स. के. नेऊरगांवकर, बी. ई., ए. एम्. आय्. ई. | २३३ |
| २० | अर्थाचे पंधरा अनर्थ | कविवर्य दे. ल. महाजन | २४९ |
| २१ | उर्वशी-पुरूरवा-कथानकाचें प्रयोजन | श्री. वि. ग. कर्वे | २६१ |
| २२ | भागवताचा उपसंहार | पूज्य विनोबा भावे | २६७ |

११०९८

# संपादकाचें हृद्गत

नाथषष्ठीच्या शुभप्रसंगीं नाथदर्शनाचा हा दुसरा—भागवतखंड संतवाङ्मयप्रेमी रसिक वाचकांच्या सेवेंत सादर करण्यास आम्हांस सानंद धन्यता वाटत आहे. महाराष्ट्रांत श्री ज्ञानेश्वर व श्री तुकाराम यांच्या वाङ्मयाचा जितका सखोल व व्यापक अभ्यास आजपावेतों झाला, तितका नाथवाङ्मयाचा झाला नाहीं. याला अनेक कारणें आहेत. ज्या इस्लामी राजवटींत इतकीं वर्षें या विभागांतील मराठी भाषिकांनीं काढलीं, त्या शासनाचें मराठी भाषा, वाङ्मय व संस्कृतीला प्रतिकूल धोरण होतें म्हणून कदाचित् नाथवाङ्मयाकडे अभ्यासकांचें जावें तितकें लक्ष गेलें नसावें किंवा पूज्य विनोबाजी म्हणतात त्याप्रमाणें नाथांची निरहंकारता याला कारण असावी. एकीकडे आपले गुरु श्री ज्ञानदेव तर दुसरीकडे आपले शिष्योत्तम श्री तुकाराम यांच्या नांवाचा आणि त्यांच्या वाङ्मयकृतींचा बोलबाला व्हावा आणि त्यांत आपलें नांव लोपून जावें असें नाथांना वाटत असावें म्हणून कदाचित् अभ्यासकांना त्यांची प्रेरणा लाभली नाहीं. पण ज्याप्रमाणें निर्गुण व निराकार ब्रह्माला सगुण आणि साकार वर्णिल्याशिवाय संतांचें समाधान झालें नाहीं तद्वत् आपल्या नामरूपाचा लोप व्हावा अशा वृत्तीच्या या थोर संतांच्या वाणीचा महिमा व ऐश्वर्य जगापुढें मांडल्यावांचून त्यांच्या भक्तांना चैन पडणें शक्य नव्हतें. या दृष्टीनें श्री ज्ञानेश्वर व श्री तुकारामांचें वाङ्मय बरेचसें प्रकाशांत आलें. पण तितकें नाथवाङ्मयाकडे जनतेचें लक्ष वेधण्याचे प्रयत्न झाले नाहींत.

सर्व सामान्यांचीच नव्हे तर चांगल्या चांगल्या शहाण्यांची समजूत अशी झाली आहे कीं या विज्ञानयुगांत संतवाङ्मयाचा उपयोग कांहीं नाहीं. त्याच्या प्रसारानें लोककल्याण साधणें शक्य नाहीं. तेव्हां अशा प्रकारचा खटाटोप आणि त्याकरितां काळ आणि द्रव्याचा व्यय व्यर्थ होय. पण थोड्या बारकाईनें विचार केल्यास या विचारसरणींतील वैगुण्य लक्षांत येण्यासारखें आहे. मानवी जीवनाच्या अंतिम ध्येयाचा विचार जितक्या सखोलपणें वैदिक तत्त्वज्ञानानें केला आहे तितका अन्य देशांत झाला नाहीं असे पाश्चात्य देशां-

तील बहुसंख्य विचारवंतहि मानतात. केवळ आधिभौतिक उन्नतीच्यामागें लागलेलीं राष्ट्रें विज्ञानाची तीव्र उपासना करीत आहेत. पण त्या उपासनेला अध्यात्म ज्ञानाची जोड न देतां आल्यामुळें ठिकठिकाणीं मानवतेची गळचेपी होत चालली आहे. माणूस माणसाला ओळखीनासा झाला आहे. जागतिक शांतीच्या नांवाखालीं अशांततेचे भीषण प्रकार सर्वत्र होत आहेत. महाराष्ट्रांतील थोर संतांनीं दूरदर्शीपणानें हें ओळखून स्वयं भगवंतांनीं प्रेरणा दिलेल्या आणि भगवद्गीता व भागवताच्या रूपानें बोधिलेल्या भागवत धर्माचा प्रचार आप-आपल्यापरीनें केला आणि तो स्वतः आचरून जगापुढें ठेवला. त्यामुळें जन-तेची नैतिक पातळी फार उंचावली. समाजांतील निरनिराळ्या थरांमधील उच्च नीच भाव नाहींसा होऊन सलोखा व संघटना वाढली. त्याकाळीं अनेक प्रकारचे जातिभेद व सांप्रदायभेद असतांहि भगवद्भक्तीच्या आणि नाम-संकीर्तनाच्या एका पातळीवर जनतेस आणून संतांनीं तिला एकजिनसी केलें आणि तत्कालीन परधर्मीय राज्यसत्तेचा प्रतिकार करण्यास तिला कार्यक्षम बनविण्याचे अशा रीतीनें महान् प्रयत्न झाले.

आज ती परिस्थिति राहिली नाहीं. स्वातंत्र्य प्राप्त होऊन एक तप लोटलें, तरीपण कोणत्याहि क्षेत्रांत शांति आणि समाधान दिसून येत नाहीं. प्रांतीयता, जातीयता, भाषिकता इत्यादींचीं भूतें थैमान घालीत आहेत. भार-तीय संस्कृति ही भोगप्रधान नसून त्यागप्रधान आहे याचा पूर्णपणें विसर पडला आहे. वैयक्तिक आणि सामाजिक जीवनांतून दया, क्षमा, शांति, नम्रता, शील, सदाचार, नीतिमत्ता, परस्पर प्रेम, त्याग आदि दैवी गुणांचा लोप होत चालला आहे. अर्थपरायणतेच्या बेसुमार वाढीमुळें समाजाची नैतिक पातळी उंचावण्याच्या ऐवजीं ती खालावत चालली आहे. अशा वेळीं आध्या-त्मिकतेच्या भूमिकेवर जनतेस जर आणतां येईल तरच देशाचा तरणोपाय आहे. त्याकरितां समताधिष्ठित भागवत धर्माचा प्रचार जितका करतां येणें शक्य आहे तितका हवा आहे. जगाला मानव धर्माची आठवण करून देण्याची शक्ति संतवाङ्मयांत आहे. संतांच्या चरित्रापासून व त्यांच्या वाङ्मयांतून मिळणारें चिरंतन जीवनमूल्यांचें शिक्षण राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीस प्रेरक व पोषक ठरणारें आहे. कारण ‘ सर्वभूतहितेरतिः । ’ हें त्यांच्या जीवनाचें वैशिष्ट्य आहे. सर्वांगीण विकासाच्या कार्यांत देश मग्न असतांना ह्या

जीवनमूल्यांच्या शिक्षणाचें महत्त्व आगळें आहे व त्याची आजच्या काळाला अत्यंत आवश्यकता आहे. त्यांतहि नाथवाङ्मयाचें विशिष्ट स्थान आहे. त्यांनीं ' विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ॥' असा केवळ तोंडानें जप करीत न बसतां कृतीनेंहि सर्वत्र एकच परमात्मा वास करून राहिला आहे, त्याच्या साक्षात्काराचें सुलभ साधन भक्ति हेंच आहे, ही भक्ति दिसते तितकी सोपी नाहीं, तर प्रसंगीं ' दारा सुत गृह प्राण ।' ही देवास अर्पण करण्याची सिद्धता भक्ताचे ठिकाणीं असावी लागते, ती करीत असतां व्यवहार सोडावयाचें कारण नाहीं, मात्र तो परमार्थ भावानें करावा आणि सारीं कर्में भगवदर्पण करून मोकळें व्हावें, ज्याचा हेतु रामनामीं आहे त्याचा प्रपंचच परमार्थरूप होतो, ही शिकवण आपल्या भागवतादि ग्रंथांतून देऊन भागवत धर्म प्रचाराचें फार मोठें कार्य केलें. आणखी एका दृष्टीनें त्यांच्या कार्याचें महत्त्व आहे. संस्कृत न जाणणाऱ्यांची संख्या नाथकालीं फार मोठी होती. त्यांच्यांत नाथ मिळून मिसळून वागत, त्यांच्या सुखःदुखाशीं समरस होत, आकांक्षा ओळखत, अडीअडचणी न्याहाळून पहात. त्यांना समजेल उमजेल व वर्तनांत उमटेल अशा प्रकारचे साहित्य सोप्या व सुबोध मराठी भाषेंत निर्माण करून मराठी भाषिकांवर त्यांनीं मोठा उपकार केला. अगदीं सामान्य गृहस्थाप्रमाणें आपलें सारें जीवन त्यांनीं घालविलें, पण ' भूतमात्रीं हरीविण । न पाहेचि दुजेपण ॥ ' ही भूमिका आपल्या जीवनांतील यच्चयावत् घटनांतून सुस्पष्ट केली. सर्व ठिकाणीं परमेश्वराला पाहणें म्हणजे भूतमात्रांची निरहंकार वृत्तीनें सेवा करणें हा आदर्श त्यांनीं समाजापुढें ठेवला.

गीता आणि भागवताचा एकादश स्कंध हे केवळ पूजेचे किंवा नामस्मरणासाठीं निर्माण झालेले ग्रंथ नव्हेत. ते उपदेशपर, मार्गदर्शक आणि भक्ति, ज्ञान व क्रिया यांचें रहस्य समजाविणारे ग्रंथ असल्यामुळें त्यांचें चिंतन व मनन व्हावें व तदनुसार आचरण होत असावें ही अपेक्षा आहे. म्हणून यांतील उपदेश प्राकृत जनांना समजावून देण्याकरितां मराठी भाषेंत त्यांचें विवरण होणें अवश्य होतें. श्री ज्ञानेश्वरांनीं गीता निवडून त्यावर आपला लोकोत्तर ग्रंथ ' ज्ञानेश्वरी ' हा जगाला दिला तर नाथांनीं एकादश स्कंध निवडून त्यांतील भागवत धर्माचा उपदेश सोप्या व सुबोध भाषेंत आपल्या भागवत ग्रंथांत विवरला. असे ग्रंथ भारतांतील विद्यापीठांतून अभ्यासिले जातील तर भावी

पिढीचें खरें कल्याण होईल आणि शेकडो वर्षांचें मनोमालिन्य पार धुऊन निघेल. महाराष्ट्रांतील घराघरांतून नाथवाङ्मयाचा प्रसार व अभ्यास व्हावा या दृष्टीनें ' श्री एकनाथ संशोधन मंदिराचे ' गेल्या कांहीं वर्षांपासून आपल्या मर्यादित क्षेत्रांत प्रयत्न चालू आहेत.

सुमारे तीस वर्षांपूर्वी अहमदनगरच्या वाङ्मयोपासक मंडळानें श्रीज्ञानेश्वरांचें वाङ्मयदर्शन घडविण्याकरितां ' ज्ञानेश्वरदर्शन ' हा ग्रंथ दोन खंडांत प्रकाशित केला. नाथदर्शनाकरितां तीच प्रेरणा लाभली. पण कार्यास मूर्त स्वरूप येण्यास तब्बल वीस वर्षें लागलीं. कार्याचा निश्चय १९५० सालच्या नाथषष्ठीचे वेळीं करण्यांत आला आणि मराठवाड्यांतील नामवंत साहित्यिक व संशोधक श्री. न. शे. पोहनेरकर यांच्या अव्याहत व चिकाटीच्या प्रयत्नानें नाथदर्शनाचा पहिला खंड सन १९५२ सालीं प्रकाशित झाला. त्यांनीं नाथभक्तांना महाद्वारांत पोहोंचवून नाथवाङ्मयांतील दैदीप्यमान ताऱ्यांचें ध्रुवदर्शन करविलें. नाथवाङ्मयाची रूपरेषा सामान्यपणें वाचकांच्या लक्षांत यावी ही त्या वेळची कल्पना होती. म्हणून नाथांच्या प्रमुख ग्रंथांचा परामर्श घेणारे लेख त्या खंडाकरितां चिकित्सापूर्वक निवडण्यांत आले. पण तेव्हांच्या उद्देशपूर्तींत एक मोठी उणीव राहून गेली होती ती म्हणजे नाथभागवतावरील परिशीलनात्मक लेखांची. ती उणीव दुसऱ्या खंडांत भरून काढण्याची इच्छा असूनहि गेल्या आठ वर्षांत तो योग जमून आला नाहीं. या अवधींत संस्थेनें छोटीं मोठीं इतर बरींच प्रकाशनें केलीं त्यांत विशेष उल्लेखनीय डॉ. श्रीधरराव कुलकर्णी यांनीं लिहिलेल्या ' नाथांचा भागवत धर्म ' या प्रबंधाचें प्रकाशन होय. हा विद्वत्ताप्रचुर प्रबंध अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिला गेल्यामुळें तो विद्वत्समाजांत मान्य झाला आणि साहित्यसम्राट् कै. न. चिं. केळकर पारितोषकाचा मानकरी बनला. पण नाथदर्शनाच्या दुसऱ्या खंडाचा संकल्प आजपर्यंत पार पाडतां आला नाहीं. शेवटीं १९५९ सालीं यासंबंधी विचार होऊन नाथदर्शनाचा दुसरा खंड सर्वसामान्य स्वरूपाचा न काढतां केवळ नाथभागवतांतील विषयांचा ऊहापोह करणाऱ्या लेखांचा काढावा आणि नाथांच्या इतर ग्रंथांचें परिपूर्ण दर्शन घडवून आणणारे आणखी कांहीं स्वतंत्र खंड प्रकाशित करावे असें ठरलें. ही योजना खर्चाची असल्यामुळें महाराष्ट्र शासनाकडे द्रव्यसहाय्याची विनंती करण्यांत आली. पहिल्या खंडाच्या प्रकाशनास हैद्राबाद

संस्थानच्या तत्कालीन नागरी प्रशासकांनीं पांच हजार रुपयांचें महादान दिलें होतें त्यामुळें त्या खंडाचें प्रकाशन सुकर झालें. तसेंच यावेळीं होईल असा भरंवसा होता. महाराष्ट्रीय थोर संतांचें वैचारिक ऋण फेडण्याकरितां महाराष्ट्र शासन हजारो रुपयांचा व्यय त्यांच्या मौलिक ग्रंथांच्या स्वस्त आवृत्या प्रकाशित करण्याकडे करीत आहे. यामुळें आमची मागणी अस्थानीं होणार नाहीं असें वाटत होतें आणि अत्यंत आनंदाची गोष्ट ही कीं महाराष्ट्र शासनाच्या माननीय शिक्षण साचिवांच्या सक्रिय पाठिंव्यामुळें आणि ना. मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांच्या कृपादृष्टीमुळें या कार्याकरितां पांच हजार रुपयांचें महादान मिळालें याबद्दल त्यांच्याविषयीं अंत:करणपूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्यापलीकडे आम्ही कांहीं करूं शकत नाहीं.

या कार्याकरितां एक उपसमिति नेमण्यांत आली. त्या समितीचे कार्यवाह श्री. वा. ह. घारपुरे यांच्या दुर्दम्य उत्साहामुळें इतक्या अल्पावधींत लेखांचें संकलन होऊं शकलें. महाराष्ट्रांतील अनेक संत वाङ्मयोपासकांना त्यांनीं पत्रें लिहिलीं. नाथभागवतांतील विषयांची सूची दिग्दर्शनार्थ त्यांच्याकडे पाठविण्यांत आली. त्यापैकीं कोणत्याहि एका किंवा भागवताशीं संबंधित इतर कोणत्याहि विषयाची निवड करून लेखकांनीं आपले लेख गेल्या वर्षाच्या कार्तिक व॥ ३० पर्यंत पाठवावेत अशी विनंति करण्यांत आली. कारण संकल्प हा होता कीं गेल्या नाथषष्ठीसच या ग्रंथाचें प्रकाशन व्हावें. पण यांत अनेक अडचणी आल्या. कांहीं विचारवंत लेखकांनीं प्रकृतीच्या अस्वास्थ्याचें कारण दाखवून तर कांहींनीं अन्य कार्याच्या व्यापृततेच्या सबबीवर वरील मुदतींत लेख पाठविण्यास असमर्थता दाखविली. त्यांना पुरेशी सवड देणें अवश्य होतें. अशा अनेक कारणांमुळें लेखांचें संकलन परवांपर्यंत चालू राहिलें. महाराष्ट्रांत संतवाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्यांचे प्रामुख्यानें दोन वर्ग आहेत. एक वारकरी सांप्रदायांतील जुन्या वळणाच्या ह. भ. प. मंडळींचा तर दुसरा महाविद्यालयांतून या वाङ्मयाचा चिकित्सक पद्धतीनें अभ्यास केलेल्यांचा. या दोन्ही वर्गांतील मान्यवर लेखकांना पत्रद्वारें आणि कित्येकांना समक्ष विनंति करण्यांत आली. आठवणीकरितां दोन दोन चार चार वेळां पत्रें धाडण्यांत आलीं व त्यापैकीं ज्यांनीं कृपावंत होऊन आपले लेख पाठविले त्यापैकीं बहुतेकांच्या लेखांना या खंडांत स्थान देण्यांत आलें. कांहीं विषयावर

एकापेक्षां अधिक लेख आले होते. त्यांतून निवड करावी लागली. तें काम संस्थेचे विश्वस्त आणि संतवाङ्मयांतील अधिकारी पुरुष प्राचार्य सोनोपंत दांडेकर व ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर यांचेकडे सोपविण्यांत आलें. त्यांनीं परिश्रमपूर्वक सारे लेख वाचून मुद्रणयोग्य लेखांची निवड केली. या उभयतांचे आभार मानण्याच्या व्यामोहांत पडणें श्रेयस्कर वाटत नाहीं. कारण कार्याच्या प्रारंभापासून शेवटपर्यंत त्यांचेंच मार्गदर्शन लाभलें आहे आणि संस्थेच्या प्रत्येक कार्याकडे आत्मीयतेनें त्यांचें लक्ष असतें तेव्हां त्यांच्या ऋणांतून मुक्ततेचा प्रसंगच संभवत नाहीं.

ज्या नामवंत विद्वान् नाथवाङ्मयोपासकांनीं हे लेख लिहिण्याचे कष्ट घेतले आणि केवळ संस्थेवरील प्रेमाखातर अन्य व्यवसायांतून वेळ काढून हे लेख लिहिले, त्या सर्वांचे आम्ही आभारी आहों. तसेंच स्थळाच्या अभावीं ज्यांचे लेख या खंडांत प्रकाशित करतां आले नाहींत, त्यांचेबद्दलहि कृतज्ञता व्यक्त करणें आमचें कर्तव्य आहे. या खंडांत त्यांच्या लेखांचें प्रकाशन न होऊं शकल्याबद्दल अत्यंत दिलगिरी वाटते. ज्या कवि मित्रांनीं नाथभागवत-प्रशस्तिपर काव्यें लिहून पाठविलीं, त्यांचेहि आम्ही अत्यंत आभारी आहों. तीं काव्यें या ग्रंथांत प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत.

या खंडांत केवळ नाथभागवतांतील प्रतिपादित विषयांची चर्चा व उहापोह करणाऱ्या लेखांची निवड करण्यांत आली आहे हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. भागवतांत अनेक विषय आले आहेत व त्याचें रत्नभांडार अमाप आहे. त्यांतून जीं कांहीं रत्नें विद्वान् लेखकांच्या हातीं लागलीं, तीं त्यांनीं आमचे स्वाधीन केलीं असून त्यांतील कितीतरी रत्नें हातीं लागावयाचीं आहेत. संस्थेची भूमिका ‘ भारवाही हमाला ’ ची आहे. ती तिनें कितपत पार पाडली हें सूज्ञ वाचकांनीं ठरवावयाचें आहे.

आमचें विनंतिपत्र आणि त्यानंतरचीं सूचनापत्रकें महाराष्ट्रांतील ज्या ख्यातनाम वृत्तपत्रांनीं प्रसिद्ध केलीं त्या सर्वांचे आम्ही आभारी आहों. हें विनंतिपत्र प्रसिद्ध झाल्यानंतर श्रीमंत राजेसाहेब, भोर, यांजकडून या कार्या-करितां एकशे एक रुपयांचें दान प्राप्त झालें. महाराष्ट्रांतील पुण्य भूमींत आजहि संतवाङ्मयावर प्रेम करणारे थोर व दानशूर सज्जन आहेत. प्रसंग-

विशेषीं त्यांच्या दानाचा ओघ आपोआप अशा कार्याकडे वळत असतो. या ' सात्त्विक ' दानाबद्दल श्रीमंत राजेसाहेबांचे आम्ही ऋणी आहों. संतवाङ्मयप्रेमी, पूर्व पंजाबचे राज्यपाल माननीय श्री. न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ यांचें आमच्या संस्थेवर पहिल्यापासून प्रेम आहे. नाथदर्शनाच्या पहिल्या खंडा-करितां नाथांचें चरित्र व चारित्र्यावर प्रकाश पाडणारा एक मननीय लेखहि त्यांनीं पाठविला होता. म्हणून या खंडास प्रस्तावना लिहिण्याबद्दल त्यांना विनंति करण्यांत आली. ती त्यांनीं मान्य केली आणि प्रस्तावनालेखांत आपले बहुमोल विचार व्यक्त केले याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहों.

पूज्य आचार्य विनोबाजींनीं मराठवाड्यांतील पदयात्रेच्यावेळीं संस्थेला भेट दिली होती. तिच्या कार्याविषयीं समाधान व्यक्त करून महत्त्वाचें मार्ग-दर्शहि केलें होतें. म्हणून या खंडास आशीर्वादात्मक पुरस्कार लिहून पाठवि-ण्याविषयीं त्यांना विनंति करण्यांत आली. यावेळीं ते बिहार प्रांतांत अत्यंत कार्यमग्न असतांहि त्यांनीं सवड काढून चार शब्द लिहून पाठविले याबद्दल आम्ही आपली कृतज्ञताबुद्धि अत्यंत नम्रतेनें व्यक्त करीत आहों.

अनेक मित्रांच्या सूचनेवरून या खंडांत नाथभागवतांतील प्रतिपादित विषयांची अध्यायवारी सूचीहि देण्यांत आली आहे. नाथभागवताचा अभ्यास करूं इच्छिणाऱ्यांना या सूचीचा उपयोग होईल असा भरंवसा वाटतो. या-शिवाय नाथभागवतांत इतस्ततः विखुरलेलीं वाङ्मयरत्नें मधून मधून देण्यांत आलीं आहेत. नाथभागवतांत ठिकठिकाणीं परमार्थपर सुटसुटीत व्याख्या आल्या आहेत त्यांचें संकलन करून त्यापैकीं कांहीं प्रकाशित करण्यांत आल्या आहेत. त्याचाहि अभ्यासकांना उपयोग होईल असा विश्वास आहे.

पुणें येथील ज्ञानेश्वरी प्रेसचे संचालक श्री. रा. गो. पाटील हे संत-वाङ्मयप्रेमी आहेत. अशा प्रकारच्या वाङ्मयाचें मुद्रण व प्रकाशन हें त्यांचें वैशिष्ट्य आहे. त्यांनीं अल्पावधींत ग्रंथाच्या मुद्रणाचें काम आत्मीयतेनें, सुबक व आकर्षक करून दिलें. याखेरीज मुद्रितें तपासणें, चित्रांचे सांचे करविणें इत्यादि सर्व कामांत त्यांचें सहाय्य झालें याबद्दल त्यांना व त्यांच्या उत्साही कामगार बंधूंना धन्यवाद द्यावे तितके थोडे आहेत. नाथभक्त श्री. आपटे यांनीं

आपल्याकडील श्री एकनाथांचे मोठे सुंदर चित्र दिलें. त्यावरून मुखपृष्ठावरील चित्राचा सांचा तयार करतां आला. याबद्दल त्यांचेहि आम्ही आभारी आहों.

नाथांच्या घरांतून आला अतिथी कधीं उपाशी पोटी किंवा अतृप्त परतला असें झालें नाहीं. त्यांच्या घरीं बौद्धिक व आध्यात्मिक तृप्तीबरोबर व्यावहारिक तृप्तीहि होत असे. प्रत्यक्ष भगवान् जेथें 'श्रीखंड्याचें' रूपानें बारा वर्षांपेक्षां अधिक काळ 'जीवना' चा पुरवठा करीत राहिले तेथें कोणीहि यावे व आपलें जीवन समृद्ध करण्याकरितां तुष्टि, पुष्टि आणि शांति बरोबर न्यावी यांत नवल तें कोणतें? त्यांच्या प्रत्यक्ष सहवासांत ज्यांना ही तृप्ति लाभली, ते खरोखर धन्य होत! आजहि त्यांच्या वाङ्मयभांडारांतून जें कांहीं गंवसलें त्यावरसुद्धां आपली बौद्धिक व आध्यात्मिक तृप्ति हमखास होईल.

नाथांनीं आपल्या भागवतांत ब्रह्मप्राप्तीसाठीं अन्य मार्गांपेक्षां सुगम साधन 'सर्वांभूतीं भगवद्भाव' हें सांगितलें. हा भाव निर्माण होण्याकरितां आवश्यक असलेल्या अखंड भजन, नामसंकीर्तन, सदाचरण, सत्सहवास, मनोजय, अहंकारनाश आणि अनन्य शरणागति इत्यादि अनेक साधनांचें फार गोड विवरण केलें. ब्रह्मप्राप्तीसारख्या मोठ्या ध्येयाची सिद्धि संसारी जीवांना अशक्य कोटींतील वाटत असली तरी आपला रोजचा संसार त्यांत पदोपदीं उद्भवणाऱ्या अडचणींची तमा न बाळगतां प्रसन्नतेनें करून सर्वत्र आनंदाचें वातावरण निर्माण करण्याकरितांदेखील वरील साधनें उपकारक ठरतील. शांति व दयेचे सागर श्रीएकनाथांची हीच अपेक्षा आहे. महाराष्ट्रांतील रसिक आणि श्रद्धावान् वाचक वर्ग ती अपेक्षा पूर्ण करून आपल्या जीवनाचें मांगल्य साधेल या भरंवशानें त्यास भागवताच्या प्रांगणांत आणून सोडण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.

आम्ही सेवा करीत नाहीं, नाथ ती आमच्याकडून करवून घेतात ही धारणा असल्यामुळें ही वाङ्मयसेवा त्यांच्याच चरणीं अर्पण करून पुढील सेवेकरितां मी व माझे सहकारी मोकळे होत आहों.

विनम्र

**बळवंत गिरिराव घाटे**
अध्यक्ष, श्री एकनाथ संशोधन मंदिर

खडकेश्वर, **औरंगाबाद**
शके १८८२

# श्री एकनाथ संशोधन मंदिर
## संक्षिप्त इतिवृत्त

**संस्थेचें उद्दिष्ट :**

या संस्थेची स्थापना शके १८७३ च्या गोकुळअष्टमीस ऑगस्ट १९५१ मध्यें खालील उद्देशानें झाली.

( १ ) श्रीएकनाथ आणि इतर महाराष्ट्र संतांच्या अप्रसिद्ध ग्रंथांचें संकलन, संशोधन, प्रकाशन आणि अशा ग्रंथांच्या स्वस्त किंमतीच्या आवृत्त्या काढणें.

( २ ) मराठींतील संतवाङ्मयाचा हिंदी भाषेंतून आणि अन्य भाषांतील संतवाङ्मयाचा मराठींतून अनुवाद करणें.

( ३ ) संतचरित्रें आणि त्यांच्या वाङ्मयासंबंधीं अधिकारी व विद्वान् व्यक्तींचीं व्याख्यानें व प्रवचनें करविणें.

( ४ ) सांस्कृतिक संशोधनाकरितां शिष्यवृत्त्यांची योजना करणें.

सार्वजनिक संस्थांच्या नोंदणी कायद्याप्रमाणें २४ डिसेंबर १९५२ रोजीं या संस्थेची नोंदणी करण्यांत आली.

**संस्थेचें विश्वस्त मंडळ :**

या मंडळांत ह. भ. प. प्रा. सोनोपंत दांडेकर, एम्. ए., ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर, श्री. सेतु माधवराव पगडी, एम्. ए., आय. ए. एस्., श्री. बळवंतराव घाटे, बी. ए., एल्एल्. बी. आणि श्री. खंडेराव शिसोदे पाटील ढाकेफळकर हे आहेत.

**प्रकाशन कार्य :**

संस्थेनें गेल्या नऊ वर्षांत दहा पुस्तकें प्रकाशित केलीं. संस्थेच्या पुरस्कृत ग्रंथांत श्रीकृष्णदयार्णवाचा हरिवरदा ग्रंथ श्री. कोपर्डेकर खण्डशः प्रसिद्ध करीत आहेत. तीन वर्षांपूर्वीं डॉ. श्रीधरराव कुलकर्णी, एम्. ए., पीएच्. डी., हैद्राबाद, यांनीं लिहिलेला ‘ नाथांचा भागवत धर्म ’ हा विद्वत्ताप्रचुर प्रबंध संस्थेकडून प्रकाशित झाला. तो विद्वन्मान्य झाला व त्याला साहित्यसम्राट कै. न. चिं. केळकर पारितोषक मिळालें. इतर प्रकाशनांची यादी अन्यत्र दिली आहे. त्यापैकीं

'एकनाथ और तुलसीदास' या श्री. जगमोहनलाल चतुर्वेदी यांच्या पुस्तकास उत्तर प्रदेश सरकारनें २५० रु. चें पारितोषक दिलें. ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर यांचा 'हरिपाठविवरण' हा ग्रंथ इतका लोकप्रिय झाला कीं त्याची पहिली आवृत्ति केव्हांच संपून गेल्यामुळें दुसरी काढावी लागली. एकनाथदर्शनाचा दुसरा भागवतखंड यावेळीं प्रकाशित होत आहे. श्री. वा. ह. घारपुरे यांनीं तयार केलेला भावार्थ रामायणाचा संक्षेप लवकरच प्रसिद्ध करण्यांत येईल. भारत इतिहास संशोधक मंडळाचे श्री. शंकरराव जोशी यांनीं पैठण महात्म्यासंबंधीं एक माहितीपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध करण्याकरितां सामग्री गोळा केली आहे. त्याचेंहि प्रकाशन हातीं घेण्याचा विचार आहे. द्रव्याभावीं हीं सारीं प्रकाशनें अडून राहिलीं आहेत.

**हस्तलिखितें :**


वे. शा. सं. नारायणशास्त्री व्यास यांनीं खेडोपाडीं हिंडून सुमारें दीड हजार हस्तलिखितें गोळा केलीं आहे. त्यांची सूची तयार झाली असून संशोधनाचें काम लवकरच सुरू करण्यांत येईल. मराठवाड्यांत अनेक संतकवि, तत्त्वज्ञ आणि अन्यान्य शास्त्रांत पारंगत असे थोर विचारवंत पुरुष होऊन गेले. त्यांचें वैचारिक धन हस्तलिखिताच्या स्वरूपांत इतस्ततः विखुरलेलें पडलें आहे. त्याचें संकलन अविलंबेंकरून होणें अवश्य आहे. म्हणून संशोधनकार्यास संघटित स्वरूप देऊन संस्थेंत एक प्रधान संशोधन केंद्र निर्मितां यावें, अशी योजना आहे.

**ग्रंथालय :**

सध्यां संस्थेच्या ग्रंथालयांत सुमारें अकराशे थोर विचारवंतांच्या लेखणींतून उतरलेलीं पुस्तकें आहेत. भारतीय तत्त्वज्ञान, वैदिकवाङ्मय, संतवाङ्मय आणि भारतांतील प्रचलित धर्मांचा तौलनिक अभ्यास यांशीं संबंधित विषयांचा पदव्युत्तर अभ्यास करूं इच्छिणाऱ्यांना पुरेशीं साधनें उपलब्ध करून द्यावींत व त्या दृष्टीनें हिंदी, मराठी व इंग्रजी भाषांतील ग्रंथांनीं हें ग्रंथालय समृद्ध व अद्यावत् बनवावें, अशी ही योजना आहे.

**संस्थेची इमारत :**

कांहीं स्थानिक आणि ग्रामीण नाथभक्तांच्या उदार देणग्यावर संस्थेनें सुमारें तीस हजार रुपये मोलाची एक भव्य इमारत वरील कार्याकरितां निर्मिली



श्री एकनाथ संशोधन मंदिर, खडकेश्वर, औरंगाबाद

आहे. तिच्या उद्घाटनप्रसंगीं महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल श्री. श्रीप्रकाशजी यांनीं संस्थेचें उद्दिष्ट व तिच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करून पांचशें रुपयांची बहुमोल देणगी दिली. महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री ना. यशवंतरावजी चव्हाण यांनीं संस्थेस भेट देऊन काम पाहिलें व संतोष प्रदर्शित करून शासनाकडून ग्रंथालया-करितां इमारतीच्यावरील मजल्याच्या बांधकामासाठीं पंधरा हजार रुपयांचें व साधन-सामग्रीकरितां तीन हजार रुपयांचें अनुदान मंजूर केलें. याबद्दल उभयतां माननीयांची संस्था अत्यंत ऋणी आहे. ग्रंथप्रकाशनास माननीय शिक्षण सचिवांच्या व ना. शिक्षणमंत्र्यांच्या कृपादृष्टीमुळें पांच हजार रुपयांचें अनुदान मिळालें. याबद्दल संस्था त्यांचीहि कृतज्ञ आहे.

**सहाय्यकाचे प्रकार :**

संस्थेच्या वरील संकल्पित योजना पार पाडण्यास किमान पन्नास हजार रुपयांची आवश्यकता आहे. महाराष्ट्राबद्दल आदर व अभिमान बाळगणाऱ्या सज्जनाकडे संस्थेनें सहाय्याची मागणी केली आहे. सहाय्य खालील प्रकारांनीं देतां येतें.

( १ ) आश्रयदाते – एकदम एक हजार किंवा त्यापेक्षां अधिक देऊन, वा

( २ ) सन्मान्य दाते – एकदम पांचशें रुपयापेक्षां अधिक आणि एक हजारा-पेक्षां कमी देऊन, वा

( ३ ) दाते – एकदम एकशें एक पेक्षां अधिक आणि पांचशेंपेक्षां कमी देऊन,

( ४ ) आजीव सभासद – एकदम शंभर रुपये देऊन, वा

( ५ ) हितचिंतक – शंभरापेक्षां कमी द्रव्य देऊन, वा

( ६ ) वार्षिक सभासद – प्रतिमासी एक रुपया किंवा एकदम बारा रुपये देऊन बनतां येते. यापैकीं शक्य असेल त्या प्रकारानें अधिकांत अधिक द्रव्यसहाय्य करून श्रेय व प्रेय संपादावें, अशी नम्र विनंती आहे.

**गोपाळराव पालिमकर**
सेवानिवृत्त प्राचार्य, बीएड् कॉलेज
कार्यवाह

**बळवंतराव घाटे**
सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश
अध्यक्ष

**लक्ष्मणराव कुलकर्णी**
सरकारी ॲडव्होकेट
सहकार्यवाह

# प्रस्तावना

एकनाथदर्शन खंड दुसरा हा एक अद्वितीय ग्रंथ श्री एकनाथ संशोधन मंदिरामार्फत प्रसिद्ध होत आहे. या ग्रंथांत ज्या २२ गृहस्थांनीं संत एकनाथ यांच्या भागवताबद्दल व त्यांच्या जीवनविषयक दर्शनाबद्दल प्रपंच केला आहे व ज्या अधिकारी व्यक्तींनीं आपलीं वाङ्मयसुमनें संत एकनाथ यांच्या पदीं वाहिलीं आहेत, त्यांची योग्यता लक्षांत घेतां अशा तऱ्हेचा व्यापक बुद्धीनें लिहिलेला व संग्रहित केलेला ग्रंथ मराठी वाङ्मयांत क्वचितच आढळेल. मराठी साहित्यांत व विशेषतः संतवाङ्मयांत ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी, नाथांचें भागवत, तुकोबांची गाथा व रामदासांचा दासबोध या चार ग्रंथांना एक विशेष महत्त्व आहे.

**काहाण्या कथा गोष्टी पवाड । नाना अवतारे चरित्रें वाढ ।**
**त्या समस्तामध्यें जाड । अध्यात्मरचना ॥**

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत मराठी सारस्वतांत संतांची रचना ही श्रेष्ठ व ‘ जाड ’ मानली जात होती व आहेहि. या काळांत काहाण्या, कथा, पुराणें व इतिहास यावर लेखन झालें नाहीं असें नाहीं. सज्जनांचीं चरित्रें, अन्यांचीं चरित्रें हीहि आदरानें अगर अन्यथा गायिलीं गेलीं. पण अध्यात्म वाङ्मयाला, अध्यात्म विद्येच्या विवरणाला जें स्थान प्राप्त झालें तें खरोखरच जाड होतें. ज्ञानेश्वरांनीं भगवद्गीतेवर टीका करून अमूल्य अशी ग्रंथरचना केली. गीता हा मोठा विषय, गीता सांगणारा तर प्रत्यक्ष भगवान् आणि त्यांत ज्ञानेश्वरां-सारख्या साहित्याचार्यांची व साक्षात्कार झालेल्या पुरुषाची भर पडल्यानें सुवर्णाला सुगंध प्राप्त व्हावा असें झालें. आपल्या भावार्थ-दीपिकेनें त्यांनीं अमृतालाहि मागें सारलें. तसेंच थोडेसें संत एकनाथ यांनीं श्रीमत् भागवतावर टीका रचून कार्य केलें आहे.

वेद व उपनिषदें यांच्यांतील साऱ्या अध्यात्म विद्येचें सार गीतेमध्यें

आहे. तिच्या उद्घाटनप्रसंगीं महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल श्री. श्रीप्रकाशजी यांनीं संस्थेचें उद्दिष्ट व तिच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करून पांचशें रुपयांची बहुमोल देणगी दिली. महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री ना. यशवंतरावजी चव्हाण यांनीं संस्थेस भेट देऊन काम पाहिलें व संतोष प्रदर्शित करून शासनाकडून ग्रंथालया-करितां इमारतीच्यावरील मजल्याच्या बांधकामासाठीं पंधरा हजार रुपयांचें व साधन-सामग्रीकरितां तीन हजार रुपयांचें अनुदान मंजूर केलें. याबद्दल उभयतां माननीयांची संस्था अत्यंत ऋणी आहे. ग्रंथप्रकाशनास माननीय शिक्षण सचिवांच्या व ना. शिक्षणमंत्र्यांच्या कृपादृष्टीमुळें पांच हजार रुपयांचें अनुदान मिळालें. याबद्दल संस्था त्यांचीहि कृतज्ञ आहे.

**सहाय्यकाचे प्रकार :**

संस्थेच्या वरील संकल्पित योजना पार पाडण्यास किमान पन्नास हजार रुपयांची आवश्यकता आहे. महाराष्ट्राबद्दल आदर व अभिमान बाळगणाऱ्या सज्जनाकडे संस्थेनें सहाय्याची मागणी केली आहे. सहाय्य खालील प्रकारांनीं देतां येतें.

( १ ) आश्रयदाते – एकदम एक हजार किंवा त्यापेक्षां अधिक देऊन, वा

( २ ) सन्मान्य दाते – एकदम पांचशें रुपयापेक्षां अधिक आणि एक हजारा-पेक्षां कमी देऊन, वा

( ३ ) दाते – एकदम एकशें एक पेक्षां अधिक आणि पांचशेंपेक्षां कमी देऊन,

( ४ ) आजीव सभासद – एकदम शंभर रुपये देऊन, वा

( ५ ) हितचिंतक – शंभरापेक्षां कमी द्रव्य देऊन, वा

( ६ ) वार्षिक सभासद – प्रतिमासी एक रुपया किंवा एकदम बारा रुपये देऊन बनतां येते. यापैकीं शक्य असेल त्या प्रकारानें अधिकांत अधिक द्रव्यसहाय्य करून श्रेय व प्रेय संपादावें, अशी नम्र विनंती आहे.

**बळवंतराव घाटे**
सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश
अध्यक्ष

**गोपाळराव पालिमकर**
सेवानिवृत्त प्राचार्य, बीएड् कॉलेज
कार्यवाह

**लक्ष्मणराव कुलकर्णी**
सरकारी ॲडव्होकेट
सहकार्यवाह

# प्रस्तावना

एकनाथदर्शन खंड दुसरा हा एक अद्वितीय ग्रंथ श्री एकनाथ संशोधन मंदिरामार्फत प्रसिद्ध होत आहे. या ग्रंथांत ज्या २२ गृहस्थांनीं संत एकनाथ यांच्या भागवताबद्दल व त्यांच्या जीवनविषयक दर्शनाबद्दल प्रपंच केला आहे व ज्या अधिकारी व्यक्तींनीं आपलीं वाङ्मयसुमनें संत एकनाथ यांच्या पदीं वाहिलीं आहेत, त्यांची योग्यता लक्षांत घेतां अशा तऱ्हेचा व्यापक बुद्धीनें लिहिलेला व संग्रहित केलेला ग्रंथ मराठी वाङ्मयांत क्वचितच आढळेल. मराठी साहित्यांत व विशेषतः संतवाङ्मयांत ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी, नाथांचें भागवत, तुकोबांची गाथा व रामदासांचा दासबोध या चार ग्रंथांना एक विशेष महत्त्व आहे.

**काहाण्या कथा गोष्टी पवाड । नाना अवतारे चरित्रें वाढ ।**
**त्या समस्तामध्यें जाड । अध्यात्मरचना ॥**

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत मराठी सारस्वतांत संतांची रचना ही श्रेष्ठ व 'जाड' मानली जात होती व आहेहि. या काळांत काहाण्या, कथा, पुराणें व इतिहास यावर लेखन झालें नाहीं असें नाहीं. सज्जनांचीं चरित्रें, अन्यांचीं चरित्रें हीहि आदरानें अगर अन्यथा गायिलीं गेलीं. पण अध्यात्म वाङ्मयाला, अध्यात्म विद्येच्या विवरणाला जें स्थान प्राप्त झालें तें खरोखरच जाड होतें. ज्ञानेश्वरांनीं भगवद्गीतेवर टीका करून अमूल्य अशी ग्रंथरचना केली. गीता हा मोठा विषय, गीता सांगणारा तर प्रत्यक्ष भगवान् आणि त्यांत ज्ञानेश्वरां-सारख्या साहित्याचार्यांची व साक्षात्कार झालेल्या पुरुषाची भर पडल्यानें सुवर्णाला सुगंध प्राप्त व्हावा असें झालें. आपल्या भावार्थ-दीपिकेनें त्यांनीं अमृतालाहि मागें सारलें. तसेंच थोडेसें संत एकनाथ यांनीं श्रीमत् भागवतावर टीका रचून कार्य केलें आहे.

वेद व उपनिषदें यांच्यांतील साऱ्या अध्यात्म विद्येचें सार गीतेमध्यें

आलें आहे. वेदांच्याइतकीच मान्यता पावलेला व गीतेइतकीच ज्याची योग्यता म्हणतां येईल असा ग्रंथ श्रीमद्भागवत हा आहे. श्रीमद्भागवत ही व्यासांची समाधिभाषा मानली जाते. भागवत या ग्रंथाचा प्रभाव सर्व साधुसंतांच्या रचने-वर व जीवनावर पडलेला आहे. भागवत हें वेदरूपी अमृताचें अमृत आहे आणि शुकाचार्यांनीं आपल्या अलौकिक वाणीनें तें सांगितलें असल्यानें त्यांतील भावमधुरता याला उपमाच देतां येत नाहीं. गीतेवर ज्याप्रमाणें अनेक टीका झाल्या आहेत, त्याप्रमाणें भागवतावरहि अनेक टीका झालेल्या आहेत. तथापि भागवतावरील संस्कृतांत लिहिलेल्या टीका अगर मराठींत लिहिलेल्या टीका या सर्वांत एकनाथांचें भागवत हें सर्वश्रेष्ठ ठरतें असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाहीं. भागवत धर्माची पताका केवळ मराठी संतांनींच मिरवली असें नव्हे तर उत्तर हिंदुस्थानांत, गुजराथ, बंगाल, द्रविड देश व कर्नाटक इत्यादि प्रांतांत जन्म-लेल्या संतांनीं ती मिरवली आहे. ज्ञानेश्वरांनीं ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्यासाठीं गोदावरीच्या दक्षिण तीरीं ' मराठीचिये नगरीं ' अवतार घेतला आणि गीतेंत सांगितल्याप्रमाणें जेव्हां अधर्म वाढतो तेव्हां भगवान् अवतार घेतात अशी ग्वाही दिली आहे. एकनाथांच्या शब्दांत सांगावयाचें तर

**जैं धर्माची वाट मोडे । अधर्माची शीग चढे ।**
**तैं आम्हां येणें घडे । युगायुगीं ॥**

आणि जणुंकाहीं ही प्रतिज्ञा पुरी करण्यासाठीं एकनाथ जन्मले व आपल्या भागवत ग्रंथानें धर्मप्रवर्तनाचें काम केलें आणि उद्धवाचें प्रेम पाहून अति उत्तम असें गुह्य ज्ञान श्रीकृष्णानें सांगितलें.

• **हें ज्ञानाचें सोलींव ज्ञान । हें वेदाचें विसावतें स्थान ।**

तें एकनाथांनीं भागवत ग्रंथांत सकळ जनासाठीं उपलब्ध केलें. वास्त-विक जे अधिकारी असतील तेंच ब्रह्मज्ञानाला प्राप्त आहेत. स्त्रिया व शूद्र यांना तो अधिकार नाहीं

**तंव श्रीकृष्णराओ म्हणे उद्धवदेवा । हा ज्ञानरत्नाचा ठेवा ।**
**भलतेयांहातीं नेदावा । अधिकारेंविण ।**
**हें निरूपण न सांगावें नास्तिकां । न बोलावें दांभिकां ।**
**आईकों नेदावें निंदकां । विशेषतां ॥**

अशी परंपरा असूनसुद्धां नाथांनीं आपल्या उदार अंतःकरणानें यच्च-यावत् जनासाठीं सर्व दरवाजे उघडे करून ज्ञानाचें भोजन मुक्तद्वार करून घातलें. ज्यांना आश्रम धर्म नाहीं, ज्यांना श्रौत कर्म नाहीं, जे शूद्र जन, त्यांच्यांत या ग्रंथाच्या ज्ञानानें विरक्ति उत्पन्न होईल व ते

**मग चित्तें वित्तें जीवितें । रिघे सद्गुरूतें अनन्य शरण ।**

असे होतील. निर्लोभानें व कृपेनें सद्गुरु शूद्र जनांना उपदेश करतात तेव्हां

**तेथें न लगे दूषण उपदेशा ।**

असें नाथांनीं सांगितलें आहे. तथापि ही जी नवीन प्रथा त्यांनीं पाडली, तीहि आपले सद्गुरु जनार्दन स्वामी यांना विचारूनच. " **जयाची दृष्टि समसमान । स्त्री पुरुष अवलोकन ।** " त्यानेंच स्त्रियांना उपदेश करावा असा त्यांच्या गुरूनें कौल दिला. क्षत्रिय, वैश्य, स्त्री व शूद्र यांची श्रद्धा पाहून ब्रह्मज्ञानाचा उपदेश केल्यास तो दोष नाहीं. नाथांनीं सकळां-साठीं भागवत रचलें हें उघड आहे. भागवत धर्म म्हणजे भक्ति धर्म किंवा भक्ति-प्रधान धर्म हें उघड आहे.

ज्ञानेश्वरींत म्हटलें आहे कीं वाक्चातुर्यें जरी मोहित होऊन ज्ञानेश्वरी वाचली तरी कालांतरानें भक्तिमार्गाकडे मनुष्य वळेल आणि वाक्चातुर्य हें एक प्रलोभन संतांनीं मानलें असलें तर त्यांत वावगें कांहीं नाहीं. या दृष्टीनें विचार करतां एकनाथी भागवत आध्यात्मिक विचाराचा जसा एक अमूल्य ठेवा आहे तसाच हा ग्रंथ साहित्याच्या दृष्टीनेंहि एक श्रेष्ठ दर्जाची रचना आहे. या रचनेंत खरोखर श्रेष्ठ साहित्यहि आहे हें मान्य करावें लागेल.

**ब्रह्मरसें रसाळ कथा । निरूपिलें भागवता ।**

हें खरें आहे. ग्रंथाचा मुख्य उद्देश अध्यात्मपर व त्यांत ज्ञान, भक्ति, वैराग्य या गोष्टी साहाजिकच आल्या आहेत. ' **वाचे बरवें कवित्व** ' पण त्याचबरोबर परतत्त्वाचा विचार असावा हीच गोष्ट नाथांचें भागवत वाचतांना पटते.

**प्रतिपदीं पावावें परब्रह्म । हाचि कवित्वाचा कवित्व धर्म ।**

असें नाथांनीं भावार्थ रामायणांत सांगितलें आहे. मनामध्यें सद्भाव असल्याशिवाय ग्रंथरचना होत नाहीं. अनेक लोक

**उपट्या पत्रावळी करोनिया गोळा । कवित्वाची कळा दाखविती ॥**

अशी नाथांची रचना नाहीं. ' भागवताची अपूर्वता ' या प्रकरणांत उत्प्रेक्षा अलंकाराचीं उदाहरणें नाथांची साहित्याच्या दृष्टीनेंहि श्रेष्ठता दाखवितात. '**कीं माहेरा आली कणव ।** ', ' **ना ते निर्गुणाचे अवेव ।**', '**कीं ब्रह्मविद्येचे श्रृंगार ।** ' यांतील उत्प्रेक्षा कोणाला आनंद देणार नाहीं ?

भागवतावर मराठी टीका करून मराठी भाषेचें मोठेपण नाथांनीं राखलें आहे.

**संस्कृतकर्ते ते महाकवी । मा प्राकृतीं काय उणीवी ।**
**नवी जुनी म्हणावी । कैसेनि केवीं सुवर्णसुमनें ॥**

*　　　*　　　*

**कपिलेचें म्हणावें क्षीर । मा इतरांचे तें काय नीर ।**

*　　　*　　　*

**संस्कृत वंद्य प्राकृत निंद्य । हे बोल काय होती शुद्ध ।**

असें सांगून नाथांनीं म्हटलें आहे कीं,

**देवासी नाहीं वाचाभिमान । संस्कृत प्राकृत त्या समान ।**

मला वाटतें, भारतांत सध्यां होत असलेल्या भाषाविषयक भावगर्दीत ही नाथांची विचारसरणी खरोखरच उपयुक्त ठरणार आहे. पैठणसारख्या परंपरागत व कर्मठ वातावरणांत मराठी भाषेंत हा ग्रंथ त्यांनीं लिहिला, यावरून त्यांच्या मनाचें धैर्य समजून येण्यासारखें आहे. अद्वैत वेदांत लोकभाषेंत सांगून खरा लोकधर्म त्यांनीं लोकप्रिय केला. ब्रह्मज्ञान यांतील मिरास नाहींशीं करून पृथ्वी, आकाश व वायु याप्रमाणें ज्ञान हें सर्वांचें व सर्वांसाठीं आहे ही भावना जागृत केली.

**माझी मराठी भाषा चोखडी । परब्रह्में फळली गाढी ।**

असें घडवून आणलें. नाथांची भागवतावरील टीका ही जणुंकांहीं त्यांची जीवननिष्ठाच वाङ्मयरूपानें सदेह झाली आहे असें वाटतें. त्यांच्या समत्वबुद्धीचें व्यक्तिमत्व त्यांच्या ओव्यांतून दिसून येतें. संसारांत राहून श्रेष्ठ धर्माचें पालन कसें होऊं शकते, याचें विवरण नाथांच्या भागवतांत दिसून येतें. त्यांची भाषा सरळ व सुगम आणि त्यांत वावरणाऱ्या भावना श्रेष्ठ व पवित्र अशाच आहेत. मूळ ग्रंथ संस्कृतांत असला तरी नाथांनीं तें भागवत

' यथार्थें अर्थविलें ' व ' निःशब्दाच्या ' गोष्टी सांगितल्या.

' भागवतांतील अद्वैत सिद्धांत ' याचा परामर्श नाथांनीं आपल्या भागवतांत घेऊन त्याचा अर्थ उत्तम प्रकारें समजावून सांगितला आहे. कोणत्या साधनावर भर दिल्यानें व तें कसें आचरण्यांत आणल्यानें साध्याची प्राप्ती होते, याचा विचार करून संसाराचें बंधन तोडावयाचें तर ब्रह्मविद्या हेंच एक साधन आहे हा मान्य झालेला सिद्धांत अनेक दृष्टांत व उपमा देऊन त्यांनीं सांगितला. जीव व ब्रह्म हे एक आहेत असें प्रतिपादून नाथ म्हणतात,

**ब्रह्माऽहमस्मि ऐशी वाणी । एक वेळ पडली कानीं ।**

असें झाल्याबरोबर अविद्या नाहींशीं होते. मनुष्य जागृत होतो व मग जगाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन बदलून जातो. मनांतील वासना नाहींशीं झाल्याशिवाय नुसता संन्यास घेण्यानें भागत नाहीं. हें सांगतांना ते म्हणतात,

**ब्रह्मज्ञानाविण संन्यासी । नटाचें ऐसें मुंडण त्यासी ।**
**सोकला मिष्टान्न भिक्षेसी । वृथा गेरूसी नाशिले ॥**

नरदेह प्राप्त होऊन जो ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेत नाहीं

**तो लांडा गर्दभ जाण । पुच्छेवीण दुपायी ॥**

म्हणून ब्रह्मज्ञानप्राप्ति हें मनुष्याचें ध्येय आहे व ब्रह्मज्ञान म्हणजे अद्वैताचा अनुभव व वासना बीज नाहींसें होणें. भागवत धर्म हा अद्वैत धर्मापासून निराळा नाहीं. भागवत धर्म हा सनातन आहे आणि हा भागवत धर्म सोपा आहे हें सांगतांना तो

**पव्हणियाहूनि पाय उतारा । भागवत धर्म अति सोपारा ।**
**तो मार्गु दावावया पुरा । हांकारी स्त्रीशूद्रां पंचाध्यायीं ॥**

भागवत धर्म हा सोपा पण त्यामुळें जी प्राप्ति होणार ती मात्र परमात्मप्राप्ति हें निश्चित. भागवत धर्माचा अधिकारी प्रत्येकाला होतां येते. तेथें जातिविषयक, लिंगविषयक अधिकार कोणाला नाहीं. भागवत धर्म म्हणजे लोकशाही धर्म आहे. ज्याला ज्याला देह आहे त्याला त्याला या धर्माचा अधिकार आहे. भागवत धर्म म्हणजे मानव धर्म होय व या मार्फत उपलब्ध होणारा मोक्षमार्ग सर्वांच्यासाठीं मोकळा आहे. वेद, शास्त्र, व्युत्पत्ति याशिवाय

निजात्मप्राप्ति करून देणारा हा धर्म आहे. वेदशास्त्रपठण न करतां कोण-कोणते जड व मूढ लोक तरले यांचा इतिहास नाथांनीं दिला आहे. ज्या द्विज श्रेष्ठांनीं या भागवत भक्तिमार्गाला विन्मुखता दाखविली, त्यांच्यापेक्षां सामान्य लोक जे भक्त झाले ते श्रेष्ठ असा अभिप्राय नाथांनीं दिला आहे. सगुण व निर्गुण दोन्ही स्वरूपांत भगवंताचें वंदन व पूजन करणारे सर्व भक्तच. भागवत हें एक शास्त्र आहे व त्यांत दोन्ही भक्तीचा समावेश होतो. भागवत धर्मीय लोक वेदविद्येचे विरुद्ध नाहींत पण भक्तीला ते अधिक मानतात व गीतेमध्यें भक्तिमार्गच श्रेष्ठ मानला आहे असें मत ते मांडतात.

**श्रुति स्मृति हे दोन्ही डोळे । येणेंवीण जे आंधळे ।**
**तेही हरिभजनीं धांवतां भावबळें । पडेना आडखुळे सप्रेम योगें ॥**

भागवत धर्मांत भक्ति श्रेष्ठ व ती भक्ति म्हणजे विशेषेकरून विठ्ठलाची असें नाथांनीं सांगितलें आहे. भगवत्भजन अगर हरिकीर्तन कलियुगांत मोक्ष-प्राप्तीचें सुगम साधन आहे असें नाथ सांगतात.

या एकनाथदर्शन खंड दुसऱ्यांत एकनाथी भागवताबद्दल अनेक दृष्टि-कोनांतून लिहिलेले लेख संग्रहित केले आहेत. हे लेख भक्तिभावानें लिहिले आहेत, थोडे डोळसपणें लिहिले आहेत, कांहीं इतिहास दृष्टीनें लिहिले आहेत. तथापि सर्व लेखांची पार्श्वभूमि सारखीच आहे. हिऱ्याचे पैलू असतात, त्याप्रमाणें या संग्रहांत एकनाथी भागवताचे निरनिराळे पैलू दाखविण्यांत आले आहेत. तात्पर्य, वर सांगितल्याप्रमाणें हा संग्रह एका अर्थानें रत्नभांडार झाला आहे व खरोखर मराठी समालोचनात्मक वाङ्मयांत एक उत्कृष्ट भर पडली आहे. हा ग्रंथ वाचतांना वाचकाला सतत मधुर अशाच वातावरणाचा अनुभव येईल. भक्तिमार्गी, ज्ञानमार्गी, कर्ममार्गी या तिन्ही वृत्तीच्या वाचकांना आप-ल्याला आवडेल तें तर त्यांत सांपडेलच, पण त्याहिपेक्षां अधिक सांपडेल व श्रेष्ठ आनंदाचा उपभोग त्यांना खास लाभेल.

या चांगल्या ग्रंथाला दृष्ट लागूं नये म्हणून प्रस्तुत लेखकाची प्रस्तावना एखादें बाहुलें ठेवावें त्याप्रमाणें ठेवली आहे.

**न. वि. गाडगीळ**
राज्यपाल, पूर्व पंजाब

# पुरस्कार

एकनाथदर्शनाचा भागवतखंड नाथषष्ठीस प्रकाशित होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. नाथांचें भागवत म्हणजे ज्ञानेश्वरीची सुबोध आवृत्तिच आहे. भारतांतील अनेक भाषांत भागवताचीं रूपांतरें, विवरणें इत्यादि अनेक सत्पुरुषांनीं आणि कवींनीं केलेलीं आहेत. त्यांत दोन प्रकार दिसतात. एक तर सबंध भागवतावर लिहावयाचे अथवा तितके लिहवत नसेल तर दशम स्कंधावर लिहावयाचे. पण नाथांनीं तिसराच मार्ग काढला. तत्त्वज्ञानप्रधान एकादश स्कंधावर त्यांनीं लिहिलें. एकादश स्कंधावर इतकें रसाळ, अनुभवयुक्त, विस्तृत विवरण अन्य कोणत्याहि भाषेंत झालेलें माझ्या पाहण्यांत नाहीं.

नाथांची भूमिका सामान्य सांसारिक मनुष्याला हळूं हळूं परमार्थाकडे घेऊन जाण्याची असल्यामुळें त्यांचें भागवत लोकभोग्य झालें आहे. जसा इंजिनीअर घाटांत हळूं हळूं रस्ता चढवतो, तशी नाथांची विवरणशैली आहे. मला अशी आशा आहे कीं महाराष्ट्र जनतेच्या चित्तशुद्धीला नाथांचा "वाग् विसर्ग" फार उपयोगी पडणारा आहे या गोष्टीची जाणीव एकनाथदर्शनाचा हा खंड चांगल्यारीतीनें करून देईल.

बिहार यात्रा
२८-१२-१९६०

विनोबाचा
जयजगत्

# नाथभागवत प्रशस्ति

श्रीभागवत वरानें केलें यश शुद्ध एकनाथानें ।
येणें प्रमुदित झाला साधु जसा बाळ सेवितां थानें ॥
ग्रंथ श्रीभागवत श्रीरामायण करी सुविस्तर ते ।
जरि न रचितां दयानिधि केवळ जड जीव तरि कसे तरते ॥ **मोरोपंत**

कलियुगीं नाम तारक निश्चिती । दृष्टांत श्लोक भागवतीं ।
त्याहीवरी सद्‌गुरुभक्ति । महिमा वर्णिती स्वमुखें ॥
श्रीनाथांचें प्रसाद वचन । ऐकतां तटस्थ सभाजन ।
पंडितासी नाहीं देहभान । समाधिस्त जाण ते होती ॥
जे वेद शास्त्रांचे निज मथित । तो ग्रंथ महाभागवत ।
त्याचेवरी टीका केली प्राकृत । जरी मणिकर्णिकेंत बुडविलें ॥
एकनाथें एकादशावरी देखा । स्वमुखें केली प्राकृत टीका ।
त्याचा अर्थ पाहोनि निका । सप्रेम सुखा पावलों ॥
पुराणीं श्रेष्ठ भागवत । याहीवरी उद्धवगीत ।
जरी तुमच्या मुखें प्राकृत होत । तरी उपयोगी पडते बहुतांच्या ॥
ऐसे श्रोतयांचे आर्त देखा । देखोनि संतोष वाटला निका ।
एकादशावरी अनाथसखा । प्राकृत टीका आरंभत ॥ **महिपती**

श्रीआदिनाथ गुरु दत्त जनार्दनासी । ते साधिलें करुनि सन्निध साधनासी ।
केली तयावरुनि भागवताख्य गाथा । साष्टांग वंदिन दयार्णव एकनाथा ॥
वाराणशींत विदुषांप्रति मान्य झाली । एकादशावरि टिका सुगमार्थ केली ।
ब्रह्मीं स्वकर्म विनियोग जनोपकारी । श्रीएकनाथ विबुधा भरणावतारी ॥

**कृष्णदयार्णव**

दृष्टांत सुंदर समर्पकही असावा । कीं वाचका विषय वर्ण्य झणीं कळावा ।
वैशिष्ट्य हें अनुभवास जयांत येतें । तें नाथभागवत तारक भाविकांतें ॥ १ ॥
जो प्राकृतांत अनुवाद म्हणूनि कोप । काशीस्थ-पंडितवरांप्रति ये अमाप ।
ज्याचें परीक्षणिं परी मनिं तेच धाले । तें नाथभागवत पूर्ण तिथेंच झालें ॥ २ ॥
सेवा-प्रसन्न गुरुवर्य जनार्दनांनीं । प्रत्यक्ष दत्तपदिं वाहुनि शिष्य रानीं ।
ज्यासाठिं पूर्ण वरदानहि देववीलें । तें नाथभागवत या जगिं धन्य झालें ॥ ३ ॥
ही नाशवंत तनु तो अविनाशि आत्मा । सर्वत्र एकचि सख्या जगिं या परात्मा ।
जाणून प्राप्त करि कर्म नि मुक्त होईं । हें नाथभागवतसार बघूनि घेईं ॥ ४ ॥

पोटांत भूक परि घांस न बाळ घेतां । काऊ चिऊ करुनि जेववि त्यास माता ।
बद्धास बोध हळुंवार तसाच ज्यांत । तें नाथभागवत नित्य असो स्मृतींत ॥ ५ ॥
जें ज्ञान शुद्ध हरिची दृढ नित्यभक्ति । तैशी विवेकसहिता विषयीं विरक्ति ।
यांचें पुनः पुनरपि कथितें महत्त्व । तें नाथभागवत हृद्य असें कवित्व ॥ ६ ॥
कृष्ण स्वधाम गमनीं प्रिय उद्धवातें । जें ज्ञान देऊनि हरी विरहव्यथेतें ।
तें ज्यांत होय उघडें नि सुबोध लोकां । तें नाथभागवत कीं भवसिंधु नौका ॥ ७ ॥
आधार भागवत धर्म सुमंदिराचा । जो एक मुख्य म्हणतात सखोल साचा ।
ज्याचेनि पावन समृद्ध मराठि भाषा । तें नाथभागवत भारत-भूमि-भूषा ॥ ८ ॥

**विश्वनाथ केशव छत्रे,** कल्याण

नाथांच्या भागवता आलें वैशिष्ट्य आगळे लोकीं ।
लोकींच या न केवळ गाती महती अनंत कविलोकीं ॥
मेरुमणी नाथांच्या वाङ्मयमणि मालिकेंतला विलसे ।
सागर शांत गमे हा नाथांचा ग्रंथरत्न ज्यांत वसे ॥
गांभीर्य सागराचें विस्तृतता रत्न गर्भता यांत ।
तळमळती रत्नांचें दर्शन घ्यायास रसिक जन खास ॥
नाथांचा सागर हा खारट नोहे नव्हेच दुर्लंघ्य ।
माधुर्य यांत मोठें आहे सर्वांस हा सहजगम्य ॥
सहजप्राप्त कुणाही तत्त्वें यांतील वाचितां हर्षे ।
येती आनंदोर्मी जीवन सौख्यांत मनुज आकर्षे ॥
साधे भोळे भाविक तरती हा ग्रंथ वाचतां सहज ।
ग्रंथांतिल रत्नांचा लाभ घडे वाचकां इथें सुलभ ॥
परमार्थ वा प्रपंचीं भेदाभेद न असेंच हा दावी ।
रत्नें अनमोल अशीं भागवतीं अमित नित्य वेंचावीं ॥
सुगमार्थ याच ग्रंथीं गरुडाची आढळे भरारी ना ।
काठिण्य सुलभता ही प्रतिभावंताविना न हो कोणा ॥
वैभव वाक्प्रदर्शन नव्हता हेतू मुळींच नाथांचा ।
राष्ट्राच्या उदयाचा होता सत्हेतु हो मनीं त्यांच्या ॥
सौंदर्य मोहि सकला सोपा आनंददायि हा ग्रंथ ।
सोपा सकल जनाला दावी भक्तास मुक्तीचा पंथ ॥

उत्सन्न धर्म झाला हतबल झाला समाज हा अमुचा ।
धर्मध्वज फडकत हा नाथांनीं ठेविलाच राष्ट्राचा ॥
नाथांच्या भागवतां आलें वैशिष्ट्य या विचारांनीं ।
हानी या देशाची धर्माची टाळलीच नाथांनीं ॥
अक्षर-वाङ्मय-सागर मंथुनि धर्मामृतास दे जनन ।
नाथांच्या भागवतां करिती नित सुजन देवही नमन ॥

**श्री. रा. देव,** धाराशिव ( उस्मानाबाद )

नाथा ! तुझा भागवताख्य ग्रंथ । केला तुवां गोडचि प्राकृतांत ॥
आबालवृद्धां बहु जो सुबोध । जेणें कळे अंतरिं आत्मबोध ॥ १ ॥
भाषा जनां संस्कृत ती कळेना । वेदांत कांहीं मनिं ऊमजेना ॥
जाणोनिया हेंचि मराठि ग्रंथ । निर्माण केलासि तुवां यथार्थ ॥ २ ॥
अज्ञान-योगें जन जे जगांत । नाना पथें हिंडुनि शीणतात ॥
दावावया मार्ग खरा तयाला । सद्ग्रंथ हा भागवताख्य केला ॥ ३ ॥
नाथा ! तुझा उज्वल ग्रंथ झाला । ज्ञानाब्धि कीं हा जणुं निर्मियेला ॥
यामाजि रत्नें बहुमोल नाना । मेवाच कीं हा रसिकां जनांना ॥ ४ ॥
दृष्टांत साहित्य जयांत पूर्ण । नाहीं कुठें लेशहि ज्यांत न्यून ॥
सर्वांग जो सुंदर ग्रंथराज । दावी पुराण-श्रुति-शास्त्र-बीज ॥ ५ ॥
ज्यासी तुला नाहिंच वाङ्मयांत । केला असा ग्रंथ तुवां जगांत ॥
वेदांत गुह्याप्रति जो यथार्थ । दावी जना सोज्वळ सत्य पंथ ॥ ६ ॥
ज्या वाचितां आणिक ऐकतांची । होई पहा शुद्धि खरी मनाची ॥
सद्भक्ति वैराग्य नि आत्मबोध । सद्भाविका साच मिळे अगाध ॥ ७ ॥
आश्चर्यवत् पाहति यासि कोणी । आश्चर्यवत् ऐकति यासि कानीं ॥
ऐकोनिया बोलति वा अहाहा । ये पूर प्रेमाश्रुजलप्रवाहा ॥ ८ ॥
भावें भजा ग्रंथवरा तुम्ही या । कां शीणतां साधनिं अन्य वाया ॥
सद्ग्रंथ हा साच अनन्य भावें । आवर्तिल्या ज्ञान मिळे स्वभावें ॥ ९ ॥
सामान्य हा ग्रंथ नव्हेच खास । वाचा सदा भक्तिमनें तयास ॥
अभ्यासुनी पाहिल पूर्ण अर्थ । होईल तो या भुवनीं कृतार्थ ॥ १० ॥
नाथा ! मदीयांतरिं त्वां वसावें । त्वद्ग्रंथिंचें गूज सुजाणवावें ॥
नाथा ! कृपेनें मजसी पहावें । रामा भवाब्धींतुनि पार न्यावें ॥ ११ ॥

**रा. ब. खाडिलकर,** वकील, नाशिक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ...................... वि: ..................
क्रमांक ...................... नों: दि: ..................
दा. क. ११०१८

# श्री एकनाथी भागवताची विषयसूची

## : संपादकीय :

## अध्याय पहिला

श्लोक संख्या : २४ ओवी संख्या : ३९७

सद्गुरूस नमन १, गणेशास नमन २-१६, सरस्वतीस नमन १७-३४, संतांस नमन ३५-६८, कुलदेवतेस नमन ६९-७८, श्रीजनार्दन स्वामीस नमन ७९-११५, संस्कृत कवींस नमन ११६-१२०, प्राकृत कवींस नमन १२१-१२२, संस्कृत व प्राकृत भाषेचें साहश्य१२३-१३०, भानुदासास नमन १३१-१३८, विश्वामिलास नमन १३९, याज्ञवल्कीस नमन १४०, भूतमात्रांस नमन १४१, श्रीदत्तात्रेय स्वामीस नमन १४२-१४४, भागवत सांप्रदाय परंपरा १४५-१५८, परीक्षितीचा संक्षिप्त वृत्तांत १५९-१६६, ब्राह्मणांस नमन १६७ १७०, संतांनीं नाथांचा केलेला गौरव १७१-१७६, नाथांची संतांपाशीं प्रार्थना १७७-१७८, संतांची नाथांस अनुज्ञा १७९-१८०, उपोद्घात १८१-१८३, परीक्षितीचे उद्गार १८४, श्रवणाविषयीं उपन्यास १८५-१८६, श्रीकृष्णचरित्राची अपूर्वता १८७-२०२.

श्लोक १-५—श्रीशुक संभाषण, श्रीकृष्णहस्तें दैत्यांचें निर्दलन २०३, कौरवपांडवांचा गृहकलहानें नाश २०४-२१८, श्रीकृष्णाचा कुलनिर्दलनासंबंधानें चाललेला विचार २१९-२३८.

श्लोक ६-७—श्रीकृष्णमूर्तीचें सौंदर्य व चित्तादि इंद्रियांची तद्रूपता २३९-२५७, चरणाचा महिमा २५८-२६३, कीर्तीचा महिमा २६४-२७६.

श्लोक ८-९—परीक्षितीची प्रार्थना, यादवांस ब्रह्मशाप होण्याचें कारण काय ? २७७-२८५.

श्लोक १०-१२—श्रीशुक संभाषण, श्रीकृष्ण संकल्पानें स्वकुलाचा नाश २८६-२८८, श्रीकृष्णमूर्तीचें सौंदर्य २८९-२९५, श्रीकृष्णांनीं केलेल्या कर्मांच्या स्मरणानें मुमुक्षूंच्या सकळ कर्मांचें निर्मूलन २९६-३०४, श्रीकृष्णकीर्तीचा महिमा ३०५-३१०, यादवांच्या नाशाची आवश्यकता ३११-३१३, ऋषींचें पिंडारकास गमन ३१४-३३८, ब्राह्मणांचा प्रभाव ३३९-३४२.

श्लोक १३-१७—यादवांचा कंदुकविहार ३४३-३४४, सांबाचें स्त्रीवेषधारण, ऋषींच्या आश्रमीं आगमन, स्तवन व प्रार्थना ३४५-३५८, गर्भवती स्त्रीस काय होईल म्हणून प्रश्न ३५९-३६०, नारदाची आनंदावस्था ३६१, ब्राह्मणाचा महिमा ३६२-३६५, ऋषींचा शाप ३६६-३६८, मुसळाचा उद्भव ३६९-३७३.

श्लोक १८-२३—यादवांचें चिंताक्रांत स्थितींत आगमन ३७४-३७५, वृत्तांताचें कथन ३७६-३७७, यादवांची भयानक स्थिति व श्रीकृष्णाच्या परोक्ष खलबत ३७८-३८०, मुसळाचें पिष्टीकरण व त्याचा परिणाम ३८१-३८६.

श्लोक २४—श्रीकृष्णाची समर्थता ३८७-३९६, उपसंहार ३९७-३९९.

## अध्याय दुसरा

**श्लोक संख्या : ५५** **ओवी संख्या : ७८७**

वस्तुनिर्देशरूप मंगलाचरण १-१३, उपोद्घात १४-२०.

श्लोक १-३—श्रीशुक संभाषण २१-२२, नारदास कृष्णदर्शनाची हौस २३-२९, श्रीकृष्णपदपंकजविमुखतेनें पुनः पुनः संसृति ३०-३५.

श्लोक ४-९—वसुदेव संभाषण, नारदाचें वसुदेवगृहीं आगमन व त्यांचा सन्मान ३६-४१, वसुदेवाकडून नारदाची स्तुति ४२-७७, भागवत धर्म सांगण्याविषयीं वसुदेवाची प्रार्थना ७८-८३, नारदाचें स्ववृत्तकथन ८४-९०, भवाचें भीषणत्व ९१-९८, भव तरण्याची प्रार्थना ९९-१०२.

श्लोक १०—श्रीशुक संभाषण, नारदाची आनंदावस्था १०३-१०८.

श्लोक ११-१३—नारद संभाषण, भागवत धर्म महिमा १०९-११६, वसुदेवाची थोरवी ११७-१२२, भक्ताच्या स्वानंदतेविषयीं उद्गार १२३-१२८.

श्लोक १४-२७—ऋषभाची वंशावळी १२९-१३५, भरताचा वृत्तांत १३६-१६८, ऋषभाच्या नऊ पुत्रांची कथा १६९-१८७, नऊहि मुनींचा ब्रह्मांडांत निरीच्छ संचार १८८-१८९, त्यांचें विदेहाच्या होमस्थानीं आगमन १९०-१९४, त्यांच्या अंगप्रभेची अपूर्वता १९५, विदेहानें त्यांचा केलेला सन्मान १९६-१९८, नवांची योग्यता व त्यांचें सनकादिकांशीं साधर्म्य १९९-२०७.

श्लोक २८-३१—विदेहाची प्रार्थना, नऊहि मुनींचें स्तवन २०८-२१६, नरदेहाचा विचार २१७-२४१, विदेहानें केलेला आत्यंतिक क्षेमाचा प्रश्न २४२-२५७, भागवत धर्माचा महिमा २५८-२६२, विदेहाची शरणागती २६३-२६८.

श्लोक ३२—नारद संभाषण, २६९-२७२, विदेहाचे नऊ प्रश्न २७३-२७५.

श्लोक ३३— कवि संभाषण, २७६-२७७, देहबुद्धीचा घातुक परिणाम २७८-२८६, हरिभक्तीचें महत्त्व २८७-२९१, भगवद्भक्तीनें इंद्रियनिग्रहता २९२-३०२, भगवद्भक्तांस भवभयाची अबाधकता ३०३-३०९.

श्लोक ३४—अज्ञान जीवांच्या उद्धरणार्थ भगवद्भक्तीची प्रगटता ३१०-३१७, भागवताचें माहात्म्य ३१८-३२८.

श्लोक ३५—भागवत धर्म सांप्रदायिकांस विधि निषेधाची अबाधकता ३२९-३४५.

श्लोक ३६—भागवतधर्मीयांच्या कर्मार्पणाचें लक्षण, मानसिक अर्पण ३४६-३६०, इंद्रियांचें अर्पण ३६१-३९३, अभिमान अर्पण ३९४-४१६, चित्ताचें अर्पण ४१७-४२१, बुद्धीचें अर्पण ४२२-४३७, कायिक अर्पण ४३८-४४४, स्वाभाविक अर्पण ४४५-४५४.

श्लोक ३७—स्वरूपाच्या विस्मरणानें मायेचा उद्भव ४५५-४६१, मायानिरसनार्थ भगवद्भक्तीची आवश्यकता ४६२-४७३, अभक्तांची दुःखदावस्था ४७४-४७७, भवभयनिरसनार्थ व भगवद्भक्तिप्राप्त्यर्थ सद्गुरुपादसेवनाची आवश्यकता ४७८, सद्गुरूचें माहात्म्य ४७९-५०६.

श्लोक ३८-३९—मनकल्पित भवबंधन व सर्वत्र ब्रह्मभावनेनें मनाचें नियमन ५०७-५२३, भगवंताच्या चरित्र श्रवणानें, कीर्तनानें व नामस्मरणानें अपरोक्षानुभवता ५२४-५५५.

श्लोक ४०-४३— अपरोक्षानुभव भक्तांची स्वानंदता ५५६-५७९, अद्वैतता ५८०-६०३, भक्ति, विरक्ति आणि अनुभवाची एकाच वेळीं प्राप्ति

६०४-६१७, अनन्य भक्तीचा व भक्तांचा महिमा ६१८-६२३, विदेहाची आनंदावस्था ६२४-६२८.

श्लोक ४४–विदेहाची प्रार्थना, भगवद्भक्तांचें लक्षण काय? ६२९-६३४.

श्लोक ४५-४७–हरि संभाषण, भक्तांचे विविध प्रकार ६३५-६३८, उत्तम भक्तांचें लक्षण ६३९-६४८, मध्यम भक्तांचें लक्षण ६४९-६५१, प्राकृत भक्तांचें लक्षण ६५२-६५५.

श्लोक ४८-५०–उत्तम भक्तांची विषयीं अभोक्तृता ६५६-६६२, इंद्रियादि कर्मीं अलिप्सता ६६३-६९१, आत्माराम चिंतनानें कामाची निष्कामता ६९२-६९९.

श्लोक ५१-५५–प्राकृत भक्तांच्या देहाभिमानाची भगवद्भावनेनें विरामता ७००-७०२, देह, जात, वर्णाश्रमादींची निरहंकारता ७०३-७२०, देव भक्तांची अनन्यता ७२१-७३६, ब्रह्माचें उदाहरण ७३७-७४१, शंकराचें उदाहरण ७४२-७४३, निरपेक्षता ७४४-७५१, भगवत्चरणाचा महिमा ७५२-७८०, उपसंहार ७८१-७८७.

## अध्याय तिसरा

**श्लोक संख्या : ५५** **ओवी संख्या : ८७२**

गुरुनमनरूप मंगलाचरण १-१५, उपोद्घात १६-१७.

श्लोक १-२–विदेहाची प्रार्थना, माया कशाला म्हणतात? १८-३१.

श्लोक ३–अंतरिक्ष संभाषण, माया प्रश्नोद्भवाची असंभवता व तत्संबंधाचे दृष्टांत ३२-६५, मायोद्भवाची खूण ६६-६८, मायेचें लक्षण ६९-८४.

श्लोक ४-७–भूतात्म्याची व्यापकता ८५-१००, जीवशिवाचा आभास १०१-१०५, जीवाची विषयावस्था १०६-१२९, देहअहंता १३०-१३५, कर्मांमुळें पुनः पुनः जन्ममरण १३६-१४९.

श्लोक ८-१२–प्रळयवर्णन १५०-१७३, वैराज पुरुषाचा अव्यक्तीं लय १७४-१७७, भगवद्भक्तीनें परम पदाची प्राप्ति व तद्विषयक ब्रह्मदेवाच्या मताचे दोन श्लोक १७८-१९०.

श्लोक १३-१५—पंचभूतें, त्रिविध अहंकार, त्रिगुण व महत्तत्त्व यांचा मायेंत प्रवेश १९१-२०१.

श्लोक १६—मायेमुळें त्रिपुटीचा उद्भव २०२-२०९, मायेचें मिथ्यात्व २१०-२१५, मायोद्भवाचें रहस्य २१६-२१७, राजाची विस्मितता २१८-२२२.

श्लोक १७— विदेहाची प्रार्थना, मायेचा तरणोपाय कोणता ? २२३-२२८.

श्लोक १८-२०—प्रबुद्ध संभाषण, मायानिरसनार्थ वैराग्याची आवश्यकता २२९-२३१, स्त्रियांच्या आसक्ततेनें मायेची बाधकता २३२-२४०, विषयसुखार्थ केलेल्या काम्यकर्मांचा दुःखद परिणाम २४१-२५९, स्वर्गादि सुखाची नश्वरता २६०-२७२.

श्लोक २१—सद्गुरुभक्तीनें मायेपासून मुक्तता २७३-२७४, विविध गुरूंची विविध लक्षणें २७५-२९५, सद्गुरूची लक्षणें २९६-३२४.

श्लोक २२—विविध शिष्यांची विविध लक्षणें ३२५-३२९, सच्छिष्याची लक्षणें ३३०-३५१.

श्लोक २३—असत्संगत्यागार्थ सत्संग, दया, मैत्री, श्रद्धा इत्यादींची आवश्यकता ३५२-३७७, साधकास परब्रह्मप्राप्त्यर्थ साधनोपाय ३७८-३७९.

श्लोक २४-३२—भागवत धर्म, शौच ३८०-३९९, तप ४००-४०२, तितिक्षा ४०३-४१४, मौन ४१५-४२२, स्वाध्याय ४२३-४२७, सद्गुरुप्रबोधानें परब्रह्माची प्राप्यता ४२८-४८९, अन्नाच्छादनाची निरीच्छता ४९०-५०२, भागवत शास्त्राध्ययनाची आवश्यकता ५०३-५१४, मनास शमाचें, इंद्रियांस दमाचें व वाचेस सत्याचें नियमन ५१५-५४२, भगवंताच्या चरित्रश्रवणानें व कीर्तनानें निर्गुणाची प्राप्यता ५४३-५५२, निर्गुणानुभवानें कर्मांची व दारापुत्र-देहगेहाची कृष्णार्पणता ५५३-५६५, आत्मदर्शन होईपर्यंत सगुण मूर्ति, प्रतिमा, ब्राह्मण, भगवद्भक्त व सद्गुरु यांच्या पूजनाची आवश्यकता ५६६-५८१, भक्तांच्या समागमानें स्वानंदाची प्राप्यता ५८२-५८५, भक्तीनें हृदयांत आत्म्याची प्रगटता ५८६-५८८, आत्मदर्शनानें उद्धवणाऱ्या आनंदोर्मीचें वर्णन ५८९-६०५, सद्गुरूची सच्छिष्याबद्दल कळकळ ६०६-६१३.

श्लोक ३३–सद्गुरूपाशीं भागवत धर्म शिक्षणानें भगवद्भक्तीची प्राप्ति व मायेचें निर्मूलन ६१४-६२१.

श्लोक ३४–विदेहाची प्रार्थना, परब्रह्म कसें आहे ? ६२२-६२८.

श्लोक ३५-३६–पिप्पलायन संभाषण, नारायणाच्या सत्तेची व्यापकता ६२९-६४२, मन, बुद्धि, वाचा, प्राण व इंद्रियें यांस स्वरूपाची अगम्यता ६४३-६६१, आशंका, इंद्रियांस जर ज्ञान होणें शक्य नाहीं तर जीवाचें बंधन सुटावें कसें ? ६६२, 'शब्दादेवापरोक्षेति' या पदाचें विवरण ६६३-६७०, परब्रह्म-लक्षण ६७१-६८०, वेदांचा अनुभव व शास्त्र्यांचा मताभिमान ६८१-६८५, अहंकारत्यागानें ब्रह्मैक्यता ६८६-६८९.

श्लोक ३७-३९–ब्रह्मामुळें मायाभास व ॐकाराचा उद्भव ६९०-७०७, प्राणवायुप्रमाणें आत्म्याची अविकारता ७०८-७२१, तिन्ही अवस्थांत आत्म्याचें साक्षित्व ७२२-७३१, अविद्यानाशानें ब्रह्मीं समरसता ७३२-७३६

श्लोक ४०–भगवद्भक्तीनें चित्ताची निर्मळता व परब्रह्माची प्राप्यता ७३७-७५४.

श्लोक ४१-४२–विदेहाची प्रार्थना, कर्म कशाला म्हणावें ? ७५५-७५८.

श्लोक ४३-४६–आविर्होत्र संभाषण, कर्म, अकर्म, विकर्माचें विवरण ७५९-७७२, कर्मानें कर्मबंधनाचें च्छेदन व कर्मफलाशेनें पुनः पुनः जन्ममरण ७७३-७७८, वेदविहित कर्माचरणाची आवश्यकता ७७९-७८७, कर्म, अकर्म व विकर्माचें लक्षण ७८८-७९०, ईश्वरार्पणानें कर्माची नैष्कर्म्यता ७९१-८०१.

श्लोक ४७-५५–केशवादि मूर्तिपूजनानें नैष्कर्म्यता ८०२-८०४, पूजनादि कर्माचरणास गुरुमुखाची आवश्यकता ८०५-८११, पूजेच्या विधिविधानाचें व मूर्तिध्यानादि प्रकाराचें विवरण ८१२-८५५, हृदयस्थ परमात्म्याच्या पूजनानें अपरोक्षानुभवाची प्राप्यता ८५६-८६३, उपसंहार ८६४-८७२

## अध्याय चौथा

**श्लोक संख्या : २३** **ओवी संख्या : २९५**

नमनरूप मंगलाचरण १-१९, उपोद्घात २०-२८.

श्लोक १–विदेहाची प्रार्थना, परमेश्वराचीं अवतारचरित्रें किती आहेत ? २९-३५.

श्लोक २-५–द्रुमिल संभाषण, अवतारांची अनंतता ३६-४३, पुरुषावतारकथन ४४-६६.

श्लोक ६-१६–नरनारायणावतारकथन, दक्षकन्या मूर्तीच्या उदरीं जन्म ६७-६८, नारदादिकांस नैष्कर्म्य लक्षणाचा बोध व स्वरूपाची प्राप्ती ६९-७४, कामक्रोधादि शत्रूंचें बद्रिकाश्रमीं आगमन, नारायणाची निर्द्वंद्वता व शांतता ७५-९७, नारायणानें कामक्रोधादिकांचा केलेला सन्मान ९८-११०, कामानें नारायणाची केलेली स्तुति १११-१२८, क्रोधानें केलेली स्तुति १२९-१७७, नारायणाच्या सेवेंत सौंदर्यसंपन्न स्त्रिया व देवांची गाळण १७८-१८७, देवांस सुंदर अशी स्त्री घेऊन जाण्याविषयीं आज्ञा १८८-१९३, उर्वशीचा इंद्रसभेंत प्रवेश व इंद्राची अनुरक्तता १९४-२००, आशंका, साधकाचें विघ्नापासून रक्षण कसें होईल ? २०१-२०२, भगवद्भक्तीनें विघ्नाचें निरसन २०३-२०७.

श्लोक १७-२२–नानावतार चरित्रकथन, हंसस्वरूप २०८, दत्तात्रेय २०९-२१०, सनत्कुमार २११, ऋषभ २१२-२१३, हयग्रीव २१४-२१५, मत्स्य २१६, कूर्म २१७, गजेंद्रोद्धरण २१८, मार्कंडेय रक्षण २१९, ऋषींचें रक्षण २२०-२२३, ब्रह्महत्येपासून इंद्राचें रक्षण २२४-२२५, देवस्त्रियांची मुक्तता २२६-२२७, नरसिंह २२८-२३०, मोहिनी २३१-२३३, कुश व लवणासुरमर्दन २३४-२३५, वामन २३६-२३९, परशुराम २४०-२४३, रामचंद्र २४४-२५३, श्रीकृष्ण २५४-२७०, बौद्ध २७१-२७९, कल्कि २८०-२८२.

श्लोक २३–परमेश्वराच्या अवतारचरित्रांची अपारता २८३-२८६, उपसंहार २८७-२९५.

## अध्याय पांचवा

**श्लोक संख्या** : ५२ **ओवी संख्या** : ५७६

नमनरूप मंगलाचरण १-३२, उपोद्घात ३३-३५.

श्लोक १–विदेहाची प्रार्थना, अभक्तास कोणती गति मिळते ? ३६-४३.

श्लोक २—चमस संभाषण, पुरुषापासून त्रिगुणमिश्रित वर्णाश्रमांचा उद्भव ४४-५१.

श्लोक ३-५—ज्ञानाभिमान्यांची भक्तीच्या विमुखतेनें अधःपतनता ५२-६३, स्त्रीशूद्रादि अज्ञ जनांची संतानुग्रहानें मुक्तता ६४-७७, तिन्ही वर्णांची अभिमानानें बद्धता ७८-८१.

श्लोक ६-९—मूर्ख ज्ञानाभिमान्यांची स्वर्गादि सुखाभिलाषार्थ केलेल्या कर्मानें अधःपतनता ८२-९४, कामक्रोधांचा उद्भव व साधूंचा उपहास ९५-११०, स्त्रीलोभानें संन्याशाचा उपहास १११-१३८, जीविकार्थ यज्ञांत पशुहनन व याज्ञिकत्वाचा अभिमान १३९-१४८, स्वतःचें धन, ऐश्वर्य, विद्या, दान, सौंदर्य, बळ, कर्म इत्यादि विषयींची आढ्यता १४९-१९१.

श्लोक १०-१८—ईश्वराची सत्ता १९२-२०७, विषयांची स्वाभाविक अभिलाषा २०८-२१८, विवाहप्रतिष्ठा व स्त्रीसंगाविषयीं नियमन २१९-२३१, मांसभक्षणानें व सुरापानानें अधःपतनता २३२-२४१, धनाचा धर्मार्थ विनियोग केल्यानें शांतिसुखाची प्राप्ति २४२-२५०, विषयांत धन वेंचल्यानें पतन २५१-२६०, मद्य, मांस व मैथुन याविषयीं वेदांचें नियमन २६१-२७६, स्वमतानें पशुहनन केल्याचा दुष्परिणाम २७७-२८०, सर्वभूतीं परमात्म्याचें वास्तव्य असल्यानें परद्वेषानें अधःपतन २८१-२८२, अज्ञ जनांस संतसेवेनें कैवल्यपदप्राप्ति २८३, ज्ञानाभिमान, काम्यकर्म व वासुदेवाच्या विमुखतेनें अभक्तांस दुर्गतीची प्राप्यता २८४-३००, अभक्त वर्णनानें वाणीस दोष ३०१-३०२, वाचेच्या शुद्ध्यर्थ रामनामाचें प्रायश्चित्त ३०३-३०५.

श्लोक १९—विदेहाची प्रार्थना, परमेश्वराचे कोणत्या युगांत कोणत्या नामरूपवर्णआकारानें पूजनादि प्रकार होतात? ३०६-३११.

श्लोक २०-२३—करभाजन संभाषण, कृतयुगवर्णन, केशवाचें पूजन ३१२-३१५, मूर्तीचें ध्यान ३१६-३१७, लोकस्थिति व धर्मनिष्ठा ३१८-३२०, नामस्मरणाचे दहा प्रकार ३२१-३२३

श्लोक २४-२६—त्रेतायुगवर्णन, मूर्तीचा आकार ३२४-३२६, लोकांची धर्मनिष्ठा ३२७-३२९, नामस्मरणाचे आठ प्रकार ३३०-३३१.

श्लोक २७-३१—द्वापारवर्णन, मूर्तीचा आकार ३३२-३३३, पूजेचे प्रकार ३३४-३३६, नामस्मरणाचे प्रकार ३३७-३४१.

श्लोक ३२-३५—कलियुगवर्णन, श्रीकृष्णाचें ध्यान ३४२-३४५, नामसंकीर्तनाचा महिमा ३४६-३६५, पादसेवनाचा महिमा ३६६-३८२, श्रीरामाचा पत्नीसह वनवास ३८३-४००, युगानुरूप परमेश्वराचें पूजन ४०१-४०२.

श्लोक ३६-३८—कलियुगाच्या थोरवीचें कारण ४०३-४०४, नामसंकीर्तनानें परमानंदाची व चारी मुक्तींची प्राप्यता ४०५-४४०, इंद्रादि देवांची व कृतयुगांतील सभाग्य जनांची नामसंकीर्तनाविषयीं मनीषा ४४१-४४९, स्त्री शूद्रांची नारायणीं तत्परता ४५०.

श्लोक ३९-४२—द्रविड देशांतील पांचहि नद्यांचा स्थानमहिमा ४५१-४५९, मुकुंदचरणीं शरणतेनें ऋणत्रयापासून मुक्तता ४६०-४७०, भगवद्भक्तास कर्माकर्माची अबाधकता ४७१-४७९, भागवत धर्माचें व भगवद्भक्तीचें रहस्य ४८०-४८७.

श्लोक ४३-५०—नारद संभाषण, ऋषभ पुत्रांची अदृश्यता ४८८-४९३, विदेहास भगवद्भक्तीच्या अनुष्ठानानें परम पदाची प्राप्यता ४९४-४९५, वसुदेवाच्या भाग्यश्रीचें वर्णन ४९६-४९८, भागवत धर्माचरणानें परम पदाची प्राप्ति ४९९-५००, वसुदेव देवकीचें यशोवर्णन ५०१-५०५, श्रीकृष्णसमीपतेनें इंद्रियांची पवित्रता ५०६-५२३, कंसशिशुपालादि शत्रूंची कृष्णध्यानानें मुक्तता ५२४-५२८, वसुदेवास परब्रह्माची सहजप्राप्यता ५२९-५३०, श्रीकृष्णाची निर्गुणता ५३१-५३४, अवतारांचें कारण ५३५-५४३.

श्लोक ५१—श्रीशुक संभाषण, वसुदेव देवकीच्या पुत्रमोहाचा विलय ५४४-५४८.

श्लोक ५२—निमिजायंत संवादाचें माहात्म्य ५४९-५६६, उपसंहार ५६७-५७६.

## अध्याय सहावा

श्लोक संख्या : ५० ओवी संख्या : ४२९

नमनरूप मंगलाचरण १-१९, उपोद्घात २०-२३.

श्लोक १-६–श्रीशुक संभाषण, देवांचें श्रीकृष्णदर्शनार्थ आगमन २४-४५, श्रीकृष्णमूर्तीचें वर्णन ४६-५१, द्वारकेचें वर्णन ५२-५४, देवास श्रीकृष्णदर्शनाची उत्सुकता ५५-६३, देवांनीं श्रीकृष्णावर केलेली पुष्पवृष्टि ६४-६६.

श्लोक ७-१९–देवांची प्रार्थना, श्रीकृष्णचरणीं शरणता ६७-७४, मायेचें नियंतृत्व व अलिप्तता ७५-७९, धर्मस्थापनार्थ अवतारधारण ८०-८१, भक्तांचा महिमा ८२-८७, चरित्रश्रवणाचा महिमा व तप, मंत्र, शास्त्र, दान, कर्म इत्यादींची निरर्थकता ८८-११०, चरणांचा महिमा व तत्सिद्ध्यर्थ भक्तांच्या पूजनादि प्रकारांचें वर्णन १११-१२२, याज्ञिकांचें हवन १२३-१२५, योग्याचें योगसाधन १२६-१३०, माया जाणण्याकरितां भजन १३१-१३२, मुमुक्षूंचें साधन १३३-१३८, देवास वनपुष्पमालेचें प्रेम १३९-१५१, चरणाचा महिमा १५२-१६५, देवाचें नियंतृत्व व अकर्तृत्व १६६-२११, गोकुळांतील चरित्र-श्रवणाचा व चरणतीर्थाचा महिमा २१२-२३६.

श्लोक २०–श्रीशुक संभाषण, देवांनीं केलेली स्तुति २३७-२४०.

श्लोक २१-२७–ब्रह्मदेवाची प्रार्थना, अवतार चरित्राचें गौरवयुक्त वर्णन व स्वधामीं येण्याविषयीं कृष्णाची प्रार्थना २४१-२६२.

श्लोक २८-३१–श्रीकृष्ण संभाषण, अवताराची परिपूर्तता २६३-२६७, यदुकुलाच्या निर्दलनानंतर सत्यलोकीं येण्याचें अभिवचन २६८-२७७.

श्लोक ३२-३३–श्रीशुक संभाषण, देवांचें स्वस्थानीं गमन २७८-२८०, द्वारकेंत उत्पाताचा उद्भव २८१-२९०, यादवांचें भयानें श्रीकृष्णापाशीं आगमन २९१-२९२.

श्लोक ३४-३८–श्रीकृष्ण संभाषण, ब्राह्मण शापाचा प्रभाव २९३-२९५, यादवांस प्रभासास जाण्याविषयीं अनुज्ञा २९६-२९७, प्रभास क्षेत्राचें माहात्म्य २९८-३०८.

श्लोक ३९-४१–श्रीशुक संभाषण, यादवांचें प्रभास क्षेत्रास गमन ३०९-३११, उद्धवाची खेदावस्था व श्रीकृष्णचरणीं शरणता ३१२-३२६.

श्लोक ४२-४९–उद्धवाची प्रार्थना, श्रीकृष्ण चरित्राच्या महात्म्याचें वर्णन ३२७-४०३.

श्लोक ५०—श्रीशुक संभाषण, श्रीकृष्ण उद्धवाच्या सख्यत्वाचें वर्णन ४०४-४११, उपसंहार ४१२-४२९.

## अध्याय सातवा

**श्लोक संख्या** : ७४ **ओवी संख्या** : ६४९

नमनरूप मंगलाचरण १-५, उपोद्घात ६-१२.

श्लोक १-५—श्रीकृष्ण संभाषण, ब्रह्मादि देवांची स्वधामीं येण्याविषयीं प्रार्थना १३-१७, अवतार कार्याची परिपूर्तता १८-१९, ब्राह्मणशापानें यादवांचा व द्वारकेचा नाश २०-२१, कलीची प्रबळता, अधर्माची वृद्धि, ब्राह्मणाची स्वधर्मापासून च्युति व निंदेची प्रवृत्ति २२-२८.

श्लोक ६—स्वजनविषयक मोहत्यागाची आवश्यकता २९-३२, स्वरूप-ध्यासानें अहंकाराचा नाश व निजधामाची प्राप्यता ३३-४९.

श्लोक ७-८—इंद्रियास भासणाऱ्या साकारतेची नश्वरता ५०-५६, भेदामुळें गुणदोषाभ्यास व कर्माकर्मविकर्मोद्भव ५७-७०, श्रीधरमत ७१-८३.

श्लोक ९—मुमुक्षूस विषयत्यागाची आवश्यकता ८४-८८, सर्वभूतीं स्वरूप-भावनेनें चित्ताचें परमानंदीं निमज्जन ८९-१०१.

श्लोक १०-१२—ज्ञान विज्ञानानुभवानें विघ्नांची, कर्माची व विषयांची अबाधकता १०२-११९, कर्माच्या ठिकाणीं अलिप्तता १२०-१३२, शांतीनें सर्वभूतीं भगवद्रूपता १३३-१४४, जन्मदुःखविमोचनता १४५-१५८.

श्लोक १३—श्रीशुक संभाषण, उद्धवाची श्रीकृष्णचरणीं शरणता १५९-१६२.

श्लोक १४-१८—उद्धवाची प्रार्थना, कर्मसंन्यासाची व त्यागाची गहनता १६३-१७०, देहात्मभावना १७१-१७२, अनायासें तत्त्वप्राप्ती होईल असा उपाय सांगण्याबद्दल देवाला विनंती १७३-१७५, गुरुत्वास ब्रह्मादि देवांची योग्यता नसल्यामुळें श्रीकृष्णास शरणता १७६-१८५, श्रीकृष्णाची शुद्धता १८६-२०१, उद्धवाची शरणता २०२-२०५.

श्लोक १९-२३—श्रीकृष्ण संभाषण, उद्धवास अहं महिषासुराची बाधकता २०६-२०९, आपला उद्धार आपण करण्याची आवश्यकता २१०-२१६, कर्मा-

पासून तरेन किंवा न तरेन याचा स्फूर्तिरूप अनुभव २१७-२१९, जन्ममरणाविषयीं अनुताप व आपला आपण गुरु २२०-२३८, सांख्ययोगानें स्वरूपाची प्राप्यता २३९-२४२, नरदेहाची महति २४३-२४८, आनुमानिक ज्ञानानें ईश्वराची अप्राप्यता व अभिमान त्यागानें आत्मानुभव २४९-२५४.

श्लोक २४-२५—यदूचें वर्णन २५५-२५७, अवधूत वर्णन २५८-२७७.

श्लोक २६-३०—यदूची प्रार्थना, निजानंदाची प्राप्ति कशी झाली? २७८-३१५.

श्लोक ३१—श्रीकृष्ण संभाषण, यदूच्या भाग्याचें व अवधूताच्या आदरातिथ्याचें वर्णन ३१६-३१८.

श्लोक ३२—ब्राह्मण संभाषण, यदूचा गौरव ३१९-३२२, आत्मज्ञानप्राप्तीस गुरूची आवश्यकता ३२३-३२४, संसार तरणोपायास सद्‌बुद्धीची आवश्यकता ३२५-३३४, चाळणीचें गुरुत्व ३३५-३३६, सुपाचें गुरुत्व ३३७-३३९, गुणग्रहण व त्यागरूपानें जगाचे गुरु ३४०-३४५, चोवीस गुरूंचीं नांवें व त्यांपासून भिन्न भिन्न शिक्षणाची प्राप्यता ३४६-३५९.

श्लोक ३३-३८—पृथ्वीचें गुरुत्व, शांतीची प्राप्यता ३६०-३७७, पर्वताचें गुरुत्व, परोपकारता ३७८-३९२, वृक्षाचें गुरुत्व, पराधीनता व आदरता ३९३-४०७.

श्लोक ३९-४१—वायूचें गुरुत्व दोन प्रकारचे, प्राणवायूची रसादि माधुर्याविषयीं उदासीनता ४०८-४२१, बाह्यवायूची अनासक्तता ४२२-४३१.

श्लोक ४२-४३—आकाशाचें गुरुत्व चार प्रकारचे, समता, असंगता, निर्मळता व अभेदता ४३२-४५९.

श्लोक ४४—उदकाचें गुरुत्व चार प्रकारचें, स्वच्छता, कोमलता, मधुरता व मळनाशकता ४६०-४७५, भगवद्भक्तांचा महिमा ४७६-४८६.

श्लोक ४५-४७—अग्नीचें गुरुत्व सहा प्रकारचे, तेजस्विता, मलास्पर्शता, गुप्तता, प्रकटता, निराकारता, साकारता ४८७-५११.

श्लोक ४८-४९—चंद्राचें गुरुत्व, अखंडता व कळामुळें वृद्धिक्षयाभास ५१२-५१९, काळगतीची सूक्ष्मता ५२०-५३२.

श्लोक ५०-५१—सूर्याचें गुरुत्व, अलिप्तता ५३३-५४६.

श्लोक ५२-७३—कपोत कपोतीची कथा, स्त्री आसक्तीचा दुःखद परिणाम ५४७-५५०, अन्योन्य प्रेम ५५१-५६९, कपोतीचें गर्भधारण व प्रसूती ५७०-५७६, पिलांचें लालनपालन ५७७-५९२, लुब्धकाच्या जाळ्यांत पिलांचें बंधन ५९३-५९५, कपोत कपोतीची विव्हलता ५९६-६००, कपोतीचा आत्मघात ६०१-६०३, कपोताचा शोक व स्त्रीवर्णन ६०४-६११, परस्त्रियांची निंदा व स्वस्त्रीची स्तुति ६१२-६२०, कपोताचा आत्मघात ६२१-६३१, विषयवासनेचा परिणाम ६३२-६३३.

श्लोक ७४—नरदेहाची कर्तव्यता ६३४-६४७, उपसंहार ६४८-६४९.

## अध्याय आठवा

**श्लोक संख्या** : ४३ **ओवी संख्या** : ३३१

नमस्काररूप मंगलाचरण १-१२, उपोद्घात १३-१५.

श्लोक १—स्वर्गसुखाची व नरकाची सादृश्यता १६-१८, साधूंची विषयीं विरक्तता १९-२०, प्रारब्धाचें भोक्तृत्व २१-२४.

श्लोक २-४—अजगराचें गुरुत्व, आहार व त्याच्या सरसनिरसपणाबद्दल अनास्था २५-४०.

श्लोक ५-६—समुद्राचें गुरुत्व, सुप्रसन्नता, गंभीरता, समृद्धता व असमृद्धतेबद्दल अनास्था ४१-६९.

श्लोक ७-८—पतंगाचें गुरुत्व, स्त्रीलोभानें मरण ७०-९१.

श्लोक ९-१२—भ्रमराचें गुरुत्व, सारग्रहणता ९२-१०६, माशीचें गुरुत्व, गृहमक्षिकेची असंग्रहता १०७-१११, मधुमक्षिकेच्या संग्रहतेचा परिणाम ११२-१२१.

श्लोक १३-१४—गजाचें गुरुत्व, गजीच्या अंगस्पर्शानें निरुद्धता १२२-१३१, परस्परांचा नाश १३२-१३८, वेश्यांच्या संगतीचा दुष्परिणाम १३९-१४४.

श्लोक १५-१६—मधुमाशीचें गुरुत्व, अर्थसंग्रहाची बाधकता १४५-१५६.

श्लोक १७-१८—मृगाचें गुरुत्व, नादलुब्धतेनें निरुद्धता, योषितागायन-श्रवणानें मुमुक्षूची साधनापासून च्युति, ऋष्यशृंग ऋषीचा दृष्टांत १५७-१६९, मीनाचें गुरुत्व १७०.

श्लोक १९-२१—मीनाचा रसनालोलुप्यानें नाश, मुमुक्षूनें रसनेंद्रियें आवरण्याची आवश्यकता १७१-१८७.

श्लोक २२-२८—पिंगला वेश्येचें गुरुत्व, पुरुषाचा अभिलाष १८८-२००, आशेची निराशा व वैराग्याचा उद्भव २०१-२१५.

श्लोक २९-४१—पिंगलेचें स्वगत भाषण, हृदयस्थाचें विस्मरण २१६-२२४, जार पुरुषानें नीचपण व वृत्तीला वीट २२५-२३२, शरीरपुराचें वर्णन २३३-२४१, हृदिस्थ पुरुषाचें सुख व परपुरुषापासून झालेल्या दुःखाचें वर्णन २४२-२५५, विवेकयुक्त वैराग्याचा उद्भव २५६-२६६, शरणता २६७-२६८, आत्मारामाच्या निदिध्यासानें निष्कामतेची प्राप्यता २६९-२७२, संसारकूपाची भीषणता २७३-२८६, वैराग्यलक्षण २८७-२९२.

श्लोक ४२-४३—ब्राह्मण संभाषण, पिंगलेचें भाग्यवर्णन २९३-३०६, आशेमुळें पतन ३०७-३१३, निराशेचा महिमा ३१४-३२४, उपसंहार ३२५-३३१.

## अध्याय नववा

**श्लोक संख्या** : ३३ **ओवी संख्या** : ५०८

नमस्काररूप मंगलाचरण १-२०, उपोद्घात २१-२२.

श्लोक १—ब्राह्मण संभाषण, परिग्रहाची बाधकता व त्याच्या त्यागानें अनंत सुखाची प्राप्यता २३-३९.

श्लोक २—टिटवीचें गुरुत्व, आमिषत्याग ४०-४९, अहंकार त्यागानें परिग्रहाचें निर्मूलन ५०-५७.

श्लोक ३-४—बालकानुरूप योग्याला देहगेहाची निश्चिंतता व उभयतांच्या सुखदावस्थेची तुलना ५८-८६.

श्लोक ५-१०—कुमारीचें गुरुत्व, वराकडील मंडळींचा पाहुणचार करण्यांत तिनें दाखविलेलें चातुर्य व त्यापासून एकाकी राहण्याचें शिक्षण ८७-११५.

श्लोक ११-१३—शरकर्ता लोहाराचें गुरुत्व, वैराग्ययुक्त मनाची एकाग्रता ११६-१३०, त्रिगुणांच्या लयानें चिन्मात्रता १३१-१४६, चित्ताची चैतन्यता अथवा संप्रज्ञात समाधीचें लक्षण १४७-१५४, शरकर्त्यांची एकाग्रता १५५-१५९.

श्लोक १४-१५—सर्पाचें गुरुत्व, एकाकी संचार व परकृतगृहीं वास्तव्याचें वर्णन १६०-१७९.

श्लोक १६-२१—कातणीचें गुरुत्व, कोळ्याच्या स्वक्रीडार्थ उत्पन्न केलेल्या तंतूप्रमाणें ईशशक्तीचें जाळें १८०-२३५.

श्लोक २२-२३—कीटकी, कुंभारणीच्या तद्रूपतेप्रमाणें मुमुक्षूची ध्येयवस्तूशीं सारूप्यता २३६-२४६.

श्लोक २४-२९—नरदेहाचें गुरुत्व, २४७-२५९, देहासक्तीचा दुःखद परिणाम व विवेकयुक्त अनासक्तीनें अद्वैताची प्राप्यता २६०-३०१, देहसुखार्थ स्त्री गृहादि परिवाराची संग्रहता ३०२-३०९, वासनासंस्कार व पुनर्जन्म ३१०-३१४, इंद्रियांच्या विषयासक्तीनें वासनेची दृढता ३१५-३२०, आत्मज्ञानार्थ नरदेहाची उत्पत्ति ३२१-३३१, नरदेहाची दुर्लभता, विषयाभिलाषेनें अधःपतनता व आत्मज्ञानसंपादन हीच कर्तव्यता ३३२-३८०.

श्लोक ३०-३१—वैराग्याचा उद्भव, अहंतेचा त्याग व निःसंग संचार ३८१-३८८, गुरुबोधाच्या निश्चयार्थ व चित्ताच्या स्थिरतेसाठीं चोवीस गुरूंची आवश्यकता ३८९-४१४, निजगुरूचा महिमा ४१५-४२२, यदु-अवधूताची एकात्मता ४२३-४२९, श्रीदत्तात्रेयपरंपरा ४३०-४३८, नाथांच्या गुरूचें महत्त्व ४३९-४५६, श्रोत्यांकडून नाथांची प्रशंसा ४५७-४६६, अवधूतगमन ४६७-४६९.

श्लोक ३२-३३—श्रीकृष्ण संभाषण, यदूची निर्वाच्यता व अवधूताची सुप्रसन्नता ४७०-४७५, यदूची निःसंगता ४७६-४८६, उद्धवाचा उपहास ४८७-४९०, नाथांचा मराठी भाषाभिमान ४९१-४९८, उपसंहार ४९९-५०८.

## अध्याय दहावा

**श्लोक संख्या : ३७** **ओवी संख्या : ७६५**

नमस्काररूप मंगलाचरण, गुरूवर धन्वंतरीचें रूपक १-४०, उपोद्घात ४१-४३.

श्लोक १—श्रीभगवान् संभाषण, उपासना वर्म ४४-४६, कर्मांचे प्रकार व लक्षणें, नित्य व नैमित्तिक कर्में ४७-५१, काम्य कर्में ५२-५४, निषिद्ध कर्में ५५-५८, प्रायश्चित्त कर्में ५९, नित्यनैमित्तिकाचा विनियोग ६०-६८, वर्णाश्रमलक्षण ६९-७३.

श्लोक २-५—मुमुक्षूची विषयीं विरक्तता व विवेकता ७४-८५, भेदानें भोगाभिलाष व अभेदानें स्वरूपता ८६—९१, कर्मानें चित्तशुद्धि व ज्ञानप्राप्ति ९२-१००, भक्तास कर्मअभाव १०१-१०४, अहिंसा धर्माचरणानें वृत्तीचा उपरम व गुरुभक्तीचा उद्भव १०५-१०६, आत्मज्ञानार्थ सद्गुरूची आवश्यकता १०७-११३, सद्गुरूचें माहात्म्य ११४-१२६, शिष्याची गुरुगवेषणा १२७-१३९, सद्गुरु भजनाचा महिमा १४०-१४५.

श्लोक ६—शिष्यलक्षणें, सन्मानाची अनपेक्षा १४६-१५९, निर्मत्सरता १६०-१८०, दक्षता १८१-१८६, निर्ममत्व १८७-१९०, सुहृदता १९१-१९३, निश्चलता १९४-२०१, परमार्थजिज्ञासा २०२-२०७, अनुसूयता २०८-२१६, सत्यता २१७-२३६, नवरत्नमालेच्या महिमा २३७-२४०, शिष्यास निर्ममत्व कसें प्राप्त होईल ? आशंका २४१, आत्मसुखानें उदासीनता २४२-२५०, गुरुसेवेची अत्यादरता २५१-२५२, निजसुखापुढें सर्व सुखें तुच्छ २५३-२५४.

श्लोक ७-१०—आत्मा देहांत असून दोन्ही देहातीत २५५-२६०, मनोमय कोशाचें निरसन २६१-२७३, हिरण्यगर्भाचें निरसन २७४-२८२, अग्नि काष्ठांत असून अलिप्त २८३-२९२, आशंका, आत्म्यानें देहधारण केल्यावर देहाचा त्याग कसा होईल ? २९३-२९८, अविद्याभ्रम २९९-३१७, ब्रह्मविद्येनें अविद्येचें निरसन व देहाचें मिथ्यात्व ३१८-३२५.

श्लोक ११-१३—ब्रह्मविद्यासाधन ३२६-३३६, आशंका, देहामुळें ब्रह्मविद्या प्राप्त होते ती विद्या देहाचें निर्दळण कसें करील ? ३३७-३३८, अग्नीचा

दृष्टांत ३३९, गुरूपासून ब्रह्मज्ञान व त्यामुळें मायानिर्दळण ३४०-३४७, गुरुबोधानें परमानंदप्राप्ति व त्रिगुण अहंता त्याग ३४८-३७९, कर्ममीमांसकाच्या मतांचा उहापोह ३८०-५२८, कर्मानें मिळणाऱ्या स्वर्गसुखाचें वर्णन ५२९-५५३, पुण्यक्षयानें स्वर्गच्युति ५५४-५६४, अविधि आचरणानें पतन ५६५-५९६, काम्यकर्माचरणानें संसृतीचें दुःख ५९७-६०४, इंद्रादि पदांची नश्वरता व ईश्वराची सत्ता ६०५-६२३, मीमांसक मत ६२४, आत्म्याची अकर्तव्यता ६२५-६४१, जीवाची अद्वैतता ६४२-६६८, कर्मवाद्यांची लोकभोगेच्छा ६६९-६७२, गुणवैषम्यतेनें स्वर्गादि भोगाभिलाष व त्याची अनित्यता ६७३-६८२, मायेमुळें अनेकत्वाचा आभास ६८३-६९७, भाव तसा देव ६९८-६९९, अभेद भक्तीनें जीवाची मुक्तता व उद्धवाची आनंदावस्था७००-७१०.

श्लोक ३५-३७—उद्धवाची प्रार्थना, आत्म्यास बद्धता व मुक्तता कां घडते? ७११-७२८, बद्ध व मुक्त कसें ओळखावे? ७२९-७३३, एकच वस्तूस बद्ध मुक्तता कां घडते? ७३४-७५२, उपसंहार ७५३-७६५.

## अध्याय अकरावा

**श्लोक संख्या :** ४९ **ओवी संख्या :** १५७९

नमस्काररूप मंगलाचरण, मेघरूपानें गुरुनमन १-२०, उपोद्घात २१-२८.

श्लोक १-३—आत्म्याचें ठायीं बद्धमुक्तीचा अभाव २९-५८, शुक वामदेवांचा दृष्टांत ५९-७२, मायेमुळें अन्यथा भाव व शोक, मोह, सुख, दुःख प्राप्ति ७३-९७, मायेमुळें विद्या अविद्येचा उद्भव ९८-१०५, मायेचें लक्षण व बद्ध मुक्ततेची स्फूर्ति १०६, ब्रह्मविद्येनें अविद्येचें निरसन १०७-१११, आशंका, ब्रह्मज्ञान, अविद्या, कार्य यांनीं मोक्ष होतो तर भक्ति कशाकरितां? ११२-११३, मायेची असमर्थता ११४, श्रीविष्णूची समर्थता ११५-१२१, उद्धवाच्या प्रश्नाचें उत्तर १२२-१२३, उद्धवाची श्रीकृष्णानें पाठ थोपटून स्वशक्तिसंचरण केलें १२४-१२८.

श्लोक ४-१०—जीवाची परमात्म्याशीं ऐक्यता पण विद्या अविद्येमुळें बद्ध मुक्त

भाव प्रतीति १२९-१५४, जीवेश्वराचा भेद व बद्धमुक्तता १५५-१५८, जीवेश्वराची सख्यता व सादृश्यता १५९-१९९, जीवाचें कर्मफलभोक्तृत्व व ईश्वराचें अभोक्तृत्व २००-२०७, कर्मफलाशेनें जीवाची नित्य बद्धता व नैराश्यानें ईश्वराची नित्य मुक्तता २०८-२१६, जीवाची बद्ध मुक्तता २१७-२४९, उद्धवाचें यशोवर्णन २५०-२६२.

श्लोक ११-१७—केवल मुक्तांचीं लक्षणें, निरभिमानता २६३-२६७, आसन २६८-२७१, गमन २७२-२७६, निमज्जन २७७-२८३, निरीक्षण २८४-२९१, श्रवण २९२-३०१, घ्राण ३०२-३०७, भोजन ३०८-३१७, स्पर्शन ३१८-३२९, वचन ३३०-३४८, हस्तक्रिया ३४९-३६०, पायाची क्रिया ३६१-३६६, स्त्रीविषयीं अनासक्तता ३६७-३७६, धनाची अनास्था ३७७-३८०, शयन ३८१-३८७, नियमाचें अबंधन ३८८-३९४, प्रकृति गुण कर्मीं अलिप्तता ३९५-४२७, संकल्पविकल्पाच्या नाशामुळें अद्वैतता ४२८-४३८, देहगुणाहून अलिप्तता ४३९-४४०, इंद्रियें, मन व बुद्धि यांची संकल्पशून्यता ४४१-४४४, मुक्ततेचा अनुभव मुक्तासच ४४५-४५४, सुखदुःख व मानापमानाविषयीं उदासीनता ४५५-४६८, स्तुति निंदेची समता ४६९-४८६, कर्मांची अहेतुकता ४८७, वाचेची मौन्यता ४८८-४९०, मनाची चैतन्यता ४९१-४९५, चैतन्यानुभवामुळें पिशाच्चवत् वर्तन ४९६-५१०.

श्लोक १८—अभिमानियास मुक्ताची स्थिति नाहीं, शब्दब्रह्मनिष्णात विद्वानांची विद्वत्ता व सन्मान, प्रतिष्ठा निरर्थक ५११-५५८.

श्लोक १९—कुस्त्रीसंगति, पराधीनता, असत्प्रजा, धनलोभ, वाचेची अविकळता इत्यादि मुळें होणारी दुःखदस्थिती ५५९-६०१.

श्लोक २०-२५—नामगुणकीर्तनाचा महिमा ६०२-६३७, विवेक, वैराग्य व जिज्ञासा यामुळें ब्रह्मप्राप्ति ६३८-६४३, मनाच्या स्थिरतेसाठीं भक्तीची आवश्यकता ६४४-६५५, कर्मफलत्यागानें भक्तीची प्राप्ति ६५६-६६८, भक्तप्रेम महिमा ६६९-६९७, श्रवण, कीर्तन व नामस्मरणाचा महिमा ६९८-७४५, भक्तांचें मदाश्रयानें व मत्प्रीत्यर्थ धर्मार्थ कर्माचरण ७४६-७४९, अभक्त लक्षण ७५०-७६०, उत्तम भक्ताचें लक्षण ७६१-७८२, सत्संगानें भक्तीची प्राप्यता ७८३-७९२.

श्लोक २६-२८—उद्धवाची प्रार्थना, साधूंचीं लक्षणें व भक्तीचीं लक्षणें सांगण्याविषयीं प्रश्न ७९३-८२४, भक्तप्रेमामुळें श्रीकृष्ण साधुलक्षण सांगतो ८२५-८२९.

श्लोक २९-३३—साधूंचीं लक्षणें, कृपाळुता ८३०-८३३, अद्रोहता ८३४-८३८, सहनशीलता ८३९-८४३, सत्यता ८४४-८५२, शुद्धता ८५३-८५६, समता ८५७-८६६, परोपकारता ८६७-८७४, एकाग्रता ८७५, अकामता ८७६-८८०, बाह्येंद्रियांची नियामकता ८८१-८८६, मृदुता ८८७-८९०, शुचिष्मंतता ८९१-८९९, अपरिग्रहता ९००-९१५, अनीहता ९१६-९३४, मित भोजनता ९३५-९४१, शांति ९४२-९४८, स्थिरता ९४९-९५८, शरणता ९५९-९६७, मननशीलता ९६८-९७६, सावधानता ९७७-९८७, अक्षोभता ९८८-९९२, धीरता ९९३-१०००, षड्गुणजितता १००१-१००५, अमानिता १००६-१००८, सन्मानता १००९-१०१४, परबोधकता १०१५-१०३४, मित्रता १०३५-१०४१, कारुण्य १०४२-१०४७, कवित्वता १०४८-१०५०, मायानदीचें रूपक १०५१-१०७६, सर्वधर्मकर्मत्याग व भक्ती १०७७-१११४, देवास भक्ताचें प्रेमकाव्य १११५-११२१, नाथांचा ग्रंथ परिहार ११२२-११२४, देवाचें भाषण ११२५-११२८, देवभक्तांचें ऐक्यत्व ११२९-११४०, अनन्य भोळ्या भक्तांचें देवास प्रेम ११४१-११८४.

श्लोक ३४-४१—भक्तीचीं लक्षणें, प्रतिमापूजन ११८५-११८८, संतपूजन ११८९-१२३४, श्रवण, मनन, ध्यान, आत्मसमर्पण, भक्तीचे प्रकार १२३५-१२५४, वैष्णव व्रताचरणाचें व पर्वकाळाचें महत्त्व १२५५-१२८०, मूर्तिस्थापन, पूजन, सेवा इत्यादि प्रकार, मूर्तीचें वर्णन १२८१-१३०१, देवालय व प्राणप्रतिष्ठा याविषयीं निरभिमानता १३०२-१३०४, दानाची अवाच्यता १३०५-१३०७, देवाच्या वस्तूची अग्रहणता १३०८-१३१२, प्रिय पदार्थ कृष्णार्पण केल्याचा महिमा १३१३-१३२४.

श्लोक ४२-४९— पूजेचीं अकरा स्थानें १३२५-१३२८, सूर्यपूजन १३२९-१३३८, अग्निपूजन १३३९-१३५०, ब्राह्मणपूजन १३५१-१३८४, गोपूजन १३८५-१३९२, वैष्णवसेवा १३९३-१४०७, आकाशपूजन १४०८-

१४१३, वायुपूजन १४१४-१४१९, उदकपूजन १४२०-१४२५, पृथ्वीपूजन १४२६-१४३१, आत्मपूजन १४३२-१४४४, सर्वात्मभावानें सर्व भूतांचें पूजन १४४५-१४५५, सगुणनिर्गुणाची समानता व निर्गुणाची गहनता १४५६-१४५९, सगुण मूर्तीच्या दर्शनाचा महिमा १४६०-१४९३, भक्तीचीं लक्षणें १४९४-१४९७, सगुणनिर्गुणाची ऐक्यता १४९८-१५०२, कर्मकृष्णार्पणतेनें सद्भक्तीचा उदय १५०३-१५१५, गुरुभजनानें मद्भक्तीची प्राप्यता १५१६-१५२५, ज्ञानापेक्षां भक्तीची सुलभता व विशेषता १५२६-१५४६, भक्तीचा महिमा १५४७-१५५१, संतांपासून निजभक्तीची प्राप्यता १५५२-१५६२, उद्धवयशोवर्णन व गुह्यज्ञान-विषयक उद्गार १५६३-१५७६, उपसंहार १५७७-१५७९.

## अध्याय बारावा

**श्लोक संख्या** : २४ **ओवी संख्या** : ६२६

वसंत रूपकानें नमस्काररूप मंगलाचरण १-१६, उपोद्घात १७-२३.

श्लोक १-८—श्रीकृष्ण संभाषण, भगवत्प्राप्तीस मुख्य संतसंगच, बाकीचीं साधनें निरर्थक २४-६३, दैत्य, राक्षस, स्त्री, शूद्र, अंत्यज, खग, मृग, सर्प इत्यादींचा सत्संगतीनें उद्धार ६४-१०५, भावार्थानें भगवत्प्राप्ति १०६-११७, सत्संगावांचून भगवत्प्राप्ति दुर्लभ ११८.

श्लोक ९-१५—गोपिकांचें यशोवर्णन, मत्प्राप्तीस योग, ज्ञान, व्रत, तीर्थ, दान, तप, ध्यान इत्यादि साधनांची निरर्थकता ११९-१२०, सत्संगतीनें गोपींना निजपदप्राप्ती १२१-१२४, मद्वियोगानें गोपींची विव्हळता १२५-१३८, गोपिकांचें प्रेम १३९-१४५, रासक्रीडा १४६-१६४, गोपिकारूपानें श्रुतींचें गोकुळीं प्रगट होणें १६५-१६८, भाव तसा देव १६९-१७२, गोपिकांस श्रीकृष्णवियोगाचें दुःख १७३-१७५, गोपींना कृष्णस्मरणानें समाधि अवस्था प्राप्त १७६-१९२, गोपींच्या कामाभिलाषाचा नाश १९३-२१३, सत्संगतीचा महिमा २१४-२१६, भगवत्प्राप्तीनंतर त्रिगुणात्मक वेद व कर्म निरर्थक २१७-२२०, अविद्यानाशानें वेद व विधिनिषेध व्यर्थ २२१-२२९, वेदांतश्रवणानें अविद्येचा नाश २३०-२३२, हृदयस्थास शरण गेल्यानेंच अविद्येचें निर्मूलन २३३-२५९, हृदयस्थाचें स्वरूप २६०-२६७.

श्लोक १६—उद्धवाची प्रार्थना, आत्मा कर्ता कीं अकर्ता ? कर्म करावें किंवा टाकावें ? २६८-२७५.

श्लोक १७-२३—भगवंताचें उत्तर, मायेमुळें जीवाभास व कर्तृत्व २७६-२८६, चित्तशुद्धीपर्यंत स्वकर्मांची आवश्यकता २८७-२८९, जीवशिवाचें चैतन्यत्व २९०-२९२, जीवाच्या कर्मबंधनाचें मिथ्यात्व २९३-३०३, जीवाची मनोरूपता व शरीरसंयोगता ३०४-३४९, नाथांची प्रतिभा, काव्य ३५०-३५८, सूक्ष्म नादामुळें वाचा, इंद्रियें, त्रिविध ताप यांची अभिव्यक्ति ३५९-३८३, जीवशिवाचें अभिन्नत्व ३८४-३९०, शक्तीचा प्रभाव व तिचे नाना प्रकार ३९१-४१९, भववृक्षाचा उद्भव ४२०-४२४, भववृक्षाचें वर्णन ४२५-४३९, भववृक्षाची सुख दुःख हीं दोन फळें व एक दुःखफळभोक्ता ४४०-४४९, सुखफळभोक्ता, वानप्रस्थ ४५०-४६२, संन्याशास ब्रह्मानंदाची प्राप्ति ४६३-४६६, गुरुभक्तीनें भववृक्षाचें च्छेदन ४६७ ४७६.

श्लोक २४—सद्गुरूचें लक्षण ४७७-४८०, सद्गुरुभक्ति ४८१-५८२, बोधानें भववृक्षाचें च्छेदन ५८३-५८९, आत्मज्ञानानें तृप्ति व कर्मत्याग ५९०-५९८, ज्ञानवृत्तीचा त्याग न झाल्यास अभिमानाची बाधकता ५९९-६१२, उद्धवास शिकवण ६१३-६१७, देवभक्तांचें प्रेम ६१८-६२२, उपसंहार ६२३-६२८.

## अध्याय तेरावा

**श्लोक संख्या : ४२** **ओवी संख्या : ७८१**

हंस रूपकानें मंगलाचरण १-२०, उपोद्घात २१-२७, उद्धवाची आशंका, त्रिगुणांचें वास्तव्य असतां सद्विद्येचा उद्भव कसा होईल ? २८-३०.

श्लोक १-५—आत्म्याचें ठायीं गुण नाहींत ३१-३५, विद्येची उत्पत्ति गुणांच्या नाशानें होते ३६-४९, सात्विक अन्नसेवनानें सत्त्वगुणवृद्धि, रजतमनाश व बोधप्राप्ती ५०-६०, गुणवृद्धीस दहा हेतु, आगम, आप, प्रजा, देश, काल, कर्म, जन्म, ध्यान, मंत्र, संस्कार ६१-६४, आगम ६५, आप ६६-७०, प्रजा७१-७२, देश ७३-७४, काल ७५-७८, कर्म ७९, जन्म ८०-९३, ध्यान ९४-१००, मंत्र १०१-११०, संस्कार १११-११८, तमोगुण वृद्धीचें लक्षण व तें टाळण्याकरितां दहा लक्षणें ११९-१३२, रजोगुणवृद्धीचे प्रकार १३३-१५१, सत्त्वगुण

व तमोगुण टाकतां येतात, पण रजोगुण टाकतां येत नाहीं १५२-१५९, सात्त्विक सेवनाचें गुणवर्णन १६०.

श्लोक ६-७—सात्त्विक अन्नसेवनानें सत्त्ववृद्धि, धर्मप्रवृत्ति व ज्ञानप्राप्ति होते १६१-१६२, सत्त्वशुद्धिवांचून गुरूपदेश व्यर्थ १६३-१७२, भक्तीनें ज्ञान व ज्ञानानें अविद्यानाश १७३-१८५, आशंका, देहामुळें जर ज्ञान उत्पन्न होतें तर तें ज्ञान देहाचें व गुणांचें निर्मूलन कसें करील ? १८६-१८८, वैराग्यानें ज्ञान व ज्ञानानें अविद्यानाश व स्वरूपप्राप्ती १८९-१९७, जनांच्या विषयलालसेचें उद्धवास आश्चर्य, उद्धवाची प्रार्थना, जनांस विषयांची दुःखदावस्था कळत असून ते श्वान, खर, अजासारखे विषयासक्त कां व्हावेत ? १९८-२२५.

श्लोक ८-११—श्रीकृष्ण संभाषण, रजोगुणामुळें देहबुद्धि व आत्मविस्मृति २२६-२२९, रजोगुणामुळें कामासक्ति २३०-२४६, आशंका, मुमुक्षूला विषयत्याग व्हावा कसा ? २४७-२४८.

श्लोक १२-१४—विषयांच्या अनुतापानें मनाचें नियमन करण्याची आवश्यकता २४९-२५३, योगाभ्यासानें मनोनिग्रह २५४-२६१, सनकादिकांस केलेल्या उपदेशासंबंधींचे उद्गार २६२-२६७.

श्लोक १५—उद्धवाची प्रार्थना, सनकादिकांस उपदेश कोणत्या रूपानें केला व तो काळ कोणता ? २६८-२७०.

श्लोक १६—श्रीकृष्ण संभाषण, सनकादिकांनीं पित्यास केलेला सूक्ष्म योगगती व स्वरूपस्थिती या विषयीं प्रश्न २७१-२७३.

श्लोक १७—सनकादिकांचा प्रश्न, विषयांत चित्त व चित्तांत विषय असतां अन्योन्य त्याग कसा व्हावा ? २७४-२७८.

श्लोक १८-२१—श्रीकृष्ण संभाषण, ब्रह्मदेवाची कर्मामुळें जड बुद्धि म्हणून त्यानें केलेलें परमात्म्याचें चिंतन २७९-२८५, हंस स्वरूपानें परमात्म्याचें सत्यलोकीं आगमन २८६-२९९, हंसाचा सत्यलोकीं सन्मान व सनकादिकांनीं आपण कोण म्हणून केलेला प्रश्न ३००-३०५, नित्यानित्यज्ञानाचें हंस गीतेंत प्रतिपादन व उद्धवयशोवर्णन ३०६-३१४.

श्लोक २२-२६—हंस संभाषण, आत्मा अद्वैत व देह पंचभूतात्मक असल्यामुळें प्रश्नाची अयुक्तता ३१५-३३३, आत्म्याची सर्व इंद्रियांचें ठिकाणीं व्यापकता ३३४-३५९, विषयत्यागावांचून ब्रह्मज्ञानाची अप्राप्यता ३६०-३६१, स्वरूपाच्या विस्मरणानें व कर्तृत्वभोक्तृत्वअभिमानानें देहद्वयाचा उद्भव ३६२-३६७, भक्तीनें अभिमानाचें निर्मूलन, देहद्वयाचें निरसन व जीवाची तद्रूपता ३६८-३९२.

श्लोक २७-२८—जीवाचें तिन्ही अवस्थामध्यें साक्षित्व ३९३-४०१, अहंममत्वानें जीवास बंधन ४०२-४१३, तूर्यानुभवानें चित्ताचा व विषयाचा अन्योन्य वियोग ४१४-४२९, देहाभिमान संसारबंधनास कारण, त्याचें लक्षण ४३०.

श्लोक २९- अहंकारामुळें देहाची प्रबलता ४३१-४३६, ईश्वरभावनेनें तूर्यावस्थाप्राप्ती, जीवाची तद्रूपता व अभिमानखंडन ४३७-४४७.

श्लोक ३०-३१—ज्ञानाभिमानानें स्वरूपज्ञानाचा लोप ४४८-४५८, आशंका, वेदानेंच जर भेदाचें प्रतिपादन केलें आहे तर वेदाज्ञा असत्य कां मानावी ? ४५९-४६४, अज्ञ जनांस वेदाचें नियमन, पण सज्ञानास नाहीं ४६५-४८०.

श्लोक ३२-४०—आत्म्याचें तिन्ही अवस्थांत साक्षित्व ४८१-५०१, मायेमुळें गुणावस्था व संसारबंधनप्राप्ती ५०२-५०९, भवबंधनिरसनार्थ साधुसेवेची आवश्यकता, साधुसेवेनें ज्ञानखड्गाची प्राप्ती व देहाभिमानाचें खंडन ५१०-५२९, आशंका, परमात्म्याचें भजन कोठें करावें? ५३०-५३२, हृदय हें भजनस्थान होय ५३३-५४२, मनःकल्पित संसाराचा आभास, अलातचक्राचा दृष्टांत ५४३-५५७, भगवद्भावनेनें संसारभ्रमाचें निर्मूलन ५५८-५६६, ज्ञात्याची जीवन्मुक्तस्थिती ५६७-७११, हंसानें ब्रह्मज्ञानाची गायिलेली महति ७१२-७२१, स्वतःच्या व्यापकतेचें व निर्गुणत्वाचें हंसानें केलेलें वर्णन ७२२-७३७.

श्लोक ४१-४२—ज्ञानश्रवणानें सनकादिकांची निःसंदेहता व ब्रह्मस्वरूपता ७३८-७४२, सनकादिकांनीं हंस स्वरूपाचें केलेलें पूजन ७४३-७४९, हंसाचें निजधामास गमन ७५०, उपसंहार ७५१-७८१.

## अध्याय चौदावा

**श्लोक संख्या :** ४६ **ओवी संख्या :** ५४८

सागररूपानें गुरूस नमन १-१७, मराठी भाषेचें श्रेष्ठत्व १८-२५, उपोद्घात

२६-२८, भक्तीनें सायुज्य मुक्ति मिळते तर इतर साधनांचा काय उपयोग! त्यांत मुख्य कोणतें व गौण कोणतें ? २९.

श्लोक १-२– वरील शंकेचें समाधान करण्याबद्दल उद्धवाची प्रार्थना ३०-३४, प्रस्तुत अध्यायांतील प्रतिपादित विषय ३५-३९.

श्लोक ३–श्रीकृष्ण संभाषण, ब्रह्मदेवास भक्तीचा उपदेश कल्पादीं ४०-४३.

श्लोक ४-११– उपदेशपरंपरा ४४-५२, प्रकृतिस्वभावानुरूप विविध साधनें ५३-६०, माया आवरणानें विवेकनाश व विषयनिष्ठता ६१-६४, नाना साधनांची विटंबना व दुःखरूप फळ व पतन ६५-८२.

श्लोक १२-१५–उद्धव योग्यता वर्णन ८३-८५, निरपेक्षास ब्रह्मसुखप्राप्ति ८६-१०२, भक्तीचें गुणवर्णन १०३-११४, भक्तांची त्यागवृत्ति ११५-१३४, आशंका, भक्ताप्रमाणें देवाचें प्रेम भक्तावर असतें कां ? १३५-१४०, उत्तर, देवास भक्ताइतकें जगांत दुसरें कांहीं प्रिय नाहीं १४१-१६१.

श्लोक १६-१७–भक्तीचीं लक्षणें, निरपेक्षता १६२-१६६, मननता १६७-१६९, शांतता १७०-१७३, समता १७४-१७५, निर्वैरता १७६-१८०, भक्ताचीं पांच लक्षणें, निरपेक्षता १८१-१८२, भक्तमहिमा १८३-१९१, आकिंचनता १९२-१९३, शांति १९४, महंतस्थिति १९५-१९७, निर्विषयता १९८-२००, सुखसंपन्नता २०१-२२०.

श्लोक १८-२१–भक्तास विषय बाधत नाहींत २२१-२२३, भक्तीनें विषयनिवृत्ति २२४-२२८, आशंका, विषयाची निवृत्ति कशानें होईल? २२९-२३०, भक्तीच्या पराकाष्ठेनें, भक्तमहिमा २३१ २९८.

श्लोक २२-२४–भक्तीशिवाय सर्व साधनें व्यर्थ २९९-३०६, भगवंताच्या चरित्रश्रवणानें चित्तशुद्धि, भक्तीची प्राप्ती व भक्ताच्या देहावर दिसणारीं चिन्हें ३०७-३१३, भक्तीवांचून विरक्ति नाहीं व विरक्तीवांचून भगवत्प्राप्ती नाहीं ३१४-३१६, भक्तीचीं चिन्हें ३१७-३३६.

श्लोक २५-३०–भक्तीनें अविद्यानाश व परमानंदप्राप्ती ३३७-३४१, आशंका, ज्ञानानें अविद्यानाश होतो तर भक्ति कशाला पाहिजे ? ३४२-३४३,

उत्तर, भक्तीनें ज्ञान व जीवास चैतन्यत्व प्राप्त होतें ३४४-३४८, चिंतनानें चित्ताची मद्रूपता प्राप्त होते ३४९-३५४, साधकानें भोग व स्त्रीसंग त्यागून भगवत्ध्यान करावें ३५५-३६४, स्त्री व स्त्रैणसंगति साधकास बाधक आहे ३६५-३९५, विरक्तीकरितां कोणतें ध्यान करावें? ३९६-४००.

श्लोक ३१—उद्धवप्रार्थना, ध्यान सगुणाचें किंवा निर्गुणाचें? त्याचें रूप काय? वर्ण कोण? हें कृपाकरून सांगावे.

श्लोक ३२-४६—श्रीकृष्ण संभाषण, ध्यानाचीं साधनें दोन, आसन लक्षण ४०१-४०६, अभ्यास लक्षण- ४०७-४३२, सगुण निर्गुण प्रणव उपासनेनें जीवास सुखप्राप्ती ४३३-४६४, सगुणरूप प्रणव ध्यान प्रकार ४६५-५१२, ध्यानानें त्रिपुटीचें निरसन व पूर्णानंदप्राप्ती ५१३-५३६, विषयाचा उपसंहार ५३७-५४८.

## अध्याय पंधरावा

**श्लोक संख्या** : ३६ **ओवी संख्या** : २५०

अंजनरूपानें सद्गुरूस नमन १-९, जनार्दनांनीं भागवताची आपल्यास गोडी लावली हें काव्यमय भाषेंत नाथ वर्णितात १०-२४, उपोद्घात २५-२८, प्रस्तुत अध्यायांतील प्रतिपाद्य विषयाचा उल्लेख २९-३१.

श्लोक १—श्रीकृष्ण संभाषण, भक्तीस ध्यानाचे वेळीं सिद्धींचा उपसर्ग ३२-३४.

श्लोक २—उद्धवाचा प्रश्न, कोणत्या सिद्धीची कोणत्या धारणेनें प्राप्ती होते व त्यांची संख्या किती? ३५-३६.

श्लोक ३-७—श्रीकृष्णाचें भाषण, स्वरूपानुभवानें आठ सिद्धी व शुद्ध सत्त्वानें दहा सिद्धींची प्राप्ति होते ३७-४२, अणिमा, महिमा, लघिमा आदि आठ सिद्धींचें वर्णन ४३-४८, दहा सिद्धींचें वर्णन ४९-५९.

श्लोक ८-९—पांच क्षुद्र सिद्धींचें वर्णन ६०-६४, सिद्धीच्या प्राप्तीचीं साधनें ६५-६६.

श्लोक १०-१६—आठ सिद्धी—( १ ) अणिमा वर्णन ६७-७० ( २ ) महिमा वर्णन ७१-७४ ( ३ ) लघिमा वर्णन ७५-७८ ( ४ ) प्राप्ती वर्णन ७९-

८२ ( ५ ) प्रकाश वर्णन ८३-८६ ( ६ ) ईशिता वर्णन ८७-९२ ( ७ ) वशिता वर्णन ९३-९८ ( ८ ) यत्काम वर्णन ९९-१०६.

श्लोक १७-२६—दहा सिद्धी- ( १ ) अनूर्मित्व १०७-१०८ ( २ ) दूर श्रवण १०९-११२ ( ३ ) दूर दर्शन ११३-११५ ( ४ ) मनोजव ११६-११८ ( ५ ) कामरूप ११९-१२२ ( ६ ) परकाया प्रवेशन १२३-१२९ ( ७ ) स्वच्छंद मृत्यु १३०-१४० ( ८ ) प्राप्ती सुरक्रीडा १४१-१४३ ( ९ ) संकल्प सिद्धि १४४-१४६ ( १० ) अप्रतिहत आज्ञा १४७-१५०.

श्लोक २७-३०—पांच सिद्धिवर्णन ( १ ) त्रिकालज्ञता १५१-१५२ (२) अद्वंद्वता १५३-१५५ ( ३ ) प्रतिष्टंभ १५६-१६६ ( ४ ) परचित्ताभिज्ञता १६७-१७१ ( ५ ) अपराजितत्व १७२-१७७.

श्लोक ३१—भिन्न भिन्न सिद्धींची भिन्न भिन्न धारणेनें प्राप्ती १७८-१८०.

श्लोक ३२-३३—साधकाला शम, दम, वैराग्य, विवेक, मनन, ध्यान आदि साधनांनीं सिद्धीची प्रगटता, सिद्धीची बाधकता म्हणून त्यागच करावा १८१-१९९.

श्लोक ३४—जन्म, औषधी, तप, मंत्र, योगादि साधनांनीं प्राप्त होणाऱ्या सिद्धींचें वर्णन २००-२१४, भक्तांना सिद्धीची इच्छा होत नाहीं २१५-२२०.

श्लोक ३५-३६—भगवंतांनीं स्वतःच्या पूर्णत्वाच्या ऐश्वर्याचें केलेलें वर्णन २२१-२३०, सिद्धि मत्प्राप्तीस विघ्नें आणतात २३१-२३४, निरपेक्षतेचें महात्म्य २३५-२४६, उपसंहार २४७-२५०.

## अध्याय सोळावा

**श्लोक संख्या :** ४४ **ओवी संख्या :** ३३७

गुरूच्या निर्विशेष स्वरूपास नमन १-१९, भागवतपरंपरा व देशभाषेंत वर्णन २०-२८, मागील सर्व अध्यायांचा सारांश २९-६९, जनार्दनकृपेचा महिमा ७०-७४, मागील अनुवाद ७५-७७.

श्लोक १-५—उद्धवाची प्रार्थना, तूं सर्वीं सर्वत्र सबाह्य असतांहि अतर्क्य किंवा अपरोक्ष कसा म्हणवून घेतोस ? याकरितां विभूतींची समूळ स्थिती सांगावी ? ७८-९८.

श्लोक ६-८—श्रीभगवंताचें संभाषण, असाच प्रश्न पूर्वी कुरुक्षेत्रांत अर्जुनानें केला होता ९९-१०७, अर्जुनास झालेल्या विषादाचें वर्णन १०८-११७, अर्जुनास भगवंतांनीं सांगितलेलें ज्ञान ११८-१५०.

श्लोक ९-१४— विभूतींचें वर्णन, ईश्वरत्व १५१-१५९, गति, काळ अकृत्रिमता १६०-१६४, सूत्र क्रिया महत्तत्त्व, जीव, मन १६५-१७०, हिरण्यगर्भ, ओंकार, अकार, गायत्रीछंद १७१-१७६, इंद्र, अग्नि, वामन, शंकर १७७, भृगु, मनु, नारद, कामधेनु १७८-१८०.

श्लोक १५-२५—कपिल, गरुड, दक्ष, अर्यमा १८१-१८२, प्रल्हाद, चंद्र, कुबेर १८३-१८४, ऐरावत, वरुण, सूर्य, भूपति १८५-१८७, उच्चैःश्रवा, सुवर्ण, यम, वासुकी, शेष, सिंह, संन्यासी, ब्राह्मण १८८-१९१, गंगा, धनुष्य, समुद्र, त्रिपुरारी १९२-१९३, मेरु, हिमालय, अश्वत्थ, यव १९४-१९५, वसिष्ठ, बृहस्पति, कार्तिकस्वामी, १९६-१९७, ब्रह्मयज्ञ, अहिंसाव्रत, वायु, अग्नि, उदक, वाचा १९८-२०२, योग, नीति, आन्वीक्षिकी, विद्या, वाद २०३-२०७, शतरूपा, मनु, नारायण, सनत्कुमार २०८-२०९.

श्लोक २६-३०—संन्यासधर्म, क्षमा, सत्यवचन, मौन, प्रजापति २१०-२१७, संवत्सर, मधुमाधव, मार्गशीर्ष, अभिजित् २१८-२२१, कृतयुग, असित, देवल, व्यास, उशनाचार्य २२२-२२५, वासुदेव, उद्धव, हनुमंत, सुदर्शन २२६-२३५, पद्मराग, पद्मकळा, कुश, गोघृत, २३६-२३७.

श्लोक ३१-३५—उद्यमलक्ष्मी, कपटयुक्ति, सहनशीलता, सत्त्ववृत्ति २३८-२४२, मनोबळ, भजनकर्म, वासुदेवादि नऊ मूर्ति २४३-२५७, विश्वावसु, पूर्वचित्ति, स्थैर्य, गंध २५८-२६०, मधुर रस, तेज, प्रकाश, ध्वनि, अनाहत २६१-२६२, बळी, अर्जुन, उत्पत्ति, स्थिति, प्रलय २६३-२६५.

श्लोक ३६-४०—इंद्रियांची अभिव्यक्तता २६६-२७२, पंचवीस तत्त्वें, त्रिगुण २७३-२७६, क्षेत्रक्षेत्रज्ञ २७७-२८२, विभूतींची अपारता २८३-२८६, मानवी विभूति २८७-२९१.

श्लोक ४१—विभूतींचें मनःकल्पितत्व व स्वरूपाच्या ठिकाणीं मिथ्यात्व २९२-२९४.

श्लोक ४२-४४—भगवंताचे ठिकाणीं मन, बुद्धि व इंद्रियें यांचें नियमन केल्यानें भगवत्प्राप्ती व संसाराची निवृत्ति २९५-३००, इंद्रियांचें नियमन न केल्यास दुःखकोटी ३०१-३०६, भक्तीनें शांतीची प्राप्यता व संसारनिवृत्ति ३०७-३१०, संकटसमयीं भक्तांच्या रक्षणाचे दृष्टांत ३११-३१७, भक्तांचा महिमा ३१८-३२२, श्रीकृष्ण उद्धवाची स्वानंदता ३२३-३२७, उपसंहार ३२८-३३८.

## अध्याय सतरावा

**श्लोक संख्या : ५८** **ओवी संख्या : ५४२**

मेरुरूपकानें गुरूस नमन १-११, उपोद्‌घात १२-१८.

श्लोक १-७—उद्धवाची प्रार्थना, त्यानें केलेले पांच प्रश्न—( १ ) वर्णाश्रमधर्म ( २ ) वर्णबाह्यांचें कर्म ( ३ ) सर्व वर्णांचा स्वधर्म ( ४ ) आश्रमधर्म ( ५ ) स्वधर्म-युक्त भगवद्भक्ति १९-४९.

श्लोक ८—शुकानें उद्धवाचें केलेलें यशोवर्णन ५०-५८.

श्लोक ९—श्रीकृष्ण संभाषण, जनांच्या उद्धारार्थ योग्य प्रश्न केल्याबद्दल उद्धवाचा गौरव ५९-६२.

श्लोक १०-११—वर्णाश्रमधर्म, कृतयुगवर्णन, वर्ण, ध्यान, तपश्चरण ६३-७०.

श्लोक १२-१५—त्रेतायुगवर्णन, वेदाची व यज्ञाची प्रगटता ७१-७५, चार वर्णांचा उद्भव ७६-७८, वर्णाश्रमस्थिती ७९-८०, गुणानुरूप वर्णव्यवस्था ८१-८३.

श्लोक १६—ब्राह्मणाचीं दहा लक्षणें—(१) शम ८४-८९ (२) दम ९०-९२ ( ३ ) तप ९३-९७ ( ४ ) शौच ९८-१०० ( ५ ) संतोष १०१-१०६ (६) शांति १०७-१०९ ( ७ ) आर्जव ११०-११३ ( ८ ) निजभक्ति ११४-१२३ ( ९ ) दया १२४-१३१ ( १० ) सत्य १३२-१३५.

श्लोक १७—क्षत्रियाचीं दहा लक्षणें—( १ ) तेज १३६-१३९ ( २ ) बळ १४०-१४२ ( ३ ) धृति १४३-१४४ ( ४ ) शौर्य १४५-१४९ ( ५ )

तितिक्षा १५०-१५४ ( ६ ) औदार्य १५५-१५८ ( ७ ) उद्यम १५९-१६१ ( ८ ) स्थैर्यता १६२-१६३ ( ९ ) ब्राह्मणभक्ति १६४-१६८ ( १० ) ऐश्वर्य १६९-१७४.

श्लोक १८—वैश्याचीं पांच लक्षणें—( १ ) द्रव्यलोभ १७५-१७६ ( २ ) अर्थसंचय १७७-१७८ ( ३ ) दाननिष्ठा १७९ ( ४ ) ब्राह्मणसेवा १८०-१८१ ( ५ ) अदंभत्व १८२-१८४.

श्लोक १९—शूद्रकर्में—( १ ) ब्राह्मणसेवा १८५-१८६ ( २ ) गोरक्षण १८७-१८८ ( ३ ) देशसेवा १८९-१९१, चारहि वर्णांतील कर्तव्यतेचें संक्षिप्त वर्णन १९२-१९९.

श्लोक २०—वर्णबाह्य जातीचीं लक्षणें—( १ ) अशौच २००-२०४ (२) असत्य २०५-२०७ ( ३ ) चोरी २०८-२१० ( ४ ) नास्तिकता २११-२१३ ( ५ ) शुष्कविग्रह २१४-२१९ ( ६ ) काम २२०-२२३ ( ७ )क्रोध २२४-२२५ ( ८ ) लोभ २२६, उपसंहार २२७ २२९, वर्णबाह्य जातींचीं लक्षणें ज्यांत आहेत ते नरकगामी होत २३०-२३४.

श्लोक २१—सर्व वर्णांचे सहजधर्म- ( १ ) अहिंसा २३५-२३६ ( २ ) सत्य २३७-२३८ ( ३ ) अचौर्य २३९-२४१ ( ४ ) अकामता २४२-२४४ ( ५ ) अक्रोधता २४५-२४८ ( ६ ) निर्लोभता २४९-२५०, कामक्रोध-लोभांचा परस्परावलंबन २५१-२५७, भूतप्रियहितकारिता २५८-२६५.

श्लोक २२-३६—आश्रमधर्मवर्णन, ब्रह्मचर्याचे दोन भेद, उपकुर्वाण व नैष्ठिक २६६-२७२, उपकुर्वाण धर्माचरण २७३-२८६, विर्यरक्षण २८७-२९०, आचार्य, माता, पिता, सूर्य, अग्नि, गो, ब्राह्मण इत्यादि विषयीं ब्रह्मचाऱ्याचें कर्तव्य २९१-२९५, गुरूची महति २९६-३०५, आहार नियम ३०६-३१३, गुरु-सेवेशीं सावधानता ३१४-३३७, ब्रह्मचारीयांचें स्त्रियांचें अवलोकन, दर्शन, स्पर्शन इत्यादि विषयीं बंधन ३३८-३५३, सदाचरण ३५४-३५७, स्वधर्माचें नियमन ३५८-३६१, भक्तीचा उद्भव ३६२-३६७.

श्लोक ३७-३८—उपकुर्वाण व्रताच्या समाप्तीनंतर गार्हस्थ्य, वानप्रस्थ अगर संन्यास यापैकीं कोणत्याहि आश्रमाचें अधिकारानुरूप ग्रहण ३६८-३८७, भक्तास आश्रमनियमांची अनावश्यकता ३८८-३९०.

श्लोक ३९-४६—गृहस्थाश्रम, भार्येसंबंधी युक्तायुक्तविचार ३९१-३९६, षट्कर्माचें व त्रिकर्माचें नियमन ३९७-४०८, ब्राह्मणांस स्वधर्माचरणानें ब्रह्मप्राप्ती ४०९-४३३, धनानें भक्तसंरक्षण करणारास ब्रह्मप्राप्ती ४३४-४४२, राजधर्म ४४३-४५२.

श्लोक ४७-४९—आपत्कालीं चारी वर्णांनीं उपजीविका कशी करावी ? ४५३-४७२, नित्य कर्मांचें आचरण ४७३-४८३, यज्ञकर्माचरण ४८४-४९०, स्त्री, पुत्र, गृहादींची अनासक्ति ४९१-५०२, अनासक्तीनें स्वमुक्तता ५०३-५०५.

श्लोक ५०-५८—भक्तास आश्रमांतराची अनावश्यकता ५०६-५०९, वानप्रस्थाधिकारी ५१०, संन्यासाधिकारी ५११-५१२, अनधिकारी ५१३-५१५, अहंममताभिमानानें व कुटुंबाच्या मोहानें अधःपतनता ५१६-५३०, नरदेहाचें कर्तव्य ५३१-५३२, ब्राह्मणजन्माचें श्रेष्ठत्व ५३३-५४२.

## अध्याय अठरावा

**श्लोक संख्या** : ४८ **ओवी संख्या** : ३९७

मंगलाचरण १-६, उपोद्घात ७-९.

श्लोक १-११—वानप्रस्थाश्रम, वनवासगमन १०-१६, आहार, निद्रा, वस्त्राच्छादनाविषयीं नियम १७-२४, तपोलक्षण २५-२८, फलाहाराविषयीं नियम २९-३७, वेदोक्त कर्माचरण ३८-४३, स्वस्वरूपप्राप्ती ४४-४९, कामाभिलाषी वानप्रस्थास मूर्खाची उपमा ५०-५५, आयुष्यव्यवस्था ५६-६३.

श्लोक १२-२७—संन्यासाश्रम, संन्यासग्रहण कोणीं करावें ? ६४-६८, संन्यासग्रहणांत येणारीं विघ्नें ६९-७३, संन्याशास विधिविधानाचें किंकरत्व नाहीं ७४-७९, संन्याशाचे वस्त्राच्छादनाविषयीं नियम ८०-८५, आत्मानुसंधानानें इंद्रियांची पवित्रता ८६-९५, त्रिदंडलक्षण ९६-१०३, संन्याशाचा आहार १०४-१२५, त्याचा विहार १२६-१३०, आचार १३१-१३७, विकार १३८-१४९, संचार १५०-१६०, संन्याशाचे भिक्षानियम १६१-१६५, विरक्तता १६६-१६९, स्वरूपबोधानें प्रपंचाचें मिथ्यात्वदर्शन १७०-१७४, संन्यासाश्रमाचे चार भेद-हंस, परमहंस, बहूदक, कुटीचक १७५-१८७.

श्लोक २८-३७—परमहंसाचे धर्म-ज्ञाननिष्ठ, विरक्त, भगवद्भक्त व अनपेक्ष यांनीं आश्रम धर्मांचा त्याग करून लोकरक्षणार्थ धर्म राखावे १८८-१९७, वेड्या-प्रमाणें वर्तन १९८-२०३, विवाद्य भाषणासंबंधीं मौन २०४-२१३, उपसर्गांची सहनशीलता २१४-२२५, निर्वैरता २२६-२३४, आहारविहाराविषयीं निरीच्छता २३५-२३८, भिक्षेसाठीं अटनाची आवश्यकता २३९-२४६, आहार, निद्रा, वस्त्रासंबंधीं नियम २४७-२५१, कर्मांची निरभिमानता २५२-२५४, आत्मदर्शनानें भेदाचें निरसन २५५-२५९, प्रारब्धभोगानें देहाचें अस्तित्व २६०-२६५, विदेहावस्था २६६-२६९.

श्लोक ३८-३९—ज्ञानप्राप्तीकरितां संन्यास घेऊन गुरूस शरण जावें २७०-२७७, गुरुसेवेविषयीं तत्परता २७८-२८९.

श्लोक ४०-४१—विषयार्थी दांभिक व अविरक्त संन्यासी निंद्य होय २९०-३११.

श्लोक ४२-४६—चारहि आश्रमांचें संक्षिप्त लक्षण व सर्वांचा मुख्य धर्म भगवद्भक्ति ३१२-३१७, गृहस्थाचें स्वधर्माचरण ३१८-३२२.

श्लोक ४७—भगवद्भक्तीचें वर्णन, सर्वभूतीं ईश्वरभावनेनें चौथ्या परम भक्तीची प्राप्ती ३२३-३३२, स्वधर्मानुष्ठानानें चित्तशुद्धि, ज्ञानप्राप्ती व संसार निवृत्ति ३३३-३४५, स्वधर्माची उपेक्षा करून सकाम कर्म केलें तर परिणाम दुःखद ३४६-३६५, स्वधर्माचरणानेंच ज्ञानभक्तीची प्राप्ती ३६६-३७७.

श्लोक ४८—स्वधर्ममहिमा ३७८-३९१, उपसंहार ३९२-३९७.

## अध्याय एकोणिसावा

**श्लोक संख्या** : ४६ **ओवी संख्या** : ५९५

शंकररूपकानें गुरुनमन १-१०, उपोद्घात ११-२४.

श्लोक १-५—श्रीभगवंताचें भाषण, ज्ञानानुभवाचें लक्षण २५-३३, ज्ञानानें साधनांचा त्याग ३४-३९, ज्ञात्याचें भगवत्प्रेम ४०-४६, देवासहि ज्ञात्याचें प्रेम ४७-५६, ज्ञानाची पवित्रता ५७-६३, ज्ञानविज्ञान लक्षण ६४-६५, ज्ञानविज्ञान-संपन्न ज्ञात्याच्या भजनास्थितीचें लक्षण ६६-७०.

श्लोक ६-७—ऋषीमुनींचीं ज्ञानसाधनें ७१-७८, प्रपंचाचें मिथ्यात्व व वस्तूचें सत्यत्व ७९-९३, उद्धवाची आनंदावस्था ९४-९६.

श्लोक ८-१०—शुद्धज्ञान व भक्तिविषयक उद्धवाचा भगवंतास प्रश्न ९७-१०६, शरणता १०७-११८, भवाचें दुःखद वर्णन व जनाविषयीं कळकळ ११९-१३५, कृष्णाचें भाषण १३६.

श्लोक ११-२४—श्रीकृष्ण संभाषण, धर्माची थोरवी व भीष्माची महति १३७-१५४, धर्मानें भीष्मास केलेले प्रश्न १५५-१६३, भीष्माचें ऐकिलें तेंच देवांनीं सांगितलें १६४-१६७, ज्ञानाचें वर्णन १६८-१७४, विज्ञानलक्षण १७५-१८४, त्रिगुणांची अंतवंतता १८५-१८९, आत्मवस्तूचें सत्यत्व १९०-१९५, प्रपंचमिथ्यात्वाचीं चार प्रमाणें १९६-२०६, इहासूत्रादि भोगाविषयीं विरक्ति २०७-२१२, भक्तीचीं लक्षणें २१३-२१६, कथाश्रवण २१७-२१९, कीर्तन २२०-२२६, पूजन २२७-२२९, संतांचें ठिकाणीं प्रेम २३०-२३७, सर्वांभूतीं भगवद्भाव २३८-२४३, मनार्पण २४४-२५०, धन, दारादिकांचा त्याग २५१-२५४, मनासह सर्व कर्में मदर्पण २५५-२६१, मदर्पणानें मनाची निर्मलता व मत्भक्तीची प्राप्ती २६२-२६६, आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी भक्तीपेक्षां ज्ञान्याच्या भक्तीचें महत्त्व २६७-२८२, भक्तांचें ऐश्वर्य २८३-२९४, भक्तीचें रहस्य २९५-३०१, देवभक्ताचें प्रेमनिमज्जन ३०२-३१४, व्याख्यान लांबल्याबद्दल नाथांचा परिहार ३१५-३२४.

श्लोक २५—मन अर्पण करण्याचा सुगम उपाय नामस्मरण, त्यामुळें पापाचें क्षालन ३२५-३३४.

श्लोक २६—विषयासक्तीनें अनर्थप्राप्ती ३३५-३४६, परमात्मप्राप्तीच्या चार साधनांचा सारांश ३४७-३४८.

श्लोक २७—परमात्मप्राप्त्यर्थ धर्म, ज्ञान, वैराग्य व ऐश्वर्य अशा चार लक्षणांचा गुह्यार्थ ३४९-३५७, यमनियमादि प्रश्नोद्धवाचें कारण ३५८-३६१.

श्लोक २८-३२—उद्धव प्रार्थना, यमनियमविषयक दोन व गुणविषयक तेहतीस प्रश्न ३६२-३७०, प्रश्नांचीं उत्तरें देण्याविषयीं भगवंताची प्रार्थना ३७१-३७४.

श्लोक ३३-४५—श्रीकृष्ण संभाषण—( १ ) यमाचे बारा प्रकार ३७५-३९३ ( २ ) नियमाचे बारा प्रकार ३९४-४१२, यमनियमांचें महत्त्व ४१३-४१६, नाथांचे उद्गार ४१७-४३०, तेहतीस गुण—( १ ) शम ४३१-४३४ ( २ ) दम ४३५-४३७ ( ३ ) तितिक्षा ४३८-४४३ ( ४ ) धृति ४४४-४४६ ( ५ ) दान ४४७-४५० ( ६ ) तप ४५१-४५४ ( ७ ) शौर्य ४५५-४५९ ( ८ ) सत्य ४६०-४६३ ( ९ ) ऋत ४६४-४६५ ( १० ) शौच ४६६-४७१ ( ११ ) त्याग ४७२-४७३ ( ११ ) धन ४७४-४७८ ( १२ ) यज्ञ ४७९-४८४ ( १३ ) दक्षिणा ४८५-४८६ (१४) बळ ४८७-४९१ (१५) भाग्य ४९२-५०१ (१६) लाभ ५०२-५०५ (१७) विद्या ५०६-५१० (१८) लज्जा ५११ (१९) श्री ५१२-५१३ (२०) सुख ५१४-५१५ (२१) दुःख ५१६-५१७ (२२) पंडित ५१८-५२० (२३) मूर्ख ५२१-५२४ (२४) सन्मार्ग ५२५ (२५) चित्तविक्षेपता ५२६-५३१ (२६) स्वर्ग ५३२-५३४ (२७) नरक ५३५-५४४ (२८) गुरु ५४५-५५० (२९) गृह ५५१-५५४ (३०) आढ्य ५५५-५५६ (३१) दरिद्री ५५७-५५८ (३२) कृपण ५५९-५६४ (३३) ईश्वरत्व ५६५-५६८, प्रश्नसमाप्ती ५६९, साधकानें गुणदोषापासून अलिप्त राहण्याची आवश्यकता ५७०-५७२.

श्लोक ४६—ब्रह्मज्ञानलक्षण, अविद्येमुळें गुणदोषांचा उद्भव व ब्रह्माचें पूर्णत्व ५७३-५८१, गुणदोषासंबंधानें वेदरहस्य ५८२-५८८, साधकाचें कर्तव्य ५८९-५९२, उपसंहार ५९३-५९६.

## अध्याय विसावा

**श्लोक संख्या** : २७ **ओवी संख्या** : ४६२

समुद्ररूपानें गुरुनमन १-१०, नाथांची निरहंकारिता ११-१४, उपोद्घात १५-२२.

श्लोक १-५—उद्धवप्रार्थना, विधि निषेध पाळले नाहींत तर वेदाज्ञेचें उल्लंघन होतें व जर पाळले तर गुण दोष उद्भवतात, तेव्हां या भ्रमाचें निरसन व्हावें कसें ? २३-६५.

श्लोक ६-८—श्रीकृष्ण संभाषण, भगवत्कृपेवांचून वेदार्थ कळत नाहीं ६६-६९, अधिकारभेदामुळें वेदांनीं ज्ञान, भक्ति व कर्म सांगितले ७०-८९, गुणदोषांच्या अस्तिनास्तीचें रहस्य ९०-९८.

श्लोक ९-११—कर्मयोग, विरक्तीपर्यंत कर्मांची कर्तव्यता ९९-१०१, विरक्तीनें कथाश्रवणादर आणि कर्मांची अबाधकता १०२-१०८, स्वधर्माचरणानें विरक्तीचा उद्भव व ईश्वरप्राप्ती १०९-१२३.

श्लोक १२-१७—नरदेहानेंच ईश्वराची प्रसन्नता १२४-१४१, ज्ञानाभिमानानें पतन १४२-१४५, देह नश्वर असला तरी ब्रह्मप्राप्ती करून देतो १४६-१५४, पक्ष्याच्या वरस्थ्याविषयीं निरभिमानतेचा दृष्टांत १५५-१५८, नरदेहाचें नश्वरत्व मानून तत्‌विषयीं वैराग्याची आवश्यकता १५९-१६२, वैराग्ययुक्त भक्तीनें देहाभिमाननिवृत्ति १६३-१६६, दुर्लभ अशी नरदेह नौका, मदुपासनेचा सानुकूल वायु, सद्गुरूसारखा कुशल कर्णधार नावाडी अशा संगमानें भवाब्धीचें उल्लंघन व सायुज्यांत निमज्जन १६७-१८३, परमार्थास विमुख असणारा आत्मघातकी व त्यास नरकप्राप्ती १८४-१९३.

श्लोक १८-२१—स्वहिताकरितां साधकाची कर्तव्यता १९४-२००, मनाला स्थिर करण्याचा उपाय २०१-२१५, मनाच्या स्थिरतेविषयीं अश्व दृष्टांत २१६-२२३, सांख्ययोगाचें दिग्दर्शन २२४-२२७.

श्लोक २२-२६—सांख्ययोग, व्यापक चैतन्याच्या चिंतनानें चित्ताचा उपरम २२८-२४३, वैराग्ययुक्त आत्मचिंतनानें मनाची स्थिरता २४४-२४९, योगसाधनानें मनाची स्थिरता २५०-२७०, आन्वीक्षिकी विद्येनें तत्पदप्राप्ति २७१-२८५, ईश्वरभक्तीनेंच ईश्वरप्राप्ती २८६-२९३, योग्याची अनुतापानें पापापासून शुद्धता २९४-३०३, वेदाज्ञेचें रहस्य, विषयनिवृत्तीसाठीं कर्मप्रवृत्ति ३०४-३१५, स्वकर्मानें चित्तशुद्धि, वैराग्याचा व शुद्ध सत्त्वाचा उद्भव ३१६, शुद्ध सत्त्वानें गुरुभजनाची प्रगटता ३१७, गुरूचें महात्म्य ३१८-३२४, अधिकारानुरूप कर्माचरणाची आवश्यकता ३२५-३३९.

श्लोक २७ ३३—भक्तियोग, भक्तीचा अधिकारी ३४०-३४५, विषयांतून मुक्त होण्याकरितां ईश्वराचा धांवा ३४६-३५६, भगवत्कृपेनेंच अनुताप व

भक्तीची प्राप्ती ३५७-३६३, हृदयस्थ आत्मदर्शनानें भ्रांतीचें निरसन ३६४-३८१, भक्तीचा महिमा ३८२-३९५, भक्तीचें रहस्य ३९६-४०१.

श्लोक ३४-३७—भक्तलक्षण, निरपेक्षतेनें अभेद भक्तीची प्राप्ती ४०२-४१०, निरपेक्ष भक्ताचें ऐश्वर्य ४११-४१५, भक्तांना गुणदोष दिसत नाहींत ४१६-४२५, वेदांतील त्रिकांडांचा निष्कर्ष व त्याच्या अनुष्ठानानें सगुणाची अगर निर्गुणाची प्राप्यता ४२६-४५९, एकादशाचें महत्त्व, उपसंहार ४६०-४६२.

## अध्याय एकविसावा

**श्लोक संख्या : ४३** **ओवी संख्या : ५४२**

वैकुंठनाथ रूपकानें गुरूस नमन १-२४, उपोद्घात २५-२८.

श्लोक १-४—वेदामार्ग टाकून कामनिक योग इच्छितात त्यास दुःख २९-३४, कर्मामुळें गुणदोषांचा उद्भव ३५-४५, विषयनिवृत्तिसाठीं दोषादोषांचा विचार ४६-५१, व्यावहारिक आचार वर्णन ५२-६३.

श्लोक ५-७—स्वधर्मकर्मसिद्धार्थ वेदांत दोषादोषांचें प्रतिपादन ६४-७२, स्वधर्माचरणानें मोक्षाची प्राप्ती ७३, वेदाचा गुह्यार्थ समजण्यास गुरूची आवश्यकता ७४-७५, वेदामुळें जगदुद्धार ७६-७७, उद्धवाचा गौरव ७८, अधिकारानुरूप कर्माचरणासाठीं वर्णाश्रमाचे नियम ७९-८०.

श्लोक ८-१५—कर्मासाठीं देशाची शुद्धाशुद्धता ८१-९०, काळाची पवित्रता अपवित्रता ९१-१०६, द्रव्याची शुद्धाशुद्धता १०७-१४९, कर्त्याची शुचिता १५०-१५२, शुचित्वाचीं सहा लक्षणें १५३-१६८.

श्लोक १६-१८—गुणदोषांचें युक्तायुक्त लक्षण १६९-१९७, विषयत्यागार्थ गुणदोषांचें प्रतिपादन १९८-२०९.

श्लोक १९-२३—कामक्रोधामुळें उद्भवणारी कर्तव्यमूढता २१०-२१६, अविवेकानें मूढता २१७-२१९, विषयाभिनिवेश भ्रमाचें वर्णन २२०-२३५, वासनेप्रमाणें सकाम वा निष्काम कर्माची फलप्राप्ती २३६-२४०, मूर्खांच्या उद्धारार्थ स्वर्गादि भोगांची अभिव्यक्तता २४१-२४५.

श्लोक २४-२५—प्राणिमात्रांना विषयाची अभिलाषा स्वाभाविक आहे. त्याच्या निवृत्तीकरितां वेदानें विधिनिषेधाचें केलेलें विवरण २४६-२५५.

श्लोक २६-२८—सकामाकरितां वेद अर्थवाद बोलतो व स्वधर्माकडे प्रवृत्त करतो २५६-२७०, सकाम कर्म करणाऱ्याची दीनता, कृपणता व तमाच्या वृद्धीनें मुग्धता २७१-२८१, कामाभिलाषेनें हृदयस्थाची अप्रगटता व त्यामुळें अधःपतन २८२-२९४.

श्लोक २९-३४—वेदार्थ न कळल्यामुळें सकामांची स्वर्गाकडे प्रवृत्ति होते व शेवटीं नाश २९५-३१८, स्वधर्मानुष्ठानानें ब्रह्माची प्राप्ती ३१९-३२१, सकाम कर्मानें जीवाची हानि ३२२-३२६, गुणानुसार विषयाभिलाषा व तत्प्राप्त्यर्थ अन्य देव, पितर, भूतादि पिशाचांचें भजन ३२७-३३४, सकाम कर्माचा अनिष्ट परिणाम ३३५-३५०.

श्लोक ३५-४० कर्मत्यागानें जीवास ब्रह्मप्राप्ती व्हावी म्हणून वेद परोक्ष बोलतो व त्याचा गुह्यार्थ सांगतो ३५१-३६५, वेदाची अर्थतः व शब्दतः दुर्ज्ञेयता ३६६-३७६, वेदांचे व्यासकृत चार विभाग व त्याची दुर्बोधता ३७७-३८७, ब्रह्माची विकारता व मायेची अविकारता ३८८-३९६, योग्यास सूक्ष्म नादाचें अनुसंधान असतें पण सकामास नसतें ३९७-४१०, ॐकाराचा उद्भव, त्याची व्यापकता ४११-४१५, वैखरी वाणीची अभिव्यक्ति ४१६-४३५.

श्लोक ४१—गायत्री छंद व त्याचा महिमा ४३६-४५०, भगवत्कृपेशिवाय वेदाचें रहस्य अनाकलनीय ४५१-४५७, वेदाच्या तिन्ही कांडांचें तात्पर्य ४५८-५१२, उद्धवाची आनंदावस्था व गुरुकृपेचा महिमा ५१३-५२८, उपसंहार ५२९-५४२.

## अध्याय बाविसावा

**श्लोक संख्या : ६०** **ओवी संख्या : ७३१**

सूत्रधार रूपकानें गुरूस नमन १-१८, उपोद्घात १९-२७.

श्लोक १-३— उद्धवाची प्रार्थना, तत्त्वांची निर्णीत संख्या किती ? २८-५५.

श्लोक ४-९—श्रीकृष्ण संभाषण, तत्त्वसंख्यासंबंधानें भिन्न भिन्न मतानुवाद ५६-६८, वादाची सत्त्ववृद्धीनें उपरमता ६९-७१, कार्यकारणानुरूप तत्त्वोपपत्ती व अनुप्रवेशता ७२-८७, वक्त्याच्या ज्ञानविवक्षेप्रमाणें तत्त्वें न्यूनाधिक ८८-९१.

श्लोक १०-१३—सव्वीस तत्त्वांचें वर्णन ९२-११०, पंचवीस तत्त्वांचें विवरण १११-१३४, आत्म्याची निर्गुणता, जीवात्म्याची गुणकर्मीं अलिप्तता १३५-१३९, त्रिगुण, काळ व महत्तत्त्वाची प्रकृतीशीं अभिन्नता १४०-१४५.

श्लोक १४-१६—अठ्ठावीस तत्त्वें, प्रकृति, पुरुष, महत्तत्त्व, पंचमहाभूतें, अहंकार, पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें, मन, पंचविषय व त्रिगुण १४६-१६८.

श्लोक १७-१८—प्रकृतीपासून उत्पत्ति, स्थिती, निर्दलन १६९-१७२, पुरुषामुळें प्रकृतीची प्रकाशता १७३-१८०, प्रकृतिपुरुषाचें भिन्नत्व १८१-१८६, पुरुषावलोकनानें प्रकृतीची महदहंकारादि तत्त्वांशीं एकत्रता व ब्रह्मांडाचा उद्भव १८७-१८९.

श्लोक १९-२४—सात तत्त्वें १९०-१९६, सहा तत्त्वें १९७-१९८, चार तत्वें १९९-२०२, सतरा तत्वें २०३-२०४, सोळा तत्त्वें २०५-२११, तेरा तत्वें २१२-२१३, अकरा तत्वें २१४-२१७, नऊ तत्त्वें २१८-२१९, दोन तत्वें २२०, एक तत्व २२१-२२४.

श्लोक २५—निजतत्वसिद्ध्यर्थ तत्वांची न्यूनाधिकता २२५-२२६, तत्वांचा निष्कर्ष २२७-२३०.

श्लोक २६-२८— उद्धवाची प्रार्थना, प्रकृति पुरुषाचें भिन्नत्व कसें ? २३१-२७९.

श्लोक २९-३३—रात्री दिवसाप्रमाणें प्रकृति पुरुषाचा संबंध २८०-२८१, पुरुषाच्या अस्तानें प्रकृतीचा विस्तार, अहंकारता, त्रिगुणता व त्रिविधतापता २८२-३१४, त्रिविध तापांची व्यापकता ३१५-३७२, अहंकाराचा उद्भव व त्याची व्यापकता ३७३-३८३, प्रकृति पुरुषांचें भिन्नत्व ३८४ ३९२, आत्म्याची शुद्धता ३९३-३९७, स्वरूपाच्या विस्मरणानें विषयाभिवृद्धि ३९८-४००,

देहाभिमाननिरसनार्थ साधनांची आवश्यकता ४०१-४०२, अज्ञान लक्षणें ४०३-४०६.

श्लोक ३४-३५—उद्धवाची प्रार्थना, आत्मा एका देहांतून दुसऱ्या देहांत कसा जातो ? ४०७-४१८.

श्लोक ३६-४४—श्रीकृष्ण संभाषण, लिंगदेहयुक्त मनाचा देहाभिमान व त्याचें देहांतर ४१९-४२३, आत्मा अलिप्त असून आभासाचें कारण ४२४-४३०, मनाचें विषयांत तादात्म्य व तदनुरूप देहांतरगमन ४३१-४३५, जनन मरण मीमांसा ४३६-४५६, देहाचें जन्ममरण व आत्म्याची अविनाशिता ४५७-४६१, मनोजन्य त्रिपुटीचा उद्भव ४६२-४७७, काळगतीचा प्रभाव ४७८-४९०, आत्म्याचें नित्यत्व व देहबुद्धीचें मिथ्यात्व ४९१-५०४.

श्लोक ४५-४८—आत्म्याची अविनाशिता व देहभावनेनें जन्ममरणाचा आभास ५०५-५१०, देहाच्या नऊ अवस्था—निषेक ५११-५१२, गर्भावस्था ५१३, जन्मावस्था ५१४, बाल्यावस्था ५१५-५१६, कुमारावस्था ५१७, तारुण्यावस्था ५१८-५२२, उत्तरावस्था ५२३-५२४, जरावस्था ५२५-५३४, मरणावस्था ५३५-५४०, आत्म्याचें अलिप्तत्व ५४१-५४६, मनोजन्य विकारता ५४७-५४८, आत्मा व जीव दोघेहि निःसंग ५४९-५६८, देहाभिमानामुळें जन्ममरणाचें भोक्तृत्व ५६९-५७२, विरागी साधकाच्या निजात्मतेची अगम्यता ५७३-५८२, आत्म्याच्या जनन मरणासंबंधानें लौकिक मतांचें निरसन ५८३-५८६, वृक्षाचा दृष्टांत ५८७-५८९.

श्लोक ४९-५५—आत्मज्ञानाच्या विस्मरणानें देहाभिमानाची प्रबळता व त्रिगुण कर्माचरणानें भिन्न भिन्न योनींत पुनः पुनः जन्ममरण ५९०-६०४, आशंका, कर्मफळांचा भोक्ता कोण ? ६०५-६०७, गायनलुब्ध श्रोत्यांचा दृष्टांत ६०८-६१०, आशंका, गुणकर्मफळाचें भोक्तृत्व जर आत्म्याकडे आलें तर तो नित्य मुक्त कसा ? ६११-६१४, आब्रह्म स्तंभपर्यंत मनोजन्य विकारता ६१५-६४१, विवेक वैराग्यानें भवभयाचें निरसन व ब्रह्मानंदाची प्राप्यता ६४२-६५०.

श्लोक ५६—विषयांच्या अनुतापानें साधकास वैराग्याचा उद्भव व सद्गुरु-

कृपेनें त्याच्या भवभ्रमाचें निर्मूलन ६५१-६६१, ज्ञानोत्तर प्रारब्धाचें अवशेष भोक्तृत्व ६६२-६६७.

श्लोक ५७-५८—साधूंच्या शांतीचें वर्णन ६६८-६९५, उद्धवाची विस्मितता ६९६-७००.

श्लोक ५९-६०—उद्धवाची प्रार्थना, द्वंद्वाचें निरसन होऊन शांतीची प्राप्ती कशी होईल ? ७०१-७२१, उपसंहार ७२२-७३१.

## अध्याय तेविसावा

**श्लोक संख्या : ६२** **ओवी संख्या : १००५**

चित्स्वरूप गुरूस नमन १-१७, उपोद्घात १८-३०.

श्लोक १-४—श्रीशुक संभाषण, उद्धवाचें यशोवर्णन ३१-४६, श्रीकृष्ण संभाषण, उद्धवाचा गौरव ४७-५०, साधूंची शांति ५१-५५, प्राकृत जनांना दुर्जनांच्या वाग्बाणांची असह्यता ५६-६१, शांतीचा निश्चितार्थ सांगण्यासाठीं भिक्षूचा इतिहास ६२-७०.

श्लोक ५—भिक्षुगीत, दुर्जनांनीं छळले असतांहि भिक्षु शांत चित्तानें सहन करतो ७१-७६.

श्लोक ६-१३—कदर्यु ब्राह्मणाचा वृत्तांत, त्याचा व्यवसाय, कर्मभ्रष्टता व कृपणता ७७-८८, धर्म, कर्म, स्वजन, पांथस्थ आदि कर्तव्यापासून त्याची पराङ्मुखता ८९-१०३, पुत्र, पत्नी, सहोदर, स्वजन आदींनीं केलेला तिरस्कार १०४-११०, धनरक्षणानें इहपरलोकापासून च्युति १११-११६, स्वधर्म व स्वकर्माच्या विमुखतेनें धननाश व स्वजनाकडून झालेली उपेक्षा ११७-१४६, धननाशामुळें झालेला उद्वेग १४७-१५२, विषयांचा अनुताप व परमेश्वराचा धांवा १५३-१६४.

श्लोक १४-२१—धनलोभाच्या अनिष्ट परिणामाविषयीं भिक्षूचे उद्गार १६५-२०२, धनापासून पंधरा अनर्थ ( १ ) चोरी २०३-२१२, ( २ ) हिंसा २१३-२१९, ( ३ ) असत्य २२०-२२९, ( ४ ) दंभ २३०-२४६, ( ५ )

काम २४७-२५१, ( ६ ) क्रोध २५२-२५६, ( ७ ) गर्व २५७-२६८, ( ८ ) मद २६९-२८२, ( ९ ) भेद २८३-२८९, ( १० ) वैर २९०-२९९, (११) अविश्वास ३००-३२५, ( १२ ) स्पर्धा ३२६-३३१, ( १३ ) स्त्री, ( १४ ) द्यूत व ( १५ ) मद्यपान ३३२-३४४, साधकानें अर्थत्याग करण्याची आवश्यकता ३४५-३५१, अर्थामुळें पुत्र, पत्नी, सुहृदांचा अन्योन्य विरोध ३५२-३५७.

श्लोक २२-२७—कर्मभूमींत नरदेह दुर्लभ व त्यांतहि ब्राह्मण कुळांत जन्म दुर्लभ असतांहि धनलोभामुळें देहसार्थक्याची अनवस्था ३५८-३७२, आशंका, दैवयोगें प्राप्त झालेल्या धनाचा त्याग कसा करावा? ३७३-३७६, उत्तर, धनाचा युक्त स्थानीं व्यय करावा. असें न केलें तर परिणाम अनिष्ट होतो ३७७-४१०, अर्थतृष्णेमुळें स्वकर्तव्याचें विस्मरण होतें ४११-४१३, स्वकर्तव्यानें साधकाची मुक्तता ४१४, अधर्मानें धनाचा नाश व जरेनें सामर्थ्याचा नाश ४१५-४१८, माया-भ्रमामुळें धनार्जनाचे प्रयत्न ४१९-४२३, देहास सुख न होतां त्याची मरणोन्मुखता ४२४-४४३.

श्लोक २८-३०—भगवत्कृपेनें विवेकयुक्त वैराग्याचा उद्भव ४४४-४५५, आत्मज्ञानार्थ उर्वरित आयुष्याचा व्यय करण्याचा निश्चय ४५६-४६५, परमात्म साधनाच्या सहाय्यार्थ सकल देवांची प्रार्थना ४६६-४७३.

श्लोक ३१-४२—श्रीकृष्ण संभाषण, कदर्युला अभिमानत्यागानें शांतीची प्राप्ती ४७४-४९४, वनांत वास्तव्य व भिक्षार्थ ग्रामांत संचार ४९५-४९९, स्वग्रामांत आगमन व तेथें दुर्जनांनीं केलेला छळ ५००-५६३, त्रिविध प्रारब्धाचें देहास भोक्तृत्व व स्वधर्मविरततेमुळें शांतीची अढळता ५६४-५७६.

श्लोक ४३-५०—द्विज संभाषण, मन हेंच सुखदुःखाचें कारण आहे ५७७-६१३, मनापासून त्रिगुणांचा उद्भव व गुणकर्मामुळें जीवास जन्ममरणसंसृति ६१४-६१८, मनामुळें जीवत्वभास व सुखदुःखभोग ६१९-६३३, दान, स्वधर्म, व्रतादि निष्काम साधनानें मनोनिग्रह होतो ६३४-६४९, मन निश्चळ असल्यास साधन व्यर्थ व अति चंचल मनास साधन निरर्थक ६५०-६६३, मनोजय देवादिकांनाहि कठीण ६६४-६८४, सद्गुरुकृपेनें मनोजय होतो ६८५-७११,

मनाचें दुर्जयत्व व शत्रु, मित्र व उपेक्षा या तीन साधनांनीं नियमन ७१२-७५५, मी व माझें या देहात्मभावनेनें सुखदुःखभोग ७५६-७७१.

श्लोक ५१-५६—जन, देवता, आत्मा, ग्रह, कर्म व काळ हीं सुख-दुःखाचीं कारणें नव्हेत ७७२-८८४.

श्लोक ५७-५८—आत्म्याची निर्द्वंद्वता ८८५-८८७, आशंका, आत्मा व देह हे जर सुखदुःखाचे भोक्ते नव्हेत तर मग सुखदुःखाचा भोक्ता कोण? ८८८, देहाहंतेमुळें सुखदुःखभोग ८८९-९०१, सिद्धांची द्वंद्वसहिष्णुता ९०२-९०७, विवेकयुक्त अद्वैत निष्ठेनें मनोजयाची साध्यता ९०८-९११, मुकुंदचरणीं अनन्य शरणतेनें विवेकाचा उद्भव व निजशांतीची प्राप्ती ९१२-९३०.

श्लोक ५९-६२—श्रीकृष्ण संभाषण, भिक्षूचें विवेकयुक्त वैराग्य व अढळ शांति ९३१-९४४, अविद्येपासून मनाचा उद्भव व त्यामुळें सुखदुःखाचें भोक्तृत्व ९४५-९४८, विवेकानें मनाचें नियमन व अद्वैताची प्राप्यता ९४९-९६१, मनोनिग्रहाचा इत्यर्थ ९६२-९६७, भिक्षुगीतमहात्म्य ९६८-९८०, उपसंहार ९८१-१००५.

## अध्याय चोविसावा

**श्लोक संख्या** : २९ **ओवी संख्या** : ६२६

मंगलाचरण १-४८, उपोद्घात ४९-६१.

श्लोक १—कपिलानें देवहूतीस सांगितलेल्या ज्ञानानें द्वंद्वाचें निरसन ६२-७१.

श्लोक २—ब्रह्माचें पूर्णत्व, अहंतेची स्फूर्ति व प्रकृतिपुरुषांचा उद्भव ७२-८०, वेदाचा उद्भव व त्यांतील अभेदज्ञानाचा विवेकवंतास अनुभव ८१-८४.

श्लोक ३-९—ब्रह्माची निर्विकारता व मायेमुळें प्रकृतिपुरुषांचा उद्भव ८५-९५, पुरुषाची अविकारता व प्रकृतीची विकारता ९६-१०२, प्रकृतीपासून त्रिगुण, महत्तत्व व अहंकार याचा उद्भव १०३-११४, अहंकाराचे त्रिगुण प्रकार ११५-१२२, तमापासून पंचमहाभूतांचा, राजसापासून दशेंद्रियांचा व सत्वापासून इंद्रिय

काम २४७-२५१, ( ६ ) क्रोध २५२-२५६, ( ७ ) गर्व २५७-२६८, ( ८ ) मद २६९-२८२, ( ९ ) भेद २८३-२८९, ( १० ) वैर २९०-२९९, (११) अविश्वास ३००-३२५, ( १२ ) स्पर्धा ३२६-३३१, ( १३ ) स्त्री, ( १४ ) द्यूत व ( १५ ) मद्यपान ३३२-३४४, साधकानें अर्थत्याग करण्याची आवश्यकता ३४५-३५१, अर्थामुळें पुत्र, पत्नी, सुहृदांचा अन्योन्य विरोध ३५२-३५७.

श्लोक २२-२७—कर्मभूमींत नरदेह दुर्लभ व त्यांतहि ब्राह्मण कुळांत जन्म दुर्लभ असतांहि धनलोभामुळें देहसार्थक्याची अनवस्था ३५८-३७२, आशंका, दैवयोगे प्राप्त झालेल्या धनाचा त्याग कसा करावा? ३७३-३७६, उत्तर, धनाचा युक्त स्थानीं व्यय करावा. असें न केलें तर परिणाम अनिष्ट होतो ३७७-४१०, अर्थतृष्णेमुळें स्वकर्तव्याचें विस्मरण होतें ४११-४१३, स्वकर्तव्यानें साधकाची मुक्तता ४१४, अधर्मानें धनाचा नाश व जरेनें सामर्थ्याचा नाश ४१५-४१८, माया-भ्रमामुळें धनार्जनाचे प्रयत्न ४१९-४२३, देहास सुख न होतां त्याची मरणोन्मुखता ४२४-४४३.

श्लोक २८-३०—भगवत्कृपेनें विवेकयुक्त वैराग्याचा उद्भव ४४४-४५५, आत्मज्ञानार्थ उर्वरित आयुष्याचा व्यय करण्याचा निश्चय ४५६-४६५, परमात्म साधनाच्या सहाय्यार्थ सकल देवांची प्रार्थना ४६६-४७३.

श्लोक ३१-४२—श्रीकृष्ण संभाषण, कदर्युला अभिमानत्यागानें शांतीची प्राप्ती ४७४-४९४, वनांत वास्तव्य व भिक्षार्थ ग्रामांत संचार ४९५-४९९, स्वग्रामांत आगमन व तेथें दुर्जनांनीं केलेला छळ ५००-५६३, त्रिविध प्रारब्धाचें देहास भोक्तृत्व व स्वधर्मविरततेमुळें शांतीची अढळता ५६४-५७६.

श्लोक ४३-५०—द्विज संभाषण, मन हेंच सुखदुःखाचें कारण आहे ५७७-६१३, मनापासून त्रिगुणांचा उद्भव व गुणकर्मामुळें जीवास जन्ममरणसंसृति ६१४-६१८, मनामुळें जीवत्वभास व सुखदुःखभोग ६१९-६३३, दान, स्वधर्म, व्रतादि निष्काम साधनानें मनोनिग्रह होतो ६३४-६४९, मन निश्चळ असल्यास साधन व्यर्थ व अति चंचल मनास साधन निरर्थक ६५०-६६३, मनोजय देवादिकांनाहि कठीण ६६४-६८४, सद्गुरुकृपेनें मनोजय होतो ६८५-७११,

मनाचें दुर्जयत्व व शत्रु, मित्र व उपेक्षा या तीन साधनांनीं नियमन ७१२-७५५, मी व माझें या देहात्मभावनेनें सुखदुःखभोग ७५६-७७१.

श्लोक ५१-५६—जन, देवता, आत्मा, ग्रह, कर्म व काळ हीं सुख-दुःखाचीं कारणें नव्हेत ७७२-८८४.

श्लोक ५७-५८—आत्म्याची निर्द्वंद्वता ८८५-८८७, आशंका, आत्मा व देह हे जर सुखदुःखाचे भोक्ते नव्हेत तर मग सुखदुःखाचा भोक्ता कोण ? ८८८, देहाहंतेमुळें सुखदुःखभोग ८८९-९०१, सिद्धांची द्वंद्वसहिष्णुता ९०२-९०७, विवेकयुक्त अद्वैत निष्ठेनें मनोजयाची साध्यता ९०८-९११, मुकुंदचरणीं अनन्य शरणतेनें विवेकाचा उद्भव व निजशांतीची प्राप्ती ९१२-९३०.

श्लोक ५९-६२—श्रीकृष्ण संभाषण, भिक्षूचें विवेकयुक्त वैराग्य व अढळ शांति ९३१-९४४, अविद्येपासून मनाचा उद्भव व त्यामुळें सुखदुःखाचें भोक्तृत्व ९४५-९४८, विवेकानें मनाचें नियमन व अद्वैताची प्राप्यता ९४९-९६१, मनोनिग्रहाचा इत्यर्थ ९६२-९६७, भिक्षुगीतमहात्म्य ९६८-९८०, उपसंहार ९८१-१००५.

## [illegible]

**श्लोक संख्या :** २९

**ओवी संख्या :** ६२६

मंगलाचरण १-४८, उपोद्घात ४९-६१.

श्लोक १—कपिलानें देवहूतीस सांगितलेल्या ज्ञानानें द्वंद्वाचें निरसन ६२-७१.

श्लोक २—ब्रह्माचें पूर्णत्व, अहंतेची स्फूर्ति व प्रकृतिपुरुषांचा उद्भव ७२-८०, वेदाचा उद्भव व त्यांतील अभेदज्ञानाचा विवेकवंतास अनुभव ८१-८४.

श्लोक ३-५—ब्रह्माची निर्विकारता व मायेमुळे [illegible] ९५, पुरुषाची अविकारता व प्रकृतीची विकारता ९६-१०२, प्रकृतीपासून त्रिगुण, महत्तत्व व अहंकार याचा उद्भव १०३-११४, अहंकाराचे त्रिगुण प्रकार ११५-१२२, तमापासून पंचमहाभूतांचा, राजसापासून दशेंद्रियांचा व सत्वापासून इंद्रिय

देवतांचा उद्भव १२३-१३५, पंचमहाभूतांच्या एकत्वतेनें ब्रह्मांडाचा उद्भव १३६-१४२.

श्लोक १०-१३—नारायणाचा लीलाविग्रह व नाभिकमळापासून ब्रह्मदेवाचा उद्भव १४३-१४७, ब्रह्मदेवाच्या रजोन्धत्वाचें चतुःश्लोकी भागवतोपदेशानें निरसन व त्रैलोक्याचा उद्भव १४८-१६६, सिद्धांचें जन्मस्थान १६७, सप्त पाताळें व त्यांत देवदानवांचें वास्तव्य १६८-१८०, सकाम कर्मानें पुनः पुनः संसृति १८१-१८४, स्वर्गलोकरचना १८५-२१३, ध्रुवमंडळ २१४-२१५, महर्लोक २१६, जनोलोक २१७, तपोलोक २१८, सत्यलोक २१९-२२८, कैलासलोक २२९-२४६, वैकुंठलोक २४७-२७०, भिन्न भिन्न साधनांनीं भिन्न भिन्न लोकप्राप्ती होते २७१-२७२.

श्लोक १४—भिन्न भिन्न लोकप्राप्तीचें विवरण २७३-२९३, भक्तांस सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता मुक्तींची प्राप्ती २९४-३३२, अनन्य भक्तांचें देवास प्रेम ३३३-४१७, नाथांचे उद्गार ४१८-४४५.

श्लोक १५-२०—त्रिगुण काळाची काळसत्ता, जीवाचें उन्मज्जन व निमज्जन ४४६-४५२, प्रकृतिपुरुषाची व्याप्ती ४५३-४५६, वस्तूंचें अविनाशकत्व व मायेचें मिथ्यात्व ४५७-४७५, ब्रह्म, माया व काळाची अभेदता ४७६-४८९, ब्रह्माचें सनातनत्व ४९० ५१७.

श्लोक २१-२७- ब्रह्मांडाचें प्रलयवर्णन, रजोगुणापासून झालेल्याचा रजोगुणांत लय ५१८-५३९, सात्त्विकापासून इंद्रियदेवता व मन यांचा उद्भव व त्यांचा सात्त्विकांत लय ५४०-५४२, शब्दतन्मात्रेचा गुणासह महत्तत्त्वांत लय ५४३-५४९, महत्तत्त्वाचा गुणसाम्यांत, गुणसाम्याचा अव्यक्तांत व अव्यक्ताचा काळांत लय ५५०-५५६, काळाचा जीवरूप पुरुषांत लय ५५७-५६०, जीवाचें मिथ्यात्व व परब्रह्माचें अद्वयत्व ५६१-५७९, आदिमध्यांतीं ब्रह्माचें अभिन्नत्व ५८०-५८२, प्रकृतिपुरुषाचें भिन्नत्व व प्रकृतीची अस्वतंत्रता ५८३-५८४, सांख्यज्ञानानें विकल्पाचें निरसन ५८५-५८९, सांख्यज्ञानाचा महिमा ५९०-६०९, उपसंहार ६१०-६२६.

## अध्याय पंचविसावा

**श्लोक संख्या : ३६** **ओवी संख्या : ४६१**

निर्गुण सद्गुरूस नमन १-२१, उपोद्घात २२-३८.

श्लोक १-५—पुरुषाच्याठिकाणीं प्रत्येक गुणाची भिन्न भिन्न अभिव्यक्तता ३९-४१, उद्धवाच्या श्रेष्ठत्वाचें वर्णन ४२-५२, सत्त्वगुणाची पंधरा लक्षणें ५३-७३, शुद्ध सत्त्वाचें लक्षण ७४-७५, रजोगुणाचीं पंधरा लक्षणें ७६-९१, तमोगुणाची सोळा लक्षणें ९२-९९, मिश्रगुणांचें वर्णन १००-११३.

श्लोक ६-१८—त्रिगुण वृत्तीच्या त्रिविध अहंकारांचें व ममत्वाचें लक्षण ११४-१३७, त्रिगुणमिश्रित धर्म, अर्थ व काम यांचें लक्षण १३८-१५६, गुण-लक्षण पुरुषाची क्रिया १५७-१६१, तिन्ही गुणांचें कर्मवैचित्र्य १६२-१८९, भगवंताचा व मायेचा संबंध १९०-१९४, त्रिगुणास्तव जीवाची सेवकता व निर्गुणत्वानें आत्म्याची सेव्यता १९५-१९९, गुणक्षोभामुळें जीवास बद्धकता २००-२०४, सत्त्ववृद्धि भगवत्कथाश्रवण, कीर्तन व नामस्मरणानें होते २०५-२०८, सत्त्वगुणलक्षण २०९, सत्त्ववृद्धीनें विवेक, वैराग्य, स्वधर्म, सुख, शम व दम यांचा योग २१०-२१५, रजोगुणवृद्धि २१६-२२६, तमोगुणाची प्रबळता २२७-२३३, तमोगुणाचें लक्षण २३४-२३७, तमोगुणवृद्धीनें शोक, मोह, पाप, अविवेक, अधर्म व निद्रा यांचा योग २३८-२४०, सत्त्वगुणवृद्धीनें विषयांचा उद्वेग व भगवत्पदीं अनन्य शरणता २४१-२४६, रजोगुणानें विषयांचें चिंतन, चित्ताची विक्षेपता २४७-२५२, तमोगुणाच्या वृद्धीनें चित्ताची शून्यता आणि मूढत्वामुळें नष्टप्रायता २५३-२६२.

श्लोक १९-२०—सत्त्वगुणाच्या दैवी, रजोगुणाच्या आसुरी आणि तमोगुणाच्या राक्षसी संपत्तीचें लक्षण २६३-२८०, सत्त्व, रज, तमोगुणाच्या जागृति, स्वप्न व सुषुप्ति अशा तीन अवस्था २८१-२८५, तूर्यावस्था २८६-२९०.

श्लोक २१-२२—सत्त्वगुणानें सत्यलोकापर्यंत प्राप्ती २९१-२९४, रजोगुणवृद्धीनें शूद्रादि चांडाळ वर्णांत जन्म २९५, तमोगुणवृद्धीनें स्थावरापर्यंत अधोगति २९६-२९८, प्राणोत्क्रमणाचेवेळीं सत्त्व, रज, तम गुणाची वृद्धि असल्यास अनुक्रमें

स्वर्ग, मनुष्य, नरक लोकप्राप्ती २९९-३०१, भगवद्भक्तीनें वैकुंठ लोक अगर निर्गुणस्वरूपप्राप्ती ३०२-३०६.

श्लोक २३-२९—कर्मांचे चार प्रकार ३०७-३१४, त्रिगुण व निर्गुण यांचें चतुर्विध लक्षण ३१५-३३२, निवासाचीं चार स्थानें ३३३-३४४, कर्त्यांचे चार प्रकार ३४५-३५०, श्रद्धेचे चार प्रकार ३५१-३६८, आहाराचे चार प्रकार ३६९-३७९, सुखाचे चार प्रकार ३८०-३९२.

श्लोक ३०-३१—द्रव्य, देश, फळ, काळ, ज्ञान, कर्म, कर्ता, श्रद्धा, आकार व निष्ठा यांची त्रिगुणात्मकता ३९३-३९८, पुरुषाव्यतिरिक्त प्रकृतिकार्याचें मिथ्यात्व ३९९-४०१, उद्धवाचा गौरव ४०२-४०४.

श्लोक ३२-३३—त्रिगुण कर्मास्तव जीवाचें बंधन व गुरुभजनानें त्याचें च्छेदन ४०५-४१५, नरदेहानेंच ज्ञान, विज्ञान व ब्रह्मप्राप्ती, भगवद्भजनानें सत्त्व-गुणाची वृद्धि, विवेकयुक्त ज्ञान व विज्ञानाच्या उद्भवानें त्रिगुणाचें मिथ्यात्व व [illegible]

श्लोक ३४-३६—निरपेक्ष भक्तीनें शुद्ध सत्त्व गुणाची स्वानंदस्फूर्ति व त्याचे शुद्ध सत्त्व विवेकानें निरसन ४२५-४४०, निर्गुणानुभवानें साधकाची जीवन्मुक्तता ४४१-४४४, अज्ञानाचें अभेदभक्तीनें निरसन व निजात्मप्राप्ती ४४५-४५१, उप-संहार ४५२-४६१.

## अध्याय सव्विसावा

**श्लोक संख्या :** ३५ **ओवी संख्या :** ५०२

नमनरूप मंगल १-११, उपोद्घात १२-२१.

श्लोक १-३—भागवत धर्माचरण हेंच नरदेहाचें कर्तव्य २२-२३, भागवत धर्मानें चित्तशुद्धि व परमानंदप्राप्ती २४-२६, जीवन्मुक्तांना प्रकृति कार्याचा अभाव २७-३९, मुमुक्षूंना कुसंगत्यागाची आवश्यकता ४०-४८.

श्लोक ४-६—पुरूरवा राजाचें वर्णन ४९-५७, उर्वशी वर्णन ५८-६१, अन्योन्य करार ६२-६४, करारांचें उल्लंघन व उर्वशीचें गमन ६५-७३, पुरू-

रव्याचा शोक ७४-९२, उर्वशीचें धिक्कारयुक्त भाषण व शापकथन ९३-१०१, पुरूरव्यास उर्वशीची प्राप्ती व कामभोगानें उद्भवलेली विरक्ति १०२-१०८.

श्लोक ७-२४—ऐल संभाषण, उर्वशीपासून झालेल्या सुखाचें व तिनें केलेल्या अपमानाचें अनुतापयुक्त वर्णन १०९-१७३, ईश्वरशरणागतीशिवाय स्त्रीकामनाशाची असंभवनीयता १७४-१८३, कामनिवृत्तीस इंद्रादि देवांच्या यजनाची वा वेदादि शास्त्राध्ययनाची निरर्थकता १८४-१९०, हृदयस्थ नारायणाच्या प्रगटतेनें कामाचें निर्मूलन १९१, उर्वशीच्या अपराधापेक्षां स्वतःच्या अपराधांचें आविष्करण १९२-२०१, देह दुर्गंधीयुक्त असतांहि सौमनस्यादि गुणांचा आरोप २०२-२१२, आत्म्याची नित्यमुक्तता, देहाचें जडत्व व देहाभिमानानें विषयांचें भोक्तृत्व २१३-२१४, देहाचे निरनिराळे आठ मालक असल्यामुळें देहाभिमानाची व्यर्थता २१५-२२३, मी भोक्ता व देह माझा हेंच अधःपतनास कारण २२४, स्त्रीसुखलुब्धास कृमीची उपमा २२५-२३६, स्त्री व स्त्रैणसंगतीची बाधकता म्हणून त्याज्यता २३७-२८०.

श्लोक २५-२६—श्रीकृष्ण संभाषण, पुरूरव्याची धन्यता २८१-२८८, भगवत्कृपेचा महिमा २८९-२९४, गुरुबोधानें पुरूरव्याचें द्वैतनिरसन, उर्वशीत्याग व परमानंदप्राप्ती २९५-३०१, दुःसंगत्यागार्थ सत्संगाची आवश्यकता ३०२-३१४.

श्लोक २७—संतांचीं लक्षणें ३१५, ( १ ) निरपेक्षता ३१६-३१८, ( २ ) मच्चित्तता ३१९-३२१, ( ३ ) प्रशांतता ३२२-३२५, ( ४ ) समदर्शनता ३२६-३२७, ( ५ ) निरहंकारता ३२८-३३३, ( ६ ) निर्ममता ३३४-३३७, ( ७ ) निर्द्वंद्वता ३३८-३४४, ( ८ ) अपरिग्रहता ३४५-३५२.

श्लोक २८-३४—संतमुखानें कथाश्रवण केली असतां पापक्षालन व चित्तशुद्धि ३५३-३६७, भगवत्कृपेची कथा कीर्तनीं अनुराग उत्पन्न होण्यास आवश्यकता ३६८-३७१, कथाश्रवणानें अंतःशुद्धि व कथेविषयीं प्रेमाची वाढ ३७२-३७७, श्रद्धायुक्त कथागानानें प्रेमाचा उद्भव व भगवत्तत्परता ३७८-३८३, भगवत्तत्परतेनें भक्तीची प्राप्ती ३८४-३९६, निरपेक्ष भक्तीनें चारहि मुक्तींचा त्याग ३९७-४००, अनन्य भक्तीनें स्वानंदप्राप्ति ४०१-४१०, सत्संगतीनें द्वंद्व, अज्ञान व

स्वर्ग, मनुष्य, नरक लोकप्राप्ती २९९-३०१, भगवद्भक्तीनें वैकुंठ लोक अगर निर्गुणस्वरूपप्राप्ती ३०२-३०६.

श्लोक २३-२९—कर्मांचे चार प्रकार ३०७-३१४, त्रिगुण व निर्गुण यांचें चतुर्विध लक्षण ३१५-३३२, निवासाचीं चार स्थानें ३३३-३४४, कर्त्यांचे चार प्रकार ३४५-३५०, श्रद्धेचे चार प्रकार ३५१-३६८, आहाराचे चार प्रकार ३६९-३७९, सुखाचे चार प्रकार ३८०-३९२.

श्लोक ३०-३१—द्रव्य, देश, फळ, काळ, ज्ञान, कर्म, कर्ता, श्रद्धा, आकार व निष्ठा यांची त्रिगुणात्मकता ३९३-३९८, पुरुषाव्यतिरिक्त प्रकृतिकार्यांचें मिथ्यात्व ३९९-४०१, उद्धवाचा गौरव ४०२-४०४.

श्लोक ३२-३३—त्रिगुण कर्मास्तव जीवाचें बंधन व गुरुभजनानें त्याचें च्छेदन ४०५-४१५, नरदेहानेंच ज्ञान, विज्ञान व ब्रह्मप्राप्ती, भगवद्भजनानें सत्त्व-गुणाची वृद्धि, विवेकयुक्त ज्ञान व विज्ञानाच्या उद्भवानें त्रिगुणाचें मिथ्यात्व व ब्रह्माची प्राप्ती ४१६-४२४.

श्लोक ३४-३६—निरपेक्ष भक्तीनें शुद्ध सत्त्व गुणाची स्वानंदस्फूर्ति व त्याचें शुद्ध सत्त्व विवेकानें निरसन ४२५-४४०, निर्गुणानुभवानें साधकाची जीवन्मुक्तता ४४१-४४४, अज्ञानाचें अभेदभक्तीनें निरसन व निजात्मप्राप्ती ४४५-४५१, उपसंहार ४५२-४६१.

## अध्याय सव्विसावा

**श्लोक संख्या** : ३५ **ओवी संख्या** : ५०२

नमनरूप मंगल १-११, उपोद्घात १२-२१.

श्लोक १-३—भागवत धर्माचरण हेंच नरदेहाचें कर्तव्य २२-२३, भागवत धर्मानें चित्तशुद्धि व परमानंदप्राप्ती २४-२६, जीवन्मुक्तांना प्रकृति कार्याचा अभाव २७-३९, मुमुक्षूंना कुसंगत्यागाची आवश्यकता ४०-४८.

श्लोक ४-६—पुरूरवा राजाचें वर्णन ४९-५७, उर्वशी वर्णन ५८-६१, अन्योन्य करार ६२-६४, करारांचें उल्लंघन व उर्वशीचें गमन ६५-७३, पुरू-

रव्याचा शोक ७४-९२, उर्वशीचें धिक्कारयुक्त भाषण व शापकथन ९३-१०१, पुरूरव्यास उर्वशीची प्राप्ती व कामभोगानें उद्भवलेली विरक्ति १०२-१०८.

श्लोक ७-२४—ऐल संभाषण, उर्वशीपासून झालेल्या सुखाचें व तिनें केलेल्या अपमानाचें अनुतापयुक्त वर्णन १०९-१७३, ईश्वरशरणागतीशिवाय स्त्रीकामनाशाची असंभवनीयता १७४-१८३, कामनिवृत्तीस इंद्रादि देवांच्या यजनाची वा वेदादि शास्त्राध्ययनाची निरर्थकता १८४-१९०, हृदयस्थ नारायणाच्या प्रगटतेनें कामाचें निर्मूलन १९१, उर्वशीच्या अपराधापेक्षां स्वतःच्या अपराधांचें आविष्करण १९२-२०१, देह दुर्गंधीयुक्त असतांहि सौमनस्यादि गुणांचा आरोप २०२-२१२, आत्म्याची नित्यमुक्तता, देहाचें जडत्व व देहाभिमानानें विषयांचें भोक्तृत्व २१३-२१४, देहाचे निरनिराळे आठ मालक असल्यामुळें देहाभिमानाची व्यर्थता २१५-२२३, मी भोक्ता व देह माझा हेंच अधःपतनास कारण २२४, स्त्रीसुखलुब्धास कृमीची उपमा २२५-२३६, स्त्री व स्त्रैणसंगतीची बाधकता म्हणून त्याज्यता २३७-२८०.

श्लोक २५-२६—श्रीकृष्ण संभाषण, पुरूरव्याची धन्यता २८१-२८८, भगवत्कृपेचा महिमा २८९-२९४, गुरुबोधानें पुरूरव्याचें द्वैतनिरसन, उर्वशीत्याग व परमानंदप्राप्ती २९५-३०१, दुःसंगत्यागार्थ सत्संगाची आवश्यकता ३०२-३१४.

श्लोक २७—संतांची लक्षणें ३१५, (१) निरपेक्षता ३१६-३१८, (२) मच्चित्तता ३१९-३२१, (३) प्रशांतता ३२२-३२५, (४) समदर्शनता ३२६-३२७, (५) निरहंकारता ३२८-३३३, (६) निर्ममता ३३४-३३७, (७) निर्द्वंद्वता ३३८-३४४, (८) अपरिग्रहता ३४५-३५२.

श्लोक २८-३४—संतमुखानें कथाश्रवण केली असतां पापक्षालन व चित्तशुद्धि ३५३-३६७, भगवत्कृपेची कथा कीर्तनीं अनुराग उत्पन्न होण्यास आवश्यकता ३६८-३७१, कथाश्रवणानें अंतःशुद्धि व कथेविषयीं प्रेमाची वाढ ३७२-३७७, श्रद्धायुक्त कथागानानें प्रेमाचा उद्भव व भगवत्तत्परता ३७८-३८३, भगवत्तत्परतेनें भक्तीची प्राप्ती ३८४-३९६, निरपेक्ष भक्तीनें चारहि मुक्तींचा त्याग ३९७-४००, अनन्य भक्तीनें स्वानंदप्राप्ति ४०१-४१०, सत्संगतीनें द्वंद्व, अज्ञान व

मरणभयाची निवृत्ति ४११-४१८, भवांतून तरण्याला संतच जीवाला नौकाश्रय होत ४१९-४२७, अन्नानें प्राणपोषण, धर्मानें परलोकसौख्य, त्याप्रमाणें सत्संगतीनें भवभयनिर्मोचन ४२८-४३४, सूर्योदयानें सृष्टिस्थित्यंतराची व सत्संग सूर्योदयानें अंतर स्थित्यंतराची तुलना ४३५-४४४, सूर्यापेक्षां संतांचा महिमा अधिक ४४५-४५१, संत सर्व जगाचे आप्तेष्ट असून जीवांना मुक्त करणारे होत ४५२-४६०.

श्लोक ३५–पुरूरव्याचा जन्मवृत्तांत ४६१-४९१, आत्मानुभवानें स्वर्गादि भोगांचा व देहसंगतीचा त्याग व निःसंग संचार ४९२-४९५, उर्वशी पुरूरवा आख्यानाचें महत्त्व ४९६, प्रस्तुत अध्यायांतील विषयाचा निष्कर्ष ४९७-४९८, उपसंहार ४९९-५०२.

## अध्याय सत्ताविसावा

**श्लोक संख्या : ५५** **ओवी संख्या : ४१८**

सद्गुरुनमन १-७, उपोद्घात ८-११.

श्लोक १-५–उद्धवाची प्रार्थना, भगवद्भक्तांचा पूजाविधि कसा? १२-४८, भक्तवचनानें श्रीकृष्णाचा संतोष ४९.

श्लोक ६-११–श्रीकृष्ण संभाषण, आगमनिगमोक्त पूजाविधानांची अपारता व तिचें संक्षिप्त निवेदन ५०-५५, पूजाविधीचे वेदोक्त, आगमोक्त व मिश्र असे तीन प्रकार ५६-६२, वेदोक्त कर्मास ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे तीन वर्ण अधिकारी ६३-६७, पूजास्थानें आठ–प्रिय प्रतिमा, स्थंडिल, अग्नितेज, सूर्यमंडळ उदक, हृदय, ब्राह्मण, सद्गुरु ६८-८६, पूजाविधि आठ प्रकारचे ८७-९७.

श्लोक १२-१८–प्रिय प्रतिमेचें लक्षण, पूजा ९८-१२२, सकाम निष्काम भक्तांचा पूजाप्रकार १२३-१३०, प्रतिमेला स्नान, भोजन व अलंकार आदि उपचार १३१-१३३, स्थंडिल १३४ १३५, अग्नि १३६-१३७, सूर्य १३८, उदक १३९, हृदय १४०, ब्राह्मण १४१, सद्गुरु १४२-१४८, अनन्य भक्तांच्या भावयुक्त उदकानेंहि संतोष व अभक्तांच्या गंध, धूप, दीपादि नाना द्रव्यार्पणानेंहि संतोषाचा अभाव १४९-१६३.

श्लोक १९-३५—पूजाविधी, स्नान, पूजासंभार व आसन १६४-१६७, नमन, न्यास, ध्यान व कलशादि पात्रांचें पूजन १६८-१७१, पाद्य, अर्घ्य व आचमनोदक १७२-१८१, देहशुद्धि व अण्वी नामक जीवनकलेच्या साकार मूर्तीचें ध्यान १८२-१९४, सगुण मूर्तिध्यानानें अभेद भक्तीचा उद्भव १९५-२०३, अभेद भक्तीचा महिमा २०४-२०६, श्रीकृष्ण उद्धवाची स्वानंदैक्यता व भक्तभाव २०७-२१५, मूर्तीचें आवाहन व न्यास २१६-२२१, पाद्य, अर्घ्य व आचमन, मधुपर्क, पीठावरण, आसन व भक्तभाव २२२-२५४, आयुधांचें पूजन २५५-२६२, पार्षदांचें पूजन २६३-२६५, दुर्गा विनायकादि देवांची प्रतिष्ठा व पूजन २६६-२७०, सुवासिक द्रव्योदकानें समंत्रक अभिषेक २७१-२७८, वस्त्रालंकारादि भूषणें २७९-२८७, पाद्य, अर्घ्य, आचमन, मधुपर्क, गंध, अक्षता, पुष्प, धूप, दीप व नीरांजनादि उपचार २८८-२८९, नाना पदार्थयुक्त भोजन २९०-२९८, वार्षिक पर्वांच्या पूजोपचारांचें निदर्शन २९९-३०४.

श्लोक ३६-४२ होमाचे विधी व विधान प्रकार, कुंडरचना व अग्निप्रतिष्ठा ३०५-३११, मूर्तीचें ध्यान ३१२-३१४, समिधा व अवदानादि उपचार ३१५-३२१, नमन, बलिहरण, नारायणाचें ध्यान व मंत्रजप ३२२-३२५.

श्लोक ४३-४७—पूजाविधी, आचमन, करोद्वर्तन, तांबूल, पुष्पांजली ३२६-३३१, नामस्मरण, कथा, कीर्तन, नृत्य व अभिनय ३३२-३३८, स्तोत्रपठण, कथानिरूपण, प्राकृतस्तवन व नमन ३३९-३५४, साष्टांग नमनाचें लक्षण ३५५-३५९, प्रसादग्रहण व पूजासमाप्ति ३६०-३६२.

श्लोक ४८-४९—उद्धवाचा प्रश्न, पूज्य मूर्ति कोणाची ? ३६३, उत्तर, जी मूर्ति ज्यास प्रिय ती त्याची पूज्य मूर्ति ३६४-३६५, उपासनाकांडरहस्य ३६६-३७३, उपरिनिर्दिष्ट पूजाविधीनें भक्तांस ऐहिक व पारलौकिक सिद्धींची प्राप्यता ३७४-३७५.

श्लोक ५०-५२—देवालय बांधून त्यांत मूर्तींची प्रतिष्ठा, पूजा आदि वार्षिक उत्सवप्रीत्यर्थ क्षेत्रग्रामादिकें अर्पण व त्यापासून मिळणारें फळ ३७६-३८५.

श्लोक ५३—निष्काम भक्तीनें भगवत्स्वरूपाशीं साधकाचें ऐक्य ३८६-३९२.

श्लोक ५४-५५—देवद्विजादि वृत्तींच्या अपहारानें निरय गतीची प्राप्ती

३९३-३९५, साधकांना हितोपदेश ३९६-३९८, दुर्गुण वर्णन ३९९-४०२, नामस्मरणानें कर्माकर्माचें निरसन ४०३-४१०, उपसंहार ४११-४१८.

## अध्याय अठ्ठाविसावा

**श्लोक संख्या** : ४४ **ओवी संख्या** : ७४१

सद्गुरुनमन १–१७, उपोद्घात १८–४४.

श्लोक १-९–त्रिगुणामुळें स्तुति निंदेची प्रवृत्ति होते म्हणून गुण दोष न पाहतां सर्वत्र भगवद्भाव पाहण्याची आवश्यकता ४५-६७, स्वरूपीं अविद्यादि कार्याचें मिथ्यात्व ६८-९०, आशंका, वेदांनींच जर आत्म्यापासून देहादि भेदोत्पत्तीचें प्रतिपादन केलें आहे तर तें मिथ्या कसें म्हणतां येईल? ९१-९२, वेदवचनाचें रहस्य ९३, आदि, मध्य व अंतीं वस्तूची अभिन्नता ९४-१००, मायेमुळें प्रपंचाचा भास १०१-१०४, ज्ञानविज्ञानानुभवानें संतांना सर्वभूतीं समता १०५-१११, प्रपंचाच्या नश्वरतेचीं चार प्रमाणें म्हणून मुमुक्षूनें तद्विषयीं उदासीन असण्याची आवश्यकता ११२-१२१.

श्लोक १०-११–उद्धवाची प्रार्थना, आत्मा निर्गुण स्वयंप्रकाश आहे व देह जड आहे तेव्हां संसाराचा भोक्ता कोण? १२२-१४७, संसार बद्धतेची खूण १४८.

श्लोक १२-१४–श्रीकृष्ण संभाषण, अहंभोक्तृत्वानें जन्ममरणाचा भोग १४९-१६१, संसाराचें मिथ्यात्व १६२-१६४, संसाराच्या आभासाचें कारण १६५-१६६, जीवाची विषयसेवनानें बद्धता १६७-१६९, बद्ध मुक्तांचे अनुभव भिन्न भिन्न १७०-१७६, देहाहंतेमुळें शोक हर्षादि गुणवृत्तींचें व जन्ममरणाचें भोक्तृत्व १७७-१८९, देहाच्या अहंतात्यागानें शुद्धता, अहंतेमुळें मुक्ततेचा अभाव १९०-१९२, आत्म्याची परात्परता, मायेचें अधिष्ठान व व्याप्त जीवाची अहंतेनें बद्धता १९३-२०८, देहअहंतेचें निर्मूलत्व २०९-२११, देहाहंतेच्या उद्धवाची खूण २१२-२१३, गुरुसेवेनें ज्ञानखड्गाची प्राप्ती व त्यानें देहाहंतेचें च्छेदन २१४-२१६, अहंतेच्या च्छेदानें साधकाचा निःसंग संचार २१७-२१८, आशंका, संसाराचें समूळ निर्दळन होईल असें ज्ञान कोणतें? २१९-२२०.

श्लोक १५-२३–विवेकज्ञानानें ब्रह्मैक्यता २२१-२२६, शब्दज्ञानानें

पावनता २२७-२२८, तपानें अनुताप, अनुतापानें परोक्ष ज्ञान व नंतर अपरोक्ष ज्ञान गुरुसेवेनें होतें २२९-२३९, प्रत्यक्ष ज्ञानाचें साधन व फळ २४०-२६२, प्रत्यक्ष ज्ञानोपलब्धीनें तिन्ही अवस्थांत अविकारता २६३-२६९, तूर्यानुभव २७०-२८०, तूर्यानुभवानें प्रपंचाचें मिथ्यात्व २८१-२९२, मनामुळें प्रपंचाचा भास २९३-२९९, ज्ञानानें संशयच्छेदन व स्वानंदप्राप्ती ३००-३०९, आशंका, देहेंद्रियें व प्राणादि असतां साधकाच्या देहाभिमानाचा त्याग कसा ? ३१०.

श्लोक २४-२८—साधकांना आत्मानुभवानें प्रकृति व तत्कृत कार्यांचा अभाव ३११-३२१, अपरोक्ष ज्ञानानें इंद्रिय कर्मांची अबाधकता व गुणदोषांची अलिप्तता ३२२-३५७, स्वरूप विस्मरणामुळें अहंतेचा उद्भव व त्यामुळें विषयांची बाधकता ३५८-३७०, भगवद्भक्तीनें अहंता निर्मूलन ३७१-३७३, भक्तीचा महिमा ३७४-३९८, भक्तांस विषयांची अबाधकता ३९९-४०५, कुभोगामुळें विषयी जनाना संसृतिदुःख ४०६-४१४.

श्लोक २९-३२—परमार्थी साधकाच्या विघ्नांचें अनुतापानें निरसन व पुनर्जन्मांत कर्मांची अबाधकता ४१५-४३१, अज्ञान्याला अहंकर्तृत्वामुळें कर्मांचें बंधन व ज्ञान्याला निरभिमानतेमुळें अबंधन ४३२-४३८, ज्ञानी देहातीत असल्या-मुळें कर्मीं अलिप्तता ४३९-४७४.

श्लोक ३३-३६—अज्ञानामुळें आत्म्याचें ठिकाणीं विकारता ४७५-४८०, भक्तीनें अज्ञानाचें निर्मूलन ४८१-४९४, आत्म्याची निर्विकारता, ज्ञानाज्ञानीं अलिप्तता, स्वयंप्रकाशता, अप्रमेयता, अनिर्वाच्यता, स्वतःसिद्धता व निर्द्वंद्वता ४९५-५६०, प्रपंचाभासाचें कारण ५६१-५६८.

श्लोक ३७—पूर्व मीमांसकांच्या मताची अयुक्तता, त्यांचा संग टाकण्याची आवश्यकता ५६९-५९३.

श्लोक ३८-४३—साधकांच्या अंतराय निवृत्तीचा उपाय ५९४-५९८, योग्यांच्या उपसर्गांच्या निर्मूलनाचीं साधनें-तप, मंत्र, ध्यान, नामसंकीर्तन, सत्सग यांचें विवरण ५९९-६४०, योग्याच्या नश्वर देहास अमर करण्याचा निरर्थक प्रयत्न ६४१-६५५, ज्ञात्याचा विवेक वैराग्ययुक्त त्याग ६५६-

६६७, योग्यांनीं सिद्धीचा त्याग करून भगवद्भक्ति करण्याची आवश्यकता ६६८-६७२.

श्लोक ४४—अनन्य भक्तांना विघ्नांची अबाधकता व स्वसुखानुभवाची उपलब्धि ६७३-६९२, उद्धवाचें यशोवर्णन ६९३-७१७, उपसंहार ७१८-७४१.

## अध्याय एकोणतिसावा

**श्लोक संख्या :** ४९ **ओवी संख्या :** १०४७

सद्गुरुनमन १-१६, उपोद्घात १७-२५, उद्धवाचा प्रश्न, ब्रह्मप्राप्तीचें सुगम साधन कोणतें ? २६-३१.

श्लोक १-६—शरणागति व स्तवन, ब्रह्मस्थिति फार दुर्गम असून मनोनिग्रह दुर्घट आहे, तेव्हां त्याचा सुलभ उपाय कोणता ? ३२-१९१, नाथांचें स्वगत १९२-१९९, श्रीशुक संभाषण २००-२१५.

श्लोक ७-११—श्रीकृष्ण संभाषण, भागवत धर्माचरणानें जन्ममरणाचें निर्मूलन २१६-२२७, प्रस्तुत अध्यायाचें महत्त्व २२८-२३१, कर्मलक्षण २३२, भगवदुद्देशानें केलेलें कर्म त्यालाच अर्पण होतें २३३-२३५, मदर्पणतेची साध्यता मनाला शनैः शनैः अनुसंधानानें येते २३६-२३९, मदर्पणतेनें मद्भजनाची जिज्ञासा २४०, अखंड अनुसंधानाचा साधनोपाय २४१, पवित्र क्षेत्रीं अगर सरिता तीरीं वास्तव्यानें पावनता २४२-२५२, सत्संगतीचें महत्त्व २५३-२६१, देवाला आवडत्या वस्तु नृत्य, गायन, कीर्तनादि अर्पण केल्यानें भक्तीची प्राप्ति होते २६२-२७४.

श्लोक १२-१४— अंतरंग भक्तीचें लक्षण २७५-२७९, भक्तांच्या भजन-स्थितीचें लक्षण २८०-२८५, भक्तीच्या उपलब्धीपर्यंत वेदमर्यादेचें पालन २८६-२९३, भक्तांची सर्वभूतीं समानता २९४-३१५.

श्लोक १५-१९—नरदेहीं सर्वभूतीं समत्व पाहण्यानें अहंकाराचें निर्मूलन ३१६-३२९, गर्व, सन्मान, प्रतिष्ठा, ममता, वर्णाभिमान इत्यादि त्यागाची आवश्यकता ३३०-३३४, सर्वभूतीं लोटांगण घातल्यानें लोकेषणेचा ऱ्हास ३३५-३४४, भगवद्भाव

उद्धवेपर्यंत साधनांची आवश्यकता ३४५-३५८, भगवद्रूप वृत्तीचा लय व परब्रह्मीं ऐक्यता ३५९-३६६, सर्व साधनांत भक्ति हेंच श्रेष्ठ साधन ३६७-३७३, भक्तांमुळें भक्तीची प्राप्ती व अभेद भक्तीनें भगवत्प्राप्ती ३७४-३८२.

श्लोक २०-२२—भक्तीमुळें साधकांना विघ्नांची अबाधकता ३८३-३९१, कोणतेंहि कर्म मदर्पण करणें ही सुद्धां उत्तम भक्ति होते ३९२-३९८, विषयासक्त जनांच्या ब्रह्मार्पण कर्मांची व ज्ञानयोग साधनांची निरर्थकता ३९९-४०४, कर्म मदर्पण करणें हेंच बुद्धीचें कौशल्य ४०५-४०८, कर्म ईश्वरार्पण करण्यानें ज्ञान व ब्रह्मप्राप्ती ४०९-४१३.

श्लोक २३-२८—निर्दिष्ट ज्ञानाचें महत्त्व ४१४-४३६, निष्काम भक्तास ज्ञानोपदेश ४३७-४३८, उपदेश लक्षण ४३९-४४१, ज्ञानदात्याचें महत्त्व ४४२-४५२, ग्रंथाच्या श्रवण मननाचें फल ४५३-४७०.

श्लोक २९—उद्धवास ज्ञानरहस्य कळलें काय म्हणून प्रश्न ४७१-४७७, ज्ञानानुभवाची खूण ४७८-४८७, उद्धवाचें स्वानंदीं निमज्जन ४८८-४९०, शिष्याच्या ज्ञानानुभवानें गुरूला संतोष ४९१-५०१.

श्लोक ३०-३१—उद्धवाला परोपदेशार्थ उपन्यास, असत् शिष्य त्यागाचें लक्षण ५०२-५३३, ज्ञानदानी गुरूची महति ५३४, उपदेशास योग्य शिष्याचें लक्षण ५३५-५६०, लोभी गुरूची परमार्थास अपात्रता ५६१-५६२, निर्लोभी गुरूचा उपदेश ग्राह्य ५६३, स्त्रियांच्या संगत्यागाची आवश्यकता ५६४-५७२, ज्ञानोपदेशास योग्य स्त्रियांचें वर्णन ५७३-५७८, गुरूपदेश घेणाऱ्याची पात्रता व देणाऱ्याची योग्यता ५७९-५९०.

श्लोक ३२-३३—ज्ञान झालें असतां ज्ञातव्य म्हणून कांहीं उरत नाहीं ५९१-५९३, अभक्तासाठीं साधनें ५९४-५९९, उद्धवाचें स्वानंदीं निमज्जन ६००-६१०, उद्धवाची अज्ञ जनांच्या अज्ञानाची विस्मितता ६११-६१२.

श्लोक ३४—साधकांना चतुर्विध पुरुषार्थांकरितां सांगितलेल्या साधनांच्या त्यागानें व भगवंताच्या अनन्य भक्तीनें तत्काळ स्वरूपप्राप्ती ६१३-६१५, अनन्य भक्तांच्या मनोरथाची पूर्तता व अंतीं सायुज्यतेची प्राप्ती ६१६-६३४, उद्धवाच्या प्रेमावस्थेनें श्रीशुकाची स्वानंदता ६३५-६३८.

श्लोक ३५-३६–श्रीशुक संभाषण, भक्तियोगश्रवणानें उद्धवाची प्रेमावस्था ६३९-६५०, गुरुउपकाराच्या उत्तीर्णत्वाची अशक्यता ६५१-६६२, उद्धवाचे श्रीकृष्णचरणीं नमन ६६३-६६५.

श्लोक ३७-४०–उद्धवाची प्रार्थना, स्तवन व शरणता, सायुज्यमुक्ति नको पण गुरुभक्तीची अपेक्षा आहे ६६६-७३९, देवभक्तांचा प्रेमसंवाद नाथांच्या काव्यांतून ७४०-७७१.

श्लोक ४१-४४–श्रीकृष्ण संभाषण, बद्रिकाश्रमाचें महत्त्व व तेथें जाण्यास उद्धवास अनुज्ञा ७७२-७९५, लोकसंग्रहार्थ स्वधर्मानुरूप आचाराची आवश्यकता ७९६-८११, नित्याचरण, शिष्योपदेश, गुरुशिष्यांचें अन्योन्य कर्तव्य इत्यादि विषयीं उपन्यास ८१२-८४३, उपदेशानुरूप वर्तनानें शिष्याच्या त्रिगुणाचें निर्मूलन व स्वरूपाची प्राप्ती ८४४-८५१.

श्लोक ४५-४८–श्रीशुक संभाषण, उद्धवाला हरि, मेधा म्हणण्याचें कारण ८५२-८५८, उद्धवाची श्रीकृष्णास प्रदक्षिणा व आनंदाश्रूंनीं पादद्वयाचें प्रक्षालन ८५९-८६२, उद्धवाला श्रीकृष्णवियोगाची विव्हळता ८६३-८८९, श्रीकृष्ण-पादुकांच्या प्रसादानें उद्धवाची कृतकृत्यता ८९०-८९४, उद्धवविदूर भेट व संवाद ८९५-९०६, विदुराचे उद्गार ९०७, श्रीकृष्णनिर्याण पाहण्याकरितां उद्धवाचे प्रभास क्षेत्रीं गमन ९०८-९२०, कलियुगांतील ब्रह्मज्ञान्यांची शिश्नोदरपरायणता ९२१-९२४, श्रीकृष्णनिर्याण पाहून उद्धवाचें बद्रिकाश्रमीं गमन, नित्याचरण व निर्याण ९२५-९६४, श्रीकृष्णांनीं सांगितलेल्या भक्तिसारामृताचें माहात्म्य ९६५-९८५.

श्लोक ४९–श्रीकृष्णांनीं वेदाचें मंथन करून सारामृत काढलें ९८६-९९३, श्रीशुकाचें श्रीकृष्णास नमन ९९४-९९८, उद्धवाच्या प्रश्नांमुळें ज्ञानविज्ञानाचें प्रकटीकरण व त्यामुळें जगाचें उद्धरण ९९९-१००६, नाथांचा ग्रंथकर्तृत्वपरिहार १००७-१०२३, ज्ञानोपलब्धीस संस्कृत मराठी भाषांची समानता १०२४-१०३४, उपसंहार १०३५-१०४७.

## अध्याय तिसावा

**श्लोक संख्या : ५०** **ओवी संख्या : ४१०**

सद्गुरुजयजयकाररूप मंगल १-१३, उपोद्घात १४-१५.

श्लोक १-३—परीक्षितीची प्रार्थना, उद्धव बद्रिकाश्रमीं गेल्यानंतर श्रीकृष्णांनीं आपल्या कुळाचें निर्मूलन करून स्वदेहाचें विसर्जन कसें केलें? १६-२४, श्रीकृष्ण-सौंदर्यवर्णन २५-३०, श्रीकृष्णकीर्तिमहिमा ३१-४३, श्रीकृष्णमूर्तिध्यानानें तद्रूपता ४४-४८, ब्राह्मणवचन पालनार्थ देहत्याग ४९-५२, भागवतोपदेशाचें परीक्षिती-मुळें प्रगटन ५३-५६.

श्लोक ४-९—श्रीशुक संभाषण, द्वारकेंतील भयंकर उत्पातामुळें यादवांची चिंताग्रस्तता ५७-७३, श्रीकृष्णाची यादवांस प्रभास क्षेत्रीं जाण्याची आज्ञा ७४-८४, स्त्रीपुत्रांस शंखोद्धारास ठेवण्याची सूचना ८५, विघ्ननाशार्थ विधियुक्त कर्मा-चरणाचें दिग्दर्शन ८६-९७.

श्लोक १०-२४—यादवांचें प्रभासक्षेत्रीं गमन ९८-१०२, श्रीकृष्णाज्ञे-प्रमाणें कर्माचरण व मद्यप्राशन १०३-१०४, मद्यप्राशनानें अन्योन्य कलह १०५-१६४.

श्लोक २५-२६—श्रीकृष्णाला कुळक्षयानें झालेला संतोष व त्याचीं कारणें १६५-१७२, बळरामाचें निर्याण १७३-१७७.

श्लोक २७-३८— श्रीकृष्णांनीं निजधामगमनार्थ अश्वत्थतळीं घातलेलें वीरासन, स्वरूपसौंदर्य व दर्शनमहिमा १७८-१८७, श्रीकृष्णमूर्तीचें श्रीशुकांनीं केलेलें वर्णन १८८-२१२, श्रीकृष्णचरणास जराव्याधाच्या बाणानें विंधान २१३-२२०, जराव्याधाची अनुतापयुक्त प्रार्थना व शरणता २२१-२८१.

श्लोक ३९-४८—श्रीकृष्ण संभाषण, जराव्याधाचें भ्रमनिरसन व स्वर्गो-गमन २८२-३१५, दारुकाचें श्रीकृष्णशोधन, दर्शन, नमन व प्रार्थना ३१६-३२६, रथायुधादि ऐश्वर्यांच्या ऊर्ध्वगतिगमनानें दारुकाची ताटस्थ्यता ३२७-३३२, दारुकाचे करुणोद्गार ३३३-३४६, श्रीकृष्णाचा द्वारकेंतील सुहृज्जनांस संदेश ३४७-३५७, दारुकाची खेदयुक्त प्रार्थना ३५८-३७२.

श्लोक ४९-५०—श्रीकृष्णांनीं दारुकाला केलेल्या ज्ञानोपदेशाचें विवरण, स्वधर्मलक्षण, स्वधर्मानें वैराग्याचा उद्भव, ज्ञानोपलब्धि, अपेक्षेचा विलय व निरपेक्षतेचा उद्भव, विज्ञान लक्षण व उपशम लक्षण ३७३-३९१, दारुकाची श्रीकृष्णचरणीं अभिन्नता ३९२-३९५, दारुकाचे श्रीकृष्णास नमन व द्वारकेस गमन ३९६-३९७, उपसंहार ३९८-४१०.

## अध्याय एकतिसावा

**श्लोक संख्या : २८** **ओवी संख्या : ५६१**

सद्गुरुनमनरूपमंगल १-१४, उपोद्घात १५-२०.

श्लोक १-१४—श्रीशुक संभाषण, श्रीकृष्ण निर्याण वर्णन २१, कृष्णदर्शनार्थ देवादिकांचें आगमन व त्यांनीं केलेली स्तुति व पुष्पवृष्टि २२-३७, समाधीचें मिष ३८-४९, श्रीकृष्णास योगधारणेचा अभाव ५०-५३, श्रीकृष्णमूर्तीचें चैतन्यत्व ५४-५९, देहत्वाचा अभाव ६०-७१, देवांना उल्हास व विस्मय ७२-८९, भगवंताचें यशवर्णन करून देवांचें स्वस्थानीं गमन ९०-९४, श्रीशुक देवाच्या सामर्थ्याचें वर्णन करतात ९५-९८, यदुकुळांतील जन्मकर्माचा योगमायेस्तव आभास ९९-१०६, श्रीकृष्णाच्या विदेहत्वाची शिव, शक्र, ब्रह्मादिकांस अतर्क्यता १०७-११०, गोवर्धनधारण, दावाग्निभक्षण, रासक्रीडन, द्वारकास्थापन, ऋषीजनतृप्त्यर्थ भाजीपानसेवन, ब्रह्मदेवगर्वहरण, उत्तरागर्भरक्षण, मृत गुरुपुत्रानयन, जराव्याधउद्धरण इत्यादि विदेहद्योतक लीलांचा निर्देश १११-१२६, आशंका, श्रीकृष्णाचें एवढें सामर्थ्य होतें तर मग त्यांनीं देह कां टाकला ? १२७-१२८, उत्तर, देवाच्या सामर्थ्याचें वर्णन १२९-१३१, इहलोकाच्या आसक्ततेची अगर निजधामप्रयाणाची अनिच्छा १३२, साधकहितार्थ निजधामगमन १३३-१४०, साधकांना वैराग्य, विरक्ती, आत्मप्राप्तीची दीक्षा १४१-१४३, श्रीकृष्णदेहाची थोरवी १४४-१५३, श्रीकृष्णाचें निजधामास गमन १५४-१५५, उक्त चौदा श्लोक सद्भावपूर्वक पठन करण्यानें श्रीकृष्णस्वरूपाची प्राप्यता १५६-१८१.

श्लोक १५-२०—द्वारकेची रुक्षता १८२-१८४, दारुकाचें आगमन व विलाप १८५-१९१, भगवंताच्या निरोपाचें कथन व तत्श्रवणानें द्वारकेंतील

लोकांचा विलाप १९२-२२०, माता, पिता, स्त्रियादि गोत्रजांचें प्रभास क्षेत्रीं गमन व निधन २२१-२४०, श्रीकृष्णस्त्रियांच्या मुक्तत्वासंबंधानें तार्किकांचें मत-खंडन २४१-२४९.

श्लोक २१-२२—अर्जुनास श्रीकृष्ण विरहानें दु:ख व गीतोपदेश स्मरणानें शांतता २५०-२६३, अर्जुनाचे उद्गार २६४-२६९, अर्जुनास युद्धप्रसंगीं उपदेशिलेल्या ज्ञानाचा महिमा २७०-२७२, गीतामाहात्म्य २७३-२८३, अर्जुनहस्तें मृतांचा उत्तरविधि २८४-२८७.

श्लोक २३-२६—श्रीकृष्णस्थानाव्यतिरिक्त सर्व द्वारकेचा नाश २८८-२९३, बाल, वृद्ध, स्त्री जनांचें अर्जुनासमवेत इंद्रप्रस्थास गमन २९४-२९७, वज्राला राज्याभिषेक २९८, पांडवांचें महापथास प्रस्थान २९९.

श्लोक २७-२८—श्रीकृष्णावतार माहात्म्य, अवतारलीलेच्या श्रद्धायुक्त वर्णनानें सर्व पापांचें निर्मूलन ३००-३२९, संगतीनें उद्धरलेल्यांचा नामनिर्देश ३३०-३४९, जन्मत:च श्रीकृष्णाची षड्गुणैश्वर्यसंपन्नता ३५०-३५४, श्रीकृष्णकीर्तिवर्णनानें परा भक्तीची प्राप्यता ३५५-३७२, अवतारलीलेची अपूर्वता ३७३-३८७, ग्रंथोपसंहार, उक्त ग्रंथांत ज्ञान, वैराग्य, भक्ति व मुक्ति यांचें प्रतिपादन ३८८, प्रत्येक अध्यायाचा निष्कर्ष ३८९-४४०, भागवत सांप्रदाय परंपरा ४४१-४४७, सांप्रदाय परंपरेनें व भावार्थदीपिका प्रकाशानें स्वकृत टीकेची पूर्णता ४४८-४५३, ग्रंथाधिकारी ४५४, ग्रंथमाहात्म्य व काव्यमय वर्णन ४५५-४९३, नाथांचे स्वकृत टीकेविषयीं उद्गार ४९४-५२४, ग्रंथकर्तृत्वाचीं स्थानें ५२५-५३३, श्रीजनार्दनाचें आशीर्वचन ५३४-५४९, ग्रंथसमाप्तिकालनिर्देश ५५०-५५४, उपसंहार ५५५-५६१.

---

**भागवताची अध्याय संख्या : ३१**
**भागवताची श्लोक संख्या : १३६७**
**भागवताची ओवी संख्या : १८८००**

---

# भागवताची फलश्रुति

सदा सेव्या सदा सेव्या श्रीमद्भागवती कथा ।
यस्याः श्रवणमात्रेण हरिश्चित्तं समाश्रयेत् ।। १ ।।
अर्थोऽयं ब्रह्मसूत्राणां भारतार्थ विनिर्णयः ।
गायत्रीभाष्यरूपोऽसौ वेदार्थ परिबृंहितः ।। २ ।।

पद्मपुराण

---

## सर्व सांडून माझी भक्ति केल्यानें जीव मुक्त होतो.

सांडूनि स्त्री पुत्र विषय ध्यान । सांडूनि योग योग्यता शहाणपण ।
सांडूनि कर्मठता कर्माभिमान । मजलागीं शरण रिघावें ।।
सांडूनिया वेदाध्ययन । सांडूनिया शास्त्रश्रवण ।
सांडूनि प्रवृत्ति निवृत्ति जाण । मजलागीं शरण रिघावें ।।
सांडूनि धन मान चेष्टा । सांडूनि सन्मान प्रतिष्ठा ।
सांडूनिया नाना निष्ठा । शरण वरिष्ठा मज यावें ।।
सांडूनिया वैदिक लौकिक । सांडूनि आगम तांत्रिक ।
मज शरण रिघालिया देख । माझें निजसुख पावसी ।।
सांडूनि कुळाचें उंचपण । सांडूनि जातीचा अभिमान ।
सांडूनि आश्रमाचें श्रेष्ठपण । मजलागीं शरण रिघावें ।।
सांडूनिया ज्ञान ध्यान । सांडूनिया विधि विधान ।
सांडूनिया देहाभिमान । मजलागीं शरण रिघावें ।।
सर्वहि सांडोनि अभिमान । मज रिघालिया शरण ।
तुज कैचें जन्ममरण । माझे प्रतापें जाण तरशील ।।

ना. भा. अ. १२-२३३ ते ४१

---

# नाथभागवतांतील कांहीं परमार्थपर व्याख्या

## संपादकीय संकलन

### अकामता

स्वधर्में धन यावें हातां । हे हीनसे धन कामता ।
कामिनी कामाची नेणे वार्ता । परस्त्री ते माता नेमस्त ॥ १७-२४२
हो कां स्वदाराभिगमन । तेथेंही आसक्त नसे मन ।
आश्रमधर्मार्थ जाण । प्रतिपालन स्त्रियेचें ॥ १७-२४३
या नांव गा अकामता । ... ... ... ...१७-२४३।१

### अकिंचनता

मीवांचूनि ज्याचे गाठीं । नाहीं फुटकी कांचवटी ।
मजवांचोनि सगळे सृष्टीं । आणिकांतें दृष्टि न देखे ॥ १४-१९२
ऐसें करितां माझें भजन । जाती कुळ देहाभिमान ।
सहजें जाय निरसोन । अकिंचन या नांव ॥ १४-१९३

### अक्रोधता

जेथ कामाचा आदरू नाहीं । तेथ क्रोधाचें नचले कांहीं ।
जेवीं आकाशाचे ठायीं । न रुपती पाहीं निज शस्त्रें ॥ १७-२४५
जरी बीज जाहलें गोमटें । तरी भूमीविण अंकुर न फुटे ।
तैसें कामावांचूनि कोठें । क्रोधें उद्भटे न वाढिजे ॥ १७-२४६
एवं कामाची जे बोळवण । तेंचि क्रोधाचीही जाण ।
जैसें गरोदरीचें मरण । करी निर्दळण गर्भाचें ॥ १७-२४७
शिर तुटलिया पाठीं । हस्तपादादि क्रिया तुटी ।
काम निमालिया पाठीं । निमाली गोठी क्रोधाची ॥ १७-२४८

### अचौर्य

हो कां अधर्माचिये जोडी । कोडी धरोनिया कवडी ।
जो रिघो नेदी दृष्टीं बुडीं । फुटकी कवडी स्पर्शेना ॥ १७-२३९

तेथेंही चोरी करणें । कां दृष्टि चुकवूनि वस्तु घेणें ।
अथवा न पुसतां नेणें । जीवें प्राणें न संभवे ॥ १७-२४०
अन्यायोपार्जित धन । स्वप्नींही नातळे मन ।
हें अचौर्याचें लक्षण । ... ... ... १७-२४१

## अद्रोहता

व्याघ्र सर्पादि देहांसीं । कदा द्वेष नुपजे त्यासी ।
जरी देऊं आले उपद्रवासी । तरी द्वेषासी करी ना ॥ ११-८३६
देहास आली आपदा। तेणें सांडी करी प्रारब्धा।
द्वेष येऊं नेदी कदा । नातळे क्रोधा निज बळें ॥ ११-८३७
हें जाण पां अद्रोहता । ... ... ... ११-८३८।१

## अनुद्यम

सांडूनिया सर्व कर्म । स्तब्धता राहे परम ।
या नांव अनुद्यम । सुखावलें तम ते ठायीं वसे ॥ २५-९७

## अनृत

अनृत म्हणजे असत्यता । ... ... ...२५-९२।३

## अपरिग्रहता

जो निर्द्वंद्व निरभिमान पहाहो । त्यासि मिथ्या समूळ निज देहो ।
तेथ देहसंबंधी परिग्रहो । उरावया ठावो मग कैंचा ॥ २६-३४५
स्वजन धन स्त्री पुत्रांसी । नांदोनि तो नातळे त्यांसीं ।
स्वप्न घरवात जागृता जैशी । तैसा साधूसी संसारु ॥ २६-३४६
एवं परिग्रही असोन । साधु अपरिग्रही पूर्ण । २६-३४७।१-२

## अमानित्व

आपला स्वामी देखे सर्वांभूतीं । तेथें मान इच्छा वा कवणाप्रती ।
मानाभिमान सोडिले निश्चितीं । अति नम्र वृत्ति वर्तणें ॥ ११-१००६
आधीं देहीं धरावा अभिमान । मग इच्छा वा अति सन्मान ।
तंव देहाचें खुंटलें भान । मानाभिमान पळाले ॥ ११-१००७
या नांव गा अमानिता । ... ... ... ११-१००८।१

## असूया

आपणाहूनि अधिक ज्ञान । ऐसें जाणोनि आपण ।
त्याचे गुणीं दोषारोपण । करणें ते जाण असूया ॥ २९-३२५

## अहिंसा

दुःख नेदूनि सुख देणें । या नांव अहिंसा म्हणणें । १७-२३६।१,२
पावो आदळतां देख । झणीं पृथ्वी पावेल दुःख ।
या काकुळती आवश्यक । पाउलें अलोलिक हळूं ठेवी ॥ ३-४५०
आकाश दचकेल देख । यालागीं नेदी सैरा हांक ।
वाचा परिपक पीयूख । वचनें परम सुख सर्वांसी देत ॥ ३-४५१
त्याचा शब्दू जरी गगनीं भरे । तेणें शब्दानंद चमत्कारें ।
गगनाचि निज सुख भरे । येणें सुखोद्गारें वचनोक्ति ॥ ३-४५२
जळामाजीं घालितां उडी । झणीं उदक दडपेल बुडी ।
तरंगन्यायें देणें बुडी । जीवनाची दुथडी न हेलावतां ॥ ३-४५३
झणी दुःख पावेल वारा । म्हणोनि निश्वास न घालूं सैरा ।
नेमूनि प्राण संचारा । निज शरीरा वागवी ॥ ३-४५५
निज देहा करावया घातु । सर्वथा जेवीं नुचले हातु ।
तेवीं भूतांवरी निघातु । ज्याच्या पोटांतु उपजेना ॥ ३-४५६
अत्यंत न्याहारें पाहतां । चवकू पडले प्राण्याच्या चित्ता ।
यालागीं बाह्य दृष्टीं कुरता । न पाहे भूतीं भूतभावें ॥ ३-४५७
भूतां देतां दुःखलेशु । भूतीं दुखवेल भूतेशु ।
ऐसा ज्याचा दृढ विश्वासु । तेथ रहिवासु अहिंसेचा ॥ ३-४५९
या नांव गा शुद्ध अहिंसा । ... ... ... ३-४६१-१

## आर्जव

आतां आर्जव तें ऐसें । सर्वां जीवा जीवन जैसें ।
कां तंतू जैसा निजाविलासे । अविरोधू आभासे पटाआंतु ॥ ३-४२८
साखरेचें इंद्रावण । केलिया न वचे गोडपण ।
तैसे विषमहि जीवा जाण । आर्जवें पूर्ण रंजवी स्वभावें ॥ ३-४२९

वक्र चंद्राची चंद्रिका । परी अमृत वक्र नव्हे देखा ।
तैसे देखोनि विषम लोकां । मनोवृत्ति देखा पालटेना ॥ ३-४३०
यापरी जयास आप्त सर्वदा सर्व । ऐसा जो कां निज स्वभाव ।
तया नांव गा आर्जव । ... ... ...३-४३२।२

## आढ्यता

जो ज्ञान गुण अति संपन्न । जे कल्पांतींही न वेंचे धन।
तोचि आढ्यतम जाण । येर तें धन नश्वर ॥ १९-५५५

## आर्ति

आर्ति म्हणजे अति संताप । ... ... २५-९५।१

## आशा

आशा म्हणजे अति लोलुप्य । ... ... २५-९५।३

## ईहा

काम क्रियाते ईहा पूर्ण । ... ... २५-७८।१

## ईक्षापरिपाक

मी कोण कैंचा किमात्मक । निष्कर्म कीं कर्मबद्धक ।
करणें निजात्मविवेक । ईक्षा परिपाक या नांव ॥ २५-५६

## ईश्वरत्व

कनक आणि कामिनी । ज्यासी नावडे मनींहुनी ।
तोचि ईश्वरु त्रिभुवनीं । सत्य सत्य हे वाणी उद्धवा ॥ १९-५६५

## उद्यम

परमार्थप्राप्तीं उपायीं । स्वधर्मनिष्ठा क्षत्रियाठायीं ।
जो जो व्यवसावो करणें कांहीं । तो उद्यम पाहीं बोलिजे ॥ १७-१५९

## ऋत

ऋत म्हणजे तें ऐसें येथ । सत्य वाचा जें श्रोत्यांचें हित ।
तेंहि दुःखसंबंधरहित । ऋत निश्चित बोलिजे ॥ १९-४६४

चित्र पाहतां दिसे विषम । त्यामाजीं भिंती सदा सम ।
तेवीं जग दिसतां विषम । ज्या ब्रह्म सम निजबोधें ॥ १९-४६५

## ऐश्वर्य

ऐश्वर्याचें मुख्य लक्षण । अतिशयेंसि संपूर्ण ।
भगवत्पदवी घेणें आपण । अतिसंपन्न ऐश्वर्य ॥ १८-३५-५

## औदार्य

क्षत्रियांचे प्रकृतीस जाण । द्रव्य तें तृणासमान ।
याचकाचें निवे मन । तें देणें दान सर्वस्वें ॥ १७-१५५
देश काल सत्पात्र स्थान । तेथ देऊनि सन्मान ।
निर्विकल्पभावें गहन । देणें दान विध्युक्त ॥ १७-१५६
ऐसें स्वाभाविक जें दान। हा क्षत्रियांचा प्रकृतिगुण।१७-१५८।१-२

## कवित्व

वेदशास्त्रांचे मथितार्थ । झाले करतलामलक समस्त ।
तैसाच ब्रह्मानंदें डुल्लत । कवि निश्चित या नांव ॥ ११-१०४८
उपनिषदांचा मथितार्थ । ज्याच्या मुखाचा वास पाहात ।
परोक्षापरोक्ष ज्यांचेनि सत्य । कवि विख्यात त्या नांव ॥ ११-१०४९

## कलि

व्यर्थ कलहता कलि जाण । ... ...... २५-९४।४

## काम

काम म्हणजे विषयशोषु । जेवीं इंधनीं वाढे हुताशु ॥ २५-७७।१-२

## कारुण्य

प्रत्युपकार न वांछितां । मी कारुणिक हे ना देहीं अहंता ।
ऐसेनि दीन दुःख निवारितां । कारुण्य सर्वथा त्या नांव॥ ११-१०४२
दयार्णवें द्रवली दृष्टी । तनुमनधन वेंचोनि गांठीं ।
अनाथावरी कृपा मोठी । उद्धरी संकटीं दीनातें ॥ ११-१०४५

जैसा कळवळा निजस्वार्थी । त्याहून अधिक अनाथ भूतां ।
तिये नांव परम कारुण्यता । ... ... ११-१०४६

## कृपण

गांठीं असोनिया धन । जो पोटें न खाय आपण ।
सदा लोलिंगत मन । दरिद्र लक्षण या नांव ॥ १९-५५९
यापरी जो कृपण । ऐक त्याचेंहि लक्षण ।
जेवीं राजा बांधी सेवक जन । तेवीं इंद्रियाआधीन जो होय॥१९-५६०
निर्धारितां निज रूपजाण । सर्वांचा राजा जो आपण ।
तें विसरोनि होय दीन । इंद्रियाआधीन होऊनि ठाके ॥ १९-५६१
मन तयाचे आज्ञाधार । मनाचीं इंद्रियें किंकर ।
त्याच्यानि हा होय डिंगर । अजितेंद्रियें होय थोर कृपण ऐसे १९-५६२
निज किंकराचीं किंकरें । त्या इंद्रियांचे हा वोळंगे द्वारें ।
अजितेंद्रियत्वें अति खरें । निजांगीं सुभरे कृपणत्व ॥ १९-५६३
या नांव गा कृपणपण । ... ... ... ... १९-५६४

## कृपाळुता

कृपा भूतमात्रांच्या ठायीं । सारिखीच सर्व देहीं ।
येथ तेथ हें त्या नाहीं । अवकृपा ठायीं निमाली ॥ ११-८३०
दुःख हरोनि सुख देत । नवल कृपाळुत्वाचें चित्त ।
जीवाचा जीव जीवीं सुत । कृपा अद्भुत तयापरी ॥ ११-८३१
जेणें आपणांसी होय दुःख । ते परासि न करी निःशेख ।
जेणें आपणा होय सुख । तें करी आवश्यक प्राणिमात्रा ॥ ११-८३२
या नांव गा कृपाळुता । ... ... ... ... ११-८३३।१

## क्रम

क्रम नामे अति आयासता । २५-९३।१

## गुरु

ऐसा गुरु तूं कोण म्हणशी । मी नित्य लागे ज्याच्या पायाशीं ।
तो चिन्मात्र पूर्ण ब्रह्मराशी । गुरुनाम तयासी बोलिजे ॥ १९-५४५

त्या ब्रह्मापरीस अधिकता । गुरूसि आली तत्त्वतां ।
ब्रह्म ब्रह्मत्वें हा प्रतिपादितां । येरव्ही ब्रह्माची वार्ता कोण पुसे १९-५४६

## गृह

आतां गृहाचें लक्षण । तुज मी सांगेन संपूर्ण ।
माड्या गोपुरें धवळारें जाण । गृह प्रमाण तें नव्हे ॥१९-५५१
मनुष्य देह तो गृहाश्रम । जेथें नित्य वसे मी पुरुषोत्तम ।
तेथील करितां स्वधर्म कर्म । आत्माराम उल्लासे ॥ १९-५५२

## चित्तविक्षेपता

ज्याशीं जाहली चित्तविक्षेपता । तो निंदी गुरु देवता ।
जो न मानी वेदशास्त्रार्था । तो उत्पथामाजीं पडे ॥ १९-५२६
जो गुरु दोष दर्शी समत्सरता । जो क्रोध करी सुहृद आप्ता ।
जो धिक्कारी माता पिता । चित्तविक्षेपता ती नांव ॥१९-५२७
जो सन्मानालागीं पाही । जो साधुसज्जनांतें करी द्रोही ।
जो दोष देखे ठायीं ठायीं । चित्तविक्षेप पाहीं या नांव ॥ १९-५२८
जो वदे परापवादा । जो करू रिघे परनिंदा ।
जो विश्वासे स्त्रियेचे शब्दा । चित्तविक्षेप बाधा ती नांव ॥ १९-५२९
जो सन्मार्गापासून चेवता । पडे अधर्म अकर्म उत्पथा ।
तेही चित्तविक्षेपता । जाण तत्त्वतां उद्धवा ॥ १९-५३०

## तप

शरीरशोषणा नांव तप । तें प्रारब्धें भोगानुरूप ।
हृदयीं वाहणें कृष्णस्वरूप । तो शुद्ध साक्षेप तपाचा ॥ ३-४००
जागृती स्वप्न सुषुप्ती आंत । भगवत्प्राप्तीलागीं चित्त ।
झुरणीमाजीं पडे नित्य । तप निश्चित त्या नांव ॥ २५-५७
माझ्याठायीं अनुताप । त्या नांव गा शुद्ध तप ।
कां हृदयीं चिंतिता चित्स्वरूप । हें परम तप तपामाजीं ॥१९-४५४

## तितिक्षा

महा सुख आलें होये । तें जेणें उल्हासें अंगीं वाहे ।
तेणेंचि उल्हासें पाहे । दुःखही साहे निजांगीं ॥ १९-४३८
तेज आणि आंधारी । नभ समत्वें अंगीं धरी ।
तेवीं जो अविकारी । सुख दुःख परी साहतां ॥ १९-४३९
गोफणेचा सुवर्ण पाषाण । लागतां दुःख होय परम ।
तोचि वोळखलिया सुवर्ण । दुःख जाऊन सुख होय ॥ १९-४४०
तैसें द्वंद्वाचें निजस्वरूप । वोळखिलिया मद्रूप ।
तेव्हां द्वंद्वें होतीं चिद्रूप । हे मुख्य स्वरूप तितिक्षेचें ॥१९-४४१
स्वप्नींचें दरिद्र आणि सधनता । जागृतीसी दोन्ही मिथ्या ।
तेवीं सुख दुःखा परता । देखणें तत्त्वतां ते तितिक्षा ॥ १९-४४३
जेणें हरिखें साहणें सुख । त्याचि वृत्तीं साहणें दुःख ।
तितिक्षा या नांव देख । ... ... २५-५४

## तिरस्कार

भाविक जे साधक जन । त्यांचे सांडूनि टाकी साधन ।
धिक्कारूनि निर्भत्सी पूर्ण । तिरस्कार जाण त्या नांव ॥ २९-३२६

## तेज

तेज म्हणजे प्रताप शक्ती । जैसा क्षितितळींचा गभस्ती ।
ज्याचिया प्रताप दीप्तीं । लोपले जाती महींद्र ॥१७-१३७

## तूर्यावस्था

जे जागृती तें जागवित । जें स्वप्नीं स्वप्नातें नांदवित ।
जे सुषुप्तीतें निजवित । त्यातें तुरीय म्हणती उद्धवा ॥ २५-२८७
जे तिही अवस्था आंत । असोनि नव्हे अवस्थाभूत ।
जे निर्गुण निज नित्य । त्यातें म्हणत तुरीय ॥ २५-२८८

## त्याग

सकळ संकल्पांचा त्याग । हाचि पै संन्यास चांग ।
ऐसें बोलिला तो श्रीरंग । त्याग तो सांग या नांव ॥ १९-४७२

जे मिळाले जीविका भाग । त्यांतही सत्पात्रीं दान योग ।
विषय ममता सांडणें सांग । त्या नांव त्याग उद्धवा ॥ २५-६१

## तृष्णा

झालिया अर्थप्राप्ती । वासनेसि नव्हे तृप्ती ।
चढती वाढती आसक्ती । तृष्णा निश्चिती या नांव ॥ २५-७९

## दम

विषयप्रवृत्ति प्रचंड । कर्मेंद्रियांचें बाह्य बंड ।
विधीनें त्यांचें ठेंचूनि तोंड । सैरा वितंड विचरों नेदी ॥ १७-९०
वेद विधीचेनि हातें । देहनिर्वाहापुरतें ।
खाणें जेवणें इंद्रियांतें । तो जाण तेथें दम गुण ॥ १७-९१
बाह्य इंद्रियांची चडफड । शमेंसी करावा गळा जोड ।
निग्रहणें विषय चाड । दमाचें कोड या नांव ॥ २५-५४

## दया

बाळक देखोनि संकटीं । जेवीं न सांवरत माय उठी ।
तेवीं दीन देखोनि दृष्टीं । ज्याचें पोटीं दया द्रवे ॥ १७-१२४
जो जाणे दीनांचा विचार । तो दीन दयाळु साचार ।
उद्धवा तें माझें निज भांडार । सुखाचें सुख सार तो मज ॥ १७-१२९
या नांव गा दया जाण ।

## दान

सर्व भूतासि न द्यावें दुःख । त्याचे पोटीं आलें सुख ।
महादान हेंचि देख । द्यावें सुख सर्वांसी ॥ १९-४४७
दुःख निरसूनि भूतांसी । सुख देणें सर्वांसीं ।
हेंचि उत्तम दान पृथ्वीसीं । अनायासीं तुकेना १९-४४८
जन्ममरणाचें दुःख । निरसूनि द्यावें निजसुख ।
याचि नांवें दान देख । अलौलिक उद्धवा ॥ १९-४४९
या नांव गा परम दान ।

## दंड-वाग्

मौन अथवा सत्य भाषण । कां श्रीरामनामाचें स्मरण ।
हो कां ओंकाराचें उच्चारण । वाग्दंड जाण या नांव ।। १८-९६

## दंड-देह

प्राणायामें निज प्राण । जिणोनि करावा स्वाधीन ।
या नांव देहदंड जाण ।.........१८-९७

## दंड-मन

मनाचें चपळपण । संकल्प विकल्प जाण ।
त्याचें करावया च्छेदन । ब्रह्मानुसंधान करावें ।। १८-९९
माझें स्वरूप सर्वगत । तेथ निश्चयें ठेवितां चित्त ।
मन संकल्पविकल्पें जाय जेथ । तेथ तेथ तें स्वरूप ।। १८-१००
ऐसें सावध राखतां मन । दृढ लागल्या अनुसंधान ।
तंव संकल्प विकल्प क्षीण । सहजचि जाण स्वयें होती ।।१८-१०१

## दंभ

दंभ म्हणजे अतिमान्यता । .........२५-९३।२

## दांतता

ऐशी बाह्येंद्रिय नियामकता । हे जाणावी साधूची दांतता ।। ११-८८६

## धृति

वोडवलियाहि कल्पांता । धाक रिघो नेणें ज्याच्या चित्ता ।
ऐसें निज धैर्य स्वभावतां । धृति तत्त्वतां त्या नांव ।। १७-१४३
जिव्हा आणि दुसरें शिश्न । यांचा जयो करावा आपण ।
या नांव धृति संपूर्ण । विद्याधारण धृति नव्हे ।। १९-४४४
ज्यासी द्रव्यदारासक्ती । तेथ कदा न रिगे हे धृती ।
द्रव्यदाराअनासक्ती । त्याचें घरीं धृती पोषणी सदा ।। १९-४४६

## धन

धन धान्य पशु रत्न । हें प्राण्यासि नव्हे इष्ट धन ।
मोक्षमार्गी सबळ जाण । इष्ट धन तो धर्म ॥ १९-४७४
घरीं जें पुरिलें धन । तें घरींच राहे जाण ।
धर्म तो सवें चालतें धन । अंगा बंधन येवो नेदी ॥ १९-४७५
धर्मिष्ठाएवढा कृपण । न देखे मी आणीक जाण ।
मरे तोही स्त्री पुत्रा वंचून । अवघेंचि धन स्वयें ने ॥ १९-४७६
धार्मिकीं धर्मार्थ वेंचूनि धन । मी भांडारी केला नारायण ।
जें समयीं जें जें लागे जाण । तें मी आपण स्वयें पुरवी ॥ १९-४७७
यालागीं धर्म तो इष्ट धन । हें सत्य सत्य माझें वचन । १९-४४७

## निद्रा

ऐक निद्रेचें निज वर्म । जें आळसाचें निजधाम ।
जाड्यता सोलीव परम । ते निद्रा निःसीम तामसी ॥ २५-१६

## नियम

शौचाची ऐक ऐशी परी । अंतरीं शुचि विवेकें करी ।
बाह्य ते वेदाज्ञेवरी । शौच करी मृज्जलें ॥ १९-३९५
परिसे जपाचा विचार । ज्यासी जैसा अधिकार ।
तैसा जपावा मंत्र । कां स्वतंत्र हरिनाम ॥ १९-३९६
तपाचा जो मुख्य प्रकार । जेणें शुद्ध होय अभ्यंतर ।
तें स्वधर्मी गा सादर । अत्यादर करावा ॥ १९-३९८
ऐक होमाचा विचार । देवाचें मुख्य वैश्वानर ।
पंचमहायज्ञ अग्निहोत्र । होम साचार या नांव ॥ १९-४००
माझ्या भजनाची अति आवडी । कां धर्माची अधिक गोडी ।
या नांव श्रद्धा रोकडी । जाण धडफुडी उद्धवा ॥ १९-४०१
दीन देखोनि तत्त्वतां । अति नम्र विनीतता ।
यथाशक्ति अर्पणें अर्थां । आतिथ्य तत्त्वतां या नांव ॥ १९-४०२

मेळवूनि ब्राह्मण संभार । श्रद्धायुक्त षोडशोपचार ।
पूजितां संतोषे श्रीधर । पूजा पवित्र ब्राह्मणाची ॥ १९-४०५
शुद्ध व्हावया अंतःकरण । करावें गा तीर्थगमन ।
तीर्थयात्रीं श्रद्धा गहन । तीर्थाटन या नांव ॥ १९-४०६
परोपकारार्थ पर्वत । जेवीं कां सामग्री वाहत ।
तेवीं क्रियामात्रें उपकारार्थ । सदा वर्तत उपकारी ॥ १९-४०८
जें प्राप्त जाहलें अदृष्टीं । तेणें काळ यथा सुखें लोटी ।
कदा सम सम नाहीं पोटीं । यथालाभ संतुष्टी या नांव ॥१९-४१०
काया वाचा मनें धनें । जो विनटला गुरुकारणें ।
त्याचें उठे संसारधरणें । गुरुसेवा म्हणणें या नांव ॥ १९-४११

## निरपेक्षता

वृत्तिशून्य जी अवस्था । ती नांव जाण निरपेक्षता ।१४-१६६।१,२
प्राप्ताप्राप्त लाभावस्था । बाधूं न शके साधूच्या चित्ता ।
चित्त रतलें भगवंता । निरपेक्षता या नांव ॥ २६-३१६

## निर्वैरता

जें भेदाचें निराकरण । तेंचि निर्वैरतेचें लक्षण ।
उद्धवा हें सत्य जाण । निर्वैरपण या नांव ॥ १४-१७९

## निर्लोभता

जेथ काम क्रोध नाहीं । तेथ लोभ उठी कोणे ठायीं ।
तळवटी नसतां भुयी । वृक्ष कांहीं वाढेना ॥ १७-२४९
शीर बोडिले सकेशीं । तेथ राहूं न शके ऊ जैसी ।
तेवीं गेलिया कामक्रोधासी । वस्ती लोभासी असेना ॥ १७-२५०

## निःस्पृहता

अर्थ स्वार्थी इच्छा चढे । अर्थ जोडतां अधिक वाढे ।
ते इच्छा सांडणें निज निवाडे । निस्पृहता घडे ते ठायीं । २५-६३

## निरहंकारता

जें जें सान थोर दिसे दृष्टीं । तें तें अवघें मीचि सृष्टी ।
माझ्या मीपणाची निज पुष्टी । घोटीत उठी त्रैलोक्य ॥ २६-३३२
ऐसा मीपणें मी परिपूर्ण । तेथ मी म्हणावया म्हणतें कोण ।
निःशेष निमालें मीतूंपण । निरभिमान या नांव ॥ २६-३३३

## निर्ममता

ऐसें माझें मीपण पाहतां । समूळ हारपली ममता ।
हें माझें म्हणावया पुरता । ठाव रिता नुरेचि ॥ २६-३३४
तेथ मीपणें मी माझें । नुरेचि तूंपणेंसि तुझें ।
ऐसें परब्रह्माचेनि निजें । झालें सहजें निर्मम ॥ २६-३३५
जो निर्मम निरभिमान । त्यासी नाहीं भेदभान ।

## निर्द्वंद्वता

अभेदीं मिथ्या द्वंद्वबंधन । हा गुण निर्द्वंद्व ॥ २६-३४४

## निंदा

निंदा म्हणजे असदारोप । ... ... २५-९५१२

## परोपकारता

जो वृक्ष प्रतिपाळीं । कां जो घाव घाली मुळीं ।
दोनींतें वृक्ष पुष्पीं फळीं । समान मेळीं तुष्टला ॥ ११-८६८
तैसा कायावाचामनें । साधु वाढला उपकाराकारणें ।
आपुलें पारकें म्हणो नेणें । उपकारू करणें सर्वांसी ॥ ११-८७०

## पूजा-वेदोक्त

वेदींचे मंत्र वेदींचें अंग । वेदोक्त माझी पूजा सांग ।
या नांव गा वैदिकमार्ग । ... ... २७-५७

## पूजा-आगमोक्त

आगम मंत्र आगमचि अंग । माझी आगमोक्त पूजा सांग ।
या नांव गा तंत्रमार्ग । ... ... २७-५८

## मिश्र-पूजा

वेदांचे मंत्र तंत्रींचें अंग । एवं मिश्रित विभाग ।
माझी पूजा निपजे सांग । मिश्र मार्ग या नांव ॥ २७-५९

## पूजास्थानें-अष्टविध

प्रियप्रतिमा पूजास्थान । हें माझें प्रथम अधिष्ठान ।
कां पृथ्वीतळीं स्थंडिलीं जाण । पूजास्थान दुसरें ॥ २७-६९
अग्नीचें स्वरूप माझें । तें पूजास्थान जाणती जें ।
सूर्यमंडळीं जे पूजा कीजे । तें चवथें माझें पूजास्थान ॥ २७-७०
उदकीं जें माझें पूजन । तें पांचवें पूजास्थान ।
हृदयीं जें माझें आवाहन । तें पूजास्थान सहावें ॥ २७-७१
सकळ पूज्यामाजीं जाण । मुख्यत्वें पूज्य ब्राह्मण ।
तें सातवें पूजास्थान । उद्धवा जाण अति श्रेष्ठ ॥ २७-७४
एवं सद्गुरु ज्ञानघन । जो हरिहरां वंद्य पूर्ण ।
तो माझें सद्रूप अधिष्ठान । हें पूजास्थान आठवें ॥ २७-८०

## बळ

रिघतां रणामाझारीं । दुजयाचें सहाय्य न धरी ।
जेवीं वनगजीं केसरी । तेवीं रिघोनि दळभारी विभांडी वीर ।१७-१४०
आकाश दाटल्या निशाचरीं । भूमंडळीं कोंदल्या असुरीं ।
ऐसें प्रबळबळें आल्या वैरी। ज्याचे धृतीमाझारी विस्मयो नुठी १७-१४
आकाश पडावया गडाडी । पृथ्वी उलथावया हडवडी ।
तरी ज्याचे धृतीची रोकडी । नव्हे वांकुडी रोमावळी ॥ १७-१४२
सर्वांमाजीं प्राण सबळ । प्राणबळें बळी सकळ ।
प्राणयोगें मन चपळ । अतिचंचळ प्राण स्पर्शें ॥ १९-४८७
यापरी बलिष्ठ प्राण । प्राणाआधीन सदा मन ।
तो प्राण जिंकावा आपण । बळवंतपण या नांव ॥१९-४८८
प्राणाआधीन जीव मन । त्या प्राणाचें करूनि दमन ।
तो स्वयें कीजे गा स्वाधीन । अति बळ जाण या नांव ।१९-४९९

## बलोद्यम

राजबळें उद्यम व्यवहार । अंग दाटावया जो व्यापार ।
न्यायें सांडूनि स्वार्थ फार । बलोद्यम प्रकार या नांव ॥२५-८९

## ब्रह्म

जें वाचेचें वदवितें । परी वाचा वदों न शके ज्यातें ।
जें मन बुद्धयादिकां जाणतें । परी मन बुद्धि ज्यातें नेणती ॥३-६७२
जें नयनातें दाखवितें । परी नयन न देखती ज्यातें ।
जें श्रवण घ्राणातें चेतवितें । परी श्रवण घ्राण ज्यातें नेणती ॥३-६७३
एवं सर्वांचें जें जाणतें । परी सर्व सर्वथा नेणती ज्यातें ।
ज्यासि जाणावयालागीं येथें । आणिक जाण तें असेना ॥ ३-६७४

## ब्रह्मचर्य

हा आत्मा हें आत्मीं पाहीं । ऐसें मिथुन मुळीं नाहीं ।
तें निजमूळ पाडितां ठायीं । ब्रह्मचर्य पाहीं अभंग ॥ ३-४४७
या नांव गा निज नैष्ठिक्य । ब्रह्मचर्य अति सुटंक ।
सद्गुरूनीं बोलिलें निष्टंक । अलौलिक अभंग ॥ ३-४४८

## ब्रह्मचर्य—नैष्ठिक

व्रतबंध जाहल्या पाठीं । जो परमार्थीं ठेवूनि दृष्टी ।
गृहस्थाश्रमाची न करी गोठी । नैष्ठिक्य परिपाटी त्या नांव ॥१७-२६८

## ब्रह्मचर्य—उपकुर्वाण

वेद शास्त्र संपूर्ण पठन । गुरुदक्षिणा व्रत विसर्जन ।
करूनि करी पाणिग्रहण । उपकुर्वाण त्या नांव ॥ १७-२६९

## भजन

दारा सुत गृह प्राण । करावें भगवंतासी अर्पण ।
हे भागवत धर्म पूर्ण । मुख्यत्वें भजन या नांव ॥ २-२८८

## भक्त—उत्तम

जैशा घृताचिया कणिका । घृतेंसि नव्हती आणिका ।
तेवीं भूत भौतिक व्यापका । भिन्न देखा कदा नव्हती ॥ २-६३६
हे उत्तम भक्ताची निजस्थिती । ... २-६३७

## भक्त—मध्यम

ईश्वर मानी उत्तमोत्तम । तद्भक्त मानी मध्यम ।
अज्ञान ते मानी अधम । द्वेषी ते परम पापी मानी ॥२-६३७
ईश्वरीं प्रेम पवित्र । भक्तांसी मैत्री मात्र ।
अज्ञानी तो कृपापर । उपेक्षा निरंतर द्वेषियांची ॥ २-६३८
हे मध्यम भक्तांची भक्ति । ... २-६३९

## भक्त—प्राकृत

पाषाणप्रतिमा हाचि देवो । तेथेंचि ज्याचा पूर्ण भावो ।
भक्त सज्जनासि पहाहो । अणुमात्र देहो लवो नेदी ॥ २-६४०
ते ठायीं साधारण जन । त्यांची वार्ता पुसे कोण ।
त्यासि स्वप्नींहि नाहीं सन्मान । यापरी भजन प्राकृताचें ॥२-६४१
ऐशिया स्थिती जो जड भक्तु । तो जाणावा मुख्य प्राकृतु ।२-६४२

## भक्ति

माझें अर्चन माझें ध्यान । माझें करावें कीर्तन ।
माझ्या नामाचें नामस्मरण । माझे गुण वर्णावे ॥ ११-१४९५
अहर्निशीं माझी कथा । अहर्निशीं माझी वार्ता ।
अहर्निशीं मातें ध्याता । भक्ति तत्त्वतां ती नांव ॥११-१४९६

## भक्ति-परा

आवडीं गातां कृष्णकीर्ति । कीर्तिमंता । लागे परम गती ।
जीतें परा ऐसे म्हणती । ... ३१-३५५

## भक्ति–अंतरंग

पाहतां निजात्म दृष्टीवरी । मी सर्व भूतांच्या अंतरीं ।
अंतरींच हा निर्धार धरी । तंव भूताबाहेरी मज देखे ॥ २९-२७६
जो परावरादि अनंत । तो मी भूता सबाह्य भगवंत ।
मी तोचि होय माझा भक्त । मिळोनि मजआंत मद्रूपें ॥ २९-२७७
जैसजैशी माझी व्याप्ती । तैसतैशी भक्तांची स्थिती ।
जें जें देखें भूत व्यक्ति । तेथ सबाह्य प्रतीती मद्रूपे ॥ २९-२७८

## भक्ति–निज

जे जे भेटे तोचि देवो । ऐसा भावार्थी ज्याचा भावो ।
तो एक पढियंता मज पहाहो।त्याचे भावें जीवो आम्ही उद्धवा १७-१२१
एवं निःसीम भावार्थाची स्थिती।त्या नांव उद्धवा माझी भक्ति १७-१२२

## भागवत धर्म

हैतुक अथवा अहैतुक । वैदिक लौकिक स्वाभाविक ।
भगवंतीं अर्पे सकळिक । या नांव देख भागवत धर्म ॥२-३३६

## भागवतोत्तम

सर्वाभूतीं भगवंत । भूतें भगवंतीं वर्तत ।
भूतीं भूतात्मा तोचि समस्त । मी म्हणणें तेथें मीपणा नये ॥ २-६३१
सर्वभूतीं भगवंत पाही । भूतें भगवंताचे ठायीं ।
हें अवघें जो देखे स्वदेहीं । स्वस्वरूप पाही स्वयें होय ॥ २-६३२
तो भक्तामाजी अति श्रेष्ठ । तो भागवतामाजी वरिष्ठ ॥२-६३३।१,२

## भाग्य

ज्ञान आणि वैराग्यपूर्ण । लक्ष्मी आणि औदार्यगुण ।
ऐश्वर्य आणि यशगहन । हे षड्गुण जाण महाभाग्य ॥ १९-४९६

## भी

महा भय कंप भी शब्द ।                २५-९५।४

## भेद

भिदा म्हणजे भेद जाण । स्फुरद्रूप प्रपंचभान ।
माझें तुझें प्रपंचवचन । भिदा लक्षण या नांव ।। २५-८२

## मद

विद्येचा दर्प गहन । मदाचें लक्षण या नांव ।। २५-७८।२

## मननता

वेदशास्त्रार्थ परम प्रमाण । तें माझें शुद्ध स्वरूप जाण ।
तये स्वरूपीं निजनिर्धारण । त्या नांव मनन बोलिजे ।।१४-१६७

## मद्रूपपण

जो करी विषयांचें ध्यान । तो होय विषयीं निमग्न ।
जो करी सदा माझें चिंतन । तो चैतन्यघन मीचि होय ।।१४-३४१
आवडीं माझें जें चिंतन । चित्त चिंता चिंतितेपण ।
विरोनि होय चैतन्यघन । मद्रूपपण या नांव ।। १४-३५२
माझे प्राप्तीलागीं जाण । हेंचि गा मुख्य लक्षण ।
माझें ध्यान माझें भजन । मद्रूपपण तेणें होय ।। १४-३५३
मजवेगळें जें जें ध्यान । तेंचि जीवासी दृढ बंधन ।
यालागीं सांडून विषयांचें ध्यान । माझें चिंतन करावें ।।१४-३५४

## मच्चित्तता

चित्तें चिंतावें चैतन्य । याचि नांवें मच्चित्तपण ।
याचि नांवें निरपेक्षपूर्ण । इतर चिंतन भवबंधू ।। २६-३१९
निरपेक्ष व्हावया येथ । जागृती स्वप्न सुषुप्ती आंत ।
चिन्मात्रीं जडलें चित्त । या नांव मच्चित्त उद्धवा ।। २६-३२०
देह झालिया लक्ष्मीयुक्त । अथवा हो कां आपद्युक्त ।
चित्त परमानंदीं निश्चित । या नांव मच्चित्त उद्धवा ।। २६-३२१

## महाबुद्धि

माझें सर्वभूतीं ज्यासि भजन । त्याचे बुद्धीची बुद्धि मी आपण।
ते तूं बुद्धि म्हणसी कोण । कर्म ब्रह्मार्पण महाबुद्धि ॥ २९-४०५

सर्वभूतीं माझें भजन । सर्व कर्म मदर्पण ।
हे बुद्धीची महाबुद्धि जाण । येणें ब्रह्मपूर्ण स्वयें होती ॥ २९-४०६

## महोत्साह

रणीं उत्साह शूरासी । कां पुत्रोत्साह नरासी ।
विवाहोत्साह सुहृदांसीं । महोत्साह त्यासी बोलिजे ॥ २५-८४

## मित्रता

परम मैत्रीचा भावो देख । दुःख हिरोनि द्यावें सुख ।
साधु जीवांचें निरसोनि दुःख । परम सुख देतसे ॥ ११-१०३७

मनें धनें कर्तव्यता । ज्याची अनन्य अवंचकता ।
त्या नांव परम मित्रता । हे खूण तत्त्वतां जाणावी ॥ ११-१०४०

सर्व भूतांच्या ठायीं । सुहृदांवांचोनि दुजें नाहीं ।
तरी न करितांचि मैत्री पाही । ठायीचे ठायीं अलोलिक ॥ ३-३६६

जो विषयोगें न विटे । नाना विकल्पीं न उठे ।
आलिया परम संकटें । मैत्री नेटें पाटें सदा ग्राह्य ॥ ३-३६७
या नांव गा मित्रभावो। प्राण गेलिया न तुटे पहाहो॥ ३-३६८।१,२

## मूर्ख

वेद शास्त्र नेणतां एक । त्यासि मूर्ख म्हणती लोक ।
ते मूर्खता येथें न मने देख । केवळ मूर्ख देहाभिमानी ॥ १९-५२१

केवळ नश्वर देह देख । तो मी म्हणोनि मानी हरिख ।
देहाभिमानें भोगी नरक । या परता मूर्ख कोण आहे ॥ १९-५२२

देहाचें निजरूप येथ । अस्थि चर्म विष्ठा मूत्र ।
तो मी म्हणवूनि जो श्लाघत । मूर्ख निश्चित तो जाण ॥ १९-५२४
ऐशी जे कां देहअहंता । ती नांव परम मूर्खता । १९-५२५।१,२

## मौन

जेव्हां ज्याचे बोलावे अवगुण । तेथें तेथें दिसे आपण ।
यालागीं बोलतां पैशुन्य । पडे मौन गुरुवाक्यें ॥ ३-४१७
गुण देखोनिया स्तवन । करितां पडे दृढ मौन ।
मीचि स्तव्य स्तविता स्तवन । मज म्यां वानितां पूर्ण मूर्खत्वा माझें ॥
एवं स्तुति निंदा वाग्वाद । करितां खुंटला संवाद ।
महा मौनें अति शुद्ध । परमानंद साधका ॥ ३-४२२

## मोह

मोह म्हणजे भ्रमाचा पूरु । २५-९४।२

## अहिंसा

अहिंसा काया वाचा मनें । परपीडा त्याग करणें । १९-३७९

## सत्य

सत्य तें यथार्थ बोलणें । १९-३७९

## अस्तेय

हातें चोरी नाहीं करणें । परी परद्रव्याकारणें ।
मनीं अभिलाष नाहीं धरणें । अस्तेय लक्षण त्या नांव ॥ १९-३८०

## अनासक्ति

असतां देह गेह संगती । ज्याचे पोटीं नाहीं आसक्ती ।
जेवीं यात्रेमाजीं लोक येती । परी संगासक्ती त्या नाहीं ॥ १९-३८१

## ऱ्हीं

निंद्य कर्माकारणें । पोटांतून कंटाळणें ।
लौकिकीं निंद्य कर्मा लाजणें । ऱ्हीं म्हणणें या नांव ॥ १९-३८३

## असंचय

इहलोकीं संग्रहो करूं नेणें । जाणें दैवाधीन देहाचें जिणें ।
सर्व सुख भोगाकारणें । नाहीं संग्रहणें पुण्यातें ॥ १९-३८४

या नांव गा असंचयो । ऐक्य आस्तिक्याचा निर्वाहो ।
सर्वत्र माझा ब्रह्मभावो । कोठेंही अभावो घेऊं नेणे ॥ १९-३८६

## ब्रह्मचर्य

ब्रह्मचर्य ऐसें येथ । जैसे आश्रम प्रयुक्त ।
बोलिले शास्त्रीं यथोचित । तें निश्चित करावें ॥ १९-३८७
मौनी न बोलावें इतुकें जाण । मिथ्यालाप संभाषण ।
नित्य करावें वेदपठण । गायत्री स्मरण कां हरिनाम ॥ १९-३८८

## स्थिरता

स्थिरवृत्ति आत्मारामीं । कां असावी निजधर्मीं ।
भावार्थें संतसमागमीं । स्थिरता उपक्रमी या नांव ॥ १९-३८९

## क्षमा

स्वदेह दंडिलें कां वंदिलें । परी क्षमा सम दोहीं काळें ।
देहाचा भोगू तो दैवमेळें । येणें विवेकमेळें क्षमावंत ॥ १९-३९०
या नांव क्षमा म्हणिजे । १९-३९१

## अभय

जें जें पारिखें देखिजे । तें तें होइजे आपणचि ॥ १९-३९१
आत्मा एक पंचभूतें एक । दुजें पाहतां नाहीं देख ।
निमालें भयाचें महादुःख । अभय निःशेख या नांव ॥ १९-३९२

## यश

शास्त्रविवादीं जयो घेणें । कां युद्धीं शूर पराभवणें ।
तेणें ख्याति वाढणें । यश मिरविणें या नांव ॥ २५-८५

## याञ्चा

याञ्चा म्हणजे लोलंगता । २५-९३।१

## लज्जा

नरदेहीं लाभे परब्रह्म । तदर्थ न करूनि सत्कर्म ।
विषयार्थ करी धर्माधर्म । ते लज्जा परम अति निंद्य ॥ २५-६६

केवळ अवयव झांकणें । ते लज्जा येथ कोण म्हणे ।
गेलियाही जीवें प्राणें । अकर्म न करणें ते लज्जा ।। १९-५११

## लाभ

माझी करितां उत्तम भक्ती । चारी मुक्ति पायां लागती ।
सुरवर लोटांगणीं येती । लाभ श्रीपती मी लाभे ।। १९-५०३
हा लाभ न येतां हातीं । धनादिकाची जे प्राप्ती ।
तो नाड जाण निश्चितीं । नरकगतिदायक ।। १९-५०४
यालागीं परम लाभ माझी भक्ति । तेणें मी लाभे श्रीपती ।। १९-५०५

## लोभ

लोभ म्हणजे अति कृपणता । २५-१२।१

## विद्या

देहाचे माथां वर्णाश्रम । आश्रमांचे माथां कर्म ।
कर्माचा अभिमान परम । तो जीवभ्रम देहबुद्धि ।। १९-५०७
ते छेदोनि गृहाची बाधा । तो मेळविजे चिदानंदा ।
ते नांव शुद्ध आत्मविद्या । येर ते अविद्या सर्वही ।। १९-५०८
जे निरसी गा अविद्या । ते बोलिजे शुद्ध विद्या ।
येरी शास्त्रादि चौदा विद्या । ते जाण अविद्या पाल्हेळी ।।१९-५०९
जे निरसी जीवाची बाधा । ते बोलिजे शुद्ध आत्मविद्या ।।१९-५१०

## विषाद

विषाद म्हणजे दुःखसंचारू । अभ्यंतरू जेणें पोळे ।। २५-१४

## विज्ञान

पूर्वी देखतेनी स्वभावें । व्यापक वस्तूनि ये सर्वें ।
व्यापिलीं असतीं देहातीतत्वें । हें मानी जीवें भावें निश्चित ।। १९-१७६
जेवीं कां घटमात्रास । सबाह्य व्यापक आकाश ।
तेवीं सकळ प्रपंचास । चिदाभास व्यापक ।। १९-१७७

ऐसें जें कां शुद्ध ज्ञान । तें ज्ञेय प्राप्तीचें कारण ।
ज्ञेय पावलिया ज्ञान । हारपे जाण वृत्तीसी ॥ १९-१७८

कां ज्ञानें गम्य वस्तु जे । यालागीं तें ज्ञेय म्हणिजे ।
ज्ञेय पावलिया ज्ञान लाजे । जेवीं कां सूर्यतेजें खद्योत ॥ १९-१७९

जळीं रिघाल्या लवण । लवणपणा मुके जाण ।
तेवीं ज्ञेय पावलिया ज्ञान । ज्ञातेपण हारपे ॥ १९-१८०

ज्ञेय पावलिया सम्यक । स्वरूपीं चिन्मात्रैक एक ।
तेथ मिथ्या व्याप्यव्यापक । साधक बाधक असेना ॥ १९-१८१

## वीर्य

वीर्य म्हणजे केवळ । बलाढ्यता अति प्रबळ ।
दाखवणें शारीरबळ । या नांव शील वीर्याचें ॥ २५-८८

## वैराग्य

धन धान्य रत्नांच्या राशी । उर्वशी आल्या शेजारासी ।
तें अवघें तृणप्राय ज्यासी । वैराग्य त्यासी आम्ही म्हणो ॥ १९-३५१

जेथ निःस्पृहा मूळ सांग । त्यासि नांव दृढ वैराग्य । २५-६४

दृढ वैराग्यता ते ऐशी । विषयो टेकिल्या अंगासी ।
चेतना नव्हे इंद्रियासी । निद्रितापाशीं जेवीं रंभा ॥ ८-२८८

अथवा वमिलिया अन्ना । जेवीं वांछीना रसना ।
तेवीं विषय देखोनि मना । न धरी वासना आसक्ती ॥ ८-२८९

## शम

मनादि ज्ञानेंद्रियवृत्ती । बाह्य दृष्टी परिचार स्थिती ।
ते आवरूनि विवेकयुक्तीं । आत्मप्रतीती धरावी ॥ १७-८५

मुख्य करूनि गुरुवचन । तदर्थीं बुद्धि निमग्न ।
तत्प्रवीण होय मन । शम तो जाण या नांव ॥ १७-८८

आपुली जे चित्तवृत्ती । सांडूनि बाह्य स्फूर्ति ।
अखंड राखणें आत्मस्थिती । शम निश्चिती त्या नांव ॥ २५-५३

बुद्धी जे कां विवेकवंती । असार सांडूनि सार धरिती ।
मनाच्या सकळ वृत्ती । विवेकस्थिती आवरोनी ॥ १९-४३१
त्या वृत्तीसमवेत आपण । बुद्धि परमात्मीं मिळे जाण ।
जेवीं सागरासी लवण । दे आलिंगन भावार्थे ॥ १९-४३२
समुद्रीं मिळतां लवण । समुद्रचि होय आपण ।
तेवीं आत्मनिश्चयें बुद्धि पूर्ण । चैतन्यघन स्वयें होय ॥ १९-४३३
ऐसा बुद्धीचा उपरम । त्यातें म्हणिजे गा शम । १९-४३४।१,२

## शांति

काम क्रोध सलोभता । समूळ मूळेंसि न वचतां ।
देहीं आली जे निश्चळता । तें न सरे सर्वथा येथ शांती ॥१९-१७०
काम लोभादि दोषरहित । परमानंदीं जडलें चित्त ।
शांति सुखवासें वसे तेथ । त्यालागीं प्रशांत बोलिजे त्यासी॥२६-३२२
जरी प्राणांत केला उपकार । तरी दुष्ट न म्हणे हा नर ।
अपकाऱ्यां करी उपकार । प्रशांति प्रकार या नांव ॥ २६-३२३
जरी ठकूनि सर्वस्व नेलें । तरी क्षोभेना दोषबळें ।
तें जाण ब्रह्मार्पण झालें । येणें अंगा आलें प्रशांतत्व ॥ २६-३२४
ब्रह्मभावेंचि तत्त्वतां । विश्वासणें सर्वभूतां ।
कदा विकल्प नुपजे चित्ता । हे प्रशांतता ॥ २६-३२५

## शुचिष्मंतता

साधूंची जे शुचिष्मंतता । ते भगवद्भजनेंचि तत्त्वतां ।
व्रत तप दानादि तीर्थां । शुचिष्मंतता त्यांचेनि ॥ ११-८९१

## शुद्धता

निंदा असूयादि दोष समस्त । निजात्मबोधें प्रक्षाळित ।
अत्यंत पवित्र केलें चित्त । अनिंदित निज बोधें ॥ ११-८५३
गुरु आज्ञा तीर्थी न्हाला । न्हावोनि सर्वांगीं निवाला ।
त्रिविध तापें सांडवला । पवित्र झाला मद्रूपें ॥ ११-८५४

काय सांगूं त्याची पवित्रता । तीर्थें मागती चरणतीर्था ।
मीही पदरज वांछितां । इतराची कथा काय ॥ ११-८५५
कृष्ण म्हणे उद्धवा । हा अनवद्य गुण । ११-८५६

## शोक

शोक म्हणजे हाहाकारु । २५-९४।१

## शौच

बाह्य मळाचें क्षालन । मृज्जलादि वेदविधान ।
आंतरमळाचें निर्दळण । आत्मज्ञान निजनिष्ठा ॥ १७-९९
शुद्ध शौचें निर्मळपण । मुख्यत्वें उद्धवा हेंचि जाण ॥ १७-१००
अंतरीं कर्मबळाचें बंधन । त्याचें स्वधर्में करावें क्षालन ।
कर्में कर्माचें निर्दळण । करूनि आपण निष्कर्म व्हावें ॥ १९-४६८
ते स्वधर्मी फळाशा न सुटतां । कर्मबंधनें न तुटती सर्वथा ।
यालागीं फळ निराशता । अंतरशौचता अति शीघ्र ॥ १९-४६९
नैराश्यें स्वधर्माचरण । तेणें अंतरमळाचें क्षालन ।
या नांव गा शौच जाण । शौच पूर्ण नैराश्यें ॥ १९-४७०

## शौर्य

शूरांचें शौर्य तें कैसें । शत्रूंचें निःशेष नांव पुसे ।
वैरी कोणी कोठेंचि नसे । करणें ऐसें तें शौर्य ॥ १७-१४५

## श्री

सकळ साम्राज्य वैभवेंसी । चतुर्दश भुवन विलासेंसी ।
आंगीं लक्ष्मी आलिया जयापाशीं । परी थुंकोनि तिसीं पुसेना १९-५१२
ऐसी ज्याची निरपेक्षता । त्याची नित्य वस्ती माझे माथां ।
त्याहीहोनि परता । आणिक सर्वथा मज नाहीं ॥ १९-५१३

## श्रद्धा

नवल श्रद्धेचें लक्षण । ब्रह्मा मुंगी समसमान ।
तरी यथोचित-विधान । सर्वथा जाण चुकेना ३-३७०

करितां यथोचित अर्पण । जरी क्रिया दिसे भिन्न भिन्न ।
तरी अंतरश्रद्धा अभिन्न । हें मुख्य लक्षण भागवतधर्मी ॥ ३-३७७
जो गुरुवाक्य विश्वासी । सबाह्य विकला सर्वस्वेसी ।
तोचि भावार्थ द्विजदेवांसीं । श्रद्धा त्यापाशीं समूळ नांदे ॥ २५-६५

## सद्गुरूचें निरुपमत्व

जो शब्दपरनिष्णात । शिष्य प्रबोधनीं समर्थ ।
तोचि सदूगुरु येथ । जाण निश्चित उद्धवा ॥ १२-४७८
जो स्वरूपीं करी समाधान । तो सदूगुरु सत्य जाण ।
त्या वेगळें सदूगुरुपण । व्हावया कारण असेना ॥ १२-४७९
गुरु म्हणो पित्यासमान । तंव तो एक जन्मींचा जाण ।
हा मायबापु सनातन । जनक पूर्ण जगाचा ॥ १२-४८१
गुरु मातेसमान पाहो । तंव गर्भजन्में तिचा मोहो ।
गर्भवास निवारी गुरुरावो । अधिक स्नेहो पुत्रापरीस ॥ १२-४८२
गुरु मानूं स्वामीसमान । तरी तो निवारूं न शके मरण ।
सदूगुरु चुकवी जन्ममरण । स्वामी संपूर्ण गुरुरावो ॥ १२-४८४
गुरु मानूं कुलदेवता । तंव तिसी कुळधर्मीं पूज्यता ।
हा कुळदेवतेची देवता । नित्य पूज्यता निजकर्मी ॥ १२-४८५
गुरु मानूं कल्पतरुसमान । तंव कल्पतरु दे कल्पिलें दान ।
सद्गुरु दे निर्विकल्पता पूर्ण । अगाध दान निर्लोभ ॥ १२-४८६
चिंतामणी दे चिंतिल्या अर्था । सद्गुरु करी चिंतेच्या घाता ।
चित्ता मारूनि दे चैतन्यता । अक्षयता निजज्ञान ॥ १२-४८७
कामधेनु दे दुभतें । नें दे कामनेचपुरतें ।
सद्‌गुरु देत स्वानंदातें । कामनेतें निर्दाळी ॥ १२-४८८
गुरुसमान म्हणो सागरू । तो गंभीर परी सदा क्षारू ।
स्वानंदें नित्य निर्भरू । अति मधुरू निजबोधें ॥ १२-४८९
गुरु परब्रह्मसमान । हेंही बोलणें किंचित् न्यून ।
गुरुवाक्यें ब्रह्म सप्रमाण । येरवीं ब्रह्म प्राण शब्दमात्र ॥ १२-४९०

## सत्य

सत्य तें जाण पां ऐसें । ज्याचें मन वाचा असत्य दोषें ।
जागृति स्वप्न सुषुप्तिवशें । स्पर्शलें नसे अणुमात्र ॥ १७-२३७
निंदा आणि नरस्तवन । कदा मिथ्या न बोले वचन ।
वाचा अनसुट धरणें जाण । सत्य संपूर्ण या नांव ॥ १७-२३८
सत्याचें सत्यत्व हें ऐसें । जागृति स्वप्न सुषुप्तिवशें ।
ज्यासी असत्यता न स्पर्शे । निज सत्य ऐसें निर्धारिलें ॥ १७-१३२
ऐसें सत्य परिपक्कल्या पोटीं । सत्य वाचा सत्य दृष्टी ।
निजसत्यत्वें सत्य सृष्टी । पडिली तुटी असत्याची ॥ १७-१३३
ज्या नांव बोलिजे निज सत्य । तें मी सांगेन निश्चित ।
सम ब्रह्म देखणें संतत । तें परम सत्य उद्धवा ॥ १९-४६०
वस्तु न देखतां सर्व सम । जें देखणें गा विषम ।
तेंचि असत्य अति दुर्गम । सत्य तें ब्रह्म समसाम्यें ॥ १९-४६१

## समता

विचित्र भूतें विचित्र नाम । विचित्राकारें जग विषम ।
तेथें देखे सर्वां सर्व सम । परब्रह्म समत्वें ॥ १४-१७४

## समदर्शनता

जग पाहतां दिसे विषम । विषमीं देखे सम ब्रह्म ।
तोचि समदर्शी परम । २६-३२७

## सन्मानता

ब्रह्मादि मशकवरी । सर्वांतें वंदी शिरीं ।
एवं निष्ठा चराचरीं । बुद्धि दुसरी जाणेना ॥ ११-१००९
सर्वभूतीं स्वामी देखे । लोटांगण घाली हरिखें ।
सुरवर नर हें नोळखे । अति संतोखें वंदित ॥ ११-१०१०
यापरी सकळ भूतां । साधु सन्मानातें देता । ११-१०१४।१,२

## सन्मार्ग

चालणें माझ्या वेदपंथा । सन्मार्गता ती नांव ॥ १९-५२५।३,४

## समाधि

निरभिमान निरवधि । त्या नांव अखंड समाधी ॥१३-६६४।१,२
सर्व संकल्पाचा अवधि । त्या नांव निर्विकल्प समाधी ।
सकळ शास्त्र हेंचि प्रतिपादी । समाधि त्रिशुद्धि त्या नांव ॥१३-६६९
स्वरूप देखतां प्रथम दृष्टी । नावरत विस्मयो उठी ।
तोही जिरवोनिया पोटीं । दशा जे उठी ते समाधी ॥१३-६७२
जेथ बाध्यबाधकता फिटली । सकळ अहंविद्या तुटली ।
सहज समाधी त्या नांव झाली । हे संस्था केली सिद्धांती ॥१३-६९३

## सहनशीलता

शांती सकळ वैभवेंसी । अखंड असे संतांपाशीं ।
यालागीं सहनशीलता तयांसीं । अहर्निशीं अनिवार ॥ ११-८४१
हिंडतां सकळभूतीं सैराटा । न म्हणे हा भला खोटा ।
नाचत निजशांतीचे चोहटा । संत गोमटा त्या नांव ॥ ११-८४२
ऐशी जे सहनशीलता । ते तितिक्षा जाण तत्त्वतां ॥११-८४३-१।२

## सुख

सुख आणि महादुःख । दोनींते ग्रासोनिया देख ।
प्रकटे स्वानंद स्वाभाविक । या नांव सुख उद्धवा ॥ १९-५१४
जेथ दुजयाची चाड नाहीं । इंद्रियांचा पांग न पडे कांहीं ।
विषयाविण आनंद हृदयीं । निजसुख पाहीं या नांव ॥१९-५१५

## सुखप्रयोग

राजस सुखाचा नवलभाग । विषयसुखभोग जो सांग ।
तेंचि सुख मानिती चांग । सुखप्रयोग या नांव ॥ २५-८३

## सुखाधिकारी

निष्काम निर्लोभ निर्दंभ भजन । निर्मत्सर निरभिमान ।
ऐशिया मद्भक्तांसी जाण । माझें सुख संपूर्ण मी देतों ॥ १४-१०१

## सुखसंतुष्टी

न करितां अति आटाटी । यथा लाभें सुखी पोटीं ।
या नांव गा सुखसंतुष्टी । जाण जगजेठी उद्धवा ॥ २५-६१

## स्तब्धता

अति गर्वें जे स्तब्धता । कोणा दृष्टीं नाणीं सर्वथा ।
या नांव स्तब्धावस्था ।......२५-८०

## स्त्री-ब्रह्मज्ञानाधिकारी

अतिथी आणि पतिपुत्रांसी । भोजनीं समता नित्य जिसीं ।
धनलोभ नाहीं मानसीं । परमार्थीं तिसी अधिकारु ॥२९-५८६

## स्थैर्यता-क्षत्रियाची

गोब्राह्मणसंरक्षणता । स्वधर्में प्रजापाळकता ।
ये ठायीं उबगूं न ये चित्तां । या नांव स्थिरता क्षत्रियाची ॥१७-१६२

## स्मृति

माझा मुख्य निजस्वार्थ कोण । मी काय करतों कर्माचरण ।
ऐसें जें पूर्वानुस्मरण । स्मृति जाण या नांव ॥ २५-६०

## स्पर्धा

देहीं ममता तोचि अभिमान । आपुल्या ज्ञानेसी समान ।
त्याचें निर्भत्सनें जें ज्ञान । स्पर्धा जाण या नांव ॥२९-३२४

## स्वर्ग

स्वर्ग शब्दाची उत्पत्ति । सत्त्वगुणाची व्युत्पत्ति ।
जेणें निजसुखाची होय प्राप्ति । परी इंद्रलोक गती तो स्वर्ग नोहे ॥

ऐसा जो कां सत्त्वगुण । तोचि येथें स्वर्ग जाण । १९-५३४।१,२

## स्वनिवृत्ति

खातां नावडे पुढें पेंडी जैसी । तैसें गौण देखोनि विषयांसी ।
जो विनटला ब्रह्मसुखासी । स्वनिवृत्ति त्यासी बोलिजे ॥ २५-६९

## स्वाध्याय

वेदू अथवा नामस्मरण । या नांव गा स्वाध्यायो जाण । ३-४२७।१,२

## हिंसा

हिंसा ते तत्त्वतां परपीडा । २५-९२।४

## हृदयस्थ

सांडूनि रूप नाम अभिमान । स्फुरे जें कां उद्धवपण ।
तें मज हृदयस्थाचें रूप जाण । त्यासि तुवां शरण रिघावें ॥१२-२६१
नाम रूप गुण वार्ता । हे माया जाण तत्त्वतां ।
ते सांडूनि जे स्फुरे सत्ता । तें मज हृदयस्थाचें रूप ॥ १२-२६२

## ज्ञान

भूतें समसमान चैतन्य । एकात्मता देखणें जाण ।
या नांव गा शुद्ध ज्ञान । माझाही जाण हा निश्चय ॥१९-१७४
ऐक उद्धवा निज वर्म । गुह्य सांगेन मी परम ।
माझी भक्ति जे सप्रेम । उत्तम धर्म तो जाण ॥ १९-३४९
ऐके एकात्मता निजबोध । परतोनि कदा नुपजे भेद ।
या नांव गा ज्ञान शुद्ध । कृष्ण परमानंद सांगत ॥ १९-३५०



दा. क्र. ११०१८
ग्रंथ. संग्रहालय प्रत

# तुका म्हणे भागवत । केलें श्रुत सकळां ॥

: लेखक :

ह. भ. प. प्रा. शं. वा. तथा सोनोपंत दांडेकर, एम्. ए.

एकनाथदर्शनाकरितां या लेखावरील अवतरणांत श्रीतुकोबांनीं जें सांगितलें आहे त्याच्या आधारानें श्रीएकनाथ महाराजांचें महात्म्य सांगावयाचें ठरवलें आहे. कारण, तुकोबांनीं म्हटल्याप्रमाणें संतांचें महात्म्य सामान्य मनुष्याच्या आंवाक्याबाहेरचें असतें. '**भक्तांचा महिमा भक्तचि जाणती । दुर्लभ या गती आणिकांसी ॥**' संतच संतांना ओळखूं शकतात.

लेखाचें शीर्षक म्हणून जें अवतरण दिलें आहे तें ज्या अभंगाचा शेवट आहे तो पुढीलप्रमाणें आहे :-

**शरण शरण एकनाथा । पायीं माथा ठेविला ॥ १ ॥**
**नका पाहूं गुणदोष । जालों दास पायांचा ॥ २ ॥**
**उपेक्षितां मज । तरी लाज कोणासी ॥ ३ ॥**
**तुका म्हणे भागवत । केलें श्रुत सकळां ॥ ४ ॥**

वारकऱ्यांमध्यें परंपरागत अशी गोष्ट सांगतात कीं तुकोबांनीं श्रीएकनाथी भागवताचीं हजार पारायणें केलीं होतीं. व ही गोष्ट तुकोबांचे अभंग व एकनाथांचें भागवत यांची तुलना केली असतां शक्य अशीच वाटते इतका नाथभागवताचा परिणाम तुकोबांच्या अभंगांवर झालेला आहे.

'**करिसी तें देवा करी माझें सुखें । परि मी त्यासी मुखें न म्हणे संत ॥**' असें देवाला बजावणारे आत्मानुभवी संत तुकोबा ज्यांना शरणागति करून पायीं माथा ठेवतात त्यांचें महात्म्य आणखी कांहीं सांगून पटवण्याचें कारण नाहीं. नाथांचे उच्च आध्यात्मिक अनुभव वाचकांच्या समोर मांडून त्यांचें पारमार्थिक गुरुत्व वाचकांना पटवून देणें हा प्रस्तुतच्या लेखाचा हेतु नाहीं. या लेखाचा हेतु नाथांच्या लौकिक चरित्रांतील 'ग्रंथकर्तृत्व' हा जो एक भाग त्याचा विचार करून, लौकिक दृष्टीनेंसुद्धां नाथ हे अलौकिक कसे आहेत, त्यांच्या

ग्रंथांत प्रसाद, प्रतिभा, वक्तृत्व, लोककल्याणाची तळमळ, बाळेभोळे यांच्या उद्धाराची कळकळ इत्यादि उत्तमोत्तम गुण कसे भरले आहेत हें दाखवणें हा आहे. व त्याकरितां त्यांचा ‘ भागवत ’ ( एकादश स्कंधावरची त्यांची टीका ) हा ग्रंथ निवडला आहे. ही निवड योग्य आहे हें तुकोबांनीं त्यांचें वर्णन करतांना भागवताचाच वरील अवतरणांत उल्लेख केला आहे ह्यावरून सिद्ध होण्यासारखी आहे.

नाथांनीं मराठींत जें भागवत आणलें तें श्रीमद्‌भागवत होय. आपले गुरु जनार्दन स्वामी यांच्या आज्ञेवरून नाथांनीं ‘चतुःश्लोकी भागवत’ म्हणून भागवतांतील जो भाग प्रसिद्ध आहे त्यावर ओवीबद्ध टीका लिहिली. हा त्यांचा पहिलाच ग्रंथ. नंतर पुढें नाथांनीं श्रीमद्‌भागवतांतील एकादशस्कंधावर ओवीबद्ध टीका लिहिली. तुकोबांनीं नुसतें ‘ भागवत ’ श्रुत केलें एवढेंच म्हटलें आहे. पण त्याचा अर्थ प्रामुख्यानें एकादशस्कंधावरची टीका असा घेऊनच प्रस्तुतचा लेख लिहिला आहे. कारण, चतुःश्लोकी भागवतावर टीका लिहिल्यानंतर त्यांनाच पुन्हा एकादशस्कंधावर विस्तृतपणें लिखाण करावेसें वाटलें. शिवाय, चतुःश्लोकी भागवताचा मतितार्थ एकादशाच्या टीकेंत आहेच. म्हणून या लेखापुरता ‘ भागवत श्रुत केलें ’ म्हणजे ‘ एकादश ऐकवला ’ एवढाच घेऊन कांहीं विचार मांडले आहेत.

नाथांनीं ‘ भागवत ऐकवलें ’ याची स्पष्टता भागवतांतील श्लोक व नाथांचें त्यावरील भाष्य यांचीच फक्त तुलना करून करतां येईल. पण, ती स्पष्टता इतर ज्या भागवतावर संस्कृतप्राकृत टीका आहेत त्याच्याशींहि तुलना करून केली तर अधिक फलदायी होईल. म्हणून तसाच अगदीं अल्पसा प्रयत्न या लेखांत केला आहे. अल्पसा म्हणण्याचें कारण असें कीं जसें गीतेवरील शांकरभाष्य व ज्ञानेश्वरी यांची विस्तृत तुलना करून प्रबंध लिहिले गेले आहेत, तसा ज्या श्रीधरी टीकेला—भावार्थदीपिकेला—अनुसरून नाथांनीं आपली टीका लिहिली नुसत्या तिच्याशीं नाथभागवताची तुलना करूनसुद्धां एक प्रबंध तयार करतां येईल व तो होणें अवश्य आहे. व हें कार्यसुद्धां मोठें आहे.

पण श्रीधरीप्रमाणेंच भागवत ग्रंथावर इतरहि मध्व, वल्लभ, चैतन्य इत्यादि भक्तिसांप्रदायिकांच्या संस्कृत टीका आहेत. मराठींत मोरोपंतांचें ‘ मंत्रभागवत ’, महानुभवी पंडित कवीश्वर भास्करभट्ट यांची ‘ उद्धवगीता ’, वामन पंडितांचीं ‘ स्फुट प्रकरणें ’ इत्यादि भागवताचें सार सांगणारे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

नाथभागवताची खरी योग्यता जाणून घेण्यासाठीं त्याची या सर्व टीकांशीं तुलना व्हायला पाहिजे.

तुलना ही सर्वदाच घातक अथवा निंद्य असते असें नव्हे. सत्य शोधनाच्या शुद्ध बुद्धीनें केल्यास तुलना उपकारीच ठरते तुलना बुद्धीचा विकास करते व तुलनेचा जो विषय त्याच्या मोलावरहि उत्तम प्रकाश पाडणारी अशी असूं शकते. आतां तर धर्मांचाहि तौलनिक अभ्यास करण्याचा स्तुत्य प्रयत्न सुरू आहे. प्रस्तुत लेखाचा विषय म्हणून संस्कृत टीकांपैकीं एकदोन व प्राकृतांपैकीं एक अशी निवड केली आहे. व त्यांतीलसुद्धां तीन प्रसंगच तुलनेकरितां घेतले आहेत. कारण, या लेखाचा हेतु या बाबतींत प्रयत्न व्हावेत ही गोष्ट अधिकारी पुरुषांच्या नजरेस आणणें एवढाच आहे.

वेद व भगवद्गीता यांच्या खालोखाल, कांहीं भक्तिमार्गीयांच्या दृष्टीनें तर वेदाच्या खालोखाल पण भगवद्गीतेपेक्षांहि अधिक मोठा मान्यतेचा ग्रंथ कोणता असेल तर तो श्रीमद्भागवत होय. जरी व्यासांनींच अठरा पुराणें लिहिलीं असलीं तरी श्रीमद्भागवत ही व्यासांची समाधिभाषा समजली जाते व म्हणून त्याची योग्यता आगळीच मानली जाते. भागवताचें महात्म्य भागवताच्या प्रारंभींच पुढीलप्रमाणें दिलें आहे :—

**निगमकल्पतरोर्गलितं फलं शुकमुखादमृतद्रवसंयुतम् ।**
**पिबत भागवतं रसमालयं मुहुरहो रसिका भुवि भावुकाः** ।। १-१-३

" रसिकजनहो, श्रीमद्भागवत हें वेदरूपी वृक्षाचें पक्कें होऊन गळून पडलेलें फळ आहे. श्री शुकाचार्यरूपी पोपटाचें मुख लागल्यानें परमानंदरूपी अमृतानें तें पूर्ण तयार झालें आहे. जोंपर्यंत शरीरांत चेतना आहे तोंपर्यंत या दिव्य भगवद्रसाचें पुनः पुनः पान करीत रहा. " भारतांतील साधुसंतांच्या चरित्रावर आणि अर्थातच त्यांच्या वाङ्मयावर श्रीमद्भागवताचा केवढा परिणाम झाला आहे हें कै. श्री. कोल्हटकरकृत भागवतादर्श अथवा भागवताचा उपसंहार या पुस्तकाचें समीक्षण लिहितांना कै. ह. भ. प. पांगारकरांनीं उत्तम रीतीनें सांगितलें आहे. त्यापैकीं एक परिच्छेद देतों म्हणजे वाचकांस भागवताची संतवाङ्मयावर केवढी छाप आहे याची कल्पना येईल.

कै. ह. भ. प. पांगारकर लिहितात :—

“ ज्ञानेश्वरीवर भागवताचा पुष्कळच संस्कार झालेला आहे. .... भागवताचा संस्कार ज्ञानेश्वरांप्रमाणेंच इतर मराठी संत कवींवरही झाला आहे. नाथांचें तर एकादशस्कंधावर स्वतंत्र भाष्यच आहे. कृष्णदयार्णव यांनीं २२५ वर्षांमागें दशमस्कंधावर ५५ हजार ओव्यांची ‘ हरिवरदा ’ टीका केलेली प्रसिद्ध आहे. ज्योतिपंत महाभागवत यांनीं ओवी व अभंग या दोन्ही वृत्तांत भागवताचा कथाभाग आणला आहे. मोरोपंती मंत्रभागवत व स्फुट आख्यानें प्रसिद्ध आहेत. वामनांचीं भागवती स्फुट प्रकरणें—पराकाष्ठेची मधुर अशीं लोकप्रिय आहेतच. तुकोबांवर भागवताचा काय संस्कार झाला हें मी आपल्या श्रीतुकारामचरित्रांत ( पृ. १६५–१७२ ) सप्रमाण दाखवलें आहे. .... समर्थांनींहि दासबोधांत आपण कोणत्या ग्रंथाच्या संमति घेतल्या तें प्रथमच सांगितलें आहे. त्यांत भागवताचा उल्लेख आहे. तात्पर्य, महाराष्ट्रांतील सर्व साधुसंत व कवि या सर्वांवर भागवत ग्रंथाची विलक्षण छाप पडलेली असून त्यांचे बहुतेक सर्व सिद्धान्त भागवतांतलेच आहेत, असें दिसून येतें. महाराष्ट्राबाहेर पाहिलें तरी सूरदास, नरसीमेहता, मिराबाई, श्रीकृष्णचैतन्य, अनेक द्रविडी व कर्नाटकांतील संत या सर्वांस भागवतानें मोहून टाकलें आहे, याविषयीं शंका रहात नाहीं. साधुसंतांच्या ग्रंथांचा व उक्तींचा प्रसार म्हणजे भागवत सिद्धान्ताचाच प्रसार आहे, हें पाहिलें म्हणजे भागवतानें हिंदुराष्ट्रावर केवढा उपकार केला आहे हें पूर्णपणें समजून येईल.”

श्रीमद्भागवत म्हणजे भक्तकथारूपी रत्नांची खाण आहे. ज्यांत भक्तिप्रमेयरूपी अनंत मोतीं तळाशीं विखुरलीं आहेत असा हा भक्तिरसाचा समुद्र आहे. गुरुवर्य कै. डॉ. रानडे आपल्या ‘ Mysticism in Maharashtra ’ या ग्रंथांत म्हणतात :—

“ The Bhagwat as we have pointed out is a repository of the accounts of the Ancient Mystics of India and if we may seek for some types of Mystics in Bhagwat, we may find a number of such types which later on influenced the whole course of the Mystic movement.”

वरील विधानास पुष्टि म्हणून तुकोबांची एकच उक्ति देतों. तिजवरून महाराष्ट्रीय संत भागवताला केवढा मान देत याची कल्पना येईल.

**गीता भागवत करिती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचें ॥**
**तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ॥**

गीता भागवत 'श्रवण' करणाऱ्यांची सेवा मिळाली तर तुकोबा आपणांस धन्य समजतात. मग गीता भागवतांतील अर्थाशीं एकरूप जे झाले त्यांना तुकोबा कोठें ठेवतील याची कल्पनाच करणें कठिण आहे.

ज्ञानराजांनीं शके १२१२ (सन १२९०) मध्यें गीतेवर ज्ञानेश्वरीरूपी लेणें चढवून मराठी वाचकांची मोठी सोय केली. त्यायोगें 'मराठीचिये नगरीं' ब्रह्मविद्येचा सुकाळ झाला. पण ज्ञानराजांनंतर कांहीं वर्षांनीं यादवांचें राज्य नाहींसें झालें. मुसलमानी अंमल सुरू झाला व वैदिक धर्माला महाराष्ट्रांत मोठें ग्रहण लागलें. अशा वेळीं ज्ञानराजांनंतर तीनशें वर्षांनीं नाथांचा अवतार झाला. ते स्वतःच म्हणतात :–

**जैं धर्माची वाट मोडे । अधर्माची शीग चढे ।**
**तैं आम्हां येणें घडे । युगायुगीं ॥**

वैदिक धर्म व वैदिक संस्कृति यांचें रक्षण करण्याकरितां ज्ञानराजांनीं देववाणींतील गीतेचें तात्पर्य सर्वांना सुलभ अशा देशी भाषेंत मांडलें. ज्ञानराजांचेंच हें कार्य नाथांनीं पुढें चालविलें. म्हणून 'ज्ञानाचा एका व नाम्याचा तुका' अशी म्हण पडली आहे.

श्रीमद्भागवताचे बारा स्कंध आहेत. त्यांतील एकादशस्कंध हा नाथांनीं आपल्या टीकेकरितां निवडला. कारण, भगवद्गीता ही ज्याप्रमाणें 'श्रीरंग अर्जुनेसी संवादला' असा भारतांतील भाग आहे व म्हणून ज्ञानराजांनीं तो आपल्या टीकेकरितां निवडला; तसेंच एकादशस्कंध हा, पहिले कांहीं थोडे अध्याय सोडून दिले तर जो 'श्रीरंग उद्धवासी संवादला' असाच आहे. व नाथांच्या भाषेंत सांगावयाचें तर अर्जुन हा भगवंताचे तरुणपणांतील अपत्य तर उद्धव हा वयसेच्या शेवटच्या अवस्थेंतील अपत्य. यामुळें श्रीकृष्णउद्धव संवादाला अधिकच गोडी आलेली आहे व म्हणून नाथांनीं तो निवडला आहे.

महाराष्ट्राच्या बदलत्या परिस्थितींत नाथांनीं वैदिक धर्माच्या रक्षणाचें कार्य

कीर्तन, पुराण व ग्रंथलेखन इत्यादि विविध प्रकारानें केलें. नाथांच्या वेळच्या परिस्थितीचें स्वरूप त्यांचीच एक ओवी देऊन सांगतां येण्याजोगें आहे.

ते म्हणतात :—

**ज्याचें देह पराधीन । तो जीवें जितां सदा दीन ।**
**पराधीना समाधान । नव्हे जाण कल्पान्तीं ॥** ११-५६६

नाथांनीं मुसलमानांच्या कडव्या अंमलांत पैठणसारख्या क्षेत्रांत राहून वैदिक धर्म व संस्कृति यांचें संरक्षण केलें हें त्यांचें मोठें कार्य आहे. परंतु प्रस्तुत लेखाचा तो विषय नसल्यानें त्यांनीं अशा बिकट प्रसंगीं धर्मरक्षण केलें व भागवतधर्माचा फड जगवला या त्यांच्या कार्याचें तुकोबांनीं पुढीलप्रमाणें जें वर्णन केलें आहे तेवढें नमूद करून पुढें जाणें अवश्य आहे.

**ब्राह्मणाचा पोर एक खेळिया भला । तेणें जन खेळकर केला रे ।**
**जनार्दन बसवंत करूनियां तेणें । वैष्णवांचा मेळा मेळविला रे ।**
**एकाचि घाई खेळतां खेळतो । आपणचि बसवंत जाला रे ॥**

आतांपर्यंत जें ‘ भागवत ’ नाथांनीं श्रुत केलें त्याची महती सांगितली. हेतु असा कीं नाथांनीं जी निवड केली तिचें महात्म्य वाचकांच्या लक्षांत यावें. आतां तुलनेकडे वळूं.

तुलनेकरितां आपण जिचें अनुकरण केलें आहे असें नाथांनीं स्वतःच भागवताच्या शेवटीं सांगितलें आहे ती श्रीधरस्वामींची संस्कृतांतील ‘ भावार्थदीपिका ’ ही एक टीका घेतली आहे. नाथ महाराज मोठ्या विनयानें या टीकेबाबत पुढीलप्रमाणें उद्गार काढतात :—

**त्या समर्थांचिये पंक्ती । भावार्थदीपिका धरोनि हातीं ।**
**श्रीधरें दावितां पदपदार्थीं । निजात्मस्थिति निवाला ॥**
**जेथ देशभाषापदपक्षेंसीं । एकाजनार्दनकृपेची माशी ।**
**तृप्त होय अवघ्यांसरिशी । निषेध तिशीं असेना ॥**
**एका जनार्दनी मांजर वेडें । भावार्थदीपिकाउजियेडें ।**
**हे रस देखोनि चोखडे । ताटापुढें पैं आलें ॥**

**मीयों मीयों करितां स्मरण । कृपेनें तुष्टलें सज्जन ।**
**शेष प्रसाद देऊनि आपण । संतृप्त पूर्ण मज केलें ॥**

अ. ३१– ४४८ ते ४५१

येथें एका गोष्टीकडे वाचकांचें लक्ष वेधणें अवश्य आहे. कित्येक लेखकांनीं ‘ भावार्थदीपिका ’ या नांवावरून नाथांनीं ज्ञानेश्वरीच अनुसरली असा अर्थ केला आहे. कारण, जरी स्वतः ज्ञानदेवांनीं तसें कोठेंच म्हटलें नाहीं तरी ज्ञानेश्वरीस कांहीं लोक ‘भावार्थदीपिका’ म्हणतात. नाथांच्या भागवतावर ज्ञानेश्वरीचा मोठा परिणाम झाला आहे ही गोष्ट सर्वमान्य आहे. पण याचा अर्थ भागवतांतील श्लोकांचा अर्थ अथवा भागवताचें तात्पर्य काढतांना त्यांनीं ज्ञानेश्वरी अनुसरली असा करणें योग्य होणार नाहीं. कारण, ज्ञानेश्वरांनीं भागवतावर कांहीं लिहिलेंच नाहीं.

तुलनेकरितां भावार्थदीपिकेच्या जोडीला संस्कृतांतील आणखी तीन टीका घेतल्या आहेत. एक, श्रीधरस्वामींच्या टीकेवरील श्रीराधारमणदासगोस्वामिकृत ‘ दीपिकादीपिनी ’ टिप्पणी. या दोन्ही अद्वैती टीका आहेत. यांच्या जोडीला चैतन्यसंप्रदायी श्रीमद्विश्वनाथचक्रवर्तिकृत ‘ सारार्थदर्शिनी ’ व श्रीरामानुजसंप्रदायी श्रीमद्वीरराघवाचार्यकृत ‘ भागवतचन्द्रचन्द्रिका ’ ह्या द्वैती टीका नमुना म्हणून घेतल्या आहेत.

मराठी टीकांपैकीं फक्त कवीश्वर भास्करभट्ट महानुभवकृत ‘ उद्धवगीता अथवा एकादशस्कंध ’ एवढीच टीका घेतली आहे.

इतकें प्रास्ताविक सांगितल्यानंतर आतां भागवतांतील मूळ श्लोक, त्यावरील संस्कृत प्राकृत टीका व त्यावरील नाथांच्या ओव्या या क्रमानें पुढें देत आहोंत. यायोगें वाचकांनाच स्वतः तुलना करतां येईल. तुलनेकरितां एकादशस्कंधामधील तीन प्रसंग घेतले आहेत. ते पुढील प्रमाणें :–

## प्रसंग पहिला

प्रथम, एकादशस्कंध अध्याय पहिल्यामधील आरंभीचाच प्रसंग म्हणून घेतला आहे. येवढ्याच्या विचारानेंसुद्धां नाथांची खोल बुद्धि, वाचकांस विषय समजावा या विषयींची त्यांची तळमळ, त्यांचा अभ्यास इत्यादिवर चांगला प्रकाश पडेल.

प्रसंग असा आहे कीं ऋषीश्वरांनीं सांबादि यादवांना शाप दिल्यावर त्यांनीं काय केलें व त्यांची काय स्थिति झाली ह्या प्रसंगाचें भागवतकारांनीं केलेलें पुढीलप्रमाणें वर्णन :–

( १ ) **मूळ श्लोक** :–

**किं कृतं मन्दभाग्यैर्नः किं वदिष्यन्ति नो जनाः ।**
**इति विह्वलिता गेहानादाय मुसलं ययुः ॥ १८ ॥**
**तच्चोपनीय सदसि परिम्लानमुखश्रियः ।**
**राज्ञ आवेदयांचक्रुः सर्वयादवसन्निधौ ॥ १९ ॥**
**श्रुत्वाऽमोघं विप्रशापं दृष्ट्वा च मुसलं नृप ।**
**विस्मिता भयसंत्रस्ता बभूवुर्द्वारकौकसः ॥ २० ॥**

( अ ) येथें महत्त्वाचा प्रश्न उत्पन्न होतो कीं श्रीकृष्णासारखा त्राता जवळ असतांना त्याला ही गोष्ट न सांगतां यादवतरूणांनीं ती उग्रसेन राजास कां सांगितली व त्यानेंहि कृष्णास न कळवतां मुसळाचें चूर्ण करून तें समुद्रांत फेकून देण्याची आज्ञा कां केली? वास्तविक नेहमीप्रमाणें या बाबतींतहि श्रीकृष्णाचा सल्ला घेणें अवश्य होतें.

याबाबत संस्कृत टीकाकार काय म्हणतात तें पहा :–

( २ ) श्रीधरस्वामीकृत **भावार्थदीपिका** :–

**राज्ञे उग्रसेनाय न तु श्रीकृष्णाय ॥ १९ ॥**

( ३ ) भावार्थदीपिकेवरील श्रीराधारमणगोस्वामिकृत **दीपिकादीपिनी** :–

**उग्रसेनायेत्यपि श्रीकृष्णेच्छयैव ॥ १९ ॥**

( ४ ) श्रीमद्विश्वनाथचक्रवर्तिकृत **सारार्थदर्शिनी** :–

**राज्ञे उग्रसेनायैव न तु श्रीकृष्णाय लज्जाभयाभ्यामितिभावः ॥१९॥**

( ५ ) **नाथभागवत** :–

**ऐक राया परिक्षिती । सबळ भविष्याची गती ।**
**वृत्तांतु श्रीकृष्णा न सांगती । विचार आपमतीं तिहीं केला ॥**

नाथभागवत १-३८०

श्रीधरस्वामी ‘ उग्रसेनाला सांगितलें, कृष्णास नव्हे ’ येवढेंच म्हणतात. दुसरे दोन टीकाकार ‘ श्रीकृष्णाच्याच इच्छेनें व लज्जाभीती यामुळें ’ अशीं अनुक्रमें कारणें देतात. तर नाथ म्हणतात ‘भविष्य अटळ आहे.’ यांपैकीं तात्त्विकदृष्ट्या कोणतें श्रेष्ठ तें वाचकांनींच ठरवावें.

( **आ** ) या बाबतींत आणखी पुढें दुसरा प्रश्न उत्पन्न होतो कीं यादव मूढमति. म्हणून त्यांनीं श्रीकृष्णाला कळवलें नाहीं. पण श्रीकृष्ण तर सर्वज्ञ होता ना! मग जें कूळ आपण रक्षिलें त्याची काळजी त्याला नसावी का? त्याला हें भविष्य कळलें नव्हते का? हें अशक्य. कारण, तो सर्वज्ञ. मग कळून श्रीकृष्णानें हें कसें घडूं दिलें? आपला कुलक्षय त्यानें कसा होऊं दिला?

याचें उत्तर याच्यापुढें भागवतकार देतात :—

( १ ) **मूळ श्लोक** :—

**भगवान् ज्ञातसर्वार्थः ईश्वरोऽपि तदन्यथा**
**कर्तुं नैच्छद् विप्रशापं कालरूप्यन्वमोदत** ॥ २४ ॥

( २ ) **भावार्थदीपिका** :—

**ज्ञाताः सर्वेऽर्था येन स ईश्वरोऽपि समर्थोऽपि सन्**
**अन्यथा कर्तुं नैच्छत् । किन्त्वन्वमोदत यतः कालरूपी** ॥

( ३ ) **भागवतचंद्रचंद्रिका** :—

······**समर्थोऽपि तदन्यथा कर्तुं नैच्छत किन्तु कालरूपी हेतुगर्भमिदं कालरूपेण संहर्तुं कृतसंकल्पत्वादन्वमोदत** ॥

( ४ ) **नाथभागवत** :—

**कोणी न सांगतां हें पेखणें । जाणीतलें सर्वज्ञें श्रीकृष्णें ।**
**परी द्विजशापु अन्यथा करणें । हें निजमनें स्पर्शेना ॥**
**म्हणाल हें नव्हेल त्यासी । पालटवेना द्विजशापासी ।**
**जो निमाल्या आणी गुरुपुत्रासी । कृष्ण कळिकाळासी नियंता ॥**
**पाडूनि कळिकाळाचे दांत । देवकीचे गतगर्भ आणित ।**
**ईश्वरा ईश्वरू श्रीकृष्णनाथ । जाणे सर्वार्थ निजसिद्धी ॥**

निद्रा न मोडितां तिळभरी । मथुरा आणिली द्वारकेभीतरी ।
श्रीकृष्ण काय एक न करी । तोही ममता न धरी कुळाची ॥
निजकुळक्षयो जऱ्ही आला । तऱ्ही अन्यथा न करी ब्राह्मणबोला ।
ब्राह्मणें पांपरा जरी हाणीतला । तो हृदयीं धरिला पदांकू ॥
तोंचि श्रीवत्सलांछन । सकळ भूषणां भूषण ।
हृदयीं मिरवी श्रीकृष्ण । यालागीं पूर्ण ब्रह्मण्यदेवो ॥
श्रीकृष्ण शिरीं वंदी ब्राह्मण । अन्यथा न करी ब्राह्मणवचन ।
यालागीं ब्रह्मण्यदेवो पूर्ण । वेद वंदिजन वर्णिती ॥
ब्राह्मणरूप स्वयें श्रीहरी । यालागीं ब्राह्मणांचा कैवारी ।
कुळक्षयो जाहला जरी । तरी द्विजांवरी क्षोभेना ॥
ऐकोनि ब्राह्मणांचा शापू । न धरी मोहाचा खटाटोपू ।
म्हणे सिद्धी गेला कृतसंकल्पू । कुळक्षयानुरूपू संतोषे ॥
यापरी श्रीगोविंदु । काळरूपी मानी आनंदु ।
कुळक्षयाचा क्षितिबाधु । अल्पहि संबंधू धरीना ॥
पूर्ण संतोष श्रीकृष्णनाथा । ............ अ. ३८७-९७

**उद्धवगीता :–**

ब्रह्मशापानें मुसळाची निर्मिति होऊन त्यायोगें यदुकुळाचा नाश झाला. ही कथा थोडक्यांत कवीश्वर भास्करभट्ट यांनीं प्रकरण १३ व १४ यांत सांगितली आहे. त्यांतील कांहीं भाग पुढें दिला आहे.

मूळांत श्रीकृष्णभगवान् ईश्वर असूनहि '**तदन्यथा कर्तुनैच्छद् विप्रशापम्**' असे शब्द आहेत. ह्या शब्दांतून भगवंताचा ब्राह्मणांविषयींचा आदरच व्यक्त होत आहे. टीकाकारानें तो आदर कायम ठेवून '**कालरूप्यन्वमोदत**' याचें व्याख्यान करणें अवश्य आहे. या बाबतींत महानुभवीय टीकाकार व नाथ यांच्या लिखाणाची तुलना करावी म्हणजे व्यासांचें हृद्गत खरें कोण व्यक्त करतो याची वाचकांना कल्पना येईल.

## प्रकरण १३

परमेश्वरा निजधामा बीजें करावयाची वृत्ति. आन पुढिल वेव्हाणि

ऐसें मोक्षाचें करूनि आवारूं : कृतकार्यों जाला ईश्वरू
मग निजधामा मेलिकारू : चिंतिता जाला ५२
माघौतें सींहावलोकनें : पाहिलें दैत्यसूदनें
तवं यदुवंशाचीं वेळुवनें : वनवावीं असति ५३
तेव्हळि ब्राह्मणाचेनि शापानळें : यादव-वन वनविलें
मग नेणतयाचेया ऐसें बोलिलें : सभेमाजि ५४
" यथ उपाओ नाहीं ऐसा : जेणें चुके ब्राह्मणाचा शापु धारसा
म्हणौनि जाईजैल प्रभासा : आवघां जनीं ५५
तेथ तुम्हां पुण्य घडे : तरि चुकति आवघेचि अवघडे
तेथचें फळ दाविजैल रोकडें : हातावरि ५६
ऐसें बोलौनि गोपाळें : यादवां करवि पालानविले
मग देव्हार चौकिये बीजें केलें : उद्धवदेवेंसीं ५७ "

## प्रकरण १४

उद्धवदेवीं देवाचीं वृत्ति जाणितली.

तेथ म्हणे उद्धवदेवो : " जि ! हें आवघेचि वाओ
देवाचा बोलता भाओ : कव्हणा वोळखवेना ५८
काईसें ब्राह्मणु ? काईसा शापु ? : हा आवघा तवंचि आटोपु
जवं तुं न करीसि कोपु : या ब्रह्मकुळावरि ५९
तुं दृष्टि करीसि वांकुडी : तरि येवढीये सृष्टीची होये राखौंडी
तेथ ब्राह्मणाची काइसी प्रौढी : तुजपुढें ? ६०
पुण तुजाचि हे ईच्छा जाली : जें यदुवंशवेलिचां मुळीं
घालावी इंगळी : ब्रह्मशापाची ६१
चौतोंडा ब्राह्मणु आला : तो नेणों काई आळोंचुनि गेला
तेव्हळिचि मि धाकिनलां : मनामाजि ६२
जेथ काळा वारिजति दारवठे : तिये गांवीं काईसीं अरीष्टें ?
ये ब्रह्मसुखाचिये पेंठे : उपताप काईसे ? ६३
पुन हें आवघें विचारितां : ऐसें येत असे माझेया चित्ता
जें गोसांवी निजधामा आतां : बिजें करीति ६४ "

## प्रसंग दुसरा

( १ ) मूळ श्लोक :–

अप्युद्धव त्वया ब्रह्म सखे समवधारितम् ।
अपि ते विगतो मोहः शोकश्चासौ मनोभवः ।। अ. २९-२९

( २ ) भावार्थदीपिका :–

' सम्यग्ज्ञानानुपत्तौ पुनःउपदेक्ष्यामि ' इति आशयेन पृच्छति ' अपि ' इति । अपि किं ।। २९ ।।

( २ ) दीपिकादीपिनी :–

...पुनरुपदेक्ष्यामीति करुणाव्यग्रताभिव्यञ्जिता मोहो मायिकलीला-दर्शनजो भ्रमः शोकः पुनर्मद्प्राप्तिजं दुःखम् ।। २९ ।।

( ३ ) भागवतचन्द्रचन्द्रिका :–

...पुनरुपदेक्ष्यामीति भावः एवमग्रे मोहः देहात्मभ्रमः स्वतंत्रात्म-भ्रमादिरूपो मनोभवो मनसि भवः शोकस्तापत्रयजन्यः ज्ञानाभाव-प्रयुक्तश्च ।। २९ ।।

( ४ ) सारार्थदर्शिनी :–

...नित्यसिद्धस्य निस्त्रैगुण्यस्यापि उद्धवस्य ज्ञानादि ग्राहणार्थं स्वशक्त्यैव मोहमुत्पाद्य ज्ञानाद्युपदेशेन पुनस्तं निराकृत्य लीलया पृच्छति । अपीति ।। २९ ।।

( ५ ) उद्धवगीता :–

### प्रकरण १०८

मागील सकळ निरोपणाचा महिमा ' तुझा संदेह फिटला ( कीं ) नाहीं ' ऐसा प्रश्न :–

हें सार सकळ शास्त्रांचें : रहस्य सर्व धर्मांचें
जिह्वार कैवल्याचें : निरूपण हें ८१४
तुझेया हृदय-पथा : हे आली निरूपण-कथा
किं कांहीं असे संदेह- व्यथा : मनामाजि ? ८१५

( ६ ) नाथभागवत :–

उद्धवा तुझें देखोनि प्रेम । गुह्य ज्ञान अतिउत्तम ।
तुज म्यां निरूपिलें परब्रह्म । सांग सुगम अतिशुद्ध ॥
हें ज्ञानाचें सोलींव ज्ञान । हें वेदांचें विसावतें स्थान ।
हेंचि अविद्येची बोळवण । समाधान जिवाशिवां ॥
ऐसें हें जें गुह्य ज्ञान । मनबुद्धिवाचेसी अगम्य जाण ।
तें म्यां तुज केलें निरूपण । श्रद्धा संपूर्ण देखोनी ॥
जेवीं सखा सख्याप्रती । आपुली वोपी निजसंपत्ती ।
तेवीं म्यां हे ब्रह्मस्थिती । तुझ्या हातीं वोपिली ॥
जैसें दिधलें श्रवणाच्या हातीं । तैसें प्रविष्ट जाहलें तुझिया चित्तीं ।
कीं माझारीं पडली कांहीं गुंती । विकल्पवस्ती विक्षेप ॥
म्यां निरूपिलें सार परम । तें तुज कळलें परब्रह्म ।
नसेल तरी हाचि उपक्रम । पुढती सुगम सांगेन ॥
चैतन्य ठसावोनि चित्तीं । जेथ आकळिली ब्रह्मस्थिती ।
तेथ मोहममतेची वस्ती । समूळ निश्चितीं नसावी ॥
आकळलें ब्रह्मज्ञान । त्याची हेचि वोळखण ।
संकल्पविकल्पाविंदान । पुढती जाण उपजेना ॥
उपजेना मीतूंपण । उपजेना ध्येय ध्याता ध्यान ।
नुपजे त्यासी कर्मठपण । ब्रह्म परिपूर्ण जाणितल्या ॥
जेणें जाणितलें ब्रह्मज्ञान । त्यासी बाधीना कर्मबंधन ।
कर्माचें जें कर्माचरण । तें जाण आपण मायिक ॥
जेवीं छाया चळे पुरुषाचेनि । परी तियेचा लोभ पुरुष न मानी ।
तेवीं काया चाळी ब्रह्मज्ञानी । देहाभिमानी तो नव्हे ॥
जेवीं सूर्यापुढें आंधार । अर्धक्षण न धरी धीर ।
तेवीं ब्रह्मज्ञानीं कर्मादर । अणुमात्र उरेना ॥
कर्माचें जें कर्मबंधन । तो मनोजन्य संकल्प जाण ।
जेथें मनाचें मोडे मनपण । तेथें कर्माचरण निर्बीज ॥
वस्तु नित्य निर्विकल्प । तेथें नाहीं संकल्पविकल्प ।
हें परब्रह्माचें निजस्वरूप । हेंचि रूप स्वानुभवासी ॥

ऐसें ब्रह्म पावल्या स्वयमेवो । मी एक उद्धव होतों पहा हो ।
त्या उद्धवपणासी नाहीं ठावो । मा शोकमोहो तेथ कैंचा ॥
उद्धवपणाचिये वस्ती । शोकमोहांची उत्पत्ती ।
तें उद्धवपण नाठवे चित्तीं । जरी ब्रह्मप्राप्ती तुज जाहली ॥

नाथभागवत ४७० ते ४८५

( ५ ) उद्धवगीता :-

प्रकरण १०९

उद्धवदेवीं भणितलें " देवा ! तूं निरोपिता : माझा संदेह फिटला : तूं सांगसी तें करीन. "

तवं म्हणे उद्धवदेवो : जि ! तुं निरूपिता सर्वज्ञराओ
तेथ संदेहा वाओ : केवि होईल ? ८१६
तुझेनि वाचा-सुधाकरें : फिटे अज्ञानांचें आंधारें
म्हणौनि तुझें वचन सर्व प्रकारें : मज करणें आति ८१७

एकोणतिसाव्या श्लोकांत नसलेला भाग भास्करभट्टकवींनीं येथें मांडला. नाथांनींहि मांडला आहे. त्या दोघांची तुलना करतां यावी म्हणून थोडा लांब असूनहि पण महत्त्वाचा नाथभागवतांतील उतारा पुढें देत आहोंत. नाथांनीं उद्धवाचें व भगवंताचें कसें वर्णन केलें आहे, गुरुशिष्य नात्यांतील वेगवेगळ्या छटा या निमित्तानें कशा दाखवल्या आहेत त्या बघण्यासारख्या आहेत. नाथांच्या योग्यतेसंबंधीं वेगळें लिहिण्याचें कारणच नाहीं. हा उतारा वाचूनच कल्पना येईल.

( ६ ) नाथभागवत :-

ऐसें ऐकतां देवाचें वचन । उडालें उद्धवाचें उद्धवपण ।
जाहला स्वानंदीं निमग्न । बोलतेपण बुडालें ॥
पावतां आपुली निजात्मता । उडाली उद्धवत्वाची अवस्था ।
बुडाली स्वदेहअहंता । निजनिमग्नता स्वानंदीं ॥
तेथें देवें पुशिला जो प्रश्न । त्याचें कोण दे प्रतिवचन ।
कृष्णेसहित उद्धवपण । गिळोनी परिपूर्ण वस्तु जाहला ॥

देखोनी उद्धवाची अवस्था । हा ब्रह्म पावला निजात्मता ।
हें कळों सरलें श्रीकृष्णनाथा । हृदयस्था काय न कळे ॥
शिष्य साचार अनुभव लाहे । तेणें सद्गुरु सुखाचा मेरु होये ।
जेवीं तानयाचें धणीं माये । सुखावली राहे स्वानंदें ॥
सेवक विभांडितां परचक्र । तेणें रायासी संतोष थोर ।
गुढी उभारूनि साचार । करीं निजगजर स्वानंदें ॥
तानयाचे लळे पुरविणें । हें व्यालीची वेदना व्याली जाणे ।
कां शिष्यासी स्वानुभव देणें । हें स्वयें जाणे सद्गुरु ॥
निजपुत्रें लाधल्या निधान । पिता संतोषें आपण ।
तेवीं उद्धवाचेनि अनुभवें जाण । स्वयें श्रीकृष्ण संतोषे ॥
कृष्णसुखें सुखरूप नित्यतां । तो हा शिष्यानुभवें सर्वथा ।
लाहे सुखाची परमावस्था । हे गुरुगम्यता अगम्य ॥
शिष्यासी बोध करितां । गुरुसि नसती सुखावस्था ।
तरी उपदेशपरंपरता । नव्हती तत्त्वतां इये लोकीं ॥
गुरु सांगे जैं उबगलेसाठीं । तैं ते शिष्यासी बोधेना गोष्टी ।
मा निजानुभवाची भेटी । केवीं निजदृष्टीं देखेल ॥
जेवीं बाळासी लेणें लेववितां । तें नेणें परी सुखावे माता ।
तेवीं शिष्यासी अनुभव होतां । सुखावे तत्त्वतां सद्गुरुरावो ॥
तैसा उद्धवाचा ब्रह्मभावो । देखोनि सुखावे कृष्णदेवो ।
माझा उद्धव जाहला निःसंदेहो । यासी ब्रह्मानुभवो आकळिला ॥
उद्धवाची ब्रह्मनिष्ठता । अनुभवा आली निजात्मता ।
हें कळों सरलें श्रीकृष्णनाथा । परोपदेशार्थो शिकवीत ॥
तूं पावल्या ब्रह्मज्ञान । तेथ शिष्योपदेशलक्षण ।
पात्रशुद्धीचें कारण । तेही वोळखण हरि सांगे ॥

नाथभागवत ४८६ ते ५००

## प्रसंग तिसरा

मूळ श्लोक :–

नैतत्त्वया दांभिकाय नास्तिकाय शठाय च ।
अशुश्रूषोरभक्ताय दुर्विनीताय दीयताम् ॥ अ. २९-३०

एतैर्दोषैर्विहिनाय ब्रह्मण्याय प्रियाय च ।
साधवे शुचये ब्रूयाद्भक्तिः स्यात् शूद्रयोषिताम् ॥ अ. २९-३१

( १ ) भावार्थदीपिका :–

उपधारितं आकलय्य आह- 'न एतत् इति' शठाय वंचकाय ॥३०॥
शूद्राणां योषितां च यदि भक्तिःस्यात् तर्हि ब्रूयात् ॥ ३१ ॥

( २ ) दीपिकादीपिनी :–

यादिभक्तिः स्यात् तर्हि शूद्रयोषिद्भ्योऽपीत्यर्थः ।
इति सर्वेषां अधिकारित्वं दर्शितम् ॥ ३१ ॥

उद्धवगीता :–

प्रकरण ११०

तवं श्रीकृष्णरावो भणे "अयोग्यासीं हें नेदावें."

तवं श्रीकृष्णराओ म्हणे "उद्धवदेवा : हा ज्ञानरत्नाचा ठेवा
भलतेयांहातीं नेदावा : अधिकारेंविण ८१८
हें निरूपण न संगावें नास्तिकां : न बोलावें दांभिकां
आइकों नेदावें निंदकां : विशेषतां ८१९

प्रकरण १११

"योग्यासी शास्त्र नीरोपावे."

माझेया शरणागतां : निरूपावें भागवतां
मुमुक्षु विरक्तां : बहुत करूनि ८२०

उद्धवगीतेंतील प्रकरण १११ मधील ८२१ व ८२२ या ओव्या पुढील 'नैतद्विज्ञाय' या श्लोकाचा अर्थ व्यक्त करणाऱ्या आहेत. यामुळें त्या येथें उद्धृत केल्या नाहींत.

श्लोकांत 'शूद्रयोषिताम्' असा स्पष्ट उल्लेख असूनसुद्धां भास्करभट्टकवींच्या व्याख्यानांत त्याचा उल्लेख नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. परंतु उल्लेख नसण्याचें कारण सहज सांगतां येण्यासारखें आहे. महानुभावीयांच्या शास्त्रांत

पुरुष व स्त्रिया या सर्वांना नुसता उपदेशच नव्हे तर संन्यासदीक्षाहि विहित आहे. खुद्द भास्करभट्टकवींनीं उद्धवगीतेच्या शेवटीं ' प्रकरण पाहून भक्तिज्ञानवैराग्यलक्षण ' वेचलें असें दिग्दर्शित केलें आहे. पण ही निवड करतांना महानुभावीयांच्या सिद्धान्तास बाध येईल अशी निवड होणें कठिण हें चाणाक्ष वाचकांस सांगावयास पाहिजे असें नाहीं व म्हणूनच ' शूद्रयोषिताम् ' याचा विचार गाळला आहे.

आतां या श्लोकावरच्या नाथांच्या ओव्या पुढें देतों म्हणजे नाथांनीं ' भागवत श्रुत ' केलें याचा अर्थ आपल्या हृदयावर उमटेल.

स्त्रीशूद्रांना ब्रह्मज्ञानाचा उपदेश कोणी करावा व कसा करावा याचा विचार नाथांनीं या स्थळीं जितका केला आहे तितका खोल व व्यापक विचार इतरत्र क्वचितच् वाचावयास मिळेल. शिवाय, हे उतारे नाथांच्या थोर अंतःकरणाचें दर्शन करून देणारे असल्यानें ते जरी थोडे लांब आहेत तरी देत आहोंत.

**जे कां द्विजन्म्यांहूनि बाहेरी । वेदें वाळूनि सांडिलें दूरीं ।**
**जे कां मंत्रार्थी अमंत्री । जे अनधिकारी श्रवणासी ।।**
**ज्यांसी नाहीं आश्रमधर्म । ज्यांसी नाहीं श्रौतकर्म ।**
**ज्यांसी नाहीं जपहोम । जे वर्णाधम अतिनीच ।।**
**ऐसे जे कां शूद्रजन । ऐकोनि ये ग्रंथींचें ज्ञान ।**
**निवाराया जन्ममरण । उपजे दारुण विरक्ती ।।**
**उखितांच एकसरें चित्तें । मनींहुनि विटे विषयांतें ।**
**मग चित्तें वित्तें जीवितें । रिघे सद्गुरूतें अनन्यशरण ।।**
**गुरूसी पुसों नेणे प्रश्न । म्हणे निवारीं जन्ममरण ।**
**भावार्थें घाली लोटांगण । शुद्ध श्रद्धा संपूर्ण परमार्थीं ।।**
**ते होत कां शूद्रजन । त्यांसी उपदेशितां ब्रह्मज्ञान ।**
**उद्धवा कदा न लागे दूषण । हें सत्यवचन पैं माझें ।।**
**जे कां अपेक्षोनियां वित्त । चतुर्वर्णां उपदेशित ।**
**ते धनलोभें लोलुप एथ । नाहीं घेइजत गुरुत्वें ।।**
**जेथ गुरूशींच सलोभता । तेथ शिष्याची बुडे विरक्तता ।**
**ऐशिये ठायीं उपदेश घेतां । परमार्थतां अपघातु ।।**

निर्लोभत्वें कृपेनें पूर्ण । सद्‌गुरु उपदेशी शूद्रजन ।
ऐसेनि करी जो दीनोद्धरण । तेथ नलगे दूषण उपदेशा ॥

नाथभागवत ५५५ ते ५६३

* * *

जेणें तडफडूनि जाण । वैराग्याशी ये मरण ।
जेणें ज्ञात्यासी लागे दूषण । तो स्त्रीसंग आपण न करावा ॥
स्त्री देखतांचि अवचितीं । तत्काल पाडी अधःपातीं ।
तिची जाहलिया संगती । कैंची धडगती सज्ञाना ॥
प्रमादीं पाडी सर्वार्थीं । हे प्रमदा नामाची निजख्याती ।
तिची जाहलिया नित्य संगती । केवीं परमार्थी तरतील ॥

* * *

उद्धवा तुज हेंचि मागतों जाण । नको स्त्रियांशीं संभाषण ।
नको स्त्रियांचें अवलोकन । नको स्त्रीवचन कानीं घेऊं ॥

नाथभागवत ५६४ ते ५६८

* * *

स्वभावें सात्त्विक वनिता । गोष्टी सांगों आली परमार्था ।
तोचि विकल्प तत्त्वतां । सुहृदां समस्तां परिकल्पे ॥
यालागीं प्रमदाजन । सर्वथा त्यागावा आपण ।
प्रमदासंगतीं ब्रह्मज्ञान । सर्वथा जाण वाढेना ॥
उपदेशीं त्याज्य स्त्रिया जरी । तरी मागिलीं थोरथोरीं ।
उपदेशिल्या कैशापरी । तें एक निर्धारीं सांगेन ॥
श्रेष्ठ याज्ञवल्क्य पाहीं । तेणें उपनिषदांच्या ठायीं ।
उपदेशिली मैत्रेयी । नाना युक्ती पाहीं प्रबोधुनि ॥
स्वयें नारद महामुनी । प्रल्हादाची निजजननी ।
इंद्रापासूनि सोडवूनि । ब्रह्मज्ञानीं उपदेशी ॥
अवतरोनि कपिलमुनी । बैसोनियां सिद्धासनीं ।
देवहूतीलागोनी । ब्रह्मज्ञानीं प्रबोधी ॥
जो योगियांचा मुकुटमणी । कैलासपति शूळपाणी ।
भव उपदेशी भवानी । ब्रह्मज्ञानीं निजबोधें ॥

इतरांची गोठी कायशी । तुवांचि गा हृशीकेशी ।
उपदेशिलें यज्ञपत्न्यांसी । ऐसें म्हणसी उद्धवा ।।
ऐसा देखोनियां सद्‌भावा । उपदेश करूं म्हणशीं कणवा ।
तरी तो अधिकार ओळखावा । ऐक उद्धवा सांगेन ।।

नाथभागवत ५७१ ते ५७९

*　　　*　　　*

ऐक उद्धवा निश्चित । वाचाळ स्त्री ते अनुचित ।
तेथें उपदेश करणें तें व्यर्थ । लागे अपघात गुरुत्वा ।।
तेथें स्त्रीस अति बडबड । ब्रह्मज्ञानें गर्जे तोंड ।
जेथें विषयाचा धुमाड । परमार्थ गोड परपुरुषीं ।।
जे स्त्री ब्रह्मज्ञानीं धीट । मुखीं अत्यन्त वटवट ।
तिसीं उपदेश करूं नये स्पष्ट । अपवादाचें बोट जेणें लागे ।।
तेथें म्यांही केली विनंति । श्रीजनार्दनस्वामीप्रति ।
स्त्रिया शूद्र उपदेशार्थ येतीं । काय निश्चितीं सांगावें ।।
गुरुवेगळा मार्ग नाहीं । म्हणोनि येती लवलाही ।
त्यांसी उपदेशावें काई । हें माझ्या हृदयीं स्मरेना ।।
हें ऐकोनियां वचन । संतोषले श्रीजनार्दन ।
जेणें होय चित्ताचें शोधन । तें नाम जाण उपदेशी ।।
चित्त शुद्धि झालिया जाण । वोरसोनि येतें आपण ।
अनन्यभावें मग शरण । आल्या ज्ञान उपदेशी ।।
स्त्रीपुरुष–अवलोकन । जयाचे दृष्टीं समसमान ।
ऐसेनि अनुभवें जो परिपूर्ण । तोचि स्त्रियांसी जाण उपदेशी ।।
तोही अधिकार न पाहतां । उपदेश न करीं सर्वथा ।
त्याही उपदेशाची कथा । ऐक तत्त्वतां सांगेन ।।
म्यां ज्या कां निंदिल्या वनिता । त्यामाजीं सभाग्या सात्त्विकता,
सांडोनियां विषयावस्था । जे परमार्थी उद्यत ।।
त्यजुनियां प्रपंचाची हाव । नावडे विषयाचें नांव ।
वैराग्यें उठला सद्‌भाव । घेऊनि धांव परमार्थीं ।।

अतिथि आणि पतिपुत्रांसी । भोजनीं समता नित्य जिसी ।
धनलोभ नाहीं मानसीं । परमार्थी तिसी अधिकारु ॥
जन्ममरणनिवारणीं । जीवामनाची नित्य काचणी ।
माझे भवपाशच्छेदनीं । धर्मदाता कोणी मिळता कां ॥
सद्गुरुप्राप्तीची अतिआर्त । काया वाचा चित्त जीवित ।
कुरवंडी करुनि सांडित । परमार्थार्थ सद्भावें ॥
यापरी निजपरमार्था । सद्भावें जे विनटे वनिता ।
उद्धवा तिसी हे उपदेशितां । दोष सर्वथा लागेना ॥
क्षत्रिय वैश्य स्त्री शूद्रजन । यांची सच्छ्रद्धा दृढ पाहून ।
उपदेशितां ब्रह्मज्ञान । दोष निर्दळण शिष्याचे ॥
उपदेशितां ब्रह्मज्ञान । जैं गुरुसीच लागे दूषण ।
तैं शिष्यासी उद्धरी कोण । हें व्याख्यान अबद्ध ॥
पहावया पात्रशुद्धता । मी बोलिलों दोषवार्ता ।
वांचूनि ब्रह्मज्ञान उपदेशितां । दोष सर्वथा असेना ॥
हें ज्ञान जाणितल्या पाठीं । जाणणेंचि सरे सृष्टीं ।
संसारासी पडे तुटी । तेथ दोषाची गोठी असेना ॥

नाथभागवत ५८० ते ५९८

वर नमुन्याकरितां म्हणून जे प्रसंग दिले आहेत त्यांवरून वाचकांना श्रीएकनाथांनीं 'भागवत श्रुत केलें' हें जें तुकोबांनीं त्यांचें वर्णन केलें तें किती यथार्थ आहे याची कल्पना येईल.

संस्कृतांत कां होईना पण भागवताचा अर्थ स्पष्ट करण्याकरितां श्रीधरादिकांनीं प्रयत्न केला. यांत त्यांनीं पुढील पिढ्यांवर उपकारच केले हे कोणी नाकारणार नाहीं. पण त्यांची उदारता संस्कृत जाणणाऱ्यापुरतीच होती ! येरां असंस्कृतज्ञा–व हाच वर्ग मोठा–नव्हती. यामुळें त्यांनीं भागवत 'सकळां' श्रुत केलें असें म्हणतां येणार नाहीं. उलट नाथांच्या काळीं 'संस्कृत वाणी देवें केली आणि प्राकृत काय चोरें आणली' असें बजावून सांगावें लागण्याइतकी संस्कृताची महती असतांना व स्वतः संस्कृत उत्तम येत असतांनासुद्धां संस्कृतांत ग्रंथ करून पांडित्य दर्शविण्याचा मोह नाथांनीं टाळला व सर्वांना सुगम अशा मराठींत ग्रंथ

लिहिला. यामुळेंच 'श्रुत केलें सकळां' हें त्यांचें तुकोबांनीं केलेलें वर्णन यथायोग्य आहे.

असें करण्यांत नाथमहाराज हे मूळ भागवत लिहिण्याचा जो व्यासांचा हेतु तोच पूर्ण करीत आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्यांना श्रुतिस्मृतीचा अधिकार नाहीं अशांना तरावयाचें साधन म्हणूनच भागवताची निर्मिति व्यासांनीं केली व तोच हेतु मनांत धरून नाथांनीं तें भागवत मराठींत आणलें.

आतां भागवत सकळांकरितां मराठींत आणण्याचा प्रयत्नहि अनेकांनीं केला आहे. उदाहरणार्थ, महानुभवीय पंडित भास्करभट्ट यांची उद्धवगीताच घेऊं. पण त्यांनीं जरी ' सकळां ' करितां मराठींत लिहिलें तरी भगवंताचा संदेश जसाच्या तसा जगास न सांगतां त्याला आपल्या मताचा व आवडीनिवडीचा वंग लावून तो जगास सांगितला. त्यांनीं भगवंताचें बोलणें मराठींत आणतांना **निवड** केली.

**एकादशेंसी सरिसीं : भाजूनि साहित्य देशी ।**
**मियां आवारूं केलें जगासी : ज्ञान अमृताचें** प्र. ११३–८२६

असें जरी ते म्हणत असले तरी एकादशस्कंधापैकीं ज्यांच्यांत ' निमिजायन्त ' नारदवसुदेव असे संवाद आहेत असे पांच अध्याय गाळलेच आहेत.

कवीश्वरांनीं ' निवड केली ' हें विधान पटावें म्हणून भास्करभट्टांनीं जे अनेक फरक केले आहेत त्यांपैकीं आणखी एक दोघांचा उल्लेख करतों.

अध्याय सहामध्यें उद्धव भगवंताला त्याच्या प्रयाणानें आपली केवढी हानि होईल हे सहा श्लोकांत सांगत आहे. कवीश्वरांनीं त्यावर पंचाहत्तर ओव्या खर्च केल्या आहेत येवढेंच नव्हे तर उद्धवाच्या शोकाचें अतिशयोक्तिपूर्ण वर्णन केलें आहे. मूळाशीं हें धरून नव्हे हें मूळ भागवत वाचणारास सहज कळून येईल.

दुसरें उदाहरण द्यावयाचें तर ' ऋष्यशृंगाख्यानाचें '. हें आख्यान एक स्वतंत्र प्रकरण म्हणून दिलें आहे. वास्तविक मूळांत तें तसें नाहीं. भागवतांत अवधूतांनीं जे चोवीस गुरु केले त्यांत ऋष्यशृंगाला स्वतंत्र स्थान नाहीं. अ. ८ श्लोक १७, १८ व १९ यांत हरिणास कां गुरु केलें हें सांगतांना ' **आसां क्रीडनको वश्य ऋष्यशृंगो मृगीसुतः** ।।१९।। ' असा ऋष्यशृंगाच्या कथेचा उल्लेख केला आहे व नाथांनींहि यावर लिहितांना ' **विसरला तपाचा खटाटोपु** । ' इत्यादि सुंदर व्याख्यान ४।५ ओव्यांत केलें आहे. कवीश्वरांनींहि प्रकरण ४५ मध्यें ' कृष्णसारगुरु ' याबाबत

४ ओव्या लिहिल्याच आहेत. पण येवढ्यावर समाधान न पावून ऋष्यशृंगाच्या कथेला पिंगलेच्या कथेनंतर त्यांनीं स्वतंत्र स्थान दिलें, त्यावर पन्नासवर अधिक ओव्या लिहिल्या व त्यांत शृंगाररस ओतला अशी ही निवड त्यांनीं केली. असें म्हटलें तर फारसें चुकणार नाहीं कीं कवीश्वर भास्करभट्टांनीं ऋष्यशृंगास स्वतंत्र स्थान दिलें. कारण, त्यायोगें त्यांच्या ओढा असलेल्या रसाचा परिपोष करण्यास त्यांस अधिक अवसर मिळत होता.

कवीश्वरांचें काव्य उत्तम आहे. पण मूळ भागवताचें अंतरंग जसेंच्या तसें त्यांत उतरलें आहे कां असें पाहूं गेलें असतां असेंच म्हणावें लागेल कीं यांत मूळाची यथार्थ वाढ नाहीं. यांत ग्रंथकर्त्यांचाच आत्मा अधिक प्रतिबिंबित झाला आहे.

तात्पर्य, 'सकळां' करितां लिहिणारेहि लोक आहेत, पण ते मूळांत बिघाड करणारे आहेत. नाथांचें वैशिष्ट्य याच्यांत आहे कीं त्यांनीं 'सकळां' करितांहि लिहिलें व मूळाचा रंग न बिघडवितां लिहिलें. जेथें वाढ केली ती 'मूळ हेतू'च्या वाढी-करितांच केली. त्याच्याशीं विसंगत अथवा त्यांत बिघाड करणारी भर घातली नाहीं.

नाथभागवत म्हणजे मूळ भागवताप्रमाणें भक्तिप्रधानच आहे. यांत 'भक्ति', 'विरक्ति', 'परेशानुभव' व 'गुरुमहिमा' हा जो भागवताचा चतुष्पाद आत्मा त्याचा रसाळ व प्रसादपूर्ण भाषेंत आविष्कार आहे. नाथभागवत हें उत्कृष्ट काव्य आहे व त्यांत परतत्त्वाचा नुसता स्पर्श नव्हे तर परतत्त्वाच्या क्षेत्रांतील गूढ अशा प्रमेयांचा आविष्कार आहे. श्री ज्ञानदेवांचा दृष्टान्त देऊन सांगावयाचें तर जशी लावण्य, गुण, कुळवती आणि पतिव्रता अशी स्त्री असावी तशी ही नाथांची भागवती कथा आहे. नाथभागवतांत ज्ञानेश्वरीप्रमाणेंच साहित्य आणि शांति यांचें मीलन आहे व म्हणूनच ज्ञानेश्वरीच्या खालोखाल नाथभागवताचा प्रसार महा-राष्ट्रांत फार मोठा आहे.

नाथांनीं श्री ज्ञानदेवांचें वर्णन करण्याकरितां जे शब्द योजले आहेत त्याच शब्दांत खुद्द नाथांचेंच वर्णन करतां येईल.

**उदार भक्त उदार भक्त । ऐसी मात त्रैलोक्यीं ।।**

सद्भावाच्या ओंजळींत हीं वाक्पुष्पें भरून तीं श्रीनाथांच्या चरणीं अर्पण करतों.

---

# नाथभागवताची अपूर्वता

: लेखक :

## ह. भ. प. **धुंडा महाराज देगलूरकर**

महाराष्ट्रांतील संतवाङ्मयांत ' श्री एकनाथी भागवत ' या मौलिक ग्रंथाची अपूर्वता अनेक प्रकारें सिद्ध होण्यासारखी आहे. हा ग्रंथ म्हणजे अध्यात्मिक विचारांचा मराठींतील एक ज्ञानकोशच आहे म्हटलें तरी चालेल. या ग्रंथाच्या निमित्तानें श्रीनाथमहाराजांचें दिव्य, आदरणीय व अनुकरणीय चरित्र व चारित्र्यच साकारलें आहे; सद्भावनेनें प्रेरिलेली, सदाचारावर आधारलेली, ज्ञानभक्तीनें व्यापलेली, अभय सत्त्वसंशुद्धयादि दैवी गुणांनीं अलंकारिलेली नाथमहाराजांची जीवननिष्ठाच आविष्कारली आहे. ' **मानस जाणिजे बोलें** । ' ( ज्ञाने. ) या उक्तीप्रमाणें नाथांच्या पवित्र हृदयांतील अनेक दालनें या ग्रंथाच्या द्वारें परमार्थ साधनाकडे आतुरतेनें पाहणाऱ्या साधकांकरितां खुलीं झालीं आहेत कीं काय असें वाटावयास लागतें. प्रपंच व परमार्थांतील कोणत्याहि भूमिकेवर आरूढ झालेला पुरुष असो, त्यास या ग्रंथरूपी आदर्शांत आपलें प्रतिबिंब मूर्तरूपानें दिसेल असें या ग्रंथाचें आगळें वैशिष्ट्य अभ्यासकांना पटल्याशिवाय राहात नाहीं.

साहित्य या दृष्टीनें या ग्रंथाकडे पाहिल्यास मम्मटानें काव्यप्रकाशांत म्हटल्याप्रमाणें ' व्यवहारविदे ' ' शिवेतरक्षतये ' ' परनिर्वृतये ' ( व्यवहारज्ञान, अमंगलाचा नाश, आत्मप्रत्यय ) हीं प्रयोजनें या ग्रंथांत सिद्ध झालेलीं सर्वत्र दिसून येतात.

काव्यदृष्टीनें पाहतां केवळ शुष्क कल्पनाविलास व शब्दांची कसरत नाथभागवतांत फारशी सांपडणार नाहीं, पण व्यावहारिक चातुर्य, सखोल अर्थ, सर्वव्यापी प्रमेयें हीं पूर्णत्वानें सर्वत्र आढळून येतील. नाथभागवतांत, किंबहुना सर्वच नाथवाङ्मयांत, साहित्य नाहीं; नाथांना साहित्यदृष्टि नव्हती असा आक्षेप अनेकांकडून केला जातो. पण अशा आक्षेपकांची साहित्य शब्दाची कल्पनाच विकृत असेल असें म्हणावें लागेल. साहित्याकरितां नाथांनीं भागवत लिहिलें नाहीं हें खरें आहे. या ग्रंथाचें मुख्य प्रयोजन त्यांच्याच शब्दांत खालीलप्रमाणें आहे.

**भागवत मुख्य भक्तिप्रधान । जें भक्तीचें सुख सनातन ।**
**तें करतळामळ करूनि जाण । तुवां परिपूर्ण दाविलें ॥** ४३२ ॥
**तुवां हा थोर केला उपकार । तरावया स्त्रियादि शूद्र ।**
**जग व्हावया भजन तत्पर । भागवत निजसार काढिलें ॥** ४३३ ॥
**भागवतींचें गुप्त पियूष । तें त्वां प्रगटिलें भक्तिसुख ।**
**तेणें संत सुखावले देख । श्रोते सकळिक निवाले ॥** ४३४ ॥

नाथभागवत अ. २४

साहित्याचा रस क्षणिक असतो, तरीपण नाथभागवतांत साहित्याचीं अनेक अंगें सहजगत्याच आलेलीं दिसून येतात. ज्ञानेश्वरीप्रमाणें शांतरस हा या ग्रंथांतील प्रमुख रस आहे तरी '**येरांही रसा पांतिकरा । जाहला मान ॥**' ही उक्ति वर वर नाथभागवत चाळणाऱ्यांच्या ध्यानांत आल्यावांचून राहाणार नाहीं. '**ब्रह्मरसें रसाळ कथा । । निरूपिले भागवता**' असें श्रीनाथ स्वतःच म्हणतात. काव्यांतील कांहीं अंगें या ग्रंथांत दिसणार नाहींत, याचें कारण त्यांची दृष्टि बोधप्रधान आहे; तें जनरंजनासाठींच केलेलें नाहीं. ग्रंथवाचकांचें हृदय पालटावें हा त्यांतील उद्देश स्पष्ट आहे. याचा अर्थ काव्यांतील कौशल्य, अलंकार, रसवत्ता इत्यादि त्यांत नाहींत असें नाहीं, पण त्या ग्रंथाचा मुख्य भर अध्यात्मावर. ज्ञान, भक्ति, वैराग्य प्रतिपादन करणाऱ्या या काव्याचें मुख्य प्रयोजन परमानंदावाप्तिरूप कैवल्य, उपास्य देवतेचा प्रसाद व श्रीसद्गुरु जनार्दन स्वामींचा अनुग्रह. इतर अनुषंगिक गोष्टी गौण होत. नाथच म्हणतात,

**हे जनार्दन कवितावाडी । ब्रह्मरसें रसाळ गाढी ।**
**जे जनार्दनें लाविली गोडी । ते चवी न सोडी ग्रंथार्थे ॥**

नाथभागवत २९–१०३४

**तो हा एकादशा ऐसा ग्रंथ । येथ ठाकठोक परमार्थ ।**
**येणें महाकवी समस्त । निज हितार्थ पावले ॥**

नाथभागवत २९–१०३६

**कवीश्वरा नवरसिकू । नवरंगडा श्रीकृष्ण एकू ।**
**जो जो वर्णी रस विशेखू । तो तो यदुनायकु स्वयें होय ॥**

नाथभागवत ३०–३६

**कवीश्वरांची कृष्णकीर्ती । ऐकतां वाढे श्रद्धा प्रीती ।**
**तेणें थोरावे कृष्णभक्ती । हे कविता शक्ती अगाध ।।**

नाथभागवत ३०–४२

नाथभागवतांत जागजागीं अशीं प्रमाणें विखुरलेलीं दिसतील. नाथमहाराजांनीं भावार्थ रामायणांत ग्रंथ कसा असावा याविषयीं स्वतःचें स्पष्ट मत खालीं लिहिल्याप्रमाणें सांगितलें आहे.

**अफाट न करावा ग्रंथ । ग्रंथीं बोलावा मुख्यार्थ ।**
**पदी दावावा परमार्थ । हा निजस्वार्थ कवित्वाचा ।।**

बालकांड १–११८

**ज्ञानी निवती परमार्थ बोधे । पंडित निवती पदबंधे ।**
**लोक निवती कथा विनोदे । ग्रंथ संबंधे जग निवे ।।**
**मुख्यत्वे ग्रंथींचें राखावें प्रेम । प्रतिपदीं प्रतिपादावें परब्रह्म ।**
**हाचि कवित्वाचा कवित्व धर्म । श्रोते सप्रेम सुखी होतील ।।**

बालकांड १४। ८१–८२

ही काव्याची व ग्रंथाची कसोटी नाथभागवतास पूर्णत्वानें लागू पडते.

मूळ श्रीमद्भागवत हा ग्रंथ श्रीमद् वेदव्यासांच्या समाधिभाषेंतून निर्माण झाला आहे असें श्रीवल्लभाचार्यांनीं म्हटलें आहे. तसाच नाथभागवत हा ग्रंथ श्रीएकनाथमहाराजांच्या समाधिभाषेंतूनच निर्माण झाला आहे असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. '**समाधिभाषया चोक्तं ग्राह्यं तत्सर्वमेवहि ।**' म्हणजे समाधिभाषेंतील सर्वच व्याख्यान निर्दोष असतें असें त्या भाषेचें महत्त्व आहे. या भाषेंत बोलणारा कविच 'क्रांतदर्शी' असतो. त्याप्रमाणें नाथभागवतांत नाथांचें 'क्रांतदर्शित्व' सर्वत्र प्रतीत होतें. खालील ओवींतून हाच आशय प्रगट होतो.

**हृदयीं झालिया सद्भावो । भावें प्रगटे देवाधिदेवो ।**
**तेथें भागवताचा अभिप्रावो । सहजेंचि पहावो ठसावे ।।**

नाथभागवत १६–१३

* * *

**उष्ट्या पत्रावळी करोनिया गोळा । कवित्वाची कळा दाखविती ।।**

या श्रीतुकाराममहाराजांच्या वचनाप्रमाणें नाथमहाराज काव्य करीत नव्हते. त्यांच्या अध्यामिक दृष्टीला खऱ्या कवीचीं लक्षणें जीं दिसत, त्याप्रमाणें ते स्वतः होते. निदान स्वतःच्या कवीविषयक कल्पनेशीं ते प्रामाणिक होते हें निश्चित. ते म्हणतात,

**वेदशास्त्रांचा मथितार्थ । जाला करतळामळकवत ।**
**तैसाच ब्रह्मानंदे डुल्लत । कवि निश्चित या नांव ॥ १०५० ॥**
**उपनिषदांचा मथितार्थ । ज्याच्या मुखाची वास पहात ।**
**परोक्षापरोक्ष ज्याचेनि सत्य । कवि विख्यात या नांव ॥१०५१॥**

नाथभागवत अ. ११

ह्या लक्षणानें युक्त नाथ होतेच. त्यांच्या खास अनुभूतींतून आणि त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्वाच्या रंगांत रंगून बाहेर पडलेला भावगर्भ, कल्पनाप्रचुर आणि प्रतिभायुक्त मनोगताचा भव्य आविष्कार म्हणजेच श्रीनाथांचें भागवत होय.

विषयविवेचनांतील सौलभ्य, सामान्यांचेंहि चित्त वेधून घेण्याइतकें सौंदर्य, भावमयता हीं नाथभागवतांत सर्वत्र दिसून येतात. या ग्रंथाचें वैशिष्ट्य म्हणजे प्रभावी भावगर्भप्रतिपादन असूनहि तेथें अहंकारास थारा नाहीं. ग्रंथकर्तृत्वाचें सर्व श्रेय श्रीगुरूंनाच दिलें गेलें आहे. उदा.

**बाळक स्वयें बोलों नेणे । त्यासी माता शिकवी वचनें ।**
**तैसी ग्रंथ कथा कथनें । स्वयें जनार्दनें बोलविजे ॥**

नाथभागवत २–१२

श्रीनाथांच्या काव्यांत अनुप्रास, श्लेषादि शब्द व अर्थालंकार जागजागीं विखुरलेले असूनहि त्यांचें भलतेंच अवडंबर माजविलें नाहीं. श्लेषाचीं एक दोन उदाहरणें पाहूं. पहिल्याच अध्यायांत ‘ लंबोदर ’ या पदावरील कोटी पहा.

**तुजमाजी वासू चराचरा । म्हणोनि बोलिजे लंबोदरा ।**

तसेंच ‘ एकादश ’, ‘ एकनाथ ’ यावरील कोटीहि मननीय आहे.

**घटित एका आणि एकादशें । राशिनक्षत्र एकचि असे ।**
**त्या एकामाजीं जें पूर्ण दिसे । तें दशदशांशें चढे अधिक ॥**
**मागां पुढां एक कीजे । त्या नांव एकादशू म्हणिजे ।**
**तरी एका एकपणचि सहजें । आलें निजबोधें ग्रंथार्थें ॥**

म्हणोनि एकादशाची टीका । एकादशीस करी एका ।
ते एकपणाचिया सुखा । फळेल देखा एकत्वें ॥

नाथभागवत अ. १

तसेंच खालील उत्प्रेक्षालंकाराचीं उदाहरणें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

आतां वंदूं ते सज्जन । जे कां आनंद चिद्घन ।
वर्षताति स्वानंद जीवन । संतप्त जन निववावया ॥
ते चैतन्याचे अळंकार । कीं ब्रह्मविद्येचे शृंगार ।
कीं ईश्वराचे मनोहर । निज मंदिर निवासा ॥
कीं ते भूतदयार्णव । कीं माहेरा आली कणव ।
ना ते निर्गुणाचे अवेव । निजगौरव स्वानंदा ॥
ना ते डोळ्यांतील दृष्टी । कीं तिचीहि देखणी पुष्टी ।
कीं संतुष्टीसी तुष्टी । चरणांगुष्ठीं जयाचे ॥

नाथभागवत अ. १

खालील अलंकारिक वर्णन हृद्य आहे.

ते पदद्रुमीचिया दशशाखा । त्याचिया दशधा दशांगुलिका ।
अग्रीं अग्रफळ चंद्रिका । नखमणी देखा ळखलखीत ॥
ते नख चंद्रिकेचे चंद्रकांत । चरण चंद्रामृतें नित्य स्रवत ।
भक्त चकोर ते सेवित । स्वानंद तृप्त सर्वदा ॥

नाथभागवत अ. २

वरील ओव्यांत शब्द व अर्थालंकार दोन्हीहि कसे उत्कृष्ट साधले आहेत ? तसेंच एकोणतीसाव्या अध्यायाच्या शेवटीं केलेलें भक्तिसागरावरील समुद्रमंथनाचें रूपक भावगर्भ असून फारच मननीय आहे.

भगवद्भक्ति तोचि महासागर । तेथ निजधैर्य तोचि मंदर ।
गुरुशिष्य युक्ति सुरासुर । मथन तत्पर साटोपें ॥
भाव विश्वास दोन्ही मांदिरीं । बोध रविदोर दृढ धरी ।
प्रत्यगावृत्ति अभ्यासें करीं । मंथन निर्धारीं मांडिलें ॥
तेथ मंथनीं प्रथम दृष्टीं । ' अहं ज्ञाता ' हे हलाहल उठी ।
तें विवेक शिवें धरिलें कंठीं । पुढती अहं नुठी गिळिलें तैसें ॥

**निरभिमानें मथूनि मथित । काढिलें भक्तिसारामृत ।**
**तें उद्धवालागीं श्रीकृष्णनाथ । कृपेनें निश्चित अर्पिलें ॥**
**धर्म अर्थ काम मुक्ति । चहूं पुरुषार्थांही वरती ।**
**कृष्णे सारामृत निजभक्ती । उद्धवा हातीं अर्पिली ॥**

नाथभागवत अ. २९

तसेंच नाथभागवतांतील प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभीं जीं नमनें अथवा मंगलाचरणें केलीं आहेत तींहि काव्य या दृष्टीनें महत्त्वाचीं असून अध्यात्मिकतापूर्ण आहेत. बऱ्याच मंगलांत रूपकालंकार उत्कृष्ट साधला आहे. उदा. अ. ८, श्रीगुरुवरील ज्योतिष्याचें रूपक; अ. ९, अमरपती ( इंद्र ) चें रूपक; अ. १०, धन्वंतरी ( वैद्य ) रूपक; अ. ११, मेघाचें रूपक; अ. १२, वसंतऋतु; अ. १३, हंस; अ. १४, क्षीरसागर; अ. १७, मेरुपर्वत; अ. १९, त्र्यंबकेश्वर; अ. २०, चित्समुद्र; अ. २१, वैकुंठनाथ; अ. २२, खांबसूत्री इत्यादि सर्वच रूपकें म्हणजे अलंकारांचीं उत्कृष्ट उदाहरणें आहेत. शब्दलावण्य व अर्थसौंदर्य सर्वत्र असूनहि तें पतिव्रतेप्रमाणें पवित्र आहे. त्यांत वेश्येचा शृंगारिक नटवेपणा नाहीं, सहजप्राप्त रसात्मकता आहे पण त्याचें दिखाऊ प्रदर्शन नाहीं.

**साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ ।**
**शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥**

ही ज्ञानेश्वर महाराजांची उक्ति नाथभागवताचे बाबतींत सार्थ आहे. काव्यदृष्टयाहि अपूर्वता नाथभागवतांत सर्वत्र दिसून येते. अलंकाराचीं उदाहरणें शोधावयाचीं झाल्यास तीं जागजागीं विपुल प्रमाणांत आहेत. श्रीनाथमहाराजांच्या तत्त्वदर्शी मनाचा सौंदर्यसाक्षात्कार सहजतेनें होईल अशीं अनेक स्थळें नाथभागवतांत सर्वत्र सांपडतील. चतुःश्लोकी भागवतांत

**शब्दापुढें ज्ञान धांवे । ओवीपुढें अर्थ पावे ।**
**जें जें जिवीं विवंचावें । तें तें आघवे ग्रंथार्थ होय ॥**

असें म्हटलें आहे. श्रद्धाळु वाचकांना हा प्रत्यय आल्याविना राहाणार नाहीं. स्वतः नाथच म्हणतात, या व्याख्यानानें श्रोत्यांची

**स्वानंदे लोधली चित्तवृत्ति । इंद्रियें वेधिलीं सुखस्थिति ।**

*   *   *

**............ । ते कथा सुंदर मनोहर ।**
**निरूपण अति अरूवार । निजजिव्हार निववील ॥**

नाथभागवत अ. ३

अशी स्थिति होईल.

विचाराची प्रगल्भता प्रगट होण्यास त्याबरोबर उत्कृष्ट भाषाशैलीचाहि आविष्कार लागतो. वाचक वा श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव घेणारी शब्दसृष्टी निर्माण करण्यांत नाथांचा हातखंडा आहे. प्रेमाच्या, भक्तीच्या, वात्सल्याच्या मृदु मृदुल भाषेवर जसें नाथांचें प्रभुत्व आहे त्याचप्रमाणें आवेशाच्या, त्वेषाच्या, क्रोधाच्या, तीक्ष्ण, कटु, भेदक भाषाशैलीवरहि नाथांचें पूर्ण स्वामित्व आहे. म्हणजे प्रेम, वात्सल्य, वीरश्री इत्यादि कोणत्याहि मृदु तीक्ष्ण भावना असोत, त्या स्पष्ट करतांना नाथांना योग्य शब्द व अलंकार इत्यादिकांची कधींच न्यूनता भासत नाहीं, माधुर्य, ओज, प्रसाद इत्यादि काव्यगुण सर्वत्र प्रतीत होतात. मात्र अर्थगौरवाचा विशेष प्रत्यय येतो. सर्वच विषयांत जरी तो दृष्टीस पडतो तरी अध्यात्म व भक्तिप्रेमवर्णनांत त्याची पराकाष्ठा झालेली दिसून येते. कारण नाथांचा पिंडच संपूर्णतया अध्यात्माचा बनलेला आहे.

नाथभागवत हा टीकाग्रंथ असला तरी अंतर्मुख होऊन निर्विकार मनानें पूर्ण विचार करून काढलेलें जीवनाचें स्वानुभवसिद्ध सिद्धान्त, शास्त्रशुद्ध दृष्टि, श्रीजनार्दनस्वामीसारख्या निवृत्तिगर्भ प्रवृत्तींत असणाऱ्या महात्म्याचीं उपदेशवाक्यें व तदनुसार आत्मनिश्चयाची पूर्णता, या अनुभवानुसार त्या सिद्धान्ताची अनुकरणीय ऐकान्तिक साधना व आबाळसुबोधें सर्वांना ह्या ऐकान्तिक सिद्धान्ताचा लाभ मिळावा म्हणून कटाक्षानें लोकभाषेंत, मोकळ्या मनानें, साभिनिवेश दृष्टान्त, उपमा, अलंकार व उपपत्तिगर्भ भाषेंत केलेला प्रचार म्हणजेच नाथभागवत होय. सुलभ ओवीबद्ध भाषेंत नाथांच्या सर्वांगपूर्ण उदार, शुद्ध, समत्वबुद्धिपूर्ण व्यक्तिमत्वाचा साक्षात्कार अभ्यासकांना झाल्याविना राहाणार नाहीं. पवित्र गंगौघाप्रमाणें शांत व संथपणें वहाणारी नाथांची भाषा सहजता, सरलता, सुगमता, निर्मलता, भावपूर्णता, गंभीरता इत्यादि गुणांमुळें वाचकांचें व श्रोत्यांचें लक्ष आपणांकडे आकर्षून

घेते. टीकाग्रंथ लिहितांना मूळ ग्रंथांतील काठिण्य टीकाकारास जाणवत असतें, त्यामुळें कित्येकांच्या टीकेंत संदिग्धता, विपरीत अर्थवत्व, उपपत्तिशून्यता इत्यादि दोष दिसून येतात. पण नाथभाषेचा प्रवाह मूळ ग्रंथांतील काठिण्याच्या प्रतिबंधास जुमानीत नाहीं, तर निर्भयपणें, आत्मविश्वासानें महानदीप्रमाणें आपला मार्ग आक्रमीत असतो. उदा. नाथभागवत अ. ७ मधील दत्तात्रेयांच्या चोवीस गुरु प्रकरणांतील कपोत कपोतीचें वर्णन अथवा अ. २३ मधील कृपण चरित्राचा भाग जितक्या सरलतेनें व सुलभतेनें रंगविला तितक्याच सहजतेनें अ. १२ मधील '**स एष जीवो विवरप्रसूतिः प्राणेन घोषेण गुहां प्रविष्टः ।**' या सतराव्या श्लोकावरील संपूर्ण योगप्रक्रिया सांगून रंगविला आहे. त्या श्लोकावर अध्यात्मिकप्रक्रिया व योगप्रक्रिया, शरीरांतील षट्चक्रें, त्यांचीं स्थानें, त्यांच्या कला, बीजाक्षरें, कुंडलिनी जागृती इत्यादि गूढ विषयांचें विस्तृत वर्णन सर्वांस कळेल अशा पद्धतीनें केलें आहे. नाथमहाराजच म्हणतात,

**आलोडिता ग्रंथ कोडी । न कळे योगज्ञानाची गोडी ।**
**ते तुवां विशद केली फुडी । निजपरवडी विभागें ॥**
**तुझेनि मुखें कृष्णनाथें । श्रीभागवत जें कठिण होतें ।**
**तें अर्थविलें यथार्थें । सत्य आमुतें मानवलें ॥**
**हा बारावा अध्यावो । अतिगूढ बोलिला देवाधिदेवो ।**
**तेथींचाही त्वां अभिप्रावो । विशद पहावो विवरिला ॥**

नाथभागवत अ. १२

अध्यायाअध्यायांत अशीं कितीतरी स्थळें सांपडतील. माझी मराठी चिन्मात्री मिठी घालून निःशब्दाच्या गोठी सांगेल असें ते म्हणतात.

**तेवीं माझी हे मराठी । जनार्दन कृपा परिपाटीं ।**
**निःशब्दाच्या सांगे गोष्टी । चिन्मात्रीं मिठी घालूनि ॥**

नाथभागवत अ. १४

श्रीमद्भागवत एकादश स्कंधांत सांगितलेलें बंधनिवृत्ति व मोक्षप्राप्त्युपायभूत असें अध्यात्मज्ञान अशिक्षित, अज्ञानी, सांसारिक आधीव्याधींनीं पीडिलेल्या पण प्राक्तन सुकृतानें अथवा सत्संगतीनें परमार्थाची ओढ ज्यांना लागलेली आहे अशा जिज्ञासु जनांना सहज आकलन होईल अशा भाषेंत उपलब्ध करून द्याव-

याचें हें नाथांचें एकमेव ध्येय. याच एका विशिष्ट ध्येयानें प्रेरित होऊन नाथांनीं एकादश स्कंधावरील टीकेची रचना केली. ते स्वतःच म्हणतात,

**येणें प्रश्नोत्तर श्रवणें । उठे जन्म मरणांचें धरणें ।**
**संसाराचें खत फाडणें । फिटलें लाहणें विषयांचें ॥**
**मोक्षमार्गींचे कापडी । साधनीं शिणती बापुडीं ।**
**तिहीं शीघ्र यावें तांतडी । जिणावया वोढी बंधमोक्षांच्या ॥**
**जे कष्टती जप साधनें । शिणती ध्येय ध्यान अनुष्ठानें ।**
**ते ते शीघ्र या विंदानें । ज्ञानाज्ञानें जिणावया ॥**

नाथभागवत अ. ११

**भाळे भोळे विषयी जन । याचें करिता श्रवण पठण ।**
**हरिभक्त होती जाण । सन्मार्गीं पूर्ण बहुत होती ॥**

नाथभागवत अ. ३१

या ग्रंथकर्तृत्वांत धन, मान, कीर्ति, पांडित्यप्रदर्शन ,याचा गंधहि नाहीं. लोकोद्धाराच्याच एका पवित्र हेतूनें रचिल्या गेलेल्या या ग्रंथाची अपूर्वता यापेक्षां वेगळी कोणती असूं शकेल ?

शास्त्रीपंडितांनीं व कर्मठ ब्राह्मणांनीं गजबजलेल्या पैठणसारख्या पुरातन क्षेत्रांत राहून नाथांनीं भागवतासारख्या भक्तिप्रधान ग्रंथावर टीका लिहून भागवतधर्माचा व तत्प्रसारार्थ लोकभाषेचा म्हणजे मराठी भाषेचा पुरस्कार केला, ही कामगिरी अत्यंत महत्त्वाची आहे. पैठणच्या संस्कृतींत राहून प्राकृताचा पुरस्कार करणें नाथकालीं अतिशय कठिण होतें. वेदांताचे व भागवतधर्माचे आचारविचार नाथांनीं ब्राह्मणांपासून तों अगदीं खालच्या थरापर्यंत पसरविले. अद्वैतवेदांतावर भक्तीचीं लेणीं चढवून तो खरोखरीचा लोकधर्म केला. कर्मठांच्या नगरींत राहून त्यांनीं कर्मठांचें तोंड उदार अशा भक्तिपंथाकडे वळविलें. ब्रह्मज्ञान सर्वांची मिराशी केली, बोलभाषेला बोधभाषेच्या योग्यतेस चढविलें व मोठ्या प्रमाणावर लोकजागृती घडवून आणली.

**माझी मराठी भाषा चोखडी । परब्रह्में फळली गाढी ।**

किंबहुना

**तेवीं संस्कृत आटाटी । सहसा परमार्थी नव्हे भेटी ।**
**तेचि जोडल्या मराठी साठीं । तेथ घालिती मिठी सज्ञान ।।**

नाथभागवत अ. ३०

असे आत्मविश्वासाचे उद्गार भागवताच्या अध्यायाअध्यायांतून महाराजांनीं काढले आहेत. भागवताचें व्याख्यान ऐकल्यानंतर श्रोत्यांच्या अंतःकरणांत जे भाव उत्पन्न झाले ते श्रोतृप्रशस्तिरूपानें श्रीनाथमहाराजांनीं दाखविले आहेत.

**तुझे भक्तीचा एकेक बोल । ब्रह्मसुखेसी सखोल ।**
**त्याहीमाजी प्रेमाची वोल । येताती डोल चित्सुखें ।।**

नाथभागवत अ. २४

सामान्य भाविक श्रोत्यांस हर्ष होईल यांत नवल काय ? नाथांचे परमगुरु श्री दत्तात्रयांना भिक्षुगीतावरील व्याख्यान ऐकून परमहर्ष झाल्याची व निजहस्ते अभय दिल्याची ग्वाही नाथांनीं दिली आहे.

**माझे गुरूचाही गुरू । श्रीदत्त परम गुरू ।**
**तो भिक्षुगीतार्थें साचारू । योग्यां योगेश्वरू तुष्टला ।।**
**तेणें तोखलेनि अद्भुतें । आदरें आश्वासूनि मातें ।**
**अभय देऊनि निजहस्तें । पूर्ण ग्रंथार्थें डुलतु ।।**

नाथभागवत अ. २३

ही अपूर्वतेची सीमा नाहीं असें कोण म्हणेल ?

श्रीनाथभागवत या ग्रंथाच्या अपूर्वतेचें आणखी एक महत्त्वाचें कारण सर्वच नाथचरित्रकारांनीं लिहिलें आहे. त्या ग्रंथाचा एक अलौकिक व आदरणीय इतिहास आहे. काशीसारख्या महान् क्षेत्रांत या ग्रंथाचा फार मोठा सन्मान झाला होता. नाथमहाराजांनीं भागवत एकादश स्कंधावर प्राकृत भाषेंत ओवीबद्ध टीका लिहावयास प्रारंभ केला, त्याचे पहिले पांच अध्याय तयार झाले. एका नाथभक्ताला ते फार आवडले, तेवढेच त्यानें लिहून घेतले. तो त्यांचें नित्य पारायण करीत असे. तो काशीयात्रेस गेला तरी ते बरोबरच नेले. काशीक्षेत्रीं नित्य भागीरथीचें स्नान करून त्या पंचाध्यायीचें पारायण मणिकर्णिका घाटावर तो करीत असे. एके दिवशीं तेथील षट्शास्त्रसंपन्न नामांकित संन्याशाच्या शिष्यानें तो प्रकार

पाहिला व आपल्या गुरूजीस निवेदन केला. ते गुरु मोठे विद्वान असून काशीस त्यांचा बोलबाला चांगला होता. श्रीमद्भागवतासारखा सर्व वंद्य ग्रंथ व तो मराठीमध्यें ! अब्रह्मण्यम् ! असें त्या संन्यासी गुरूस व तेथील इतर कांहीं शास्त्रीपंडितांस वाटलें. भागवताचा मराठींत अर्थ करणारा हा कोण पुरुष आहे म्हणून नाथशिष्यास विचारतांच श्रीनाथमहाराजांचें नांव, वास्तव्यस्थळ इत्यादि सर्व माहिती त्यानें शिष्यभावास उचित अशा पूज्य भावानें सांगितली. ती ऐकून त्या प्राकृतद्वेषी स्वामीस फार राग आला. या कृत्याची योग्य चौकशी करून हें कृत्य करणाऱ्यास चांगलें शासन करावें म्हणून नाथांस काशीस घेऊन येण्याकरितां आपल्या दोन शिष्यांस पैठणास पाठविलें. त्या शिष्यांनीं पैठणास येऊन नाथांस सर्व वृत्तांत निवेदन केला. हें श्रीकाशीविश्वेश्वराचेंच बोलावणें आहे असें समजून नाथांनीं कांहीं भाविक मंडळीसह काशीस शुभप्रयाण केलें. घाटावरील धर्मशाळेंत नाथ उतरले. तेथें नित्य भागवतरचना व प्रवचन इत्यादि कार्यक्रम चालू होतेच. एके दिवशीं नाथांच्या या कृत्याची चौकशी करून त्यास चांगलें शासन करावें म्हणून ते स्वामी आपल्या तीनशें शिष्य व इतर शास्त्रीपंडितांसह नाथ उतरले होते तेथें आले. नाथांच्या स्वभावधर्माप्रमाणें नाथांनीं त्यांचा फार आदर केला. भगवंताचें गुणानुवाद कोणत्याहि भाषेंत गाइले तरी भगवान् प्रसन्न होतो हें निर्भयतेनें पटवून दिलें.

> **संस्कृत कर्ते ते महाकवी । मा प्राकृती काय उणीवी ।**
> **नवी जुनी म्हणावी । कैसेनि केवीं सुवर्ण सुमनें ॥**
> **कपिलेचे म्हणावे क्षीर । मा इतरांचें तें काय नीर ।**
> **वर्णस्वादें एकचि मधुर । दिसे साचार सारिखे ॥**
> **संस्कृत वंद्य प्राकृत निंद्य । हे बोल काय होती शुद्ध ।**
> **हा ही अभिमानवाद । अहंता अशुद्ध परमार्थी ॥**
> **देवासी नाहीं वाचाभिमान । संस्कृत प्राकृत त्या समान ।**
> **ज्या वाणी जाहलें ब्रह्मकथन । त्या भाषा श्रीकृष्ण संतोषे ॥**

नाथांचे हे आत्मविश्वासाचे उद्गार व नाथांच्या मुखावर झळकत असलेलें दैवी संपत्तीचें दिव्य तेज पाहून त्या संन्याशाच्या व शास्त्रीपंडितांच्या भावनेंत

बदल झाला. शास्त्रीपंडितांनीं बसून नाथांच्या टीकेचें सर्व प्रकारची कसोटी लावून परीक्षण केलें व ग्रंथार्थ अतिशय अचूक भावगर्भ असून महान् प्रासादिक आहे असें सर्वानुमतें ठरलें. नाथांनीं काशीक्षेत्रीं राहून सर्व ग्रंथ पूर्ण करावा अशी सर्वांनीं त्यांना विनंती केली. रोज टीका लिहावी व त्यावर मणिकर्णिका घाटावर पंचमुद्रापीठांत श्रीदत्तपादुकासमोर पुराण सांगावें असा क्रम ग्रंथ समाप्तीपावेतों अव्याहत तीन साडेतीन वर्षें चालू होता. ग्रंथ समाप्तीनंतर स्वामींनीं सर्व पंडितांस सांगून मोठा विजयोत्सव करविला व शेवटीं या ग्रंथाची राजैश्वर्यासह हत्तीवरून मिरवणूक काढली. अशा रीतीनें नाथभागवताचा काशीक्षेत्रीं फार मोठा जयजयकार झाला. नाथकालीं काशीक्षेत्रीं एका प्राकृत ग्रंथास एवढा सन्मान प्राप्त होणें ही अपूर्वता केवढी म्हणावी लागेल ?

या ग्रंथाचा आणखी एक विशेष असा प्रत्ययास येतो कीं यांत सर्वत्र भिन्न भिन्न साधनांचा समन्वय उत्कृष्ट प्रकारें साधला आहे. ज्ञान, कर्म, भक्ति, विवेक, वैराग्य, योग, तपादि साधनांचें स्वतंत्र महत्त्व तेथें तेथें प्रतिपादिलेलें असूनहि त्यांचा परस्पर एकवाक्यतेचा संबंध दिसून येतो. श्रीनाथभागवतांत कर्मप्रतिपादन विपुल केलें असूनहि कर्मठतेचा दुराग्रह नाहीं. तसेंच आत्मज्ञानाचें महत्त्व सर्वत्र अनेक उपपत्तींच्या द्वारें सिद्ध केलें असूनहि वृथा ज्ञानाभिमान नाहीं. भक्तिरस हा या ग्रंथाचा स्थायी भाव आहे पण प्रतिपादिलेली भक्ति अंध नसून पूर्ण डोळस आहे. कर्माचा उपासनेंत, उपासनेचा ज्ञानांत व 'ज्ञानाचा पंचमपुरुषार्थरूपा प्रेम-भक्तींत बेमालूमपणें लय साधला आहे, हें सूज्ञ वाचकांच्या लक्षांत आल्याविना राहाणार नाहीं.



# नाथभागवतांतील अद्वैतसिद्धांत

: लेखक :

ह. भ. प. **रंगनाथ महाराज परभणीकर**

श्री एकनाथ महाराजांच्या ग्रंथांत अध्यात्मशास्त्रांतील मुख्य विषयाचें म्हणजे जीवब्रह्मैक्याचें वर्णन तर उत्कृष्टरीतीनें केलेलें आहेच पण हें साध्य पदरीं पडण्याचें पूर्वी जीवानें काय करावें, शास्त्रोक्त अशा कोणत्या साधनावर आरूढ व्हावें, तीं साधनें कशीं आचरणांत आणावीं, त्यांत कोणतीं साध्याच्या जवळचीं ( अंतरंग ) आहेत व कोणतीं बहिरंग आहेत याचें स्पष्टीकरण अतिशय उत्कृष्ट केलें आहे. तसेंच कल्याणेच्छु पुरुषाच्या कल्याणास प्रतिबंध करणारीं जीं तत्त्वें आहेत त्यांचाहि खुलासा महाराजांनीं योग्यरीत्या केला आहे. मुख्य वेदांताचा सिद्धांत असा आहे कीं जीव हा स्वतः सच्चिदानंद, अनंत, अखंड, समराभरित, ओतप्रोत, निर्विकार, निराकार, सजातीय–विजातीय–स्वगतभेदरहित देशकालवस्तुपरिच्छेदशून्य, व म्हणूनच ज्याचा प्रागभाव, प्रध्वंसाभाव, अत्यंताभाव व अन्योन्याभाव नाहीं असा असलेला, तो आपणांस कर्ता, भोक्ता, परिछिन्न, सुखी, दुःखी असें समजून या निश्चयांतच दृढ राहिलेला आहे. याचें कारण त्याच्या या समजुतीवरूनच त्याच्या स्वरूपाचें त्यास अज्ञान आहे हें निश्चित होतें. याच अज्ञानास माया, प्रकृति, शक्ति अशीं नांवें आहेत व याच अज्ञानास अविद्याहि म्हणतात. म्हणून श्री एकनाथ महाराज म्हणतात,

**व्हावया संसार बंधन । त्यासि अविद्याचि गा कारण ।**
**तिचें व्हावया छेदन । खड्ग तीक्ष्ण ब्रह्मविद्या ।।**

मी देह, कर्ता, भोक्ता आहे अशा विपरीत समजुतीस संसार म्हणतात व अशा समजुतीच्या पुरुषास संसारी म्हणतात. त्यांतील मुख्य दोष म्हणजे स्वतःचें स्वरूप निरतिशयानंद असून त्याला कल्पित अशा मायाकार्य जगत् अंतःपाती विषयांत आनंद आहे असें ज्ञान होतें व त्यामुळें हा संसारी जीव सारखा अव्याहत विषय-संग्रहाच्या पाठीं लागतो. हा जेव्हां आपल्यास जीव समजतो व ज्या अपराधानें

जीव समजला त्याच अपराधानें त्यास स्थूल शरीर धारण करावें लागतें. अशीं स्थूल शरीरें, दिव्य, मनुष्य व पशुपक्ष्यादि अनंत आहेत. अशा प्रत्येक शरीरांत त्यास प्रवेश करावा लागतो व त्यासच जन्म म्हणतात. त्यांत कांहीं दिवस करारानें राहावें लागतें त्यास आयुष्य म्हणतात. तें आयुष्य संपलें म्हणजे त्या शरीरांतून त्यास निघावें लागतें त्यास मरण म्हणतात. अशी जन्म मरणाची परंपरा अव्याहत या भ्रामक जीवाची चालूच आहे. या प्रत्येक शरीरांत हा जीव सारखा विषयग्रहणाच्या पाठीशीं असतो. त्यांत कोण्या जीवाचा प्रधान विषय शब्द, कोणाचा स्पर्श, कोणाचा विषय रूप, कोणाचा रस तर कोणाचा गंध असा आहे. पण साधारण पंच विषयांच्या पाठीशीं हे जीव लागतात. त्याचें कारण वर लिहिल्याप्रमाणें सुखाची लालसा हें होय. पण विषयांत सुख मुळींच नाहीं. हें तर खरें, पण त्यास विषयांत सुख नाहीं, सुख हें तर तुझें स्वरूप आहे हें सांगावें कोणी ? पशुपक्ष्यांच्या योनींत जीवास पंच इंद्रियांच्या द्वारें पंच विषयांचें ग्रहण करण्याचेंच सामर्थ्य असतें आणि साधुसंतांचा जो बोध असतो तो शब्दद्वारां होत असतो. म्हणून शब्द हा ककारादि वर्णानें श्रोत्राचा विषय आहे आणि पदार्थाच्या ज्ञानानें तो शब्दप्रमाण आहे. लौकिक शब्द घटपटादि पदार्थांचे बोधक असतात. वैदिक शब्दांचे दोन वर्ग. ( १ ) मायिक पदार्थांचे बोधक व ( २ ) शुद्ध परमात्मस्वरूपाचे बोधक. हेच शब्द घेऊन जगास बोध करतात ते साधु, भगवदवतारी किंवा युंजानयोगी असतात. पैकीं श्री एकनाथमहाराज हे भगवदवतारी आहेत.

**ब्रह्माऽहमस्मि ऐशी वाणी । एक वेळ पडली कानीं ।**
**अविद्या निद्रा गेली पळोनी । तत्क्षणीं जागिन्नला ॥**

महाराजांचें हें वाक्य यजुर्वेदाच्या महावाक्याचा अर्थ स्पष्ट करणारें आहे. श्री एकनाथांचा अवतार जीवाची अविद्या निवृत्त करून त्यास कृतार्थ करण्याकरितां आहे. म्हणूनच ते आपल्या हरिपाठांत स्पष्ट सांगतात कीं,

**करारे बापांनो साधन हरीचें । झणीं करणीचें करूं नका ॥**

मनुष्याचें मुख्य कर्तव्य म्हणजे पुनः जन्मास न येणें हें आहे. म्हणून महाराज सांगतात,

**जेणें नये जन्म यमाची यातना । ऐशिया साधना करा कांहीं ॥**

लौकिक, वैदिक ऐश्वर्यांचा भोग संपतांच पुनः आपत्तीचा प्रसंग येतो आणि जन्ममरण चुकत नाहीं. कारण जोंपर्यंत स्वस्वरूपाचें अज्ञान आहे तोंपर्यंत आपणांस कर्तृत्व, भोक्तृत्व समजुतीची जीवदशा आहे व त्या जीवदशेंत लौकिक, वैदिक फल जीव भोगतो. पण तशा फलभोगांचें आयुष्य संपलें म्हणजे शरीर सोडावें लागतें. जोंपर्यंत जीवात्मा देहधारी आहे, तोंपर्यंत त्यास सुखाला कारणीभूत असलेलें कर्म असतें असें नाहीं तर त्याचे हातून अविहितहि कर्म होत असतें व त्याचें फल भोगण्याकरितां सृष्टिनियमाप्रमाणें यमदरबारीं जावें लागतें. म्हणून महाराजांनीं यमयातना व जन्म या दोन मुख्य अडचणी चुकवाव्या असें सांगितलें. जीव हा जोंपर्यंत ब्रह्मस्वरूपाप्रत पोहोंचणार नाहीं तोंपर्यंत संसारचक्रांत राहणारच. त्याची निरतिशय आनंदाविषयीं इच्छा ब्रह्मप्राप्तीशिवाय निवृत्तच होत नाहीं. संसारांत म्हणजे पञ्च विषयांत सुख नाहीं पण जरी प्रत्यक्षाच्या जोरावर तें आहे असें मानलें तरी तें निरतिशय नाहीं. शेवटीं तें नाशिवंतच. असें सुख भोगून जरी जीवाचें त्यांतच राहणें झालें तरी त्यास आयुष्य संपवून मरावें लागेल व त्याकालीं निरतिशय सुखाचा अनुभव न झाल्यामुळें विषयसुखांतून त्याची पूर्णता होणार नाहीं म्हणजे त्या विषयीं त्याची वासना राहणारच व त्या वासनेमुळें त्यास जन्म घ्यावा लागेल. म्हणून एकनाथ महाराज हरिपाठांत म्हणतात,

**जन्म घेणें लागे वासनेच्या संगें ।**

अर्थात् निर्वासन होणें हें मनुष्याचें मुख्य कर्तव्य आहे. अशा निर्वासन झालेल्या पुरुषासच ‘ जीवन्मुक्त ’ म्हणतात. असा हा जीव जन्मांतरीच्या पुण्याईनें किंवा पूर्ण विचारानें वेदान्तशास्त्रावर आरूढ झाला तर त्यास तुच्छ मायिक अशा विषयसुखाची इच्छा होतच नाहीं. नाथांनीं भागवतांत म्हटल्याप्रमाणें

**जो दैवयोगें पालखी चढे । तो जेवीं पुर्वील तुटके मोचडे ।**
**आहे कीं गेले कोणीकडे । स्फुरेना फुडे तो जैसा ॥**

त्या जीवन्मुक्त पुरुषाला विषयसुखाचें स्मरणच होत नसतें. जीवानें स्वतःचें कल्याण या नरदेहांत करून घेतलें नाहीं तर त्या सारखा फसवा कोणता ? नाथांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे,

**ब्रह्मज्ञानाविण संन्यासी । नटाचें ऐसें मुंडण त्यासी ।**
**सोकला मिष्टान्न भिक्षेसी । वृथा गेरूसी नाशिलें ॥**

प्रवृत्तिमार्गात धर्मशास्त्रदृष्ट्या हा आश्रम सर्वांत श्रेष्ठ आहे. पण अशा श्रेष्ठ आश्रमांत त्यास ब्रह्मज्ञान न झालें तर तो जन्मार्जित वासनेनें पुनः जन्मास येणारच. एवंच नरदेहांत आलेल्या जीवानें अगोदर ब्रह्मज्ञान संपादन करावें व कर्तव्यतेचा विषय म्हणजे हाच. बाकी सर्व व्यवहार अदृष्टाधीन आहे. व्यवहारांत आयुष्य घालविणारा मनुष्य फसतो आणि आयुष्य संपलें म्हणजे मरून जातो.

**नरदेहा येवोनिया जाण । जो न साधी ब्रह्मज्ञान ।**
**तो लांडा गर्दभ जाण । पुच्छेवीण दुपायी ॥**

पशुपक्ष्याचें मरणें म्हणजे या देहांत त्यांनीं आपली सार्थकता कांहीं न करून घेणें होय. मनुष्यप्राणी अमोल नरदेहांत येऊन आपलें मुख्य कार्य करण्यास चुकला तर तो अधिक दोषास पात्र होतो. श्री एकनाथ महाराज म्हणतात,

**बहुतां सुकृतें नरदेह लाधला । भक्तिवीण गेला अधोगती ॥**

विचार करून पाहतां जीवात्मा हा मूळचा मुक्तच पण त्यास स्वतःचें ज्ञान आहे कोठें ? अशा अज्ञानामुळें जीवास वेदाचें विधान किंवा साधुसंतांचा बोध म्हणून महाराज सांगतात,

**जंव अविद्येचें बंधन । तंव वेदाचे वेद विधान ।**
**त्या अविद्या नाशिलिया जाण । विधीनें तें स्थान सांडिलें ॥**

तुम्ही जर आपल्या स्वरूपाचे ठिकाणीं स्थित असाल तर तुम्हांस वेदशास्त्र कांहींच शासन सांगत नाहींत.

ज्या भगवद्भक्तांना विषयांची आसक्तता नाहीं त्यांचा संसार प्रारब्धवशात् देहद्वयाकडून चालत असतो. अशा संसाराचे साक्षी म्हणून जे आपणांस समजतात अशा सज्ञान भक्तांना वेदशास्त्र कांहींच विधान करीत नाहींत. कारण या भक्तांना अविद्येचें बंधनच नाहीं. श्री एकनाथ महाराज म्हणतात,

**सज्ञान भक्ताचें ठायीं । ती अविद्या निःशेष नाहीं ।**
**मा विधिविधानाचें पायीं । रिघावया कांहीं कारण ॥**

अशा भक्तानें अखंड ध्यानधारणा केली तरी त्यास जास्त काय प्राप्त करावयाचें आहे ?

**जयासी माझें अपरोक्ष ज्ञान । तेणें घालोनियां आसन ।**
**अखंड धरितां ध्यान । अधिक उपयोग जाण असेना ॥**

असें नाथांचें वचन आहे.

वेदांताचा सिद्धांत असा आहे कीं श्रीगुरुमुखानें महावाक्य उपदेशद्वारां अपरोक्ष ज्ञान होईल त्याचक्षणीं अनंत जन्मांचें संचित अविद्येसह नष्ट होतें व पुढें त्यास क्रियमाण लागत नाहीं. फक्त प्रारब्धभोग शिल्लक राहतो. तो मात्र ब्रह्मज्ञानानें नाहींसा होत नाहीं. नाथांनीं म्हटलें आहे,

**माझिया साक्षात्कारा आला । जो जीवन्मुक्तत्व पावला ।**
**तोहि अदृष्टें बांधिला । वर्ते उगला देह गेहीं ॥**
**जनकराजा राज्यपदीं नांदे । शुक नागवा प्रारब्धें ।**
**कळी लाविजे नारदें । अदृष्टछंदें विनोदें ॥**
**वशिष्ठ पुरोहितत्व करी । भीष्म पहुडे शरपंजरीं ।**
**याज्ञवल्क्या दोघी नारी । अदृष्टा करीं वर्तत ॥**

असा अदृष्टाचा महिमा नाथांनीं भागवतांतून वर्णिला आहे. ज्ञान झालेला पुरुष ध्यानधारणा करील अथवा देहनिर्वाहाचा व्यवसायहि करील. पण त्याचें हें करणें दोषावह होत नाहीं.

**अथवा इंद्रियसंगती । दैवें अनेक विषयप्राप्ती ।**
**भोगितां हे अहोरातीं । परी निजात्मस्थिति भंगेना ॥**

यांतील ‘ दैवें ’ व ‘ निजात्मस्थिति भंगेना ’ हीं पदें विसरूं नयेत. अशी ही ब्रह्मज्ञानाची महति असल्यामुळें या अमोल नरदेहांत कोणताहि व्यवसाय मनानें न पत्करतां व कशाहि मायिक विषयांत न गुंततां मनुष्यप्राण्यानें आत्मसाक्षात्कार करून संसाराला कारण असणारी जी मूळ अविद्या तिची निवृत्ति केली पाहिजे. जीवात्म्याचें ठिकाणीं शास्त्रांनीं मल, विक्षेप व आवरण असे तीन दोष मानले आहेत. मल म्हणजे अप्रवृत्ति, विक्षेप म्हणजे अशांतता आणि आवरण म्हणजे स्वस्वरूपाची अनोळख. या तीन दोषांतून जीवात्म्यानें आपली सुटका करून घ्यावी लागते व ती या नरदेहांतच होऊं शकते. श्री नाथ महाराज म्हणतात कीं मलनिवृत्तीचें साधन निष्काम कर्म आहे. त्यानें चित्ताची शुद्धि होते.

**नित्य नैमित्तिक कर्मै करावीं । तेव्हांचि पावावी चित्तशुद्धि ॥**

जीवानें प्रथम सगुण उपासना करावी असें महाराजांचें मनोगत आहे. तिचा कोणी उच्छेद करूं नये.

**सगुण रूपासी न म्हणावे मायिक । शास्त्र आत्यंतिक सांगतसें ॥**
**सांगतसें शास्त्र वेदाध्ययन करा । विक्षेप तो वारा चित्ताचा पै ॥**
**विक्षेप गेलिया चित्ताचा सकळ । आवरण केवळ राहिलेसें ॥**
**राहिलेसें जया स्वरूपावरण । ज्ञानें निवारण होय त्याचें ॥**
**ज्ञानें होय परी ज्ञानप्राप्तिलागीं । साधनें तीं अंगीं विवेकादि ॥**
**विवेक वैराग्य शमादि षट्क । चौथी ते देख मुमुक्षुता ॥**
**मुमुक्षुतेपुढें श्रवण मनन । निजिध्यास ते पाहिजेती ॥**
**पाहिजे तयां तत्त्वं पदार्थशोधन । साधनेंहि जाण अंतरंग ॥**

अभंगाचा प्रथम चरण '**दत्तराया करूं प्रथम नमन ।**' असा आहे. या अभंगांतून नाथांचें मनोगत स्पष्ट होतें. तो जिज्ञासूंनीं मनन करण्यासारखा आहे.

---

## भगवद्भक्तीनें चित्तवृत्ति निर्मळ होते.

**त्यजूनि पुत्रवित्तेषणेचें काज । जिणौनि लौकिकाची लाज ।**
**पद्मनाभ भजन भोजें । अति निर्लज्ज नाचावें ॥**
**पुत्र वित्त लोकेषणा । त्यजूनि भजतां हरिचरणा ।**
**तंव तंव चित्ताचें चित्तमळ जाणा । क्षणक्षणां नासती ॥**
**रजतमादि कर्मजमळ । चित्तीं बैसले जे सबळ ।**
**ते प्रक्षाळती सकळ । भक्तिप्रेमजळ क्षाळणें ॥**
**जंव जंव थोरावे सप्रेम भक्ति । तंव तंव पायां लागे विरक्ति ।**
**स्वयें विरमे विषयासक्ति । होय चित्तवृत्ति निर्मळ ॥**

ना. भा. अ. ३–७३८ ते ७४१

---

# श्री एकनाथ महाराज व भागवत धर्म

: लेखक :

ह. भ. प. श्रीकृष्णदास लोहियामहाराज

( संस्थान–जोगेश्वरी व पंढरपूर )

भागवत धर्माच्या श्रवणानें कित्येकांचा उद्धार झाला असून कांहीं लोक भागवत धर्माच्या पठणानें कृतार्थ झाले आहेत, तर कित्येक त्याच्या चिंतनानें संसार-पाश तोडून निजस्वरूपीं मिळाले. असा उदार व व्यापक जो भागवत धर्म, त्याच्या-बद्दल " श्री एकनाथ संशोधन मंडळा " तर्फे " श्री नाथांची भागवत धर्माची कल्पना " या विषयावर लेख लिहून पाठविण्याबद्दल विनंती करण्यांत आल्यामुळें भगवंताचा व भागवतांचा अत्यंत आवडता असा हा भागवत धर्म, यावर लिहि-ण्याची संधि मिळाली हा मी आपला भाग्योदय समजतों. कारण, त्यामुळें आपण भगवंतास व भागवतांस प्रिय होऊन श्रीनाथमहाराजांच्या कृपेलाहि पात्र होऊं अशी माझी भावना आहे.

## (श्री) भागवत धर्म हा सनातन आहे.

भागवत धर्म हा कोणी एका व्यक्तीनें स्थापन केलेला असा एकदेशी-संकुचित–परिच्छिन्न–नसून तो व्यापक असा " सनातन " आहे. स्वतः भगवं-तांनीं भाळे भोळे स्त्रीपुरुषादि सर्व वर्णीयांना–जातीयांना–आचरण करून कृतार्थ होण्यासाठीं म्हणजेच प्राणिमात्रांच्या आत्यंतिक कल्याणासाठीं सांगितलेला असल्यामुळें " हा भागवत धर्म सनातन " आहे, असें श्रीनाथांनीं म्हटलें आहे. ज्या भागवत धर्मांत " धर्माचीं न बदलणारीं सनातन मूलतत्त्वें " प्रतिपादिलीं असून ज्या धर्माचा प्रवर्तक " सनातन असा पुराण पुरुषोत्तम भगवान् " आहे, तो भागवत धर्म सना-तन म्हणजे पुरातन कां म्हणूं नये ? तसें श्रीनाथमहाराजांनीं म्हटलेंहि आहे.

**जे कां पूर्व परंपरागत । जीर्ण भागवत धर्म येथ ।**
**सांगावया नारदमुनि निश्चित । उपपादित इतिहासु ॥**

ए. भा. अ. २ ओ. १२८

श्रीभगवंतांनीं स्वमुखानें अज्ञ जीवांच्या निजकल्याणास्तव सांगितलेला जो धर्म तो भागवत धर्म. म्हणूनच श्रीनाथमहाराज त्या धर्माला " जीर्ण भागवत धर्म येथ " असें म्हणतात. तो भगवंतांनीं केव्हां व कोणाला सांगितला ? असा याच्या मुळाशीं असलेला इतिहास महर्षि नारदांनीं वसुदेवाला सांगितला, " वसुदेवा, तूं जो मला भागवत धर्माविषयीं प्रश्न केलास, त्यामुळें तूं खरोखर भाग्यशाली असून या भागवत धर्माचा पूर्व इतिहास मी तुला सांगणार आहे. ज्या भागवत धर्माचा आचार दुष्ट प्राणिमात्रांचादेखील उद्धार करणारा व कर्माकर्माचें बंधन तोडून जीवात्म्याला निजानंदाच्या साम्राज्यावर आरूढ करणारा असा हा भागवत धर्म आहे. "

**हे नवल नव्हे भागवत धर्मा । जो कां देवद्रोही दुरात्मा ।**
**अथवा विश्वद्रोही दुष्टात्मा । तोही तरे हा महिमा भागवतधर्मीं ।११४।**
**हृदयीं धरितां भागवत धर्म । अकर्म्याचें निर्दळी कर्म ।**
**अधर्म्याचे निर्दळी धर्म । दे उत्तमोत्तम पदप्राप्ती ।। ११५ ।।**
**जेथ रिघाले भागवत धर्म । तेथ निर्दळे कर्माकर्म विकर्म ।**
**निंदा द्वेष क्रोध अधर्म । अविद्येचें नाम उरों नेदी ।। ११६ ।।**
**ते भागवत धर्मीं अत्यादर । श्रद्धेनें केला प्रश्न तुवां थोर ।**
**निजभाग्यें तूं अतिउदार । परम पवित्र वसुदेवा ।। ११७ ।।**

ए. भा. अ. २

याप्रमाणें वसुदेवाच्या भाग्याची व पवित्रतेची थोरवी वर्णन करून नारदांनीं वसुदेवाला भागवत धर्माचा पूर्वेतिहास सांगितला कीं, पूर्वीं जनक राजानें तुझ्या प्रश्नासारखाच ऋषभदेवपुत्र नवयोगेश्वरांना प्रश्न केला असतांना त्या ब्रह्मनिष्ठ नवयोगेश्वरांनीं त्याचीं उत्तरें दिलीं.

**येच अर्थीं विदेहाचा प्रश्न । संवादिती आर्षभ नव जण ।**
**ते भागवत धर्म जीर्ण । इतिहास संपूर्ण सांगेन ऐक ।। १२९ ।।**

ए. भा. अ. २

या नव आर्षभांची वंशावळ व त्यांचा पूर्व वृत्तान्त येथें लिहिण्याची आवश्यकता नाहीं. मात्र हे नवही आर्षभ योगसम्राट ब्रह्मनिष्ठ असून त्यांनीं विदेहाला—जनकाला प्रश्नाचें उत्तर देतांना " हा भागवत धर्म सनातन कसा व याचा प्रवर्तक कोण ? " याचें दिग्दर्शन केलें आहे.

**ये वै भगवता प्रोक्ता उपाया ह्यात्मलब्धये ।**
**अञ्जः पुंसामविदुषां विद्धि भागवतान् हितान् ॥**

भा. ए. अ. २ श्लो. ३४

श्रीभगवंतांनीं अविद्वान् लोकांच्या तरणोपायासाठीं त्यांना अनायासानें आत्मप्राप्ति—ब्रह्मपदप्राप्ति व्हावी एतदर्थ जे उपाय सांगितले त्यालाच भागवत धर्म असें म्हणतात. म्हणून "भागवत धर्म हा सनातन धर्म आहे" असें वारकरी वैष्णव समजतात.

श्रीनाथमहाराजांनीं या भागवत धर्मांची परंपरा भागवताच्या पहिल्या अध्यायाच्या शेवटीं व ३१ व्या अध्यायांत सांगितली असून भागवताचें मूळ जें "चतुःश्लोकी भागवत" त्यांतहि हा इतिहास सांगितला आहे.

**आदिकल्पाचिये आदीं । एकार्णव जळामधीं ।**
**ब्रह्मा झाला जडमूढबुद्धी । सृष्टिसर्जन विधि स्फुरेना ॥ ३२ ॥**
**यापरी केवळ अज्ञान । नाभिकमळीं कमळासन ।**
**विसरला आपणा आपण । मी हे कोण स्फुरेना त्या ॥ ३३ ॥**
**यालागीं श्रीनारायण । द्यावया निजात्मशुद्धज्ञान ।**
**आपुली निजमूर्ती चिद्घन । तिचें दर्शन देऊं पाहे ॥ ३४ ॥**

श्री आदिनारायणानें कल्पारंभीं जड मूढ बुद्धि झालेल्या ब्रह्मदेवाला या भागवत धर्मरहस्याचे चार श्लोक सांगितल्याची कथा श्रीमद्भागवताच्या द्वितीय स्कंधाच्या नवव्या अध्यायांत आलेली आहे. त्या चतुःश्लोकी भागवतावर श्रीनाथमहाराजांनीं १०३६ ओव्या लिहिल्या आहेत त्या वाचकांनीं मूळ ग्रंथांत पहाव्यात. ब्रह्मदेवानें तपश्चर्या करून सृष्टिसृजन योग्यतेला प्राप्त झाल्यानतर श्री आदिनारायणापासून मिळालेला हा भागवत धर्म कांहीं दिवसांनीं नारदांना सांगितला व नारदांनीं वेदविभाग करणारे व ब्रह्मसूत्रप्रणेते पुराणकर्ते श्रीव्यासांना या भागवत धर्माचा उपदेश केला. त्यामुळें व्यासांची संशयनिवृत्ति होऊन ते निजसमाधानाला प्राप्त झाले. व्यासांनीं या भागवत धर्माचें ज्ञान योगीन्द्र श्री शुकाचार्यांना दिलें आणि त्यांनीं सुभद्रार्जुनसुतपुत्र परीक्षिति, त्याला तें भागवत धर्मरहस्य सांगून संसारबंधांतून मुक्त केलें.

असा हा आदिनारायणापासून उपदेशिलेला " भागवत धर्म " सनातन—पुरातन आहे. " चोदनालक्षणोऽर्थो धर्मः ।" केवळ वेद सांगतो तोच धर्म सनातन अशी कर्मठ सनातन्यांची समजूत असल्यामुळें ते कदाचित् या भागवत धर्माला " सनातन भागवत धर्म " म्हणणार नाहींत. परंतु " भगवत् प्रोक्त " असल्यामुळेंच नाथांनीं या भागवत धर्माला " सनातन " असें म्हटलें आहे. जेव्हां वसुदेवानें नारदांना भागवत धर्मासंबंधीं प्रश्न केला तेव्हां जे नवयोगेश्वरांनीं विदेहाला पूर्वीं सांगितले होते तेच प्रश्न व तींच उत्तरें नारदांनीं वसुदेवाला ऐकविलीं. विदेहानें नवयोगेश्वरांना भागवत धर्मासंबंधीं असे नऊ प्रश्न केले कीं,

**' भागवतधर्म ' ' भगवद्भक्त ' । ' माया ' कैसी असे नांदत ।**
**तिचा ' तरणोपाव ' येथ । केवी पावत अज्ञानी ।। २७९ ।।**
**येथ कैसें असे ' परब्रह्म ' । कासया नांव म्हणिजे ' कर्म ' ।**
**'अवतारचरित्रसंख्या' परम । 'अभक्तां अधमगति' कैशी ।। २८० ।।**
**' कोण युगीं कैसा धर्म ' । सांगावा जी उत्तमोत्तम ।**
**ऐसे नव प्रश्न परम । जनक सवर्म पुसे ।। २८१ ।।**

एकनाथभागवत अ. २

विदेहानें १. भागवतधर्म २. भगवद्भक्त ३. माया ४. मायातरणोपाय ५. परब्रह्म ६. कर्म ७. अवतारचरित्र संख्या ८. अभक्तांची अधोगति ९. युगधर्म याप्रमाणें क्रमानें मार्मिक प्रश्न केले असतां या प्रश्नांच्या उत्तरांतच

**कविर्हरिरन्तरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायनः ।**
**आविर्होत्रोऽथ द्रुमिलश्चमसः करभाजनः ।।**

ए. भा. अ. २।२१

या महात्म्यांनीं संपूर्ण भागवत धर्म सांगितला असल्यामुळें एकादशस्कंधाच्या या पांच अध्यायांना " भागवत धर्माची पंचाध्यायी " असें नाथांनीं म्हटलें आहे.

**पव्हणियाहूनि पायउतारा । भागवत धर्म अति सोपारा ।**
**तो मार्गु दावावया पुरा । हांकारी स्त्रीशूद्रां पंचाध्यायी ।।**

आज अस्तित्वांत असलेल्या इतर धर्मापेक्षां हा भागवत धर्म अत्यंत प्राचीन आहे. या धर्माइतके इतर कोणत्याही धर्मांत मोठमोठे धर्मप्रवर्तक, ऋषि, मुनि, तत्त्ववेत्ते, मोठमोठे ग्रंथकार, संतमहात्मे व परोपकारी हरिभक्त झालेले नाहींत. अर्थात् या भागवत धर्माचें ज्ञानमाहात्म्य वाचकांना जेवढें अधिक होईल तेवढें त्यांचे अधिक प्रेम, श्रद्धा, आदरबुद्धि वाढून वाचकांची भागवत धर्माविषयीं अभिरुचि अधिकाधिक वाढेल एतदर्थ आम्हीं "भागवत धर्म रहस्य" या नांवाचा स्वतंत्र ग्रंथ लिहिला आहे, तो वाचकांनीं पहावा. कारण या लेखांत सर्वच मुद्यांचा विस्तारभयास्तव सांगोपांग विचार करणें शक्य नाहीं.

आतां या भागवत धर्माचें प्राप्य काय? त्याचा अधिकारी कोण? भागवत धर्माचें स्वरूप काय? त्याचीं साधनें कोणतीं? ग्रंथ कोणते?

**हे आघवेचि निरुती । होआवी लागे ।।**

तत्पूर्वी या भागवत धर्माचें प्राप्य काय? याचा आपण विचार करूं.

## (ए) भागवत धर्माचें साध्य–प्राप्य

भागवत धर्माचें साध्य अथवा प्राप्य स्वर्ग अथवा सत्य लोकादि लोकलोकांतर नसून परब्रह्म स्वरूपाचा साक्षात्कार म्हणजेच "परमात्मप्राप्ति" हेंच या धर्माचें साध्य आहे. ज्याला वेदान्तशास्त्रांत ब्रह्म म्हणतात अथवा तत्त्व म्हणतात, त्यालाच भागवत धर्मांत "भगवान्" असें म्हणतात.

**वदन्ति तत् तत्त्वविदस्तत्त्वं यज्ज्ञानमद्वयम् ।**
**ब्रह्मेति परमात्मेति भगवानिति शब्द्यते ।।**

भागवत १।२।११

हेंच आमचें भागवताचें प्राप्य असून स्वर्गादि लोकलोकांतरास वांतीप्रमाणें समजून तत्प्राप्तीच्या यज्ञादि साधनांचा या धर्मांत निषेध केलेला आहे. या भागवत धर्माच्या इमारतीचा पाया ज्ञानेश्वर महाराजांनीं भरला असून ही इमारत (देवालय) तयार केल्याचें संत बहिणाबाईनीं म्हटलें आहे. परंतु लेखकास असें वाटतें कीं ज्ञानराजांच्या काव्यांत भागवत धर्माचीं तत्त्वें सूक्ष्म-बीजरूपानें असून अंकुरदशेला नामदेवरायांच्या काव्यांतून (भागवत धर्म असे शब्द) आलेला

आहे. तरी पण या भागवत धर्म वृक्षाची पूर्णतया वाढ श्री नाथांच्या वाङ्मयातून झाली आहे हेंच आम्ही वाचकांच्या निदर्शनास आणून देऊं. स्वर्गादि सुखें अनित्य व वैषयिक असल्यामुळें हें भागवत धर्माचें प्राप्य नसून ज्या सुखाच्या मागें देशाचा, कालाचा, वस्तूचा, परिच्छेद नाहीं असें " सुखस्वरूप ब्रह्म " सर्व जीवांचें साध्य आहे. तेंच परमात्मा भागवत धर्माचा प्राप्य असून त्याच प्रभूचें प्रतिपादन भागवत प्रस्थानत्रयी ग्रंथांतून केलें आहे.

**देशे काले वेदानुवादा । ज्या सुखाची न करवे मर्यादा ।**
**त्या सुखाची सुखसंपदा । मद्भक्त सदा सेविती ।।**

पण त्या ब्रह्मसुखाचा अधिकारी ब्रह्मज्ञानी असतो व ब्रह्मज्ञानाचा अधिकार वेदज्ञांना असतो व वेदाचा अधिकार ब्राह्मणांना असतो तेव्हां हें ब्रह्मसुख भागवत धर्मांतील अठरा पगड जातींना कसें प्राप्त होईल? म्हणून तर आतां आपण भागवत धर्माचा अधिकारी कोण? याचा विचार करूं.

## ( क ) भागवत धर्माचा अधिकारी

सर्व जीवांचें साध्य परब्रह्म परमात्मा आहे व तें सच्चिदानंदघन आहे, हें राजाच्या प्रश्नाला उत्तर पिप्पलायन मुनींनीं तिसऱ्या अध्यायांत उत्कृष्ट रीतीनें दिलें आहे. त्यांतील ३६ वा श्लोक सुंदर आहे.

**नैतन्मनो विशति वागुत चक्षुरात्मा**
**प्राणेन्द्रियाणि च यथाऽनलमर्चिषः स्वाः ।**
**शब्दोऽपि बोधक निषेधतयात्ममूल-**
**मर्थोक्तमाह यद्दते न निषेध सिद्धिः ।। ३६ ।।**

ज्या परब्रह्माला मन, वाणी, चक्षु, बुद्धि, प्राणाची क्रियाशक्ति विषय करीत नाहींत. शब्द देखील तेथें अपुरा पडतो. " शब्दोऽपि बोधक निषेधतया " नेति नेति या निषेध शब्दानेंच आत्म्याची सिद्धि करूं शकतो. असा अवाङ्मनसगोचर आत्मा – ब्रह्मच जीवांचें प्राप्य आहे.

मनुष्यमात्रांना ब्रह्मज्ञानाचा अधिकार आहे. मग तो कोणत्याहि वर्णाचा किंवा आश्रमाचा असो. स्त्री पुरुष कोणीही असो. असा भागवत धर्मप्रवर्तकांनीं

" सिद्धांत " गीता भागवतादि ग्रंथांतून सांगितला आहे. परंतु जे कांहीं पंडित लोक वेदाचा आधार घेऊन " तुम्हाला ( स्त्री शूद्रांना ) ब्रह्मज्ञानाचा अधिकार नाहीं " असें म्हणतात. पण या पंडितांनीं भागवत धर्माच्या ग्रंथांचें परिशीलन केलें नाहीं असें म्हणावें लागतें. खुद्द तुकाराम महाराज तरी " वेद सर्वस्व खरेंच बोलतो " असें कोठें मानतात ?

**तरावया आधीं शोधा वाणी । वांझट बोलणी वारा त्याची ॥१॥**

वेदवाणी ( १ ) यथार्थ ( २ ) भयानक व ( ३ ) पुष्पित अशी तीन प्रकारची आहे. अर्थात् भागवत धर्मप्रवर्तकांनीं मनुष्यमात्रांना ब्रह्मज्ञानाचा अधिकार आहे असें प्रतिपादिलें आहे. भगवंतांनीं ८४ लक्ष योनि उत्पन्न केल्यानंतर रचलेल्या सृष्टीकडे पाहिलें असतांना " **तंव निजात्मप्राप्ती लागोनी । न देखे कोणी अधिकारी ।** " म्हणून मनुष्य देह मोठ्या आदरानें निर्माण केला असतां

**देखोनी मनुष्यदेहासी । सुख झालें भगवंतासी ।**
**अधिकार ब्रह्मज्ञानासी । येणें देहेंसी मत्प्राप्ती ॥**

खुद्द भगवंतांनीं जो भागवत धर्म सांगितला तो मनुष्यमात्रास सांगितला असल्यामुळें " तो भागवत धर्म " म्हणजे " मानव धर्म " होय.

**मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।**
**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥**

गी. अ. ९ श्लो. ३२

गीताकारांनीं म्हणजे श्रीभगवंतांनीं सर्वांकरितां मोक्षमार्ग खुला केला आहे. या श्लोकावरील श्रीज्ञानराजांच्या ओव्या अवश्य पहाव्यात. तसेंच " ये वै भगवता प्रोक्ताः " या श्लोकावरील श्रीनाथमहाराजांच्या ओव्या पाहिल्या म्हणजेहि सत्यता पटेल. किंतु भागवत धर्माचें स्वरूपच असें आहे कीं,

**न करितां वेदशास्त्रव्युत्पत्ति । ऐशिया अज्ञानां निजात्मप्राप्ती ।**
**सुगम जोडे ब्रह्मस्थिती । यालागीं हरिभक्ति प्रकाशिली देवें ॥**

ए. भा. अ. २ ओ. ३१०

**न करितां वेदशास्त्रपठण । जड मूढ म्हणाल तरले कोण ।**

याची यादी मुळांतच ३११ ते ३१६ ओव्यापर्यंत पहावी.

" भागवत धर्म म्हणजे परमात्म्याची निर्हेतुक निष्काम प्रेमलक्षणा भक्ति" असल्यामुळें त्या भागवत धर्माचें ज्यांनीं ज्यांनीं आचरण केलें ते ते सर्व परमात्म्याचे भक्त, भागवत धर्माचे अधिकारी होते हे वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येईल. वेदशास्त्रव्युत्पत्ति नसतांनाहि " ब्रह्मस्थिति " प्राप्त झालेल्यांचा नामनिर्देश या ओव्यांतून केलेला आहे. यांत कांहीं अविवेकी असे गवळी, गोधनें, गोपाळ, गोपी स्त्रिया, गजेंद्रादि पशु ब्रह्मस्वरूपीं प्राप्त झाल्याचें वर्णिलें आहे. केवळ ब्राह्मणादि जातीच ब्रह्मप्राप्तीचे अधिकारी नसून जे जे भगवंताला भजले ते सर्वच ब्रह्मरूप झाले असें भगवान् भागवताच्या १४ व्या अध्यायांत म्हणतात. लोकव्यवहारांतील दांभिक प्रतिष्ठा सोडून शुद्ध भावानें जो माझ्या भजनीं लागला तो जातीनें जरी चांडाळ असला तरी तो मला अत्यंत पूज्य आहे. ।।२८९।। केवळ अमंगळ अशीं अस्वलें व माकडें किंवा ताक पिणारीं रानांत भटकणारीं गवळ्यांचीं पोरें, तीं सुद्धां मी पूज्य मानिलीं. ।। २९० ।। जो जातीनें नीच योनीला प्राप्त झाला पण भक्तिभावानें मत्स्वरूपाला पोंचल्यामुळें त्रैलोक्यांत पूज्य झाला असून तो महत्त्वाला चढला. ।। २९१ ।।

**विप्राद्द्विषड्गुणयुता । ये श्लोकींची हेचि कथा ।**
**जळो त्या द्विजाची पवित्रता । जो माझ्या भजनपथा विन्मुख ।।२९२।।**
**त्याहूनि श्वपच गा वरिष्ठ । जो माझ्या भजनीं भजननिष्ठ ।**
**त्यातें वंदिती पुराण श्रेष्ठ । कवि वरिष्ठ महाकवी ।। २९३ ।।**

भगवान् म्हणतात, उद्धवा, विदुर हा खरोखर दासीपुत्र असून मला आवडता झाला. म्हणून परमार्थ साधनाला जाति अथवा जातीचा अभिमान उपयोगी नाहीं. ।। २९४ ।।

**मज पावावया साचोकारें । भावो सरे जाति न सरे ।**
**यालागीं अवघ्यांचे धुरे । म्यां वनचरें उद्धरिलीं ।। २९५ ।।**
**पक्ष्यामाजी केवळ निंद्यू । जटायू उद्धरिला म्यां गीधू ।**
**अंत्यज उद्धरिला धर्मव्याधु । भाव शुद्धू मदर्थी ।। २९६ ।।**
**भलता हो भलते जाती । त्यासी माझी भावार्थे भक्ती ।**
**तोचि जाण पां पवित्र मूर्ती । माझी प्राप्ती मद्भजनें ।। २९७ ।।**

अर्थात् सर्व वर्ण – जाति, स्त्री, शूद्रादि अधिकारी होत. परंतु याला शास्त्रप्रमाण काय ? का उगीच भागवत धर्म म्हणजे " स्वकपोलकल्पित कल्पना " तर नाहीं ना !

## (ना) भागवत धर्माचें शास्त्र

भागवत धर्माचें शास्त्र तेंच कीं,

**सगुण अथवा निर्गुण । जेथ भगवत्स्वरूपवर्णन ।**
**कां भगवंत बोलिला आपण । अथवा भगवद्गुणकीर्ति जेथें ॥**
**तें तें राया शास्त्र जाण । आवडे जैसे जीवू प्राण ।**
**विशेषेसी ज्ञानकथन । सप्रेमपूर्ण पढियंते ॥**

ए. भा. ३ ओ. ५०३–५०४

ज्यात भगवताच्या सगुण अथवा निर्गुण स्वरूपाचें वर्णन असतें किंवा भगवंतानें जें सांगितलें असतें अथवा ज्यांत भगवद्गुणानुवादाचें निरूपण असतें, राजा ! तें हें " भागवत शास्त्र " असें तूं समज. भागवत ( वारकरी ) वैष्णवांना तें शास्त्र जीव कीं प्राण वाटतें. त्यांतहि विशेषेकरून ज्ञाननिरूपणावर त्या भागवतांचें फार प्रेम असतें. तें त्यांना अतिशय आवडतें. असें शास्त्र म्हणजे १. उपनिषदें २. श्रीमद्भगवद्गीता ३. श्रीमद्भागवत. हेच प्रधान ग्रंथ सांप्रदायिकांनीं उचित ठरवून श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं गीतेवर टीका लिहिली असून भागवताच्या एकादशस्कंधावर श्री नाथांनीं टीका लिहिली. तो संपूर्ण ग्रंथ भागवत धर्माचा सांगोपांग विचार करणारा असा अत्यंत रसाळ आहे.

( अ ) प्रबुद्ध मुनींनीं भागवत शास्त्र सांगतांना सगुण अथवा निर्गुण स्वरूपाचें वर्णन करणारें " तें भागवत शास्त्र. " त्यापैकीं उपनिषदें " निर्गुण परब्रह्म स्वरूप " सांगत असून सृष्टीचें आदिकारण " सगुण ब्रह्माचें " तसेंच " जीवात्मा ", " बंध ", " मोक्ष ", या संबंधी वर्णन करीत असल्यामुळें सर्व तत्त्वज्ञानाचा पाया म्हणजे हीं उपनिषदें होत. म्हणून ज्ञानेश्वर महाराजादि साधुसंतांनीं वेदाचा उत्तर भाग ( उत्तर मीमांसा ) मनीं धरून आपल्या ग्रंथांतून

त्या उत्तर मीमांसेचें सार लिहून ठेविलें आहे. उपनिषदांविषयीं ज्ञानेश्वर महाराजांना फार मोठा आदर होता.

**उपरि दशोपनिषदें । जिये उदार ज्ञान मकरंदें ।**
**तिये कुसुमें मुकुटीं सुगंधें । शोभती भली ॥ १८ ॥**

ज्ञा. अ. १

ईश, केन, कठादि दशोपनिषदें प्रत्येकानें अवश्य वाचावीं असें विधान त्यांनीं केलें असून जो न वाचील तो अज्ञानी, जडमूढ होय असें ज्ञानराजांनीं म्हटलें आहे.

**उपनिषदांकडे न वचे । योग शास्त्र न रुचे ।**
**अध्यात्मज्ञानीं जयाचें । मनचि नाहीं ॥**

ज्ञा. अ. १३–८२७

परंतु उपनिषदें वाचावीं कशीं ? भाषा संस्कृत व दुर्बोध. हें जाणूनच कीं काय ज्ञानेश्वरमहाराज, नाथमहाराज, तुकाराममहाराज यांनीं आपल्या ग्रंथांतून उपनिषदांचें मौलिक तत्त्वज्ञान ग्रथित केलें.

( ब ) गीता हा ग्रंथ तर भागवतधर्मीयांचा जणूं प्राण आहे.

( क ) श्रीमद्‌भागवत व त्यांतील एकादशस्कंध नाथभागवत तर प्राणापेक्षांहि प्रिय आहे. म्हणूनच श्रीतुकाराम महाराजांनीं भागवत सांप्रदायाची ग्रंथनामावली सांगतांना या दोनच ग्रंथांचा नामनिर्देश केला आहे.

**गीता भागवत करिती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचें ॥**

आतांपर्यंत आपण राजाच्या नऊ प्रश्नांपैकीं भागवत धर्म, भगवद्भक्त, परब्रह्म व अभक्त अधोगति अशा चार प्रश्नांचीं उत्तरें वरील चार कलमांत सोपपत्तिक व सप्रमाण दिलीं आहेत. आतां राहिलेल्या पांच प्रश्नांचीं उत्तरें " भागवत धर्माची साधना " या अवच्छेदकांत देऊं.

## ( थ ) भागवत धर्माची साधना

भवबंधाला मूळ कारण असलेली माया म्हणजे भ्रम, त्या भ्रमनिवृत्तिकरितां राजानें विचारलें असतां भागवतकार सोपा उपाय सांगतात कीं, त्या " सद-

सद्‌विलक्षण अनिर्वचनीय मायेची " निवृत्ति भगवद्‌भक्तीनें अनायासें होते. त्याकरितां श्री नाथमहाराजांनीं गीतेंतील ७ व्या अध्यायाच्या श्लोकाचें प्रतीक पुराव्याकरितां व्याख्यानांत घेतलें आहे.

**ते महामायेची निवृत्ती । करावया दाटुगी भगवद्‌भक्ती ।**
**स्वयें श्रीकृष्ण येचि अर्थी । बोलिला अर्जुनाप्रती गीतेमाजी ॥४६२॥**

भगवद्‌गीता श्लोकार्ध—

**मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ।**

* * *

**माया म्हणिजे भगवच्छक्ती । भगवद्‌भजनें तिची निवृत्ती ।**
**आन उपाव तेथें न चलती । भक्त सुखें तरती हरिमाया ॥४६३॥**
**हरीची माया हरिभजनें । हरिभक्ति सुखेंचि तरणें ।**
**हें निजगुह्य अर्जुनाचेनि कारणें । स्वयें श्रीकृष्णें सांगितलें ॥४६४॥**

ए. भा. अ. २

प्रिय वाचक, माया माया म्हणून भिण्याचें कांहीं कारण नाहीं. भगवद्‌भक्तांना भगवद्ध्यान, नामस्मरणानें मायेचा नियन्ता स्वामीच जर वश होतो, तेथें ती " अघटित घटना पटीयसी माया " तरून जाण्यास काय अवघड आहे ? विश्वास, श्रद्धा पाहिजे. असे नामनिष्ठ भक्त भगवद्ध्यान, पूजनादिकांमध्यें रत असल्यामुळें त्यांना अष्टांगयोग अथवा कर्माची आवश्यकता नाहीं. राजानें भागवत धर्मांत कर्म म्हणजे काय ? असा प्रश्न विचारला असतां त्याचें उत्तर देतांना भागवतकार म्हणतात, भगवद्‌भजन करणें हेंच भागवतांचें कर्म. परमात्मशरणागति हेंच भागवतांचें कर्म. कारण, तो भगवद्‌भक्त ( १ ) देव, ( २ ) ऋषि, ( ३ ) पितर या ऋणत्रयांतून मुक्त असल्यामुळें त्याला वर्णाश्रमानुसार कर्मधर्माची आवश्यकता नाहीं.

**ज्यांसी अनन्य भगवद्भजन । ते कदा नव्हती कर्माधीन ।**
**कर्म ज्याचें आज्ञाधीन । त्या हरीसी शरण जो झाला ॥**
**तो नव्हे कर्माचा सेवक । नव्हे देवांचा पाइक ।**
**नव्हे प्राकृतांचा रंक । अनन्य भाविक हरिभक्त ॥**

1.90

**जो हरीचा शरणागत । तो कोणाचा नव्हे अंकित ।**
**कर्माकर्मी तो अलिप्त । नित्य मुक्त ऋणत्रयासी ॥**

ए. भा. अ. ५ ओ. ४६७ ते ४६९

म्हणून भगवद्‌भक्तांना कर्माची चोदना नाहीं. स्वधर्माचरणानें चित्ताची शुद्धि होते. परंतु माझा भक्त भजनानेंच निर्मळ होत असल्यानें स्वकर्म न करणें त्याला बाधक होत नाहीं.

**एवं कर्माची चोदना । मद्‌भक्तासी नाहीं जाणा ।**
**करितां श्रवण कीर्तना । कर्मबंधना नातळती ॥ १०३ ॥**

यावर नाथांनीं अशी शंका मांडली आहे कीं, वर्णाश्रमानुसार कर्म न केल्यास शास्त्रानें " प्रत्यवाय " सांगितला आहे. तेव्हां प्रत्येकानें शास्त्राचे विधि निषेध पाळावेत. असा पूर्वपक्ष करून भगवद्‌भक्तांना " भक्ति प्रेमानें परमात्म्याला वश करावें म्हणजे कर्माकर्म, धर्माधर्म, विधिनिषेध यांची बाधा होत नाहीं, " असें दुसऱ्या अध्यायांत स्पष्ट म्हटलें आहे.

**श्रुति स्मृति हे दोन्ही डोळे । येणेंवीण जे आंधळे ।**
**तेही हरिभजनीं धांवतां भावबळें । पडेना आडखुळे सप्रेम योगे ॥३३१॥**
**प्रेमेवीण श्रुतिस्मृतिज्ञान । प्रेमेंवीण ध्यान पूजन ।**
**प्रेमेवीण श्रवण कीर्तन । वृथा जाण नृपनाथा ॥३३२॥**
**ऐसा भागवत धर्मे गोविंदु । तुष्टला चाले स्वानंदकंदु ।**
**तेथें केवीं रिघे विधिनिषेधु । भक्ता प्रमादु कदा न बाधी ॥३३६॥**
**जेवीं का स्वामीचिया बाळा । अवरोधु न करवे द्वारपाळा ।**
**तेवीं भागवत धर्म भजनशीळा । कर्मार्गळा बाधूं न शके ॥३३७॥**
**भागवत धर्मे राहे कर्म । तंव तंव सुखावे पुरुषोत्तम ।**
**सप्रेमभक्ता बाधी कर्म । हा वृथा भ्रम भ्रांतासी ॥३३९॥**
**अजामिळा कर्मबाध । यमपाशीं बांधिता सुबद्ध ।**
**तेथें प्रगटोनि गोविंद । केला अति शुद्ध नाममात्रें ॥३४१॥**

अशा नामनिष्ठ महाभागवतांना कर्माकर्माच्या विधिनिषेधाचा बडगा कोणीहि उगारूं शकत नाहीं. कलियुगांत नामस्मरणाखेरीज ( उपासनेखेरीज )

दुसरा मार्गच नाहीं. कारण कर्मधर्माचें "उचित विधि विधान" कळत नाहीं व कळलें तर घडत नाहीं. अर्थात् "**कलौ तद्धरिकीर्तनात्** ।" याच साधनाचा भागवत धर्मियांनीं स्वीकार करून चहूंकडे डांगोरा पिटून हरिभक्तीच्या नामगजराचा झेंडा आसेतु हिमाचलपर्यंत फिरविला, हें श्रीनामदेवरायांनीं "श्री ज्ञानदेवांची तीर्थावळी" या प्रकरणांत सुंदर विवेचिलें आहे.

अर्थात् भागवत धर्मामध्यें नाममाहात्म्य, भगवच्चरित्र गुणगान करणें हेंच भागवतांचें कर्म आहे. पण कोणाचे गुण, चरित्राचें गान करणें हा एक विचाराचा प्रश्न आहे ! राजानें भागवत धर्मात अवतार चरित्र सांगा म्हणून विचारलें असतां त्याच्या उत्तरांत मर्यादा पुरुषोत्तम भगवान् श्रीरामचंद्र व पुराण पुरुषोत्तम भगवान् श्रीकृष्ण यांचेंच चरित्र उच्चारावें, गावें, नामही यांचेंच घ्यावें, असें भागवतकार सांगतात.

**नाना अवतार अतिगहन । त्यांत श्रीराम कां भगवान् कृष्ण ।**
**यांचें चरित्र अति पावन । त्यांचें चरणवंदन सांगत ।।**

ए. भा. अ. ५-३६५

* * *

**शिळा तारिल्या सागरीं । गोवर्धन धरिला करी ।**
**निद्रा न मोडतां सकळ नगरी । द्वारकेमाझारी आणिली मथुरा** ५४५
**निमाला गुरुपुत्र दे आणूनी । मुखें प्राशिला दावाग्नि ।**
**गतगर्भ आला घेऊनी । निजजननी तोषार्थ** ।।५४६।।
**जो सुखैकमूर्ती निजस्वभावे । तोही जन्मकर्मगुणवैभवें ।**
**गातां कीर्तनीं अति सुखावें । स्वानंदगौरवें डुल्लतु** ।।५४८।।

ए. भा. अ. ३

म्हणून भागवत धर्माची उपासना या राम कृष्ण अवतार मूर्तींचीच होय तें शास्त्रतः योग्य आहे. भगवान् शुकाचार्यांनीं अ. २ मध्यें म्हटलें आहे,

**कोनु राजन्निन्द्रियवान् मुकुन्दचरणाम्बुजम् ।**
**न भजेत् सर्वतो मृत्युरुपास्यममरोत्तमैः** ।। ११-२-२

**सांडूनि श्रीकृष्णचरण । इंद्रादि देवांचें करितां भजन ।**
**ते देव मृत्युग्रस्त पूर्ण । मा भजत्याचें मरण कोण वारी ।।**

ए. भा. २-३३

भागवत संप्रदायांत इंद्रादि देवांचें भजन त्याज्य आहे. कारण ते जरी पदवीधर देव असले तरी त्यांच्या ठिकाणीं देवपदाची वाच्यता नाहीं. अर्थात् उपास्य देवता भगवान् श्रीकृष्ण होय. परमात्मा निर्गुण व सगुण रूप आहे व त्याला अधिकारपरत्वें भजावें हा भागवत धर्माचा विधि आहे.

**निर्गुणी पावले सगुणी भजतां । विकल्प धरितां जिह्वा झडे ।।**

असें नाथांनीं म्हटलें आहे. निर्गुण बोध व सगुण प्रेम दोन्ही भागवतांना—वैष्णवांना एकाकालीं अनुभवावयाला मिळतात. म्हणून सगुण मूर्तीचें ध्यान करावें. याप्रमाणें यथारुचि व यथाधिकार देवाच्या निर्गुण स्वरूपाला अथवा सगुण मूर्तीला अवश्य भजावें असें नाथांनीं भागवतांत म्हटलें आहे. अशा सुंदर, सुरेख, सगुण मूर्तीचा उल्लेखहि श्रीनाथांनीं केला आहे.

**ज्या उपासक पूजिती । त्या जाणाव्या चला मूर्ती ।**
**ज्या पांडुरंगादि द्वारावती । त्या स्थावरामूर्ती पुराणोक्त ।।**

ए. भा. ३-५७०

( श्री ) भागवत धर्माचें उपास्य दैवत श्री पांडुरंग.

( वि ) त्याकरितां पंढरीची वारी. " **आषाढी कार्तिकी पंढरीची वारी । साधन निर्धार आन नाहीं** ।। " असें नाथांनीं म्हटलें आहे. या पुण्य क्षेत्राचा नामनिर्देश भागवतांतहि आला आहे.

**पावन पांडुरंगक्षिती । जे कां दक्षिण द्वारावती ।**
**जेथ विराजे विठ्ठलमूर्ती । नामें गर्जती पंढरी ।।**

ए. भा. अ. २९-२४५

( ठ ) जशी पंढरपूरची वारी हें भागवत धर्माचें अंग आहे, तसेंच एकादशीव्रत हेंहि भागवतांचें अत्यंत आवडतें व्रत आहे व त्याबरोबरच

पर्व विशेष भागवत धर्मीं । नृसिंहजयंती रामनवमी ।
वामनजयंती जन्माष्टमी । उत्तमोत्तमी शिवरात्र ॥

ए. भा. ११ ओ. १२५७

*　　　*　　　*

वैष्णवासी शिवरात्रि विरुद्ध । हें बोलणें अति अबद्ध ।
सकळ पुराणीं अविरुद्ध । व्यास विशुद्ध बोलिला ॥ ५८ ॥
जे पर्वणी प्रिय चक्रपाणी । जे सकळ कल्याणाची श्रेणी ।
उभय पक्षा तारिणी । वैष्णव जननी एकादशी ॥ ६२ ॥
जे शुक्ल कृष्ण पक्ष विधी । भक्त वाऊनिया खांदीं ।
नेऊनिया सायुज्यसिद्धी । मोक्षपदीं बैसवी ॥ ६३ ॥

( ल ) त्या व्रत महोत्सवाच्या वेळीं व शुद्ध वद्य एकादशीस वैष्णवांचा मेळ मेळवून कीर्तनीं गदारोळ करावा असें नाथांनीं म्हटलें आहे व भजनाच्या उपांगांचा उल्लेख केला आहे.

रामकृष्ण हरि गोविंद । ऐशीं नामांचे प्रबंध ।
गातां नाना पदें छंदबंध । करावा विनोद कीर्तनीं ॥ ७३२ ॥
जेणें आत्मतत्त्व जोडे जोडी । ऐशिया पदांची घडी मोडी ।
कीर्तनीं गावी गा आवडी । संत परवडी बैसवूनी ॥७३३॥
श्रुति मृदंग टाळ घोळ । मेळवूनि वैष्णवांचा मेळ ।
कीर्तनीं करावा गदारोळ । काळ वेळ न म्हणावा ॥७३४॥
दशमी दिंडी जागरणें । आळस सांडूनि गावे वाणें ।
हावभाव दाखवणें । कर्म स्मरणें माझेनी ॥ ७३५ ॥

ए. भा. अ. ११

राहता राहिला राजाचा एक महत्त्वाचा प्रश्न.

कस्मिन् काले स भगवान् किं वर्णः कीदृशो नृभिः ।
नाम्ना वा केन विधिना पूज्यते तदिहोच्यताम् ॥

अ. ५ । १९

याचें उत्तर करभाजनांनीं या पांचव्या अध्यायांत दिलें असून कृतयुगांत, त्रेतायुगांत व द्वापारांत कोण देवता, काय पूजा विधान, याचा विस्तार केला असून चालू कलियुगांत काय करावें हेंहि सांगितलें आहे. एवढेंच सांगून लेखणीला विराम देतों. कलियुगांत श्रीकृष्णभक्तीवांचून म्हणजे श्रीविठ्ठलाच्या भक्तीवांचून, कीर्तनावांचून, नामस्मरणावांचून अन्य उपाय नाहीं असें भागवतकारांनीं म्हटलें आहे.

**मधुपर्कादिक विधान । सांग केलें जें पूजन ।**
**तेंही मानोनियां गौण । आवडे कीर्तन कलियुगीं कृष्णा ॥**

अ. ५–३४५

शुकाचार्यांनीं असें म्हटलें आहे कीं,

**कलेर्दोषनिधे राजन्नास्ति ह्येको महान् गुणः ।**
**कीर्तना देव कृष्णस्य मुक्तसंगः परं व्रजेत् ॥**
**कृते यद्ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः ।**
**द्वापारे परिचर्या[illegible]कीर्तनात् ॥**

भा. १२। ३ । ५१–५२

हे राजा, कलि हा जरी सर्व दोषांचा निधि आहे तरी त्याच्यांत एक मोठा गुण आहे तो हा कीं, मनुष्य केवळ हरीच्या संकीर्तनेकरून मुक्तसंग होऊन उत्तम पदास जातो. कृतयुगांत भगवान् विष्णूचें ध्यान करणारास जें फल मिळतें, त्रेता युगांत यज्ञांनीं त्याची आराधना करणारास जें फल मिळतें, द्वापारांत पूजा कर्मानें जें फल मिळतें, तेंच संपूर्ण फल कलियुगांत हरीचें संकीर्तन करणारास मिळतें. खरोखर हे दोन्ही श्लोक अत्यंत महत्त्वाचे असून ते भागवतांना अत्यंत प्रिय आहेत. म्हणून

**ज्यासी न करवे कथा श्रवण । अथवा न टके हरिकीर्तन ।**
**तिहीं करावें नामस्मरण । राम कृष्ण गोविंद ॥ ५४६ ॥**

**अच्युत नामाची निजख्याती । चेवल्या कल्पांती हो नेदीच्युती ।**
**त्या नामातें जे नित्य स्मरती । ते जाण निश्चितीं अच्युतावतार ५४७**

**रामकृष्णादि नामश्रेणी । अखंड गर्जे ज्यांची वाणी ।**
**त्यांसी तीर्थें येती लोटांगणी । सुरवरचरणीं लागती स्वयें ॥ ५४८ ॥**

बाप नामाचें निज तेज । यम वंदी चरणरज ।
नामापाशीं अधोक्षज । चतुर्भुज स्वयें तिष्ठे ॥ ५४९ ॥
नामाचेनि पडिवाडे । कायिसे भवभय बापुडें ।
कळिकाळाचें तोंड कोणीकडे । नामापुढें रिघावया ॥ ५५० ॥
जेवढी नामाची शक्ती । तेवढें पाप नाहीं त्रिजगतीं ।
नामापाशीं चारी मुक्ती । जाण निश्चितीं विदेहा ॥ ५५१ ॥

ए. भा. अ. २

याप्रमाणें नामनिष्ठ भागवतांनीं भगवत्प्रिय होण्याकरितां काय करावें हें साररूपानें श्रीनाथांनीं एका अभंगांत दिलें आहे. तेवढा अभंग लिहून हा लेख संपवूं.

आवडे देवासी तो ऐका प्रकार । नामाचा उच्चार रात्रंदिन ॥१॥
तुलसीमाळ गळां गोपीचंदन टिळा । हृदयीं कळकळा वैष्णवांचा ॥२॥
आषाढी कार्तिकी पंढरीची वारी । साधन निर्धारीं आन नाहीं ॥३॥
एका जनार्दनीं ऐसा ज्याचा नेम । तो देवा परमपूज्य जगीं ॥ ४ ॥

हरि: ॐ तत्सत् ।

---

## कर्में ईश्वरार्पण केल्यानेंच नैष्कर्म्य सिद्धि

मी एकु कर्म कर्ता । ऐशी उठो नेदी अहंता ।
तें कर्मचि स्वभावतां । अर्पी श्रीअनंता ईश्वरातें ॥
एवं ईश्वरीं जें अर्पे कर्म । तें कर्म होय निर्धर्म ।
याचि नांव परम । नैष्कर्म्य निजसिद्धी ॥
हातीं आतुडावया मासा । गळीं लाविजे अल्प आमिषा ।
तेवीं निष्काम करावया मानसा । वेदु फळाशा प्रलोभी ॥
हो कां फळाचिये चाडें । स्वधर्म कर्मी प्रवृत्ती घडे ।
तेणें नैष्कर्म्य सिद्धि आतुडे । हें वेदांचें फुडें निजगुह्य ॥

ना. भा. अ. ३–७९२, ९३, ९७, ९९

---

## भक्त आपलीं सर्व इंद्रियें भगवंताच्या भक्तीकडे लावतात.

दारा सुत गृह प्राण । करावे भगवंतासी अर्पण ।
हे भागवत धर्म पूर्ण । मुख्यत्वें भजन या नांव ।।
अकराही इंद्रियवृत्ती । कैशा लावाव्या भगवद्भक्तीं ।
ऐक राया तुजप्रती । संक्षेपस्थिती सांगेन ।।
मनें करावें हरीचें ध्यान । श्रवणें करावें कीर्तिश्रवण ।
जिव्हेनें करावें नामस्मरण । हरिकीर्तन अहर्निशी ।।
करीं करावें हरिपूजन । चरणीं देवालयगमन ।
घ्राणीं तुलसी आमोद ग्रहण । जिहीं हरिचरण पूजिलें ।।
वाढतेनि सद्भावें जाण । चढतेनि प्रेमें पूर्ण ।
अखंड ज्यासी कृष्णभजन । त्यासी भवबंधन असेना ।।

ना. भा. अ. २–२९८ ते ३०१, ३०३

---

## विषयासक्ति सांडून कीर्तन करावें.

विषयसुखाचे आसक्ती । कोणा नाहीं झाली तृप्ती ।
मृगजळाचिये प्राप्ती । केवि निवती तृषार्त ।।
यालागीं जाणतेनि मनुष्यें । नरदेहींचेनि आयुष्यें ।
विषयांचेनि सायासें । व्यर्थ कां पिसे कष्टती ।।
नरदेहा ऐसें निधान । अनायासें लाधलें जाण ।
सांडी सांडी अभिमान । तेणें समाधान पावसी ।।
पुढती नरदेहाची प्राप्ती । होईल येथ नाहीं युक्ति ।
यालागीं सांडूनि विषयासक्ति । भावें श्रीपति भजावा ।।
कलियुगीं सुगम साधन । नलगे योग याग त्याग दान ।
करितां निर्लज्ज हरिकीर्तन । चारी मुक्ति चरण वंदिती ।।

ना. भा. अ. ७–६४२ ते ६४६

---

# भागवताची वाटचाल

: लेखक :

डॉ. **शं. गो. तुळपुळे**, एम्. ए., पीएच्. डी.

( प्रमुख, मराठी विभाग, पुणें विद्यापीठ )

## भागवताचें महाक्षेत्र

भागवत ग्रंथावर महाक्षेत्राचें रूपक करून एकनाथांनीं एका ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं या क्षेत्रांत स्वानंदबोधाचें अगाध पीक पिकलें आहे. ( भा. ३१-४४४ ) हें आत्मज्ञानाचें पीक कसें काढावें याची समग्र प्रक्रिया नाथभागवतांत सांगितलेली असून तीच प्रस्तुत लेखांत थोडक्यांत पाहावयाची आहे. भागवत म्हणजे भक्त. त्याची आत्मज्ञानाच्या मार्गावरील वाटचाल, हा या लेखाचा विषय आहे. ही वाटचाल मुमुक्षूंना तर परमार्थप्रवण करीलच; पण भाळ्या भोळ्या विषयी जनांनाहि ती सुखद होईल असें एकनाथांचें आश्वासन आहे.

ही परमार्थिक वाटचाल ज्या साधनानें करावयाची तो नरदेह हें तिचें मुख्य सूत्र होय. नरदेहाची निंदा अनेकांनीं केली आहे; परंतु तसें न करतां नाथांनीं त्याचें मोठेपण गाइलें आहे हें त्यांचें एक वैशिष्ट्य होय. विवेक, वैराग्य आणि विचार हीं नरदेहींच शक्य असल्यानें तो चोवीस गुरूंचाही गुरु आहे असें एकनाथ म्हणतात. नरदेह त्यागूंहि नये व भोगूंहि नये; तर तो मध्यभागीं विभागून आत्मसाधनीं राखावा व त्याची आसक्ति न धरतां तो परमार्थासाठीं उपयोगांत आणावा असें त्यांचें सांगणें आहे. या देहाच्या जन्मापासूनच त्याच्यामागें मृत्यु लागलेला आहे हें ओळखून नरदेहाची प्राप्ती हा एक अलभ्य लाभ समजावा व त्याचें सार्थक करावें. ( भा. ९–२४९ ते ३३७ ) अर्थात् नरदेह हें साधन व आत्मज्ञान हें साध्य अशी त्यांची भूमिका आहे. या भूमिकेवर सर्वप्रथम विचार नैतिक गुणावगुणांचा करावा लागतो व तो एकनाथी भागवतांत विस्तारपूर्वक केलेला आढळतो. पैकीं दुर्गुणांचा त्याग व सद्गुणांचें संवर्धन या त्या विचाराच्या दोन बाजू होत व तिकडे आपण आतां वळूं.

## दुर्गुणत्याग

परमार्थपथावरील पहिला टप्पा म्हणजे दुर्गुणांचा त्याग हा होय. कारण, अंतःकरण शुद्ध करावयाचें म्हणजे प्रथम त्यांतील अवगुणांचा मळ नाहींसा केला पाहिजे. कोणते दुर्गुण विशेष त्याज्य होत याचें विवेचन एकनाथांनीं फार उत्कृष्ट-पणें केलें आहे. त्यांच्यामतें ' आशा ' हा सर्वांत मोठा दुर्गुण होय. कारण आशे-पाशीं सर्व पापें व दुःखें वसतात. आशा कशाचा विटाळ मानीत नाहीं, कीं काळ वेळ जाणत नाहीं. जगाचा जो नित्यदाता तो परमेश्वरहि या आशेपाशीं भिकारी होऊन आपल्या वैराच्या दारीं द्वारपाळ म्हणून राहिला, तेथें इतरांची काय कथा ? तेव्हां ' आशेपाशीं परम दुःख ' हें ओळखून आशा निःशेष घाल-वावी असें एकनाथ सांगतात. ( ८- ३०८ ते ३१४ ) तसेंच विषयतृष्णा हाहि एक विलक्षण रोग असून त्यामुळें गोड परमार्थ कडू लागतो व कडू विषय गोड वाटतो. अशा रोग्यांस विवेकासारखा ' धडफुडा ' वैद्याचार्य भेटेल तरच त्याची धडगत लागणार. म्हणून विषयाचें कुपथ्य चुकविणें असेल तर वैरा-ग्यास मनाच्या दारावर नित्य राखण ठेवावें व ईशानुसंधानाचें पथ्य लावून भव-रोग निर्दळावा असें भागवत सांगतें. ( १०-१० ते २५ ) कामासक्ति अति दारुण आहे. मद्यमद कांहीं काळानें उतरतो, धनमद निर्धनस्थिति आल्यावर निघून जातो आणि सर्व शक्ति क्षीण झाल्या कीं तारुण्यमदहि नाहींसा होतो. परंतु स्त्रीमद कदापि उतरत नाहीं. एकांतांत बसलें असतांहि वृत्ति कामक्षुब्ध होते व पुरुषाचें मन अज, श्वान किंवा खर यांप्रमाणें निर्लज्ज होऊन त्यास कर्मा-कर्मांचा विसर पडतो. स्त्रैणत्व हें स्त्रीसंगाहूनहि अधिक बाधक असून जसें गारुड्याचें माकड तसा स्त्रैण स्त्रियेच्या छंदानें नाचत असतो. तिच्यापायीं तो कुल-देवांची आणि मायबापांची तर उपेक्षा करतोच, पण शेवटीं प्रत्यक्ष गुरूसही ठकवून आपलें सर्वस्व तिच्यापायीं वहातो. सज्ञानासहि काम प्रवृत्त करणाऱ्या अशा स्त्रैणांची संगत परमार्थी पुरुषानें कटाक्षानें टाळावी असें एकनाथ सांगतात. मनांत कामक्षोभ निर्माण झाला असतां साधकानें कोणत्या युक्तीनें त्यांतून बाहेर पडावें तेंहि त्यांनीं सांगितलें आहे. अशा स्थितींत कर्मेंद्रियांच्या ठिकाणीं दृढ वैराग्य राखण ठेवल्यास कामक्षोभ आपोआप उपशम पावेल, बाह्य इंद्रियवृत्ति आवरल्यास विषयवासना मनांतच विरून जाईल असें त्यांचें म्हणणें आहे. अर्थात् हें नियमन

परस्त्रीविषयीं आहे, स्वस्त्रीविषयीं नाहीं. परंतु तेथेंहि विवेक हा पाहिजेच. अनावर मेघजळ धरण बांधून आटोक्यांत आणावें व मग त्याचे पाट काढून शेत पिकवावें, त्याप्रमाणें उच्छृंखल विषयवासनेस नियमित करावें असें एकनाथ पुनः पुनः सांगतात. कामभोगान्तीं विरक्ति उत्पन्न होईल हें त्यांच्यामतें मूर्खांचें बोलणें असून एका नारायणावांचून स्त्रीकामबंधन सोडविणारा दुसरा कोणीहि नाहीं. देवास भक्तिभावानें शरण गेल्यास हृदयीं नारायण प्रकट होऊन हृदयस्थ कामविकारांची जागा तो घेईल या विषयीं त्यांना मुळींच शंका वाटत नाहीं. (५-२०८ ते २११, १३-२०४ ते २२३, २६-१२५ ते २८६).

एका दृष्टीनें सर्व दोष विषयोपभोगाच्या लालसेंतून निर्माण होत असल्यानें त्यांचें याहून अधिक विवेचन करण्याचें कारण नाहीं. नाथभागवतांतहि 'विषय विषप्राय होत' हें तत्त्व पुनः पुनः सांगितलें आहे. अभिमान किंवा अहंकार या दोषाचें तसें नाहीं. '**न जातु कामः कामानां उपभोगेन शाम्यति ।**' हें खरें असलें तरी विषयवासनेला मर्यादा आहे, अंतहि आहे. याच्या उलट अभिमान हा एक मनोधर्म असल्यामुळे सुंभ जळला तरी पीळ राहतो या न्यायानें अभिमान सुटणें फार कठिण असतें. तसेंच ज्ञान आणि अज्ञान या दोन्ही स्थितींत तो सारखाच घातक असतो. नाथ म्हणतात,

**खैराचा शूळ तत्त्वतां मारी । मा चंदनाचा काय आन करी ।**
**तेवीं अभिमान दोहीं वरी । बाधकता धरी ज्ञानाज्ञानें ॥** १२-६०५

त्यांतहि अज्ञ जन आपलें भावबळ व संतकृपा या आधारांवर तरून जातील; पण ज्ञानी पुरुषास मात्र अहंकाराचें बंधन पडून त्यांतून सुटणें त्यास फार कठिण होऊन बसेल. कारण 'मी मुक्त झालों' यासारखा दुसरा अभिमान नाहीं. मुक्त शब्दावर श्लेष करून एकनाथ म्हणतात, कीं मीठ आणि मोतीं हीं दोन्हीं जळापासूनच होतात; पण मीठ जळींचें जळीं विरून जातें आणि मोतीं मात्र मुक्तपणानें मोलास चढून स्त्रियांच्या नाकांतील सुवर्णपाशांत अडकून पडतें. (१२-६०८ ते ६०९) म्हणून अविश्वास, म्हणजेच अभिमान हा त्यांच्यामतें सर्व दोषांचा मुकुटमणि असून तो साधकाच्या मनांत प्रकट होतांक्षणींच त्याच्या पारमार्थिक वृत्तीची धूळधाण करतो. मन एकदां अविश्वासानें ग्रासलें म्हणजे सद्भाव सहकुटुंब पळून जातो आणि सर्वत्र नास्तिकता दिसूं लागते. अशा रीतीनें गांवोगांवीं अविश्वास

निर्माण झाला कीं परमार्थराष्ट्र ओस पडतें व सर्वसाधारण लोक रानभरी होऊन साधकजन नागविले जातात. जो पोटांतून अविश्वासी किंवा अश्रद्ध आहे तो सदासर्वदा इतरांचे गुणदोषच्च पाहत राहतो व परमार्थाचा अखंड द्वेष करणें हा त्याचा स्वभाव होऊन बसतो. म्हणून अविश्वास किंवा अभिमान हा सकळ दोषांचा राजा होय, असें एकनाथ सांगतात. ( २२-३०८ ते ३२५ )

## सद्गुणसंवर्धन

दुर्गुणत्यागाचें येथवर केलेलें विवेचन एका दृष्टीनें अभावात्मक आहे. कारण केवळ दुर्गुणांचा त्याग केल्यानें परमार्थ साधणार नाहीं. त्याबरोबर सद्गुणांचें संवर्धनहि केलें पाहिजे व तें कसें करावें हें एकनाथी भागवतांत अनेक ठिकाणीं सांगितलें आहे. त्यापैकीं कांहीं स्थळांचा विचार येथें करतां येईल. सर्वप्रथम शास्त्रार्थ किंवा परमार्थाची नीतिप्रणाली. जे अत्यासक्त आहेत किंवा अति विरक्त आहेत अशांना या गोष्टीची म्हणजे विहिताविहित विचाराची विशेष आवश्यकता नाहीं. परंतु मुमुक्षूच्या दृष्टीनें मात्र शास्त्रार्थ अत्यंत महत्त्वाचा असून विषयवासना जिंकण्यास साधकाची वैचारिक बैठक निश्चित होणें अवश्य आहे व ती शास्त्रार्थाचा निजनेम जागृत असेल तरच होईल असें एकनाथांचें म्हणणें आहे. ( ३-५१० ते ५२० ) तसेंच साधकानें आपली कृष्णार्पणवृत्ति अहर्निश सांभाळली पाहिजे असेंहि ते सांगतात. आपले व्यवहार निमिषार्धेंहि विषयाकार न करतां त्यानें निजशरीर अष्टौप्रहर एका देवाच्या सेवेंत वेंचलें पाहिजे व लक्ष कोडीचें मोल देऊनहि ज्याची अर्ध घडी पुनः मिळणार नाहीं असें आपलें आयुष्य त्यांतील क्षणहि रिता जाऊं न देतां त्यानें परमार्थाकडे लावलें पाहिजे. ( ३-५५६ ते ५६५ ) निजबोधाची तळमळ त्याच्याठिकाणीं सतत जागृत पाहिजे. देव केव्हां कृपा करील आणि हा भवबंध तुटेल, निजबोधाचें दर्शन होऊन परमानंद केव्हां लाभेल असें सतत वाटत राहणें याचें नांव पारमार्थिक तळमळ. कोणी साधनाभिमानानें ठकतात, कोणी ‘ करूं करूं ’ म्हणतां मरून जातात, तर कोणी आडवाटीं शिरतात व मग त्यांचें करणें तसेंच राहतें. म्हणून सर्व ऐहिक सुखें सांडून एका नारायणाचें चिंतन करावें व त्याचाच ध्यास मनाला लावून घ्यावा. ( ७-२१८ ते २३४ ) याप्रमाणें साधकाच्या नैतिक जीवनाविषयीं सर्वसाधारण विचार करून एकनाथ कांहीं विशिष्ट गुणांच्या विवेचनाकडे वळले आहेत. पैकीं परमार्थ साध-

नाच्या दृष्टीनें शुचिता मुख्य होय असें त्यांचें म्हणणें आहे. अर्थात् त्यांचा भर अंतःशुचितेवर आहे हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. वासनेच्या मळानें मळलेलें मन सोवळें न करतां बाह्य पावित्र्याचा दिमाख करणें हें केव्हांही आंधळेपणाचेंच लक्षण होय. म्हणून सोन्यावर अग्नीचीं पुटें दिल्यानें जसें त्यांतील हिणकस जाऊन तेज चढतें, त्याप्रमाणें गुरुनिष्ठा व भावबळ या दोन साधनांनीं चित्तशुद्धि साधावी असें एकनाथ सांगतात. त्यांची पुढील ओवी या दृष्टीनें अमोल आहे.

**अंतर क्षाळिलें गुरुप्रतीति । बाह्य क्षाळिलें शास्त्रयुक्ती ।**
**ऐसें शुचित्व निज निश्चितीं । अद्वैतस्थिति तेथें नांदे ॥**

अहिंसेवरील त्यांचें व्याख्यान ज्ञानेश्वरांच्या व्याख्यानास सर्वस्वी धरून केलेलें दिसतें. तरी पण आकाश दचकेल म्हणून स्वैर हांक न देणें किंवा पाण्यांत उडी घेतली असतां तें दडपेल म्हणून जीवनाची दुथडी न हेलावतां तरंगन्यायानें बुडी देणें यासारखे त्यांचे अहिंसाविषयक विचार नवीन वाटतात. भूतांना दुःखलेश दिल्यास त्यांच्या ठिकाणीं असणारा भूतेश दुखवेल असा ज्याचा दृढ विश्वास आहे तो खरा अहिंसक असें एकनाथ म्हणतात. ( ३-४४९ ते ४६० ) दान, सत्य व तप या गुणांचें त्यांनीं केलेलें विवेचन वैशिष्ट्यपूर्ण आहे. भूतमात्राचें जन्ममरणाचें दुःख निरसून त्यास निजसुख देणें हें खरें अलौकिक दान, देवाच्या ठायीं अनुताप करणें हें परम तप व सर्वत्र आणि सतत समब्रह्म पाहणें हें खरें निजसत्य, याप्रमाणें नाथांच्या व्याख्या आहेत. ( १९-४४८ ते ४६२ ) मौनाविषयीं ते म्हणतात कीं, सद्गुरुवचन कानीं पडतांच स्तुति व निंदा हीं दोन्हीं गिळून बोल जागच्या जागीं निमणें याचें नांव मौन. मौनाविषयींची ही कल्पना ग्रीक तत्त्वज्ञानांतील मौनाच्या कल्पनेस (Epokhe) धरून आहे. परंतु यापुढें जाऊन जेव्हां एकनाथ सांगतात कीं रामनामाचें स्मरण हें महामौन आहे, तेव्हां नीतिशास्त्राकडे पाहण्याचा त्यांचा परमार्थभाव स्पष्ट होतो. ( ३-४१६ ते ४२६ ) या व इतर गुणांवर त्यांनीं एक रूपक रचिलें असून आत्मयज्ञ कसा करावा हें त्यांत स्पष्ट केलें आहे. प्रथम अंतः-करणाच्या गाभ्यांतील विकल्पाची भूमि खणून शम, दम व विरक्ति अशीं तीन कुंडें श्रद्धेच्या आवा साधून तयार करावीं; मग क्षराक्षरांच्या दोन अरणी स्थापून गुरुमंत्रानें मंथन करावें म्हणजे सूक्ष्म व निर्धूम अग्नि सिद्ध होतो. या अग्नींत युक्तीचें मंत्र म्हणत वैराग्याच्या रज तम द्रव्यांची आहुति द्यावी, लखलखीत ज्ञानशस्त्रानें

संकल्प पशूचा वध करावा व शेवटीं जीवभावाची पूर्णाहुति द्यावी म्हणजे त्यायोगें यज्ञभोक्ता परमात्मा श्रीनारायण सुखी होतो. याप्रमाणें जो कोणी आत्मयज्ञ करील त्याचें जन्ममरण निवारून त्यास ईशप्राप्ती होईल असें एकनाथांचें आश्वासन आहे. (१९-७३ ते ७८)

## कर्माकर्मविचार

परमार्थाच्या साधनांचें विवेचन करतांना एकनाथ प्रथम कर्माकर्मविचाराकडे वळले आहेत. ते स्वतः ज्या काळांत व समाजांत वावरत होते तो कर्मनिष्ठांचा असल्यानें त्यांनाहि आपलें विवेचन त्याच अनुरोधानें करावें लागलें आहे. मात्र तें करतांना कर्म, अकर्म, विकर्म इत्यादि शब्दजंजाळांत न घोटाळतां त्यांनीं सरळ मुद्याला हात घातलेला दिसतो. ज्ञानेश्वरांची मायानदी आठवून ते उघडच म्हणतात कीं या प्रपंचनगराभोंवतीं कर्मनदीचा वेढा असून प्रपंचनगराहून परमार्थाकडे येणारा प्रत्येक जण त्या नदींत बुडतो, असा आजवरचा अनुभव आहे. 'आम्ही तरलों' असें म्हणणारे तोंडाळ ज्ञातेहि या नदींत कर्मगुचक्या खातात आणि स्वतः बुडत असतांना येथें कर्म हाच एक तरणोपाय आहे असें सांगून इतरांनाहि बुडवतात. 'न कर्मणा' हें वेदवचन या कर्मठांच्या ध्यानींच येत नाहीं. (११-१०५३ ते ५८) किंबहुना '**ये कर्म नदींतें तरला। ऐसा न देखों दादुला।**' अशी वस्तुस्थिति असल्यानें कर्माचे हे सकळ उपाय सांडून देवास अनन्य प्रीतीनें भजावें, म्हणजे अशा भक्तास कर्मनदी कोरडीच होऊन जाईल असें एकनाथांचें सांगणें आहे. (११-१०६१ ते ७७) म्हणून शुद्धाशुद्ध कर्मांचा विचार करतांना रूढ व्याख्या बाजूस ठेवून त्यांनीं भक्तीस अनुकूल अशा स्वतंत्र व्याख्या बनविल्या आहेत. ज्या कर्मानें कर्माचा निरास होईल तें शुद्ध कर्म, जेथें सदा सम बुद्धि उपजेल तो पुण्य देश व जेव्हां चित्त सुप्रसन्न असेल तो साधकाच्या दृष्टीनें पुण्य काळ होय असें ते म्हणतात. (२१-१६५ ते २६५) याप्रमाणें एकनाथांना रूढ कर्म मान्य नसलें तरी ते ज्या समाजाला अनुलक्षून बोलत होते तो कर्मवादी असल्यामुळें त्यांनाहि प्रसंगोपात कर्माच्या अनुरोधानें बोलावें लागलें आहे. या दृष्टीनें त्यांनीं चार वर्ण व चार आश्रम यांचीं केलेलीं वर्णनें वाचनीय आहेत. पैकीं चातुर्वर्ण्याचें विवेचन ते रूढ कल्पनेस धरून करीत आहेत असें वाटलें तरी त्यांचा अंतस्थभाव निराळा असून सर्वभूतहितरति हा त्यांचा खरा सार्ववर्णिक धर्म आहे. (१७-१४३

ते ४२४ ) तसेंच चार आश्रमांपैकीं ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम व वानप्रस्थाश्रम यांचीं त्यांनीं केलेलीं वर्णनें कांहीं अंशीं पारंपारिक स्वरूपाचीं असलीं तरी संन्यासाश्रमाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि केवळ पारमार्थिक आहे. त्रिदंडी संन्यास म्हणजे काय तें सांगतांना ते म्हणतात कीं मौन धरणें, सत्य बोलणें किंवा रामनामाचें स्मरण करणें याचें नांव वाग्दंड, प्राणायामाच्या योगें निजप्राण स्वाधीन ठेवणें हा देहदंड व मनाचें चपळपण मोडून काढण्यासाठीं सतत ब्रह्मानुसंधान ठेवणें हा खरा मनोदंड होय. याप्रमाणें देह, वाचा आणि मन हीं ईश्वराकडे लागत नसतील तर केवळ वेणुदंडग्रहण हें दंभार्थ केलेलें देहविटंबन होय असें त्यांचें स्पष्ट मत आहे. त्यांच्या दृष्टीनें ' अहमेव नारायण ' हेंच संन्याशाचें ध्यान असून त्याचें सतत अनुसंधान धरणें हें त्याचें परम कर्तव्य होय. साहजिकच त्यांचा संन्यासी जीवमात्राविषयीं अनुकंपा बाळगतो व दुःखितांचें जीवित कडेला लावूनच पुढें जातो. ( १८–८७ ते १०३ ) विविध आश्रमधर्मांचीं हीं वैशिष्ट्यें एकनाथ प्रसंगोपात सांगत असले तरी त्यांचा कूटस्थभाव मात्र असा दिसतो कीं जो देवाचा अनन्य भक्त आहे त्यास आश्रमधर्म नाहीं. हा भक्त हरिभजनानें कृतकृत्य झाल्यामुळें त्याच्या ठिकाणीं विवेक, वैराग्य हीं आपोआप प्रकट होतात व अशा भक्तोत्तमास पुरुषोत्तम हाच स्वधर्म होऊन गेल्यानें तो आश्रम नेमातीत होतो असें त्यांचें म्हणणें आहे ( १७–३५८ ते ३६० )

## गुरुभक्ति

एकनाथांनीं सांगितलेला प्रत्यक्ष साधनमार्ग विचारांत घेण्यापूर्वी त्यांचे सद्गुरुविषयक विचार प्रथम पाहिले पाहिजेत. कारण ' **सद्गुरुविण ब्रह्मज्ञान । सर्वथा नव्हे नव्हे जाण ।** ' असा त्यांचा परमसिद्धांत असून आत्मस्वरूप आयतें, म्हणजे सिद्ध असलें तरी ते श्रद्धेच्या हातानेंच आत्मसात् केलें पाहिजे हें तत्त्व त्यांनीं पुनः पुनः सांगितलें आहे. पाऊस पडून भूमीला मार्दव आलें, कणगिहि बीजांनीं भरलेली आहे हें सर्व खरें; पण जोंवर जाणत्या माणसानें पेरणी केली नाहीं तोंवर पिकाची भाषा पोंचटच ठरणार. त्याप्रमाणें मुमुक्षूनें गुरुगवेषणाच्या कामीं क्षणाचीहि उसंत घेतां कामाचें नाहीं. आपणांस गुरु केव्हां भेटतील आणि जन्ममरणाचा हा फांसा केव्हां तुटेल अशा उत्कंठेनें त्याला वेड लागलें पाहिजे.

याप्रमाणें अवस्था झाली म्हणजे गुरुप्राप्ति दूर नाहीं असें एकनाथ म्हणतात. मात्र ती होतांना ' गुरु ब्रह्म दोन्ही एक ' अशी भावना आवश्यक असून साधकानें सद्गुरूपासून अनुग्रह त्यास सेवापूर्वक संतोषवून घेतला पाहिजे. तसेंच अनेक साधनांपैकीं एक साधन म्हणून गुरूकडे पाहणें हें त्यांच्या मतें मूर्खपणाचें लक्षण असून सद्गुरूस साधन करून साध्य त्याहून निराळें मानणें यासारखी सर्वस्वाची नागवण नाहीं. ( १०-१०७ ते १३९ ) कारण गुरु आणि भगवंत हे दोन नसून त्याच्या ठिकाणीं ऐक्याचीं सर्व लक्षणें वसत असतात. तीं सांगतांना एकनाथ म्हणतात, कीं जो कायावाचामनें अति कृपाळु आहे, जो शब्दज्ञानांत पारंगत असून ब्रह्मानंदांत सदा डुलत असतो, जो गुरुत्वाचा अहंभाव अणुमात्रहि धरत नाहीं, जो शिष्यापासून कदापि सेवा न घेतां उलट त्याचीच सेवा करतो, जो आपल्या योगक्षेमाचें साकडें शिष्यावर न घालतां उलट त्याचेंच संकट निवारतो व मुख्य म्हणजे ज्याच्याठायीं पूर्ण निजशांति नांदत असते तोच खरा सद्गुरु होय. ( ३—२८७ ते ३१५ ) अशा गुरूची सेवा हेंच परम पूजन असून साधकानें ती ' मुखीं सद्गुरूचें नाम, हृदयीं प्रेम व देहीं कर्म ' या वृत्तीनें केली पाहिजे. तशी ती केली असतां त्याच्या गुरुभक्तीस भुलून प्रत्यक्ष देव त्याच्या दारीं तिष्ठत राहील असें एकनाथ स्वानुभवानें सांगतात. ते म्हणतात,

**मज माझ्या भक्ताची गोडी थोडी । परि गुरुभक्तांची अति आवडी ।**
**सत्संगेविण रोकडी । सद्भक्ति चोखडी न पविजे ॥** ११-१५२७

परंतु गुरुसेवा किंवा गुरुभक्ति म्हणजे काय ? तर वादविवाद किंवा ' बोलाचा विनोद ' न करतां मौननिष्ठ होऊन राहणें. पश्चिमेचें कवाड जसें वाऱ्यानें एकसारखें खडखडत असतें त्याप्रमाणें उगीच बडबड न करतां सदा हरिनामाचें पठण करणें, शब्दज्ञान न मिरविणें, आत्ममौन न दाखविणें, वचनाभिमान न धरणें, सदा गुरूचें स्मरण ठेवणें व भक्तीच्या या नवरत्नांचें पदक सद्गुरूस अर्पण करणें हीच गुरुभक्ति होय. अशा प्रकारची सुंदर नवरत्नमाला जो आपल्या गुरूच्या कंठांत घालील तो धन्य होय असें एकनाथ म्हणतात ( १०-२२७ ते २३९ ) उलट सद्गुरुहि सर्व मानाभिमान सांडून हीन दीन होऊन राहणाऱ्या अशा एकनिष्ठ शिष्याची अहर्निश चिंता वहातात व त्याच्या पारमार्थिक सुखानुभूतीनें आपणहि सुखावतात शिष्यकृपेची एवढी कळकळ ज्याच्या ठिकाणीं आहे अशा

सद्गुरूपाशीं सकळ भागवत धर्म शिकावे असें एकनाथ म्हणतात. (३-६०५ ते ६१३)

तात्पर्य, साधकाच्या पारमार्थिक वाटचालींत सद्गुरूचें महत्त्व अनन्य-साधारण असून नाथांनीं त्यास केवळ कृपादृष्टीनें पाहून भवरोग मुक्त करणारा धन्वंतरी (१०-१ ते २०), वैराग्यरूपी शिंपल्यांच्याद्वारां ज्ञानरत्नें उपलब्ध करून देणारा चित्समुद्र (२०-१ ते ४), विकल्पाचे कल्लोळ चुकवीत, विवेकाच्या वल्ह्यानें कर्माकर्माचीं जळें तोडीत, भजन शिडाच्या बळावर तारूं सायुज्याच्या दिशेनें हांकणारा कर्णधार (२०-१७७ ते १८२), ऐक्याचें घटित पाहून आपलें आपणाशीं लग्न लावून देणारा ज्योतिषी (८-१ ते १२) स्वानुभवाच्या ऐरावतावर बसून स्वानंदमदानें उन्मत्त स्थितींत झुलत जाणारा अमर-पति (९-१ ते १३) व ज्याच्यासमोर निजबोधाचा गरुड हात जोडून उभा आहे आणि ज्याच्या हातांत लखलखीत तेजाचें स्वानुभवचक्र असून ज्याचा पांच-जन्य महाशब्द उठवीत आहे असा वैकुंठपति (२१-१ ते ११) याप्रमाणें विविध रूपकांच्या साहाय्यानें वर्णिलें आहे.

## भक्तिपंथ

प्रत्यक्ष साधनमार्ग सांगतांना एकनाथांनीं प्रारंभ सावधतेनें करावा असें सुचविलें आहे. आळस व निद्रा यांना दूर दवडून चिद्रूप होण्याचा हळूहळू अभ्यास करावा व प्रथम आसनजय हातीं घ्यावा. विषय मनाच्या व पवनाच्या आधीन असल्यानें आधीं पवनावर म्हणजे प्राणावर विजय मिळवावा. असें केल्यानें मन आपोआप स्थिर होईल व साधक मूळचा कितीहि विषयासक्त असला तरी त्याला परमार्थाची अधिकाधिक भूक लागेल असें त्यांचें म्हणणें आहे. (१३-२५४ ते २६१) ध्यानासाठीं योग्य आसन कोणतें ? या प्रश्नाचा विचार करतांना ज्या आसनावर बसलें असतां मन सुखावेल अशा सहजासनाची सूचना त्यांनीं केली आहे. (१४-४०२ ते ४१३) परंतु आसन किंवा प्राणायाम हीं ध्यानयोगाचीं केवळ बाह्य साधनें असल्यानें एकनाथांचा भर त्यांवर नसून भक्तीवर आहे. कारण भक्ति हा त्यांच्या मतें ध्यानमार्गाचा गाभा आहे. जड मूढ अशी कीटकी जड भिंगुरटीचें ध्यान करून जेथें तद्रूपता पावते तेथें अधिकारी साधकास भगवत्स्वरू-

पाची प्राप्ति होईल यांत अशक्य काय आहे ? जर जड जडास वेधूं शकतें तर मूळचाच ब्रह्मस्वरूप असणारा ध्याता त्याचा भ्रम ध्यानयोगानें फिटल्यानें तद्रूप कां होणार नाहीं असा एकनाथांचा प्रश्न आहे. (९-२३९ ते २४६) येथें ध्यानयोग या शब्दानें बिचकून जाण्याचें कारण नाहीं. कारण ध्यान म्हणजे नामस्मरण अशी त्यांची साधी व्याख्या आहे. सद्गुरूपासून मिळालेल्या नाममंत्राचें अखंड पुरश्चरण केल्यास भूतपिशाचादि बाधाच काय, पण सर्व विघ्नांचा आणि पातकांचा नाश होऊन साधकाच्या ठिकाणीं सर्वांभूतीं भगवद्भाव उत्पन्न होईल असें त्यांचें सांगणें आहे. ग्रासोग्रासीं नामस्मरण केलें असतां तें अन्नच ब्रह्मरूप होऊन जाईल व अशा रीतीनें तुकाराम म्हणतात त्याप्रमाणें '**विषय तो त्यांचा झाला नारायण ।**' अशी स्थिति झाल्यानें साधकास विहित विषयसेवन नाडणार नाहीं. ( २८-३८७ ते ४०६) म्हणून नामस्मरण हें अंतरशुद्धीचें व सुखाचें एकमेव साधन होय हें ओळखून साधकानें त्याचीच कास धरावी व नाममंत्राच्या बळावर ' पुरुषामाजीं पुरुषोत्तम ' व्हावें असें एकनाथ म्हणतात.(५-२४४ते३५९) परंतु नामस्मरण हें ईशप्राप्तीचें सोपें साधन असलें तरी नामाचें स्मरण होणें व राहणें फार कठिण आहे. सर्व कांहीं आठवतें, एक हरिनाम तेवढें आठवत नाहीं, असा मनाचा स्वभाव आहे. यासाठीं एक उपाय एकनाथांनीं सांगितला आहे, तो म्हणजे सत्संग. अष्टांगयोग, नित्यानित्ययोग, अहिंसादि धर्म, अश्वमेध राजसूयादि याग, वापी कूप आरामादि दानें, यासारखीं सर्व साधनें ईशप्राप्ति करून घेण्याच्या कामीं व्यर्थ असून सत्संगतीनेंच देवाची ' ठाक ठोक ' प्राप्ति होईल असें ते म्हणतात. कारण सत्संग हाच एक असा आहे कीं, जो इतर सर्व संगास दूर करून हरिसंगाची जोड करून देतो. (१२-२४ ते ४२) सत्संगति ही हरिभक्ति आणि नामकीर्ति यांची जननी असून '**मुखीं नाम निर्वाह व्हावा । यालागीं करावी साधुसेवा।**' असा नाथांचा सिद्धांत आहे.भजनाचे कायिक, वाचिक व मानसिक असे तीन प्रकार मानले आहेत. सुष्ट दुष्ट सर्वांच्या ठिकाणीं चोख ब्रह्मभाव ठेवणें हें मानसिक निजभजन, भूतीं भगवंत हें जाणून कोणाचेंहि गुणदोष न बोलणें हें वाचिक भजन व स्वतः अपकार सहन करून अपकाऱ्यावरहि उपकार करण्याचा देहव्यापार ठेवणें हें कायिक भजन होय. ( २९-३७३ ते ३९० ) परंतु निर्गुण आणि अति सूक्ष्म अशा परमेश्वराचें भजन कोठें करावें हाहि एक प्रश्नच आहे. त्यास एकनाथांचें उत्तर असें कीं, जेथें ईश्वराचा निरंतर

वास आहे असें भक्ताचें निजहृदय किंवा अंतःकरण हेंच अति सुगम असें भजन-स्थान होय. हृदयस्थ परमेश्वर हृदयांतच सांपडणार. म्हणून उगीच बाह्य आटाटी न करतां प्रत्येकानें स्वतःच्या अंतःकरणांत देवाचा शोध घ्यावा असें ते म्हणतात. ( १३-५३० ते ५४२ ) हें अनन्य भजन पंचलक्षणयुक्त असल्याचें त्यांनीं म्हटलें आहे. निरपेक्षता, ईशचिंतन, शांति, समदर्शन व निर्वैर हीं तीं पंच लक्षणें होत व त्यांनीं युक्त असें भजन होईल तर भक्ताच्या सर्व वासना विरून जाऊन त्याची वृत्तिशून्य अवस्था होईल. ( १४-१६२ ते १८५ ) याप्रमाणें सर्वव्यापक भजन करणाऱ्या भक्तास देव ' जेथिचा तेथें ' सांपडेल यांत नवल नाहीं. किंबहुना तो जिकडे पाहील तिकडे त्यास देव दिसेल ; इतकेंच नव्हे तर तो पाहो अथवा न पाहो, देव त्याच्यापुढें स्वयंभू होऊन राहील. ( २-४४७ ते ४५२ ) अशा भक्ताचें जें करणें ती देवाची पूजा, जें बोलणें तो देवाचा जप व जें देखणें तें देवदर्शन होय असें एकनाथ सांगतात. ( ११-७५० ते ७७२ ) कीर्तनभक्तीविषयीं त्यांना वाटत असलेला जिव्हाळा प्रसिद्धच आहे. त्यांनीं स्वतः कीर्तनाची पाणपोय उघडून आयुष्यभर भक्तीची गंगा वाहविली हें तर खरेंच. पण त्याबरोबर कीर्तनभक्तीचा उदोउदोहि त्यांनीं आपल्या सर्व ग्रंथांतून केला व हरिकीर्तनाचा महिमा समाजाच्या सर्व थरांतील व्यक्तींना पटवून दिला. भागवतांत ते म्हणतात, कीं नरदेहासारखें निधान अनायासें लाभलें असतांना व रामनामाच्या आवृत्तींनीं चारी मुक्ती आपल्या दासी होतात हें ठाऊक असतांना निःशंक, निर्लज्ज हरिकीर्तन करणें यांतच प्रत्येकाचें हित आहे. कारण ' **कीर्तनाचेनि नेटे पाटे । देवो भेटे प्रत्यक्ष ॥** ' (७-६४१ ते ६४७) असा अनेकांचा अनुभव आहे. तीर्थांना तीर्थत्व प्राप्त करून देणारें हरिकीर्तन हें चित्तशुद्धीचें वर्मच आहे ; कारण कृष्णकीर्तिकथनाचीं अक्षरें कर्णद्वारा आंत शिरतांच मनांतील पाप गजबजून बाहेर निघतें व साधकाचें अंतःकरण शुद्ध होतें. किंबहुना ' **जेवढी नामाची शक्ति । तेवढें पाप नाहीं त्रिजगतीं ॥**' अशी वस्तुस्थिति असल्यानें लोकलाजेचें बिरडें फेडून हरिकीर्तीचे पवाडे गावे व त्या प्रेमपुरांत बुडून जावें असें एकनाथ म्हणतात. कीर्तनांत हरिनामाचा पाठ सतत होत असल्यामुळें परमेश्वराचें अखंड स्मरण न करतांहि होतें व त्यायोगें त्यास संतोष होऊन देवाभक्ताचें आलिंगन पडतें. याप्रमाणें हरिनामकीर्ति गाइल्यानें साधक आर्द्रचित्त होतो व मग चुकलेल्या माय-

पूतांची भेट व्हावी त्याप्रमाणें भक्तीच्या पेठेंत जिवाशिवांची अकस्मात् भेट होऊन त्यास आत्मसाक्षात्काराची मिठी पडते. ( २-५५६ ते ५६३; ५-४२३ ते ४३९; २६-३५७ ते ३८६ )

## भाव तेथें देव

याप्रमाणें हरिनामाचें स्मरण, श्रवण, कीर्तन इत्यादि पर्याय सांगून शेवटीं एकनाथ म्हणतात, हीं सर्व भक्तीचींच साधनें होत. 'भाव तोचि देव' हा त्यांचा आवडता सिद्धांत असून त्यावर त्यांनीं भागवत टीकेंत अनेक ठिकाणीं व्याख्यान केलें आहे. नामस्मरण काय किंवा संकीर्तन काय, हें सर्व भावपूर्वक झालें पाहिजे, हें सांगतांना त्यांनीं सांठवून ठेवलेल्या धनाची अहर्निश चिंता वाहणाऱ्या कृपणाचा, पोटीं गर्भ संभवल्यानंतर तो उल्हासानें वाढविणाऱ्या गोरटीचा, गर्भवतीचे डोहाळे करणाऱ्या वंध्येचा, घरीं आलेल्या जांवयासाठीं सर्वस्व वेंचणाऱ्या सासूचा, वाढत्या उत्साहानें अधिकाधिक बी पेरणाऱ्या शेतकऱ्याचा व सगुण व सुरूप भर्ता निघून गेल्यावर त्याच्यासाठीं तळमळणाऱ्या कांतेचा, याप्रमाणें एकूण सहा दृष्टांत दिले आहेत. त्यांतील कळवळा, तळमळ, उल्हास व आत्मार्पणता हीं जेथें आहेत 'त्या नांव भक्ति' असें एकनाथ म्हणतात. ( १४-२४३ ते २४९ ) भक्तीच्या योगें क्रमाक्रमानें आत्मसाक्षात्कार कसा होतो त्याचें वर्णन त्यांनीं अत्यंत कौशल्यानें केलें आहे. पुत्र, वित्त, लोकेषणा सोडून व लौकिकाची लाज जिंकून भक्ति केल्यास प्रथम चित्तावरील रजतमांचे मळ निघून जातात आणि चित्तशुद्धि होते. त्यानंतर देवाविषयींचें प्रेम जों जों वाढूं लागतें तों तों अंगीं विरक्ति बाणते व विषयासक्ति जागच्याजागीं विरून चित्तवृत्ति निर्मळ होते. याप्रमाणें अंतःशुद्धि झाल्यावर साधक सर्वांभूतीं भगवंत या भावानें भक्ति करूं लागतो व ही उदार भक्तिच त्याच्या अहंकाराचा नाश करून त्याची आणि देवाची भेट करवते. वास्तविक परमात्मा प्रत्येकाच्या हृदयांत वसत असतोच; परंतु चित्तवृत्ति मलिन असल्यानें त्याचा अनुभव येत नाहीं. एकनाथ म्हणतात, कीं भक्तीनें मुख्यतः चित्तवृत्ति निर्मळ होऊन डोळ्यांवरील पडळ फिरतांच प्रकाशासहित सूर्य दिसावा, त्याप्रमाणें कल्पनालोप झाल्यानें 'नेटेपाटें' परब्रह्म प्रकट होतें. ( ३–७३८ ते ७५१ ) म्हणून शास्त्रश्रवण, ज्ञानप्रतिष्ठा, प्रवृत्ति निवृत्ति, कुळाचें उंचपण, जातीचा अभिमान, धनमानचेष्टा, नाना निष्ठा इत्यादि सर्व सांडून वरिष्ठ असा जो परमेश्वर त्याला

शरण जावें असें भागवताचें सांगणें आहे. ( १२-२३३ ते २४१ ) कारण हृदयीं देवाचें ध्यान, मुखीं नामकीर्तन, श्रवणीं कथाश्रवण, नयनीं मूर्तिदर्शन, रसनी तीर्थप्राशन व साष्टांगीं नमन, याप्रमाणें आपल्या सर्व इंद्रियांनीं अर्धक्षणहि रिकामा जाऊं न देतां देवाची सेवा करणें हा सर्व धर्मांचा राजा असून अशा भक्ताचें मन सर्वभूतीं देवदर्शन झाल्यानें आपल्या मनपणासच मुकून जातें. अशा प्रकारची सर्वभावयुक्त भक्ति म्हणजेच एकनाथांच्या मतें विज्ञान होय. ( ३०-३७८ ते ३९० ) म्हणून त्यांचें पुनः पुनः सांगणें असें, कीं पवित्र, विजन व एकांतस्थान भक्तीस अत्यंत अनुकूल असल्यामुळें साधकानें दुश्चित्त जनपदाचा त्याग करून सदा एकांतीं निरत व्हावें, म्हणजे त्यायोगें त्यास आत्मसुख प्राप्त होईल व आत्मसुखाची प्राप्ति झाल्यावर जगांत देवावांचून आणखी कांहीं न उरल्यानें त्याची द्वैत वार्ता जाऊन तो निर्भय होईल. ( १८-१३१ ते १३७ ) कृष्णानें उद्धवास सांगितलेलें हें भक्तीचें निरूपण ऐकून एकनाथ म्हणतात, कीं त्याच्या ठिकाणीं अष्ट सात्त्विक भाव निर्माण झाले व आपणांस निमित्त करून कृष्णानें दीन जनांच्या उद्धारार्थ भक्तीचा हा ज्ञानदीप पूर्णपणें पाजळला हें पाहून त्यास गहिंवर आला व गुरूपकर्तांच्या ओझ्याखालीं तो वांकून गेला. ( २९-६४४ ते ७२४ )

## भक्तस्वरूप

देव आणि भक्त यांच्यांतील संबंध वर्णितांना एकनाथ म्हणतात, कीं आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी हे भक्तांचे तीनहि प्रकार खरोखर पाहतां चौथ्या म्हणजे ज्ञानी भक्तांतच अंतर्भूत होतात. कारण भक्ति हें ईशप्राप्तीचें एकमेव भांडवल असल्यामुळें त्या भक्तींत दुजी, तिजी आणि चौथी याप्रमाणें विविध प्रकार संभवत नाहींत. किंबहुना, अनेक भक्ति मानणें ही 'साधकांची साधनभ्रांति' होय असें नाथांचें म्हणणें आहे. परंतु रूढीप्रमाणें त्यांनींहि या चार प्रकारच्या भक्तांच्या व्याख्या केल्या आहेत. मात्र त्या नवीन आहेत, रूढ नाहींत. भगवंताच्या प्राप्तीसाठीं जो कड्यावरून उडी घेण्यास किंवा जळत्या आगींत शिरण्यास मागें पुढें पाहत नाहीं तो आर्त भक्त; ईशप्राप्तीचें साधन असा मनुष्यदेह आत्महत्येसाठीं न योजतां मागील भक्तांनीं कोण्या प्रकारें देव जोडला हें विचारपूर्वक पाहून जो त्याप्रमाणें वागतो तो जिज्ञासु; 'सर्वो अर्थी मीचि अर्थना' या भावनेनें जो आपले सर्व अर्थ परमार्थी लावतो तो अर्थार्थी व ईशस्वरूपाची सहजस्थिति ज्याला प्राप्त झाली आहे तो

ज्ञानी भक्त; याप्रमाणें एकनाथांनीं पारमार्थिक भूमिकेवरून वरील व्याख्या केल्या आहेत. ( १९-२६६ ते २७९ ) योग आणि भक्ति यांतील भेद सांगतांना ते म्हणतात, कीं योगी इंद्रियांचा कोंडमारा करून कष्टी होतात, तर भक्त तीं भगवद्भक्तीकडे लावून नित्य मुक्त होतात. आपल्या अकराहि इंद्रियवृत्ति भक्तीकडे कशा योजाव्या याचें त्यांनीं सविस्तर वर्णन केलें असून दारा, सुत, गृह, प्राण हीं सर्व भगवंतास अर्पण करणें हें खरें भागवत धर्मांतील भजन होय असें म्हटलें आहे. 'कायेन वाचा' या अर्पणवाचक श्लोकाचा खरा अर्थ त्यांच्या दृष्टीनें संपूर्ण शरणागति हा आहे. ( २-२९३ ते ३०९ ) अशा भक्ताचीं इंद्रियें विषयसेवन करतात; परंतु त्याचें सुख दुःख त्याच्या चित्तांत उमटत नाहीं. मृग-जळांत स्नान करणारा न्हाऊनहि कोरडा रहावा त्याप्रमाणें ज्ञानी भक्त भोगूनहि अभोक्ता असतो. त्यास देवाचें असें अगाध स्मरण असतें, कीं त्यापुढें तहान भूक त्याला आटवतच नाहीं. देहबुद्धींत नाना प्रकारच्या तृष्णा उठत असतात. परंतु भक्ताची बुद्धि हरिस्मरणांत विनटली असल्यानें त्याच्या ठिकाणीं लौकिक तृष्णा अशी उरतच नाहीं. ग्रासोग्रासी नामस्मरण झाल्यावर अन्न हेंच पूर्ण ब्रह्म होईल यांत नवल काय ? अशा भक्ताच्या देहास जरी मरण आलें तरी त्याचें हरिस्मरण अखंड असल्यानें तो मरूनहि पूर्णपणें उरतोच. पाणी आटलें म्हणजे त्यांत प्रति-बिंबित झालेला सूर्य निमाला असें नव्हे, तसेंच देही गेला तरी भक्त उरतोच असा एकनाथांचा सिद्धांत आहे. ( २ ६५६ ते ७१६ )

## देवभक्तसंबंध

देवभक्तसंबंध वर्णितांना एकनाथ म्हणतात, कीं देव हा देह असून भक्त म्हणजे त्याचा आत्माच होय. सहजभक्तींत नांदतांना एक देव आणि एक भक्त अशी विभागणी असली तरी एऱ्हवीं दोघे एकमेकांत मिळून गेल्यानें नाममात्र निराळे दिसले तरी खरोखर पाहतां सामरस्यांत नांदत असतात असें म्हणणें अधिक युक्त होईल. ( १९ - २९५ ते ३०२ ) म्हणूनच भगवंताचें कीर्तन सोडून त्याच्या भक्ताचें नामस्मरण केल्यासहि भवबंधन तुटेल असें नाथांचें आश्वासन आहे. कारण, अनाम अशा देवाला नामरूपादि सर्व देऊन त्याला प्रतिष्ठा आणून देणारे कोण ? तर त्याचे भक्त. तेव्हां देवाला थोरपण भक्तामुळें आलेलें असल्यानें तो त्याच्या उपकारानें दाटून जातो व त्याच्या शब्दांत राहतो.

‘ भक्त भावें आकारला ’ आणि ‘ देवो उपकारें दाटला ’ अशी स्थिति असल्यानें देवानें भक्ताच्या अंकित राहावें व जेथें भक्ताचें नांव घेतलें जात आहे तेथें धांव घ्यावी यांत नवल कसलें ? ( ७ - ४७८ ते ४८५ ) याप्रमाणें ‘ एकात्मता-भक्तीचें ’ वर्णन करून एकनाथ पुढें म्हणतात, कीं आपल्या भक्तास कोणाची दृष्ट लागेल म्हणून देव त्याच्या मागें पुढें, सभोवतीं राहतो, इतकेंच नव्हे तर आपल्या सर्वांगाचा ओढा करून त्याचें संकट निवारतो. खरोखर देवासारखा कृपाळु जगांत दुसरा कोण ? पण तोहि भक्तास आपला ‘ ज्ञानतिलक ’ मानतो व हा भक्त जर आपल्याशीं एकरूप झाला तर मग आपण प्रीति तरी कोणावर करावी या चिंतेंत असतो. देवाभक्तांचें ऐक्य झाल्यावर देवानें कृपादृष्टीनें कोणा-कडे पाहावें, निजगोष्टी कोणाशीं बोलाव्या आणि क्षेमालिंगन तरी कोणास द्यावें ? एकनाथ म्हणतात, कीं अशा परिस्थितींत देव व भक्त या दोहींत एक देवच नांदतो व याप्रमाणें आपली आपण भक्ति करून अनन्य प्रीतिचें सुख अनुभवितो. देव जणुं क्षेमालिंगनाचें निमित्त करून भक्तास आपणांत सामावून घेतो व मग आपणच त्याच्या आंत बाहेर राहून ऐक्यांतील द्वैताचा आस्वाद घेतो. वेदान्तांत जिला अद्वैतभक्ति म्हणतात तीच ही होय. ( २ - ७२२ ते ७३२ ) याप्रकारें देव होऊन देवास भजणाऱ्या भक्ताचे अर्थ, स्वार्थ, परमार्थ हे सर्व देवस्वरूप होतात व त्याचे बोल म्हणजे शब्दरूपास आलेलें निःशब्द परब्रह्मच असल्यानें ते ऐकतांना श्रोत्यास अतीव समाधान होतें. असे भक्त म्हणजे देवाची ‘ सचेतन मूर्ति ’ असून त्यांच्या भावार्थाचा महिमा असा, कीं विश्वात्मा जो देव त्याचे ते आत्मा होतात. हे भक्त त्यांची सर्वांशीं ‘ जुनाट सोयरीक ’ झाल्यानें सर्वांचे सखेसोयरे होतात व क्षीरनीरांच्या मिळणीप्रमाणें सर्व जगाशीं अभेद असा मित्राचार ठेवतात. याचेंच नांव ‘ साधूची चोखट मैत्री ’ होय. ( ११ - १०३५ ते ४२ ) असा साधु स्वतः आत्माराम होऊन जगाचें विश्रामधाम बनतो, असें एकनाथ म्हणतात. ( ११ - २२७ ते २३६ )

## अनुभव

याप्रमाणें आत्मानात्मविवेक, गुरुकृपा, नामस्मरण व संतसंग या चतुःसूत्रीच्या आधारानें वाटचाल करणाऱ्या भक्तभागवतांची स्थिति गति व त्यांचें देवाशीं जडणारें नातें एकनाथांनीं वर्णिलें आहे. अशा साधकास येणारे साक्षात्कार-

विषयक अनुभव विचारांत घेऊन हें विवेचन संपवावयाचें आहे. प्रा. रानडे यांनीं म्हटल्याप्रमाणें एकनाथांचे अभंग अनुभवप्रधान असून त्यांचे इतर ग्रंथ बुद्धिवादाचे आहेत, हें खरें. तथापि एकानाथी भागवतांतहि, अप्रत्यक्षपणें कां होईना, परमेश्वराच्या साक्षात्काराचे ओझरते उल्लेख कांहीं ठिकाणीं सांपडतात व त्याचे शारीरिक आणि मानसिक परिणाम मात्र कांहींशा विस्तारानें वर्णिलेले आढळतात. त्या अनुरोधानें प्रथमतः एकनाथांनीं सागीतलेला अनुभवसोपान विचारांत घेणें योग्य होईल. या सोपानाची पहिली पायरी म्हणजे देवाचें अव्यय स्वरूप जाणून घेण्याची तीव्र इच्छा, अर्थात् जिज्ञासा होय. त्यानंतर पांडित्याचा अभिमान सोडून, देहादि कल्पनांचा श्रवणमननानें निरास करून गुरुवर दृढ विश्वास ठेवणें ही दुसरी पायरी झाली. कर्मनिष्ठा सोडून ध्याननिष्ठ होणें ही त्या पुढील पायरी. शेवटीं नाना तत्त्वांचा भ्रम फिटून सर्वगत, सर्वकाळ, सर्वदेशी व सर्वव्यापक अशा सबाह्य कोंदलेल्या 'वस्तू'चा म्हणजे परब्रह्माचा निश्चळ अनुभव घेणें ही अखेरची अवस्था होय, असें एकनाथ म्हणतात. ( ११ - ६३९ ते ६४६ ) या अनुभूतीच्या नाद प्रकाशादि प्रकारांचे कांहीं उल्लेख भागवतांत आढळतात. रणांगणांत वैऱ्यांचा पराभव करून सतरावीचें पाणी प्राशन केल्यावर दुर्गांतून अनाहताची गर्जना उठली व जयजयकाराची एकच घाई होऊन अनाहताचें निशाण लागलें आणि त्या स्थितींत शोधूनहि कोणी परका असा सांपडेना. ( ९-१२९ ते १३७ ) जनार्दनस्वामींनीं महाबोधाचें अंजन हाताशिवाय एकनाथांच्या डोळ्यांत घातलें व त्यामुळें त्यांच्या सर्वांगीं नयन निघून त्यांना सर्वत्र देखणेपण आलें आणि पहावें तेथें जनार्दनच दिसूं लागले. ( २१-२० ते २१ ) जें निमिषार्ध पाहिल्यानेंहि कोटि जन्माचें दुःख नाहींसें होतें व आनंद त्रैलोक्यांत मावेनासा होतो तें 'श्रीमुख' पाहून आपण धन्य झालों असेंहि ते म्हणतात. ( २४-२५७ ते २६३ ) मुकुट कुंडलें घातलेली, कासेस सोनकळा कसलेली व आपाद रुळणारी वनमाला धारण केलेली अशी ती घवघवीत कृष्णमूर्ति म्हणजे परिपूर्ण परब्रह्मच होय. कृष्णरूपाचें हें कौतुक पाहतांना अंतरीं निबिड सुख दाटूनहि आपले डोळे भुकेलेच राहिले असें एकनाथ सांगतात. ( ६-५५ ते ५८ ) या सुकुमार रूपाचें ध्यान आपली दृष्टि त्यास रुपणार नाहीं अशा अरुवारपणानें करावें व निःशंकपणें नामस्मरण करून धारणेवांचून ध्यान ठसवून घ्यावें असेंहि ते पुढें

म्हणतात. अशा रीतीनें ध्यान करतांना देवाचें जें हास्यवदन अनुभवास येईल, त्यांतील वदन सोडून केवळ हास्याचें, नंतर हास्य सोडून त्यांतील आनंदाचें व शेवटीं त्या आनंदांतून परमात्म्याचें ध्यान करावें असें एकनाथांचें म्हणणें आहे. ( १४-४९८ ते ५१२ )

## साक्षात्कारोत्तर स्थिति

याप्रमाणें साक्षात्काराचे कांहीं प्रकार वर्णून ते साक्षात्कारामुळें होणाऱ्या परिणामांकडे वळले आहेत. पैकीं शारीरिक परिणामाविषयीं ते म्हणतात, कीं स्वरूपावबोध होऊन चित्तचैतन्यांची भेट होतांच भक्ताच्या ठिकाणीं अष्ट सात्त्विक भाव उत्पन्न होतात व त्या हर्षोन्मादाच्या भरांत सुखोद्धरानें गदगदून जाऊन तो निर्लज्जपणें हासूं नाचूं लागतो. ( ३-५८७ ते ९७ ) अशा स्थितींत देहाच्या भरण पोषणाची त्याला शुद्धहि राहत नाहीं व कुंभार आपलें दंडभांडें घेऊन गेल्यावर त्याचें चाक कांहीं काळ फिरत राहावें, त्याप्रमाणें या ज्ञानी भक्ताचा देह केवळ प्रारब्धानुसार वर्तत राहतो. स्वदेहाच्या छायेचें सुखदुःख जसें कोणालाहि नसतें, त्याप्रमाणें अशा सज्ञानास देहबुद्धि उपजतच नाहीं. ( १८-२५६ ते २६६ ) जें देहाचें तेंच प्रपंचाचें. भाड्याच्या घोड्यानें एकदां घरीं आणून सोडल्यावर त्याची वास्तपुस्त जशी कोणी करीत नाहीं किंवा ज्याला पालखीचा लाभ झाला, तो जसा पूर्व आयुष्यांतील तुटक्या वाहणांचें स्मरण ठेवीत नाहीं, त्याप्रमाणें ज्याला ऐक्यपुष्टि लाभली तो प्रपंचांतील द्वैतदृष्टि कशाला ठेवील ? साक्षात्कारांतील या अवस्थेचें खरोखर वर्णनच करतां येत नाहीं असें एकनाथ म्हणतात. ( १३-५८९ ते ६११ ) घरांतील दिव्याचा प्रकाश गवाक्षांतून बाहेर फांकावा, त्याप्रमाणें मनांत हरि प्रगटला असतां त्याचा भजनानंद इंद्रियांतून बाहेर ओसंडत राहातो व दृष्टि जेथें जाईल तेथें तिला देवच दिसूं लागतो. किंबहुना पाऊलापाऊलीं निजभजन होत राहतें व ज्या निद्राकाळीं सामान्य जनांस गाढ मूढ अवस्था व्यापून टाकते त्यावेळींसुद्धां भक्तासमीप कृष्णरूपच असतें. ( २-३६१ ते ३८८; ५-५१८ ) याच स्थितीला एकनाथ परम समाधि म्हणतात. समाधि म्हणजे ताटस्थ्य स्थिति नव्हे. कारण शेळीसुद्धां अजगराला पाहून तटस्थ होते. तसेंच, समाधि म्हणजे दिव्य स्वरूप पाहून येणारी विस्मयावस्थाहि नव्हे. कारण, त्या अवस्थेंतहि मनांत वृत्ति उठतातच. तर स्वरूपीं दृष्टि जडल्यानें जी अखंड सम-

बुद्धि निर्माण होते व ज्या अवस्थेंत मनाचे सर्व संकल्प विराम पावतात ती खरी परम समाधि होय. आत्मस्वरूप प्रथम पाहिल्यावर चित्तांत जो अनावर विस्मय उठतो तो पोटांत जिरवून जी दशा उरते ती समाधि, असें एकनाथांचें म्हणणें आहे. (२-४३० ते ४३७; १३-६६९ ते ७७) अर्थात् अशा प्रकारचा आत्मानुभवी भक्त रात्रंदिवस काष्ठवत् पडून राहील हें शक्य नाहीं. नाथ स्पष्टच विचारतात, कीं मोल देऊन मदिरामद्यपी जेथें त्या नशेंत गातो नाचतो, तेथें ज्यानें ब्रह्मानंदाचें सेवन केलें तो स्वतःला कसा आवरूं शकेल? साहजिकच त्या उन्मादावस्थेंत त्याच्या हातून लोकबाह्य वर्तन होतें व जगाच्या दृष्टीनें ती पिशाचता ठरते. परंतु कांतीव स्फटिक गृहांतील दिव्याच्या दीप्तीमुळें त्यावर चितारलेलीं अश्वगजदळें उज्वल दिसावीं, त्याप्रमाणें त्याच्या दृष्टीला चंद्र सूर्य, वन्हि नक्षत्रें, जन नयन इत्यादि तेजांत लखलखीत आत्मज्योति दिसत असल्यानें त्याला स्वतःला तर ब्रह्मोन्माद होतोच, पण सर्व चराचर स्वानंदानें दुमदुमत असल्याचा अपूर्व अनुभव त्याला येतो. अशा स्थितींत सन्मुख विन्मुख किंवा एक दुजें ही भाषा लोपून देव भक्त हें द्वैतहि नाहींसें होतें व तो केवळ सुखरूप होऊन राहतो. (२-५७५ ते ५८४) पिंगलाख्यानाच्या प्रसंगानें या ऐक्यानुभवाचें वर्णन करतांना एकनाथ म्हणतात, कीं हृदयस्थकांत अनुभवाच्या दृष्टीनें पाहतांच पिंगलेनें त्याला ऐक्यभावानें मिठी घातली व तत्क्षणीं बोल अबोल झाला, लाज लाजली आणि साखरेनें पाण्यांत पडतांच स्वतः विरून त्याला गोड करावें त्याप्रमाणें ती निराश पिंगला भगवंत मिळवून त्याशीं समरस झाली. (८-२९७ ते ३०६) देवाभक्तांच्या या ऐक्याची परमावधि म्हणजे कृष्ण व उद्धव यांचें मीलन होय. त्यांत कृष्ण कृष्णपण विसरला, उद्धव उद्धवपण विसरला आणि एका भक्तिसुखांत ते दोघे ऐक्यभावानें उन्मत्त झाल्यामुळें तेथें 'परमानंदाचा धेंडा' नाचूं लागला. या भक्तिसुखाची गोडी भाग्यवंतासच कळणार असें एकनाथ म्हणतात. (१६-३२३ ते ३२७)

याप्रमाणें एकनाथांच्या भागवताची वाटचाल आहे. तिचें मूळ दुःखांत किंवा नैराश्यांत दिसलें तरी तिचा प्रारंभ व शेवट दोन्ही सुखमय आहेत. प्रत्यक्ष वाटचालहि सुखकरच आहे. उद्धवभजनाच्या कुळवाडींत श्रीकृष्णपिकाची जोड होते हें त्यांच्या भागवताचें सार असून ही कुळवाडी आदि अंतीं सुखाची आहे असें आश्वासन त्यांनीं दिलें आहे.

# श्रीएकनाथांची मायेची कल्पना
# व
# तिच्या निरसनाचे उपाय

: लेखक :

डॉ. सौ. **शरयू बाळ**, एम्. ए., पीएच्. डी.

( प्रिन्सिपॉल, एस्. एन्. डी. टी. कॉलेज, पुणें. )

ज्या श्रेष्ठ महाराष्ट्रीय संतांनीं भागवत धर्माची इमारत उभी केली त्यांनींच महाराष्ट्राला अद्वैत तत्त्वज्ञान व अद्वैत भक्तीची शिकवण दिली. श्री एकनाथ महाराजांच्या लिखाणाचा काल पंधराव्या शतकांतला. मुसलमानी राज्यकर्त्यांच्या संस्कृतीची दाट छाया हिंदु जीवनावर या कालांत पडलेली होती. संपत्तीजवळ ज्याप्रमाणें इतर सर्व गुणांचा वास असतो असें समजावें लागतें त्याचप्रमाणें राज्यकर्ताहि सर्वगुणसंपन्न आहे असेंच सामान्य माणसें समजत असतात. या नियमाला एकनाथकालीन हिंदु समाजहि अपवाद नव्हता. पण गीतेंत भगवान् श्रीकृष्णांनीं म्हटल्याप्रमाणें जेव्हां सामान्य समाजांत अधर्म व अनीति फैलावते तेव्हां एखादी विभूति जन्म घेऊन समाजोद्धाराचें कार्य करते. नाथांची विभूतिहि याच उद्धारकार्यासाठीं जन्मास आली होती.

एकनाथांचा काल ज्ञानेश्वरानंतर सुमारें २०० वर्षांनंतरचा. आज ज्ञानेश्वरांच्या ग्रंथांना—विशेषतः ज्ञानेश्वरीला जी लोकमान्यता मिळालेली आहे ती एकनाथांच्या कालांत सामान्य माणसांना माहितहि नव्हती असें म्हटलें तरी चालेल. एकनाथांनीं ज्याप्रमाणें ज्ञानेश्वरांच्या समाधीस्थळाचें महत्त्व जाणून आळंदीचें एक महान् तीर्थक्षेत्र बनविलें त्याचप्रमाणें त्यांनीं ज्ञानेश्वरींत नंतर घुसडल्या गेलेल्या अशुद्ध पाठांचें अवलोकन करून शक्य तों शुद्ध अशी प्रत तयार करण्याचें महत्कार्यहि पार पाडलें.

ज्यांना संस्कृत समजत नाहीं अशा अज्ञ, सामान्य जनापर्यंत वेद व उपनिषद वाङ्मयांतील तत्त्वज्ञान पोंचवून समाजाला झेपेल अशा सोप्या व सुलभ

मराठी
३९२२८

भक्तिमार्गानें या ज्ञानमंदिराच्या दारांत सर्वांना नेऊन सोडण्याच्या महान् कार्यास ज्ञानदेवांनीं सुरुवात केली. हेंच कार्य नाथांना सुमारें तीनशें वर्षांनंतर करायचें होतें. अर्थातच नाथांच्या विभूतिपूजनांत ज्ञानेश्वरांना अग्रस्थान मिळालें ही गोष्ट नाथांनीं आपल्या लिखाणांत ठिकठिकाणीं ज्ञानेश्वरासंबंधीं केलेल्या आदरणीय उल्लेखांवरून[1] सहज लक्षांत येतें. स्वतः नाथांनीं संस्कृतांतून औपनिषदिक वाङ्मयाचा सखोल अभ्यास केला होता हें त्यांच्या लिखाणावरून दिसून येतेंच. तरीसुद्धां जगताच्या कोड्याचा उलगडा करून त्याविषयीं निरूपण करतांना नाथांच्यापुढें ज्ञानेश्वरी हाच ग्रंथ प्रामुख्यानें असावा असा भास भागवत वाचीत असतांना एकसारखा होतो.

तत्त्वज्ञान क्षेत्रांत श्रीएकनाथावर आद्य शंकराचार्यांच्या अद्वैत वेदांताची पूर्ण छाप पडलेली आहे. याचा पुरावा द्यावयाचा झाल्यास एकाच गोष्टीचा उल्लेख केला तरी पुरे. एकनाथांनीं मूळ संस्कृत भागवतांतील अकराव्या स्कंधावर जी प्रदीर्घ टीका लिहिली तींत त्यांनीं ज्या थोर विभूतींना प्रथम वंदन केलें आहे त्यांत आचार्यांपैकीं एकटे शंकराचार्यच आहेत ही गोष्ट मोठी सूचक आहे. पहिल्याच अध्यायांतील ११८ व्या ओवींत ते म्हणतात,

**वंदू आचार्या शंकरु । जो प्रबोधविद्येचा सागरु ।**
**सारुनि कर्मठतेचा विचारु । प्रबोध दिनकरु प्रकाशिला ॥**

रामानुज, वल्लभ, मध्व वगैरे आचार्यांनीं स्वतःच्या दृष्टिकोनांतून उपनिषदतत्त्वांचा अर्थ लावला. या सर्व आचार्यांचें लिखाण नाथांच्या नजरेंतून सुटलें असेल हें संभवत नाहीं. पण शंकरांच्या तत्त्वज्ञानानेंच त्यांच्या मनाची खरी पकड घेतली होती. त्यांतून ज्ञानेश्वरांनींहि याच तत्त्वज्ञानाची तेजस्वी तरफदारी आपल्या 'महाराष्ट्र' भाषेंत केली. मग नाथांचें मन केवलाद्वैताकडे आकर्षिलें गेलें यांत कांहींच नवल नाहीं.

---

१. **भाव धरूनियां वाची ज्ञानेश्वरी । कृपा करी हरि तयावरी ॥ १ ॥**
**स्वमुखें आपण सांगे तो श्रीविष्णु । श्रीगीता हा प्रभु अर्जुनेसीं ॥ २ ॥**
**तोचि ज्ञानेश्वरी वाचे वदतां साचें । भय कळिकाळाचें नाहीं तया ॥ ३ ॥**
**एका जनार्दनीं संशय सोडोनी । दृढ धरीं मनीं ज्ञानेश्वरी ॥ ४ ॥**

अद्वैतमतानुसार सर्व जगाच्या दृश्य पसाऱ्यापाठीमागें एकच सत्य आहे व तें म्हणजे ब्रह्म.[२] या ब्रह्माचें स्वरूप 'सत-चित्-आनंद' असें आहे. जगाची उत्पत्ति स्थिति लय याच अधिष्ठानावर भासमान होतात. केवलाद्वैतांत एकच एक अंतिम सत्य वस्तु मानल्याबरोबर नाम रूपांनीं भिन्न भिन्न अशा विषयांनीं प्रतीत होणाऱ्या जगताचें स्पष्टीकरण कसें करावयाचें हा मोठाच प्रश्न येऊन पडतो आणि येथेंच 'माया' येते. शंकराचार्यांच्या लिखाणांत कधीं माया तर कधीं अविद्या[३] या शब्दांनीं जगदाभासाचें स्वरूप स्पष्ट केलेलें आढळतें. श्रीमद्भागवताच्या दुसऱ्या अध्यायांत मायेचें स्वरूप स्पष्ट समजावून सांगतांना एकनाथ म्हणतात,

**अज्ञानाचें मूळ माया । तें ब्रह्मादिका न ये आया ।**
**गुणमयी लागली प्राणिया । जाण ते राया अतिदुस्तर ।।**

ए. भा. २-४५८

आणि चतुःश्लोकी भागवतांत एकनाथ सांगतात,

**तुवा माया पुशिली प्रज्ञापति । तेहि उपपत्ति सांगेन ।। ४८२ ।।**

---

२. ... सदिति अस्तितामात्रं वस्तु सूक्ष्मं निर्विशेषं, सर्वगतं, एकं, निरंजनं, निरवयवं, विज्ञानं यदवगम्यते सर्ववेदान्तेभ्यः ।
... इदं जगन्नामरूपक्रियावृद्धिकृतमुपलक्ष्यते यत्तत्सदेवासीदिति ।
कदा अग्रे जगतः प्रागुत्पत्ते ।

छां. भा. ६-२-१

३. आत्मस्वरूपत्वात् अन्यत् ... वस्त्वंतरं ... स्वप्नमायामरीच्युदकसमसंसारम् ।

बृ. भा. ३-५

अविद्यया अन्यत् वस्त्वंतरमिव पश्यति ।

प्र. भा. ४-५

सर्वज्ञस्येश्वरस्यात्मभूते इवाविद्याकल्पिते नामरूपे तत्त्वान्यत्वाभ्यामनिर्वचनीये संसारप्रपंचबीजभूते सर्वज्ञस्येश्वरस्य मायाशक्तिः प्रकृतिरिति च श्रुतिस्मृत्योरभिलप्येते ।

वे. भा. २-१-१४

**सत् म्हणो तरी जीत नसे । असत् म्हणो तरी शास्त्रें न नासे ।[४]**
**आधीं असे पाठीं नसे । ऐसें मढेंहि न दिसे मायेचें डोळां ।।४८५।।**

माया सत् नव्हे व असत्हि नव्हे तर ती अनिर्वचनीय आहे. तिचें स्वरूप त्रिगुणात्मक आहे. जलाशयावर शेवाळाचा थर वाढावा व त्यानें जलाशयाचें खरें स्वरूप झांकावें, डोळ्यावर पडळ यावें व त्यानें दृष्टी गेली असा समज निर्माण व्हावा तसेंच मायेमुळें सत् वस्तूचें स्वरूप झांकळून जातें. मायेचें मिथ्यात्व दाखवितांना दोन तऱ्हेच्या उपमांचा उपयोग केला जातो. रज्जु-सर्प, शुक्ति-रजत, स्थाणु-पुरुष ही किंवा गंधर्वनगर, वंध्यापुत्र, खपुष्प इत्यादि.[५] पैकीं पहिल्या प्रकारचीं उदाहरणें नामरूपाचें अनृतत्व पण अधिष्ठानाचें सत्यत्व दाखवितात. पण हीं अधिष्ठानेंसुद्धां परम सत्य या सदरांत शेवटीं पडूं शकत नाहींत. दोरीवर सर्पाचा आभास होतो, तो सर्प पाहून मनुष्य घाबरतो व पळूं लागतो. ती दोरी आहे, सर्प नाहीं हें कळल्यावर त्याचा भ्रमनिरास होतो. पण दोरीचें अस्तित्वसुद्धां फक्त व्यावहारिक सत्तेच्या कक्षेपुरतेंच आहे. कारण पारमार्थिक दृष्टीनें विचार करूं लागल्यानंतर सर्प तर नाहींच परंतु दोरीहि नाहीं. कारण जगत्च नाहीं, सर्वांठायीं एकच ब्रह्म आहे. एवढ्या विवरणानंतर नाथांनीं मायेला दोन्ही प्रकारच्या उपमा कां दिल्या असाव्यात याचा उलगडा होतो. नाथ म्हणतात,

**मृगजळींच्या मुक्ताफळीं । मस्तकीं बाणली जाळी ।**
**गगनाच्या चाफेकळी । मिरवे वेल्हाळी अतिसौंदर्यें ।।**

---

४. **संत म्हणो तरी तत्काळ नासे । असंत म्हणो तरी आभासे ।**
**जिणें नामरूपांचें पिसें । लाविलें असे जनासी ।।**

ए. भा. ११-१०३

**नातुडे संतासंत बोलीं । माया अनिर्वचनीय जाली ।** १०४

**तैशी अनिर्वचनीय माझी माया । तेणें यदृच्छया नीड केलें ।।** १९५

५. **नहि मृगतृष्णिकादयोऽपि निरास्पदाः भवन्ति ।**

मां. भा. १-७

**न हि रजत-सर्प-पुरुष-मृगतृष्णिकादि विकल्पाः शुक्तिकारज्जुस्थाणु-उषरादिव्यतिरेकेण अवस्त्वास्पदाः शक्याः कल्पयितुम् ।**

मां. भा. १-९

रज्जुसर्पमाथ्याचा मणी । काढूनि लेइली ते लेणीं ।
शुक्तिका रजत पैंजणी । चाले रुणुझुणु खळखळत ।।
शशविषाणपादुका । लेऊनि तें चाले देखा ।
तिसी तो अहंकारु सखा । अति नेटका ज्येष्ठ पुत्र ।।

ए. भा. ३-४५ ते ४७

हे मायासुंदरीचें वर्णन पहा. मृगजळांतून काढलेल्या मोत्यांची जाळी तिनें मस्तकावर माळली आहे, गगनसुमनांनीं तिच्या केशकलापास शोभा आणली आहे, रज्जुसर्पाच्या कंठांतील मणी काढून त्याचे अलंकार तिनें केले आहेत आणि तिच्या पायांत रुणुझुणु करणारे पैंजण शुक्तिरजताचे आहेत. तिच्या पादुका शशश्रृंगाच्या बनविलेल्या आहेत. अहंकार हा तिचा सखा व ज्येष्ठ पुत्र. याचा अर्थ असा कीं जोंपर्यंत मनुष्यमात्र 'मी' आणि 'माझें' यांनीं ग्रासलेला आहे तोंपर्यंत तो मायेच्या आधीन आहे. दुसऱ्या एका ठिकाणीं मायेचें वर्णन करतांना नाथ सांगतात,

माया वांझेचे लाडिकें बाळ । माया गगनसुमनांची माळ ।
माया मृगजळाचें शीतळ जळ । माया तें केवळ गंधर्वनगर ।।

चतु. भाग. ४८८

माया म्हणजे गगनसुमनांची माळ, माया म्हणजे गंधर्वनगर, माया म्हणजे वांझ स्त्रीचें लाडकें बाळ. या सर्व वर्णनावरून एकनाथांची माया ही शंकराचार्यांचीच माया आहे हें स्पष्ट दिसून येतें.

मायेचें अस्तित्व कशा प्रकारचें आहे हें सांगितल्यानंतर एकनाथ मायेच्या कार्याचेंहि सविस्तर विवेचन करतात. जगांत अनेकत्वाचा आभास निर्माण करणें, अहंकारानें मिथ्या जगतांतील विषयांबद्दल आकर्षण निर्माण करून सुखदुःखादि भोग प्राण्याला भोगावयास लावणें व सच्चिदानंदस्वरूप परमेश्वराचें विस्मरण घडविणें हीं मायेचीं प्रमुख कार्यें आहेत. एकनाथ सांगतात,

अविद्या प्रतिबिंबे नेटका । जीव जो का माझा सखा ।
तो मनोभ्रमें भ्रमोनि देखा । भोगी सुखदुःखा मनोजन्य ।।

ए. भा. २३-६२८

जीवाचें जीवत्वच खरें नाहीं मग त्याचें सुखदुःखात्मक भोग तरी खरे कोठून असणार ? देह म्हणजे मी नव्हे, माझ्यांतील चैतन्यांश विश्वचैतन्याहून भिन्न नाहीं एवढें उमगलें कीं भ्रमनिरास झाला. मायेच्या कार्याचाहि या ज्ञानावस्थेंत लोप होतो. माया ही स्वप्नसृष्टि आहे. स्वप्नांत पाहिलेली सोनकेळी खाण्याची इच्छा जर जागा झाल्यावर एखादा मनुष्य करूं लागला तर त्याला आपण काय म्हणूं ? तशाच प्रकारचा जगत् हा एक मायाबाजार आहे. वर्णभेद, जातिभेद, वर्गभेद, उच्चनीचत्वाचे भेद हे सर्व मायाच निर्माण करते. एकदां का देवभक्तअभेद निर्माण झाला कीं जगहि नाहीं, देहहि नाहीं, सुखदुःख नाहीं, कर्मबंधन नाहीं व जन्ममरणहि नाहीं.

सत् नव्हे आणि असत्‌हि नव्हे अशी ही अनिर्वचनीय माया निर्माण तरी केव्हां झाली ? या प्रश्नाचें उत्तर शंकराचार्यांप्रमाणेंच ‘ अनादि ’ या शब्दानें नाथ देतात. तिचा आदि कोणाला निश्चित सांगतां येणार नाहीं. पण म्हणून निराश होण्याचें कारण नाहीं असा दिलासाहि एकनाथ वारंवार देतात.

नाथांच्या वाङ्मयांत माया शब्दाचा प्रतिशब्द म्हणून ‘ प्रकृति ’ या शब्दाचाहि उल्लेख आढळतो. श्रीमद्भागवताच्या १९ व्या अध्यायांत एकनाथ म्हणतात,

**जेवीं का नटाची रावो राणी । दोघे खेळती लटिकेपणीं ।**
**तेवीं प्रकृतिपुरुष उभवणी । मिथ्यापणीं जो जाणे ॥**

ए. भा. १९-९७

नाटकांतील राजाराणी जशी क्षणिक आणि खोटी, तशींच नामरूपें क्षणिक व असत्य. येथें एक गोष्ट आग्रहानें सांगावीशी वाटते. भागवताच्या १६ व्या अध्यायांत एकनाथ सांख्यप्रक्रियेसारखींच २५ तत्त्वें घेऊन सृष्टिनिर्मिति स्पष्ट करतात. पण यावरून एकनाथ एकदां सांख्य तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन सृष्टीची उत्पत्ति सिद्ध करतात असा विसंगतीचा आरोप त्यांच्यावर केव्हांहि करतां येणार नाहीं. कारण ते स्पष्टच सांगतात,

**एवं पंचवीस तत्त्वव्याख्यान । तें अवघे मीचि जाण ॥**

ए. भा. १६-२७७

**मजवेगळें अणुमात्र । उरलें नाहीं गा स्वतंत्र ।**
**मी सर्वात्मा सर्वत्र । केवळ चिन्मात्र तेंहि मी ॥**

ए. भा. १६-२८०

भागवताच्या २४ व्या अध्यायांतहि नाथ आपली भूमिका पुन्हा स्पष्ठ करतात.

**माया नियंते ब्रह्म आपण । यालागीं यासी पुरुषपण ।**
**पुरुषाची प्रिया माया पूर्ण । प्रकृति अभिधान या हेतु ॥**

ए. भा. २४-४७७

मायेचा नियंता या दृष्टीनें जेव्हां ब्रह्माचा विचार होतो तेव्हां आपण पुरुष हा शब्द वापरतो आणि याची प्रकृति म्हणजेच सृष्टीचा आभास उत्पन्न करणारी माया. जशी वस्तूबरोबर छाया येते तशीच ब्रह्माच्या ठिकाणीं माया असते. पण छायेला जें सत्यत्व तेंच मायेला. नाथ म्हणतात,

**जेवीं रुपासवें छायेची व्यक्ती । तेवीं ब्रह्मीं मायेची निजस्थिति ॥**

ए. भा. २४-८८

ब्रह्मादिकांनाहि बाधणारी ही माया जिंकणें अशक्यच आहे कां असा विचार सहजच मनांत येतो. पण भागवतामध्यें एकनाथांनीं मायानिरसनाचा मार्ग स्पष्टपणें दाखविला आहे. प्रथम नाथ सांगतात,

**माया दुस्तर शास्त्र प्रसिद्धी । तेथ भाळेभोळे स्थूळबुद्धी ।**
**सुखें तरती कोणे निधीं । ते सांग त्रिशुद्धी उपावो ॥**

ए. भा. ३-२२४

माया तरून जाणें ही अतिशय दुस्तर गोष्ट आहे. मायेच्या आधीन असणारा मनुष्य देहालाच आत्मा समजून त्याच्या सुखदु:खांत बुडून गेलेला असतो. ही माया नाहींशीं करण्याचा उपाय तरी कोणता ? एकटा प्रबुद्धच मायातरणाचा उपाय जाणतो. म्हणून सृष्टिसंबंधींचें यथार्थ ज्ञान करून घेणें हा मायानिरसनाचा पहिला टप्पा आहे. एकनाथ म्हणतात,

**मुख्य मायेचें तरण । प्रबुद्धचि जाणे पूर्ण ।**
**प्रबुद्ध जाहलिया आपण । मायेचे विंदान तरते तरती ॥**

ए. भा. ३-२२९

मनाला जडलेला विषयलोभ हें मायाधीनतेचें एक प्रमुख लक्षण आहे म्हणून विषयसुखापासून मनाला परावृत्त करणें ही फार मोठी कामगिरी मुमुक्षूस प्रथम अंगिकारावी लागते. माशी ज्याप्रमाणें गुळाच्या खड्याला चिकटून बसते, त्याचप्रमाणें इंद्रियसुखाच्या ठिकाणीं मन अतिशय लाचार बनतें. तेथून निश्चयानें व विवेकानें त्यास दूर करून जर वैराग्याची कास धरली नाहीं तर मायानिरसनाची आशाच करावयास नको.

**विषयीं लोभलें अत्यंत मन । तेथ नव्हता वैराग्यज्ञान ।**
**कदा नव्हे मायेचें तारण ।**............ए. भा. ३-२३१

त्यांतल्या त्यांत स्त्रीसुखाचें आकर्षण हें तर मायानिरसनाच्या वाटेवर खडें असणारें फार भीषण संकट[६] आहे. स्त्रीचा मोह जो टाळू शकेल तोच माया जिंकूं शकेल. नाथ सांगतात, "**जगीं माया लाठी स्त्रीकामें ।**"...ए.भा.३-२३३

स्त्रीप्रमाणेंच द्रव्यलोभ हा मुमुक्षूच्या वाटेंतील दुसरा प्रबळ शत्रू. जगांतील सर्व आधीव्याधी, दुष्ट बुद्धि, कुविचार व पाप हे द्रव्याचा आश्रय करतात. द्रव्याचा मोह धरणाऱ्यास हीं सर्व भूतें आपोआपच पछाडतात. म्हणून विषयसुख व विशेषतः स्त्री व द्रव्य यांच्या लोभांतून मुक्त होण्यासाठीं एकनाथ जो एक रामबाण उपाय सांगतात तो म्हणजे सद्गुरु. ज्याला नाशिवंताचा त्याग करून शाश्वत ब्रह्मपदाची प्राप्ति करून घ्यावयाची आहे त्यानें सद्गुरूस शरण जाण्याखेरीज गत्यंतर नाहीं.

**जाणोनी विषयांचें नश्वरपण । पावावयालागीं ब्रह्म पूर्ण ।**
**सद्गुरूसी अनन्य शरण । रिघावें संपूर्ण श्रद्धायुक्त ॥**

ए. भा. ३-२७३

**सद्गुरूवचनमात्रें माया । तरोनी हा निश्चयो राया ।**

ए. भा. ३–२७४

एकनाथ सद्गुरूला अतिशय महत्त्व देतात. गुरु हा परमार्थ साधनेच्या मार्गावरील 'सांगाती' आहे. तो शिष्यावर पुत्रवत् प्रेम करतो, त्याला मायेच्या स्वरूपाची जाणीव करून देतो, देहाआड प्रतीत होणाऱ्या स्वतःच्या चैतन्य स्वरूपाची ओळख करून देऊन भक्तिमार्गानें आनंदस्वरूपीं लीन व्हावयास त्याला

६. चिरंजीवपद ३० ते ३६ ओव्या.

मदत करतो. गुरु म्हणजे साक्षात् परब्रह्मच. [७] नाथांचा सद्गुरुविषयींचा आदरभाव त्यांच्या लिखाणांत जागोजाग दिसून येतो. गुरूंच्या कर्तृत्वासंबंधीं नाथ सांगतात,

**तेथ परब्रह्मैक प्रसिद्ध । कोंदला ठाके सच्चिदानंद ।**
**ऐसा गुरुवाक्यें प्रबोध । शिष्य अतिशुद्ध पावती ॥**

ए. भा. ३-४८३

कायावाचामनें भगवंतास शरण जाणें व त्याच्या भजन-कीर्तनांत आयुष्याच्या प्रत्येक क्षणाचा व्यय करणें म्हणजे मायानिरसनाच्या मार्गावरील आणखी एक महत्त्वाचा टप्पा गांठणें होय. जी माया वेदशास्त्रांनाहि अनावर वाटली, जिला ब्रह्मादिकांनीं दुस्तर मानली, त्या मायेचें निरसन खरा भगवद्भक्त ताबडतोब करूं शकतो. हरिनामाच्या गजरापुढें माया उभीच राहूं शकत नाहीं. माया नारायणाच्या अंकित आहे. तेव्हां नारायणाचे पाय धरा कीं माया दूर झालीच. नाथ म्हणतात,

**परात्पर नारायणाची माया । भजतां नारायणाच्या पाया ।**
**सुखेंचि तरिजे गा राया । ........................**

ए. भा. ३-६१७

नाथांच्या मतें भक्तिमार्गानें व भक्तिप्रेमानें मायेचा निरास करणें हा उपाय खात्रीचा व सर्वांस आचरण्यांत आणण्याजोगा आहे. कारण ते म्हणतात,

**भक्तिपाशीं नित्य तृप्ति । भक्तिपाशीं नित्य मुक्ती ।**
**भक्तिपाशीं भगवत्प्राप्ति । मायानिवृत्ति हरिभजनें ॥**

ए. भा. ३-६१९

भक्ति हें एक शास्त्र आहे. नाथांनीं भक्तिमार्गाकडे नुसता अंगुलिनिर्देश केला नाहीं तर त्या मार्गावरील पहिल्यापासून शेवटपर्यंतच्या सर्व खाणाखुणा सवि-

---

७. **गुरु ब्रह्म दोन्ही समान । हेंहि वचन दिसे गौण ।**
**गुरुवाक्यें ब्रह्मा ब्रह्मपण । तेथें व्हावया समान भिन्नत्व नुरे ॥**

ए. भा. ३-५७६

**कायावाचामनेंप्राणें । जो गुरूवांचोनि आन नेणें ।**
**तैसाचि भजे अनन्यपणें । गुरुभक्ति म्हणणें त्या नांव ॥**

ए. भा. १२-४९६

स्तर वर्णन करून सांगितल्या आहेत. ते म्हणतात, मायानिरसनासाठीं भक्तीची कांस धरण्याचा ज्यानें निश्चय केला त्यानें इतरहि तयारी करावयास हवी. पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे वैराग्य. जगाकडे बघण्याचा निरपेक्ष दृष्टिकोन म्हणजेच वैराग्य. वासरूं ज्याप्रमाणें गाईला सोडून कधीं राहणार नाहीं त्याचप्रमाणें विरक्तीला सोडून भक्ति राहूं शकणार नाहीं. एकनाथ विरक्तीचें स्पष्टीकरण करतांना सांगतात,

**विरक्ति म्हणिजे ऐशी पहा हो । स्त्री पुत्र देहादि अहंभावो ।**
**समूळ जेथें होये वावो । विरक्तीनिर्वाहो या नांव राया ।।**

ए. भा. २-६१५

ऐहिक विषयाभोंवतीं गुंतलेल्या सर्व भावना जर ईश्वरभक्तींत विलीन झाल्या तरच विरक्ति साध्य होईल. विरक्तीच्याबरोबर आणखीहि कांहीं गुणांचा विकास होणें आवश्यक आहे. या गुणांचें सविस्तर विवेचन नाथांनीं भागवताच्या तिसऱ्या अध्यायांत केलें आहे. शुचिता, तप, क्षमा, मौन, आर्जव व स्वाध्याय हेच ते गुण. या गुणांच्या उदयाबरोबर 'मी' व 'माझें' या कल्पनांचा निरास व्हावयास हवा म्हणजे भक्तिमार्ग आक्रमिण्यास आवश्यक अशी मानसिक तयारी पूर्ण होईल. यानंतर भजनाचा क्रम लागतो. नाथ म्हणतात,

**दारा सुत गृह प्राण । करावे भगवंतासी अर्पण ।**
**हे भागवत धर्म पूर्ण । मुख्यत्वें भजन या नांव ।।**

ए. भा. २-२९८

भक्तीच्या वृक्षाला भजन, कीर्तन व नामस्मरण यांचें खतपाणी सतत घालीत राहिल्याखेरीज हा वृक्ष फोफावत नाहीं. देवाच्या अखंड नामस्मरणांत मनाला गुंतविलें म्हणजे आपोआपच त्याची विषयांकडील ओढ कमी होते. कीर्तनानें आणखी मनःशुद्धि होत रहाते व हळू हळू मनासहित कायापालट होत जातो. भागवताच्या पांचव्या अध्यायांत नामस्मरणाचा महिमा नाथांनीं वर्णिला आहे. ध्रुव, प्रल्हाद, अजामिळ, द्रौपदी अशा अनेक भक्तांनीं नामस्मरणाचाच मार्ग अनुसरला. त्यांच्या सतत नामघोषानें परमेश्वर प्रसन्न झाला व देवभक्त एक झाले. नाथ सांगतात, नामस्मरण, कीर्तन, भजनादि साधनांनीं युक्त असा भक्तिमार्ग खुद्द भगवंतांनींच निर्माण केला.

**न करितां नाना व्युत्पत्ति । सुगमोपायें ब्रह्मप्राप्ती ।**
**अबळे तरावया निश्चितीं । भगवंतें निजभक्ति प्रगट केली ॥**

ए. भा. २-२१६

भक्तींत योगाचा आटापिटा नाहीं, शास्त्राध्ययनाचे दुर्ग नाहींत, स्त्रीपुरुष भेद नाहीं. शुद्ध मनानें परमेश्वराला साद घालावी, त्याच्या भजन पूजनांत देहभान विसरावें, कीर्तनांत रंगावें म्हणजे तो आपला झालाच पाहिजे. कीर्तनाचे मानसशास्त्रीय परिणाम एकनाथांनीं सविस्तर वर्णिले आहेत. मुख्य म्हणजे देवाला कीर्तन इतकें प्रिय आहे कीं, जेथें खऱ्या भक्तिमार्गानें भक्त कीर्तन करीत असतो तेथें देव धांवत येतो. नव्हे, तासनूतास तो तेथेंच रेंगाळतो. भागवताच्या पांचव्या अध्यायांत कीर्तनमहिमा सांगतांना नाथ म्हणतात,

**तेव्हां देव भक्त समसमान । समान अवयव समान चिन्ह ।**
**भावें करितां हरिकीर्तन । येवढें महिमान हरिभक्तांचें ॥**

ए. भा. ५-४३३

कीर्तनांत भक्त स्वतःला विसरून जातो. ऐहिक सुखदुःखांची त्याला विस्मृति होते व त्याच्या वृत्तींत निर्भयता येते. देहाच्या यातनाकडेहि तो दुर्लक्ष करूं शकतो. त्याचा सर्व जगाविषयींचा दृष्टिकोनच बदलून जातो.

भजनकीर्तनांत मृत्यूलाहि जिंकण्याचें सामर्थ्य आहे. ज्या परमात्म्यानें वेद व शास्त्रें निर्माण केलीं तो स्वतःच भक्तीचा महिमा गातो. नाथ दुसऱ्या अध्यायांत सांगतात,

**उभवूनिया चारी बाह्या । निजात्मप्राप्तीच्या उपाया ।**
**" भक्त्याहमेकया ग्राह्या " । बोलिला लवलाह्या श्रीकृष्ण ॥**

ए. भा. २-३०९

भक्तीनें देवाला अंकित करून घेतां येतें. देव भक्ताचा दास बनतो. असा भक्तीचा अपार महिमा नाथांनीं भागवतांत जागोजाग वर्णन करून सांगितलेला आहे.

येवढा भक्तिमहिमा ऐकल्यानंतर एखाद्याला अशी शंका येईल कीं, नाथ सगुण परमेश्वर मानूनच भक्तिमार्ग सांगतात तर नामरूपातीत ब्रह्मापर्यंत ते जाऊन

पोंचणार कसे व पूर्णपणें मायानिरसन होणार कसें ? नाथांना कदाचित् या शंकेची पूर्वकल्पना असावी. कारण त्यांनीं सगुण भक्तीचे फायदे व सगुणनिर्गुण ऐक्य या दोहोंवर आपल्या लेखनांत भरपूर विवेचन केलें आहे. गीतेंतहि अव्यक्ताची भक्ति[८] अत्यंत क्लेशकारक आहे म्हणून परमेश्वराचें कोणतेंहि रूप डोळ्यासमोर आणून भजनपूजन करण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं असें म्हटलें आहे. छांदोग्योपनिषदाच्या तिसऱ्या अध्यायाच्या चतुर्थ खंडावर टीका करतांना शंकराचार्यांनींहि असें म्हटलें आहे कीं, "**प्रतीकद्वारा ब्रह्मोपासनमुक्त्वा प्रतीकं हित्वा सगुणब्रह्मोपासनमुपन्यस्यति** ।" पूजेसाठीं तुम्ही कोणतीहि मूर्ति पुढें ठेवा. भक्तींत एक अशी अवस्था येते कीं, त्यावेळीं भक्त पूर्णपणें देवरूप होतो व हें अद्वैत निर्माण झाल्याबरोबर मूर्तीचें कार्य संपतें. नाथांनीं स्पष्टच सांगितलें आहे कीं,

**निर्गुणाचा बोध कठिण । मनबुद्धिवाचे अगम्य जाण ।**
**शास्त्रासी न कळे उणखूण । वेदीं मौन धरियेलें ।।**

ए. भा. ११-१४६०

निव्वळ एखादी मूर्ति पुढें ठेवून भजन पूजन केलें म्हणजे त्या माणसास निर्गुण ब्रह्म समजणार नाहीं अगर तो भक्तीनें केवलाद्वैतापर्यंत पोहोंचू शकणार नाहीं ही कल्पनाच नाथांना पटत नाहीं. नाथांची ईश्वराची कल्पना इतकी विशाल व बुद्धिप्रधान आहे कीं त्यापुढें सगुण निर्गुण हा वाद वेडेपणाचाच वाटेल. ते म्हणतात,

**जो सर्वांमाजी असे सर्वदा । परी सर्वपणा नातळे कदा ।**
**जेवीं पद्मपत्र जलस्पंदा । अलिप्त बुदबुदा असोनि संगे ।।**

ए. भा. ५-१९३

**तेवीं असोनि सकळजनीं । घसटवेना जनघसणी ।**
**नभ जैसे अलिप्तपणी ।**........................

ए. भा. ५-१९४

---

८. **क्लेशोऽधिकतरस्तेषाम् अव्यक्तासक्तचेतसाम् ।**
**अव्यक्ताहि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ।।**

गीता १२-५

वरील वर्णनावरून असें स्पष्टपणें दिसून येईल कीं तत्त्वज्ञ एकनाथ व भक्त एकनाथ यांत मुळींच विरोध नाहीं. पातळ तूप व घट्ट तूप यांत कांहीं भेद नाहीं. त्याचप्रमाणें सगुण व निर्गुण यांत कांहीं भेद नाहीं. (ए. भा. १–२४६) कोणताहि किंतु न बाळगतां नाथ सांगतात,

**निर्गुणाहूनि सगुण न्यून । म्हणे तो केवळ मूर्ख जाण ।**
**सगुण निर्गुण दोन्ही समान । न्यून पूर्ण असेना ।।**

ए. भा. ११-१४५८

याप्रमाणें मायानिरसनाचा प्रमुख उपाय जी भक्ति, तिचें विवेचन व तपशील सांगितल्यानंतर एकनाथ सांगतात, याच देहीं याच डोळा मनुष्य मुक्तावस्थेचा ब्रह्मानंद अनुभवूं शकतो. मायेच्या कचाट्यांतून बाहेर पडून ब्रह्मानंदी तल्लीन झालेल्या मुक्ताची विलोभनीय वर्णनें नाथांनीं ठिकठिकाणीं केलीं आहेत. भागवताच्या सातव्या अध्यायांत ते सांगतात,

**पहिलें शास्त्रश्रवणें ज्ञान । तदनुभवें होय विज्ञान ।**
**ऐसा ज्ञानविज्ञानसंपन्न । निरभिमान तो होय ।।**

ए. भा. ७-१३३

**साचाचि निरभिमानता । जरी आली होय हाता ।**
**तरी शान्ति तेथ सर्वथा । उल्हासता पैं पावे ।।**

ए. भा. ७-१३४

ज्ञानविज्ञानानें संपन्न झालेला तो साधुपुरुष निरभिमानी होतो. त्याच्या चित्ताला अखंड शांति प्राप्त होते व एका अनुभूत आनंदांत त्याचें मन तल्लीन होऊन जातें. त्याला सर्व सजीव सृष्टींत परमेश्वर भरून राहिलेला दिसतो. नाथ सांगतात,

**सर्वभूतीं भगवंत पाही । भूतें भगवंताचे ठायीं ।**
**हें अवघे देखे जो स्वदेहीं । स्वस्वरूपें पाही स्वयें होय ।।**

ए. भा. २-६४४

मात्र भक्तीचें हें शिखर गांठणें वाटतें तेवढें सोपें नाहीं. पूर्व पुण्याई, सतत तपश्चर्या, मनःशुद्धि व ईश्वरीकृपा असल्यासच नराचा नारायण होईल. भागवताच्या बाविसाव्या अध्यायांत एकनाथ म्हणतात,

ऐसे प्राप्त पुरुष येथ । संसारीं नाहीं गा बहुत ।
हिंडतां अवघ्या जगांत । एकादा कदाचित देखिजे ।।

ए. भा. २२-५७९

वरील विवेचनावरून नाथांची मायेसंबंधींची कल्पना व तिच्या निरसनासाठीं त्यांनीं सुचविलेल्या उपायांची स्थूलमानानें वाचकांस कल्पना येईल.

## शांति

शांति म्हणजे ते ऐशीं । सागरीं अक्षोभ्यता जैसी ।
चढ वोहट नाहीं तिसी । सर्व देशीं सर्वदा ।।
नाना सरितांचे खळाळ । आणूनि घालिती समळ जळ ।
तो तिळभरी नव्हे डहूळ । अति निर्मळ निजांगें ।।
तैशी नाना भूत विषमता । स्वार्थ विरोधें अंगीं आदळतां ।
पालट्ट नव्हे ज्याच्या चित्ता । ते जाण सर्वथा निज शांति ।
ऐशी शांति ज्यासी देखा । तोचि सर्व भूतांचा सखा ।
आवडतां सर्व लोका । सुहृद तो कां सर्वांचा ।।
नवल सख्यत्वाची परी । सर्वस्व दे निजमैत्री ।
स्वार्थीं वंचनार्थुन करी । कृपापात्रीं उपदेशु ।।
अतर्क्य त्याची पाहती दिठी । मद्रूपें देखे सकळ सृष्टि ।
जगासीं मज अभिन्न गांठी । निजदृष्टी बांधली ।।
मग तो जेउते पाहे । तेउता मीचि तया आहे ।
तो जरी मातें न पाहे । तें न पाहणेंहि होये मीचि त्याचें ।।
त्याची पाहती जे दिठी । ते मीचि होय जगजेठी ।
ऐशी तया मज एक गांठी । सकळ सृष्टि समवेत ।।
अवघें जगचि मी होये । तेव्हां तो मी हे भाष जाये ।
ऐसा तो मजमाजी सामाये । सम साम्य समत्वे ।।

ना. भा. अ. ७-१३६ ते १४४

# एकनाथी भागवतांतील मंगलाचरणें

: लेखक :

डॉ. **वि. म. कुलकर्णी,** एम्. ए., पीएच्. डी.

( प्रमुख, मराठी विभाग, डी. ए. व्ही. महाविद्यालय, सोलापूर )

महाराष्ट्राच्या संतवाङ्मयांतील ग्रंथरत्नांत एकनाथांचा 'भागवत' हा एक अतिशय मोलाचा व महत्त्वाचा ग्रंथ आहे. श्री ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत व तुकोबांचा गाथा ही वारकऱ्यांची 'प्रस्थानत्रयी' मानण्यांत येते. इतकें महत्त्व एकनाथी भागवत या ग्रंथास प्राप्त होण्याचें कारण, त्यांतील भागवत धर्माचा, म्हणजे सहज सुलभ भक्तिमार्गाचा जयजयकार हें होय. एकनाथांना कांहीं भाविक ज्ञानेश्वरांचा अवतारच समजतात. त्यांतील तथ्य कै. पांगारकरांच्या शब्दांत एवढेंच सांगतां येईल कीं, "ज्ञानेश्वरीचा दुसरा अवतार म्हणजे नाथभागवत होय. जे सिद्धांत ज्ञानेश्वरींत संक्षेपानें सांगितले आहेत, ते गृहस्थाश्रमी नाथांनीं भाविक उपासकांच्या मनांवर आपल्या रसाळ सगुण प्रेमानें ओथंबलेल्या वाणीनें भागवतांत उलगडून विस्तारानें सांगितले आहेत." अशा या सिद्ध व प्रासादिक ग्रंथाचे एकूण ३१ अध्याय आहेत व त्यांत प्रत्येकाच्या आरंभीं मंगलाचरण आलें आहे. त्यांचें सम्यक्दर्शन घेण्याचा व त्याविषयीं आलोचन करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखांत केला आहे.

प्रत्येक मंगलाचरणाच्या शेवटच्या कांहीं ओव्यांत नाथांनीं "मागील ग्रंथ-संगति" सांगून मागील अध्यायाचा दुवा चालू अध्यायाशीं जोडला आहे व तेथें केव्हां केव्हां प्रस्तुत अध्यायांतील विषयाचें महत्त्वहि थोडक्यांत प्रतिपादन केलें आहे. मंगलाचरणांत बहुतेक स्थळीं आपले श्रेष्ठ गुरु जे जनार्दनस्वामी त्यांची स्तुती केली आहे व त्यांना नम्रतापूर्वक वारंवार अभिवादन केलें आहे. एकनाथी भागवताची पहिलीच ओवी श्री गुरुवंदनानें पावन झालेली आहे.

**ॐ नमो श्री जनार्दना । नाहीं भवअभव भावना ।**
**न देखोनि मीतूंपणा । नमन श्रीचरणा सद्गुरुराया ॥**

या ओवींत जें गुरुशीं तन्मयत्व व शरणागतत्व बीजरूपानें दिसून येतें, त्याचाच वाढविस्तार विविध मंगलाचरणांच्या ओव्यांतून झालेला आढळतो. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या आरंभीं

**ॐ नमोजी आद्या । वेदप्रतिपाद्या ।**
**जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।**

म्हणून आत्मरूपी ओंकाराला प्रणाम केला आहे. पण एकनाथांनीं आपल्या गुरूचेंच नांव सर्वप्रथम ओवींत योजून आपला गुरुविषयींचा आदर थोड्या धिटाईनें व्यक्त केला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ग्रंथाच्या आरंभींचें म्हणून पहिल्या अध्यायाचें मंगलाचरण सुविस्तृत झालें आहे हें साहजिकच होय. भागवताच्या पहिल्या श्लोकावरील टीका सुरू होण्या-पूर्वींच्या या जवळ जवळ २०० ओव्या अनेक दृष्टींनीं अभ्यसनीय आहेत. यांत १४०-४२ ओव्यापर्यंत गणपती, सरस्वती, संतसज्जन, कुलदैवत, संस्कृत कवि इत्यादिकांना परम आदरानें नमन केलें आहे. या नमनांचा विचार करतांना एकनाथांचें व्यक्तिमत्व व कवित्व यांवर कांहीं प्रकाश पडतो काय हें पाहणें महत्त्वाचें होईल.

तसें पाहिलें असतां वैदिक संप्रदायाच्या दृष्टीनें ग्रंथारंभीं कार्यसिद्धि व्हावी म्हणून श्रीगणेशाचें मंगलरूप आठवावें व त्यांस नमन करावें असा रूढ संकेतच आहे. या संकेतानुसार एकनाथांनीं गणपतीचें जें रूप वर्णन केलें आहे तें सर्वच रूपकात्मक आहे. या ठिकाणीं ज्ञानेश्वरांनीं केलेल्या अशाच स्वरूपाच्या गणेश-वर्णनाची कोणासहि आठवण व्हावी. एकनाथांचें वैशिष्ट्य हें कीं, रूपकपद्धति एकसारखी असूनहि ज्ञानेश्वरांहून एकनाथांचें निराळेंपण जाणवतेच. चारी पुरुषार्थ म्हणजे गणेशाच्या चार भुजा आहेत, बोधाचा नागबंध म्हणजे कटिभूषण आहे, प्रकृति पुरुष हे दोन चरण आहेत; संसाराचा फांस तोडणारा परशू हातांत आहे इत्यादि वर्णन करून हा देव ‘ मूषकवाहन ’ कसा यावर नाथांनीं एक कोटी लढ-विली आहे. ते म्हणतात,

**सूक्ष्माहूनी सूक्ष्म सान । त्यामाजी तुझें अधिष्ठान ।**
**यालागीं मूषकवाहन । नामाभिधान तुज साजे ।।**

सरस्वतीच्या वंदनांत "**वाग्देवतेची स्तुती। वाचाचि जाहली वदती।**" म्हणून द्वैतपणानें वर्णन करणें कठीण आहे, असें नाथ म्हणतात. यानंतर सज्जन-वृंदाचें फार सुरेख वर्णन एकनाथांनीं जिव्हाळ्यानें केलें आहे. त्यांच्याठिकाणीं विश्वास ठेवल्यावर सर्व कांहीं साध्य होईलच असें म्हणून एकनाथांनीं एकलव्याचा समर्पक दृष्टांत दिला आहे. या सज्जनांच्या वर्णनाच्या रूपानें जीवन्मुक्त, स्थितप्रज्ञ अशा महापुरुषांचा आदर्शच एकनाथांनीं थोडक्यांत रेखाटला आहे. स्वरूप-सांक्षात्कारामुळें या सज्जनांच्या ठिकाणचें स्मरण विस्मरण, प्रपंच परमार्थ, स्वप्न जागृति इत्यादि सारें द्वंद्व हरपलेलें असतें, अशा संतसज्जनांनीं एके वेळीं मोठा सोहळा करून एकनाथांना प्राकृत भाषेंत ग्रंथ रचण्याची आज्ञा केली असें वर्णन येथें आलें आहे. संत म्हणाले,

**आम्हांसी पाहिजे ज्ञानकथा। वरी तुजसारखा रसाळ वक्ता।**
**तरी स्तुती सांडोनी आतां। निरूपण तत्त्वतां चालवी॥**

या ठिकाणच्या ओव्यांवरून एकनाथकालीन कांहीं संतसज्जनांनीं एकनाथांना भागवताच्या रचनेविषयीं आग्रहपूर्वक प्रेरणा केली असावी असाहि तर्क निघूं शकेल. ओवी एकोणऐंशीपासून पुढें जनार्दनस्वामींच्या थोरपणाच्या निदर्शक ओव्या गायिल्या आहेत. यांत परमोत्कट शिष्यभाव दिसून येतो. गुरूनें 'भवस्वप्न वावगें केलें', 'देहीं देह विदेह केलें' आणि अशा स्थितींत 'नमनहि नमनेंशीं गेलें, नमितें नेणों काय झालें' अशी परम अद्वैताची भूमिका प्राप्त झाली. मग श्रीगुरु जनार्दन आपल्या मुखाचें निजमुख झालें व त्यांनीं हा ग्रंथ प्रगट केला, असें नाथ म्हणतात. मात्र त्यांची लीला अगाध! कारण त्यांनीं अभंगांत आपलें नांव न घालतां माझें नांव घातलें.

एकनाथ, एकाजनार्दन व एकादशस्कंध या शब्दांना अनुलक्षून त्यांतील अर्थांच्या विविध छटा दाखवून अनेक श्लेष साधले आहेत व मोठी बहार केली आहे. यानंतर व्यास, वाल्मिकी, शंकराचार्य आणि भागवताचे भाष्यकार श्रीधर यांना वंदन केलें आहे. पुढें मराठी कवींपैकीं थोडक्यांचाच उल्लेख आहे.

**वंदूं प्राकृत कवीश्वर। निवृत्ती प्रमुख ज्ञानेश्वर।**
**नामदेव चांगदेव वटेश्वर। ज्यांचें भाग्य थोर गुरुकृपा॥**

या कवींच्या चरणीं माथा ठेवतांना यांचे ग्रंथ वाचून प्राकृत जनांना म्हणजे मराठी जनतेला ज्ञानप्राप्ति होते, असें गौरवपूर्वक म्हटलें आहे हें विशेष. मराठी कवींच्या उल्लेखाच्या संदर्भांतच संस्कृत व मराठी यांच्या परस्परसंबंधाविषयींच्या एकनाथांच्या ओव्या अवतरल्या आहेत. सोन्याचीं फुलें ताजीं व शिळीं म्हणून दाखविणें जसें कठीण, तसें संस्कृत ग्रंथकर्ते तेवढे महाकवि व मराठी कवि हे सामान्य कवि असें दाखविणें कठीण आहे. " **संस्कृत वाणी देवें केली ।** " या अहंभावपोषक सिद्धांताला ' **प्राकृत काय चोरांपासून झाली ।** ' असा रोकडा जबाब एकनाथांनीं याच मंगलाचरणांत दिला आहे व तो शतकानुशतके मराठी-प्रेमीयांच्या मनांवर कोरला जात आहे.

तिसऱ्या अध्यायाच्या मंगलाचरणांत एकनाथ ' **ॐ नमोजी गुरुराया । म्हणोनि सद्भावें लागे पाया ।** ' अशी सुरुवात करतात व पुढील ओव्यांतून गुरूचे व देवाचे चरणच कसे भवतारक आहेत याचें विस्तारानें वर्णन करतात, तें सारें भावपरिपूर्णच आहे. या ठिकाणच्या उल्लेखांतील अहिल्याशिळा प्रभु-चरणस्पर्शानें उद्धरली गेली हा उल्लेख मार्मिक वाटतो. ग्रंथकर्तृत्व हें माझें नसून माझ्या गुरुमाउलीचें–श्री जनार्दनांचें आहे हें तर सर्व ठिकाणीं पुन्हां पुन्हां सांगितलें आहे. चौथ्या अध्यायाच्या मंगलाचरणांत याची विशेष प्रतीति येते. एक-नाथांच्या ठिकाणीं भागवतांतील उच्च कोटीचें तत्त्वज्ञान स्वांगीं मुरलें होतें, याचें प्रत्यंतर वारंवार मिळतें व वाचकांचा, त्यांच्या व्यक्तिमत्वाविषयींचा आदर दुणावत जातो. ग्रंथकर्तृत्वाच्या अनुषंगानें आपलें व गुरुमाउलीचें एकत्व वर्णन करण्यांत नाथांच्या मनास मोठाच हर्ष होतो असें दिसून येतें. चौथ्या मंगलाचरणांत त्यांनीं पुढील समर्पक दृष्टांत दिले आहेत.

**शंख मधुर ध्वनी गाजे । तो वाजविल्याचेनि वाजे ।**
**तेवीं म्यां जें जें बोलिजे । तें तें बोलणें साजे तुझेनि ।।**

**माझें करून खांब सूत्र । तूं झालासी सूत्रधार ।**
**हालवोनिया निजसूत्र । कर्में विचित्र करविसी ।।**

**जेवीं कापुरा आगी झटे । तेव्हांचि कापुरत्व खुंटे ।**
**सच्छिष्यासि सद्गुरु भेटे । तेव्हांचि फिटे भिन्नभेदू ।।**

नाथांच्या मनांत सद्गुरु व देव हे एकरूपच आहेत हें विशेषेकरून ध्यानांत घेतलें पाहिजे. सद्गुरुरूपानें आपण देवासच वंदन करीत आहोंत, आवाहन करीत आहोंत असा नाथांचा आत्मभाव आहे. त्यांच्या मंगलाचरणांतून जे विविध उल्लेख येतात ते देवानें निजभक्तांचा विविध अवतारांतून जो उद्धार केला तत्संबंधीचे येतात व ते वाचतांना सारें परमात्मचरित्रच आपणांपुढें साकार होतें. '**संत स्वरूपें अवतरला । स्वयें संचला परमात्मा ।**' हीच त्यांची एकमेव भावना आहे. '**जीं जीं संतांचीं स्वरूपें । तीं तीं श्रीहरीचीं स्वरूपें ।**' असें ते म्हणतात, तें उगाच नव्हे.

सहाव्या अध्यायाच्या मंगलाचरणांत 'जनार्दन' या नांवाची एक गंमतीची फोड नाथांनीं केली आहे. '**लिंग देहाचें मर्दन । तेंचि जनाचें अर्दन ।**' असें त्यांनीं तेथें म्हटलें आहे.

आठव्या अध्यायाच्या मंगलाचरणांत सद्गुरूस जीवाची आत्म्याशीं जी ऐक्यवृत्ति, तिचें 'घटित' पाहणारा ज्योतिषी म्हटलें आहे. हा ज्योतिषी नुसतें 'घटित' पाहून थांबत नाहीं, तर चैतन्यरूपी जीवाचें ब्रह्माशीं लग्न लावून देतो. एकदां हें विशिष्ट विवाहाचें रूपक कल्पिल्यावर नाथांनीं तें समग्र व सांग फुलवून दाखविलें आहे. '**ॐ पुण्याहं**' "मीच प्रणवरूप आहे" असें म्हणून स्वतःचेंच जीवाशीं लग्न लावण्याचा हा प्रकार, नाथ म्हणतात, नवलाईचा म्हणावा ! या लग्नाचे वेळीं चार पुरुषार्थांचें 'तेलवण' समर्पिलें आहे, अहंभावाचें 'लिंबलोण' केलें आहे, वैराग्य, विवेकादि साधनचतुष्टयाचा 'मधुपर्क' अर्पिला आहे. पण या लग्नांत सारा "एकात्मभाव" असल्यानें नवरा काळा कीं गोरा हें ओळखूं येत नाहीं. हें अद्वैतप्रतिपादक विवेचन वाचतांना नाथांच्या रूपकरचनेच्या कौशल्याचा पुन्हां एकदां प्रत्यय येतो.

नवव्या अध्यायाच्या मंगलाचरणांत सद्गुरूचें ठिकाणीं इंद्राची, अमरपतीची उपमा योजिली आहे व मग एकाहून एक सरस कल्पना लढवून स्वर्गातील इंद्राची, त्याच्या ऐश्वर्याची आणि इहलोकींच्या देवावतारांची तुलना करून दाखविली आहे, ती मोठी रोचकच आहे. नाथ स्वतः या रूपक योजनेंत रंगून जातात व भाविक वाचकांसहि रंगवून सोडतात. गुरुकृपा हीच कामधेनु, श्रद्धा हें वासरूं, त्याच्या

हुंकारानें या कामधेनूस पान्हा फुटतो व तें दुमतें सर्व भक्तभागवतांना पुरेसें होतें. इंद्रास स्वर्गांत सिंहासन आहे तर इहलोकीं सद्गुरूस सच्चिदानंदाची गादी आहे.

दहाव्या अध्यायांतील उपमा उत्तम वैद्याची-धन्वंतरीची आहे व तीहि वाचकांच्या मनबुद्धींना रुचकर खाद्य पुरवीत शेवटपर्यंत साग्रसंगीत वर्णिली आहे. भवरोगाच्या भ्रमानें जन भ्रमले आहेत, त्यांची ज्ञानशक्ती क्षीण झाली आहे, ते वारंवार विषयाचें पाणी मागत आहेत, त्यांची " **गोड परमार्थ झाला कडु ।** " अशी स्थिती झाली आहे. अशा भ्रमितचित्तरोग्यांना सद्गुरु अक्षररस " अर्ध-मात्रा " देतात व यामुळें मी देह नव्हे, अशी जाणीव होते. रोग थोडा बरा झाल्यावर भूक वाढते, तेव्हां कोणतें खाणें दिलें जातें हें एकनाथांनीं तेव्हांच्या पद्धतीनुसार वर्णिलें आहे. चित्तचिंतेच्या लाह्या, कर्माकर्माचे लाडू आणि ब्रह्म-हस्मीची गोमटीं पक्वान्नें खाऊन भवरोग पुरता नाहींसा होतो आणि स्वानंदाची पुष्टि प्राप्त होते, असें वर्णन आलें आहे. या मंगलाचरणांत सद्गुरूचें नांव तेंच आमचें वेदशास्त्र आहे व तें सर्व मंत्रांहून श्रेष्ठ आहे असा निर्वाळा एकनाथांनीं दिला आहे.

अकराव्या अध्यायाच्या मंगलाचरणांत श्रीगुरूला सत्‌चित्‌घन असें म्हटलें आहे व तो स्वानंदरूपी जलाचा वर्षाव करीत आहे, त्यामुळें भक्तरूपी मयूर आनंदले आहेत इत्यादि वर्णन केलें आहे. सर्वसामान्य मराठी वाचकांस सहज समजण्याजोगें असें गुरूचें आनंदघन स्वरूपांत जें वर्णन येथें केलें आहे, तें अतिशय प्रत्ययकारी आहे.

बाराव्या अध्यायांत गुरूला नाविन्यपूर्ण वसंतऋतूची उपमा दिली आहे. या ठिकाणची प्रत्येक ओवी प्रसाद व माधुर्य या गुणांनीं नटलेली आहे. अनुप्रास-युक्त व नादमधुर शब्दांनीं नटलेल्या अशा या ओव्या रसिकांना सदा आनंददायक ठरतील.

**भक्ति सरोवरीं निर्मळ पाणी । विकासल्या नवविध कमळणी ।**
**भक्त सुस्नात तिये स्थानीं । निमज्जनीं निश्चळ ।।**
**वसंते उल्हास तरुवरा । उलोनी लागल्या स्वानंदधारा ।**
**पारंब्या भेदोनिया धरा । धरा धरा विगुंतल्या ।।**

यासारख्या ओव्या बानगीदाखल सांगतां येतील.

चौदाव्या अध्यायांतील मंगलाचरण विशेषच उल्लेखनीय आहे. येथें गुरूला 'क्षीरसागर' कल्पिलें आहे. त्यांतून ज्ञानरूपी चंद्राचा उदय होतो आणि मग अविद्येचा अंधार दूर होतो, हें सांगून सागरमंथनावरहि मजेदार रूपक केलें आहे. रूपकें रचण्यांत एकनाथांचा किती हातखंडा आहे, हें येथें पाहून घ्यावें. या सागर-मंथनांतून ब्रह्मरस व भ्रमरस यांनीं भरलेला कलश निघाला. अहंकाररूपी राहु मध्यें येऊं लागला. त्याचें शिर छेदल्यानंतर दैवी प्रकृतीच्या लोकांना ब्रह्मरस प्राप्त झाला, असें म्हटलें आहे. याखेरीज 'जनार्दनाच्या कृपेनें मी मराठींत भागवत सांगत आहे, शब्दामध्यें "निःशब्द वस्तु" म्हणजे शब्दातीत परब्रह्म व्यक्त करून दाखवीत आहे.' असेंहि एकनाथांनीं येथें प्रांजळपणें म्हटलें आहे. जनार्दनांनींच आपणांस भागवताची गोडी लावली असा उल्लेख पुढील मंगलाचरणांत आला आहे. जो वक्ता कथेशीं एकरूप झाला नाहीं, तो ऊंसाच्या घाण्यासारखा नीरस-पणानें उगाच करकर मात्र करीत राहतो. मला मात्र जनार्दनांनीं कथेचें गोडपण चाखविलें, अशी नाथांची ग्वाही आहे. भागवत हें "शुकमुखींचें श्रेष्ठ फळ आहे, त्याला साल नाहीं, कोय नाहीं, हें नुसतें माधुर्यच अंतर्बाह्य ओसंडून राहिलें आहे," असें एकनाथ म्हणतात.

सोळाव्या अध्यायाच्या मंगलाचरणामध्यें "**माझे मराठी आरिव बोल। सद्गुरूनीं केले सखोल।**" ही प्रसिद्ध ओंवी आली आहे. याखेरीज भाग-वताची पूर्वपरंपराहि येथें सांगितली गेली आहे. एकनाथांनीं येथें पूर्वीच्या १५ अध्यायांतील म्हणजे पूर्वार्धांतील विषयांचें सूत्र थोडक्यांत कथन केलें आहे, तसेंच पुढील १५ अध्यायांतील सार सांगून ठेवलें आहे. हें निरूपण "अतिशुद्ध" म्हणजे तर्कशुद्ध असल्याची ग्वाहीहि येथें दिली आहे. आपला ग्रंथ श्रीधरी टीके-वर आधारलेला आहे, हेंहि येथेंच स्पष्ट कथन केलेलें आहे.

एकोणविसाव्या अध्यायांतील मंगलचरण शंकराच्या उपमेनें मंडित झालेलें आहे तर एकविसाव्या अध्यायांत सद्गुरूस श्रीविष्णूची उपमा दिली आहे. ही उपमा सविस्तर वर्णन करतांना एकनाथ वर्ण्य विषयाशीं विशेष समरस झालेले दिसतात आणि शेवटीं शेवटीं तर सद्गुरुरूपी महाविष्णूंनीं संतुष्ट होऊन माझ्या-कडून मराठींत हा ग्रंथ कां करविला हेंहि मला समजत नाहीं, कारण '**म्यां**

**करणें का न करणें । हेंहि हिरून नेलें जनार्दनें ।**' अशी माझी स्थिति झाली आहे व माझें बोलणें तोच बोलत आहे इत्यादि सांगून ते आपलें भक्तिभावानें भरलेलें अंतःकरणच मोकळें करीत आहेत असें दिसतें.

यापुढील अध्यायाच्या मंगलचरणांत एकनाथकालीन समाजस्थितीची द्योतक अशी कळसूत्री बाहुल्यांची उपमा आली आहे. पूर्व कर्मांच्या सूत्राप्रमाणें ८४ लक्ष पुतळ्या आपल्या तंत्रानें नाचविणारा, कळसूत्री बाहुल्यांचा खेळ करणारा सद्गुरु मोठा लाघवी व नवलाचा दिसतो. आपलें निजसूत्र न दाखवितां विचित्र भूतें नाचविण्याची त्याची कला अगाधच म्हणावी. खेळ वाढविणारा तोच, मोडणारा तोच! अर्थात् त्याचें मूळ लक्षण कळावयाचें तर गुरुकृपाच होणें आवश्यक.

यापुढील अध्यायांपैकीं २४, २८ व ३१ या अध्यायांतील मंगलाचरणें महत्त्वाचीं वाटतात. २४ व्या अध्यायाच्या मंगलाचरणांत मूळ एकादशस्कंधांत सांख्यशास्त्राचें निरूपण भगवान् श्रीकृष्णांनीं उद्धवास सांगितलेलें आहे, त्या विषयास अनुसरूनच प्रकृतिपुरुषविवेक विविध उपमा, दृष्टांतांच्या आधारें सांगितला आहे व पुढील विषयाची थोडक्यांत प्रस्तावनाच केली आहे. वास्तविक पाहतां परमेश्वर हा अद्वैताचा रहिवासी आहे. तेथें एक अद्वयानंदच संचला आहे. अशा स्थितींत जेथें मीतूंपणाला ठाव नाहीं, तेथें प्रकृति व पुरुष हें वेगळेंपण तरी कोठून संभवणार? एकनाथ म्हणतात, "**वांझेच्या पुत्राचा विवाहो । समारंभ चला पहा हो ।**" तशीच ही स्थिति म्हणावी! यापुढें मात्र एकनाथांनीं आपल्या प्रश्नास आपणच उत्तर दिलें आहे व अर्धनारीनटेश्वराप्रमाणें या संसारांत प्रकृति आणि पुरुष एका रूपांतच नांदत आहेत, असें सांगितलें आहे. प्रकृतिमुळें पुरुषाला महत्त्व आहे. तिच्यामुळेंच पुरुषास पंचमहाभूतात्मक सृष्टीचें कर्तेपण प्राप्त झालें.

**ऐसा प्रकृतिचिया भिडा । पुरुष केवळ झाला वेडा ।**
**निजत्व विसरुनी बापुडा । केला गाढा अति दीन ॥**

अर्थात् या परिस्थितींतून सुटका करणारा म्हणजे एक गुरुरायच होय हें पुन्हां आवर्जून सांगावयास एकनाथ विसरत नाहींत.

अठ्ठाविसाव्या अध्यायांत ज्ञानयोगाचें थोडक्यांत विवेचन आलेलें आहे व आत्मानात्मविचारहि आला आहे. विशेष म्हणजे याच अध्यायांत निर्विकार व चिन्मय परब्रह्माचा साक्षात्कार झालेल्या ब्रह्मनिष्ठ पुरुषांची स्थिति वर्णिलेली आहे. साहजिकच एकनाथांच्या लेखणीसहि येथील मंगलाचरणाचेवेळीं विशेष भरते आलें आहे. श्रीगुरूचा चिदात्मज्योति, स्वानंदघन, देवचूडामणि असा विविध नामांनीं जयजयकार करून " **ऐसा श्रीगुरु तूं अनंत । तुझ्या स्वरूपासी नाहीं अंत ।**' असें एकनाथांनीं म्हटलें आहे. एकनाथांची अद्वयाची आवडती कल्पना येथें मांडली गेली आहे. एकनाथ हे द्वैती कीं अद्वैती या कधीं कधीं विचारल्या जाणाऱ्या शंकेस येथें चांगलेंच उत्तर मिळतें. गंगानदी सागरास मिळून त्यावर तळपत राहते, त्याप्रमाणें भक्त परब्रह्मामध्यें मिळून जाऊन त्याचेंच भजन करीत राहतात असा दृष्टान्त नाथ देतात. या अध्यायाच्या मंगलाचरणाचें आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विषयाच्या उत्कटतेबरोबर आपली टीकाहि अधिकाधिक प्रासादिक होत चालली आहे, असें एकनाथ म्हणतात. या अध्यायांतील निरूपण म्हणजे 'सोलीव स्वानंद' च होय असें यथार्थ रीतीनें म्हणून एकनाथ श्रीकृष्ण व उद्धव यांच्या संवादाकडे वळले आहेत.

एकतिसावा अध्याय हा शेवटचा अध्याय. एकतीस वेळां श्रीसद्गुरूचें व त्या अनुषंगानें परमात्मस्वरूपाचें मंगल चिंतन करतांना एकनाथांची कल्पना कधींच कंटाळली नाहीं, संकोचली नाहीं. तिनें मोठ्या 'चढोवढीनें' गुरुरूपाचा व गुरुकृपेचा महिमा विविध प्रकारांनीं व तत्त्वप्रचुर रीतीनें कथन केला, इतका कीं, नुसत्या या एकतीस मंगलाचरणांचा बारकाईनें अभ्यास करणारासहि एखादा तत्त्वनिरूपणाचा ग्रंथ वाचल्याचें समाधान लाभावें. एकतिसाव्या अध्यायांत श्रीकृष्णाच्या निर्याणाचें वर्णन आहे व तें करण्यापूर्वीं मंगलाचरणांत थोडक्यामध्यें सारें श्रीकृष्णचरित्रच ग्रथित केलें आहे. हा भागवतांतील कळसाध्याय. तेव्हां श्रीकृष्ण निजधामाला गेल्यावर निरूपणहि संपलें हें सांगतांना नाथ एक मार्मिक दृष्टांत देतात,

**कळसावरतें न चढे काम । तेवीं देवें टाकिल्या निजधाम ।**
**राहिला निरुपणाचा संभ्रम ।** ............

एकनाथी भागवताच्यां मंगलाचरणांतील ओवी ओवींतून एकनाथांचा गुरुविषयींचा निष्ठाभाव व त्यांचा अध्यात्मांतील स्वाधिकार या गुणांचा प्रत्यय येतो. 'हरिवरदा' चे कर्ते कृष्णदयार्णव यांनीं एकनाथांचा गौरव करतांना यथार्थच म्हटलें आहे कीं,

अभेद गुरुभजनाची मागी । प्रकट आचरोनि दाविली जगीं ।
गुरुदास्याच्या ऐश्वर्ययोगीं । समता आंगीं शोभविली ।।

---

## यालागीं मुख्य गुरु नरदेहो

चोवीस गुरूंचाहि हा गुरु । विवेक वैराग्य विचारु ।
हा नरदेहीं लाधे सधरु । यालागीं मुख्य गुरु नरदेहो ।।
देहासी जें गुरुत्व जाणा । तें दो प्रकारीं विचक्षणा ।
सांगेन त्याच्या लक्षणा । संरक्षणा परमार्थी ।।
देहा ऐसे वोखटे । पृथ्वीमाजीं नाहीं कोठें ।
देहा ऐसें गोमटें । पाहतां न भेटे त्रिलोकीं ।।
वोखटे म्हणोनि त्यागावें । तैं मोक्षसुखासी नागवावें ।
हो कां गोमटें म्हणूनि भोगावें । तैं अवश्य जावे नरकासी ।।
तरी हें त्यागावें ना भोगावें । मध्यभागें विभागावें ।
आत्मसाधनीं राखावें । निजस्वभावें हितालागीं ।।
जैसें भाडियाचें घोडें । आसक्ति सांडोनि पुढें ।
येणेवरी नेणे घडे । स्वार्थ चाडे लागुनी ।।
हेतु ठेवूनि परमार्थी । गेहीं वस्ती करूं जेवीं उखिता ।
देह आसक्तीची कथा । बुद्धीच्या पंथा येवों नेदी ।।

ना. भा. अ. ९-२४९ ते ५५

---

ग्रं. क्र. ११०१४

# नाथांचा कर्मयोग

: लेखक :
डॉ. श्रीधर रंगनाथ कुलकर्णी, एम्. ए., पीएच्. डी.
( प्रमुख, मराठी विभाग, निजाम कॉलेज, हैद्राबाद )

भक्तिप्रधान भागवत । मुख्य भक्ति ते स्वधर्मयुक्त ।
येणें स्वधर्में भक्त समस्त । परम भागवत उद्धरले ।।

ए. भा. १८ -३९०

चित्तवृत्ति क्रियाचरण । या नांव गा कर्म जाण ।
तेथ निरक्षेप जें माझें भजन । स्वधर्म संपूर्ण या नांव ।।
ब्रह्मकर्माचें प्रकाशक । कर्म तितुकें ब्रह्मात्मक ।
हेंचि मदर्पण चोख । माझें भजन देख या रीतीं ।। ७४ ।।

ए. भा. अ. २५

संताशिरोमणि श्रीएकनाथ यांनीं भागवती टीकेंत प्रतिपादिलेल्या कर्मयोगाचें विवरण हा स्वतंत्र ग्रंथाचा विषय एका लेखाच्या मर्यादेंत मांडतां येणें अशक्यप्राय आहे. कर्मयोग हें नाथांच्या उपदेशाचें सारसर्वस्व आहे. कर्म मोक्षप्रद आहे एवढीच नाथांची भूमिका नसून कर्म ब्रह्मस्वरूप आहे असा त्यांचा सिद्धांत आहे. नाथांच्या या सिद्धांताचा सांगोपांग विचार लेखाच्या मर्यादेंत अशक्य असला तरी नाथांच्या भूमिकेचें स्थूल दिग्दर्शन मात्र करतां येईल.

## कर्मयोगाची ऐतिहासिक पार्श्वभूमि

वैदिक तत्त्वज्ञानाच्या प्रारंभकाळांत कर्मयोगाचें स्वतंत्र विवरण आढळत नाहीं. कारण वैदिक धर्मच कर्मयोगप्रधान असल्यानें या धर्माच्या विचारांत कर्मयोग आवश्यक असल्याचा आग्रह अनावश्यक होता. ' कर्म करीत करीत शंभर वर्षें जगावें, अनासक्तीनें जीवनांतील सुखदुःखांचा उपभोग घ्यावा, याशिवाय दुसरा कोणताच मार्ग प्रशस्त नाहीं. अनासक्तवृत्तीनें कर्म करणारास कर्माची बाधा होत नाहीं ' हे व यासारखे विचार प्रारंभींच्या उपनिषदांत आढळतात. वेदोक्त

कर्म व वेदोक्त धर्म मानवास अत्यावश्यक असल्याची या दर्शनकारांची भूमिका असल्यानें कर्मत्याग किंवा कर्मसंन्यासवादाच्या सापेक्ष भूमिकेंतून आलेलें कर्मयोगाचें महत्त्व या काळांत आढळत नाहीं.

कर्मठांचा जड कर्माविषयींचा आग्रह पराकोटीस पोंचल्यानंतर त्याची स्वाभाविक प्रतिक्रिया कर्मत्याग किंवा कर्मसंन्यासाच्या भूमिकेंत परिणत झाली. वेदोक्त यज्ञयागादिक कर्म म्हणजेच धर्म होय या चुकीच्या समजुतीनें धर्माचरणानें व्यक्तीचा होणारा विकास खुंटला व विकसनशीलवृत्ति विरोधी दिशेनें उफाळून आली. कर्मसंन्यास हीच ज्ञानी माणसाची खरी निष्ठा होय या भूमिकेस महत्त्व आलें. कर्मांचा आत्यंतिक आदर करणारे कर्मठ आणि कर्माकडे व पर्यायानें विश्वाकडे पाठ फिरविणारे ज्ञानमार्गीय संन्यासी या दोघांच्या एकांतिक भूमिकेमुळें समाजाचा सर्वांगीण विकास मात्र थांबला. आत्यंतिक कर्मनिवृत्ति समाजकल्याणास व व्यक्तिविकासास बाधक असल्यानें वैदिकधर्मप्रेरणेचें पुनरुज्जीवन करतांना कर्मयोगाचा आग्रहानें पुरस्कार करणें भगवद्गीतेस आवश्यक वाटलें. कर्माकर्माच्या खटाटोपांतून संन्यास घेऊन मोकळा होण्यास आतुर झालेल्या अर्जुनास युद्धप्रवृत्त करतांना निष्काम कर्मयोगाचा भगवंतांनीं आग्रह धरला तो याच हेतुनें.

## गीतेंतील निष्काम कर्मयोग

कर्मयोग या संज्ञेचा सरळ अर्थ कर्मांच्यायोगें जिवाशिवाचें ऐक्य साधणें असा होतो. कर्म तर बंधनकारक, मग तें मोक्षप्रद कसें होणार या आशंकेस गीतेनें निष्काम कर्मयोगाच्या विवरणानें उत्तर दिलें आहे. कर्म बंधनकारक असतें हें खरें असलें तरी कर्मांच्या संन्यासानें या बंधनाचा विच्छेद करतां येतो हें तितकेसें खरें नाहीं. कारण कर्म सोडण्याचा कितीहि कठोर निर्धार केला तरी संपूर्ण कर्मत्याग असंभवनीय आहे. जगणें हेंच जेथें कर्म आहे तेथें जिवंत राहून कर्म सोडण्याची भाषा करणें वेडेपणाचें ठरणार आहे. अशा परिस्थितींत त्याग घडणार तो फक्त आवश्यक कर्तव्यकर्मांचाच. म्हणजे कर्मांच्या बंधनांतून सुटण्यासाठीं कर्तव्यत्यागाचा अधर्म स्वीकारूनहि संपूर्ण कर्मत्याग घडत नाहीं तो नाहींच.

## कर्मानें कर्मबंधाचा विच्छेद

कर्म सोडावें तर अधर्म घडतो, कर्म आचरावें तर कर्मबंध आड येतो या दुश्चक्रांतून सुटण्याचा मार्ग गीतेनें सांगितला तो निष्काम कर्मयोगाचा. समत्वबुद्धीनें

व स्थितप्रज्ञवृत्तीनें फलाची आकांक्षा न बाळगतां व कर्तृत्वाचा अहंकार जडूं न देतां केलेलें कर्म बंधनकारक न होतां मोक्षप्रद ठरतें. ही समत्वबुद्धि अथवा ज्ञान-योग ज्यास अशक्य वाटेल त्यानें परमेश्वरार्पणपूर्वक म्हणजे भक्तियुक्त अंतःकरणानें कर्म करावें म्हणजे कर्मांची बाधा त्यास होणार नाहीं. हिऱ्यानें हिरा चिरावा त्याप्रमाणें निष्काम कर्मानें कर्मबंधनाचा विच्छेद करावा हें गीतोक्त निष्काम कर्माचें अथवा कर्मयोगाचें सार आहे.

## कर्मसंन्यासाची प्रतिष्ठा

गीतेचा निष्काम कर्मयोग कालांतरानें मलिन झाला. अवैदिक विचार-सरणींनीं कर्मसंन्यासास महत्त्व दिल्यानें या आश्रमाची प्रतिष्ठा वाढली. वैदिक परंपरेंतहि पुन्हां कर्मत्यागास मानाचें स्थान मिळालें. वैदिक तत्त्वज्ञानास आलेल्या या मालिन्याचें निवारण बुद्धोत्तर कालांत भागवत व योगवासिष्ठ या ग्रंथांनीं केलें. या दोन्ही ग्रंथांनीं गीतेंतील कर्मयोगाचा अनुक्रमें भक्ति व ज्ञान यांच्या पार्श्वभूमीवर पुरस्कार केला. तरी कर्मसंन्यासवादी विचारसरणीचें समग्र निर्मूलन होऊं शकलें नाहीं.

## भक्तिप्रधान कर्मयोग

गीतोक्त कर्मयोगाचें पुनरुज्जीवन भागवतानें भक्तीस प्राधान्य देऊन केलें आहे. पुराणांच्या रचनावैशिष्ट्यास अनुसरून इतर अनेक विषयांचें विवरण भागवतांत आलेलें असलें तरी निष्काम कर्मयोगाचा प्रवाह सर्व विवरणांत अनुस्यूत आहे. एकादशस्कंधांत या योगाचें विवरण विशेष आलेलें आहे. म्हणूनच ‘ भागवत एकादशस्कंध ही गीतेची सुधारून वाढविलेली आवृत्ति आहे ’ असा जाणत्यांचा अभिप्राय पडतो. या स्कंधाच्या तिसऱ्या अध्यायांत कर्मांच्या योगानें कर्मांचा निरास करून नैष्कर्म्य प्राप्त करून देणाऱ्या कर्मयोगाचा विचार आला आहे. ईश्वरार्पणपूर्वक कर्म करणें म्हणजे नैष्कर्म्य होय असा भागवतकारांचा सिद्धांत आहे. ( ३–४३ ते ५५ ) ज्ञानी आणि परम भागवत यांच्या लक्षणांतदेखील भागवतानें कर्मयोग साकार केला आहे. भागवताच्या पहिल्या स्कंधांत देखील

**यदीश्वरे भगवति कर्म ब्रह्मणि भावितम् ।।**

**यद्वा क्रियते कर्म भगवत् परितोषणम् ।**
**ज्ञानं यत्तदधीनं हि भक्तियोग समन्वितम् ।।** १-१२, ३२

ईश्वरार्पणपूर्वक कर्मानें ज्ञानाची व भगवंताची प्राप्ती होते असा निर्वाळा दिला आहे.

## ज्ञानेश्वरांचें युगप्रवर्तक कार्य

भागवतांतील भक्तिप्रधान कर्मयोगावर उत्तरकालांत शंकराचार्यादिकांच्या कर्मसंन्यासानें मात केली. वेदांती ज्ञानचर्चेंत जीवितसाफल्य मानूं लागले व भक्तियोगी भगवच्चिंतनांतच सर्वस्व समजूं लागले. त्यामुळें निष्क्रियता वाढली, अधर्म धर्माच्या नांवानें वावरूं लागला, व्यक्तीचा विकास खुंटला व समाजाची अधोगती झपाट्यानें होऊं लागली. अशा परिस्थितींत महाराष्ट्रांत गीतोक्त कर्मयोगाचें पुनरुज्जीवन करण्याचें क्रांतिकारक कार्य संत ज्ञानेश्वर यांनीं केलें. कर्मयोग हा धुरेचा योग आहे, कर्म हींच सर्वात्मक ईश्वरास प्रसन्न करणारी पूजा आहे, 'कर्में ईशु भजावा' हा भगवंताचा आदेश आहे, देहधाऱ्यांनीं कर्माची खंती करणें गांवढळपणाचें आहे, स्वधर्मकर्म तारक आहे, तोच नित्य यज्ञ आहे, कर्माच्या बंधनांतून मुक्त होण्यास कर्मत्याग करावा लागत नाहीं, कर्माचें फळ भगवंतास अर्पण करणारा ज्ञानी कर्मातीत होतो, असें निःसंदिग्ध प्रतिपादन ज्ञानेश्वरांनीं केलें आहे.[1]

## नाथांची भूमिका

एकनाथांच्या कर्मयोगाचा विचार या पार्श्वभूमीवर केला पाहिजे. नाथांनीं भागवताच्या एकादश स्कंधावर भाष्य केलें असलें तरी श्रीमद्भगवद्गीता ही कर्मयोगाचाच आदेश देते असा सिद्धांत भागवती टीकेंत व इतरहि स्फुट प्रकरणांत पुनरुक्तीचा दोष स्वीकारूनहि त्यांनीं प्रतिपादिला आहे. 'अज्ञानी अवस्थेंतच कर्म संभवतें, चित्तशुद्धीसाठीं कर्म आवश्यक असलें तरी ज्ञान आणि कर्म यांचा एकत्र संभव अशक्य असल्यानें कर्मसंन्यासपूर्वक आत्मनिष्ठा हींच अंतिम मानली पाहिजे,' असें संन्यासमार्गीय भाष्यकारांनीं गीतेचें निष्कर्ष काढलें असलें तरी गीता निष्काम

---

१. ज्ञानेश्वरी— २-२६५, २६६; ३-८० ते ९१; १२-७६ ते ७८, १३४, १५६; १८-९०६ ते ९१७

कर्मयोगाचाच पुरस्कार करते असा ठाम सिद्धांत ज्ञानेश्वरांप्रमाणेंच एकनाथांनीं मांडला आहे. ज्ञानी अर्जुनास भगवंतांनीं युद्ध करण्यास प्रवृत्त केलें. युद्धांत म्हणजे प्रत्यक्ष कर्म करीत असतां त्याच्या समाधीचा भंग झाला नाहीं किंवा 'मी ज्ञानी आहे, मला आतां कर्म करण्याची आवश्यकता नाहीं' असा भ्रमहि त्यास झाला नाहीं. उलट निष्काम बुद्धीनें स्वधर्म कर्मांचें आचरण त्यानें केलें असें गीतेच्या तात्पर्यार्थाच्या संदर्भात एकनाथांनीं प्रतिपादिलें आहे.[२]

## कर्म म्हणजे काय ?

नाथांची कर्माची कल्पना बरीच व्यापक आहे. त्यांच्यामतें विश्व हेंच महान् कर्म आहे.

**मुख्य मुळीं जें कां उपजे । कर्म ऐसें त्यातें म्हणिजे ।।**

ए. भा. ३-६८

'जेणें विश्वाकार संभवें' असें कर्माचें लक्षण ज्ञानेश्वरांनींहि सांगितलें आहे. विश्व ही कर्मभूमि असल्यानें या क्षेत्रांत वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस आपल्या उन्नतिसाठीं कर्माचाच आश्रय करावा लागतो. भगवान् या कर्माचा अध्यक्ष असल्यानें कर्म सोडून भगवंताची प्राप्ती होण्याची आशा बाळगणें व्यर्थ होय.

**गुज परिसे उद्धवा । कर्माध्यक्षु मी जाणावा ।**
**कर्मीं मीचि अभिलाषावा । क्रियेनें धरावा मी एकु ।।**
**एवं कर्मा आधीं मध्यें अंतीं । मी अविनाश धरितां चित्तीं ।**
**तीं कर्मेंचि निष्कर्में होतीं । जाण निश्चितीं उद्धवा ।।**

ए. भा. १०-७२, ७३

कर्माशिवाय विश्व नाहीं, कर्माविना भगवत्प्राप्ती नाहीं, अर्थात् कर्माखेरीज जीवितसाफल्य नाहीं, हें निराळें सांगणें नलगे.

कर्म अपरिहार्य आणि पावन असलें तरी व्यक्तिद्वारां घडणाऱ्या प्रत्येक कृतींत कर्माच्या सर्व वैशिष्ट्याचें दर्शन घडतें असें मात्र नव्हे. अज्ञानी व्यक्तीची

---

२. चतुःश्लोकी भागवत– ६५८ ते ६६५; स्वात्मसुख– २६२ ते ७०; हस्तामलक–३५४ ते ३५६; ए. भा. २-४२१ ते ४४१, १३-६९१ इत्यादि.

स्वाभाविक प्रवृत्ति विषयाकडे असते. कारण, अज्ञान हें अविद्येचें कार्य असून विषयप्रवृत्ति हा त्याचा गुणधर्म आहे. या विषयप्रवृत्तीची आत्यंतिक निवृत्ति हाच मोक्ष होय. व्यक्तिकडून घडणारें कर्म विषयप्रवृत्त न ठरतां तें मोक्षकारक व्हावें यासाठीं वेदांनीं वर्णाश्रमधर्माच्या आधारें कर्मप्रवृत्तीचें नियमन केलें आहे. हेतु हा कीं या नियमाप्रमाणें घडणाऱ्या कर्मानें विषयप्रवृत्तीचा निरास होऊन अंतीं मोक्षाचा लाभ घडावा.

**करावया विषय निवृत्ति । वेदें द्योतिली कर्म प्रवृत्ति ।**
**वर्णाश्रमाचार स्थिती । विषयासक्ति छेदकू ॥**
**नित्य नैमित्तिक कर्म तंत्र । नाना गुण दोष प्रकार ।**
**वेदें द्योतिले स्वाधिकार । विरक्त नर व्हावया ॥**
**स्वकर्में होय चित्तशुद्धी । तेणें वैराग्य उपजे त्रिशुद्धी ।**

ए. भा. २०-२१४ ते १६

अज्ञानजन्य सहज प्रेरणेनें घडणारें कर्म विषयप्रवृत्त असतें म्हणून वेदोक्त कर्म आचरावें म्हणजे विषयनिवृत्ति होते, चित्त शुद्ध होतें, वैराग्य अंगीं बाणतें, ज्ञानाचा उदय होतो व मोक्ष दूर रहात नाहीं.

## स्वधर्मयुक्त कर्म

कर्म केलें पाहिजे हें खरें असलें तरी तें कर्म वेदांनीं दिलेल्या आदेशानुसार असावें. यालाच ‘ स्वधर्म ’ या नांवानें नाथांनीं संबोधिलें आहे.

**यालागीं ज्यासी जो अधिकार । तो तेणें नुल्लंघावा अणुमात्र ।**
**हा वेदें केला निर्धार । स्वधर्में नर तरावया ॥**
**जरी म्हणसी कर्मचि पावन । हेंहि सर्वथा न घडे जाण ।**
**स्वाधिकारेवीण कर्माचरण । तें अतिदारुण बाधक ॥**

ए. भा. २०-२२५,२६

वेदांनीं घालून दिलेल्या मार्गानें घडणारें व अधिकारानुरूप आचरलेलें कर्मच तेवढें बंधनकारक नसतें. इतर कर्म हें बंधनांत गोवतें. म्हणून स्वधर्माचें अधिष्ठान कर्मास असणें आवश्यक आहे. स्वधर्माच्या विवरणांत नाथांनीं कर्मयोगाचा प्रपंच विशेषेकरून केला आहे.

**चित्तवृत्ति क्रियाचरण । या नांव गा कर्म जाण ।**
**तेथ निरपेक्ष जें माझें भजन । स्वधर्म संपूर्ण या नांव ॥**

ए. भा. २५-६५

भक्तियुक्त अंत:करणानें आचरलेल्या वेदोक्त कर्मानें स्वधर्म सांग व परिपूर्ण होतो. हा स्वधर्म अनादि व मोक्षकर आहे. ( १८-३४६ ) याच्या अनुष्ठानानें ज्ञानाचा उदय अंत:करणांत होतो, सर्वभूतीं परब्रह्माचा प्रत्यय घडतो. थोडक्यांत म्हणजे '**एवं स्वधर्में मत्प्राप्ती जाण।**' ( १८-३३३ ते ३४५ ) कारण,

**ब्रह्म कर्माचें प्रकाशक । कर्म तितुकें ब्रह्मात्मक ।**
**हेंचि मदर्पण चोख । माझें भजन देख या रीतीं ॥**

ए. भा. २५-७४

वेदविहित व निष्काम बुद्धीनें आचरलेलें व परमेश्वरार्पणपूर्वक कर्म हें परब्रह्मस्वरूप असतें. हाच संपूर्ण धर्म, हेंच सफल कर्म आणि हीच स्वधर्मयुक्त भक्ति होय.

## मुख्य भक्ति स्वधर्मयुक्त

जिवाशिवाचें ऐक्य घडवून आणणारी भक्ति केवळ भजनात्मक नाहीं. ती स्वधर्मकर्मरूप आहे. '**मुख्य भक्ति ते स्वधर्मयुक्त।**' असें नाथांनीं बजावलें आहे.

**यालागीं नैराश्यें जें स्वधर्म कर्म । तेंचि माझें भजन परम ।**
**तेणें भजनें भक्तोत्तम । स्वयें पुरुषोत्तम होऊनी ठाकती ॥**

ए. भा. १८-३७६

स्वधर्मानें मोक्ष लाभतो हें लक्षांत न घेतां इतर साधनांचा अवलंब करणें म्हणजे घरची कामधेनु सोडून ताकासाठीं भीक मागण्यासारखें आहे.

**यालागीं स्वधर्म आचरतां । निज मोक्ष लाभे आइता ।**
**हे वेदार्थाची योग्यता । जाणे तो ज्ञाता सज्ञान ॥**

ए. भा. २१-७३

भक्तीची आणि कर्मयोगाची सांगड गीता आणि भागवत या दोन्ही ग्रंथांत घालण्यांत आली आहे. ज्ञानेश्वर आणि एकनाथ यांनींहि आपल्या उपदेशांत कर्म-

योगाच्या साफल्यासाठीं भक्ति आवश्यक गणली आहे. कर्म अपरिहार्य आहे हें मान्य केल्यावर त्याच्या बंधांतून मुक्त होण्याचा मार्ग स्वीकारणें क्रमप्राप्त ठरतें. हा मार्ग द्विविध आहे. ज्ञानपूर्वक समत्व बुद्धीनें आणि निष्काम बुद्धीनें केलेलें कर्म मोचक ठरतें. ज्ञानानें ज्यांच्या मनोवृत्तींचा विकास झाला असेल त्यांनाच या मार्गाचा अवलंब करतां येईल. अर्थात् बहुसंख्य मुमुक्षूंचा हा मार्ग नव्हे हें उघड आहे. म्हणून दुसरा सुलभ मार्ग म्हणजे कृष्णार्पणपूर्वक कर्म करण्याचा. भागवतानें 'मुख्य भक्ति स्वधर्मयुक्त' सांगितली ती हीच.

**कर्म करितां मज अर्पण । अवचटे फळ बांधी मन ।**
**इतुक्यासाठीं भक्तांसी विघ्न । सर्वथा जाण येवों नेदी ॥**

ए. भा. ११-१५०५

भक्त हा परमेश्वराचा जीव-प्राण असल्यानें त्याला कोणत्याहि प्रकारची 'बाधा' होणार नाहीं याची काळजी भगवान् वाहतो. म्हणूनच भक्तास कर्माचें वा स्वधर्माचें बंधन बाधत नाहीं. शिवाय, हा मार्ग सोपा व निष्कंटक असल्यानें अधःपाताचा धोकाहि या मार्गांत नसतो. म्हणूनच

**तैसा मज अर्पिता स्वधर्म । त्याचें सफळ होय निजकर्म ।**

ए. भा. १०-६४

## कर्मानें कर्मबंधाचा विच्छेद

कर्मसंन्यासाच्या भूमिकेवरून यावर अशी शंका उपस्थित होण्याचा संभव आहे कीं, कर्म तितकें बंधनकारक असतांना निष्काम बुद्धीनें कां होईना, केलेलें कर्म बंधनकारक ठरणार नाहीं काय ? नाथभागवताच्या पंचविसाव्या अध्यायांत अशाच स्वरूपाचा पूर्वोत्तरपक्ष १० व्या श्लोकावरील भाष्यांत नाथांनीं केला आहे. 'कर्मानें फळाशा वाढते, फळ भोगावेंच लागतें, कर्म इतकें वाईट असतांना, स्वतंत्र जीव कर्मानें परतंत्र केला असतांना कर्मानें भक्ति घडते असें आपण म्हणतां हें कसें ?' नाथांनीं एक दृष्टांत देऊन या शंकेचें निरसन केलें आहे. सर्पाचें तोंड धरलें कीं तो अंगाला विळखा घालतो. विळख्याच्या भीतीनें तोंड सोडावें तर साप चावतो. दाबलेलें तोंड तसेंच ठेवावें तर विळखा जाचतो. अशा वेळीं मांत्रिक किंवा गारुडी ज्याप्रमाणें आपली सुटका करूं शकतो, विळखाहि सुटतो व विष-

बाधाहि होत नाहीं, त्याप्रमाणें सद्गुरूस शरण गेल्यास तो '**कर्मे करवीं ब्रह्मार्पण।**' तेणेंकरून कर्मानें भक्ति घडते व भक्तीनें कर्मबंधांतून मुक्तताहि लाभते. ( २५-१६६ ते १७३ )

वस्तुतः कर्मानेंच कर्मबंधांतून मुक्तता मिळवावयाची असते, कर्मत्यागानें नव्हे. अशा स्वरूपाचें कर्मच सात्विक गणलें जातें.

**जेणें कर्में कर्माचा निरास। तें शुद्ध कर्म सावकाश॥**

ए. भा. २१-१६१

किंवा,

**कर्म म्हणिजे जें निवृत्त। जें आशापाश फळरहित।**
**कां क्रिया उपकारार्थ। सात्विक निश्चित तें कर्म॥**

ए. भा. १३-७९

या कर्माची बाधा कत्यांस होत नाहीं म्हणूनच नाथांचा निर्वाणीचा उपदेश आहे.

**सकळ साराचें स्तर पूर्ण। कर्ममात्र मदर्पण।**
**साक्षेपें करावें अर्पण। .........** ए. भा. २९-३९८

## ज्ञानोत्तर कर्म

कर्मसंन्यासवादाच्या भूमिकेवरील आणखी एक आशंका म्हणजे ज्ञानोत्तर कर्मासंबंधानें. चित्तशुद्धीसाठीं कर्म करावें असें संन्यासवादी म्हणतात. परंतु ज्ञानोत्तर कर्माची मुळींच आवश्यकता नाहीं असा त्यांचा आग्रह आहे. नाथांची भूमिका या बाबतींत स्पष्ट आहे. ज्ञानोत्तर कर्म आवश्यक आहे असें भक्त भागवत आणि ज्ञानी यांच्या लक्षणांचा विस्तार करतांना नाथांनीं जागोजाग स्पष्ट केलें आहे.

**आम्ही जितेंद्रिय म्हणवित। म्हणोनि नाचरे जो वेदोक्त।**
**त्यासी नातुडे गा परमार्थ। अति अनर्थ अंगीं वाजे॥**
**जरी शास्त्रज्ञ ज्ञाता झाला। आणि वेदोक्ता विमुख ठेला।**
**तरी तो जाणपणेंचि नागवला। जाण बुडाला दुःखार्णवीं॥**
**नाचरे जो वेदोक्त कर्म। व्यक्त कर्में मानी निष्कर्म।**
**त्यासी थोर पडला भ्रम। नाडला परम अभिमानें॥**

ए. भा. ३-७७९ ते ८१

भागवती टीकेच्या शेवटच्या अध्यायांत कर्मसंन्यासवाद्यांचा ओझरता उपहासात्मक उल्लेखहि नाथांनीं केला आहे. अर्जुन ज्ञानी होता तरी त्यानें यादवांचें अंत्य कर्म विधिपूर्वक केलें हें सांगतांना नाथ म्हणतात,

**मी पावलों निष्कर्म ब्रह्म । तो मी न करी अन्त्य कर्म ।**
**ऐसा ज्ञान गर्वोक्तम । तोहि सूक्ष्म भ्रम अर्जुनीं नाहीं ॥**

ए. भा. ३१-२८५

ज्ञानी भक्तांनीं आश्रमादिक कर्मांचा स्वरूपतः त्याग न करतां हृदयांत त्याग करावा व कर्म करून कर्मातीत व्हावें. ( १८-१८८ ते १९७ ) महायोग्यांची समाधि म्हणजे कर्मशून्य अवस्था नव्हे. कर्मानेंच त्याला परब्रह्मप्राप्ती झालेली असते व कर्मातच नैष्कर्म्य अवस्थेचा व समाधिसुखाचा अनुभव तो घेतो.

**तेवीं कर्मास्तव उत्पत्ति । कर्मेंचि जाली परब्रह्मप्राप्ती ।**
**त्या कर्मामाजीं वर्तती । निष्कामस्थिती महायोगी ॥**

ए. भा. १३-६९९

उद्धवास केलेल्या उपदेशाचा समारोप करतांनाहि नाथांनीं ज्ञानोत्तर कर्माची आवश्यकता प्रतिपादिली आहे. या ठिकाणच्या ज्ञानोत्तर कर्माच्या विवरणास मूळ भागवतांत मुळींच आधार नाहीं हें विशेषेकरून ध्यानांत ठेवलें पाहिजे. कृष्ण उद्धवास सांगतात, ' मला कांहींच प्राप्त करून घ्यावयाचें नव्हते तरी मी लोकसंग्रहार्थ कर्म करीत राहिलों. त्याचप्रमाणें माझी पूर्णावस्था मी तुला दिलेली असल्यानें लोकसंग्रहार्थ कर्म करणें हें तुझें कर्तव्य आहे. मला आतां कर्माची आवश्यकता नाहीं असा भ्रम तुझ्याठिकाणीं निर्माण होऊं देऊं नकोस. ' ( २९-८०१ ते ८०९ )

**पावोनि ब्रह्मज्ञान । स्वयें उद्धरला आपण ।**
**न करी तोचि दीनोद्धरण । तें भंडपण ज्ञात्याचें ॥**
**स्वयें तरोनि जना तारी । हे ज्ञानाची अगाध थोरी ।**
**ते म्यां दिधली तुझ्या करीं । जन उद्धरी उद्धवा ॥**

ए. भा. २९-८२० ते ८२४

## शांकर वेदांतास विरोध

भागवती टीकेस नाथांनीं शांकर परंपरेंतील श्रीधराचार्यांच्या भाष्याचा आधार घेतला आहे. सोळाव्या अध्यायाच्या प्रारंभीं श्रीधरी टीकेचा यथोचित गौरवहि त्यांनीं केला आहे. परंतु श्रीधरी टीकेंतील कर्मसंन्यासपर अर्थांचा स्वीकार मात्र केला नाहीं हें विशेषेकरून ध्यानांत ठेवलें पाहिजे. कांहीं ठिकाणीं नाथांनीं 'श्रीधरोक्ति' म्हणून भागवताच्या अर्थाचा विचार केला आहे व स्वतःचा अर्थ स्वतंत्रपणें दिला आहे तर कित्येक ठिकाणीं कर्मसंन्यासपरतेचा त्याग करून मूळ भागवतांतील पदांचे कर्मयोगपर अर्थ दिले आहेत. विस्तारभयास्तव अशा सर्वच स्थळांचा निर्देश करणें अशक्य असल्यानें फक्त एकाच स्थळाचा उल्लेख करतों. एकादशाच्या ११ व्या अध्यायांतील ३२व्या श्लोकाचा अर्थ लावतांना 'वेदादिष्ट धर्मांचाहि त्याग कर' असें श्रीधराचार्यांनीं स्पष्टीकरण केलें आहे. याच श्लोकावरील भाष्यांत नाथांनीं कोणत्याहि परिस्थितींत वेदोक्त कर्मांचा त्याग करतां येत नाहीं असा निर्वाळा दिला आहे. (ए. भा. ११-१०८९ ते ९४)

## महाराष्ट्राचें वैशिष्ट्य

महाराष्ट्रांतील भागवत धर्मानें कोणत्याच काळांत कर्मसंन्यासाचा स्वीकार केला नाहीं. '**आचार्यांतें वाट पुसत।**' मराठी भागवत धर्मानें भागवत धर्माची पायाभरणी केली, या मंदिराचे आधारस्तंभहि उभारले, परंतु पूर्वाचार्यांचें ऋण मान्य करूनहि 'अकर्मक' भक्तीचा व कर्मसंन्यासाचा पुरस्कार केला नाहीं. त्यामुळें मराठी साहित्य व महाराष्ट्राचें सांस्कृतिक जीवन भारतांत वैशिष्ट्यपूर्ण असेंच राहिलें. कर्मकांडांतील कर्मठता अंगीं जडूं न देतां व कर्मसंन्यासानें प्राप्त होणारी लोकविमुखता निर्माण होऊं न देतां मराठी संतांनीं ज्ञानभक्ति समुच्चयात्मक कर्मयोगाचा पुरस्कार केला. म्हणूनच दाक्षिणात्य भक्तीची कर्मजडता व उत्तरेकडील भक्तीची विषयसंकुलता मराठी भागीरथीच्या प्रवाहास कलंकित करूं शकली नाहीं. निष्काम कर्म आवश्यक असल्याचा सिद्धांत ज्ञानदेवानंतर नाथांनीं एवढ्या ठामपणानें जनमनावर बिंबविलेला असल्यानें आमचें सांस्कृतिक जीवन परिशुद्ध राहिलें, जनांतील जनार्दन जागृत राहिला, व्यक्तीनें धर्म सनाथ केला, धर्मानें व्यक्तिजीवन कृतार्थ

केलें व मराठी मन आणि मराठी साहित्य यांना समृद्धी प्राप्त झाली ती कर्मयोगाच्या-वेदोक्त धर्मप्रेरणेच्या जागत्या आणि ज्वलंत प्रत्ययानें. नाथांच्या कर्मयोगानें दिलेलें हें वरदान मराठी मनास उत्तरोत्तर प्रोत्सक होवो हींच नाथचरणीं प्रार्थना.

---

## भक्ताची पूजा म्हणजे ती देवाची पूजा

मनासी आवडे जें जें कांहीं । तें तें अर्पी मजचि पाहीं ।
शेखी आपुलें मन तेंही । माझ्या ठायीं समर्पी ।।

माझें स्वरूपाचे ठायीं जाण । केवि घडे मनाचें अर्पण ।
तेचिविषयीं निरूपण । स्वये श्रीकृष्ण सांगत ।।

छत्र चामर हस्ती घोडे । त्यागूनि होतां गा उघडे ।
ऐसें वैराग्य धडफुडे । मज रोकडें पावावया ।।

माझें पावावया निजसुख । द्रव्य दारा पुत्रादिक ।
त्यागूनि सांडिती निःशेख । यापरी देख अनुतापी ।।

आवडी करितां माझें भजन । विसरे भोगांची आठवण ।
माझे प्राप्तीलागीं जाण । रिता क्षण जावो नेदी ।।

हृदयीं मी स्वतःसिद्ध जाण । त्या माझें करूनि आवाहन ।
आपण करी जें भोजन । तेंही मदर्पण तो करी ।।

कवळ कवळीं हरिस्मरण । तें अन्नचि होय ब्रह्म पूर्ण ।
यापरी माझे भक्तजन । कर्म मदर्पण स्वयें करिती ।।

ऐशीं सर्व कर्में कृष्णार्पण । सर्वदा जो करी जाण ।
त्याचें मन होय मदर्पण । तेंचि निरूपण देवो सांगे ।।

सर्व कर्में मदर्पण । करितां शुद्ध होय मन ।
जेवि लोह कमावितां जाण । होय दर्पण सोज्वळ ।।

ना. भा. अ. १९-२४९, ५०, ५३, ५४, ५५, ५९ ते ६२

---

# नाथभागवतांतील स्त्रीदर्शन

: लेखक :

प्रा. पां. ना. कुलकर्णी, एम्. ए.

( कला व विज्ञान महाविद्यालय, नागपूर )

## वेदांचें न्यून

स्त्रीशूद्रांना वेदोक्तशास्त्रश्रवणाचा अधिकार नाकारण्यांत आला होता. ( ए. भा. ५-७३ )

**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परांगतिम् ।**

गीता ९-३२

या श्रीकृष्णानें दिलेल्या आश्वासनामुळें तदुत्तरकालीं परमार्थमार्गांतील स्त्रियांच्या अधिकारित्वानधिकारित्वाची चर्चा होऊं लागली. वेदांवर पक्षपातीपणाचा आरोप करतांना नाथ म्हणतात,

**वेदु अत्यंत कृपणु जाला । त्रिवर्णांचे कानीं लागला ।**
**स्त्रीशूद्रादिकांसी अबोला । धरूनि ठेला अद्यापी ॥**
**तें वेदांचें अति न्यून । उद्धरी हरिनामकीर्तन ।**
**स्त्री शूद्र अंत्यज जन । उद्धरण हरिनामें ॥**

ए. भा. ५-४१६, १७

पुढ ३१ व्या अध्यायांत नाथ सांगतात,

**कृष्ण निःश्वासें जन्मले वेद । गीता स्वमुखें प्रगटली शुद्ध ।**
**यालागीं गीतार्थ अगाध । धडौते वेद तेणें जाहले ॥ २८० ॥**
**वेदें आप्त केले तिनी वर्ण । दुराविले स्त्रीशूद्रजन ।**
**न शिवे त्यांचें कान । हें वेदांसी न्यून पैं आलें ॥ २८१ ॥**
**तें वेदाचें फेडावया उणें । गीता प्रकट केली श्रीकृष्णें ।**
**गीतेचे श्रवणें पठणें । उद्धरणें समस्तां ॥ २८२ ॥**

ए. द. २...८

साहजिकच भागवत धर्मांत स्त्रीशूद्रांचा विचार प्रामुख्यानें नजरेसमोर ठेवला गेला. ज्ञानयोगादि इतर परमार्थ मार्ग स्त्रीशूद्रांना अनाकलनीय आणि आचरण्यास कठीण म्हणून भागवत धर्माची मातब्बरी विशेष. अशा सहिष्णुतेंतून आणि व्यापक दृष्टिकोनांतून भागवत धर्माची उत्पत्ति व वृद्धि झाली अर्थात् स्त्री-विषयक सहानुभूतीच्या भूमिकेची अपेक्षा भागवत धर्माकडून करावयास हवी.

## सहानुभूतीची घोषणा

ही सहानुभूतीची घोषणा मोठ्या आनंदानें आणि मनमोकळेपणानें एकनाथांनीं अनेक ठिकाणीं केली आहे.

**स्त्रीशूद्रादि आघवे । घालूनिया ( भागवतरूपी ) नावें ।**
**एकेच खेपें स्वयें न्यावें । भजन भावें परतीरा ॥**

ए. भा. २-३०२

कलियुगांत नामसंकीर्तनानें चहूं वर्णांना स्त्री, शूद्र असा भेद न करतां मुक्ति मिळते. ( ए. भा. ५-४१५ ) कलियुगांत स्त्री, शूद्र भक्तीचें भोज माजवितील. ( ए. भा. ५-४५० )

**पोहणियाहूनि पाय उतारा । भागवत मार्गु अति सोपारा ।**
**तो मार्गु दावावया पुरा । हांकारी स्त्रीशूद्रां पंचाध्यायी ॥**

ए. भा. ५-५६५

श्रीकृष्णास विनंती करतांना २९ व्या अध्यायांत उद्धव म्हणतो,

**पव्हणियापरीस पाय उतारा । स्त्रियां अबळां अति सोपारा ।**
**तैशिया उपाय प्रकारा । शार्ङ्गधरा सांगिजो ॥**

ए. भा. २९-४४

आणि २५ व्या अध्यायांत श्रीकृष्णानें तसें आश्वासन देऊन ठेवलेंहि आहे.

**हें भागवतींचें अति गुह्य ज्ञान । मुख्यत्वेंसीं भक्तिप्राधान्य ।**
**भावें करितां माझें भजन । स्त्रिया शूद्रजन उद्धरती ॥**

ए. भा. २५-४२३

## मनुष्यदेहाची महती आणि स्त्रीपुरुषसमानता

मोक्षप्राप्तीचें साधन म्हणून संतांनीं नरदेहास महत्त्व दिलें.

**मनुष्यदेह अति दुर्लभ ।** ए. भा. २-२१२

* * *

**कर्मभूमि नरदेह प्राप्त । हें पूर्ण निजभाग्याचें मथित ।**
**देव नरदेह वांछित ।....................** ए. भा. ३-२७१

* * *

**नरदेहा ऐसें निधान । अनायासें लाधलें जाण ॥** ए. भा. ७-६४४

* * *

**मनुष्यदेहींचेनि ज्ञानें । सच्चिदानंद पदवी घेणें ।**
ए. भा. ९-३३०

असा नरदेहाचा गौरव नाथ करतात. तथापि या देहाचें वोखटेंपणहि त्यांनीं अनेक स्थलीं स्पष्ट केलें आहे.

**देहा ऐसें वोखटें । पृथ्वी नाहीं कोठें ।**
**देहा ऐसें गोमटें । पाहतां न भेटे त्रिलोकीं ॥**
**वोखटें म्हणोनि त्यागावें । तैं मोक्षसुखासी नागवावें ।**
**हो कां गोमटें म्हणोनि भोगावें । तैं अवश्य जावें नरकासी ॥**
**तरी हें त्यागावें ना भोगावें । मध्यभागें विभागावें ।**
**आत्मसाधनीं राखावें । निजस्वभावें हितालागीं ॥**
ए. भा. ९-२५१ ते ५३

आणि म्हणून असा विचार ते मांडतात. हा जो नरदेह, तो केवळ पुरुषदेहच असें मानण्याचें कारण नाहीं.

**जननी जठरीं ज्यासी जनन । त्या नांव बोलिजेती जन ।**
ए. भा. २३-७७२, २३-८१६, २५-६

ही ‘ जन ’ शब्दाची नाथांची व्याख्या आहे.

**‘ सर्व भूतीं देखें मद्भावो । हा सर्व धर्मांमाजी रावो ॥’** ( ए. भा. ३०-३८१ ) अशी सर्वभूतात्मकता जेथें अभिप्रेत आहे तेथें ही स्त्री, हा पुरुष असा भेदभाव न बाळगणेंच आवश्यक.

'**देवो देवी मीचि आहे** ।' (ए. भा. ११-१३४५ ) किंवा ' **शतरुपा आणि मनु । इयें दोनी मी** ।।' ( ए. भा. १६-२०८, २१७ ) असें स्वतः श्रीकृष्णानेंच सांगितलें आहे. वैकुंठीं ' **नाहीं विषयवार्ता उपाधी । स्त्रीपुरुषां समान बुद्धि** ।।' ( ए. भा. २४-२६४ ) असेंहि श्रीकृष्णानें उद्धवास सांगितलें आहे. नाथांनींहि ' आत्मा ', ' आत्मी ' असा भेद नाहीं असें अनेकवार सांगून स्त्रीपुरुषसमानता आपल्यास मान्य असल्याचें दर्शविलें आहे.

**हा आत्मा हे आत्मी पाहीं । ऐसें मिथुन मुळीं नाहीं ।**

ए. भा. ११-३६७; ३-४४७

**मुळीं आत्मा आत्मी नाहीं तेथ । स्त्रीरूपें भासे भगवंत ।**

ए. भा. ८-८७

**विचारितां आत्मसुख । सर्व देहीं समान देख ।**
**विजातीय स्त्रीपुरुषवेष । सुख विशेष तेथ नाहीं ॥**
**पाहे पां स्त्रीपुरुषदेहीं । आत्मा आत्मी हें तंव नाहीं ।**
**आत्मसुख आपुल्या ठायीं । असे पाहीं स्वतःसिद्ध ॥**

ए. भा. १०-२४३,४४

**दिसे देहाकृति मुंडली । तीतें म्हणती हे रांड जाली ।**
**परी आत्म्याची रांड नाहीं जाहली । असे संचली आत्मस्थिति ॥**

ए. भा. १९-२३९

**देहावयवलिंगदर्शन । तेणें स्त्रीपुरुष नामाभिधान ।**
**परी आत्मी आत्मा नाहीं जाण । जीवत्व समान स्त्रीपुरुषीं ॥**

ए. भा. २५-१६४

पण पुढें २६ व्या अध्यायांत पुरुरवा ' **स्त्रीपुरुषीं आत्मा एक** । ' असे उद्गार काढूनहि लगेच त्याच्या पुढच्याच चरणांत ' **स्त्रीरूप तेथ आविद्यक** ।' असें म्हणतो. त्याचें पुढचें बोलणें साऱ्याच संतांना मान्य असावें. स्त्रीरूपाच्या या अविद्यकत्वामुळेंच ती खूप निंदिली गेली आहे.

## स्त्रीनिंदा

नाथभागवतांतच काय पण बहुतेक अध्यात्मपर ग्रंथांत स्त्रीनिंदा अधिक्यानें आढळते. सहानुभूतिपूर्ण दृष्टिकोनाची जाणीव होऊनहि मनावर ठसा उमटतो तो

या स्त्रीनिंदेचाच. स्त्रीचा संग कोणीहि, कधींहि, कोठेंहि करूं नये ही गोष्ट वारंवार सांगितली जाते. नाथभागवतांतील पुढील अवतरणें पाहिल्यास प्रस्तुत विधानाची सत्यता पटेल.

**एकली योषिता नरकीं घाली ।**
एं. भा. ८-७९

**सोलिव मोहाचें रूप । तें जाण योषितास्वरूप ।**
**त्याहीवरी खटाटोप । वस्त्रें पडप भूषणें ।।**
एं. भा. ८-८४

**मूळ नाशासी जीविता । कनक आणि योषिता ।**
एं. भा. ८-११९

**स्त्री ते अग्निकुंडासमान । पुरुष तो घृतकुंभ जाण ।**
एं. भा. १७-३४६

**त्यागावी कामिनी संगती । हा मुख्य त्याग परमार्थी ।**
एं. भा. १७-३४९

पुरुषांनीं केलेली स्त्रीनिंदा पुरेशीं नाहीं म्हणूनच कीं काय स्त्री असूनहि उर्वशी पुरुरव्यास म्हणते,

**आम्हां स्त्रियांची आसक्ति । कदा धड नव्हे गा भूपती ।**
**सदा स्त्रियांची दुष्ट जाती । जाण निश्चितीं महाराजा ।।**
**विशेषें आम्ही स्वैरिणी । स्वेच्छा परपुरुषगामिनी ।**
**आमुचा विश्वास मनीं । क्षणीं न मानीं नृपनाथा ।।**
**आम्हा प्रमदांच्या संगतीं । राया ठकले नेणों किती ।**
एं. भा. २६-१४ ते १६

सातव्या अध्यायांत दुहिता, निजभगिनी, स्त्रीपुत्र यांचा त्याग करण्याचा उपदेश ( ३० ) श्रीकृष्णानें उद्धवास केला आहे. पुन्हां २९ व्या अध्यायांत 'प्रमदा' शब्दावर '**प्रमादीं पाडी सर्वार्थी । हे प्रमदा नामाची निज ख्याती** ।।५६६।।' अशी गंमतीची कोटी करून श्रीकृष्ण उद्धवास सांगतो,

**जेणें तडफडूनि जाण । वैराग्यासी ये मरण ।**
**जेणें ज्ञात्यासी लागे दूषण । तो स्त्रीसंग आपण न करावा** ।।५६४।।

**स्त्री देखतांचि अवचितीं । तत्काळ पाडी अधःपाती ।**
**तिची जाहलिया संगती । कैंची घडगती सज्ञाना ।। ५६५ ।।**

म्हणून स्त्रियांशीं संभाषण नको कीं त्यांचें अवलोकन नको. त्यांचें वचनहि कानीं घेऊं नको, ( ५६८ ) त्यांच्याशीं मात, एकांत, संगत नको, ( ५६९ ) अनुवाद, संवाद किंवा बोधहि त्यांना करूं नको. ( ५७० )

आपल्या गुरूंची माहिती सांगतांना अवधूत यदूला म्हणतो,

**जो सुख इच्छील आपणासी । तेणें नातळावें स्त्रियेसी ।**

ए. भा. ८-१२१

संसार जिंकावयाचा असेल तर स्वधर्मनिष्ठ संन्याशांनीं योषितांना पाहून त्वरेनें पळ काढावा.

**नको स्त्रियांची भेटी । नको स्त्रियांसीं गोष्टी ।**
**स्त्री देखतांचि दिठीं । उठाउठीं पळावें ।।**
**पळतां पळतां पायांतळीं । आल्या काष्टाची पुतळी ।**
**तेही नातळावी कुशळीं । निर्जीव स्त्री छळी पुरुषातें ।।**

ए. भा. ८-१२४ ते २६

**ग्राम्य स्त्रियांचें संगतीं जाणें । तो वैसला मरणा धरणें ।**
**मरण आल्याही न करणें । जीवें प्राणें स्त्रीसंगु ।।**
**वेश्येचे संगतीं जातां । बळाधिक्य करी घाता ।**
**निरंतर स्वपत्नी भोगितां । नाहीं बाधकता हें न म्हण ।।**

ए. भा. ८-१३९, ४०

स्त्रीआसक्ति हें संसारदुःखाचें मूळ आहे हें कपोताकपोती यांच्या कथेचें ( ए.भा.७-५४६ ते ६३४ ) सार आहे. अनेक पौराणिक संदर्भांनींहि स्त्रीसंगाची दुःखास्पदता नाथांनीं स्पष्टपणें मांडली आहे.

स्वतः श्रीकृष्णहि म्हणतात,

**अविद्येच्या अनंत कोटि । जाण पां स्त्रीसंगाचे पोटीं ।**
**अधर्माचा भडका उठी । योषिता दृष्टी देखतां ।।**

**जें महामोहाचें मेळवण । जें खवळल्या कामाचें इंधन ।**
**जें जीवाचें परम मोहन । अधःपतन ते योषिता ॥**
**जिचे कटाक्ष अति तिख । जिव्हारीं रुतले देख ।**
**जे जीवाची व्यामोहक । जिचें चढलें विख उतरेना ॥**
**एवढी बाधा जाण स्त्रीसंगतीं । जो वांछूं पाहे माझी प्राप्ति ।**
**तेणें सांडावी स्त्रियेची आसक्ति । हृदयीं प्रीति न राखावी ॥**
**स्त्री आठवितांचि चित्ता । उच्छेदी ज्ञानध्यानअवस्था ।**
**एवढी स्त्रीसंगबाधकता । ............**

ए. भा. १४-३६६ ते ३७५

## स्त्रैण

'**अत्यंत स्त्रीकामीं वशता । ती नांव मुख्य स्त्रैणता ।**' अशी स्त्रैणतेची व्याख्या (ए.भा.१४-३९३) नाथ देतात. 'परमेश्वराचें ज्याला आर्त, त्यानें स्त्रीसंगाची मात तर सांडावीच, पण त्यापेक्षांहि स्त्रैणाची संगति अति वोखटी हें ध्यानांत धरावें. त्याच्याशीं भेटी गोष्टी न व्हाव्यात.' (ए. भा. १४-३६० ते ६५) या उपदेशानंतर पुन्हां एकदां स्त्रीनिंदा करून श्रीकृष्ण म्हणतात, "एक वेळ स्त्रीसंग पुरवला, पण स्त्रैणसंगतीची बाधा मात्र अनिवार. स्त्रीसंगतींतहि कांहीं पुरुष उद्धरले गेल्याचें आढळतें. उदा. चूडालेमुळें शिखिध्वज, मदालसेमुळें कुवलयाश्व व लीलेमुळें तिचा पति. परंतु स्त्रैणाच्या संगतींत मात्र उद्धार गति नाहीं. (ए.भा. १४-३७६ ते ३९३) स्त्रैणसंगति कशी व किती घातक आहे याचें वर्णन पुन्हां एकदां २६ व्या अध्यायांतहि (२४७ ते ५२, २६८) आलें आहे.

## श्रीकृष्णानें कल्पिलेली उद्धवाची शंका व तिला उत्तर

स्त्रियांच्या संबंधींचे असले विचार ऐकल्यानंतर आणि सात्विक स्त्रीहि उपदेशास अयोग्य हें कानांवर आल्यानंतर "**मागिलीं थोरथोरीं । उपदेशिल्या कैशा परी ।**" अशी उद्धवास शंका येईल असें वाटून श्रीकृष्ण म्हणतात, "याज्ञवल्क्यानें मैत्रेयीला उपदेशिलें, नारदानें प्रल्हादाच्या मातेस इंद्रापासून सोडवून ब्रह्मज्ञान सांगितलें, कपिल मुनींनीं देवहूतीस, शंकरानें भवानीस आणि मी यज्ञपत्न्यांना उपदेश केला. तेव्हां सद्भक्ति पाहून त्यांनाहि उपदेश द्यावा असें म्हणशील तर तसा अधिकार हवा.

स्त्रीपुरुष अवलोकन । जयाचे दृष्टीं समसमान ।
ऐसें अनुभवीं जो परिपूर्ण । तोचि स्त्रियांसी जाण उपदेशी ।।
तोही अधिकार न पाहतां । उपदेश न करिती सर्वथा ।
त्याही उपदेशाची कथा । ऐक तत्त्वतां सांगेन ।।
म्यां ज्या कां निंदिल्या वनिता । त्यांमाजी सभाग्या सात्त्विकता ।
सांडूनिया विषयावस्था । जे परमार्थी उद्यत ।।
त्यजूनिया प्रपंचाची हांव । नावडे विषयाचें नांव ।
वैराग्यें उठला सद्भाव । घेऊनि धांव परमार्थी ।।
अतिथि आणि पति पुत्रांसी । भोजनीं समता नित्य जिसी ।
धनलोभ नाहीं मानसीं । परमार्थी तिसी अधिकारु ।।
जन्ममरण निवारणीं । जीवामनाची नित्य काचणी ।
माझे भवपाशच्छेदनीं । धर्मदाता कोणी मिळता का ।।
सद्गुरु प्राप्तीची अति आर्त । काया वाचा वित्त जीवित ।
कुरवंडी करूनि सांडित । परमार्थार्थ सद्भावें ।।
यापरी निजपरमार्था । सद्भावें जे विनटे वनिता ।
तिसी उद्धवा हें उपदेशितां । दोष सर्वथा लागेना ।।
क्षत्रिय वैश्य स्त्री शूद्र जन । यांची सच्छ्रद्धा दृढ पाहून ।
उपदेशितां ब्रह्मज्ञान । दोष निर्दळण शिष्यांचें ।।
उपदेशितां ब्रह्मज्ञान । जैं गुरूसीच लागे दूषण ।
तैं शिष्यासी उद्धरी कोण । हें व्याख्यान अबद्ध ।।
पहावया पात्र शुद्धता । मी बोलिलों दोषवार्ता ।
वांचूनि ब्रह्मज्ञान उपदेशितां । दोष सर्वथा असेना ।।

ए. भा. २९-५७१ ते ९०

सारांश, स्त्रीनिंदा करूनहि पात्रशुद्धता पाहून स्त्रियांना ब्रह्मज्ञानाचा उपदेश करायला प्रत्यवाय नाहीं असें मत या ठिकाणीं मांडलें गेलें आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे.

## भोगपिपासेचें तत्त्वज्ञान

स्त्रियांना हा परमार्थमार्ग अशा रीतीनें उपलब्ध करून दिला असला तरी

**जेथवरी स्त्रीपुरुषव्यक्ति । तेथवरी कामासक्ति ।।**

ए. भा. २०-३०७, २१-१९४

हा निसर्गाचा सिद्धांत दृष्टिआड करून चालत नाहीं. पण जेव्हां या निसर्गनियमाचें तत्त्वज्ञान म्हणून अभिनिवेशानें समर्थन केलें जातें तेव्हां एकनाथ साहजिकच रागावतात आणि अशांची भोगपिपासा चव्हाट्यावर मांडतात. वेदोक्त कर्म करणाऱ्यांचीहि भोगपिपासा नाहींशी झालेली नसते. असे लोक आपली भूमिका सजवितांना म्हणतात, " वैराग्याच्या मिशानें स्त्रीत्याग करायला लावून महामूर्खच लोकांना फसवीत असतात."

**काय गृहाश्रमीं देव नसे । मग वनां धांवताती पिसे ।**
**साचचि देव वनीं वसे । तरी कां मृग ससे न तरती व्याघ्र ।।११५।।**

दीनांना ( ३-२६ ), साधकांना ( ८-२६ ) देवमाया स्त्रीरूपानें भुलवितें, देवहि दारारूपानें विघ्नें आणतात. (१८-७०, २६-१३, २८-४१९) असें असूनहि स्त्रियादि शूद्रांना, मंत्र देणाऱ्यांना थोर ज्ञाते मानतात. ( १९-३४१ ) हें सांगतांना नाथांची वाणी उपहासानें भरलेली आहे. स्त्रीकाम आणि तज्जन्य संकटपरंपरा ( ३-२३२ ते २४३ ) यांचें वर्णन करून ते म्हणतात,

**तेवीं विषयांचेनि सुखें सुख । न पावतीच ब्रह्मादिक ।**
**विषयाचा जे मानिती हरिख । ते परम मूर्ख पशुदेही ।।**

ए. भा. ३-२४४

केवळ गुरुरायाच्या स्मरणानें हा '**स्त्रीबाधू विलया जाय ।**' (२६-८) असें सांगून ठेवणें मात्र त्यांना आवश्यक वाटतें.

## समन्वय

इंद्रियसुखभोग अटळ असल्याची नाथांना जाणीव आहे. वेदप्रेरणेशिवायहि सर्वांची वासना विषयोपभोगाकडे स्वाभाविकपणें धांवते. ही विषयगोडी अनर्थकोडी करील, योनिसंकर घडेल या भयानें वेदानें वर्णाश्रमाचे नियम घालून दिले.

**आवरावया योनिभ्रष्टां । मैथुनीं विवाहप्रतिष्ठा ।**
**लावूनिया निजनिष्ठा । वर्ण वरिष्ठा नेमिले ।। २१९।।**

अर्थात् वर्णसंकर चुकविण्यासाठीं विवाह निर्धार केला गेला.

**धर्मपत्नी पाणिग्रहण । विवाह नेमिला सवर्ण ।**
**तेथें सप्तम पंचम त्यजून । सगोत्रीं लग्न करूं नये ॥ २२२ ॥**

असा नियमहि घालण्यांत आला कीं,

**ऋतुकाळीं ज्या स्त्रीगमन । ते पुरुष ब्रह्मचारी आपण ।**
**वेद निवृत्तिपर जाण । त्यागरूपें आपण भोगातें नेमी ॥ २३० ॥**

शिवाय, ए. भा. १८-३२०

आणि मग पुढच्याच ओवींत नाथ सांगतात,

**आत्मा वै पुत्रनामासि । पुत्र झालिया स्त्रियेसी ।**
**संग करूं नये स्त्रीपासीं । शनैः शनैः विषयासीं त्यागवी वेद ॥२३१॥**

शिवाय, ए. भा. २१-१९६; ५-२०८ ते २३१

इंद्रियसुखाकडे कांहींशा सहानुभूतीनें व उदात्ततेनें पाहण्याची दृष्टि तिसऱ्या अध्यायांत आढळते.

**दशधा इंद्रियें अचेतन । तयांतें चेतविता नारायण ।**
**दशधा रूपें प्रवेशोन । इंद्रियवर्तन वर्तवी ॥ ११६ ॥**
**उपस्थ सुखाची सुखप्राप्ति । तेणें सुखावे श्रीपती ।**
**स्त्रीपुरुष मैथुन व्युत्पत्ति । प्रकाशी अति प्रीतीं पुरुषोत्तम ॥१२४॥**

पुढें नाथ आणखी सांगतात कीं सद्गुरुकृपेनें ब्रह्मचर्यस्थिति लाभते **आणि मग**

**त्या उपस्थ सुखाची नित्य स्थिती । संभोगेवीण जे वाढविती ।**
**तेथ मिथ्या स्त्रीपुरुष व्यक्ति । सहजें होती सज्ञान ॥**

ए. भा. ३-४४०

मुक्ताचें वर्णन करतांना नाथ लिहितात कीं द्वैताची भुली सांडून मुक्त **स्त्री भोगतो.** साहजिकच तेथें लोलुप्य नसतें. संतति झाली तरीहि तेथें आत्म**प्रतीति असते.** कारण,

**आत्मा वै पुत्रनामासि । सत्यत्व आलें ये श्रुतीसी ।**

ए. भा. ११-३६७ ते ३७६

पुढें याच अध्यायांत मुक्त “ **स्त्रीसंगें प्रजा व्याला । नाहीं मुकला ब्रह्मचर्या** ॥ ४१९ ॥ ” असेंहि ते सांगतात. अशाच कारणांनीं ते रामावरील

स्त्रीकामतेचा आरोप उडवितात (५-३८५ ते ३९६) आणि कृष्णावर व्यभिचाराचा आरोप करणाऱ्यांना कृष्णमुखेंच मूर्ख ठरवितात. (१२-२०८; २४-३७९ ते ८४)

सारांश,

**स्त्रीपुरुषांची चित्तवृत्ति । अनुकूल वर्ते धर्मप्रवृत्तीं ।**
**तरीच परलोक साधिती । इतरां प्राप्ती ते नाहीं ॥**

ए. भा. ७-६१२

म्हणूनच

**गृहाश्रमु न सांडितां । कर्मरेखा नोलांडितां ।**
**निजव्यापारी वर्ततां । बोधू सर्वथा न मैळे ॥**

ए. भा. ९-४३५

अशी ग्वाही ते देतात.

## स्त्रीजीवनाची सामाजिक बाजु

भागवतावरील ही टीका लिहितांना विशिष्ट तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्याचें धोरण स्त्रीसंबंधांत नाथांनीं कसें ठेवलें आहे याचा आपण विचार केला. हें सर्व लिहितांना मधून मधून अर्थालंकार साधून आणि कांहीं वर्णनें करून नाथांनीं स्त्री-जीवनाची लौकिक बाजूहि रंगविली आहे. इतस्ततः विखुरलेल्या या माहितीचें कण गोळा करून तत्कालीन स्त्रीसमाजाचें दर्शनहि कांहीं प्रमाणांत आपल्यास घेतां येईल.

### माता

नाथ बालपणींच आईवडिलांना मुकले होते. त्यांच्या आईचें नांव रुक्मिणी होतें. विठ्ठलाची भक्ति भानुदासांनीं घराण्यांत रुजविली होतीच. या सर्व कारणांनीं रखुमाई ही आपली माता अशी वार्ता ते मोठ्या अभिमानानें सांगतात. (१-१३५) परशुरामानें '**मारूनि माता जिवविली । तेचि कुळदेवता ॥**' (१-१३५) अशी माहिती ते सांगतात. या संदर्भात परशुरामाचीच उपमा नाथांना देतां येईल. मूळ नक्षत्रावर जन्मून त्यांनीं मातेच्या मृत्यूचा मार्ग मोकळा केला असला तरी आपल्या वाङ्मयांत अनेक ठिकाणीं मातृप्रेमाचा निर्देश गौरवपूर्ण शब्दांत करून तिला त्यांनीं चिरंजीव केलें आहे. माता हें उपमान घेऊन त्यांनीं चोवीस ठिकाणीं

रूपकें केलीं आहेत. अशा ठिकाणीं इतर तपशील त्यांनीं भरलेला नाहीं. उपमा साधतांना व दृष्टांत देतांना मातेचें स्मरण त्यांना अनेकदां होतें. त्यांत मातेच्या वात्सल्याचे उल्लेख सर्वाधिक आहेत. मातेच्या विविध अवस्थांचीं हीं दृश्यें पाहण्यासारखीं आहेत.

पुत्र झाल्याचें ऐकून माता आनंदली तरी ' बाटावळी ' जेव्हां पाहील तेव्हांच तिला पुत्रसुख भोगतां येईल. मग आधींच मुलावरचें तिचें प्रेम मोठें, तशांत त्याचें ' मुखवटे ' लागतांच स्वानंदाच्या नेटानें तिला अनिवार पान्हा लोटतो (१९-४२०) तर केव्हां त्यानें मागितलें नसतांहि कळवळून ती त्याला स्तनास लावते. (११-११६१; २५-२९ ) राजपुत्राचें भाग्य वर्णितांना नाथ लिहितात,

**कां राजपत्नीचे स्तन । देखावया शके कोण ।**
**परी निजपुत्र तेथें जाण । बळें स्तनपान करीतसे ।।** १-२०

बालक थोडें मोठें होतांच तिच्या लीला आणखी वाढतात. डोळे झांकून आपल्याकडे धांवणाऱ्या बालकाकडे ती अत्यंत सद्भावानें झेंपावते ( २-३३३ ) तर कधीं त्याच्या धोरणानें तदनुकूल खेळ खेळते. ( २७–३६७ ) ही माता आमच्या आदराचें स्थान राहील. बालकानें कसलाहि धाया ( हट्ट ) घेऊन पायीं मिठी घातली असतां धन वेंचून त्याला आई हवें तें देईल पण कधींहि जीवें मारणार नाहीं. ( २९-६२५ ) तानुल्याचें प्रतिपालन करतांना ( ३-५५६; २९-१० ) त्याला न सांडतां ( २३-९६४ ) व त्याच्या जीवावर जीवभाव ठेवून ( २-७२५ ) ती त्याची चिंता वाहाते ( २४-३५६; २९-८४२ ) व शहाणपणानें त्याला वाढवते. (२९-११) स्वतःची चिंता नेणणाऱ्या बालकाच्या हितासाठीं अशा रीतीनें प्रवर्तणारी ही माता ( २५-३१; २८-३६ ) त्याच्या तृप्तींत स्वानंदानें सुखावते. ( २९-४९१ ) मुलाला संकटांत पाहून ' न सांवरत ' उठणारी ( १७-१२४ ) ही माता चुकलेल्या बालकाला शिकवण द्यायला मात्र चुकत नाहीं. ( १२-३५४ ) मातेपासून चुकलेलें दीन बालक तिच्या आगमनानें संतोषतें ( २-४३ ) तर कधीं भेट होतांच ओरडून रडायला लागतें आणि मग सप्रेम मिठी पडते. (१४-३२४) चुकल्या पुत्राची शुद्धिवार्ता ती कधीं सादरें ऐकते ( २-५२५ ) तर कधीं निघून गेलेल्या पुत्राची शुद्धि आली असतां त्याच्या खाणाखुणा ऐकून विव्हळतेनें सर्वाधिक चरफडते. ( २३-९७३, ७४ ) तर कधीं

**चुकल्या मायपूतां संकटीं । एकाकीं बहुकाळें जाहली भेटी ।**
**तेणें वोरडें घालोनि मिठी । चालें पोटीं अनिवार रुदन ॥**

ए. भा. २-५५९

आधीं वंध्या वाटणारी पण नंतर गर्भसंभव होतांच उशीरा आलेल्या त्या गर्भाला उल्हासानें व कळवळ्यानें वाढवणारी (१४-२४४, ४५) आणि पुत्र होतांच त्याच्या बाबतींत कळवळणारी (३१-३०५) माता बराच काळ खोळंबून राहावें लागल्यानें पुत्रप्रेमाच्या बाबतींत अधिक हळुवार बनली तर नवल नाहीं.

मूल लहान असतांना त्याला 'प्रकटावयवीं' लाडवणारी पण तें प्रौढ होतांच सलज्ज होणारी (२२-४८०, ८१) माता निर्देशून आणखी एका अवस्थेचें दर्शन नाथ घडवतात. सारांश, माता क्वचित् स्वतः कुरूप असली तरी तिच्या स्नेहाला मात्र कधींहि कुरूपता नसते (१७-११०) ही गोष्ट या उदाहरणांनीं स्पष्टच होते. मुकें बालक सोडून सती जाऊं पाहणारी माता येथें फक्त एकदांच दिसते. (६-३४०)

देवकी आणि रोहिणी यांनीं केलेल्या शोकांत कृष्णाच्या चतुर्भुजत्वाचा उल्लेख असला तरी मातृहृदयाचें आक्रंदन अत्यंत उत्कटतेनें व्यक्त झालें आहे. (३१-२०५ ते २१९) 'आपला पान्हा प्राशायला मिळाला नाहीं म्हणून तर कृष्ण तान्हा रुसला नाहीं ना?' हा देवकीचा आर्त प्रश्न ऐकून हृदय गलबलतें. कर्त्या पुत्राच्या निधनानें वृद्ध मातेला किती तीव्र शोक होतो याचें मोठें करुण चित्र नाथांनीं येथें रेखाटलें आहे. आपल्या बोलण्यांतील निश्चितता व्यक्त करण्यासाठीं कृष्ण 'देवकीची आण' घेतो. (११-११८१; १२-२५३, ५४; २९-३८०) कृष्णाची ही मातृभक्ति लक्षांत घेतली कीं देवकीचा शोक आणखी व्याकुळता वाढवितो.

## पत्नी

नाथभागवतांत माता ही नेहमींच सुमाता असली तरी पत्नी मात्र नेहमींच सुपत्नी किंवा पतिव्रता नाहीं. पतीच्या मनांत आपल्याविषयीं प्रीति निर्माण व्हावी म्हणून कुलवधू सासुसासऱ्यांना मान देते आणि त्यांच्या दासांनाहि मानते. (८-१०३) सती पतिव्रता पतीचें वचन कधींहि उल्लंघीत नाहीं (१४-४३९) म्हणून सगुण, सुंदर, पतिव्रता नवऱ्याची अत्यंत पढियंती होते आणि मागणी

नसतांहि तो तिला सर्वस्व देतो. ( १३-१८४ ) प्रकृति आणि पुरुष यांच्या संसाराचें चमत्कृतिजनक वर्णन ( २४-४ ते ३८ ) करून प्रकृतीनें पुरुषाला कसें वश केलें हें सांगतांना विशिष्ट कौटुंबिक चालीरीतीचा एकनाथ उल्लेख करतात तो असा,

**प्रकृति पतिव्रता शिरोमणी । कांत वश्य करोनि निजगुणीं ।**
**वासना सूक्ष्म सेवया अनुदिनीं । भोगवी सुगरणी भर्ताराकरवीं ।।**

ए. भा. २४-३५

तर उलट सर्वस्वासह जीवप्राण अर्पिणाऱ्या धर्मपत्नीशींहि धनलोभामुळें अविश्वासाची वागणूक ठेवणारा भ्रतारहि येथें आहे. ( २३-३०३ ) नवरा बायकोंत अबोला असला तरी तो अबोला म्हणजेच अति प्रीति ( ११-३३२ ) हें नाथांनीं ओळखलें होतें. पण विषयावस्था निःशेष निमाली तरी वृद्ध पतिव्रतेला भर्त्याचा त्याग करणें आवडत नाहीं. ( २९-८६६ ) सहासष्ट वर्षांनंतर पुरुषानें वानप्रस्थ घ्यावा असें धर्मशास्त्र सांगतें. अशा वेळीं भार्येला पुत्राच्या हातीं निरवून पुरुष वनाकडे निघूं पाहतो. पण

**भार्या साध्वी पतिव्रता सती । ईश्वरस्वरूप मानी पती ।**
**भ्रतार निघतां वानप्रस्थीं । जे पुत्राप्रती राहीना ।।**
**सांडितां भ्रतारसेवेसीं । कल्पांत हो पाहे जिसी ।**
**जे भ्रतार चरणांची दासी ।... ...**

अशी पत्नी " **ते सवें वनासी आणावी ।** " अशी अनुज्ञा नाथ देऊन ठेवतात. ( १८-११ ते १४ )

**स्त्री पुरुषांची चित्तवृत्ति । अनुकूल वर्ते धर्मप्रवृत्तीं ।**
**तरीच परलोक साधिती । इतरां प्राप्ति ते नाहीं ।।**

ए. भा. ७-६१२

अशी खूण नाथ सांगतात.

पतिपत्नींच्या विरहाचीं आणि मीलनाचीं कांहीं स्थळें येथें आढळतात. केव्हां सगुण, सुरूप, समर्थ भर्ता निघून गेल्यास त्याची पत्नी त्याच्यासाठीं तळमळते ( १४-२४८ ) तर केव्हां पुष्कळ काळ परदेशीं गेलेला पति पत्र पाठवतो आणि

मग त्याची कांता तें पत्र अत्यंत एकाग्रतेनें व सादर ऐकते. ( २३-९७२ ) नाथांनीं येथें 'पत्र ऐके' असें म्हटलें आहे हें लक्षांत घ्यावें. स्त्रियांची निरक्षरताच त्यांतून स्पष्ट होत नाहीं काय ? उलट केव्हां '**पर्णिली कांता माहेरा जाये । चित्तीं निघाली दूरी न राहे ।**' ( १३-२७७ ) अशी स्थिति जशी आढळते तशीच माहेरीं गेलेल्या स्त्रीचें ध्यान करतांच ती जिव्हारीं प्रगट होते आणि आपल्या हावभावकटाक्षांनीं पुरुषाला सकाम करते.

पतिव्रतांविषयीं एकनाथांना अत्यंत आदर वाटतो. कौरवांनीं द्रौपदीचा अवमान केला हें सांगतांना ते लिहितात,

**बाळे भोळे अज्ञान जनीं । तेही गांजितांना धर्मपत्नी ।**
**ते साचचि धर्माची मानिनी । आणिली बांधोनि सभेमाजी ।।**

* * *

**दुःशासनें धरिले वेणीकच । तेणेंचि वाढली कचकच ।**

* * *

**पतिव्रतेचें वस्त्रहरण । तेणें तत्काळ पावे मरण ।।**

१-२०९ ते २१५

स्वतःच्या वर्तनानें पातिव्रत्याला धक्का देणाऱ्या कांहीं अपतिव्रतांचेहि निर्देश नाथ करतात. तसेंच विधवा, सवतीसंबंध, माहेरवाशिणी कन्या, वेश्या, स्त्री नट, दासी आदींचे उल्लेखहि नाथभागवतांतून इतस्ततः आढळतात. याखेरीज स्त्री-जीवनाशीं संबंधित असे इतर अनेक उल्लेखहि नाथांच्या सूक्ष्म अवलोकनांत आलेले भागवतांतून विपुलतेनें पाहण्यास मिळतात. वाचकांनीं ते मूळ ग्रंथांतूनच पाहावेत.



## देव भोळ्या भक्तांचें सर्वस्व आहे.

तेविं माझिया भोळ्या भक्ता । मीचि जाण जिवलग माता ।
अर्थ स्वार्थ परमार्थता । जाण तत्त्वतां मी त्यांसी ॥

बाळक न मागतां धांवोनी । कळवळोनि माता लावी स्तनीं ।
तेविं भोळ्या भक्तालागुनी । मी अनुसंधानीं लावितां ॥

कर्माकर्म प्रत्यवायता । हे सज्ञानासीच सर्वथा ।
भोळ्या भक्तासी कर्मबाधकता । मी सर्वथा येऊं नेदीं ॥

भोजनीं बैसतां बापासी । दूरी बैसवी ज्येष्ठ पुत्रासी ।
अंकीं वाऊनि बाळकासी । तृप्ती निज ग्रासी देतुसे ॥

वाट चुकल्या भुयाळासी । फेरा पडे चाले जाणत्यासी ।
बाळक बापाचे कडियेसी । श्रमु तयासी येवों न शके ॥

ना. भा. अ. ११-११५९, ६१, ६५, ६६, ६९

---

## भक्त राहतात तो देश पावन

असो हें पवित्रतेचें महिमान । पावना पावन आहे आन ।
जेथें वसले भक्त सज्जन । तो देश पावन सर्वार्थी ॥


जे गांवीं वसती माझे भक्त । तत्संगें तो गांव पुनीत ।
जे देशीं वसले साधु संत । तो देश पुनीत त्यांचेनी ॥

भक्तांचा वारा लागे जिकडे । अति पवित्रता होय तिकडे ।
ते सत्संगती ज्यासी घडे । पवित्रता जोडे तयासी ॥

माझें स्वरूपीं ज्यांचें चित्त । अखंड जडलें भजनयुक्त ।
त्यांसीच बोलिजे मद्भक्त । तेचि संत सज्जन ॥

ना. भा. अ. २९-२५१, ५२, ५३, ५७

---



श्री एकनाथांच्या वाड्यांतील पूजामंदिर, पैठण
(मंदिराच्या सभामंडपांत नाथांचीं कीर्तनें व पुराणें होत असत)

# श्री एकनाथी भागवत आणि वर्णाश्रमधर्म

: लेखक :

महामहोपाध्याय वेदान्ततीर्थ **यज्ञेश्वर माधवशास्त्री कस्तुरे**

( प्राचार्य, संस्कृत महाविद्यालय, नांदेड )

श्री एकनाथी भागवत हा ग्रंथ श्रीमद्भागवताचा एक भाग असल्यामुळें भक्तिप्रधान आहे. ग्रंथ भागवताच्या ह्या अकराव्या स्कंधांत तत्त्वज्ञानाचेंहि विवेचन आहे; पण मूळ भागवत ग्रंथाचा उद्देश भक्तीचेंच प्रतिपादन करण्याचा आहे. या भक्तिप्रतिपादनाच्या कक्षेंत वर्णाश्रमधर्माचा संबंध काय येतो ? असा प्रश्न स्वाभाविकच निर्माण होतो. कारण भक्तीला अमुक वर्णाचा, जातीचा, आश्रमाचा, वयाचा मनुष्य पाहिजे, असा कांहीं नियम नाहीं.

**कौमार आचरेत् प्राज्ञः धर्मान् भागवतानिह ।**

या नियमाप्रमाणें ध्रुवासारखा लहान मुलगा आणि प्रल्हादासारखा दैत्य शिशुहि परमेश्वराचा आवडता भक्त बनूं शकतो.

श्री एकनाथ महाराजांचा भागवत संप्रदाय आहे. देवदरबारीं समता घडवून आणून जातीची विषमता बोथट करणें हें भागवत धर्माचें उद्दिष्ट आहे.

पण श्रीमद्भागवत किंवा एकनाथी भागवत यांचा वर्णाश्रमव्यवस्थानिर्णय हा मुख्य विषय नाहीं. इतकेंच नव्हे तर श्री एकनाथ महाराज हे एक आधुनिक मतवाद्यासारखेच वर्णाश्रममर्यादेच्या विरोधी होते, असेंहि त्यांच्या चरित्रावरून तर्कितां येतें. त्यांनीं अंत्यजाचें मूल कडेवर घेतलें, रामेश्वराची कावड गाढवाला पाजली आणि श्राद्धासाठीं शिजविलेलें सुग्रास अन्न अस्पृश्यांना खाऊं घातलें हें प्रसिद्धच आहे. त्यांची अभंगवाणी काय म्हणते पहा.

**वर्णाश्रमधर्म जाति कुल गोत । एकाकारी होत आत्मतत्त्वीं ।**

* * *

**नामधारकासीं नाहीं वर्णावर्ण ।**

आम्ही ब्रह्मकुळींचे ब्राह्मण । याति कुळ नाहीं लहान ॥
आम्हां सोवळें ओवळें नाहीं । विटाळ न देखो कवण्या ठायीं ॥
आम्हां सोइरे जे जाहले । ते याति कुळा वेगळे केले ॥
एका जनार्दनीं बोधू । याति कुळींचा फिटला संबंधू ॥

*　　*　　*

जाति कुळ धर्म नुरेचि आम्हां कांहीं ।

*　　*　　*

संत भलते याति असो । परी विठ्ठल मनीं वसो ॥
तया घालीन लोळणी । घेईन मी पायधुनी ॥
जाति कुळाशीं संबंध । मज नाहीं भेदाभेद ॥
भलते जातीचा । विठ्ठल उच्चारी वाचा ॥
तेणें पावन देह चारीं । एका जनार्दनी निर्धारीं ॥

*　　*　　*

सर्वाभूतीं दया भेद नोहे चित्ता । साधी परमार्थ हाचि एक ॥

अशीं कितीतरी वचनें देतां येतील. असे उघड उघड पुरावे दिसत असतां नाथदर्शनांत वर्णाश्रमविचार म्हणजे नास्तिक चार्वाकादि दर्शनांतून ईश्वरवाद पहाण्यासारखेंच हास्यास्पद नाहीं काय, असें सकृद्दर्शनींच वाटतें.

वर्णाश्रमविचार हा मुख्य प्रतिपाद्य विषय नसला तरी मूळ भागवताच्या एकादश स्कंधांत कांहीं प्रसंगानुरूप आणि कित्येक वेळां मुद्दाम प्रश्न उपस्थित करून वर्णाश्रमधर्माचा उल्लेख व विचार ठिकठिकाणीं आलेला आहे. त्या त्या श्लोकांचें विवरण श्रीनाथमहाराजांनाहि करणें क्रमप्राप्तच होतें. शिवाय इतर विवेचन करीत असतांहि नाथांच्या लेखणींतून वर्ण व आश्रम यांचा विचार येणें स्वाभाविक आहे. त्या वाक्यांचा सर्वसाधारणपणें विचार करूनच नाथमहाराजांचें मत ठरविणें न्याय्य आहे. त्या संपूर्ण वाक्यांचा विचार येथें करण्याला अवकाश नाहीं, पण कांहीं महत्त्वाच्या उल्लेखांची मीमांसा केली तरी नाथदर्शनांतील एका विषयावर प्रकाश पडण्यासारखा आहे. त्याशिवाय हा निर्णय घेणें योग्य नाहीं. म्हणून एकनाथी भागवतांतीलच साधक बाधक वचनांचें पूर्वापर संदर्भपूर्वक विवेचन करून नाथांच्या वर्णाश्रमव्यवस्थाविषयक अभिप्रायांचें दिग्दर्शन यथामति करण्याचें ठरविलें आहे.

## वर्णाश्रमव्यवस्था म्हणजे काय?

**वर्ण** :– प्राचीन भारतीय समाजरचनेंत निखिल मानवजातीचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशा चार विभागांत वर्गीकरण केलेलें आहे. यालाच चातुर्वर्ण्य किंवा चार वर्ण असें म्हणतात. वर्ण शब्दानें हेच चार वर्ण येथें विवक्षित आहेत.

**आश्रम** :– याचप्रमाणें ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ आणि संन्यास या मानवी आयुष्याच्या चार अवस्थांना चार आश्रम असें म्हणतात. त्यांचाच प्रस्तुत विचार करावयाचा आहे.

**व्यवस्था** :– व्यवस्था म्हणजे सामाजिक नियंत्रणाची पद्धति किंवा योजना. चार वर्ण व चार आश्रम यांच्याद्वारां समाजाचें नियमन करण्याची जी योजना प्राचीन भारतीयांनीं केलेली आहे, तिच्यावर श्रीएकनाथ महाराजांच्या या एकाकार टीकेंतून काय प्रकाश पडतो तें आपणाला पहावयाचें आहे.

## वर्णव्यवस्था–विरोधी बाजु

आरंभींच दुसऱ्या अध्यायांत

**न यस्य कर्मभ्यां न वर्णाश्रमजातिभिः ।**
**सज्जतेऽस्मिन्नहंभावो देहे वै स हरेः प्रियाः ॥ २-५१ ॥**

यावरून ज्याला मी अमुक वंशांत जन्माला आलों, असें पवित्र कार्य मी करीत आहें, हा माझा वर्ण, आश्रम व जात, अशाप्रकारें या हाडाकातड्याच्या देहावर अभिमान नसतो, तोच परमेश्वराला प्रिय होतो. म्हणजे देहाला वर्ण, जात कांहीं नसून ती एक अभिमानमूलक कल्पना आहे असें व्यक्त होतें. यावर नाथ काय म्हणतात पहा.

**ज्यासी नाहीं देहाभिमान । तो हातीं न धरीं देहाचा वर्ण ।**
**तैसाचि आश्रमाचा अभिमान । भक्त सज्ञान न धरी कदा ॥६९९॥**
**तैशाच आश्रमादि अवस्था । भक्ता न धरी सर्वथा ।**
**तैशीच जातीचीहि कथा । न घे माथा भक्तोत्तम ॥ ७०१ ॥**
**जाति उंच नीच असंख्य । परी तो म्हणे माझीचि एक ।**
**जेवीं गंगातीरीं गांव अनेक । परी गंगा माझा एक गांव न म्हणे ॥७०२॥**

**तेवीं जन्मकर्म वर्णाश्रमजाती । पूर्णभक्त हातीं न धरती ॥ ७०३ ॥**

ए. भा. अ. २

यावरूनच देहाला आत्मा मानणाऱ्या अज्ञानी माणसांच्या ह्या वर्ण, आश्रम, जाति कल्पना आहेत. मूळ आत्मा अकर्ता व म्हणून जात्यादि रहितच आहे. सूर्यामुळें सूर्यकांत मण्यांतून अग्नि प्रकट होतो. त्यायोगानें यज्ञदाहादि क्रिया घडतात. म्हणून मूळ सूर्याचें अंग भाजतें कां ? म्हणजे अभिमानमूलक या कल्पना आहेत, वस्तुगत्या नाहींत. वर्ण जन्मासिद्ध असता तर जन्मतःच दिसून येता. पण

**जेव्हां पावे जन्मप्राप्ति । तेव्हां त्यासवें नाहीं वर्णाश्रमजाती ।**
**जन्म अभिमानें माथा घेती । हें कुळगोत जाती पै माझी ॥७१७॥**
**वाढवितां वर्णाश्रमजाती । सज्ञान गुंतती निज अभिमानें ॥७१८॥**
**डावे हातींचे पदार्थी । उजवे हातीं स्वयें देतां ।**
**येथ कोण देतां घेतां । तेवीं एकात्मता सर्वाभूतीं ॥ ७३९ ॥**

ए. भा. अ. २

तेव्हां वर्णाश्रमव्यवस्था सर्व मूर्खांप्रमाणें लादलेल्या कल्पनामात्र आहेत असें सूचित होत नाहीं कां ?

सतराव्या अध्यायांत सृष्टीच्या आरंभीं ही वर्णाश्रमव्यवस्था कांहीं नव्हती, असें स्पष्टच सांगितलें आहे.

**आदौ कृतयुगे वर्णो नृणां हंस इति स्मृतः । १७-९-१०**

याचें स्पष्टीकरण श्रीनाथ काय करतात पहा.

**पूर्वी कृतयुगीचें लक्षण । तैं नव्हते गा चारी वर्ण ।**
**बहुशाखा वेदपठण । कर्माचरण तें नाहीं ॥ ६३ ॥**
**तैं सकळ मनुष्या जाण । सोऽहं हंसाचें अखंड ध्यान ।**
**यालागीं हंस हाचि एक वर्ण । सर्वांसहि जाण तें काळीं ॥६४॥**
**यापरी मज समस्त । स्वधर्म स्वभाव आवडत ।**
**यालागीं जाण निश्चित । त्यांतें बोलिजे कृतयुग ॥ ६५ ॥**

कृतयुग ही तर समाजाची अत्यंत आदर्श अवस्था. त्यावेळीं हंस नांवाचा एक वर्णात्मक सर्व समाज होता. हंस म्हणजे ‘ सोऽहं हंसाचें अखंड ध्यान ’ अर्थात्

आत्मसाक्षात्काराची पराकोटी. राजा व पोलीस यावांचून समाजधारणा त्याकाळीं असे.

**न राज्यं नैव राजाऽसीत् न दण्डो न च दाण्डिकः ।**
**धर्मेणैव प्रजाः सर्वा रक्षन्ति स्म परस्परम् ॥**

असें वर्णन महाभारतादि ग्रंथांत आढळतें. आजच्या समाजसुधारणावादाचें तरी हेंच साध्य आहे कीं राजा नको, राज्यव्यवस्था नको, शिक्षाहि नसावी व शिक्षा करणारा नसूनहि सर्व प्रजेनें स्वकर्तव्यें करूनच परस्परांचें रक्षण करावें. हीच स्थिति भगवंतालाहि-अधिक प्रिय आहे हें 'समस्त स्वधर्म स्वभावें आवडत' अशा शब्दांनीं नाथांनीं उल्लेखिलें आहे.

## वर्णधर्मासारखीच आश्रमधर्माची स्थिति

२७ व्या अध्यायाकडे पहा.

**आश्रमधर्मविधि विधान । तेथ अधिकारी द्विजन्मे जन ।**
**त्यासी कर्मबाधा बाधी गहन । गुंतले ब्राह्मण कर्मठत्वें ॥२७॥**
**तैसें नव्हे तुझें भजन । भजनाधिकारी सर्व वर्ण ।**
**दीनोद्धारी भजन पूर्ण । स्त्रिया शूद्रजन उद्धरिले ॥ २८ ॥**
**सर्व वर्ण आणि आश्रम । भगवद्भजनें गति उत्तम ।**
**हेंचि भक्तीचें निजवर्म । भक्त निष्काम जाणती यासी ॥३१॥**

यावरून असें दिसून येते कीं, ही वर्णाश्रमाची चौकट संतांना जाचत होती. कारण याचे अधिकारी फक्त 'द्विजन्मे' म्हणजे प्रायः ब्राह्मणच. कारण नाथांच्या काळींहि क्षत्रिय आणि वैश्य या वर्णांचें संस्कारयुक्त अस्तित्व आजच्या सारखेंच संपुष्टांत आलेलें असावें. म्हणूनच '**गुंतले ब्राह्मण कर्मठत्वें** ।' असें म्हटलें आहे. मग काय बाकीचा प्रचंड समाज उद्धारास अपात्रच काय? नाहीं. यासाठीं संतांनीं तोड काढली. भक्तिमार्गाचा प्रसार करून त्यांनीं ही जातिवादाची तीव्रता कमी केली. स्त्रिया, शूद्र, सर्व वर्ण आणि आश्रम यांना भगवद्भजनानें 'उत्तम गति' प्राप्त करून देण्याची सोय त्यामुळें निघाली व हेंच 'भक्तीचें निजवर्म' होय.

२९ व्या अध्यायांत तर त्यांनीं आपला साम्यवादच मांडला आहे.

**ऐसे अतिवंद्य जे ब्राह्मण । आणि चांडाळामाजी निंद्य हीन ।**
**तो श्वपच द्विजवरा समान । हरिरूपें जाण भक्त देखे ॥२९५॥**

**श्वपच आणि ब्राह्मण । अतिभेदे विषमपण ।**
**आत्मदृष्टीं पहातां जाण । दोघे समान चिद्रूप ।। २९६ ।।**
**सुवर्ण विष्णु सुवर्ण श्वान । एक पूज्य एक हीन ।**
**विकूं जातां मोल समान । निंद्य वंद्य जाण आत्मत्वीं तैसे ।। २९७ ।।**

म्हणजे लोकव्यवहाराच्या दृष्टीनें तत्कालीन परिस्थितींत वर्णभेद नाहींसे करणें त्यांना अशक्य वाटले असले तरी सर्वच जीव परमात्मस्वरूप आहेत, ही पारमार्थिक भावना नाथांना वर्णभेद जाचत होते, हेंच सुचवितें. म्हणूनच त्यांनीं शेवटीं निर्णय दिला आहे कीं,

**स्वकर्म धर्म वर्णाचार । करितांहि निजव्यवहार ।**
**ज्यासी सर्वाभूतीं मदाकार । तो भक्त साचार प्रिय माझा ।।**

ए. भा. २९-३१२

याप्रमाणें वर्णभेदच वस्तुतः नाहींत. पण व्यवस्थेसाठीं मानावयाचेच असतील तर गुणकर्मानुरूपच मानले पाहिजेत, असें नाथ मानीत हें पुढील उल्लेखावरून दिसतें.

**ज्यासी जीविका जेणें जाण । त्या ब्राह्मणाचा तोचि वर्ण ।**

ए. भा. १८-१०६

**तो ब्राह्मण शूद्रकर्में करी । शूद्रत्व धारी क्रियायोगें ।।**

ए. भा. १८-११०

एकूण नाथमहाराजांना वर्णभेदाबद्दल तिटकारा होता व वर्णभेद गुणकर्मानुसारीच त्यांना मान्य होता असें सिद्ध होतें.

## हेंच नाथांचें हृद्गत आहे काय ?

अशा प्रकारें एका बाजूनें आपण नाथभागवताचा कानोसा घेतला. पण हेंच नाथांचें खरें मत आहे कां नाहीं ? हें एकाच प्रकारच्या वचनांचा आधार लक्षांत घेऊन निर्णय करणें धोक्याचें असतें. नाहींतर शांकरभाष्यांत ठिकठिकाणीं जे पूर्वपक्ष मांडले आहेत ते वाचतांना अगदीं बिनतोड वाटतात. एखाद्यानें त्या सर्व पूर्वपक्षांचाच संग्रह एकत्र छापला व हें पहा श्री शंकराचार्यांचें मत असें म्हटलें तर विचारवंतहि थोडा वेळ बुचकळ्यांत पडेल ! पण जाणता विचारी माणूस

संपूर्ण ग्रंथ पाहूनच त्यांच्या मनाचा ठाव घेतो. तद्वत् नाथांच्याहि याबाबतच्या एकुण निर्देशावरून त्यांच्या मताचा निर्णय करणेंच योग्य होय. तें आपण आतां पाहूं.

पूर्वपक्षामध्यें एकूण चार मुद्दे प्राधान्यानें आलेले आहेत.

( १ ) वर्णाभिमान हा विद्वानांचा विषय नसून मूर्खांची ती कल्पना आहे.

( २ ) वर्णादि भेद कृत्रिम आहे. सृष्टीच्या आरंभीं ( कृतयुगांत ) वर्णादि भेद नव्हता.

( ३ ) पारमार्थिकदृष्ट्या अवघें विश्व ब्रह्मरूपच आहे, म्हणून हा भेद मानूं नये.

( ४ ) मानावयाचाच तर तो गुणकर्मानुसार असावा हेंच नाथांचें मत आहे.

याचा विचार करावयाचा तर याच्या उलट बाजूहि अशी लक्षांत येते कीं, अभिमान नसावा म्हणजे भेदच नसावा असें म्हणतां येत नाहीं. सोऽहं हंसाच्या ध्यानांत—जीवब्रह्मैक्य साक्षात्काराच्या अवस्थेंत द्वैतच राहात नाहीं, म्हणून व्यवहारकालीं तें मानूं नये असें होत नाहीं. आणि म्हणूनच पारमार्थिक सर्वभूतात्मभाव प्राप्त न होतांहि वर्णाश्रमधर्म सोडावा असें सिद्ध होत नाहीं.

याविषयीं नाथमहाराजांची त्याच प्रकरणांतील एक ओवी स्पष्ट प्रकाश पाडते.

**तेवीं वर्णाश्रमजाती । पूर्ण भक्त हातीं न धरिती ॥**
ए. भा. २-७०३

असें म्हटल्याबरोबरच नाथांनीं पुढील आशंका मांडली आहे व तिचें निरसनहि त्याच ओवीच्या उत्तरार्धांत केलें आहे.

**शंका :—तरी काय वर्णाश्रमजाती । भक्त निःशेष त्यागिती ।**
**उत्तर :—त्यांत असोनि नाहीं अहंकृति । ते हे उपपत्ति बोलिलों राया ॥**
ए. भा. २-७०४

याचा अर्थ भक्त आणि तत्त्वज्ञानी जरी झाला तरी तो आपली वर्णाश्रमजाति सोडून देतो असें नव्हे; तर त्याच वर्णांत असूनहि तो देहाभिमानाच्या अभावी

**तेवीं जन्मकर्म वर्णाश्रमजाती । पूर्णभक्त हातीं न धरती ॥ ७०३ ॥**

ए. भा. अ. २

यावरूनच देहाला आत्मा मानणाऱ्या अज्ञानी माणसांच्या ह्या वर्ण, आश्रम, जाति कल्पना आहेत. मूळ आत्मा अकर्ता व म्हणून जात्यादि रहितच आहे. सूर्यामुळें सूर्यकांत मण्यांतून अग्नि प्रकट होतो. त्यायोगानें यज्ञदाहादि क्रिया घडतात. म्हणून मूळ सूर्याचें अंग भाजतें कां? म्हणजे अभिमानमूलक या कल्पना आहेत, वस्तुगत्या नाहींत. वर्ण जन्मासिद्ध असता तर जन्मतःच दिसून येता. पण

**जेव्हां पावे जन्मप्राप्ति । तेव्हां त्यासवें नाहीं वर्णाश्रमजाती ।**
**जन्म अभिमानें माथा घेती । हे कुळगोत जाती पै माझी ॥७१७॥**
**वाढवितां वर्णाश्रमजाती । सज्ञान गुंतती निज अभिमानें ॥७१८॥**
**डावे हातींचे पदार्था । उजवे हातीं स्वयें देतां ।**
**येथ कोण देतां घेतां । तेवीं एकात्मता सर्वांभूतीं ॥ ७३९ ॥**

ए. भा. अ. २

तेव्हां वर्णाश्रमव्यवस्था सर्व मूर्खाप्रमाणें लादलेल्या कल्पनामात्र आहेत असें सूचित होत नाहीं कां?

सतराव्या अध्यायांत सृष्टीच्या आरंभीं ही वर्णाश्रमव्यवस्था कांहीं नव्हती, असें स्पष्टच सांगितलें आहे.

**आदौ कृतयुगे वर्णो नृणां हंस इति स्मृतः । १७-९-१०**

याचें स्पष्टीकरण श्रीनाथ काय करतात पहा.

**पूर्वी कृतयुगीचें लक्षण । तैं नव्हते गा चारी वर्ण ।**
**बहुशाखा वेदपठण । कर्माचरण तें नाहीं ॥ ६३ ॥**
**तैं सकळ मनुष्या जाण । सोऽहं हंसाचें अखंड ध्यान ।**
**यालागीं हंस हाचि एक वर्ण । सर्वांसहि जाण तें काळीं ॥६४॥**
**यापरी मज समस्त । स्वधर्म स्वभाव आवडत ।**
**यालागीं जाण निश्चित । त्यांतें बोलिजे कृतयुग ॥ ६५ ॥**

कृतयुग ही तर समाजाची अत्यंत आदर्श अवस्था. त्यावेळीं हंस नांवाचा एक वर्णात्मक सर्व समाज होता. हंस म्हणजे 'सोऽहं हंसाचें अखंड ध्यान' अर्थात्

आत्मसाक्षात्काराची पराकोटी. राजा व पोलीस यावांचून समाजधारणा त्याकाळीं असे.

**न राज्यं नैव राजाऽसीत् न दण्डो न च दाण्डिकः ।**
**धर्मेणैव प्रजाः सर्वा रक्षन्ति स्म परस्परम् ॥**

असें वर्णन महाभारतादि ग्रंथांत आढळतें. आजच्या समाजसुधारणावादाचें तरी हेंच साध्य आहे कीं राजा नको, राज्यव्यवस्था नको, शिक्षाहि नसावी व शिक्षा करणारा नसूनहि सर्व प्रजेनें स्वकर्तव्यें करूनच परस्परांचें रक्षण करावें. हीच स्थिति भगवंतालाहि-अधिक प्रिय आहे हें ' समस्त स्वधर्म स्वभावें आवडत ' अशा शब्दांनीं नाथांनीं उल्लेखिलें आहे.

## वर्णधर्मासारखीच आश्रमधर्माची स्थिति

२७ व्या अध्यायाकडे पहा.

**आश्रमधर्मविधि विधान । तेथ अधिकारी द्विजन्मे जन ।**
**त्यासी कर्मबाधा बाधी गहन । गुंतले ब्राह्मण कर्मठत्वें ॥२७॥**
**तैसें नव्हे तुझें भजन । भजनाधिकारी सर्व वर्ण ।**
**दीनोद्धारी भजन पूर्ण । स्त्रिया शूद्रजन उद्धरिले ॥ २८ ॥**
**सर्व वर्ण आणि आश्रम । भगवद्भजनें गति उत्तम ।**
**हेंचि भक्तीचें निजवर्म । भक्त निष्काम जाणती यासी ॥२९॥**

यावरून असें दिसून येते कीं, ही वर्णाश्रमाची चौकट संतांना जाचत होती. कारण याचे अधिकारी फक्त ' द्विजन्मे ' म्हणजे प्रायः ब्राह्मणच. कारण नाथांच्या काळींहि क्षत्रिय आणि वैश्य या वर्णांचें संस्कारयुक्त अस्तित्व आजच्या सारखेंच संपुष्टांत आलेलें असावें. म्हणूनच ' **गुंतले ब्राह्मण कर्मठत्वें** ।' असें म्हटलें आहे. मग काय बाकीचा प्रचंड समाज उद्धारास अपात्रच काय? नाहीं. यासाठीं संतांनीं तोड काढली. भक्तिमार्गाचा प्रसार करून त्यांनीं ही जातिवादाची तीव्रता कमी केली. स्त्रिया, शूद्र, सर्व वर्ण आणि आश्रम यांना भगवद्भजनानें ' उत्तम गति ' प्राप्त करून देण्याची सोय त्यामुळें निघाली व हेंच ' भक्तीचें निजवर्म ' होय.

२९ व्या अध्यायांत तर त्यांनीं आपला साम्यवादच मांडला आहे.

**ऐसे अतिवंद्य जे ब्राह्मण । आणि चांडाळामाजी निंद्य हीन ।**
**तो श्वपच द्विजवरा समान । हरिरूपें जाण भक्त देखे ॥२९५॥**

**श्वपच आणि ब्राह्मण । अतिभेदे विषमपण ।**
**आत्मदृष्टीं पहातां जाण । दोघे समान चिद्रूप ॥ २९६ ॥**
**सुवर्ण विष्णु सुवर्ण श्वान । एक पूज्य एक हीन ।**
**विकूं जातां मोल समान । निंद्य वंद्य जाण आत्मत्वीं तैसे ॥ २९७ ॥**

म्हणजे लोकव्यवहाराच्या दृष्टीनें तत्कालीन परिस्थितींत वर्णभेद नाहींसे करणें त्यांना अशक्य वाटले असले तरी सर्वच जीव परमात्मस्वरूप आहेत, ही पारमार्थिक भावना नाथांना वर्णभेद जाचत होते, हेंच सुचवितें. म्हणूनच त्यांनीं शेवटीं निर्णय दिला आहे कीं,

**स्वकर्म धर्म वर्णाचार । करितांहि निजव्यवहार ।**
**ज्यासी सर्वाभूतीं मदाकार । तो भक्त साचार प्रिय माझा ॥**

ए. भा. २९-३१२

याप्रमाणें वर्णभेदच वस्तुतः नाहींत. पण व्यवस्थेसाठीं मानावयाचेच असतील तर गुणकर्मानुरूपच मानले पाहिजेत, असें नाथ मानीत हें पुढील उल्लेखावरून दिसतें.

**ज्यासी जीविका जेणें जाण । त्या ब्राह्मणाचा तोचि वर्ण ।**

ए. भा. १८-१०६

**तो ब्राह्मण शूद्रकर्में करी । शूद्रत्व धारी क्रियायोगें ॥**

ए. भा. १८-११०

एकुण नाथमहाराजांना वर्णभेदाबद्दल तिटकारा होता व वर्णभेद गुणकर्मानुसारीच त्यांना मान्य होता असें सिद्ध होतें.

## हेंच नाथांचें हृद्गत आहे काय ?

अशा प्रकारें एका बाजूनें आपण नाथभागवताचा कानोसा घेतला. पण हेंच नाथांचें खरें मत आहे कां नाहीं ? हें एकाच प्रकारच्या वचनांचा आधार लक्षांत घेऊन निर्णय करणें धोक्याचें असतें. नाहींतर शांकरभाष्यांत ठिकठिकाणीं जे पूर्वपक्ष मांडले आहेत ते वाचतांना अगदीं बिनतोड वाटतात. एखाद्यानें त्या सर्व पूर्वपक्षांचाच संग्रह एकत्र छापला व हें पहा श्री शंकराचार्यांचें मत असें म्हटलें तर विचारवंतहि थोडा वेळ बुचकळ्यांत पडेल ! पण जाणता विचारी माणूस

संपूर्ण ग्रंथ पाहूनच त्यांच्या मनाचा ठाव घेतो. तद्वत् नाथांच्याहि याबाबतच्या एकूण निर्देशावरून त्यांच्या मताचा निर्णय करणेंच योग्य होय. तें आपण आतां पाहूं.

पूर्वपक्षामध्यें एकूण चार मुद्दे प्राधान्यानें आलेले आहेत.

( १ ) वर्णाभिमान हा विद्वानांचा विषय नसून मूर्खांची ती कल्पना आहे.

( २ ) वर्णादि भेद कृत्रिम आहे. सृष्टीच्या आरंभीं (कृतयुगांत) वर्णादि भेद नव्हता.

( ३ ) पारमार्थिकदृष्ट्या अवघें विश्व ब्रह्मरूपच आहे, म्हणून हा भेद मानूं नये.

( ४ ) मानावयाचाच तर तो गुणकर्मानुसार असावा हेंच नाथांचें मत आहे.

याचा विचार करावयाचा तर याच्या उलट बाजूहि अशी लक्षांत येते कीं, अभिमान नसावा म्हणजे भेदच नसावा असें म्हणतां येत नाहीं. सोऽहं हंसाच्या ध्यानांत–जीवब्रह्मैक्य साक्षात्काराच्या अवस्थेंत द्वैतच राहात नाहीं, म्हणून व्यवहारकालीं तें मानूं नये असें होत नाहीं. आणि म्हणूनच पारमार्थिक सर्वभूतात्मभाव प्राप्त न होतांहि वर्णाश्रमधर्म सोडावा असें सिद्ध होत नाहीं.

याविषयीं नाथमहाराजांची त्याच प्रकरणांतील एक ओवी स्पष्ट प्रकाश पाडते.

**तेवीं वर्णाश्रमजाती । पूर्ण भक्त हातीं न धरिती ॥**

ए. भा. २-७०३

असें म्हटल्याबरोबरच नाथांनीं पुढील आशंका मांडली आहे व तिचें निरसनहि त्याच ओवीच्या उत्तरार्धांत केलें आहे.

**शंका :–तरी काय वर्णाश्रमजाती । भक्त निःशेष त्यागिती ।**

**उत्तर :–त्यांत असोनि नाहीं अहंकृति । ते हे उपपत्ति बोलिलों राया ॥**

ए. भा. २-७०४

याचा अर्थ भक्त आणि तत्त्वज्ञानी जरी झाला तरी तो आपली वर्णाश्रमजाति सोडून देतो असें नव्हे; तर त्याच वर्णांत असूनहि तो देहाभिमानाच्या अभावी

अहंकारत्याग करतो, पण कर्मे मात्र तींच त्या त्या वर्णाश्रमाला विहित अशींच करतो, हें ' त्यांत असोनि ' या पदानें स्पष्ट होतें. ग्रंथारंभीं पहिल्याच अध्यायांत भगवान् गोपालकृष्णाचें वर्णन करतांना नाथ म्हणतात,

**मायेसी दाविलें विश्वरूप । गोपाळासी दाविलें वैकुंठ द्वीप ।**
**परी गोवळेपणाचें रूप । नेदीच अल्प पालटों ॥ १८७ ॥**

आईला विश्वरूप दाखविणारा आणि आपल्या सवंगड्यांना जिवंतपणींच वैकुंठदर्शन करविणारा श्रीकृष्ण आपलें गोवळेपण पालटूं द्यायला तयार नाहीं. तसाच भक्त ज्ञानी देखील आपल्या जन्मजात जातिभेदांत अल्पहि पालट पडूं न देतां निरभिमानानें राहतो, हेंच या वचनाचें तात्पर्य आहे.

## वर्णाश्रमोत्पत्ति

कृतयुगांत वर्णादि विभाग नव्हता. तो मागाहून निर्माण झाला. त्याअर्थी तो ईश्वरी सृष्टींत नसून मनुष्यकृत म्हणजे कल्पिलेला आहे. या मुद्यावर मूळ भागवतांतच पांचव्या व सतराव्या अध्यायांत प्रश्न उपस्थित करून चर्चा केली आहे. नाथांच्याच भाषेनें हें पाहूं.

**पुरुषापासूनि जन्मले जाण । चारी आश्रम चारी वर्ण ।**
**त्यांचें उत्पत्तीचें स्थान । ऐक संपूर्ण नृपनाथा ॥**
**मुखीं वेदविद ब्राह्मण । बाहु जन्मले राजन्य ।**
**उरु जन्मले वैश्यवर्ण । चरणीं जन्मस्थान शूद्रवर्णा ॥**

ए. भा. ५-४५, ४६

म्हणजे चातुर्वर्ण्य विराट पुरुषापासून जन्माला आले. ते कोणी केलेले, कृत्रिम नाहीं हेंच नाथ मानतात. पुरुष म्हणजे विराट पुरुषच हेंहि सतराव्या अध्यायांत स्पष्ट केलें आहे.

**वैराज पुरुषाच्या जाण । मुखीं उपजले ब्राह्मण ।**
**बाहूपासूनि राजन्य । उरु जन्मस्थान वैश्याचें ॥**
**शूद्र चरणीं जन्मले जाण । यापरी जाहले चारी वर्ण ।**
**याचें एक मुख्य लक्षण । स्वधर्माचरण सर्वांसी ॥**

म्हणूनच नाथ म्हणतात, ही संस्था आजकालची नसून '**कल्पादि पासूनि स्वधर्म संस्था ।**' १७-६२

## वर्णाश्रमधर्म मूर्खांचा विषय

वर्णाश्रम अभिमान सज्ञान भक्त हातीं धरीत नाहींत, त्याअर्थी अज्ञानी अभक्तांचा तो विषय आहे हें उघड दिसतें. पण हें ज्ञान म्हणजे कोणतें व त्या दृष्टीनें मूर्ख कोण तें पाहिलें पाहिजे. आत्मसाक्षात्कारी पुरुष हाच नाथांना येथें ज्ञानी म्हणून विवक्षित आहे. जो देहाला मी म्हणत नाहीं, तो देहाच्या वर्णाश्रमाला कसा माझे म्हणेल ? तशा अधिकाराचा माणूस '**मनुष्याणां सहस्रेषु कश्चित् ।**' असतो व त्याला वर्णाश्रमाचीं बंधनें असतात, असें प्रत्यक्ष धर्मपीठाचे आद्य जगद्गुरु शंकराचार्यसुद्धां मानीत नाहींत. त्यामुळें लाखो लोकांतील एखादा संन्यासी झाला व त्यांतहि एखादा 'वर्णाश्रमाच्या' मर्यादेपलीकडे गेला म्हणजे बाकीच्यांनीं तो मानूं नये असें सिद्ध होत नाहीं. कारण नाथांनींच ठिकठिकाणीं वर्णाश्रम पाळणें कसें आवश्यक आहे, त्यावांचून मानवाला खरें कल्याण प्राप्त होणेंच शक्य नाहीं हें अगदीं आवर्जून सांगितलें आहे, तें पहा.

**जो वर्ण जो आश्रम । तेणेंचि करावे स्वधर्म ।**
**आचरितां परधर्म । दुःख परम पाविजे ॥** १०-४५ ॥
**सर्व मानवा परमगति । स्वधर्में घडे भगवद्भक्ति ॥** १७-२ ॥
**वर्णाश्रमी जे कोणी नर । त्यासी स्वधर्मचि मोक्षपर ॥** १७-६१ ॥
**चारी वर्ण चारी खाणी । चारी युगें चारी वाणी ।**
**चारी पुरुषार्थ चहू लक्षणीं । मुक्तीची मांडणी चतुर्धा ॥**३-७७७॥

म्हणजे वर्णाश्रमधर्म ही मुक्तीची मांडणी आहे. इतकेच नव्हे तर स्वधर्मच प्रत्येकानें पाळला पाहिजे. याचें नाथांनीं मार्मिक दृष्टांतांनीं विवेचन केलें आहे. स्वधर्माचरणावरील त्यांचा कटाक्ष पहाण्यासारखा आहे.

**मुखींचा व्यापार भोजन । तो नाकें करूं जातां जाण ।**
**सुख बुडवूनिया दारुण । दुःख आपण स्वयें भोगी ॥** २१-३६
**कां पायाचें चालणें । पडे जैं डोई करणें ।**
**तैं मार्ग न कंठे तेणें । परी कष्टणें अनिवार ॥** २१-३७

तेवीं जें कर्म स्वाधिकारें । सुखातें दे अत्यादरें ।
तेंचि कर्म अन्याधिकारें । दुःख दुर्धर भोगवी ॥ २१-३८

याचप्रमाणें

गजाचें आभरण । भूषण गाढवासी नव्हे । २१-३९

*　　*　　*

दूध निजांगें गोड । परी ज्वरिता कडू विख ॥

*　　*　　*

ब्राह्मणीं विहित मंत्रपठन । शूद्रासी जाण तो दोष ।

*　　*　　*

करितां स्वधर्मानुष्ठान । रज तम नासती जाण ।
शुद्ध सत्त्व अंतःकरण । तेथें माझें ज्ञान प्रकाशे ॥

मुळांत नामरूप भेद कांहीं नसतां लोकहितार्थच ही वैदिक धर्मरचना आहे, पहा.

नाहीं नाम रूप गुण कर्म । ऐसे जे केवळ सम ।
तेथें माझेनि वेदें विषम । केलें निरुपम नाम हितार्थ ॥ २१-६५
तळीं पृथ्वीवरी गगन । पहातां दोन्ही समान ।
तेथ दशदिशा कल्पिल्या जाण । देशान्तर गमन सिद्धर्थ ॥ २१-६६

कारण,

रूप नाम आश्रम वर्ण । वेदू नेमिता ना आपण ।
तैं व्यवहारु न पडतां जाण । मोक्ष साधन तैं कैचें ॥ २१-६९
केवळ स्वधर्म कर्म सांडितां । अंगीं आदळे पाखंडता ।
तेथेंहि मोक्ष न ये हातां । निज स्वार्था नागवले ॥ २१-६२

तात्पर्य,

प्राणी पावावया कल्याण । हें वेदोक्त स्वधर्माचरण ।
विषय त्यागालागीं जाण । केलें निरूपण गुण दोष ॥ २१-२०६

म्हणून,

**आश्रम धर्म विधि विधान । तेथ अधिकारी द्विजन्म जन ।**
**त्यासी कर्मबाधा अति गहन । गुंतले ब्राह्मण कर्मठत्वें ।। २७-२७**
**वेदोक्त आचरावें कर्म । निःशेष त्यागावें निषिद्ध काम्य । २७-९१**
**वेदोक्त सांडणें स्वधर्म । हाचि मुख्यत्वें अति अधर्म ।**
**हातां आलिया परब्रह्म । न त्यागितां कर्म स्वयें राहे ।। २७-९२**

ज्ञानी पुरुषहि कर्म टाकीत नाहीं, तर कर्मच त्याला सोडून जातें. कारण कर्मांचा मूळ आधार जो संकल्प तोच तेथें नष्ट झालेला असतो.

**न कर्माणि त्यजेद्योगी कर्मभिस्त्यज्यते ह्यसौ ।**
**कर्मणो मूलभूतस्य संकल्पस्यैव नाशतः ।।**

सारांश, आत्मज्ञानी पुरुष वर्णाश्रममर्यादेच्या पलीकडे गेलेला असा एखादा असतो. पण बाकीच्या सर्वांनीं स्वधर्ममर्यादा पाळलीच पाहिजे यावर नाथांचा कटाक्ष आहे. नाथांना ही वर्णाश्रमाची चौकट हवी होती, जाचत नव्हती हें यावरून सिद्ध होतें.

## नाथ आणि साम्यवाद

याचप्रमाणें ज्याअर्थीं आत्मसाक्षात्कारी व भगवद्भक्त सर्वत्र समदृष्टीचा असतो त्याअर्थीं नाथहि आधुनिक साम्यवादाचेच पोटांतून चहाते होते असा समज होतो. पण 'समदृष्टि' या शब्दाचा अर्थ काय ? भगवद्गीतेमधील

**शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः ।**

या वाक्याचा अनेकांनीं विपर्यास केलेला आहे. कारण सम शब्दाचा अर्थ 'समसमान–एक सारखेच' असा नसून गीताच त्याचा अर्थ लगेच स्पष्ट करते कीं,

**निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ।**

सम म्हणजे ब्रह्म. तद्वत् येथेंहि पूर्वपक्षांत जें नाथांचें वाक्य साम्यवादसमर्थक दिलें आहे, त्यांत

**श्वपच व द्विजन्म समान । हरिरूपें जाण भक्त देखे ।।**

असे शब्द आहेत. त्याअर्थी हरि-ब्रह्मरूपानें ' भक्त ' सर्वांना पाहातो असा त्यांचा भावार्थ उघड आहे. तसेंच 'श्वपच आणि ब्राह्मण' मूळचे 'अतिभेदें विषम', पण

**आत्मदृष्टीं पाहतां दोघे समान चिद्रूप ।**

सोन्याचा विष्णु व सोन्याचाच कुत्रा आकारानें विषम नाहींत असें म्हणतां येत नाहीं. पण विकायला गेलों म्हणजे जसें तें सर्व सोनें एका मोलाचें, तद्वत् 'आत्मत्व' या स्वरूपामध्यें 'निंद्य वंद्य' असें कांहीं नाहीं. ते अर्थात्च आत्मदृष्टीच्या लोकांनाच ना ! पण ती दृष्टि ज्यांना नाहीं त्यांना व्यवहार करतांना भेद मानावाच लागतो ना ! नाहींतर साखरेचेंच कुत्रें व कोंबडें करून वाढलें तर संन्याशाला वाईट कां वाटतें ? शेवटीं दिलेली ओवी तर आत्मज्ञानी देखील आपला 'वर्णाश्रम' व्यवहार पाळतो हेंच उलट सिद्ध करते. कारण त्यांत

**स्वकर्म-धर्म-वर्णाचार । करिताहि निज व्यवहार ।**

भक्त साचार सर्वांभूतीं मदाकार-परमात्माकार पहातो व तोच मला प्रिय होतो. म्हणजे

**पण्डिताः समदर्शिनः न तु समवर्तिनः ।**

पंडित समदर्शी असतात, वागतांना मात्र ज्याचे त्याचे भेद पाळूनच वागतात, असा अर्थ स्पष्टच दिसत नाहीं काय ?

यावरून वर्ण आहेत, आश्रम आहेत, त्यांचे कांहीं धर्म, आचार ठराविक आहेत. ते कल्पादिपासून असल्यामुळें केवळ पोथीजात असे नसून ईश्वरकृत आहेत एवढें दिसून आलें. आतां ते गुणकर्मतः आहेत का जन्मजात आहेत याचा नाथ-वचनानुसार विचार करूं.

## चातुर्वर्ण्य गुणतः का जन्मतः

जसजसा सत्त्व गुण वाढेल तसतसा मनुष्य उच्च उच्च वर्णाचा होतो असें दिसतें. असें करतां करतां मनुष्य शुद्ध सत्त्वप्रधान झाला कीं मुक्त होतो पहा.

**सांडूनिया अभिमान । सर्व जीवासी सर्वदा लीन ।**
**या नांवें मद्धर्म जाण । शुद्ध लक्षण हें धर्माचें ॥**

याशिवाय गुणानुरूप वर्ण-परिवर्तन सुचविणारीं पुढील प्रमाणें पहा.

ज्यासी म्हणती नीचवर्ण । स्त्रीशूद्रादि हीन जन ।
ज्यासी दूरी शास्त्रश्रवण । ज्यासी दूरी श्रवण वेदोक्त ॥ ५-७३
त्यासी झाल्या सद्भावपूर्ण । ते होत कां हीन जन ।
परी संतकृपेसी आयतन । विश्वासें पूर्ण अधिकार झाला ॥ ५-७४
अज्ञान जे नीचवर्ण । भावें धरोनि संतचरण ।
निज विश्वासें पूर्ण । जन्म मरण निरसिती ॥ ५-७७

म्हणजे हीन कर्मी-वर्णी लोकहि सद्भावना व सत्संग यांच्या योगानें अधिकारी बनतात. ते तेव्हां हीन रहात नाहींत, इतकेंच काय पण

वैश्य शूद्र स्त्रियादि समस्त । पावले मातें सत्संगें ॥ १२-६६
जे सकळ वर्णधर्मावेगळे । ज्यांच्या नांवास कोणी नातळे ।
छाया देखोनि जग पळे । अत्यंत मैले अत्यंज ॥
तिहीं धरोनि सत्संगति । आले माझिया पदाप्रति ।
देव द्विज तयाते वंदिती । अभिनव कीर्ति संतांची ॥

ए. भा. १२-६८

बहवो मत्पदं प्राप्तास्त्वाष्ट्रकाया धवादयः ।
वृषपर्वा बलिर्बाणो मयश्चाथ बिभीषणः ॥
व्याधः कुब्जा व्रजे गोप्यो यज्ञपत्न्यस्तथापरे ।

ही सर्व मंडळी

जीवित्वें मीनालिया मजप्रति । सायुज्य मुक्ति पावली ॥

ए. भा. १२-१०२

यावरून भक्तिमार्गानें सर्वांना उद्धार करून घेतां येतो. देवब्राह्मणांना तो वंद्य होतो, हीच संतांची कामगिरी. तात्पर्य, नीचानें कायमचें नीचच रहावें, असा नियम नाहीं. अर्थात् तो परिवर्तनक्षम आहे. यावरून नाथ वर्णपरिवर्तनवादी होते कां ? या दृष्टीनें थोडा विचार करूं.

वरील सर्व वचनें मोघम आहेत. त्यांत वर्णामध्यें बदल होऊन शूद्राचा ब्राह्मण किंवा ब्राह्मणाचा शूद्र बनतो, असा स्पष्ट उल्लेख नाहीं. सत्संगतीनें, सद्भावनेनें व भक्तिभावानें सर्व थरांतील लोक विशेषतः नीचवर्णी लोकहि उद्धरून

जातात. मग उच्चवर्णीय जन उद्धार पावतील, हें काय सांगायला पाहिजे? अशा कैमुतिक न्यायानेंच सांगण्याचा उद्देश या वचनांतून दिसून येतो. कारण ज्यांच्या सावलीलाहि लोक उभे रहात नाहींत असें म्हणून त्यांची अस्पृश्यता नाथांनीं उल्लेखिली आहे, ते देव द्विजवंद्य झाले तरी त्यांची अस्पृशता जाते असें सांगितलें नाहीं. किंबहुना पुष्कळ लोक माझ्या पदाला पावले असें सांगतांनाहि ते राक्षसाचे ब्राह्मण बनले असें सांगितलें नाहीं. ते ज्या जातीचे होते त्याच जातीचे शेवटपर्यंत राहिले असें म्हणावें लागते.

याच्या उलट मात्र पुष्कळ वचनें आहेत कीं ज्यावरून वर्णाचें अपरिवर्तनीय स्वरूपच सिद्ध होतें पहा.

**पहातां केवळ जडमूढ । रजतमोयोनि जन्मले शूद्र ।**

ए. भा. १२-६४

म्हणजे रजोगुणी, तमोगुणी योनीच आहेत व तेथें जन्मतात ते शूद्र. याचप्रमाणें ब्राह्मणादि चारी वर्णांच्या मूळ प्रकृतिच आहेत.

**जैसे जन्म जैसें स्थान । त्या वर्णाश्रमामाजी तैसे गुण ।**
**उत्तमीं उत्तमत्व जाण । नीचीं नीचपण सहजचि ॥**
**तेचि ब्राह्मणादि चारी वर्ण । त्यांचें प्रकृतीचें लक्षण ।**
**वेगवेगळे जाण । स्वयें नारायण सांगतसे ॥**
**उद्धवासि म्हणे श्रीकृष्ण । ब्राह्मण प्रकृति दशलक्षण ।**

ए. भा. १७-८१, ८३, ८४

**शमो दमस्तपः शौचं सन्तोषः शान्तिरार्जवम् ।**
**मद्भक्तिश्च दया सत्यं ब्रह्मप्रकृतयस्त्विमाः ॥** १७-१५

यापेक्षां स्पष्ट उल्लेख काय पाहिजे? याचप्रमाणें क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अतिशूद्र यांचे प्रकृतिसिद्ध कांहीं गुण आहेत. तसेंच कांहीं धर्म सार्ववर्णिकहि सांगितले आहेत. त्यावरूनहि वर्णांचें स्वरूप जन्मासिद्ध आहे हें दिसून येतें. मूळ श्लोकच स्पष्ट आहेत. म्हणून त्यावरील सविस्तर नाथांचें विवरण न देतां ते श्लोकच पाहूं.

**तेजो बलं धृतिः शौर्यं तितीक्षौदार्यमुद्यमः ।**
**स्थैर्यं ब्रह्मण्यतैश्वर्यं क्षत्र प्रकृत यस्त्विमाः ॥** १७-१६

आस्तिक्यं दाननिष्ठा च ह्यदम्भो ब्रह्मसेवनम् ।
अतुष्टिरर्थोपचयैर्वैश्य प्रकृत यस्त्विमाः ।। १७-१७
शुश्रूषणं द्विजगवां देवानां चाप्यमायया ।
तत्र लभ्येन सन्तोषः शूद्र प्रकृत यस्त्विमाः ।। १७-१८
अशौचमनृतं स्तेयं नास्तिक्यं शुष्क विग्रहः ।
कामः क्रोधश्च तर्षश्च स्वभावोऽन्तेवसायिनाम् ।। १७-१९
अहिंसा सत्यमस्तेयमकामक्रोधलोभता ।
भूतप्रियहितेहा च धर्मोऽयं सार्ववर्णिकः ।। १७-७१

येथील प्रकृति म्हणजेच स्वभाव. कारण येथेंच तीन ठिकाणीं प्रकृति शब्द घालून त्याच अर्थीं स्वभाव शब्द योजलेला स्पष्ट आहे. आणि स्वभाव म्हणजे

हेत्वंतरानपेक्षो वस्तुधर्मविशेषः स्वभावः ।

हे स्वाभाविक निजलक्षण 'अकृत्रिमस्थिति' असे नाथांचे शब्द आहेत.

कोणत्याहि इतर कारणावांचून वस्तूचा जो जन्मसिद्ध गुण, तोच स्वभाव म्हणून आपण व्यवहारांतहि बोलतो.

यावरील नाथांचें व्याख्यान जिज्ञासूंनीं मुळांतूनच अवश्य पहाण्यासारखें आहे. त्यांतील महत्त्वाचे शब्द लक्षांत घेण्यासारखे आहेत.

ब्राह्मणप्रकृतीचे क्षितीं । या दश लक्षणाची उत्पत्ति ।
स्वाभाविक सहजगति । अकृत्रिम स्थिति उद्धवा ।। १७-१३५
वर्णाश्रमाहूनि जाण । केवळ अंत्यजादि जे जन ।
त्यांचें प्रकृतीचें लक्षण । स्वयें नारायण सांगत ।। १७-१९६
यापरि गा अशौचता । ज्याचें अंगीं स्वभावता ।
तो जाण पा तत्त्वतां । गुण प्रथमता अंत्यजाचा ।। १७-२०४
जो सर्व वर्णांचा सहजधर्म । जेणें पाविजे परब्रह्म ।। १७-२३३
चातुर्वर्ण्य स्वभाव प्रकृति । सर्व वर्णांची लक्षणस्थिति ।
सर्व वर्णांची स्वधर्म गति । तें म्यां तुजप्रति सांगितली ।। १७-२६५

मात्र हा जन्मसिद्ध वर्ण किंवा त्याचे गुण कोणत्याहि जातीच्या उद्धाराला आडवे येत नाहींत. कारण 'जडमूढ'हि

सत्संगति लागोनि दृढ । मातें सदृढ पावले ।

सत्संगति, भक्ति सर्वांची उद्धारक आहे. मानवांना हे भिन्न भिन्न धर्म त्या त्या स्थितींतून अशा प्रकारे सर्वांचा उद्धार व्हावा, यासाठींच आहेत. अशा प्रकारें जन्मजात वर्णाश्रमाचें नाथांनीं सुंदर समर्थन केलें आहे. (पहा–ए.भा. २०–११४, ३२३, ३२६, ३२८ ते ३३१; २१–४६, ७६, १०९)

याप्रमाणें वर्णधर्माचें स्वरूप श्रीनाथांनीं दाखविलें तें पाहिलें. आश्रमधर्म आतां पाहूं.

## आश्रमधर्म

परमात्मा गोपाळकृष्ण चारी आश्रमाची साकार मूर्तीच होती.

**चहूं आश्रमा प्रकाशकू । त्रिलोकीं कृष्ण गृहस्थ एकू ।**
**तोचि ब्रह्मचारी निष्टंकू । अति नेटकू संन्यासी ।।** १–२९६

भगवंताचें ब्रह्मचर्य एवढ्या स्त्रिया होत्या तरी निष्टंकू आहे. साऱ्या त्रैलोक्याचा संसार करणारा त्याच्यासारखा गृहस्थाश्रमी दुसरा कोण आहे? आसक्तीचा त्याग करण्यासाठीं ही आश्रमव्यवस्था आहे. तो नेटका संन्यास त्याच्याइतका इतरत्र कोठें आढळेल? जरी त्यानें दंड कमंडलु हातीं घेतलें नसलें तरी,

**श्रीकृष्णाचा स्मरतां काम । स्वयें संन्यासी होती निष्काम ।।**

असा भगवान् कृष्ण संन्यासाश्रमाचा आदर्शच नव्हे काय? आश्रमव्यवस्थेचें हें रहस्य लक्षांत घेऊनहि व्यावहारिक आश्रमव्यवस्था वर्णविशेषावरच अवलंबून आहे हें नाथांनीं स्पष्ट केलें आहे.

**ब्रह्मचर्य आणि गृहस्थ । तिन्ही वर्णा अवश्य प्राप्त ।**
**चहूं आश्रमा आश्रयभूत । जाण निश्चित ब्राह्मण ।।**

वर्णांमध्यें ज्याप्रमाणें ब्राह्मण उत्तम, तसा आश्रमांमध्यें संन्यास सर्वश्रेष्ठ आहे.

**चतुराश्रमी संन्यास जाण । तो मी म्हणे नारायण ।**
**वर्णाग्रज जे ब्राह्मण । ते मी ब्रह्म जाण ब्रह्मत्वें ।।** १६-१००

सर्व आश्रमांचा तर तम दृष्टीनें श्रेष्ठ कनिष्ठ भाव पुढील रूपकावरून ध्यानीं येतो.

गार्हस्थ्य पुरुषांच्या चरणीं । ब्रह्मचर्य हृदयस्थानीं ।
वक्षःस्थळीं वसती वनीं । शिरोमणि संन्यास ॥ ५-५१

म्हणजे संन्यास हा समाजनियमनाचें परम साध्य आहे. अर्थात् सर्व आश्रमांचें उद्दिष्ट हेंच आहे कीं बाळपणापासून संयमी वृत्ति ठेवून व्रतस्थ राहून अभ्यास करावा. तरुणपणींहि नियमितपणेंच परमार्थप्राप्तीचें साधन म्हणून गृहस्थाश्रम स्वीकारावा. त्यानंतर जेव्हां स्त्रीविषयक वासना विचारानें आवडेनाशीं होईल पण वैराग्य तीव्र नसेल तेव्हां वानप्रस्थाश्रम स्वीकारावा. आणि पूर्ण वैराग्य ज्या क्षणीं होईल, त्या क्षणीं सर्वकर्मसंन्यास करून ईश्वरप्राप्तीकडे सर्व मन लावावें. हा आश्रमव्यवस्थेचा उद्देश नाथांच्या अनेक वचनांवरून स्पष्ट होत आहे.

वेद निवृत्तिपर जाण । त्यागरूपें आपण भोगाते नेमी ॥ ५-२३०
आत्मा वै पुत्रनामासी । पुत्र झालिया स्त्रियेशीं ।
संग करूं नये स्त्रीपाशीं । शनैः शनैः विषयाशीं त्यागवी ॥
ए. भा. ५-५३१

पाडून कुटुंबासी लंघन । सर्व द्रव्य वेंचून जाण ।
करूं नये यज्ञाचरण । अधर्मपण तेथेंहि । १७-४८७

न धरितां कर्माभिमान । शुद्ध द्रव्य जोडिल्या जाण ।
करावें यज्ञाचरण । हें स्वधर्मचरण गृहस्थाचें ॥ १७-४८९

ऐसेनि विवेकें विवेकवंता । कदा न बाधी मोह ममता ।
अतिथीच्या परी सर्वथा । अनासक्तता गृहवासी ॥ १७-५०१

*　　*　　*

तेथें (गृहस्थाश्रमीं) स्वधर्में विषया सेविता । दृढ साधावी विरक्तता ।
तेथेंहि वैराग्य न ये हातां । तरी वानप्रस्थाश्रमी व्हावे ॥ १७-३८५

स्त्रीकामु तरी नावडे । विवेक वैराग्य थोडें ।
तेणें वानप्रस्थाश्रमाकडे । निघावे रोकडे तात्काळ ॥ १७-३७५

सर्व आश्रम सर्व वर्ण । त्यासी हाचि स्वधर्म जाण ।
सांडूनिया विषयाचें भान । माझें भजन करावें ॥ १८-३२१

**जो विवेकतेजें दीप्तिमंत । ज्यासी सदा वैराग्य धडधडीत ।**
**जो सर्वार्थी दिसे विरक्त । त्यासीच निश्चित संन्यास ॥**
**मुख्यत्वें ज्यासी ब्राह्मणधर्म । त्यासीच बोलला चतुर्थाश्रम ।**
**वैश्य क्षत्रिया नेम । संन्यास नाहीं** ॥ ए. भा. १७-३७६, ७७

उपजीविकेचें साधन बदललें तरी ब्राह्मण कर्मतः क्षत्रिय, वैश्य, शूद्र होतो. पण वर्णानें तो ब्राह्मणच असतो. त्याअर्थी जन्मावरूनच वर्णनिश्चय नाथसंमत होता. तसेंच केवढेंहि वैराग्य आलें तरी क्षत्रिय त्या सात्त्विक वृत्तीमुळें संन्यास ग्रहण करूं शकत नाहीं. या म्हणण्यावरून गुण बदलण्यानें वर्ण पालटत नाहीं, हेंच दिसून येतें.

या सर्व आश्रमधर्मांच्या विवेचनावरून विषयनिवृत्ति व तद्वारां आध्यात्मिक उत्कर्ष हेंच सामाजिक व्यवस्थेचें साध्य नाथांनीं आपल्या डोळ्यापुढें ठेवलें होतें असें उघड दिसतें. भौतिकसाधनपरतंत्र समाज असमाधानी असतो. मग त्याला साधनानुकूलता कितीहि मोठ्या प्रमाणांत असो. याच्या उलट आत्मज्ञानप्रवण मनुष्य व्यावहारिकदृष्ट्या संपन्न नसला तरी '**कौपीनवंतः खलु भाग्यवंतः ।**' असें आचार्य म्हणतात त्याप्रमाणें कसल्याहि स्थितींत सुख, स्वास्थ्य भोगूं शकतो.

## नाथकालीन वर्णाश्रमस्थिति

आतांपर्यंत आपण नाथभागवताचें या दृष्टीनें परिशीलन केलें. त्यावरून त्याकाळीं वर्णाश्रमस्थिति कशी व्यक्त होते तें थोडक्यांत पाहून हा विषय संपवूं. नाथांचे काळीं वर्णाश्रमव्यवस्था जन्माधिष्ठितच मानली जात असे यांत शंका नाहीं. स्पृश्यास्पृश्यतेची बंधनेंहि कडक पाळलीं जात, हें "**छाया देखोनि जन नातळे** !" इत्यादि ओंव्यावरून दिसून येतें. ब्राह्मणधर्माचें सर्वश्रेष्ठत्व त्यांनाहि मान्य होतें. पण त्यांनीं ठिकाठिकाणीं ब्राह्मणावर जे कोरडे ओढले आहेत, त्यावरून वर्णव्यवस्था मोडकळीस आलेली होती, हें स्पष्ट दिसतें. केवळ जन्माभिमान माथा घेऊन अहंकारांतच शास्त्ररहस्य किंवा भगवत्परायणता संपादन न करतां ते आपला व समाजाचा घात करतात, याबद्दल नाथांनीं तळमळ व्यक्त केली आहे. वस्तुतः ही जबाबदारी मुख्यतः याच वर्गावर पडते. म्हणून त्यांच्याकडेच हा अव्यवस्थेचा दोष येतो.

## उपसंहार

तात्पर्य, नाथभागवताचें आमूलाग्र अवलोकन केलें असतां त्यांच्या मताचा हा निष्कर्ष आपल्या पदरीं पडतो कीं,

( १ ) वर्णाश्रमव्यवस्था जन्मजात आनुवंशिकतेवर अवलंबून आहे.

( २ ) ती लोककल्याणार्थ निर्माण झालेली असून तिच्यामुळेंच समाजांतील स्वैराचाराला आळा बसून लोकांचा उद्धार होतो.

( ३ ) स्ववर्णाचेंच आचरण प्रत्येकानें केलें पाहिजे तरच देवाची भक्ति सफल होते. त्यायोगानेंच सर्वांना आपला उद्धार करून घेता येतो.

( ४ ) आश्रमव्यवस्था मनुष्याला अध्यात्मप्रवण करण्यासाठींच आहे.

( ५ ) **'वर्णाश्रमधर्म जाति कुळगोत । एकाकारी होत आत्मतत्त्वीं ॥'** असा आत्मतत्त्वसाक्षात्कार हें सर्वांचें परम साध्य आहे.

---

## भागवताची अवीट गोडी

**बाळकाहातीं दिधल्या फळा । खावें हें न कळे त्या अबळा ।**
**त्याचें मुखीं घालूनि गळाळा । गोडीचा जिव्हाळा जनक दावी ॥**
**गोडी लागल्या बाळकासी । तेंचि फळ खाय अहर्निशीं ।**
**तेंवि जनार्दनें आम्हांसीं । गोडी श्रीभागवतासी लाविली ॥**
**ऐशी लाविली गोडी चढोवढी । तेणें झाली नवल परवडी ।**
**मज सांडितांहि ते गोडी । गोडी न सोडी मजलागीं ॥**
**ते गोडीनें गिळिलें मातें । मीपण गेलें गोडी आंतौतें ।**
**ते गोडीचें उधळलें भरितें । सबाह्य रितें उरो नेदी ॥**
**हें शुकमुखींचें श्रेष्ठ फळ । गोडीपणें अतिरसाळ ।**
**त्वचा आंठोळीवीण केवळ । गोडीच सकळ फळरूपें ॥**

ना. भा. १५-२० ते २४

---

## भागवत प्राकृत झालें तरी तें निजज्ञानाचा ठेवाच आहे.

१

जरी सोन्याचें पेंडुकें केलें । तरी तें दगडमोला नाहीं आलें ।
तैसें भागवत प्राकृत जालें । परि नाहीं चुकलें निजज्ञाना ॥
मुक्ताफळालागीं सागरीं । बुडया देती नानापरी ।
तें सांपडलियां घरींच्यां विहिरीं । जो अव्हेरी तो मूर्ख ॥
धनवंतु रत्नपारखी पुरा । तेणें धुळीमाजीं देखिल्या हिरा ।
गांठीं बांधोनि आणी घरा । पारखी खरा निजज्ञानें ॥
तैसें ज्ञात विद्वज्जन । ग्रंथु मराठी देखोन ।
उपेक्षा न करितां करावा यत्न । पारखोनि चिद्रत्न साधावया ॥

ना. भा. ९-४९५, ९६, ९८, ९९

२

संस्कृत वंद्य प्राकृत निंद्य । हे बोल काय होती शुद्ध ।
हाहि अभिमान वाद । अहंता अशुद्ध परमार्थी ॥
मोलें भूमी खणतां वैरागरी । अवचटें अनर्घ्य रत्न लाभे करीं ।
तें रत्न सांपडल्या केरीं । काय चतुरीं सांडावें ॥
तेविं संस्कृत आटाटी । सहसा परमार्थी नव्हे भेटी ।
तेचि जोडिल्या मराठीसाठीं । तेथें घालती मिठी सज्ञान ॥
जो जो भाषा अभिमान । तो तो वक्त्यासी बाधक पूर्ण ।
ज्या भाषा केलें ब्रह्मकथन । तें होय पावन हरिचरणीं ॥
महारायाच्या ताटापाशीं । रिगमु नाहीं समर्थासी ।
तेथें सुखेसी बैसे माशी । तेविं हा आम्हांसी प्राकृत ग्रंथ ॥

ना. भा. २९-१०२५, २६, २७, ३२, ३८

# नाथभागवतांतील नैतिक मूल्यें

: लेखक :

श्री. भा. पं. बहिरट, एम्. ए., पंढरपूर

मानवी जीवन ही परमेश्वरानें मनुष्यास दिलेली मौल्यवान अशी देणगी आहे. देणारानें देणगी दिली पण तिचें महत्त्व ओळखून तिचा योग्य अगर अयोग्य उपयोग करणें मनुष्याचें हातीं आहे. या देणगीचा योग्य उपयोग कसा करावा यासाठीं संतवाङ्मय निर्माण झालेलें आहे. संतवाङ्मयांत एकनाथी भागवत हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे. सुबोध, प्रांजळ, स्पष्ट आणि गोड मराठींत रचना करून नाथांनीं आबालवृद्धांना सन्मार्ग दाखविण्याचें कार्य उत्कृष्टरीतीनें केलें आहे. अशा या थोर ग्रंथांतून नाथांनीं मानवी जीवनांतील नैतिक मूल्याबद्दल जी विचारसरणी विशद केली आहे, तिचें विवरण करणें हा प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे.

या विवरणांतील मुद्दे पुढीलप्रमाणें आहेत—

( १ ) जीवन मूल्यांचे प्रकार

( २ ) त्यांच्या महत्त्वमापनाची कसोटी

( ३ ) तीन पक्ष—सुखवाद, विकासवाद, पूर्णतावाद

( ४ ) नाथभागवताचा दृष्टिकोन

( ५ ) नैतिक मूल्यांचें अधिष्ठान व फळ

याप्रमाणें या पांच गोष्टींचा विचार करून नाथांचा निष्कर्ष काय आहे हें त्यांच्या भागवत ग्रंथाधारें पहावयाचें आहे.

## ( १ ) जीवन मूल्यांचे प्रकार

नैतिक मूल्यें हीं मानवी जीवनांत जीं अनेक मूल्यें आहेत त्यापैकीं एक प्रकारची होत. तेव्हां नैतिक मूल्यांच्या स्वरूपाकडे वळण्यापूर्वी एकंदर मूल्यें पहाणें आवश्यक आहे. जी गोष्ट चांगली अगर उपयुक्त आहे तिला आपण मूल्यवान् म्हणतो व जी वाईट अगर निरुपयोगी आहे ती बिनमोलाची आहे असें मानतो.

मानवी जीवनाचें निरीक्षण केल्यास अशा तऱ्हेच्या मूल्यवान् गोष्टी अगर मूल्यें यांचे स्थूल मानानें आठ प्रकार दृष्टीस पडतात.

(१) **शारीरिक मूल्यें** :–शरीराची सुस्थिति ही सर्व इतर गोष्टींचें मूळ आहे. नरदेहाचें मूल्य नाथांनीं वर्णिलें आहे,

**नरदेह परम पावन । जो भक्तिज्ञानाचें आयतन ।**
**जेणें साधे ब्रह्मज्ञान । तो धन्य नरदेह ॥**

ए. भा. २०-१२७

शरीर हें श्रेष्ठ जीवन मूल्यांचें अत्यावश्यक असें साधन आहे.

(२) **अर्थविषयक मूल्यें** :–उत्तम जीवन जगण्यास शरीराप्रमाणेंच अर्थ अथवा धन उपयुक्त आहे. अर्थाचा दुरुपयोगहि होऊं शकतो. म्हणून तसें घडल्यास अर्थाचा अनर्थ होतो. या दृष्टीनें नाथांनीं "**यासी नाममात्र हा अर्थ । येऱ्हवीं मूर्तिमंत अनर्थ** ॥" ( २३-३४६ ) असें म्हटलें आहे व या अनर्थांची यादीहि दिली आहे.

**पुसाल अर्थींचे अनर्थ । ते सांगतां असंख्य अनंत ।**
**संक्षेपें सांगेन येथ । पंधरा अनर्थ अर्थासी ॥**

ए. भा. २३-२०४

असें म्हणून त्यांनीं चोरी, हिंसा, असत्य, दंभ, काम, क्रोध, गर्व, अविश्वास, स्पर्धा इत्यादिकांचें वर्णन केलें आहे. परंतु सदुपयोग केल्यास अर्थानेंच अनर्थ न घडतां परमार्थप्राप्ति होते असें म्हटलें आहे.

**दैवें जोडली जे संपत्ति । ते वेचोनि ऐशा निगुती ।**
**अर्थें परमार्थ प्राप्ती । सभाग्य लाहती निजनिष्ठा ॥**

ए. भा. २३-४०६

धनाच्या योग्य उपयोगानें मनुष्य भवाब्धी पार होऊं शकतो.

**जेणें वित्तें जीवितें साचार । भूतदया परोपकार ।**
**करूनियां विवेकी नर । भवाब्धि परपार पावले ॥**

ए. भा. २३-४१४

(३) **क्रीडाविषयक मूल्यें** :– निरनिराळे खेळ खेळण्यानें खेळकरपणा अंगीं येतो. संतांनीं देवाशीं खेळकरपणा वापरला व त्याचें सख्यत्व अनुभविलें. नाथांनीं अशा खेळकरपणानें देवाला प्रिय बनलेल्या गोपाळांना गौरविलें आहे.

**जाण पां अविवेकी केवळ । गौळी गोधनें गोपाळ ।**
**तेही उद्धरिले सकळ । श्रीकृष्ण सखे प्रबळ अनन्य प्रीती ।।**

ए. भा. २-३१४

(४) **सामाजिक मूल्यें**:—व्यक्तीव्यक्तींत अगर समाजासमाजांत स्नेह वाढण्याचा समावेश या मूल्यांत होतो. भगवंताची फलश्रुति सांगतांना नाथ म्हणतात,

**ये ग्रंथीं ज्या अनन्य प्रीति । निंदा द्वेष नुपजे चित्तीं ।।**

ए. भा. ३१-४३

समाजांत निंदा व द्वेष याचें निर्मूलन म्हणजे परस्पर मैत्री व सहकार्याचा पायाच होय. त्याचप्रमाणें,

**सर्व भूतीं भगवंत पाही । भूतें भगवंताचे ठायीं ।।**

ए. भा. २-६४४

हें एकनाथी भागवताचें सूत्रच असून या मैत्रीच्या योग्य विकासास सहाय्यभूत आहे.

(५) **बौद्धिक मूल्यें** :—खरें खोटें पारखतां येणें हें बुद्धीचें कार्य आहे. तें कार्य योग्य प्रकारे पार पडण्यास मानवी जीवनांत मोलाचें स्थान आहे. हीच विवेकयुक्त सारग्राहकता होय.

**भेसळल्या क्षीरनीरासी । निवडूनि घेइजे राजहंसी ।**
**तैसा विवेकयुक्त मानसी । स्वरभागासी घेतसे ।।**

ए. भा. ८-१०४

(६) **सौंदर्यविषयक मूल्यें** :—जगांत जें जें सुंदर आहे, त्याबद्दल सदभिरुचीस धरून रसिकता असणें. संतांच्या दृष्टीनें परमेश्वर हा सर्व सुंदरांचा सुंदर आहे.

**त्रिलोकींचें बरवेपण । भुलोनि कृष्णापाशीं आलें जाण ।**
**ना कृष्णलेशें बरवेपण । शोभे संपूर्ण तिहीं लोकीं ।।**

ए. भा. १-२४३

लेश असणाऱ्या सुंदर वस्तूकडून नाथांनीं लेशी जो परमेश्वर, त्याजकडे जाण्याचा मार्ग सांगितला आहे.

( ७ ) **नैतिक मूल्यें**:—निरनिराळ्या सद्गुणांचा विकास. या विकासास नाथांनीं अत्यंत महत्त्व दिलें आहे. भागवतांत सत्य, अहिंसा, शुचिता, तप, आर्जव, मौन इत्यादि सद्गुणांचें विस्तारानें वर्णन आलें आहे. ( अ. ३, ७, ८, १०,११, १७, १९, २१, २६ )

( ८ ) **धार्मिक मूल्यें** :—परमेश्वराविषयीं निष्ठा, आदर, प्रेम बाळगणें हें नाथांच्या व सर्व संतांच्या दृष्टीनें सर्वश्रेष्ठ मूल्य होय. त्या दृष्टीनें त्यांनीं भक्तीस पंचम पुरुषार्थ म्हणजे चारी पुरुषार्थांपेक्षां थोर मूल्य म्हटलें आहे.

**चहूं पुरुषार्थांचे माथा । भक्ति सर्वथा मज पढियंती ।।**

ए. भा. ११-६६७

## ( २ ) महत्त्वमापनाची कसोटी

वर सांगितल्याप्रमाणें मानवी जीवनांतील निरनिराळ्या प्रकारचीं मूल्यें आहेत. हीं पाहिल्यावर साहजिकच त्यांच्या कमी अधिक महत्त्वाप्रमाणें श्रेणी लावण्याचा प्रश्न उद्भवतो. हीं सारीं मूल्यें एकाच श्रेणीचीं आहेत काय ? किंवा त्यांत कांहीं श्रेष्ठ व कांहीं कनिष्ठ आहेत ? तसें असल्यास सर्वांत महत्त्वाचें मूल्य कोणतें ?

या मूल्यांची कमी अधिक महत्त्वाच्या दृष्टीनें श्रेणी लावण्यासाठीं आपणांस एखादें तत्त्व शोधून काढणें अगत्याचें आहे. प्रत्येक मानवाच्या जीवनांत वर सांगितलेलीं मूल्यें कोणत्यातरी प्रकारच्या श्रेणींत असलेलीं दिसतातच. परंतु महत्त्वाचा प्रश्न, ही श्रेणी योग्य व व्यवस्थित लाविली आहे कीं चुकीची लाविली आहे, हा आहे. ही श्रेणी योग्य तऱ्हेनें लावण्यांतच मानवी जीवनाची थोरवी अवलंबून आहे. मानवी जीवनाची महत्ता जीवन मूल्यांच्या योग्य मांडणींतच आहे. नाथांनीं या दृष्टीनेंच नरदेहाची म्हणजे मानवी जीवनाची थोरवी वर्णिली आहे.

**नरदेह परम पावन । जो भक्तिज्ञानाचें आयतन ।**
**जेणें साधे ब्रह्मज्ञान । तो धन्य नरदेह ।।**

जेणें नरदेहें जाण । निःशेष खुंटे जन्ममरण ।
जेणें जीव पावे समाधान । स्वानंदघन स्वयें होय ।।

ए. भा. २०-१२७, १२८

चहूं पुरुषार्थांचें अधिष्ठान । नरदेह परम पावन ।।

ए. भा. २६-१५९

## तीन पक्ष

जीवन मूल्यांची योग्य मांडणी करणें इष्ट आहे. पण त्यांच्या तारतम्याची अगर श्रेष्ठता व कनिष्ठता याची कसोटी कोणती ? पाश्चात्य नीतिशास्त्रज्ञामध्यें या कसोटीबद्दल प्रमुख अशीं तीन मतें दिसतात. या मतांच्या परीक्षणानें नाथांचा दृष्टिकोन अधिक स्पष्ट दिसण्यास सहाय्य होईल.

**सुखवाद**:–सुख ही मूल्याची श्रेष्ठता व कनिष्ठता यांची कसोटी आहे असें हा पक्ष मानतो. भारतांतील जडवादी चार्वाक, प्राचीन ग्रीक सायरेनिक्स, आधुनिक पाश्चात्य विचारवंतांपैकीं बेंथॅम वगैरेंची ही विचारसरणी आहे. ही कसोटी मान्य केल्यास शारीरिक मूल्यें हींच श्रेष्ठ मानून इतर मूल्यें त्याची साधनें होतील. या मतानें अर्थ व काम हेच खरे पुरुषार्थ होत. ते साधविणारीच नीति व धर्म होय. अशा रीतीनें धर्म आणि नीतीचें स्वरूपच बदलतें. खऱ्या धर्माचा व खऱ्या नीतीचा उपहासच होतो. ही दृष्टि असणारे विषयसुखासच श्रेष्ठ मानून परमार्थाची निंदा करतात, ज्याच्या जीवावर विषय भोगतात त्या परमात्म्याच्या अस्तित्वासच नाकारतात. यांचें वर्णन नाथांनीं केलें आहे.

काय गृहाश्रमीं देव नसे । मग वना धांवताती पिसे ।
साचचि देव वनीं वसे । तरी कां मृग ससे न तरती व्याघ्र ।।

ए. भा. ५-११५

एकांत रहिवास विवरीं । तेथचि भेटतां श्रीहरी ।
तरी न तरोनिया उंदिरीं । कां पां घरोघरीं चिवताती ।। ११७ ।।
देवो सर्वज्ञ चोखडा । तेणें पशु पक्षियांचा केला जोडा ।
तोही लोकीं मानुनिया वेडा । त्यागाचा गाढा पाडिला मोटा ।११८।

**त्याग करोनी भीक मागणें । यापरीस भलें मरणें ।**
**मुक्ती देखिली नाहीं कोणें । आपदा भोगणें जगूं देखे ।। १३१ ।।**
**ऐसी त्यागाची करूनी निंदा । भोग भोगावे म्हणती सदा ।।१३३।।**
**ज्या ईश्वराचेनि वर्तिजती । तो ईश्वरु आहे हे न मानिती ।।१९१।।**

मिल् म्हणतो, "संतुष्ट असें डुक्कर होण्यापेक्षां असंतुष्ट साक्रेटीस झालेले अधिक चांगले." डॉ. रा. द. रानडे यांनीं याच्यापुढें जाऊन मार्मिकपणें म्हटलें आहे कीं "संतुष्ट साक्रेटीस होण्यापेक्षां असंतुष्ट आत्मानुभवी होणें चांगलें."

सुखासुखांत बरेवाईटपणा असतो हें मिल मान्य करतो. हा बरेवाईटपणा समजण्यास त्या सुखाहून निरळया गोष्टीकडे वळणें भाग पडते. स्वतःचा बरेवाईटपणा प्रत्यक्ष तें सुख सांगूं शकत नाहीं, म्हणजे सुख ही सुखाच्या बरेवाईटपणाची वा तारतम्याची कसोटी होऊं शकत नाहीं. मूल्य मापनाच्या कामीं सुखवाद लंगडा पडतो.

**विकासवाद** :–विकासवादाची मूलभूत कल्पना अशी कीं सृष्टींत जीवनकलह चालू असतो. त्यांत समर्थ टिकतात. परिस्थितीस जुळतें घेणें हेंच समर्थपण. तसें न करणारे नाश पावतात. जुळतें घेऊन उरणारे तेच योग्य प्राणी होत. योग्य प्राणी उरण्याची क्रिया म्हणजे निसर्गानें केलेली निवड होय. परंतु मानवी जीवनाचें निरीक्षण केल्यास मनुष्य हा परिस्थितीवर मात करूनच आत्मोन्नति करून घेतो व त्याच्या बाबतींत नैसर्गिक ( Natural ) निवडीहून बुद्धिपुरस्सर ( rational ) निवडच दिसून येते.

विकासवाद हा जीवनकलहांत टिकाव धरून जगण्यास महत्त्व देतो. परंतु नुसत्या जगण्यानें मानवाची परिपूर्णता होत नसून तो उन्नत स्वरूपांत जगला पाहिजे. नुसतें प्राणसंरक्षणाचें मूल्य व नैतिक जीवनाचें मूल्य एक नव्हे. पुष्कळ जीवन ही विकासवादाची कसोटी आहे. पण पुष्कळ जीवन जगण्यापेक्षां तें थोडा काळ कां असेना पण उच्च ध्येयानें प्रेरित व संपन्न होऊन जगणें हेंच श्रेष्ठ होय. या उन्नत स्थितींतील क्षण म्हणजेच खरें जीवन होय. या दृष्टीनें नाथांनीं भक्ताचें वर्णन करतांना हरिप्रेमाच्या अनुभूतीच्या क्षणावरून तो त्रिभुवनसंपत्तीहि ओवाळून टाकतो, असें म्हटलें आहे.

**हरिचरणीं अपरोक्ष स्थिती । तेथील क्षणार्धाची जे प्राप्ती ।**
**त्यापुढें त्रिभुवन विभव संपत्ती । भक्त मानिती तृणप्राय ।।**

ए. भा. २-७४७

तेव्हां विकासवाद्यांनीं मांडलेली निरनिराळ्या मूल्यांच्या तरतमभावासंबंधीं पुरस्कारलेली केवळ जीवन वैपुल्याची कसोटी अपूरीच पडते.

**पूर्णतावाद** :–संपूर्ण मानवी जीवनाचा व त्याच्या वैशिष्ट्याचा विचार करून त्या वैशिष्ट्याची पूर्तता कशांत आहे हें पूर्णतावाद पहातो व त्यावरून जीवन मूल्यांचा तरतमभाव ठरवितो. विवेकबुद्धि व आध्यात्मिकता हें मनुष्याचें वैशिष्ट्य आहे. स्वतःचें जीवन व बुद्धि यांचें उगमस्थान ज्यापासून आहे, त्या परमेश्वराचें ज्ञान करून घेण्यांतच मानवाचें अंतिम कल्याण आहे, असें थॉमस ॲक्विनासनें म्हटलें आहे.

( The good of man consists in the perfection of his rational or spiritual nature and ultimately in the beautific vision of God from whom his being and reason are derived.)

नाथांनीं हीच गोष्ट सांगितली आहे.

**आहार निद्रा भय मैथुन । सर्वा योनीसी समसमान ।**
**मनुष्य देहीचें ज्ञान । अधिक जाण सर्वांसी ।।**
**देखोनि मनुष्य देहासी । सुख झालें भगवंतासी ।**
**अधिकार ब्रह्मज्ञानासी । येणें देहेसी मत्प्राप्ती ।।**
**पावोनिया मनुष्यपणा । जो न साधी ब्रह्मज्ञाना ।**
**दाढीचा मेंढा जाणा । विषयाचरणा विचरतु ।।**
**मनुष्य देहीचेनि ज्ञानें । सच्चिदानंद पदवी घेणें ।**
**एवढा अधिकार नारायणें । कृपावलोकनें दीधला ।।**

ए. भा. ९-३२७ ते ३३०

यावरून मानवी जीवनाची परिणति परमेश्वराच्या ज्ञानांत आहे असें म्हणणारा व त्या भूमिकेवरून सर्व मूल्यें पारखणारा पूर्णतावादच मान्य होता हें दिसून येतें.

## (६) नाथांचा दृष्टिकोन

नाथांनीं भागवतांत सर्व मूल्याहून धार्मिक मूल्यास महत्त्व दिलें आहे हें त्याच्या पूर्णतावादी दृष्टिकोनास अनुरूपच आहे. इतर सर्व मूल्यें हीं साधनेंच होत. धार्मिक मूल्यांत परमेश्वराच्या ज्ञानाचा व भक्तीचा समावेश होतो. ज्ञानाचा व भक्तीचा संबंध जिव्हाळ्याचा आहे. भक्तीनें ज्ञान होतें व ज्ञानानें भक्तीचा उल्हास वाढतो.

**ज्ञान साधावयालागीं जाण । कष्टावे न लगे गा आपण ।**
**सप्रेम करितां माझें भजन । दवडितां ज्ञान घर रिघे ॥** २०-१३७
**माझें भक्तीविणें ज्ञान । सर्वथा नुपजे जाण ।** १४-३४३
**नयनीं सूदल्या अंजन । देखे पृथ्वीगर्भींचें निधान ।**
**तेवीं मद्भजनें लाहोनि ज्ञान । चैतन्यघन जीव होय ॥** १४-३४६
**प्रकाशल्या माझें ज्ञान । तेणें उल्हासें माझें भजन ॥** १८-३३५

तेव्हां नाथांच्या दृष्टीनें धार्मिक मूल्यें हीं मानवी जीवनांतील सर्वांत श्रेष्ठ मूल्यें होत. तीं सर्वांनीं जतन केलीं पाहिजेत. इतर मूल्यांना त्या त्या प्रमाणांत महत्त्व असून धार्मिक मूल्यांचें पोषण होईल अशा तऱ्हेनें तीं वापरलीं पाहिजेत. सुरुवातीस जीवन मूल्याचें वर्णन करतांना जीं भागवतांतील अवतरणें दिलीं आहेत, त्यांतच ही गोष्ट ध्वनित होत आहे.

## नैतिक मूल्यें—अधिष्ठान व फळ

भक्ति ही ज्ञानाचीच नव्हे, तर सत्कर्मांच्या द्वारें व्यक्त होणाऱ्या सद्गुणांची माताच आहे.

**तेथ ज्ञानकर्मादिकें जाण । मुख्य वैराग्यही आपण ।**
**मद्भक्तीसी येती लोटांगण । चरणा शरण पै येती ॥**

ए. भा. २०-३८८

**शरण येणें ही कायसी गोठी । केवळ जन्मती भक्तीच्या पोटीं ।**
**मग लडिवाळें घालुनी मिठी । स्वानंदाची गोमटी मागती गोडी ॥**

ए. भा. २०-३९०

भक्ति आपल्या अंकीं घेऊन त्यांना पाजून पुष्ट करते.

**एवं भक्ति आपुलें अंकीं जाण। करी ज्ञानादिकांचें पालन।**
**परमानंद पाजुनी पूर्ण। करी पालन निजांगें।। ३९१**

सर्व सद्गुणांचें जन्मस्थान भक्तीच होय.

**वन उद्यान गंगा जीवन। यास पृथ्वी जेवीं अधिष्ठान।**
**तेवीं सकळ लक्षणांचें जन्मस्थान। माझी भक्ति जाण उद्धवा॥**
**सकळ पिकांचिये प्राप्ती। आधारभूत जेवीं क्षिती।**
**तेवीं सकळ लक्षणा उत्पत्ती। माझिये भक्ती माझारी॥**

ए. भा. १७-११४,११५

जीवनांत भक्तीचा अभाव असल्यास नैतिक मूल्यें ढासळून अधःपात होतो.

**मनुष्य देहीं जे भजन नष्ट। ते होती स्थानभ्रष्ट।**
**अधःपाते भोगिती कष्ट। अति उद्भट वासना॥ ५-६२॥**

दया, आर्जव, शौर्य, निस्पृहता इत्यादि सर्व सद्गुण अगर नैतिक मूल्यें यांचें अधिष्ठान ईश्वरविषयक प्रेमच आहे व त्या सद्गुणाचें फळ तें प्रेम निरंतर वाढण्यांतच आहे.

याप्रमाणें मनुष्यानें आपल्या जीवनांत नैतिक व धार्मिक मूल्यांना श्रेष्ठ स्थानीं स्थापून इतर मूल्यांची मांडणी त्यांना अनुसरून करण्यांत मानवी जीवनाचें कल्याण आहे अशी नाथांची भागवतद्वारें शिकवणूक आहे. ही शिकवणूक आचरणांत आणल्यानें प्रपंच व परमार्थ सुखमय होईल. भागवताची फळश्रुती सांगतांना नाथ म्हणतात,

**ग्रंथ सिद्धी पावेल यथार्थी। येणें सज्ञानही सुखी होती।**
**मुमुक्षू परमार्थ पावती। साधक तरती भवसिंधू॥**
**भाळे भोळे विषयीं जन। याचें करितां श्रवण पठण।**
**हरिभक्त होती जाण। सन्मार्गी पूर्ण बहुत होती॥**

ए. भा. ३१-५३७, ५३८

## सर्वांतःकरणानें नामस्मरण करावें.

१

वाचा नेमावी माझेनि नामें । मन नेमावें ध्यान संभ्रमें ।
प्राण नेमावा प्राणायामें । इंद्रियें दमनें नेमावीं ॥
बुद्धि नेमावी आत्मविवेकें । जीव नेमावा परमात्मसुखें ।
इतकेन तूं आवश्यकें । होसी कौतुकें मद्रूप ॥
मद्रूप झालिया पाठीं । मग संसार न पडे दिठीं ।
खुटल्या जन्ममरणाचिया गोठी । गमनागमन आटाटी निमाली ॥

ना. भा. अ. ५-२९८ ते ३००

२

त्या नामाच्या पाठा । तेणें देवासी संतोष मोठा ।
वेगीं सांडोनि वैकुंठा । धांवे अवचटा कीर्तनामाजीं ॥
अंतरशुद्धीचें कारण । मुख्यत्वें हरिकीर्तन ।
नामापरतें साधन । सर्वथा आन असेना ॥
कीर्तनीं हरीची आवडी कैशी । वत्सालागीं धेनु जैशी ।
कां न विसंबे जेवीं माशी । मोहळासी क्षणार्ध ॥
तेवीं नाम स्मरतया भक्ता । अतिशयें आवडी अच्युता ।
दासांची अणुमात्र अवस्था । निजांगें सर्वथा निवारी स्वयें ॥
यालागीं हरिकीर्तनीं गोडी । जयासी लागली धडफुडी ।
त्यासी नाना साधनांच्या ओढी । सोसावया सांकडी कारण नाहीं ॥
ज्यासी कीर्तनीं कथाकथनीं । चौगुण आल्हाद उपजे मनीं ।
तो उद्धरला सर्व साधनीं । पवित्र अवनी त्याचेनी ॥
एकचि जरी नाम वाचे । सदा वसे श्रीरामाचें ।
तरी पर्वत छेदोनि पापांचे । परमानंदाचें निजसुख पावे ॥
आवडी करितां हरिकीर्तन । हृदयीं प्रगटे श्रीजनार्दन ।
त्याहोनि श्रेष्ठ साधन । सर्वथा आन असेना ॥

ना.भा.अ.५-३४९,३५३ ते ३५९

# यदु-अवधूत-संवाद आणि त्याची फलश्रुति

: लेखक :

श्री. हरेराम रामकृष्ण बोडस, एम्. ए. बी. टी., मिरज

श्री दत्तात्रेयाच्या वचनार्थी । विश्वासोनि जाला घेतां ।
तेणें सर्व संग विनिर्मुक्तता । आली हातां यदूच्या ।।
समसाम्यें समान बुद्धि । जें बोलिजे 'निजसमाधि'।
ते समाधी पावोनि त्रिशुद्धि । राजा निजपदीं पावला ।।
ए. भा. ९-४७९, ४८७

* * *

काव्येषु नाटकं रम्यं तत्र रम्या शकुंतला ।
तत्रापि च चतुर्थोऽकः तत्र श्लोक चतुष्टयम् ।।

काव्य शास्त्रांत या अलंकारास 'सार' अलंकार असें म्हणतात. काव्य प्रकारांत नाटक श्रेष्ठ, नाटकांत शाकुंतल श्रेष्ठ, त्यांत पुनः चौथा अंक विशेष महत्त्वाचा व त्यांतहि पुनः विशिष्ट असे चार श्लोक महत्त्वाचे. याच अलंकाराचा अवलंब करून भक्तिशास्त्रांतील किंवा भागवत धर्मातील कौतुक सांगायचें झाल्यास असें म्हणतां येईल,

पुराणीं श्रेष्ठ भागवत । त्याहीमाजीं उद्धवगीत ।
त्यांतही सर्वप्रथम उद्धृत । यदु-अवधूत-संवाद ।।
ए. भा. १-५९

या संवादामध्यें श्रीगुरुदत्तात्रेयांनीं आपल्या अवधूतपणाचें – असंगपणाचें रहस्य शिष्योत्तम यदुराजाला मनमोकळेपणानें सांगून टाकलें आहे. "अवधूत" या पदवींतील प्रत्येक अक्षर अवधूताच्या वैशिष्ट्याचें सूचक आहे. अवधूताची व्याख्या खालीलप्रमाणें केली जाते,

अक्षरत्वात् वरेण्यत्वात् धूत संसार बंधनात् ।
तत्त्वमस्यर्थ सिद्धत्वात् अवधूतोऽभिधीयते ।।
संस्कृत आपटे कोश

श्री एकनाथ महाराज अवधूताचीं लक्षणें सांगतांना व्युत्पत्तीकडे लक्ष वेधतात.

**सभोंवता समस्तु । प्रपंच निजबोधें असे धूतु ।**
**यालागीं बोलिजे अवधूतु । एऱ्हवीं विख्यातु ब्राह्मणू ।।**
**अहं धुवील तो अवधूत । तोचि योगी तोचि पुनीतु ।**

ए. भा. ७-२७१, ७२

हा अवधूत दुसरा तिसरा कोणी नसून श्रीदत्तात्रेयच साक्षात् होय यांत शंका नाहीं. भागवतकारांनीं यदुराजावर श्रीदत्तात्रेयांचा अनुग्रह झाल्याचें वर्णन केलें आहे.

**अत्रेरपत्यमभिकाङ्क्षत आह तुष्टो ।**
**दत्तो मयाहमिति यत् भगवान् स दत्तः ।।**
**यत्पाद पङ्कज पराग पवित्र देहा ।**
**योगर्द्धिमापुरुभयीं यदु है हयाद्याः ।।**

भा. स्कं. २ अ. ७ श्लो. ४

सांगणारा श्रीदत्तात्रेयासारखा अधिकारी ! विचारणाराहि भगवंताच्या पूर्वजांचा पूर्वज यदुराजा कीं जो ‘ राजा असून सात्त्विक ’, ‘ धर्मवित् असून प्रश्रयावनत ’, ‘ बुद्धिमंत असून श्रद्धाळु ’, ‘ क्षात्रसृष्टीचा सूर्य असून ब्राह्मणभक्त ’. त्यांत विचारलेला प्रश्नहि ‘ सुंदर आणि सगुण ’ म्हणजेच ‘ निजानन्दकारण ! ’ हा संवाद उद्धवापुढें उद्धृत करणारा कोण ? दस्तुरखुद्द भगवान् ! आणि त्यावर रसाळ भाष्य करणारा कोण ? श्रीएकनाथ, कीं ज्यांना ‘ वक्ता भगवंत साह्य ! ’ भगवंताला जसा व जितका यदुकुलपरंपरेचा सात्त्विक अभिमान, नितांत आदर व आपलेपणा वाटत होता,

**ज्याचेनि नामें आम्ही सर्व । वीर यादव म्हणवितों ।।**

ए. भा. ९-४७७

तसा व तितकाच नाथांनाहि अवधूत शिष्यपरंपरेबद्दल वाटत होता.

**दत्तात्रेय शिष्यपरंपरा । सहस्रार्जुन यदु दुसरा ।**
**तेणें जनार्दनु तिसरा । शिष्य केला खरा कलियुगीं ।।**

ए. भा. ९-४३०

म्हणून दोघांचीहि या विषयाच्या प्रतिपादनांत समाधी लागली, समरसता झाली ! दोघेहि सारखेच समरस झाले तरी श्रीकृष्णांनीं संक्षेपानें जें दीडशे श्लोकांत प्रतिपादन केलें, तेंच नाथांनीं जवळजवळ दीड हजार ओव्यांत मूळ आशय न सोडतां, स्वतंत्र प्रतिभेनें, पाल्हाळ न करतां, विस्तारानें, पाणचट न होऊं देतां, पघळपणानें सांगितलें. नाथांनीं श्रीधरांचा आधार घेतला हें खरें.

**श्रीधर व्याख्यानाची युक्ती । तेहि उपपत्ती परियेसीं ॥**

ए. भा. ७-७१

पण आज जर श्रीधर असते तर म्हणाले असते कीं 'मी नाथांमुळें अमर झालों.' भगवान् भागवतश्रेष्ठ उद्धवास भागवत धर्माचा उपदेश करतात, तर नाथ हे दत्तसंप्रदायी असल्यानें, श्रीदत्त म्हणजे भगवंताचाच सहावा अवतार असून

**षष्ठमत्रेरपत्यत्वं वृतः प्राप्तोऽनसूयया ।**
**आन्वीक्षिकीमलर्काय प्रल्हादादिभ्य ऊचिवान् ॥**

भा. १-३-११

ते परम भागवत प्रल्हादाचे आत्मविद्येचे उपदेष्टे आहेत ( भा. स्कं. ७ अ. १३ ) हें जाणून डोळसपणानें भागवत संप्रदाय व दत्त संप्रदाय या दोहोंचा मधुर समन्वय करतात. भगवंताचें दुर्गम संस्कृत व्याख्यान तर नाथांचें सुगम मराठी ! म्हणून नाथ सांगतात,

**संस्कृत व्याख्यान आटाटी । अति कष्टें परमार्थी भेटी ।**
**तें जोडल्या मराठीसाठीं । उपेक्षा दृष्टी न करावी ॥**

ए. भा. ९-४९७

कृतज्ञ महाराष्ट्र 'उपेक्षा दृष्टि' तर करणार नाहींच, उलट 'अपेक्षा दृष्टि' आहे त्याची ! व्यावहारिक पुरुष मोठा कसा होतो हें जाणण्याची अपेक्षा आम्हांस आहे, पण पारमार्थिक पुरुष मोठा कसा होतो हें जाणण्याची अपेक्षा त्याहून अधिक आहे व असावीहि. श्री. अत्रे यांनीं 'मी कसा झालों?' हें पुस्तक लिहिलें आहे, तें आम्हीं वाचावें अगर न वाचावें; पण श्री. आत्रेयांनीं ( अत्रितनय दत्तात्रेयांनीं ) 'मी कसा झालों ?' हें रहस्य ज्यांत सांगितलें आहे तें प्रकरण आम्हीं अवश्य वाचावें, पाठ करावें,

आत्मसात् करावें. कांहीं ग्रंथांच्या जाहिराती पाहून काम भागतें, कांहींचे अभिप्राय पुरे होतात, कांहींचे वेंचे वाचून कल्पना येते, कांहीं मुखोद्गत करण्याच्या लायकीचे असतात, कांहीं रवंथ करण्याजोगे, तर कांहीं पचविण्याच्या लायकीचे असतात. यदु-अवधूत-संवाद हा एक पचवायचा विषय असल्यानें त्याचें चर्वण आजवर अनेकांनीं केलें असलें तरी या प्रस्तुत लेखांत पुनः चर्वितचर्वण करण्याचें योजिलें आहे.

प्रसंग असा - श्रीकृष्ण भगवान् ब्रह्मादि देवांच्या विज्ञतीप्रमाणें निजधामास जाण्याच्या तयारीला लागले; त्यावेळीं कृष्णवियोगरूपी भूतानें त्या उद्धवाला पछाडलें.

**झोंबलासे कृष्ण वियोग खेचरू । उद्धव लेंकरू झडपिलें ॥**

ए. भा. ७-२०७

त्यानें भगवंताला प्रार्थना केली कीं 'मलाहि निजधामास घेऊन चल.' (**स्वधाम नयमामपि ।**) भगवान् म्हणाले,

**तूं सर्वी सर्वगत होसी । सर्वाधार सर्व देशीं ।**
**ऐसा मी होऊनि मज पावसी । न हालतां येसी निजधामा ॥**

ए. भा. ७-४२

याप्रमाणें उद्धवाच्या प्रार्थनेची पूर्ति करण्यासाठीं भगवंतानें त्याला सर्वात्मैक्यबोध दिला. पण त्या बोधाच्या दृढीकरणार्थ पुनः उद्धवानें प्रार्थना केली,

**तत्त्वज्ञस्य निगदितं भवता यथाहं ।**
**संसाधयामि भगवन्ननुशाधि भृत्यम् ॥**

भा. ७-१६

हे देवा ! युक्तिप्रयुक्तीनें उपदेश करून विकल्पनिरास कसा करावा हें तूं जाणतोस. तूंच 'आत्मा' आहेस, तूंच 'आत्मज्ञानदाता' आणि 'आत्मबोधीं संस्थापिताहि' तूंच. (७-१८५) मी स्वतः मूढमति आहे. (**सोऽहंममाहमिति मूढमतिः** । भा. ७-१६ )

**'चित्त प्रवेशेना तुझे ठायीं ।', 'विपरीत सिद्धि वाढली ।'** इत्यादि शब्दांत नाथांनीं उद्धवाचे म्हणजे साधकाचे प्रतिबंध सांगितले आहेत. अपरोक्ष ज्ञान

झालें तरीसुद्धां असंभावना, विपरीत भावना इत्यादि प्रतिबंधांमुळें आत्मानंद दुरावतो. एवढ्यासाठीं गुरूनें आत्मबोध दिला तरीसुद्धां प्रतिबंधनिरासार्थ श्रवणोत्तर मनन, निदिध्यास करून स्थूणानिखननन्यायानें दृढीकरण स्वतः करावें लागतें; हाच अर्थ समजावून देण्यास हा यदु-अवधूत-संवाद भगवंतांनीं उद्धृत केला आहे. त्याच्या प्रस्तावनेपूर्वीं संगति दाखविण्यासाठीं श्रीधर म्हणतात,

**तदेवमसंभावना विपरीतभावनाभ्यामुपदिष्टं तत्त्वमनवगाहमानं प्रति तन्निवृत्तये गुरूपदेशं विनाऽपि स्वान्वयव्यतिरेकाभ्यामेव तत्त्वप्रतिपत्ति-र्भवतीति दर्शयितुमाह** । ( भागवत श्रीधरी टीका ७-१८, १९ )

नाथांनींहि

**शास्त्रश्रवणें दृढ ज्ञान । मननाभ्यासें होय विज्ञान ।**
**या दोहींची जाणूनि खूण । ब्रह्मसंपन्न तूं होईं ॥**

ए. भा. ७-१०९

या ओवींत स्वतःच्या मननाभ्यासाचें महत्त्व सांगितलें आहे.

**मना गूज रे तूजला प्राप्त झालें ।**
**परी पाहिजे अंतरीं यत्न केले ॥**

असें समर्थांनीं म्हटलें आहे. हा प्रयत्न कसा करावा हेंच भगवान् सोदाहरण सांगत आहेत.

**मुमुक्षु मार्गींचे सज्ञान । लोकतत्त्वविचक्षण ।**
**विचारूनि कार्यकारण । स्वतर्कीं जाण उद्धरले ॥**

... -२१३

**कृष्ण म्हणे उद्धवासी । सविवेक वैराग्य असे ज्यासी ।**
**तोचि आपुला गुरु आपणासी । विशेषेसी जाणावा ॥**

ए. भा. ७-२३५

याप्रमाणें गुरूपदेशानंतर मननाभ्यासासाठीं स्वतःचें गुरुत्व स्वतःच करावें लागतें; आणि गुरूपदेशापूर्वींहि स्वतःची भूमिका तयार करण्यासाठीं म्हणून स्वतःचें गुरुत्व स्वतः करावें लागतें. कारण भूमिका तयार झाल्याशिवाय गुरु भेटत नाहींत आणि फळ परिपक्व झाल्यावर शुकाचार्यांना बोलवावें लागत नाहीं.

**ऐशी कर्मसाम्यदशा । होय तेथ वीरेशा ।**
**सद्गुरु आपैसा । भेटेचि गा ॥**

असें श्रीज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे. पण हें स्वतःचें गुरुत्व स्वतः करण्यासाठीं एक विशिष्ट दृष्टिकोन; गुणग्राहकतेचा किंवा सारग्राहकतेचा दृष्टिकोन स्वीकारावा लागतो. तो स्वीकारला तर ' वाटेवर न पडणारे ' दुर्मिळ गुरु शब्दशः वाटेवर पडलेले दिसतील.

**येच विखींचा इतिहास जाण । तुज सांगेन पुरातन ।**
**यदु-अवधूत-संवाद-लक्षण । ज्ञानसाधन साधकां ॥**

ए. भा. ७-२५४

असें म्हणून हें साधकांचें ज्ञानसाधन स्पष्ट करण्यासाठीं भगवंतांनीं हा संवाद उद्धृत केला आहे.

**हरिखे म्हणतसे गोविंदु । उद्धवा आमुचा पूर्वज यदु ।**
**तेणें ब्रह्मज्ञानासी संवादु । केला विशदु अवधूतासी ॥**

ए. भा. ७-२५५

या संवादाची फलश्रुति काय ?

**तेणें गुरूचीं लक्षणें ऐकतां । सायुज्यमुक्ती आली हाता ॥**

ए. भा. ७-२५७

सायुज्यमुक्ति ! सायुज्य म्हणजे तरी काय ?

**यया ब्रह्मत्वासीचि पार्था । सायुज्य ऐशी व्यवस्था ॥**

ज्ञाने. १४-४०१

असो. फलश्रुतीचा अधिक विचार शेवटीं उपसंहाराच्या वेळीं करूं, तूर्त संवाद पाहूं.

यदु राजा वनांत क्रीडेसाठीं जात असतां त्याच्यासमोर हा अवधूत दत्त ' दत्त ' म्हणून उभा राहिला. त्याचें व्यक्तित्व व व्यक्तिमत्व विरोधाभासांनीं भरलेलें होतें ! ' Highest truths are always paradoxical.' शब्दशः व अर्थशः ब्रह्मवेत्ता ब्राह्मण, ब्रह्मानंदानें डुलत असणारा, निजबोधाच्या सत्तेनें द्वैत जिंकल्यामुळें निर्भय आणि निःशंक, दृश्याला दृश्यत्वानें न पाहतां स्वतःच्या

दृङ्मात्रतेनें सर्वत्र आत्मभावच पाहणारा, एकल्या अनाथ व परदेशी झालेल्या ज्ञानाला सनाथ करणारा, निरहंकारितेमुळें कर्माकर्मातीतच नव्हे तर संकल्पविकल्प-रहित झालेला, देहींच विदेही असणारा, तेजःपुंज यतिवर पाहतांच यदूनें प्रसन्न-चित्त होऊन साष्टांग दंडवत घातला व जिज्ञासु भूमिकेवरून विचारूं लागला, " स्वामी महाराज ! ' अपूर्व ' बुद्धि दिसते आपली ! कुशल असून निश्चळ, विद्वान् असून केवळ बाळ, उगे असून अविकळ ' असे अनेक विरोध आपणांमध्यें दिसतात. अर्थात् ते विरोध नसून विरोधाभास आहेत. आपण ' जड ' आहांत, पण निजशांतीमुळें; ' उन्मत्त ' आहांत, पण ब्रह्मरसपानामुळें; कामलोभदावाग्नी-मध्यें तिन्ही लोक जळत असतांना आपण होरपळत नाहीं कीं दूर पळत नाहीं;

**वणवा जळे दोहीं थडीं । गजें गंगाजळीं दिधली बुडी ।**
**त्यासी न लागती तापाच्या वोढी । तैसे निरवडी तुज देखों ॥**

ए. भा. ७-३०९

असें द्वंद्वातीत आपण दिसतां. तर विनंती एवढीच कीं आपल्या आनंदाचें कारण विशद करून सांगा. आपण कलत्रादि भोगसाधनशून्य असून आनंदी कसे ?

हा आत प्राथना एकून क्षीरसागर जसा उचंबळ... ' राजा, माझें किंवा आत्मसुखाचा संदेश यावा तसा तो अवधूत बोलूं लागला, निजानंद कारण यथार्थपणें सांगतों, ऐक. गुरूवीण आत्मप्राप्ती नाहीं हें खरें; गुरु दुर्मिळ असतात हेंहि खरें; पण सद्बुद्धीचें साहाय्य घेतलें तर ' जगाचि असकें गुरु दिसे ' हेंहि तितकेंच खरें ! मी स्वतः अनेक गुरु केले.

**निजबुद्धीच्या विवेक स्थितीं । बहुत गुरु म्यां केले असती ।**
**जे जे सद्गुण म्यां देखिले भूतीं । ते ते स्थितीं तो गुरु ॥**

ए. भा. ७-३२४

जगांतील प्रत्येक वस्तूपासून, व्यक्तीपासून—अचेतन वा सचेतन—बोध घेतां येतो व घ्यावा. सुपापासून बोध घेतां येतो कीं, रजःकण आणि भुस्सा-कोंडा यांचा त्याग करून अस्सल बीज हृदयाशीं धरून ठेवावें; हा गुण घेण्याजोगा म्हणजे

'उपादेय' आहे. चाळणीपासूनहि बोध घेतां येतो कीं, सूक्ष्म तत्त्वाचा त्याग करून स्थूल गुणदोषांचे खडबडणारे खडे बाळगण्याचा मूर्खपणा करूं नये; हा चाळणीचा गुण टाकण्याजोगा म्हणजे 'हेय' आहे. अशा रीतीनें '**हेयोपादेय उपायपणें।**' (७-३३२) दोन तऱ्हेचे गुरु असतात.

**ज्याचा गुण घेतला। तो सहजें गुरुत्वा आला।**
**ज्याचा गुण त्यागरूपें घेतला। तोहि गुरु झाला अहित त्यागें॥**

ए. भा. ७-३४२

अवधूतांचा हा दृष्टिकोन 'उपादेय' आहे. श्रीतुकोबांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे,

**उपदेश तो भलत्या हातीं। झाला चित्तीं धरावा॥**

या अभंगांत 'भलता' म्हणजे कोण? तर देव, दानव, मानव, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अतिशूद्र, स्त्री, बालक, पशु, पक्षी, कृमी, कीटक, पंचमहाभूतें, निसर्गांतील जडवस्तु, घटना, त्यांच्या प्रतिक्रिया इत्यादि सर्व. जो 'भलता' आहे तो उपदेश कसा करूं शकेल? करील, कधीं प्रत्यक्षपणें अगर कधीं अप्रत्यक्षपणें. तो उपदेश करील अगर त्याचेकडून उपदेश होईल. 'भलत्यानें उपदेश करावा काय?' हा त्याचा प्रश्न आहे. पण भलत्याचा उपदेश योग्य असेल तर मानावा हें आम्हां साधकांचें उत्तर आहे. भलत्याकडूनसुद्धां योग्य उपदेश कसा होऊं शकतो याचीं (२४ गुरूखेरीज) अनेक उदाहरणें देतां येतील. देवगुरु बृहस्पती उपदेश करील, पण दानवगुरुतुल्य रावणसुद्धां उपदेशक होऊं शकतो. रामशरानें विद्ध होऊन मुमूर्षू स्थितींत रावण पडला असतांना त्याच्याकडे लक्ष्मण गेला. त्यावेळीं रावणानें आपल्या अनुभवाचे बोल त्यास शिकविले. '**वर्णानां ब्राह्मणो गुरुः।**' असा ब्राह्मण उपदेश करील, पण अतिशूद्रसुद्धां गुरुत्वाची भूमिका वठवूं शकतो. श्रीमदाचार्य म्हणाले,

**चाण्डालोऽस्तु सक्त द्विजोऽस्तु गुरुरित्येषा मनीषा मम।**

कांता उपदेश करील. curtain lectures सार्वजनिक आहेत. कांतेचा उपदेश तर मम्मटांनीं उपमानभूत मानला आहे.

**काव्यं यशसेऽर्थकृते कांतासंमित तयोपदेश युजे।**

पण पोरेंसुद्धां उपदेश करूं शकतात. एक शास्त्रीबोवा होते. राजदरबारीं त्यांनीं '**अनन्याश्चिन्तयन्तो मां।**' या गीतावचनावर उत्कृष्ट प्रवचन केलें. तरीसुद्धां राजानें म्हटलें, 'शास्त्रीबोवा, तुम्हांला अर्थ पूर्ण समजलेला दिसत नाहीं.' तेव्हां शास्त्रीबोवा कष्टी झाले. त्यांच्या पोरीनें शिकवलें, "बाबा, अनन्य भक्ताचा योगक्षेम भगवान् वाहतो हें जर तुम्हांस पूर्ण समजलें असतें तर तुम्ही प्रवचन करून बिदागी मागण्यास राजदरबारीं गेलाच नसता!" शास्त्रीबोवांनीं पोरीला गुरु केलें. पशु, पक्षी, कृमी, कीटकसुद्धां बोध शिकवितात हें त्या पंचतंत्रकारानें व ईसापानें सिद्ध केलें आहे. तिर्यग्योनींतील प्राण्यांना बोलके करून त्यांच्याद्वारां जगाला बोध देणारे हे महात्मेच होत! जड वस्तूपासूनहि बोध मिळतो हें सूपचाळणीच्या उदाहरणानें वर दाखविलेंच आहे. निर्जीव वाटणाऱ्या घटनाहि बोलक्या असतात; फक्त त्यांच्या बोलांचा अन्वयार्थ लावणारा योजक हवा. '**योजकस्तत्रदुर्लभः।**' अशीं उदाहरणें देत बसल्यास अति विस्तार होईल म्हणून अवधूतांनीं 'श्रेष्ठ श्रेष्ठ' असे चोवीसच गुरु सांगितले. अवधूत म्हणाले,

**पृथ्वी वायु आकाश। अग्नि आप सितांश।**
**सातवा तो चंडांश। कपोत परिस आठवा॥**
**अजगर सिंधु पतंग। मधुमक्षिका गज भृंग।**
**हरिण मीन वेश्या सांग। नांवें सुभग पिंगला॥**
**टिटवी आणि लेंकरूं। कुमारी आणि शरकारु।**
**सर्प कातणी पेशस्करु। इतुकेन गुरु चोवीस॥**

ए. भा. ७-४७ ते ४९

हीं चोवीस नांवें संध्येंतील केशवादि नांवाइतकीं महत्त्वाचीं आहेत. 'चोवीस' या संख्येंतच कांहीं वैशिष्ट्य असावें! आपला देहच पहा ना!

**हें चोवीस तत्त्वांचें। कुटुंब घर वस्तीचें।**
**सुटे बंध मोक्षाचें। गुंताडें येथ॥** (ज्ञाने.)

चोवीस तत्त्वांच्या विवेकासाठीं व निरसनासाठीं चोवीस गुरु हवेतच. तेवढ्यानें भागणार नाहीं. पंचविसाव्या आत्मतत्त्वाच्या प्राप्तीसाठीं जणूं पंचविसावा 'देह' गुरु सांगितला कीं, जो 'चोवीस गुरूंचाहि गुरु' असा 'विवेकवैराग्य-विचार' प्राप्त करून देतो.

या चोवीस अगर पंचवीस गुरूंपासून अवधूत काय शिकले हें नाथांनीं सविस्तर सांगितलें आहे; तें जिज्ञासूंनीं मुळांतूनच वाचावें. तें विस्तारभयास्तव येथें सांगणें शक्य नाहीं.

पृथ्वीपासून क्षमा, वायूपासून अनासक्ती, आकाशापासून असंगत्व, पाण्यापासून स्वच्छता याप्रमाणें कांहींच्यापासून 'उपादेय' गुण घेतले; कांहींपासून 'हेय' गुण (म्हणजे दोष) समजून घेतले; तर मधुकृत, मधुहर्ता व पिंगला या तिघांपासून 'हेय-उपादेय' असे दुहेरी बोध घेतले. या दृष्टीनें श्रीधरांनीं गुरूंचें वर्गीकरण केलें तें असें,

**कपोत मीन हरिण कुमारी गज पन्नगाः ।**
**पतंगः कुररश्चाग्नी हेयार्थे गुरवो मताः ॥**
**मधुकृन्मधुहर्ता च पिंगला च द्वयो स्त्रयः ।**
**उपादेयार्थ विज्ञाने शेषाः पृथ्व्यादयो मताः ॥**

ए. भा. ९-३३

दुसऱ्या एका दृष्टीनेंहि या गुरूंचें वर्गीकरण करतां येईल. जसें, (१) जड निसर्गाचे घटक अवयव, (२) मानव, (३) तिर्यग्योनींतील प्राणी. या पंचवीस गुरूमध्यें तारतम्य करणें सोपें नाहीं; तथापि एका प्रसंगीं खुद्द अवधूतांनींच तें केलें आहे. श्रीमद्भागवताच्या ७ व्या स्कंधांतील १३ व्या अध्यायांत महाभगवद्भक्त प्रल्हाद व आजगरमुनी यांचा संवाद आला आहे. हे आजगरमुनी म्हणजेच हे अवधूत दत्तात्रेय.

**आन्वीक्षिकीमलर्काय प्रल्हादादिभ्य ऊचिवान् ।**

ए. भा. १-३-११

श्रीधर म्हणतात कीं, या १३ व्या अध्यायांत अवधूतांचाच इतिहास सांगितला आहे.

**अवधूतेतिहासेन सिद्धावस्था च वर्ण्यते ।**

म्हणून तेच हे अवधूत याबद्दल शंकाच नाहीं. '**त्वंतुकल्पः कविः दक्षः ।**' (११-७-२८) आणि '**कविः कल्पः निपुण दृक् ।**' (७-१३-१८) इत्यादि वर्णनें एकाच विभूतीचीं दिसतात. असो. येथें अवधूतांनीं प्रल्हादास

चोवीस गुरु जरी सांगितले नसले तरी त्यांतील श्रेष्ठ गुरु व त्यांपासून मिळालेला बोध यांचा उल्लेख केला आहे.

**मधुकार महासर्पौ लोकेऽस्मिन्नोगुरूत्तमौ ।**
**वैराग्यं परितोषं च प्राप्ता यच्छिक्षया वयम् ॥**

भा. ७-१३-३४

येथें मधुमक्षिका व अजगर हे 'गुरूत्तम' म्हटले आहेत आणि नाथांनीं या सर्वांमध्यें 'मुख्य गुरु नरदेह' (९-२४९) असें म्हटलें आहे. गुरु हा केव्हांहि श्रेष्ठच आहे. पण ज्या मानानें विद्या दुर्गम, गुह्य, इष्ट व श्रेष्ठ असेल, त्या मानानें त्या विद्येचें प्रदान करणारा गुरु श्रेष्ठ, श्रेष्ठतर, श्रेष्ठतम मानला जातो. शिवणकाम शिकवणारा गुरु, संगीत शिकवणारा गुरु, भौतिक शास्त्रें शिकवणारा गुरु व "**अध्यात्म विद्या विद्यानाम् ।**" अशी आत्मविद्या देणारा गुरु यांत तारतम्य करणें त्या दृष्टीनें सोपें आहे. पण येथें या २४—२५ गुरूंमध्यें तारतम्य करण्याची आवश्यकता नसल्यानें आपण पुढील मुद्याकडे वळूं.

गुरूंच्या अनेकत्वाबद्दल एक शंका घेतली जाते. शंका जुनीच आहे. श्वेत-केतु, भृगु इत्यादि वैदिक जिज्ञासूंनीं अनेक गुरूंचा आश्रय केल्याचा उल्लेख उप-निषदांत नाहीं. मग अनेक गुरु कशाला पाहिजेत ? ज्ञानप्रद गुरु एकच असतो व असावा. भगवान्हि '**मदभिज्ञं शांतमुपासीत ।**' याप्रमाणें व प्रबुद्ध योगींद्रहि '**तस्माद्गुरुं प्रपद्येत ।**' याप्रमाणें व श्रुतीहि '**तद्विज्ञानार्थं गुरुमेवाभि गच्छेत् ।**' याप्रमाणें एकवचनच वापरतात. अनेक गुरूंच्या ठिकाणीं शिष्य एकनिष्ठ कसा राहील ?

याचें उत्तर अवधूत देतात, "**न ह्येकस्मात् गुरोर्ज्ञानं सुस्थिरं स्यात् सुपुष्कलम् ।**" (९-३१) आणि नाथराय यावरील शंकेचें निरसन करतात तें असें कीं गुरूनें निजज्ञान सांगितलें तरी चांचल्य व विक्षेप हृदयांत असतात. असल्या परिस्थितींत ब्रह्मात्मैक्य साधण्यासाठीं चिंतनिकेला सहाय्य-साधन म्हणून नाना पदार्थ गुरुरूपानें हवे असतात. अवधूत म्हणाले कीं ते मी मिळविले व विक्षेप छेदून टाकले.

**जे माझ्या निज गुरूंनीं । पूर्वीं दिधलें होतें बोधूनी ।**
**तेंचि नाना गुरुत्वें साधूनी । विक्षेप छेदूनी पावलों ॥**
**निजगुरु तो एकुचि जाण । इतर गुरु साधकत्वें साधन ।**

ए. भा. ९-४१४, ४१५

माझ्या सद्गुरूची नवलाई अशी आहे कीं त्या त्या चोवीस रूपांनीं तोच बोध देतो. 'गुरूवीण रितें' असें कांहींहि नाहीं. "**माझा गुरु एक एकुलता । तेथें नाहीं दुजेपणाची वार्ता ।**" मग 'चोवीसपणा' कसा संभवेल ? या दृष्टीनें यदुराया ! मी अनेक गुरूंच्याहि ठिकाणीं एकनिष्ठ झालों म्हणून ऐक्यनिष्ठहि झालों.

असें उपसंहारात्मक थोडेसें बोलून अवधूतांनीं यदुराजास प्रेमानंदपूर्वक आलिंगन दिलें व त्या आलिंगनाच्या मिषानें निजबोधरहस्यदानाची पूर्तता केली. आत्मज्ञानामुळें दोघेहि तद्रूप झाले, वाचा बंद पडून पूर्वोत्तर पक्ष संपले, दोघेहि अष्ट सात्त्विक भावानें डंवरलें. "तुटली अहंकाराची बेडी, जिंतिली गाढी अविद्या, देहभाव पळाला, संकल्पविकल्प निमाला" इत्यादि वेचक व वेधक मोजक्या व योजक्या शब्दांनीं ही नाथांनीं यदु-अवधूत-संवादाची फलश्रुति वर्णन केली आहे. ही खरोखरीची फलश्रुति आहे, ही 'वायफळ श्रुति' नव्हे, अगर 'रोचनार्था' हि पण नव्हे. ही आनुभविक (psychological) असली तरी याची थोडीशी आनुमानिक (logical) चर्चा करून हें प्रकरण संपवावयाचें आहे.

चोवीस पंचवीस गुरूंचा उपदेश ग्रहण केल्यावर अवधूतांच्या पदरांत काय फळ पडलें, अवधूतांचा अनुभव ऐकून यदूच्या पदरांत काय पडलें, यदु-अवधूत-संवाद श्रीकृष्णमुखांतून ऐकल्यावर उद्धवाच्या पदरीं काय पडलें व हें सर्व वाचून, ऐकून व मनन करून तुमच्या आमच्यासारख्या सर्वसामान्य वाचकांच्या वा श्रोत्यांच्या पदरीं काय पडलें किंवा पडेल, इतक्या सर्व प्रश्नांचा विचार करून मग फलश्रुतीची वास्तवता ठरविली पाहिजे.

प्रत्यक्ष अवधूतांचा अनुभव असा, "**यतो बुद्धिमुपादाय मुक्तोऽरामीह।**" (७-३२) म्हणजे

**बुद्धीनें अंगिकारिलें गुणा । निज धैर्यें धरिली धारणा ।**
**तेणें मी मुक्त झालों जाणा । स्वेच्छा अटणा करीतसे ॥**

ए. भा. ७-३२५

ही जीवन्मुक्ती कशी प्राप्त झाली ? तर देहस्थितीचा विवेक करून मी वैराग्य संपादन केलें. मग

**त्या वैराग्याचेनि बळें । गुरुकृपा वचन मेळें ।**
**विषय इंद्रियांचे पाळे । एकेचि वेळे विभांडिले ॥**

ए. भा. ९-३८२

जीवानें अविद्येचा स्वीकार केला तरच तो अविद्यावान् होतो, येऱ्हवीं नाहीं, असें अविद्येचें मिथ्यात्व अनुभवानें जाणलें, त्यामुळें चित्प्रकाश पूर्णपणें लाभला, देहाबद्दलची अहंता व देहसंबद्धाबद्दलची ममता नष्ट झाली. सुकलेलें पान जसें वायुबळानें इकडे तिकडे लोळत राहतें, त्याप्रमाणें अदृष्ट बळानें या देहाचें चलनवलन चालू आहे. निजगुरूनें सांगितलेली गोष्ट साधण्यासाठीं मी ही गुरुसंस्था केली. पूर्वी गुरूनें जर बोध केला नसता तर पृथ्वी वगैरेंचा काय उपयोग झाला असता ?

यदुराजाला ब्रह्मज्ञान सांगून अवधूतांनीं त्याच्या मस्तकावर हस्तक ठेवून त्यास कृतार्थ केलें. " **श्रुत्वा यदुः कृतार्थोऽभूत** । " असें श्रीधर म्हणतात. श्रीभागवतांत इतरत्र ( २-७-४ ) ' **योगर्द्धिमापुरुभयीं यदुहैहयाद्याः** । ' असें म्हटलें आहे; म्हणजे यदूला उभयत्र योगवैभव–भुक्तिमुक्तीचें-प्राप्त झालें. प्रस्तुत लेखाच्या मथळ्यासाठीं उद्‌धृत केलेल्या ओव्यांत यदूला ' सर्वसंगविनिर्मुक्तता ' प्राप्त झाली असें म्हटलें आहे: अवधूतांनीं विषय-इंद्रियांची ताटातूट केली-पाळे विभांडिले. ( ९-३८२ ) हा संगत्याग झाला. यदूची भूमिका वेगळी होती. तो राजा होता. तो संगांत असूनहि स्नेहत्यागानें संगमुक्त झाला.

**संगीं असोनि स्नेह सांडिला । संगमुक्त झाला तो जाण ॥**

ए. भा. ९-४८०

ही विशेष मुक्तता आहे असें नाथ म्हणतात. मला पूर्वीं द्वैतसंग होता, तो जाऊन आतां मी निःसंग झालों, या दोन्ही गोष्टी मुळांतच खोट्या आहेत. वास्तविक मी त्रिकाळीं बंधमोक्षातीत आहें. माझी सहजस्थिति मला प्राप्त झाली. असें हें ' निजसमाधिपद ' त्याला प्राप्त झालें. अवधूतांनीं यदूला ' **आपणांसारिखे करिती तात्काळ** । ' या न्यायानें स्वीय साम्य देऊन टाकलें. अवधूतांचें प्रशस्तिपत्र पहा.

**तुझी पालटली दिसे स्थिती । हृदयीं प्रगटली चिच्छक्ति ।**
**मावळली विद्येची राती । बोध गभस्ति उगवला ॥**

ए. भा. ९-२२४

मुलाचें कौतुक पाहून मातेच्या डोळ्यांचें पारणें फिटतें, तसें शिष्याला निजबोध झालेला पाहून यतिवर खूष झाले. " **ययौ प्रीतो यथागतम् ।**" यदूची सर्व जिज्ञासा शांत झाली. " **राजा अतिप्रीति निवाला ।** "

आतां उद्धवावर काय परिणाम झाला ?

**कृष्ण म्हणे उद्धवासी । तूं जन्मूनि ऐशिये वंशीं ।**
**जरी ब्रह्मज्ञान न साधिसी । तरी उणें पूर्वजांसी येईल ॥**

ए. भा. ९-४८८

याप्रमाणें त्याच्या बुद्धीला डिंवचल्याबरोबर तो

**गिळावया चिद्ब्रह्मासी । निजमानसीं खवळला ॥**

ए. भा. ९-४९१

**यदु-अवधूत-संवादेसीं । लक्षणोक्त चोवीसा गुरूंसी ।**
**परिसोनिया उद्धवासी । भावना ब्रह्मेसी लिगटली ॥**

ए. भा. १०-४१

अवधूत, यदु, उद्धव यांची गोष्ट निराळी व तुमची आमची निराळी ! अवधूतांनीं गुरूपदेशानंतर असंभावनादि दोषांचा निरास करण्यासाठीं हे गुरु केले. त्यांना इष्ट फळ मिळालें. यदुराजाला व उद्धवाला अधिकारी गुरु भेटले. त्यांचाहि स्वतःचा अधिकार होता, म्हणूनच त्यांना वरील फलश्रुति अनुभवितां आली. आमचा स्वतःचा अधिकार व अधिकारी मार्गदर्शकांचा अभाव लक्षांत घेतला तर वरीलपैकीं आमच्या पदरांत काय पडेल याचा विचार करूं.

स्वतःची भूमिका तयार करण्यासाठीं हा संवाद आम्हांस बहुमोलाचा आहे. "**विरक्तीवांचूनि कहीं । ज्ञानासि तगणेंचि नाहीं ।**"(ज्ञाने.) या दृष्टीनें विरक्तीचा अंगीकार करण्याच्या कामीं या चोवीसपैकीं पांच गुरु विशेष उपयुक्त आहेत.

**पतंग मातंग कुरंग भृंग मीना हताः पंचभिरेव पंच ।**
**एकः प्रमादी स कथं न हन्यते यः सेवते पंचभिरेव पंच ॥**

म्हणजे एकेक विषयापायीं हे सर्व मरतात तर मग कैमुतिक न्यायानें पांचहि विषयांसाठीं मरणारे कसे तरतील ? पंचविसावा 'देह' गुरु आपणांस वैराग्य

खास शिकवील. जन्म, मृत्यु, जरा, व्याधि, दुःख, दोष यांचा विचार केला तर गौतम बुद्धाइतकें तीव्र नसेल, पण आमच्या कार्यापुरतें वैराग्य, दवडलें तरी पाठीं लागेल. साधकाला साधनेसाठीं एकाकीपणाचें महत्त्व 'कुमारी' रूपी गुरु शिकवील; एकाग्रतेची पराकाष्ठा करण्यास 'शरकृत्' गुरु शिकवील; ध्यानानें ध्यात्याला ध्येयरूप होतां येते हें 'पेशस्कर कीटक' सप्रयोग शिकवील; अनात्मरती सोडून आत्मरती करण्यास 'पिंगला'; गृहासक्तीचे दुष्परिणाम समजून देण्यास 'कपोत पक्षी'; अपरिग्रहाचें महत्त्व समजून देण्यास 'टिटवा'; देहाभिमानशून्यतेचा आदर्श दाखविण्यास 'अर्भक' व शेवटीं जीवशिवैक्य समजून देण्यास 'वायु, आकाश, अग्नि, चंद्रमा, रवि, समुद्र, ऊर्णनाभी (कोळी)'; यदृच्छालाभसंतोष शिकविण्यास 'अजगर-सर्प', याप्रमाणें हे सर्व गुरु (नामनिर्देश कोणाचा राहिला असल्यास त्यांनीं क्षमा करावी.) आम्हां साधकांस उपकारक ठरतील. शेवटीं 'परमार्थाची तांतडी' करण्यास हा अनित्य देहच गुरु ठरेल.

कोणत्याहि साधकाला साधना करीत असतांना त्याच्या साधनमार्गांत मधून मधून मार्गदर्शनार्थ योग्य उपदेशाची अपेक्षा वाटतेच. मग तो प्रपंचाची साधना करो, अगर परमार्थाची, अगर समर्थ म्हणतात त्याप्रमाणें प्रपंच साधून परमार्थाची साधना करो, उपदेश हा हवाच हवा, नसेल तर गैरसोय होईल. '**सद्गुरूवांचोनी सांपडेना सोय।**' श्रुति म्हणते, "**तद्विज्ञानार्थं गुरुमेवाभिगच्छेत्।**" पण असले गुरु वाटेवर पडलेले नसतात. ते दुर्लभतम आहेत. त्यांच्या शोधासाठीं आम्हीं कांहींजण जन्मच्याजन्म व्यर्थ धडपड करीत असतों. जगांत गुरुत्वदंभ माजवणारे पुष्कळ आहेत. त्यांच्या तावडींत आमच्यापैकीं कांहीं सांपडतात व तेहि शिष्यत्वदंभ करूं लागतात. मग परस्पर फसवाफसवी, लुटालूट सुरूं होते.

**विषयांकारणे झाले गुरुशिष्य। अनुभव अभ्यास स्वप्नीं नाहीं॥**

ज्ञाने. गाथा

परमार्थ बाजूलाच राहतो. यांतून मार्ग कोणता ? तर गुरूच्या शोधार्थ काळ दवडूंच नये. आपली भूमिका तयार करावी. मग "**श्रीगुरु आपैसा। भेटेचि गा॥**" तोंपर्यंत आपलें आपण गुरुत्व करावें, करतां येतें. त्यासाठीं लागणारी विशिष्ट दृष्टि ही या यदु-अवधूत-संवादाची आमच्या मतें फार मोठी फलश्रुति आहे.

यदु-अवधूत-संवादाचें तात्पर्य काय? हें इसापनीतीप्रमाणें वेगळें काढून दाखवायला नको. प्रत्येक घटनेचें तात्पर्य काय हें पहावें, हेंच या संवादाचें तात्पर्य होय.

**सर्वतः सारमादद्यात् पुष्पेभ्य इव षट्पदः ।** ११-८-१०

काय लक्षांत ठेवावें ?

" A good memory is not one that seldom forgets, but it is one that retains what is valuable ( उपादेय ) and throws away what is worthless. (हेय)"

अशी एकानें उत्कृष्ट स्मरणशक्तीची व्याख्या केली आहे. सारग्राहकता असावी. श्रीतुकोबा म्हणतात,

**उपदेश तो भलत्या हातीं । झाला चित्तीं धरावा ।।**

ही दृष्टि म्हणजेच ही फलश्रुति श्रीनाथकृपेनें आमच्या पदरांत पडो येवढीच त्या जगद्गुरु श्रीकृष्णांच्या चरणीं व यदूपदेशक श्रीदत्त गुरु अवधूतांच्या चरणीं प्रार्थना.

---

## दान व तप

**दुःख निरसूनि भूतांसी । सुख देणें गा सर्वांसी ।**
**हेंचि उत्तम दान पृथ्वीसी । अनायासीं तुकेना ।।**
**जन्ममरणांचें दुःख । निरसूनि द्यावें निजसुख ।**
**याचि नांवें दान देख । अलौकिक उद्धवा ।।**
**करूनिया कामाचा त्याग । तप करणें तें अति चांग ।**
**हृदयीं असतां कामदांग । तपाचें लिंग शोभेना ।।**
**माझ्याठायीं अनुताप । त्या नांव गा शुद्ध तप ।**
**कां हृदयीं चिंतितां चित्स्वरूप । हें परम तप तपामाजीं ।।**

ना. भा. अ. १९-४४८,४९,५१,५४

---

# स्वधर्मानुष्ठानाची आवश्यकता

: लेखक :

प्रा. **पां. कृ. सावळापूरकर**, एम्. ए., नागपूर

नाथभागवत हा एक अत्यंत प्रासादिक व रसाळ असा ग्रंथ आहे. एका दृष्टीनें श्रीमद्भागवताच्या एकादश स्कंधावरील ती टीका खरी व टीकेमध्यें लेखकाला स्वातंत्र्य कमी असतें हेंहि खरें; पण दुसऱ्या दृष्टीनें विचार केला तर यांत नाथांनीं आपलें आत्मचरित व मतेंच सर्वत्र प्रगट केलीं आहेत यांत शंका नाहीं. टीकाकार आपल्यास सर्वस्वी अभिमत असलेलाच ग्रंथ टीकेसाठीं निवडील हें उघड आहे. व पदपदार्थांचें स्पष्टीकरण करीत असतांनाच टीकाकार आपलीं मतें उघड वा अप्रत्यक्ष रीतीनें प्रगट करील हेंहि सांगणें नकोच. नाथांनीं या ग्रंथांत ओघाओघानें स्वधर्म व त्याचें अनुष्ठान यासंबंधीं पुष्कळच लिहिलें आहे.

नाथांच्या स्वधर्मकल्पना व स्वधर्मावश्यकता या संबंधीं लिहिण्यापूर्वी त्यांच्या-मागें परंपरेचा भक्कम आधार कसा होता तें पाहिलें पाहिजे. आम्ही नवीन कांहीं करणारे धर्मसुधारक आहोंत असा अभिमान प्राचीन संतांना केव्हांहि नसे. उलट आम्ही परंपरावादी आहोंत, संतांचें उच्छिष्ट सांगत आहोंत आणि धर्मावर आलेलें मालिन्य घालवीत आहोंत, हीच त्यांची भूमिका असे. काळ बदलला म्हणून मूळ धर्मतत्त्व बदलतें असें नव्हे. नाथांची भूमिका वरीलप्रमाणेंच होती. उपनिषदांचें सार गीता किंवा ज्ञानेशांच्या मतें कृपण वेदांचा नवा उदारावतारहि असून तिच्या भावार्थाची दीपिका ज्ञानेश्वरांनीं आम्हांस दाखविली. नाथांनीं या दीपिकेंत सर्वस्वी आपला मार्ग पाहिला. भागवताच्या एकादश स्कंधांत आलेलें तत्त्वज्ञान हें गीतेंत आलेलेंच पण प्रकारान्तरानें व विस्तरशः सांगितलें गेलें आहे, हें वाचकांच्या लक्षांत सहजच येतें. भागवत-एकादश स्कंधाच्या पदपदार्थव्याख्यानासाठीं श्रीधरी टीकेचा आपण मुक्त हस्तानें उपयोग केला हें नाथांनीं स्वच्छच म्हटलें आहे. पण त्याबरोबरच भागवत एकादश स्कंधाचा साक्षात् संबंध नसलेल्या भावार्थ दीपिकेचें मार्गदर्शकत्वहि नाथांनीं मोठ्या कृतज्ञतेनें व्यक्त केलें आहे.

**त्या समर्थाचिये पंक्ती । भावार्थदीपिका धरोनि हातीं ।**
**श्रीधरें दाविता पदपदार्थी । निजात्मस्थिति निवाला ॥**

ए. भा. ३१-४५०

**एका जनार्दनीं मांजर वेडे । भावार्थदीपिका उजियाडे ।**
**हे रस देखोनी चोखडे । ताटापुढें पैं आलें ॥**

ए. भा. ३१-४५२

यावरून उपनिषदें, गीता व भावार्थदीपिका येवढी मोठी भक्कम परंपरा नाथांच्या मागें होती हें उघड आहे. ज्ञानेशांचा नाथांवर इतका परिणाम झाला होता कीं, भावार्थदीपिकेंतील कित्येक ओव्याच्या ओव्या व दृष्टांत कांहीं शब्दांच्या अदलाबदलीनें नाथभागवतांत दिसतात, इतकें नाथज्ञानेशाचें तादात्म्य होतें. 'ज्ञानाचा एका' ही म्हण जी एकनाथांसंबंधीं रूढ झाली ती अगदीं खरी आहे. उपनिषदें, गीता, भावार्थदीपिका व भागवत एकादश स्कंध यांतील विलक्षण ऐक्यामुळेंच नाथांनीं

**एकादश म्हणजे एक एक । तेथ दुजेपणाचा न रिघे अंक ।**
**तेंचि एकादश इंद्रियीं सुख । एकत्वें अलोलिक निडारलें पूर्ण ॥**
**त्या एकादशाची टीका । एकारस करी एका ।**
**ते एकत्वाच्या निजसुखा । फळेल साधका जनार्दन कृपा ॥**

ए. भा. ३१-५५६, ५५७

अशी साहित्यिक कोटी करून मूळ ग्रंथाचें व त्यावरील टीकेचें अद्वितीयत्व सिद्ध केलें आहे.

नाथांचा स्वधर्म कोणता तो आतां पाहूं. स्वधर्म, परधर्म इत्यादि शब्द आले कीं, आजच्या वाचकांपुढें हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती इत्यादि धर्म उभे राहतात. पण गीता भागवतांत आलेल्या स्वधर्म शब्दाच्या वेळीं अशा धर्मनामांचा पत्ताहि नव्हता. वस्तुतः धर्म एकच असतो, अनेक असूंच शकत नाहींत. त्यामुळें धर्माला 'सनातन' हें एकच नांव शोभतें. इतर नांवें हीं आपलें अज्ञान व मर्यादा याचीं द्योतक आहेत, असें मानावें लागतें. म्हणूनच आमच्या प्राचीन ग्रंथांत वेदप्रणीत सनातन वर्णाश्रमधर्म म्हणजेच स्वधर्म असा पक्ष मांडलेला दिसतो. व्यापक

अर्थानें प्रत्येकाचें त्या त्या स्थलकालअवस्थेचें कर्तव्यकर्म म्हणजे स्वधर्म असाहि अर्थ झाला. हें कर्तव्य निश्चित करण्यासाठीं शास्त्रप्रामाण्याची आवश्यकता असते. '**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।**' किंवा '**स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।**' इत्यादि वचनांत गीतेंत व त्यावरील भावार्थदीपिकेंत जो पक्ष आला आहे तोच नाथभागवतांतहि आला आहे. असा वर्णाश्रमधर्म नाथांना पूर्ण मान्य आहे. यास उपाद्बलक अशीं वचनें नाथभागवतांत अनेक आहेत. त्यांतील दिग्दर्शनार्थ थोडीशीं देऊं.

**तप म्हणजे स्वधर्म । जो वर्णाश्रम यथोचित ।** ३-५५३
**जो वर्ण जो आश्रम । मीचि बोलिलों स्वधर्म ।**
**आचरतां परधर्म । दुःख परम पाविजे ॥** १०-४५
**चहूं आश्रमाहूनि उत्तम । आपुला जो निजाश्रम ।**
**तेथें स्थिरावोनि मनोधर्म । वर्णाश्रम चालवी ॥** १०-९५३
**वेदबळें वर्णाश्रम । निज स्वधर्म चालविती ।** १३-४६२

यावरून नाथांचें म्हणणें कळेल. भागवताच्या एकादश स्कंधाच्या सतराव्या अध्यायांत या वर्णाश्रमधर्माचें सविस्तर वर्णन आलें आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे वर्ण आणि ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, संन्यास हे आश्रम यांचीं सर्व बारीक सारीक कर्तव्यें यांत आलीं आहेत. इतकेंच नव्हे तर प्रत्येक युगांत या वर्णाश्रमाची हालहवाल काय होती हेंहि यांत आहे. प्रत्येक वर्णाचीं जशीं भिन्न धर्मलक्षणें आहेत, तशीं सर्व वर्णांना समान अशींहि धर्मलक्षणें आहेत. तींहि यांत आलीं आहेत. इतकेंच काय पण वर्णबाह्य अशाहि मंडळीचीं लक्षणें यांत आहेत. नाथांनीं यावरील व्याख्यानहि फार प्रत्ययोत्पादक रीतीनें केलें आहे. अर्थात् नाथांचा स्वधर्म म्हणजे श्रुतिस्मृतिप्रणीत वर्णाश्रमधर्म होय यांत शंका नाहीं. परंतु ज्ञानेश्वराप्रमाणेंच नाथांनींहि ईश्वरभक्तीचा डांगोरा पिटल्यामुळें ईश्वरभक्त वर्णाश्रमधर्मी हा नाथांना विशेष प्रिय वाटतो. इतकेंच नव्हे तर

**अभेद भक्त माझे जाण । वेद विधान त्या न बाधी ॥**
ए. भा. १३-४६९

असें म्हणून नाथांनीं या भक्तांची वेदविधानापासून सुटका केली आहे. गीतेंत व त्या अनुरोधानें भावार्थदीपिकेंत ' वेदवादरतां ' ची जी निंदा आली आहे त्याचाच हा अनुवाद आहे यांत शंका नाहीं. त्रैगुण्योद्भव वेदांची बाधा निर्गुण भक्तांना कशी होणार, हा नाथांचा प्रश्न आहे.

**करितां स्वधर्में माझी भक्ति । भक्तास होय जे प्राप्ति ।** १८-३२२

याचें वर्णन नाथांनीं सविस्तर केलें आहे. अशा प्रकारच्या भक्तीनें सर्वांभूतीं परमेश्वर पाहण्याची पात्रता भक्तीमध्यें येते. यांतूनच ज्ञानभक्तीचा उदय होतो आणि पुढें

**शून्य पडिलें संसारस्थिति । तेथ कैंची पुनरावृत्ति ।** १८-३४४

अशा सायुज्यतेला भक्त प्राप्त होतो.

स्वधर्माचें आचरण करतांना फलाशा धरूं नये हें कर्मयोगाचें प्रसिद्ध तत्त्वज्ञान नाथांनींहि उपदेशिलें आहे.

**यापरी होऊनि अकामात्मा । सुखें आचरावें स्वधर्मा ।**
**तेणें सांडूनि रजतमा । सत्त्वें पुरुषोत्तमा पावती ॥**

ए. भा. १०-६८

याचबरोबर

**वर्णाश्रम समुद्भवा । मूळ आश्रयो मी ओळखावा ।**
**कुळधर्म निजस्वभावा । उपासावा मी एकु ॥**

ए. भा. १०-६९

फलाशा त्यागाबरोबर सर्व वर्णाश्रमधर्माच्या मुळाशीं परमेश्वर आहे, म्हणून अंतिमत: तोच उपास्य आहे हें ध्येयहि दृष्टिआड होऊं देतां कामा नये.

**करूनि फलाशेचें शून्य । स्वधर्में करिती माझें भजन ।**
**पुरुष अथवा स्त्रिया जाण । ते सत्त्वसंपन्न निश्चित ॥**

ए. भा. २५-१६३

**ऐसिया स्वधर्मवृत्ति । जेथ प्रगटे माझी भक्ति ।**
**ते ते सात्त्विक प्रकृती । जाण निश्चितीं उद्धवा ॥**

ए. भा. २५-१६६

**स्वकर्म धर्म वर्णाचार । करितांहि निज व्यवहार ।**
**ज्यासी सर्व भूतीं मदाकार । तो भक्त साचार प्रिय माझा ॥**

ए. भा. २९-३१२

या ओंव्या पुरेशा बोलक्या आहेत. भक्ताला कीर्तनासारखें प्रिय काय असणार ? म्हणूनच

**कीर्तनें स्वधर्म वाढे । कीर्तनें स्वधर्म जोडे ।**
**कीर्तनें परब्रह्म आतुडे । मुक्ति कीर्तनापुढें लाजोनि जाय ॥**

ए. भा. ५-४१८

असें कीर्तनाचें कीर्तन नाथांनीं केलें आहे.

या स्वधर्माचरणांत नित्य, नैमित्तिक कर्मांचा विवेक करावाच लागतो. विशेषेकरून गृहस्थास हें अति आवश्यक आहे.

**नित्य नैमित्तिक स्वधर्म । हें गृहस्थांचें निजकर्म ।**
**हें चित्तशुद्धीचें निजवर्म । सत्त्व सुगम या हेतु ॥**

ए. भा. २५-१५३

कर्मयोग हें ब्रह्मज्ञानप्राप्तीचें साधन आहे. ज्ञानप्राप्तीनंतर कर्माचरणाची गरज उरत नाहीं. किंबहुना ब्रह्मज्ञानाची कर्तृत्व भावनाच नाहींशीं झाल्यामुळें सर्व धर्मकर्मांचें अस्तित्वच त्या ठिकाणीं उरत नाहीं हें आचार्यांचें सांख्यमत नाथांनाहि पूर्ण मान्य होतें.

**तेथें वेदोक्त विधिविधान । जीवा अंगीं आदळे जाण ।**
**जंव नव्हे ब्रह्मज्ञान । तंव स्वधर्माचरण करावें ॥**

ए. भा. १२-२८५

यावर विशेष विस्ताराची गरज नाहीं.

स्वधर्माचरणाचें ढोंग करणारे दांभिक सर्वत्र असतात. अशा दांभिकावर सर्व संतांनीं ताशेरे उडविले आहेत. नाथहि त्याला अपवाद नाहींत.

**अथवा करी दांभिक भजन । वैष्णवपण त्या नाहीं ॥**

ए. भा. १३-१३९९

असा स्पष्ट अभिप्राय त्यांनीं देऊन टाकला आहे. तसेंच, नास्तिकाचा निषेध करण्याच्या बाबतींत नाथहि कांहीं मागें नाहींत.

**स्वधर्मे कर्मी स्वभावता । विश्वास नाहीं ज्याच्या चित्ता ।**
**वेदशास्त्र पुराणार्था । मिथ्या सर्वथा जो मानी ॥**
**उद्धवा जाण तत्त्वता । या नांव गा नास्तिकता ।**
**आस्तिक्यभावो स्वभावता । अणुमात्रता जेथ नाहीं ॥**

ए. भा. १७-२११, २१२

या ओव्यांत नास्तिकतेची व्याख्या देऊन हा नास्तिक, '**घरींच्या आपदा लावी गाढी** ।' ( १७-२१३ ) अशा प्रकारचा असतो, असा त्यावर नाथांनीं अभिप्राय दिला आहे. श्रद्धा चांगली खरी; पण अधर्म हाच आमचा धर्म आहे अशी ज्याची श्रद्धा असेल, त्या श्रद्धेला काय म्हणावें?

**अधर्म तोचि मानी धर्म । हें तामसी श्रद्धेचें वर्म ।**

ए. भा. २५-३६४

या वचनांत नाथांनीं यास तामसी श्रद्धा म्हटलें आहे व तें अगदीं उचित आहे.

**वर्णाश्रम स्वधर्म लक्षण । सर्वांस जाण निष्ठा ही एक ॥**

ए. भा. १७-३५९

ही नाथांची भूमिका आहे. यावरून नाथ वर्णाश्रमवादी म्हणजे आजच्या कल्पनेप्रमाणें वैषम्यवादी होते, मानवधर्माची समता त्यांना मान्य नव्हती असा आक्षेप सहजच कोणी घेईल, तर तो अज्ञानमूलक ठरेल. नाथांच्या चरित्रांत त्यांनीं सर्वाभूतीं समत्व कसें पाहिलें, याचे अनेक दाखले आहेत. अंत्यजांच्या बाबतींत देखील त्यांची वागणूक भूतदयेची व समतेची होती. भागवत टीकेंत नाथांनीं प्रत्येक वर्णाची पृथक् कर्तव्यें सांगत असतांहि सर्व वर्णांचा म्हणून समान धर्म सांगितलाच आहे.

**अहिंसा सत्यमस्तेयमकामक्रोधलोभता ।**
**भूतप्रियहितेहाच धर्मोऽयं सार्ववर्णिकः ॥**

भागवत १७-२१

यावरील व्याख्यानांत हा पक्ष नाथांनीं फार उत्तम रीतीनें मांडला असून प्रत्येक गुणाची फोडहि अप्रतिम केली आहे व शेवटीं

**अहिंसादि सप्त लक्षण । हा सर्वांचा स्वधर्म जाण ।**
**सर्व आश्रम सर्व वर्ण । त्यासि मुख्यत्वें जाण हा धर्म ।।**

ए. भा. १७-२६५

असा उपसंहार केला आहे. किंबहुना वैष्णवाचें लक्षण सांगतांना जाति अप्रमाण आहे हा सिद्धान्त ज्ञानेशाप्रमाणेंच नाथांनींहि पुनः पुनः सांगितला आहे.

**वैष्णव सेवा अति कठीण । तेथें जाति नाहीं गा प्रमाण ।**
**न म्हणावा शूद्र ब्राह्मण । भक्ति प्राधान्य भावार्थें ।।**

ए. भा. ११-१३९५

**जाति उत्तम भक्तिहीन । तो वैष्णव नव्हे जाण ।**
**अथवा करी दांभिक भजन । वैष्णवपण त्या नाहीं ।।**

ए. भा. ११-१३९९

**वैष्णव मानी जाति प्रमाण । तो पापिष्ठ जाण सर्वथा ।।**

ए. भा. ११-१४००

**.................. । सांडून जातीचा अभिमान ।**
**जो मज होय अनन्य शरण । वैष्णव जाण तो माझा ।।**

ए. भा. ११-१४०१

हीं वचनें नाथांची समत्वबुद्धि सिद्ध करण्यास पुरेशीं बोलकीं आहेत.

अशा प्रकारच्या स्वधर्मानुष्ठानाची आवश्यकता काय? हा यापुढील प्रश्न आहे. नाथांनीं त्याचेंहि उत्तर निःसंदिग्ध दिलें आहे. लोकसंस्था रक्षणीय आहे, ती नीट चालावी म्हणून स्वधर्मानुष्ठान पाहिजे.

**स्वधर्म जरी लोपला । तरी सर्व सुखाचा थारा मोडला ।**

ज्ञाने. ३-११०

असें ज्ञानेशांचें प्रतिपादन आहे. नाथांचाहि अर्थात् तोच पक्ष आहे हें सांगणें नकोच. श्रीमद्भागवत अ. २ श्लो. १२ मध्यें नारद वसुदेवाला भागवत

धर्माची महती सांगतांना '**सद्यः पुनाति सद्धर्मो ।**' अशी धर्मप्रशस्ति करतात. नाथांनीं या श्लोकावरील केलेलें व्याख्यानहि फार सरस उतरलें आहे. धर्मानुष्ठानानें मनुष्य त्वरित पुनीत होतो हा धर्माचरणाचा फार मोठा लाभ आहे, याबद्दल कोणाचेंहि दुमत होणार नाहीं.

**स्वधर्म करितां स्वभावता । निजमोक्ष लाभे आयता ।**

ए. भा. १७-५६

**वर्णाश्रमी जे कोणी नर । त्यासी स्वधर्मचि मोक्षकर ।**

ए. भा. १७-६१

हा आध्यात्मिक लाभ कोणाला दूरचा वाटेल, पण

**अन्तरशुद्धयर्थ शौच पूर्ण । स्वधर्माचरण हरि सांगे ॥**

ए. भा. १९-४६७

या शुचितेची आवश्यकता तर व्यवहारांतहि नित्य पडतेच ना !

**व्हावया दोष निवृत्ति । वेदे द्योतिली धर्मप्रवृत्ति ।**

ए. भा. १९-५८५

हें कारण अगदीं आधुनिकांसहि पटण्यास हरकत असूं नये. आपली दोष-निवृत्ति व्हावी, गुणपरिपोष व्हावा, आपण उत्तरोत्तर निर्मल होत जावे, अशी इच्छा नसणारास मनुष्यच म्हणतां येणार नाहीं. पुढें होणारा कल्कि अवतार दुष्ट-निर्दालन करून महामोहाचें मूळ उच्छेदील हें सांगतांना नाथ म्हणतात,

**तेव्हां धर्माची पाहाट फुटे । सत्यासी सत्त्व चौपटे ।**

ए. भा. ४-२८२

याचा अर्थ असा कीं धर्मोदयानंतर सत्याला चौपट सत्त्व लाभते. 'सत्यमेव जयते' हें वचन खरें व्हावयाचें असेल तर धर्मानुष्ठानानेंच तें खरें होईल, एऱ्हवीं नाहीं, हा याचा आशय आहे.

नाथभागवतावरून सिद्ध होणारी नाथांची धर्मकल्पना व त्या धर्मानु-ष्ठानाची आवश्यकता वर प्रतिपादन केली आहे. पण आजच्या काळाला हें कसें शक्य आहे ? असा प्रश्न उत्पन्न होईल. पूर्वीचे वर्णाश्रमधर्म आज तंतोतंत तसे राहिले नाहींत. गुणकर्मविभाग करणें आज कठीण झालें आहे. यांत्रिक युगानें

जुनी समाजव्यवस्था कोलमडून पडत आहे. नवीन अनेक समस्या उत्पन्न होत आहेत. वेदप्रामाण्य मानणाराच तेवढा धार्मिक व इतर सर्व अधार्मिक असा एकान्तिक पक्षहि आतां घेतां येणार नाहीं इत्यादि अनेक शंका आपल्यापुढें येतात. त्याचें उत्तर दिलें पाहिजे. नाथांच्या काळींहि जुने वर्णाश्रमधर्म शबल झाले होते, तरीहि त्यांनीं त्यांचें प्रतिपादन केलें. तेव्हां आज तसें प्रतिपादन करण्यास हरकत कां यावी? राष्ट्राचा गाडा सुरळीत चालण्यासाठीं कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत वर्णाश्रम राहणारच आहेत. मग त्याला श्रमविभाग, अर्थव्यवस्था अशीं नवीं नांवें खुशाल द्यावीं! विशिष्ट ग्रंथप्रामाण्य न मानलें तरी अहिंसादि सार्ववर्णिक धर्म तर आचरणें प्राप्तच आहे ना! तेवढ्या प्रमाणांत तरी प्रत्येकास धार्मिक होणें प्राप्तच आहे. धर्म आणि नीति कोणी परस्परनिरपेक्ष मानतात. आपल्या पूर्वजांनीं तसें मानलें नाहीं. नीति ही धर्मप्रेरित असेल तरच स्थिर होते. आज आमच्या राष्ट्रास या नीतिमत्तेची अत्यंत गरज आहे. स्वातंत्र्य मिळून एक तपाहून अधिक काळ लोटला. पण या काळांत आमचा शतमुख विनिपात होत राहावा याचें कारण आम्ही स्वधर्मच्युत होत आहोंत हेंच नव्हे काय? स्वधर्मानुष्ठान म्हणजे कर्तव्याचें आचरण असें म्हटलें तर आज हें आमचें कर्तव्य कसें निश्चित करणार? ग्रंथप्रामाण्य, आप्तवाक्यप्रामाण्य इत्यादि गोष्टी सध्यां बाजूला ठेवून साधी कसोटी लावून याचा विचार करूं. प्रत्येक व्यक्ति कर्तृत्व, परिस्थिति, पूर्वसंचित इत्यादींचा संकलित परिणाम म्हणून कोठें तरी स्थिर होते. त्या त्या क्षणीं त्या व्यक्तीचें म्हणून कांहीं खाजगी व सार्वजनिक कर्तव्य निश्चित होतें. तें कर्तव्य त्या त्या व्यक्तीस अभिमत किंवा प्रिय असतेंच असें नाहीं. तरीहि तत्तत्कालविशिष्ट कर्तव्य धर्मबुद्धीनें करीत राहणें ही किमान असली तरी फार मोठी धार्मिकता आहे.

**जेवीं कां सोंगे नटनटी। दाविती हावभाव नाना गोठी।**

ए. भा. १९-५८६

या नाथवचनाप्रमाणें नटनटी जशी आपली भूमिका पार पाडतात, अशी आपापल्या कर्तव्याची भूमिका पार पाडली तरी पुरें आहे. प्रत्येक व्यक्ति धार्मिकपणें आपापलें कर्तव्य पार पाडील तर सर्व राष्ट्रच उन्नतावस्थेस येईल. राजसत्ता ही शरीरावर चालते, पण धर्मसत्ता ही आत्म्यावर चालते. धर्मसत्तेनें मनुष्य स्वयं नीतिमान होतो. राजसत्तेनें आपल्या कायद्यांनीं उत्पन्न केलेली नीतिमत्ता ही ढोंगास

कारणीभूत होते. आणि म्हणूनच आपल्या देशांत धर्मसत्तेचें अधिराज्य सर्वत्र मानलेलें आहे. धर्मानुष्ठानाची ही किमान आवश्यकता नाथकृपेनें सर्वांस पडो अशी सदिच्छा व्यक्त करून हा लहानसा लेख संपवितों.

---

## भागवत प्राकृत झालें तरी तें निजज्ञानाचा ठेवाच आहे.

जेविं सूर्याचेनि प्रकाशें । सूर्येंचि कीं सूर्यो दिसे ।
तेविं माझेनि निजप्रकाशें । मज मीचि असें देखत ॥
ऐसियाहि ठायीं जाण । कैंचें नवें जुनें ज्ञान ।
बहु काळ ठेविलें सुवर्ण । त्यासी म्हणे कोण कोहिजकु ॥
कालचाचि आजि उगवला । तो सूर्य काय म्हणावा शिळा ।
कीं आजिचा अग्नि सोंवळा । कालिचा काय ओंवळा म्हणों ये ॥
तेविं सनकादिकांचें जें ज्ञान । तेंचि मराठी भाषेमाजीं जाण ।
येथें ठेवूं जातां दूषण । दोषी आपण होइजे ॥
कां सुवर्णाचें केलें सुणें । परि तें मोलें नव्हेचि उणें ।
तेविं सनकादिकांचीं ज्ञानें । देशभाषा हीनें नव्हतीच ॥
जेविं कां गुळाचें कारलें केलें । परी तें कडूपणा नाहीं आलें ।
तेविं हंसगीत मराठें झालें । नाहीं पालटलें चिन्मात्र ॥
जें मोल मुकुटींच्या हेमासी । तेंचि मोल सुवर्णश्वानासी ।
जो कां ग्राहिक सुवर्णासी । दोघे दोघांसी समत्वें ॥
तैसें आत्मानुभवी जे येथें । ते मानितील या ग्रंथातें ।
येर ते हेळसितील यातें । निजभावार्थें न घेती ॥
जे वंदिती कां निंदिती । ते दोघे आम्हां ब्रह्ममूर्ती ।
हे निजात्मभावाची प्रतीती । केली निश्चितीं जनार्दनें ॥
तेथें एका आणि जनार्दन । एक झाले हें म्हणे कोण ।
जेविं डोळयांचें देखणेपण । डोळाचि आपण स्वयें जाणे ॥
डोळयांनीं आरिसा प्रकाशिजे । तेथें डोळेनि डोळा पाहिजे ।
तेविं हें ज्ञान जाणिजे । देखणें देखिजे देखणेनि ॥

ना. भा. अ. १३-७६९ ते ७७, ७९, ८०

---

# संतसंग महत्त्व

: लेखक :

वे. शा. सं. **आत्मारामशास्त्री जेरे**

( प्राध्यापक, तत्त्वज्ञानमंदिर, अंमळनेर )

सर्व लोक सुखाची इच्छा करतात व त्याकरितां निरंतर धडपड करीत असतात. ' सुख नको ' असें म्हणणारा जीव त्रिभुवनांत धुंडाळल्यास सांपडणें कठीण !

स्वभावतः सर्वच सुख निसर्गसुंदर व म्हणूनच तें स्वात्मरूप आणि अतिशय प्रियतम असेंच आहे. प्रत्येकाला स्वात्मा हा अतिशय प्रिय आहे. याचें कारणसुद्धां तो अनुकूल वेदनीय सुखस्वरूप आहे हेंच आहे. " **आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति** ।" म्हणजे जगांतील सर्व प्रिय वस्तु आपल्या सुखाला अनुकूल होतात म्हणूनच आपल्याला त्या आवडतात. परंतु आपण आपल्या स्वतःला जे आवडतो ते मात्र आपण म्हणून, म्हणजे सुखस्वरूप म्हणून. अत्यंत दुःखकाळीं किंवा संकट-काळीं आत्महत्या म्हणजे अत्यंत प्रिय मानलेल्या शरीराचा त्याग करण्यास उद्युक्त झालेल्या माणसास तरी दुःखदायक शरीरत्यागानें आपलें निर्मळ सुख आपणांस मिळेल अशीच कल्पना असते व ती तत्त्वतः योग्यच आहे. परंतु केवळ आत्महत्या केल्यानें असें निर्मळ सुख मिळेल ही त्याची कल्पना चुकीची असल्यानें शास्त्र व लोकदृष्टया आत्महत्या करणारा निंद्य व पापी समजला जातो एवढेंच !

जागृतींत, स्वप्नांत, निद्रेंत किंवा सविकल्प वा निर्विकल्प समाधींत एका-पेक्षां एक अधिक अशीं जीं सुखें जीवाला अनुभवाला येतात, तीं सारीं सुखें अभ्युदय कोटींतच गणलीं जातात. कारण त्या त्या अवस्थेचा नाश झाल्याबरोबर तीं तीं सुखेंहि नाहींशीं होतात. मनुष्यानंदापासून तों हिरण्यगर्भानंदापर्यंतच्या आनंद मीमांसेंत ज्या आनंदाचें म्हणजे सुखाचें वर्णन आलें आहे तें सर्व सुख शरीरेंद्रियादि उपाधि सापेक्ष तारतम्ययुक्त व विनश्वर असेंच आहे. आरशांत पडलेल्या सूर्याच्या प्रतिबिंबाप्रमाणें हें अनेक उपाधींत प्रकट झालेलें सोपाधिक सुख स्वरूपसुखाचा आभास आहे. आकाशांतील सूर्याप्रमाणें मूळ स्वरूपसुख ' सत् '

म्हणजे त्रिकालाबाधित व ' चित् ' म्हणजे स्वयंप्रकाशमान ज्ञानरूप आहे. म्हणूनच आत्म्याचें ' सच्चिदानंद ' असें लक्षण श्रुत्यादि प्रमाणांनीं सांगितलें आहे. हें स्वरूप-सुख नित्य निरंतर सर्वोत्तम व साधननिरपेक्ष सहजसिद्ध निजरूप असें आहे. प्रत्येक प्राणिमात्राचा आत्मा म्हणजे हें सुख आहे. परंतु अनादिकालापासून चालत आलेल्या या अबोधाच्या साम्राज्यांत तें स्वत:चें सुखच स्वत:स पारखें झालें आहे व औपधिक सुखासच सुख म्हणण्याची वहिवाट पडली आहे. सूर्यकांत मण्यांतून लांकडावर पडलेल्या सूर्यकिरणांना अग्नि अशी संज्ञा व्यवहारांत रूढ झाली व त्याचेंच स्तोम सर्वत्र माजलें! बिचाऱ्या सूर्यास अग्नि म्हणावयास कोणीहि तयार नाहीं, उलट विरोधच आहे. परंतु तत्त्वत: सूर्यच अग्नीचें मूळस्वरूप आहे व तें निरपेक्ष, नित्य असें अग्नीचें स्वरूप आहे इकडे कोणाचेंहि लक्ष नाहीं. हा केवढा अन्याय! परंतु अबोध साम्राज्यांत असें झाल्यास कांहीं नवल नाहीं. सूर्यकिरणावर भासणाऱ्या औपाधिक जलाच्या म्हणजे मृगजळाच्या मागें लागून कोणत्याहि मृगाची तृषाशांति झालेली ऐकिवांत नाहीं, केवळ धांवण्याचें दु:ख मात्र त्याच्या पदरीं पडलेलें प्रत्यक्ष दिसतें. त्याचप्रमाणें आजपर्यंत यावज्जीव व निरंतर या औपाधिक सुखाकरितां धडपडणाऱ्या जीवाला शांति वा सुख झाल्याचें श्रुत नाहीं. उलट जन्ममरणाच्या फेऱ्याचे श्रम मात्र अनुभवास येतात. ही याची दूरवस्था नष्ट होऊन खऱ्या स्वात्मसुखाचा लाभ जीवाला व्हावा म्हणून प्रत्यक्ष परब्रह्मच सगुण रूप धारण करून या जगांत अवतीर्ण होतें. त्या स्वरूपालाच ' संत ' अशी संज्ञा आहे.

संतांना ' माउली ' ही पदवी आहे. गाढ झोपेंत भयंकर दु:खद स्वप्न पडून त्यामुळें त्रस्त होऊन बरळणाऱ्या आपल्या मुलाला जागें करून त्याचें सर्व दु:ख नाहींसें करून माता जशी त्याला सुखी करते, त्याचप्रमाणें संत माउली अज्ञान निद्रेंत घोरत पडलेल्या व जाग्रत्स्वप्नसुषुप्त्याद्यवस्थारूपी स्वप्नांत आध्या-त्मिकादि त्रिविध तापांनीं त्रस्त होऊन तळमळणाऱ्या जीवाला ' महावाक्य ' उपदेशरूपी शब्दानें स्वस्वरूपांत जागें करून त्याला दु:खरहित व सुखरूप करते. एवढे महदुपकार संतांचे जीवावर आहेत. त्याची फेड करणें अशक्य आहे. म्हणूनच

**काय वानूं मी या संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ॥**

असे संतांचेच उद्गार आहेत.

परंतु संतसंगति करावयाची झाल्यास संतांना ओळखलें पाहिजे व लक्षणाशिवाय त्यांची ओळख होणें कठीण आहे.

जटा, भगवीं वस्त्रें, विभूती, माळा, टिळे वगैरे संतांजवळ आढळून येणारीं बाह्यचिन्हें पाहून संत ओळखूं गेल्यास जिज्ञासूंची फसवणूक होण्याचा बऱ्याच अंशीं संभव आहे व हींच चिन्हें संतांजवळ कदाचित् दृग्गोचर होत असलीं तरी तीं कांहीं त्यांचीं लक्षणें नव्हेत. लक्षण म्हणजे अतिव्याप्त्यादि दोषानें रहित असावें लागतें. संतांजवळ क्वचित् दिसणारीं हीं चिन्हें नाटकांतील नट किंवा जगवंचक ढोंगीसुद्धां धारण करूं शकतो. अर्थात् या लक्षणांत अतिव्याप्ती अव्याप्त्यादि दोष असल्यानें यावरून संत ओळखतां येणार नाहींत. शिवाय सर्व संतांची बाह्यस्थिति एकरूप कधींच नसते. संतांची बाह्यस्थिति एकरूप नसते असें सांगतांना स्वाराज्यसिद्धिकार

**कोऽपि वर्णाश्रमाचारनिष्ठापरा मुग्धबालप्रमत्तो पमाश्चापरे ।**
**रागिणो भोगिनोयोगिनश्चेतरे ज्ञानिनां लक्ष्यते नैकरूपास्थितिः ॥**

असें या श्लोकांत सांगतात. वासिष्ठादि संत वर्णाश्रमाचारानुष्ठानतत्पर दिसतात. जडभरत, दत्तात्रेय प्रभृति संत बालोन्मत्त पिशाचादि प्रमाणें वागतात. सौभरि, जनकादि संत सर्व सिद्धींनें समृद्ध असल्यानें गृहासक्त प्रापंचिकाप्रमाणें रहातात तर जैगीषव्य वगैरे संत समाधिनिष्ठ योग्याप्रमाणें असतात. अर्थात्च बाह्य परिस्थितीवरून संत ओळखणें हा कांहीं खरा उपाय नव्हे. म्हणूनच श्रीभगवंतांनीं उद्धवाला एकादश स्कंधांत संतांची ओळख अंतरंग लक्षणांनीं करून दिली आहे. हीं लक्षणें मात्र सर्व संतांजवळ अवश्य असलींच पाहिजेत. कारण हीं लक्षणें म्हणजे अव्याप्तिअतिव्याप्तिअसंभवदोषरहित त्यांचीं चिन्हें आहेत. या लक्षणांवरून जिज्ञासु संतांचा परिचय अवश्यमेव करून घेतील व त्यांत ते बिलकुल फसणार नाहींत. भगवान् म्हणतात,

**संतोऽनपेक्षा मच्चित्ताः प्रशान्ताः समदर्शिनः ।**
**निर्ममा निरहंकारा निर्द्वंद्वा निष्परिग्रहाः ॥**

भा. स्कं. ११, अ. २६, श्लो. २७

वरील श्लोकांत सांगितलेलीं संतांचीं मुख्य आठ लक्षणें आहेत. आतां या श्लोकाची व्याख्या सर्वसंतशिरोमणि अशा श्रीनाथमहाराजांच्याच शब्दांत आपण पाहूं या.

**संतांचे अमित गुण । त्यांत मुख्यत्वें अष्ट लक्षण ।**
**निवडूनि सांगे श्रीकृष्ण । ते कोण कोण अवधारा ॥१६॥**
**प्राप्त अप्राप्त लाभावस्था । बाधूं न शके साधूच्या चित्ता ।**
**चित्त रातलें भगवंता । निरपेक्षता या नांव ॥ १७ ॥**
**पैल विषयो मज व्हावा । ऐसा आठव नाठवे जीवा ।**
**हा साधूचा निरपेक्ष ठेवा । जाण उद्धवा गुण पहिला ॥ १८ ॥**

नाथ म्हणतात, संत हे अनंत गुणरत्नाकर आहेत. त्यांतून सर्व रत्नांचा संग्रह करणें मानवाला अशक्य आहे. म्हणून भगवंतांनीं त्यांतून अत्यावश्यक अशीं आठ रत्नें निवडून संग्रहार्थ मानवाच्या हवालीं केलीं आहेत. त्यांतील पहिलें रत्न निरपेक्षता हें आहे. आपणांस मिळालेल्या वस्तूंबद्दल ही अशीच माझ्याजवळ रहावी व न मिळालेल्या वस्तूंबद्दल ती मला मिळावी अशी इच्छा ज्यांच्या चित्ताला केव्हांहि पीडा देऊं शकत नाहीं, कारण सच्चिदानंद परमात्मस्वरूपांत ज्यांचें चित्त रममाण झाल्यानें जे निरंतर तृप्त आहेत, त्याचप्रमाणें प्राप्त किंवा अप्राप्त भोगाविषयीं जे निरिच्छ असतात किंबहुना आपल्या आनंदमग्न अवस्थेमुळें ज्यांना त्या भोगाची आठवणसुद्धां होत नाहीं, अशा अवस्थेस निरपेक्षता असें नांव आहे व ही निरपेक्षता संतांचें पहिलें लक्षण आहे. संतांजवळ हें लक्षण असलेंच पाहिजे. निरपेक्षता हेंच संतांचें संतपण आहे. बोधामृतानें तृप्त झाल्याशिवाय अशी निरपेक्षता बाणणेंच कठीण आहे.

संतांचा दुसरा गुण म्हणजे ‘ मच्चित्ताः ’ हा आहे. भगवान् म्हणतात, संत हे नेहमीं माझ्या ठिकाणीं चित्त ठेवणारे असतात. त्यांच्या चित्तांत माझ्यावांचून दुसऱ्या पदार्थांचा प्रवेशच होत नाहीं. कारण भगवत्स्वरूपानें चित्त भरलें असल्यानें इतर पदार्थांस तेथें रहाण्यास जागाच नसते. त्यामुळेंच संत निरपेक्ष झालेले असतात. निरपेक्षतेचें साधन म्हणजे भगवच्चित्तता हें आहे. निरपेक्षता हें त्याचें साध्य आहे. म्हणून नाथ म्हणतात,

**चित्तें चिंतावें चैतन्य । याचि नांवें मच्चित्तपण ।**
**याचि नांवें निरपेक्षा पूर्ण । इतर चिंतन भवबंधू ॥ १९ ॥**
**निरपेक्ष व्हावया येथ । जागृति स्वप्न सुषुप्ति आंत ।**
**चिन्मात्रीं जडलें चित्त । या नांव मच्चित्त गुण दुजा ॥ २० ॥**
**देह झालिया लक्ष्मीयुक्त । अथवा हो कां आपद्युक्त ।**
**चित्त परमानंदीं निश्चित्त । या नांव मच्चित्त उद्धवा ॥ २१ ॥**

जागृति, स्वप्न व सुषुप्ति या सर्व अवस्थांत एक अद्वितीय अखंड चैतन्याचें म्हणजे स्वस्वरूपाचें अनुसंधान असणें यालाच भगवच्चित्तता असें म्हणतात. जागृतींत व स्वप्नांत वृत्तिरूपानें व सुषुप्तीमध्यें संस्कार रूपानें चित्ताच्या अत्यंत सूक्ष्म स्वरूपांत संतांचें भगवच्चिंतन चालूंच असतें. जनाबाईच्या गोवऱ्यांतून 'विठ्ठल विठ्ठल' असा व अर्जुन झोंपी गेला असतां त्याच्या रोमरोमांतून 'कृष्ण कृष्ण' असा शब्द ऐकूं येत असल्याचें जें सांगतात तें या भगवच्चित्ततेचें द्योतकच आहे. अशी भगवच्चित्तता झाल्यावर त्याच्या देहाला अनेक प्रकारानें शृंगारलें किंवा कदर्याख्यानांतील कद्रूच्या देहाप्रमाणें अनेक उपद्रवानें पीडित केलें तरी निद्रित माणसाजवळ बसलेल्या उर्वशी व सर्प या दोहोंची किंमत त्या निद्रितास जशी सारखीच असते, तशी संतांना संपत्ति व आपत्ति दोन्हीहि सारख्याच असतात. ते भगवंताच्या रंगांत रंगलेले असतात. पूर्व संस्कारानें त्यांचे बाह्य व्यवहार आपाततः चालू असतात.

**लक्ष चरणीं ठेवुनि सुखें करा संसार ।**
**आज्ञा सांगुनि धाडी माझा स्वामी चिदंबर ॥**

अशी उक्ति परमशिवचिदंबर दीक्षित महाराजांचे शिष्य भक्तशिरोमणी राजाराम महाराजांची आहे, ती अगदीं यथार्थ आहे. याप्रमाणें भगवच्चित्तता हा संतांच्या ओळखीचा दुसरा गुण झाला.

अनपेक्षता हा गुण भगवच्चित्तता या गुणानें साध्य आहे व भगवच्चित्तता अनपेक्षता या गुणानें साध्य आहे. याप्रमाणें हे आठहि गुण परस्पर साध्य व साधन असें असल्यानें त्यांचें संपादन करणें फार कठीण झालें आहे. योगवासिष्ठांत

**तत्त्वज्ञानं मनोनाशो वासनाक्षय एव च ।**
**मिथः कारणतां गत्वा दुःसाध्यानि स्थितानि हि ॥**

असें म्हटलें आहे. म्हणजे तत्त्वज्ञान, मनोनाश व वासनाक्षय हे परस्परांचें कार्य व कारण होऊन जसे दुःसाध्य झाले आहेत, तद्वतच येथेंहि समजावयाचें आहे. संतांचीं जीं लक्षणें आहेत, तीं साधकांचीं साधनें आहेत. साधकांनीं तीं सर्व हस्तगत केलीं पाहिजेत व त्याकरितां त्याचें विस्तृत असें स्पष्टीकरणहि पाहिजे आहे. परंतु तेवढें स्थळ व काळ नसल्यानें इतर सहा लक्षणें नाथांच्या परम गंभीर अशा मूळ ओंव्यांतच देऊन संतलक्षणप्रकरण आटोपतें व्यावयाचें आहे. नाथांनीं म्हटलें आहे,

कामलोभादि दोषरहित । परमानंदीं जडलें चित्त ।
शांति सुखवासें वसे तेथ । यालागीं प्रशान्त बोलिजे त्यासी ॥२२॥

जरी प्राणांत केला अपकार । तरी न म्हणे हा दुष्ट नर ।
अपकाऱ्या करी उपकार । प्रशांति प्रकार या नांव ॥ २३ ॥

जरी ठाकूनि सर्वस्व नेलें । तरी क्षोभे ना दोष बोले ।
तें जाण ब्रह्मार्पण झालें । येणें अंगा आलें प्रशान्तत्व ॥ २४ ॥

ब्रह्मभावेंचि तत्त्वतां । विश्वासणें सर्व भूतां ।
कदा विकल्प नुपजे चित्ता । हे प्रशान्तता गुण तिजा ॥ २५ ॥

ऐसा प्रशान्त गुण । अंगीं बाणावया हेंचि कारण ।
जगीं देखे समदर्शन । ब्रह्म परिपूर्ण समसाम्यें ॥ २६ ॥

जग पाहतां दिसे विषम । परी विषमीं देखे समब्रह्म ।
तोचि समदर्शी परम । हा गुण निरुपम पैं चौथा ॥ २७ ॥

हे समदृष्टी यावया हातां । भावें भजोनि भगवंता ।
निःशेष त्यजिली अहंममता । तेही कथा अवधारीं ॥ २८ ॥

देहीं धरितां देहाभिमान । ते अहंता वाढवी मीपण ।
मीपणें ममता जाण । वाढे संपूर्ण देहसंबंधें ॥ २९ ॥

जे वाढली अहंममता । ते वाढवी महादुःख वार्ता ।
तेचि निवारावया निजव्यथा । सद्भावें माथा गुरुचरणीं ॥ ३० ॥

गुरुकृपा झालिया पूर्ण । माझें देहींचें जें मीपण ।
तें उकलोनि दावितां जाण । जग संपूर्ण मी एक ॥ ३१ ॥

ऐसा मीपणें परिपूर्ण । तेथ मी म्हणावया म्हणते कोण ।
निःशेष निमालें मीतूंपण । निरभिमान या नांव ॥ ३३ ॥
ऐसें माझें मीपण पाहतां । समूळ हारपली ममता ।
हें माझें म्हणावया पुरता । ठाव रिता नुरेचि ॥ ३४ ॥
निर्मम निरभिमान । तें हें उद्धवा गा संपूर्ण ।
पांचवें सहावें लक्षण । संतांचें जाण निजगुह्य ॥ ३७ ॥
ऐसे निर्मम निरहंकार । जे होऊनि ठेले साचार ।
त्यांसी द्वंद्वदुःख डोंगर । अणुमात्र बाधीना ॥ ३८ ॥
देह अदृष्टाच्या वांटा । लागतां सुखदुःखांच्या झटा ।
तो ब्रह्मसुखाचे चोहटा । देहाचा द्रष्टा होऊनि वसे ॥ ३९ ॥
जो निर्मम निरभिमान । त्यासी नाहीं भेदभान ।
अभेदीं मिथ्या द्वंद्वबंधन । हा सातवा गुण निर्द्वंद्व ॥ ४४ ॥
जो निर्द्वंद्व निरभिमान पहाहो । त्यासी समूळ मिथ्या निजदेहो ।
तेथ देहसंबंधें परिग्रहो । उरावया ठावो मग कैंचा ॥ ४५ ॥
स्वजन धन स्त्री पुत्रांसी । नांदोनि तो नातळे त्यांसी ।
स्वप्नींची घरवात जागृता जैसी । तैसा साधूंसि संसारु ॥ ४६ ॥
एवं परिग्रही असोन । साधू अपरिग्रही पूर्ण ।
हें आठवें मुख्य लक्षण । अतर्क्य जाण जगासी ॥ ४७ ॥
साधू परिग्रही दिसती । परी ते परिग्रही नसती ।
हेचि संतांची यावया स्थिती । त्यांची निजभक्ती करावी ॥ ४८ ॥
हें साधूंचें अष्ट लक्षण । तें ब्रह्मीचें अष्टांग जाण ।
कीं अष्ट महासिद्धी निर्गुण । ते हे अष्ट गुण साधूंचे ॥ ४९ ॥

याप्रमाणें नाथांच्या दिव्य व्याख्येंत संतांचीं आठ लक्षणें दाखविलीं. यांतील एक लक्षण पूर्णपणें ज्यांच्याजवळ आहे, त्यांच्याजवळ बाकीचीं सातहि लक्षणें असावयाचीच ! कारण त्याचें परस्पर सामनैयत्य आहे. या चिन्हांवरून संतांची पारख करून त्यांची संगति निरंतर केल्यास व अनन्य भावानें त्यांची सेवा भागवतांत गुरुसेवा प्रकरणांत नाथांनीं वर्णन केल्याप्रमाणें घडल्यास

आपणांसारिखे करिती तात्काळ । नाहीं काळवेळ तयालागीं ॥

या महदुक्तिप्रमाणें संत स्वभक्ताला स्वपदावर आरूढ करतात. याबद्दल बाराव्या अध्यायांत भगवंतांनीं '**सत्संगेनहि दैतेया।**' इत्यादि तिसऱ्या श्लोकापासून '**ब्रह्म मां परमं प्रापुः संगच्छत सहस्रशः।**' या तेराव्या श्लोकापर्यंत अनेक उदाहरणें दिलीं आहेत व सत्संगतीशिवाय इतर सर्व मोठालीं साधनेंसुद्धां अहंकारादि अनेक दोषग्रस्त असल्यानें आनंदकंद सच्चिदानंद अशा भगवंताच्या प्राप्तीला कारण होऊं शकत नाहींत. हेंहि त्याच अध्यायांत पहिल्या व दुसऱ्या श्लोकांत व त्यावरील नाथांच्या अत्यंत रहस्यमय व दिव्य अशा व्याख्यानांतच पाहण्यासारखें आहे. प्राणिमात्रांच्या चित्तांत अनादि कालापासून अखंड वसत असलेली शांतिसुख-समाधानाची इच्छा केवळ संतसंगतीनेंच परिपूर्ण होते. असें अन्वय व व्यतिरेकानें, तर्कशुद्ध पद्धतीनें या अध्यायांत स्वतः भगवंतांनींच वर्णित केलें असल्यानें संत-संगतीचें यापेक्षां अधिक महत्त्व कोण वर्णन करणार? संतसंगति मुख्य देहाचाच संग नाहींसा करते. म्हणून दुःखाचें मूळच नष्ट करणारी व त्यामुळें निर्मळ निजानंदाला देणारी अशी संतसंगति आहे. मदालसेनें अलर्काला '**सद्भिः सह सकर्तव्यः संतो दुःसंग भेषजम्।**' असा अत्यंत कळवळ्याचा उपदेश करून त्यायोगें त्याचें परम कल्याण केलें हें अलर्क चरित्रांत प्रसिद्धच आहे. अशा संतांची संगति सर्वांना सर्वदा लाभावी व सर्वांचें अखंड कल्याण व्हावें ही सदिच्छा आहे.

**संतचरणरज लागतां सहज। वासनेचें बीज जळोनि जाय॥ १॥**
**मग रामनामीं उपजे आवडी। प्रेम घडोघडीं वाढो लागे॥ २॥**
**प्रेमें कंठ दाटे नयनीं नीर लोटे। हृदयीं प्रगटे नामरूप॥ ३॥**
**तुका म्हणे साधन सुलभ गोमटें। परि उपतिष्ठे पूर्व पुण्यें॥ ४॥**

असें संतशिरोमणी श्रीतुकाराममहाराजांनीं संतसंगतीचें महत्त्व आपल्या वरील अभंगवाणीनें गाइलें आहे. तें सर्वांनीं हृदयांत ठेवण्यासारखें असल्यानें येथें दिलें आहे.



गोदातटाकीचें श्री एकनाथांचें समाधिमंदिर, पैठण

# भिक्षुगीता व तिची फलश्रुति

: लेखक :

अद्वैतवेदांतकार आचार्यभक्त पं. द. वा. जोग, उपनिषदतीर्थ

**ज्ञानमूर्तिं ज्ञानदेवं साक्षात् प्रेमस्वरूपिणम् ।**
**नामदेवं दयामूर्तिं नाथं वंदे पुनः पुनः ।। १ ।।**
**वैराग्यस्य परां मूर्तिं देहूक्षेत्र निवासिनम् ।**
**तुकारामं महाराष्ट्र भक्तराज चतुष्टयम् ।। २ ।।**

नाथभागवताच्या तेविसाव्या अध्यायांत लोकांचा तिरस्कार कसा सहन करावा आणि विवेकबुद्धीनें मनाचा संयम कसा साधावा हें उद्धवाच्या मनावर ठसविण्यासाठीं श्रीकृष्णांनीं भिक्षुगीता कथन केली. श्री भगवान् म्हणतात, " हे बृहस्पतीच्या शिष्या उद्धवा, खरोखरच या जगांत दुर्जनांनीं उच्चारलेल्या दुर्वचनांनीं क्षुब्ध झालेल्या मनास शांत करणारा किंवा करण्यास समर्थ असणारा साधु नाहींच. पोलादाच्या तीक्ष्ण बाणाचा वेध झाला असतां ती जखम प्राण व्याकुळ करते. जेथें बाण लागतो तेवढ्या भागाला पीडा होते. ती जखम औषधीनें बरी होते. पण दुष्टांच्या मर्मभेदक शब्दरूपी बाणांनीं अंतःकरणाला जास्त घरें पडतात. सगळ्या अंगाचा त्यामुळें भडका होतो आणि ते बाण जन्मभर टोंचीत राहतात. तथापि मी जो उपाय सांगणार आहें त्याच्या योगानें सर्व सहन करतां येणें शक्य आहे. ह्याविषयीं मी एक इतिहास सांगतों तो ऐक. "

माळव्यामध्यें कोणी एक अतिशय श्रीमंत, शेती व व्यापार या साधनानीं पैसे मिळविणारा कृपण, अति कामी, लोभी आणि क्रोधी असा ब्राह्मण रहात होता. हा ब्राह्मण स्वतः शिळेंपाकें खाई. स्त्री, पुत्र, सेवक इत्यादिकांना तो अर्धपोटीं ठेवी. नित्य नैमित्तिक कर्में करीत नसे. धर्मकृत्य तर त्याला स्वप्नांत ठाऊक नव्हतें. देव, ब्राह्मण आणि अतिथि यांना तो विमुख घालवीत असे. द्रव्यलोभामुळें तो अनेक पातकेंहि करीत असे. धनाला अडथळा आला तर त्याचा क्रोध उफाळून

येत असे. एखाद्या भूताप्रमाणें तो पैशाची राखण करीत असे. सगळे आप्त, हा केव्हां एकदां मरेल आणि आम्हांला पोटभर खायला मिळेल असें म्हणूं लागले. पुढें त्या ब्राह्मणाचें कांहीं धन त्याची स्त्री व पुत्र ही एक होऊन घेऊन गेली. गोत्रज हिस्सा घेऊन गेले. चोरांनीं तिजोरी लुटून नेली. घराला आग लागून पुष्कळ अमोलिक वस्तु जळाल्या. शेतावर कीड पडली. व्यापार बसला. विश्वासु कुळांनीं ठेवी बुडविल्या. अशा रीतीनें भाग्य त्याला पारखें झालें. त्याचा वर्ण पालटला. त्याचें ब्राह्मण्य नष्ट झालें. लोक तोंडावर निंदा करूं लागले. पोरें तोंडावर थुंकूं लागलीं. भीक मागूनहि त्याला कांहीं मिळेनासें झालें व तो अतिशय दुःखी झाला. त्याचा कंठ दाटून आला आणि त्याला तीव्र वैराग्य येऊं लागलें. तो कृपण म्हणाला, " अरे, अरे, मी आपल्या देहाला व्यर्थ ताप दिला. ब्राह्मणजन्म मिळूनहि मी कपाळकरंटा धनलोभाच्या भ्रांतीनें नाडला गेलों. मोक्षप्राप्तीला साधन असलेला मनुष्यजन्म मला मिळाला असून मी धनलोभानें नरक मिळविला. " अशा प्रकारें तो मूढ आपल्याच तोंडानें आपली निंदा करूं लागला. तो पुढें म्हणतो, " प्रायः कृपणांचें धन त्यांच्या सुखाला केव्हांहि कारण होत नाहीं, तर तें या लोकीं देहाला संताप देण्यास आणि धन असूनहि पुण्यकर्म न केल्यामुळें मरणोत्तर नरकाला कारण होतें. पहिल्यानें धन मिळविण्यासाठीं कष्ट सोसावे, नंतर वाढविण्यासाठीं श्रम करावे, रक्षणाची अहर्निश चिंता करावी आणि असें धन नष्ट झाल्यावर मनाला भ्रम व्हावा ! अशी धनाची अवस्था आहे. " तो ब्राह्मण म्हणतो,

**स्तेयं हिंसा नृतं दंभः कामः क्रोधः स्मयो मदः ।**
**भेदो वैरमविश्वासः संस्पर्धा व्यसनानि च ॥ १८ ॥**
**एते पंचदशानर्था ह्यर्थ मूला मता नृणाम् ।**
**तस्मादनर्थमर्थाख्यं श्रेयोर्थि दूरतस्त्यजेत् ॥ १९ ॥**

**अर्थः**— धनप्राप्तीसाठीं चोरी, हिंसा, खोटें बोलणें, दंभ, काम, क्रोध असे सहा व तें प्राप्त झालें असतां गर्व, मद, भेद, वैर, अविश्वास व स्पर्धा ही सहा व स्त्री, द्युत, मद्य हीं तीन व्यसनें असे एकंदर पंधरा अनर्थ मनुष्याला धनामुळें प्राप्त होतात, असें मानलें आहे. म्हणून परम पुरुषार्थाची इच्छा करणाऱ्यानें या अनर्थाख्य अर्थाचा सर्वथा त्याग करावा.

अशा प्रकारें अर्थाचे पंधरा अनर्थ सांगून परलोकींहि धनवानांना अनर्थ-

प्राप्ति कशी होते तें ( श्लो. २२ ते २४ ) पुढील तीन श्लोकांत सांगितलें आहे. " कोट्यावधि जन्मांतील पुण्याईनें या कर्मभूमींत मनुष्यप्राप्ति होते. त्यांतहि उत्तम अशा ब्राह्मणाच्या सत्कुलांत जन्म होणें, हें फार मोठ्या पुण्याचें फल आहे. इंद्रादि देवहि अशा जन्माची इच्छा करतात. पण द्रव्यलोभाच्या भ्रांतीनें किंवा लौकिक प्रतिष्ठेच्या इच्छेनें जो भगवत्भक्ताची उपेक्षा करतो, त्याला अशुभ गति प्राप्त होते. तो नरकवास भोगून अत्यंत दुःखानें चौऱ्यांशी योनींत गर्भवासाच्या यातनांत पडतो. ज्यानें स्वधर्माचरणानें द्रव्य मिळविलें असतें, त्यानें तें सद्गुरूला अर्पण करावें. जो एकनिष्ठपणें गुरूची भक्ति करतो, त्याच्या दारांत चारी मुक्ती दासी होऊन उभ्या असतात. श्रीहरि त्याच्यापासून कधींहि दूर जात नाहीं. अशा प्रकारें संपत्तीचा व्यय केला असतां परमार्थ जोडतां येतो. परंतु स्वजनांना पीडा देऊन स्वतःच्या पोटाला न खाणारा धनिक खरोखर ब्रह्मराक्षसासारखा धनरक्षकच होय तो भिक्षु म्हणतो, " व्यर्थ धनाच्या इच्छेनें पुरुषार्थाकडे दुर्लक्ष करणाऱ्या माझें धन, वय व बळ गेलें. ज्याच्यायोगानें विवेकी पुरुष मुक्त होतात, तें माझें वित्तादि गेल्यावर मी आतां म्हातारा काय साधूं ! "

भिक्षु शोक करीत असतांना म्हणतो, " ज्या देहाला भोगांनीं वाढवावयाचें, तोच मुळीं नश्वर आहे. नाना प्रकारचे भोग घेत असले तरी देहाच्या मागचा मृत्यु टळत नाहीं. द्रव्यानें यज्ञयाग करून स्वर्गभोग मिळतील, पण तेहि अस्थिर आहेत. धनलोभ्याला आत्मसुख खरोखर प्राप्त होत नाहीं. मीहि तसाच मूर्ख होतो, पण दैवयोगानें सर्व द्रव्यच कसें गेलें पहा ! " विवेकानें संपन्न झालेला भिक्षु आनंदित होऊन म्हणतो, " मी पूर्वीं अत्यंत अभागी होतो, आतां भाग्यवान् झालों आहे. श्रीहरि संतुष्ट झाल्यामुळें मी विवेक, वैराग्याला प्राप्त झालों. भक्ताचें चित्त आपल्या-कडे लागावें म्हणून श्रीहरि अगोदर त्याची संपत्ति घालवितो आणि द्रव्यत्यागानें त्याची चित्तशुद्धि झाली कीं त्याला विवेकयुक्त वैराग्य प्राप्त होतें. श्रीहरीच्या कृपेला पात्र होईल असें पुण्याचरण या जन्मीं माझ्या हातून घडलें नाहीं. माझें पूर्व जन्मींचें फार मोठें जुनें ऋण देवापाशीं ठेविलें होतें. पूर्वजन्मीं मी सत्कर्म आचरिलें होतें, त्यामुळें श्रीकृष्ण संतुष्ट झाला. द्रव्यनाशामुळें जें दुःख झालें, त्यामुळें मला आत्मसुख प्राप्त झालें. भवसागर तरून जाण्यास विवेकयुक्त वैराग्य हें एक मोठें भक्कम जहाज आहे. माझ्या उरलेल्या आयुष्यांत अर्धा क्षणहि मी व्यर्थ घालविणार नाहीं. सुख-

दुःखांचा नाश करून टाकीन. वाया गेलेल्या आयुष्याची भरपाई करीन. उरलेल्या आयुष्यांत कळिकाळाचे दांत पाडीन. गर्भव्यथेचा कर्जरोखा फाडून टाकीन आणि मी मरणाचा घात करीन. आत्मज्ञानाचा हल्ला चढवून देहरूपी कारागृह फोडीन आणि सुखदुःखाची बेडी तोडून सायुज्य मुक्तीची पताका उभारीन. पूर्वी खट्वांग राजा शिल्लक राहिलेल्या मुहूर्तभर आयुष्यांत मुक्त झाला. त्या राजापेक्षां माझें आयुष्य थोडेतरी अधिक असणारच. देवतांच्या सहाय्यानें मी एका पळांत परमार्थ साधीन."

भगवान् म्हणतात, "मनानें असा निश्चय करून मालव देशांतील तो द्विजश्रेष्ठ भिक्षु अहंकार आणि ममकार या हृदयग्रंथी तोडून शांत मुनि झाला. ज्यानें शरीर, इंद्रियें आणि प्राण यांचें नियमन केलें आहे, असा तो भिक्षु पृथ्वीवर संचार करूं लागला. तो आसक्तिशून्य होऊन आपलें श्रेष्ठत्व प्रगट न करतां भिक्षेसाठीं नगरांत व गांवांत प्रवेश करूं लागला. त्या गांवांतील दुर्जन त्या वृद्ध मलीन भिक्षूला पाहून अनेक प्रकारच्या तिरस्कारांनीं त्याचा अपमान करूं लागले." ह्याविषयीं श्रीएकनाथ लिहितात, गांवांतील दुष्ट लोक त्याच्याभोंवतीं जमून त्याला टोंचून बोलूं लागले. एकानें दंड हिसकावून घेतला; दुसऱ्यानें कमंडलु लांबविला; कोणी त्याचें आसन, कोणी रुद्राक्षाची माळ, कोणी भगवी छाटी, कोणी नेसती लंगोटीहि सोडून नेली. इतका छळ केला तरी त्याला क्रोध आला नाहीं व तो तें सर्व मुकाट्यानें सोसूं लागला. एका दुष्टानें तो संन्यासी जेवत असतां त्याच्या डोक्यावर लघवी केली. तरी त्याच्या मनांत क्रोध उत्पन्न झाला नाहीं. दुर्जन म्हणूं लागले, हा संन्यासी कसा बोलत नाहीं तें पाहूं ! ते त्याच्या तोंडावर थुंकले, त्याला लाथा मारूं लागले, कांहींनीं त्याच्या दोन्ही नाकांत काड्या खुपसल्या. तरी त्याच्या चित्ताची शांति ढळली नाहीं. कोणी त्याच्या नाकाला चुना लावीत, कोणी तोंडाला काजळ फासीत. तरीहि त्याची शांति ढळत नाहीं हें पाहून त्याला ते दुर्जन सर्व बाजूनें ओढूं लागले. तेव्हां तो संन्यासी मनांत हंसून म्हणाला कीं यांतच या लोकांना काय सुख वाटत आहे पहा ! माझें प्रारब्ध मला हें भोगवीत आहे. नाहींतर यांचा माझा काय संबंध ! अशा क्षमाशील विचारानें त्यानें कोणाचेंहि मन दुखाविलें नाहीं. दैवानें प्राप्त झालेलें जें दुर्जनादिकृत, ज्वरादिनिमित्त व शितोष्णादि-कृत दुःख, तें जसें प्राप्त होईल तसें स्वतःला भोगलें पाहिजे. प्रारब्ध कर्माचे

भोग पांडवांना हरिहरांनीं सहाय्य केलें तरी सुटले नाहींत. नराधमांकडून जरी तो तिरस्कृत झाला तरी सात्त्विक धृतीचा आश्रय करून त्यानें पुढील गाथा म्हटली.

## भिक्षुगाथा

हे लोक माझ्या सुखदुःखाचें निमित्त नाहींत. देवता, आत्मा, ग्रह, कर्म व काळहि त्याचें निमित्त नाहीं. या संसारचक्राला जें सतत चालवितें तें मन हेंच काय तें सुखदुःखाचें कारण आहे, असें श्रुती सांगतात. ( ४३ ) अतिशय बलवान् मनच सत्त्व, रज, तम या तीन गुणांना निर्माण करतें. ह्या तीन गुणवृत्तींपासून सात्त्विक, राजस व तामस अशीं तीन प्रकारचीं कर्में उत्पन्न होतात. त्या कर्मांपासून देव, तिर्यक्, मनुष्य इत्यादि प्राणिजाति उत्पन्न होतात. ( ४४ ) संसार मनाचा आहे, आत्म्याचा नव्हे. कारण आत्मा निष्क्रिय आहे. अविद्येमुळें होणारा जो अध्यास, त्याच्यामुळें हा आत्म्याचा संसार आहे, तो स्वाभाविक नव्हे. सर्व क्रिया करणाऱ्या मनाचें नियमन करणारा परमात्मा आहे. तो स्वभावतः मनःक्रियासंग-रहित आहे. कारण तो ' हिरण्मय ' विद्याशक्तिप्रधान आहे. तो जीवाचा सखा म्हणजे नियंता आहे आणि साक्षित्वानें द्रष्टा आहे. अविद्येंत प्रतिबिंबित होणारा जीव मनापासून उत्पन्न होणाऱ्या सुखदुःखांना भोगतो. मनाचें जीवाशीं होणारें तादात्म्य कांहीं विलक्षण आहे. वास्तविक पाहिलें असतां जीव मनाचा नियंता आहे. पण तोच उलट मनाशीं एकरूप होतो व मनाच्या नसत्या सुखदुःखाच्या व्यथा आपल्या माथीं मारून घेऊन सोसतो. जीवाला मनानें संसारी बनविलें. पण त्यामुळें सुखदुःख आणि जन्ममरण जीवाच्या पाठीस लागलें. अशा त्या मनाचा निग्रह केला नाहीं तर जीवाची व्यथा केव्हांहि चुकणार नाहीं. ( ४५ ) दान, नित्य नैमित्तिक स्वधर्म, यम व नियम, श्रवण, एकादशी उपवास इत्यादि सद्व्रतें व दुसरीं सर्व कर्में मनोनिग्रहरूपी फळप्राप्तीचे उपाय आहेत. मनाचा निग्रह हाच श्रेष्ठ योग म्हणजे ज्ञान आहे. ज्ञानसंपन्न साधक जर फळाची आशा टाकून दाना-दिक कर्में आचरील, तर तीं कर्में चित्तशुद्धीच्या उपयोगी पडतील. परंतु ' माझी चित्तशुद्धि व्हावी ' अशी बुद्धि उत्पन्न होण्यासहि भगवानाची कृपा आधीं पाहिजे. ती मिळावयास माझी भक्ति ही मुख्य आहे. नामानें चित्तशुद्धि होते व आत्म-स्वरूपाची प्राप्ति होते. नामासारखें दुसरें साधन नाहीं. नामस्मरण संसार बंधाचा नाश करतें. आत्मस्वरूपाची प्राप्ति झाली कीं मन निश्चल होतें. त्याच्यापुढें सर्व

साधनें लाजतात. तेव्हां तेथें दानादिकांचें प्रयोजन सहजच खुंटतें. ( ४६ ) ज्याचें समाहित चित्त शांत झालें आहे, त्याला दानादिकांचा काय उपयोग ? निग्रहशून्य मनाचाच जर विनाश झाला तर त्याला दानादि साधनांनीं दुसरें कोणतें फळ मिळणार ? एखादा पोटभर जेवून तृप्त झाल्यावर त्याला सुग्रास अन्न वाढलें तर तो तें खात नाहीं; नुसता वास घेऊन उठतो. त्याप्रमाणें मनोजय केलेल्या साधकाला सर्व साधनें व्यर्थ होतात. गंगेला महापूर आलेला असतां पैलतीरावर जाणारा मोठ्या प्रयत्नानें होडीचें सहाय्य घेतो, पण पूर उतरला कीं, तो होडी टाकून देतो. त्याप्रमाणें ज्याचें मन कामक्रोधादिशून्य होऊन निर्विकल्पांत निश्चल होतें, त्याला दानादिकांची मुळींच आवश्यकता नाहीं हें निश्चित जाणावें. ( ४७ )

अहो ! पण दानादिकांच्या योगानें इतर इंद्रियांचा जय होणें हें फळ त्याला मिळेल अशी आशंका घेऊन भिक्षु सांगतो, इतर इंद्रियें किंवा त्यांचे अधिष्ठाते देव मनाच्या आधीनच झालेले आहेत आणि मन दुसऱ्या कोणालाहि वश होत नाहीं. हा मनोरूप देव योग्यांनाहि 'भीष्म' भयंकर आहे. कारण तो बलवानांहूनहि बलिष्ठ आहे. तेव्हां त्या मनालाहि जो स्वाधीन ठेवतो तोच देवांचाहि देव म्हणजे सर्व इंद्रियांना जिंकणारा होतो. दुसरा कोणीहि तसा विजयी होत नाहीं. मनाचा महिमा अगाध आहे, म्हणून त्याला 'देव' असें म्हणतात. मोठ्या भयानकांनाहि मनाचें भय वाटतें, म्हणून मनाला 'भीष्मदेव' म्हणतात. नाथ म्हणतात, त्याला ताब्यांत ठेवण्याची मार्मिक युक्ति तुम्हांला सांगतों. हिऱ्यानें जसा हिरा कापावा, तसें मनानें मनाला जिंकावें. जेव्हां गुरुकृपा पूर्णपणें संपादन करावी, तेव्हां हें साध्य होतें. कारण मन ही गुरुकृपेला आपण दिलेली दासी आहे. त्यामुळें मन नेहमीं सद्गुरूला भीत असतें तें सद्गुरुचरणीं अर्पण केलें कीं साधकाला संतोष देतें, हा या मनाचा एक मोठा उत्तम गुण आहे. तें एकदां परमार्थाकडे लागलें कीं चारी मुक्तींना दासी करतें आणि परब्रह्माला बांधून हातांत आणून देतें. मनच मनाचें प्रकाशक आहे. तेंच साधकहि आहे आणि बाधकहि आहे. जो मनोजयानें समर्थ असतो त्याला शांति सर्वस्वी विकलेली असते. त्रिभुवनांत मनोजय धन्य होय. ( ४८ ) जिंकण्यास कठीण व ज्याचे रागादि वेग असह्य आहेत, त्यामुळेंच मर्माला व्यथा देणारा अशा या मनोरूपी शत्रूला न जिंकतां जे कोणी मर्त्य माणसांशीं मिथ्या वैर करतात आणि त्यांत जे कोणी अनुकूल असतात त्यांना मित्र करतात व जे प्रतिकूल असतात

त्यांना उदासीन किंवा शत्रु करतात, ते मूढ होत. ( ४९ ) केवळ मनानें कल्पिलेल्या या देहाला ' अहम् ' असें मानून आणि पुत्रादिकांच्या देहाला ' हा माझा ' असें समजून ज्यांची बुद्धि विवेकशून्य झाली आहे अशीं माणसें ' हा मी आणि हा दुसरा ' अशा भ्रमानें, ज्याचा अंत लागत नाहीं अशा संसारांत भ्रमण करतात. नाथ म्हणतात, शुद्ध अग्नीवर घणाचे घाव बसत नाहींत; पण लोखंडाच्या संगतीनें अग्नीला ते मुकाट्यानें जसे सोसावे लागतात, त्याचप्रमाणें नित्य मुक्त परिपूर्ण आत्म्याला केवळ देहाभिमानामुळें जीवपणा प्राप्त होतो आणि मग त्या जीवाला जन्ममरण सहन करावें लागतें. या संसारांत क्लेश सोसतांना तो अतिशय दुःखी होतो, पण देहाभिमान सोडीत नाहीं व तो शेवटीं घोर नरकांत पडतो. हा दुस्तर संसार मनःकल्पितच आहे. मनच सुखदुःखाचें कारण आहे. ( ५० )

मनच दुःखाचें कारण आहे असें सांगून जन, देवता, आत्मा, ग्रह, कर्म व काल ह्या सहापैकीं कोणीहि दुःखाला कारण नाहीं हें पुढील सहा श्लोकांत सांगतात. लोक जननीच्या उदरांत जन्म घेतात म्हणून त्यांस ' जन ' असें म्हणतात. ते जन माझ्या सुखदुःखाचें सर्वथा कारण नाहीं. मनुष्य मनुष्याला पीडा देतो तेथें आत्म्याचा काय संबंध ! आत्मा देहाहून भिन्न आहे. दोन्ही माणसांचा देह भौतिक-जड असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं सुखदुःखाचें कर्तृत्व किंवा कर्मत्व असणें शक्य नाहीं. दोन्ही देहामध्यें परमात्म्याचें एकत्व असल्यामुळें पीडा देणारा देह, पीडिला जाणाऱ्या देहाच्या कोपाचा विषय होत नाहीं असें दृष्टांतपूर्वक भिक्षु सांगतो. एखादा पुरुष खात असतांना आपली जीभ आपल्याच दांतांनीं चावतो, तेव्हां तिला वेदना झाली असतां तिनें कोणावर रागवावें ? ( ५१ ) आतां कित्येकांच्या मतानें देवतापासून दुःखप्राप्ति होते, परंतु तेंहि खरें नाहीं. कारण देवता शरीरांतच राहतात. आत्मा आत्मस्वरूपांत असून विदेही आहे. विकार पावणाऱ्या दोन देवतांतील—एकाच्या हातानें दुसऱ्याच्या तोंडावर प्रहार केला किंवा एकाच्या दांतांनीं दुसऱ्याच्या हाताला दंश केला तर त्या त्या अवयवाचे अभिमानी जे अग्नि, इंद्र इत्यादि देव, त्यांचें तें दुःख असेल ! अविक्रिय आणि अनहंकार अशा आत्म्याला त्याचा स्पर्शहि होत नाहीं. देहामध्यें देवता सर्व एकच असल्यामुळें कोपाचा विषयच नाहीं असें स्वदेहाच्या दृष्टान्तानें सांगतात. जेव्हां आपल्याच देहांतील एका अंगाला दुसरें अंग ताडन करूं लागलें तर पुरुषानें कोणावर रागवावें ? ( ५२ ) आत्मा जर

स्वतः दुःखाला कारण होत असेल तर दुसऱ्यावर रागावण्याचें कारणच काय? सर्वच आत्मा आहे व आत्माच परिपूर्ण भरला आहे. तेथें सुखदुःख कसें असणार? ज्याला सर्व प्राणिमात्रांत एकात्मता दिसते, तेथें कोण कोणाला दुःख देणार आणि कोण कोणावर संतापणार? आत्मा केव्हांहि सुखदुःख देणारा नाहीं. कारण मूर्खहि स्वतःच स्वतःला दुःख देत नाहीं. ( ५३ ) सुखदुःखाचें निमित्त 'ग्रह' होत असें मानलें तरी आत्म्याची काय हानी होणार? जन्मकाळीं जें नक्षत्रांचें लग्न असतें, त्यावरून ग्रहांची गती ठरते. त्यांतील बाराव्या व आठव्या स्थानीं जसें शुभ अशुभ ग्रह असतात, त्याप्रमाणें सुखदुःखप्राप्ति होते. परंतु या ग्रहांच्या गतीपासून आत्मा अलिप्त आहे. आत्म्याला मुळीं जन्मच नाहीं, मग त्याला ग्रह कोणत्या काळीं लागणार? शेतच पेरलें नाहीं तर उंदीर कसा कुरतडणार? घर बांधलेंच नाहीं तर माडी कशी जळणार? माशी जशी अग्नीवर बसत नाहीं, त्याप्रमाणें ग्रह आत्म्याला स्पर्श करीत नाहींत. सगळ्यांचा आत्मा एकच आहे. तोच ग्रहांचाहि आत्मा आहे. तेव्हां आपलीच आपणाला पीडा कशी होणार? ग्रह परस्परांना पीडा देतील पण आत्म्याला स्पर्श करणार नाहींत. ( ५४ ) कर्म सुखदुःखाचा हेतु आहे असें म्हणावें तर जडस्वरूप असलेलें कर्म ज्ञानस्वरूप आत्म्याला कसे बाधणार? सूर्य जर अंधारांत लपून बसेल, वणव्याला गवतानें बांधतां येईल, गोचीड जर तोंडानें दिव्याला चिकटेल, कोंडा झंझावातास प्रतिबंध करील, डबक्यांतील चिखलानें जर चंद्र माखेल तर कर्मापासून उत्पन्न होणाऱ्या सुखदुःखांनीं आत्मा बद्ध होईल. कर्माला ब्रह्मस्वरूपाची ओळख नाहीं. जेथें शुद्ध ब्रह्म आहे तेथें कर्म नाहीं. रज्जुसर्पाप्रमाणें कर्माचें स्वरूपच जर मिथ्या आहे, तर तें आत्म्याला बाधणार कसें? ( ५५ ) आतां काळ जर सुखदुःखांना कारण असेल, तर त्यांत आत्म्याचा काय संबंध? कारण काळ हा ब्रह्मांश असल्यामुळें आत्मस्वरूपच आहे. अग्नीपासून अग्नीचा अंश असलेल्या ज्वाळेला ताप होत नाहीं आणि त्यामुळें त्याच्या अंशाचा नाश पण होत नाहीं. हिमाचें शैत्य त्याच्या अंशभूत तुषारकणांचा नाश करीत नाहीं. तेव्हां कोणावर रागवावें? वस्तुतः काळ परमात्माच आहे आणि परमात्म्याला सुखदुःखादि द्वंद्व नाहीं. महाराज लिहितात, आगीनें आग कधीं जळते? उन्हानें सूर्य कधीं पोळतो? लाटेच्या योगानें समुद्र कधीं बुडतो? हिमालय पर्वत बर्फानें कधीं कांपतो? किंवा तुपानें तुपाला कधीं अपचन होतें? या गोष्टी जर घडतील तर काळाच्या सत्तेनें आत्मा सुखदुःखादि अपार क्लेश भोगील. (५६)

वरील सहाहि कारणें आत्म्याला बाधत नाहींत. लोकांना त्यांचा देहाभिमानच बाधक होत असतो. या विषयीं भिक्षु म्हणतो, एखादी विवाहित स्त्री आपल्या पतीपाशीं रहात असतांना तिला व्यभिचारानें जरी गर्भ राहिला तरी तो परपुरुषाचा आहे हें जसें कोणाला कळत नाहीं, तसा हा देहाभिमानाचा प्रकार आहे. तो चित्स्वरूपाशीं एकरूप होऊन व मिथ्या जीवपणा दाखवून आपल्या इच्छेनेंच सुख-दुःख भोगतो. जे आत्मज्ञानानें संपन्न असतात, त्यांना आपल्या प्रारब्धानुसार प्राण्यांनीं कितीहि दुःख दिलें, तरी त्याचें आत्मसमाधान ढळत नाहीं. ते कोणालाच परका मानीत नाहींत. त्यामुळें कोणाविषयींहि द्वेष उत्पन्न होत नाहीं. लोकांची निंदा आणि उपद्रव सहन करून समाधानांत राहणें हेंच सिद्धाचें मुख्य लक्षण आहे आणि साधकाला साधनहि तेंच आहे. अति प्राचीन ऋषींनीं अनुभविलेल्या या परमात्मनिष्ठेचा अवलंब करून मी मुकुंदचरणाच्या नित्य सेवेनेंच अथांग अशा तमाचें उल्लंघन करून जाईन. अभेद भक्तीनें श्रीहरिचरणांची सेवा केली असतां मी स्वतःच स्वतःला तारीन. 'मी तारीन' हे शब्द उच्चारावयासहि वेळ लागतो, परंतु हरिभक्तास संसार तरून जाण्यास तेवढाहि वेळ लागत नाहीं. अशाप्रकारें त्या भिक्षूनें तें गीत गायिलें तें श्रीकृष्णनाथाला फार आवडलें. "माझ्या उद्धवाला अशी आत्मशांति प्राप्त व्हावी" अशा आशयानें श्रीहरि कळवळून उद्धवाला काय बोलले तें ऐका. ( ५७-५८ )

## श्रीकृष्णाचा समारोप आणि फलश्रुति

भगवान् म्हणाले, याप्रमाणें ज्याचें द्रव्य नष्ट झालें आहे, त्यामुळें विरक्त होऊन जो क्लेशशून्य झाला आहे व संन्यास घेऊन जो पृथ्वीवर संचार करीत आहे आणि दुर्जनांनीं तिरस्कार केला असतांहि जो स्वधर्मापासून ढळला नाहीं अशा मुनीनें जें गीत गायिलें, तेंच मी तुला सांगितलें. तात्पर्य, पुरुषाला सुखदुःख देणारा कोणीहि नाहीं. मित्र, उदासीन व शत्रु असा हा सर्वच व्यवहार ( संसार ) अज्ञानामुळें केवळ मनाच्या विभ्रमानें केलेला आहे. यास्तव हे उद्धवा, माझ्या ठिकाणीं स्थिर केलेल्या बुद्धीनें युक्त होऊन मनाचा निग्रह कर. सर्व उपायांचा संक्षिप्त अर्थ हा एवढाच आहे. जो शांत होऊन भिक्षूनें गायिलेल्या या ब्रह्मनिष्ठेचें धारण करतो, स्वतः श्रवण करतो व दुसऱ्यांना ऐकवितो, त्याचा सुखदुःखादि द्वंद्वांनीं कधींहि

पराभव होत नाहीं. ( ५९ ते ६२ ) येथें उपसंहार आणि फलश्रुति यांसह ही भिक्षु-गीता समाप्त झाली.

## श्रीएकनाथांनीं केलेला उपसंहार

योगनिष्ठा व ब्रह्मज्ञान हेंच या भिक्षुगीतेचें निरूपण आहे. या भिक्षुगीतेचा अर्थ जो स्वस्थ चित्तानें मनांत वागवील, त्याला द्वंद्वाची पीडा केव्हांहि बाधणार नाहीं. पतिव्रता स्त्री परगांवीं गेलेल्या पतीचें पत्र जशी आदरानें व उत्कठेनें ऐकते, तसें एकाग्र चित्तानें हें भिक्षुगीत ऐकावें. ज्या भिक्षुगीताची फलश्रुति स्वत: श्रीकृष्ण आपल्या मुखानें सांगत आहे, त्या भिक्षूच्या भाग्याचें वर्णन किती करावें ? विवेक आणि वैराग्य अंगीं पूर्णपणें बाणलें असतां जो सुखदु:खादि द्वंद्वें सहन करतो, तोच श्रीहरीला अत्यंत आवडतो. ' भिक्षुगीताच्या ' द्वारां श्रीहरीनें उद्धवाला हेंच स्पष्ट दाखवून दिलें. उद्धवाचे जगावर मोठे उपकार झाले आहेत. कारण उद्धवानें जर हा शांतीचा प्रश्न केला नसता तर श्रीकृष्णानें ही कथा कशाला सांगितली असती ? श्रीकृष्णानें उद्धवाच्या निमित्तानें हें गूढ ज्ञान सांगितलें. वेदशास्त्रार्थांचा मथितार्थ, उपनिषदांचें सार, वार्तिकांतील गूढ रहस्य असें हें भिक्षुगीत श्रीकृष्णानें सांगितलें. हें जाणलें असतां आपोआपच आत्म्याशीं जीवाचें लग्न लागतें म्हणजेच जीवशिवाचें तादात्म्य होतें. ॐ तत्सत् ।

---

## सत्य

**वस्तु न देखतां सर्व सम । जें जें देखणें गा विषम ।**
**तेंचि असत्य अति दुर्गम । सत्य तें ब्रह्म समसाम्ये ॥**
**केवळ जें सत्य भाषण । तें निजसत्य नव्हे जाण ।**
**तेंचि विरंचींचें निरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥**

ना. भा. अ. १९-६१, ६२

---

# श्री नाथांची गुरुभक्ति

: लेखक :

ह. भ. प. **रघुनाथ हणमंत कोटणीस**
( कैवल्यधाम सांगली )

**आम्हां सद्गुरु तोचि परब्रह्म । ऐसा नित्य निज भाव सप्रेम ।**
**हेचि गुरुसेवा उत्तमोत्तम । शिष्य परब्रह्म स्वयें होय ।।**

ए. भा. २-४९२

श्रीएकनाथ म्हणजे गुरुभक्ति व गुरुभक्ति म्हणजे एकनाथ अशी स्थिति आहे. एकनाथांचें ज्यास दर्शन घडलें, त्यास गुरुभक्तीचें व्याख्यान करण्याची आवश्यकताच नाहीं. सूर्यदर्शनास काडवातीची जरूरी नाहीं इतका तो प्रकाशमान आहे. सूर्याला सोडून जसा प्रकाश नाहीं, तद्वत् नाथांना सोडून गुरुभक्ति नाहीं.

**गातों एका ध्यातों एका । अंतरबाह्यीं पहातों एका ।। १ ।।**

असें एकनाथ महाराज हे

**जन नोहे जनार्दन । एका जनार्दनीं बाणली खूण ।। १ ।।**

अशा जनार्दन स्वामींचे शिष्य होत.

श्रीजनार्दन स्वामींचे तीन प्रमुख शिष्य होते. ( १ ) रामा जनार्दन, ( २ ) जनी जनार्दन व ( ३ ) एका जनार्दन. जनार्दन स्वामींना श्रीगुरु दत्तात्रेयांनींच अनुग्रह केला. श्रीदत्तात्रेयांनीं जनार्दन स्वामीस स्वरूप साक्षात्कार करविला, त्याचें एकनाथ महाराजांनीं भागवतांत मोठें सुंदर विवेचन केलें आहे.

**मन मिळालेंसे मना । एका भुलला जनार्दना ।। १ ।।**

अशा प्रकारें नाथ महाराज हे जनार्दन स्वामींच्या अंतरंगाशीं समरस झालें असल्यानें व

**एका जनार्दनीं नमन । मन केलें त्या आधीन ।।**

अशी त्यांची अवस्था झाली असल्यानें त्यांना जनार्दन स्वामींच्या अनुभवाचा हा एक प्रसंग वर्णितां आला.

श्रीसद्गुरूचें मनोगत जाणणारे गुरुभक्त हे विरळाच असतात. नाथ महाराज म्हणतात,

**धन्य धन्य श्रीगुरुभक्त । गुरूचें जाणती मनोगत ॥**

नाथ महाराज हे उपासनेनें जनार्दन स्वामींचे जीव कीं प्राण होते, म्हणून त्यांना आपल्या सद्गुरूंची महती इतक्या उत्कटतेनें यथार्थत्वानें वर्णितां आली. नाहींतर हा अनुभव आपणांस कोठून कळता ! " **पतिव्रता नेणें आणिकांची स्तुती** । " अशी स्थिति नाथांची असल्याकारणानें श्रीदत्तात्रेयापासून ही परंपरा कशी आली याचें वर्णन नाथांनीं भागवत ग्रंथांत अध्याय ९ मध्यें केलें आहे. ते म्हणतात,

**गुरुप्राप्तीलागीं सर्वथा । थोर जनार्दनासी चिंता ।**
**विसरला तिन्ही अवस्था । सद्गुरु चिंतितां चिंतनीं** ॥ ४३१ ॥
**देवो भावाचा भोक्ता । दृढ जाणोनि अवस्था ।**
**येणें जाहलें श्रीदत्ता । तेणें हात माथां ठेविला** ॥ ४३२ ॥
**हात ठेवितांची तत्काळ । बोधू आकळिला सकळ ।**
**मिथ्या प्रपंचाचें मूळ । स्वरूप केवळ स्वबोधें** ॥ ४३३ ॥
**कर्म करूनी अकर्ता । तोचि अकर्तात्मबोधु जाहला देता ।**
**देहीं असोनि विदेहता । तेहीं तत्त्वतां आकळिली** ॥ ४३४ ॥

जनार्दन स्वामींच्या मस्तकावर श्रीगुरु दत्तात्रेयांनीं हात ठेवल्याबरोबर जनार्दन स्वामींना देहींच विदेहता प्राप्त झाली. प्रपंचाचें व शरीराचें भान उडालें. स्वरूपबोधस्थितींत श्रीगुरु दत्तात्रेयस्वरूपाशीं तादात्म्य झालें. ही तादात्म्यता म्हणजेच गुरुभक्तीची गुरुकिल्ली आहे जी नाथ महाराजांनीं जनार्दन स्वामींकडून संपादन केली.

गुरुबोधाचें सामर्थ्य काय आहे हें जनार्दन स्वामींचें वर्णन करतांना नाथ महाराज सांगतात,

तो बोधू आकळतां मना । मन मुकलें मनपणा ।
अवस्था नावरेचि जनार्दना । मूर्च्छापन्न पडियेला ॥ ४३६ ॥
त्यासी सावध करूनी तत्त्वतां । म्हणे प्रेमा हें सत्त्वावस्था ।
तोही गिळोनि सर्वथा । होई वर्तता निजबोधें ॥ ४३७ ॥
पूजा विधि करोनिया । जंव जनार्दनु लागला पायां ।
तंव अदृश्य जाहला दत्तात्रेया । योगमायेचियेनियोगें ॥४३८॥

भागवतासारख्या ग्रंथांत श्रीदत्त गुरूंनीं चोवीस गुरु केल्याचा कथाभाग अत्यंत विस्तृतरीतीनें सांगितल्यावर श्रीदत्त गुरूंची शिष्यपरंपरा सांगण्याच्या ओंवांतच नाथ महाराजांची अंतःकरणांतील गुरुभक्ति तेथें प्रतीत झाली व ते हें परंपरेतील एक गौप्य, अंतःकरण गुरुभक्तीनें ओथंबलेलें असल्यानें सहजच बोलून गेले. हें आपण चुकून सांगितलें असेंही पण ते म्हणण्यास विसरले नाहींत. नास्तिक लोकांना हें पटणार नाहीं हें नाथ महाराज जाणणारेच होते. तथापि दत्तात्रेयांच्या शिष्यपरंपरेचें वर्णन करतां करतां गुरुभक्तीनें देहभान विसरून गेलेले नाथ सद्गुरूच्या चारित्रांतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट या ठिकाणीं बोलून गेले. त्या बोधरहस्याच्या ओंव्या अशा आहेत,

प्रपंचदर्शनें विक्षेपता । तेथ साधावया निजऐक्यता ।
सुबुद्धीनें नाना पदार्थां । गुणग्राहकता गुरुरूपें ॥
जेथूनि विक्षेपता वाढे । तेथेंचि ऐक्यता जोडे ।
तें नानागुरुत्वें रोकडें । साधन चोखडें योजिलें ॥

ए. भा. १३-४०९, ४११

सद्गुरूशिवाय ज्यांना दुसरा विषयच नाहीं, तेथें त्यांचें कोणतेंही वाङ्मय असो, त्यांना सद्गुरूशिवाय दुसरा विषय येणार कोठून ? नाथ महाराज हे गुरुप्रेमांत रंगलेले म्हणून आपणांस ही हकीकत समजली, नाहींतर कदाचित् ती समजलीहि नसती.

गृहाश्रमु न सांडितां । कर्मरेखा नोलांडितां ।
निजव्यापारीं वर्ततां । बोधू सर्वथा न मैळे ॥

ए. भा. ९-४३५

या नाथ महाराजांनीं भागवतांत केलेल्या उल्लेखाप्रमाणें श्रीदत्तात्रेयांनीं जनार्दन स्वामींना जो उपदेश केला, तोच जनार्दन स्वामीकडून नाथ महाराजांनीं ग्रहण केला. अंतःकरणाचा विषय त्यांनीं अंतःकरणानें घेतला. नाथ महाराजांनीं जनार्दन स्वामींना पहातांच त्यांचें मन त्यांच्या ताब्यांत राहिलें नाहीं. जनार्दन स्वामींची त्यांनीं जी अनुपम सेवा केली, त्याचें वर्णनच करतां येणार नाहीं. गुरु-सेवेंत नाथ महाराज देहभान विसरून जात. माता, पिता, कुलदैवत त्यांना जनार्दन स्वामीच झाले होते. नाथ महाराज म्हणतात,

**गुरु माता गुरु पिता । गुरु स्वामी कुलदेवता ।**
**गुरुवांचोनि सर्वथा । आणिक देवता स्मरेना ।।** ४९२ ।।

काया वाचा मनानें ते गुरुसेवेस सादर असत. यापेक्षां गुरुभक्ति ती कोणती ?

**काया वाचा मनें प्राणे । जो गुरुवांचोनि आन नेणें ।**

अशी ज्यांची अवस्था झालेली ! फार काय, गुरुचरण संवाहन करतांना ज्यांची भूकतहानहि विसरून जावयाची ! गुरुसेवेंत मन गुंतल्याकारणानें स्त्रीपुत्र-धनाची विस्मृति व्हावयाची ! मनाचा मनपणा शिल्लक न रहातां स्वतःची आठवणहि होऊं नये ! नाथ महाराज म्हणतात,

**तहान विसरली जीवन । क्षुधा विसरली मिष्टान्न ।**
**करितां गुरुचरणसंवाहन । निद्रा जाण विसरला ।।** ५०६ ।।

मुखांत सद्गुरुशिवाय नामोच्चार नाहीं, हृदयांत गुरुप्रेमाशिवाय प्रेमाला स्थान नाहीं आणि गुर्वाज्ञेप्रमाणें कर्म करण्यांत जो तत्पर आहे, या गुरुभक्तीला जगांत तोड नाहीं.

श्रीउद्धवांनीं याकरितांच श्रीभगवंताजवळ गुरुभक्ति मागितली. श्रीएकनाथी भागवतांतील अध्याय २९, श्लोक ४० वरील टीकेंत नाथ महाराज गुरुभक्तीचें श्रेष्ठत्व मुक्तीपेक्षांहि अधिक थोर मानतात.

**मज थोर भ्रम होतां चित्तीं । गोड असेल जीवन्मुक्ती ।**
**तेथ न देखे तुझी भक्ती । कोरडी मुक्ति मज न लगे ।।** ७१६ ।।

सद्गुरुकृपा वचनोक्ती । शिष्य तत्काळ लाहे मुक्ती ।
त्या तुज सद्गुरूची राहे भक्ती । जळो ती मुक्ति मज न लगे।७१७।
यालागीं तुज शरण । मागुतेन मी आलों जाण ।
सायुज्याहींवरी पूर्ण । तुझें गुरुभजन मज देईं ।। ७१८ ।।

वरील ओव्या म्हणजे भागवत धर्माचें, भागवताचें किंबहुना परमार्थाचें निःसंशय " अनुभवामृतच " आहे. ज्यांनीं नाथ भागवताची हजार पारायणें केलीं व ज्यांच्या काव्यांतहि त्याची छटा उमटलेली दिसते, अशा तुकाराम महाराजांनीं श्रीभागवताचा सारांश एका अभंगांतील एका कडव्यांत आणला आहे. ते म्हणतात,

मुक्तिवरील गुरुभक्ती । उद्धवें मागितली प्रेम प्रीती ।।
हाचि भागवताचा कळस । पिका आला ब्रह्मरस ।।

अशी भक्ति नाथ महाराजांच्या ठिकाणीं होती. जे सर्वांतून मोकळे झाले, त्यांनाच ही भक्ति साधते. म्हणून नाथ महाराज भागवतांत सांगतात,

मुखीं सद्गुरूचें नाम । हृदयीं सद्गुरूचें प्रेम ।
देहीं सद्गुरूचें कर्म । अविश्रम अहर्निशीं ।।
गुरुसेवेसी गुंतलें मन । विसरला स्त्रीपुत्रधन ।
विसरला मनाची आठवण । मी कोण हें स्फुरेना ।।

ए. भा. १२-५०८, ५०९

गुरुभक्तीचें वर्म नाथ महाराजांनीं भागवतांत दहाव्या अध्यायांत सांगितलें आहे. ते म्हणतात,

गुरुस्मरण करितां देख । स्मरणें विसरे तहान भूक ।
विसरला देह गेह सुख । सदा संमुख परमार्था ।। १३७ ।।

गुरुकृपेचें सामर्थ्य व गुरुभक्तीचें परम समाधान जीवाला कसें होतें, त्या-बद्दल नाथ महाराज सांगतात,

श्रीसद्गुरु जेउती वास पाहे । तेउती सुखाची दृष्टी होये ।
तो म्हणे तेथ राहे । महाबोधु आहे स्वानंदे ।।

त्या सद्गुरूचे देखिल्या पाये । तहान भूक तत्काळ जाये ।
कल्पना उठोंचि न लाहे । निजसुख आहे गुरुचरणीं ॥

ए. भा. १०-१२२, १२३

गुरुभक्तीनें जीवाला स्वरूपानुभूती प्राप्त होते. सगुणांत निर्गुण व निर्गुणांत सगुण पहातां येतें. तात्पर्य, सगुण व निर्गुण भक्तीची प्रचीति एकच होते. नाथ महाराज म्हणतात,

घृत थिजलें कीं विघुरलें । परी घृतपणा नाहीं मुकलें ।
तेवीं अमूर्त मूर्त मुसावलें । परी तें संचलें परब्रह्म ॥

ए. भा. १-२४५

तात्पर्य, गुरुभक्तीनें जीवाला अशी प्रचीति येते व त्याचा परमात्माहि अंकित होतो, एवढा या गुरुभक्तीचा अधिकार आहे. नाथ महाराज म्हणतात,

ऐसा देव भक्तीं थोर केला । आणूनि वैकुंठीं बैसविला ।
भक्त उपकारें दाटला । मग त्याच्या बोलामाजीं वर्तें ॥
देव भक्त वचनें करी । झाला नर ना केसरी ।
प्रगटला खांबामाझारीं । शब्द करी भक्ताचा ॥
आतांही प्रत्यक्ष प्रमाण । दासांचेनि वचनें जाण ।
पाषाण प्रतिमे देवो आपण । आनंदघन प्रगटे पै ॥

ए. भा. ७-४८० ते ४८२

नाथ महाराजांची गुरुभक्ति त्यांच्या प्रत्येक कृतींत स्पष्ट होत होती. मग ती भागवतासारख्या ग्रंथांत प्रगट झाल्यास नवल तें काय ?

सद्गुरु हे शिष्याचा नरकबंध दूर करून सुख देणारे आहेत. याबद्दल नाथ महाराज म्हणतात,

सुहृद आप्त सखा बंधू । शिष्याचे सद्गुरु प्रसिद्धू ।
निवारूनि नरकसंबंधू । परमानंदू सुखदाता ॥

ए. भा. १९-६५३

गुरुउपकाराची उत्तीर्णता होऊंच शकत नाहीं इतके ते अनंत उपकार आहेत. नाथ महाराज म्हणतात,

देहें उतरायी होऊं गुरूशीं । तंव नश्वरपण या देहासी ।
नश्वरें अनश्वरासी । उत्तीर्णत्वासी कदा न घडे ॥
जीवें उतरायी होऊं गुरूशीं । तंव मिथ्यात्वाचि जीवित्वासी ।
जेणें दिधलें सत्य वस्तूसी । मिथ्या देतां त्यासी लाजेना ॥
काया वाचा मन धन । गुरूशीं अर्पितां जीव प्राण ।
कदा नव्हे जे उत्तीर्ण । हें उद्धवें संपूर्ण जाणीतलें ॥
जेथें अणुमात्र नाहीं दुःख । ऐसें दिधलें निजसुख ।
त्या गुरूशीं उतरायी देख । न व्हावें निःशेख शिष्यांसी ॥

ए. भा. २९-६५६, ६५८, ६६०, ६६१

आठहि प्रहर गुरुचरणीं आपलें अंतःकरण ठेवून अत्यादरपूर्वक गुरुसेवेंत तत्पर असतो, तोच गुरूचा सेवक होय. नाथ महाराज म्हणतात,

गुरुसेवेसि अत्यादर । करितां न राहे आठौ प्रहर ।
ठेविलें गुरुचरणीं अंतर । निरंतर निजभावें ॥

ए. भा. १०-२५२

गुरूचें महत्त्वहि सर्वांत विशेष आहे. त्याची बरोबरी कोणासच करणें शक्य नाहीं. त्याच अध्यायांत नाथ महाराज पुढें म्हणतात,

म्हणसी साधनें केलीं अनेक । तैसे सद्गुरुही साधन एक ।
म्हणतां मुमुक्षू झाले मूर्ख । निजात्मसुख बुडाले ॥
सद्गुरु केला तें साधन । त्याहूनी परतें साध्य आन ।
म्हणतां आली नागवण । नागवला जाण सर्वस्वें ॥
जो चित्सुखें सदा संपन्न । चिद्रूपीं ज्यासी समाधान ।
तो चिन्मात्र होऊनि भिन्न । नव्हे जाण सर्वथा ॥
लवण सागरीं रिघालें । तेव्हांचि तें समुद्र झालें ।
दीपें वणवया आलिंगिलें । वणवाचि झालें तें तेज ॥
एवं चिद्रूपाचें ज्यासि ज्ञान । तो चिद्रूपचि सत्य संपूर्ण ।
गुरु ब्रह्म अभिन्न जाण । ये अर्थीं प्रमाण उपनिषद ॥

ए. द. २...१४

हो कां घृताची पुतळी । नव्हतां घृतपणा वेगळी ।
घृतरूपें रूपा आली । तैसी मूर्ती जाहली सद्गुरूची ॥

ए. भा. १०-११४ ते ११९

" गुरुरेकं परब्रह्म " हेंच खरें.

गुरुभक्ति ही भगवत्‌भक्तीपेक्षांहि श्रेष्ठ असून गुरूंचें महात्म्य वर्णन करावें तेवढें थोडे आहे असें नाथ महाराज स्वानुभवानें सांगतात,

पूर्ण करितां भगवद्भक्ती । तैं गुरुभजनीं अधिकारप्राप्ती ।
सद्गुरुमहिमा सांगों किती । मी आज्ञावर्ती गुरूचा ॥
गुरु ज्यावरी अनुग्रहो करी । त्यासी मी भगवंत उद्धरीं ।
आदरें वाहूनियां शिरीं । निज ऐश्वर्यावरी बैसवीं ।
गुरु परमात्मा परेशु । ऐसा जयाचा विश्वासु ।
त्याचा अंकिला मी हृषीकेशु । जो जगदीशु जगाचा ॥

ए. भा. २०-३१८ ते ३२०

नाथ महाराज आपल्या एका अभंगांतहि हेंच सांगतात,

गुरु परमात्मा परेशु । ऐसा ज्याचा दृढ विश्वासु ॥ १ ॥
देव तयाचा अंकिला । स्वयें संचला त्याचे घरीं ॥ २ ॥
एकाजनार्दनीं गुरुदेव । येथें नाहीं बा संशय ॥ ३ ॥

नाथ महाराज यांना सद्गुरु हेंच दैवत होतें. दुसरें दैवत त्यांच्या दृष्टीला दिसलेंच नाहीं. श्रीज्ञानेश्वर महाराज यांनींहि गुरुभक्तीचे स्वारस्य ज्ञानेश्वरींत तेराव्या अध्यायांत सांगितलें आहे. ते म्हणतात,

इये शरीरींची माती । मेळवीन तिये क्षिती ।
जेथ श्रीचरण उभे ठाती । आराध्याचे ॥
गुरुसंप्रदायधर्म । ते जयाचे वर्णाश्रम ।
गुरुपरिचर्या नित्य कर्म । जयाचें गा ॥
जयाचें वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र ।
गुरुवाक्यावांचूनि शास्त्र । हातीं न शिवे ॥

ज्ञाने. १३-४३१, ४४४, ४४७

या ज्ञानेश्वर माउलींच्या ओव्याप्रमाणें नाथांनीं आपल्या गुरुभक्तीचा कळस केला. किंबहुना वारकरी सांप्रदायांत "ज्ञानाचा एका व नामाचा तुका" असें आदरपूर्वक मानतात. माउलींची राहिलेली गुरुसेवेची इच्छा नाथरूपानें त्यांनीं परिपूर्ण करून घेतली. नाथ महाराज यांची एकवीरा नामक कुलदेवता आहे. तिला वंदन करतांना भागवतांतील पहिल्या अध्यायांतच ते म्हणतात,

**एक रूप दाविलें मनीं । तंव एकचि दिसे जनीं वनीं ।**
**ऐसें एकचि कानीं वदनीं । एकपणें एकवीरा ।। ६९ ।।**
**आतां वंदू जनार्दनू । जो भवगजपंचाननू ।**
**जनीं विजनीं समानू । सदा संपूर्ण समत्वें ।। ७९ ।।**

ए. भा. अ. १

कोणीहि ग्रंथरचनेस सुरुवात केली तर गणेश, सरस्वती यांचें स्तवन करून मग ग्रंथास सुरुवात करतो. सर्व जुन्या कवींचा हाच प्रघात आहे. पण एकनाथ महाराज यांची गुरुभक्ति इतकी अनुपम होती कीं त्यांनीं ग्रंथारंभीं आपल्या सद्गुरूंना वंदन करून मगच ग्रंथास सुरुवात केली आहे. ते म्हणतात,

**ॐ नमो जी जनार्दना । नाहीं भवअभवभावना ।**
**न देखोनि मीतूंपणा । नमन श्रीचरणा सद्गुरुराया ।।**

या पहिल्याच ओवींत त्यांनीं जनार्दन स्वामींना वंदन केलें आहे.

नाथ महाराजांनीं थोडें आत्मचरित्रहि भागवत ग्रंथांत दिलें आहे. पण त्याचें सर्व कर्तृत्व त्यांनीं जनार्दन स्वामीकडेच सोपविलें आहे. कर्ता करविता एक जनार्दन हीच त्यांची भावना होती. ३१ व्या अध्यायांत ते म्हणतात,

**एका जनार्दनाचा वृत्तांत । एक म्हणती भक्तियुक्त ।**
**एक म्हणती जीवन्मुक्त । प्रपंचीं निश्चित मानिती एक ।।**
**अहो हा एका जनार्दन । नाहीं आसन न देखें ध्यान ।**
**नेम मुद्रा माळा जाण । उपासन लक्षण या नाहीं ।।**
**कोण मंत्र असे यांसी । काय उपदेशी शिष्यांसी ।**
**मंत्र न दे कोणासी । भुलली भाविकें त्यासी या भावार्थें ।।**

नुसत्या हरिनामाचा घोख । लावूनि भुलविले येणें लोक ।
ऐसे नाना विकल्प । जनार्दन देख उपजवी स्वयें ॥

ए. भा. ३१-५०४ ते ५०७

गुरुकृपेनें तादात्म्य झालेल्या अवस्थेंत नाथ महाराजांनीं " भागवत " लिहिलें आहे. ही तादात्म्यता म्हणजेच गुरुभक्ति. यावरहि त्यांच्या गुरु-भक्तीचा कळस म्हणजे ग्रंथरचनेचें सर्व श्रेय त्यांनीं श्रीजनार्दन स्वामींनाच दिलें आहे. " चतुःश्लोकी भागवत " यावरील टीकेंत नाथ महाराज म्हणतात,

गुरु आज्ञा अत्यंत लाठी । ग्रंथार्थ खेळे माझे दृष्टीं ।
आज्ञेनें पुरविली पाठी । फाकट गोष्टीमाजींही ज्ञान ॥ १०२७ ॥
नित्य कर्म करितां जाण । ग्रंथींचें दिसे गुह्य ज्ञान ।
मागें घालूनियां संध्या स्नान । ग्रंथार्थ पूर्ण प्रगटे पुढां ॥१०२८॥
जागृतीं दिसे ग्रंथार्थ ज्ञान । ग्रंथार्थमय जाहलें स्वप्न ।
सुषुप्तीमाजीं दुजेनवीण । हें गुह्य ज्ञान कोंदाटें पै ॥ १०२९ ॥
शब्दापुढें ज्ञान धांवे । ओवीपुढें अर्थ पावे ।
जें जें जीवीं विवंचावें । तें तें आघवें ग्रंथार्थ होय ॥१०३०॥

श्री भागवताच्या शेवटीं ३१ व्या अध्यायांत नाथ महाराज म्हणतात,

हा ज्ञानग्रंथ चिद्रत्न । यथार्थ अर्थविला संपूर्ण ।
माझेनि नांवें श्रीजनार्दन । ग्रंथकर्ता आपण स्वयें जाहला ॥
एका जनार्दना शरण । जनार्दना पढिये एकपण ।
जेवीं कां सूर्याचें किरण । सूर्यतेजें पूर्ण निरसी तम ॥
तेवीं जनार्दन तेजें जाण । प्रकाशलें एकपण ।
तेणें प्रकाशे ग्रंथ संपूर्ण । जनार्दनार्पण एकपणेंसीं ॥
जनीं जनार्दन एक । जाणें तो सुटला निःशेख ।
हेंचि नेणोनियां लोक । गुंतले अनेक भवचक्रीं ॥

ए. भा. ३१-५५८ ते ५६१

वरील विवेचनावरून नाथांनीं गुरुभक्तीचा किती श्रेष्ठतम आदर्श समाजापुढें ठेवला याची कल्पना होऊं शकते. शेवटीं गुरुदेव रामभाऊ रानडे ज्या माझ्या पितृदेवांना ' आधुनिक एकनाथ ' म्हणून संबोधीत, त्यांचे चरणीं ही वाङ्मयसेवा विनम्रभावें अर्पण करून विराम पावतों.

**गुरुसेवेलागीं जाण । शरण एकाजनार्दन ।।**

---

## आशेपाशीं सर्व पापें व दुःखें वसतात

**आशेपाशीं महा शोक । आशा करवी महा दोख ।**
**आशेपाशीं पाप अशेख । असे देख तिष्ठत ।।**
**आशेपाशीं अधर्म सकळ । आशा मानीना विटाळ ।**
**आशा नेणें काळ वेळ । कर्म सकळ उच्छेदी ।।**
**आशा अंत्यजातें उपासी । नीचसेवन आशेपाशीं ।**
**आशा न सांडी मेल्यासी । प्रेतापाशीं नेतसे ।।**
**आशा उपजली अनंतासी । नीच वामनत्व आलें त्यासी ।**
**आशा दीन केले देवांसी । कथा कायसी इतरांची ।।**
**जगाचा जो नित्य दाता । तो आशेनें केला भिकेसवता ।**
**वैऱ्यांचें द्वारीं झाला मागता । द्वारपाळता तेणें त्यासी ।।**
**आशा तेथें नाहीं सुख । आशेपाशीं परम दुःख ।**
**आशा सर्वांसी बाधक । मुख्य दोष ते आशा ।।**
**ज्याची आशा निःशेष जाये । तोचि परम सुख लाहे ।**
**ब्रह्मादिक वंदिती पाये । अष्टमा सिद्धि राहे दासीत्वें ।।**

ना. भा. अ. ८–३०८ ते १४

---

## साधूंचीं लक्षणें

प्राप्ताप्राप्त लाभावस्था । बाधूं न शके साधूंच्या चित्ता ।
चित्त रातलें भगवंता । निरपेक्षता या नांव ॥

पैल विषयो मज व्हावा । ऐसा आठव नाठवे जीवा ।
हा साधूचा निरपेक्ष ठेवा । जाण उद्धवा गुण पहिला ॥

निरपेक्ष व्हावया येथ । जागृती स्वप्न सुषुप्ती आंत ।
चिन्मात्रीं जडलें चित्त । या नांव मच्चित्त गुण दुजा ॥

देह झालिया लक्ष्मीयुक्त । अथवा हो कां आपद्भुक्त ।
चित्त परमानंदीं निश्चित । या नांव मच्चित्त उद्धवा ॥

जरी प्राणांत केला अपहार । तरी न म्हणे हा दुष्ट नर ।
अपकाऱ्या करी अति उपकार । प्रशांति प्रकार या नांव ॥

ब्रह्मभावेंचि तत्त्वतां । विश्वासणें सर्व भूतां ।
कदा विकल्प नुपजे चित्ता । हे प्रशांतता गुण तिजा ॥

ऐसा हा प्रशांतता गुण । अंगीं बाणावया हेंचि कारण ।
जगीं देखे समदर्शन । ब्रह्म परिपूर्ण समसाम्ये ॥

जग पाहतां दिसे विषम । विषमीं देखे सम ब्रह्म ।
तोचि समदर्शी परम । हा गुण निरुपम पै चौथा ॥

धरितां देहाचा अभिमान । ते अहंता वाढवी मीपण ।
मीपणें ममता जाण । वाढे संपूर्ण देहसंबंध्या ॥

ऐसा मीपणें मी परिपूर्ण । तेथ मी म्हणावया म्हणतें कोण ।
निःशेष निमालें मीतूंपण । निरभिमान या नांव ॥

ना. भा. अ. २६–३१७,१८,२०,२१,२३,२५,२६,२७,२९,३३

# एकादश स्कंधाचें महत्त्व

: लेखक :

ह. भ. प. रा. बा. चातुर्मास्येमहाराज

( संस्थान—अनवें व पंढरपूर )

**सर्व वेदान्तसारं हि श्रीभागवतमिष्यते ।**
**तद्रसामृततृप्तस्य नान्यत्रस्याद्रतिः क्वचित् ।।**

' एकादश स्कंधाचें महत्त्व ' या विषयाचा विचार लिहितांना मूळ भागवत ग्रंथाबद्दल दोन शब्द लिहिणें आवश्यक आहे. हा विषय वाणीच्या पलीकडचा आहे. तरीहि अल्प बुद्धीनुसार जें वर्णन केलें जाईल त्यायोगें अंत:करणास पवित्रता येईल. अस्तु. अलौकिक वस्तूच्या निर्णयाकरितां वेद, ब्रह्मसूत्रें, गीता आणि भागवत हीं चार प्रमाणें शिष्टसंमत आहेत. त्यांत उत्तरोत्तर एक दुसऱ्याचा संशय निवारण करणारा आहे. प्रस्थानत्रयीमध्यें जरी भागवतास स्थान नाहीं, तरी त्यामुळें भागवताचें महत्त्व कमी आहे असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. भागवत हें भक्तिशास्त्र असल्यामुळें व ज्ञान कर्मादि योगास मूलाधार भक्तिच असल्यामुळें भागवत एक प्रकारें प्रस्थानत्रयीचा आत्माच आहे. एका सांप्रदाय प्रवर्तक आचार्यांनीं तर प्रस्थानचतुष्टय मानून वेद, ब्रह्मसूत्रें व गीता याबरोबरच भागवताचा समावेश केला आहे. ज्ञानाच्या कसोटीनें पाहिलें असतांहि " **विद्या भागवतावधि** " असें म्हटलेलें आहे. किंवा

**हुताशने हाटक संपरीक्षा । विपत्तिकाले गृहिणी परीक्षा ।**
**रणस्थले शस्त्रभृतां परीक्षा । विद्यावतां भागवते परीक्षा ।।**

हा श्लोक भागवताच्या श्रेष्ठत्वाकरितां प्रसिद्ध आहे.

आतां एकादश स्कंधाच्या महत्त्वाचा विचार करूं. ' भागवत ' ही भगवंताची वाङ्मयी मूर्तिच आहे. प्रथम व द्वितीय स्कंध भगवंताच्या चरणस्थानीं असून तिसरा व चवथा स्कंध बाहुद्वयाचें ठिकाणीं आहेत. अशाच तऱ्हेनें एकेक कल्पना

करीत दशम स्कंध हृदयस्थानीं मानून एकादश स्कंध हा मस्तकाचें ठिकाणीं मानलेला आहे.

**चरित्र तें उच्चारावें । केलें देवें गोकुळीं ॥**

असें संतांनीं ज्याबद्दल म्हटलें आहे, तें प्रेममय श्रीकृष्णचरित्र दशम स्कंधांतच आहे. म्हणून दशम स्कंध हृदयस्थानीं मानला आहे हें योग्यच आहे. कारण प्रेमाचें स्थान हृदयच असतें. एकादश स्कंध हा तत्त्वज्ञानप्रधान आहे. त्यामुळें तो बुद्धिग्राह्य विषय आहे. बुद्धीचें अधिकरण मस्तक असल्यामुळें एकादश स्कंध मस्तकाचें ठिकाणीं मानला गेला हें उचितच होय. अर्थात् एकादश स्कंध हा शिरोभागीं आहे. एकादश स्कंधाचें महत्त्व कशांत आहे याचें विवेचन एक टीकाकार करतात,

**इह नानाव्यसनराशिभारावभुग्नशिरसां । कलिमलावकुंठितमनसां दुःखपरिहार सुखावाप्ती चाकांक्षमाणानां तदुपायमजानतां पुंसामुपकाराय करुणाकरेण बादरायणेनकृत भागवतपुराण कल्पतरोः । अनेकस्कंधपुष्पराशेः मकरन्दभूत एकादशस्कंध आरभ्यते ।**

या जगामध्यें अनेक संकटांच्या भारानें ज्यांचें मस्तक अधोमुख झालेलें आहे व कलिमलानें ज्यांच्या मनाची गति कुंठित झालेली आहे, अशा स्थितींत दुःखाचा परिहार व सुखाची प्राप्ति व्हावी अशी इच्छा करणाऱ्या पण त्याचा उपाय न जाणणाऱ्या लोकांवर उपकार करण्यासाठीं कृपाळु अशा बादरायणांनीं केलेला श्रीभागवत पुराणरूपी जो कल्पतरु, त्याच्या अनेक स्कंधरूपी पुष्पराशीचा मकरंद म्हणजेच हा एकादश स्कंध होय, हा या टीकेचा अर्थ आहे. किती मार्मिक रूपक आहे हें !

आता अशा या महत्त्वाच्या एकादश स्कंधामध्यें विषय तरी कोणता आहे, अशी जिज्ञासा होणें साहजिक आहे. एका टीकाकारानें अगदीं संक्षिप्त रीतीनें विषय सांगितला आहे.

**अथ भूभारावशेष ( भूत ) यदुकुलसंजिहीर्षानिदानविप्रशापापनोदनन्याय प्रस्थितवतः स्वकुलक्षपणसमस्ततत्त्वोपदेशस्वपदारोहणात्मकं चेष्टितमनुवर्णयत्येकादशे ।**

पृथ्वीचा भारावलेला अवशेष जो यदुकुलाचा नाश, त्याला निमित्त केलेला जो विप्रशाप, त्या विप्रशापाचें दूरीकरण करण्याच्या मिषानें प्रभास क्षेत्रास निघालेल्या श्रीकृष्णाचें स्वकुलनाश, समस्तत्त्वोपदेश आणि स्वपदारोहण हें कार्य एकादश स्कंधामध्यें वर्णन केलें आहे.

आतां श्रीधरस्वामींनीं एकादश स्कंधाच्या आरंभीं ग्रंथांतील विषया-संबंधीं जें विवेचन केलें आहे, तें असें,

**उक्तैकत्रिंशताऽध्यायैर्मुक्तिरेकादशे ततः ।**
**जायन्ते येतिहासाद्यैः समासव्यासरूपतः ॥**
**नारदो वसुदेवाय समासेन न्यवर्णयत् ।**
**भगवान् उद्धवायाथ विस्तरेणोपपत्तिभिः ॥**
**तत्र तु प्रथमेऽध्याये यदुवंशस्य संक्षयः ।**
**उपक्षिप्तो विरागाय मौसलस्यापदेशतः ॥**

या एकादश स्कंधांतील एकतीस अध्यायांनीं जयंतीपुत्राच्या इतिहासादि रूपानें दुःखापासून मुक्त करणाऱ्या साधनस्वरूपाचें कोठें संक्षेपानें तर कोठें विस्तारानें वर्णन केलें आहे. श्रीनारदांनीं वसुदेवाला तेंच स्वरूप संक्षेपानें सांगितलें आणि नंतर श्रीकृष्णांनीं आपला सखा व प्रिय शिष्य जो उद्धव त्यास तेंच अनेक उपपत्तींनीं, दृष्टान्तांनीं व इतिहासादि रूपानें सांगितलें. या एकतीस अध्यायांपैकीं प्रथम अध्यायांत मुसळाची उत्पत्ति व कार्य सांगण्याच्या निमित्तानें यदुवंशाच्या नाशाची प्रथमच सूचना दिली आहे. कारण जीवास संसारविषयक वैराग्य व्हावें, हें या श्लोकाचें तात्पर्य आहे. श्रीधरस्वामीच्या प्रस्तावनेचा विचार करतां यामध्यें प्रामुख्यानें महत्त्वाचा आलेला विषय म्हणजे स्वतः भगवंतांनीं आपल्या मुखानें उद्धवास रहस्यमय अशा तत्त्वज्ञानाचा उपदेश केलेला आहे. सहाव्या अध्यायापासून एकोणतिसाव्या अध्यायापर्यंत श्रीकृष्णउद्धव संवाद आलेला आहे. पहिली पंचाध्यायी ही त्या उपदेशाचीच संक्षिप्त आवृत्ति आहे. शेवटच्या दोन अध्यायांतहि अवतार-समाप्ति असल्यामुळें तोहि भाग अत्यंत महत्त्वाचा आहे. सारांश, या एकादश स्कंधांतील मोठा भाग श्रीकृष्णउद्धव संवादामध्येंच अंतर्भूत झालेला आहे आणि भगवन्मुखत्व असल्यामुळें यास परम प्रामाण्य प्राप्त झालें आहे. श्रीधरी टीकेवरील एका टीकाकारांनीं लिहिलें आहे,

**भगवत् वाक्यत्वेन परमप्रामाण्यात्...एकादशस्कंधः प्रारभ्यते ।**

श्रीमद्भगवद्गीता व एकादश स्कंध यांचा विचार केला असतां अर्जुनाच्या उपदेशाचा प्रसंग युद्धाचा तर उद्धवाच्या उपदेशाची वेळ अत्यंत गंभीर व शांत. म्हणून गीता सूत्रमय, तात्त्विक व गूढ, तर उद्धवगीता स्पष्ट, विस्तृत व रसाळ. कित्येक गीता प्रासंगिक व कृष्णउद्धव संवाद श्रीकृष्णाचा अंतिम संदेश मानतात. संग्रामाच्या गडबडींत युद्धविन्मुख झालेल्या अर्जुनाला युद्धोन्मुख करण्याकरितांच गीता आहे. अर्जुन आपली अस्वस्थता दूर करण्याकरितां प्रश्न विचारतो. पण उद्धवगीतेंत वेगळा प्रकार आहे. भगवंताच्या विरहदुःखाच्या कल्पनेनें उद्धव व्यथित झाला आहे. तरीहि तात्त्विक व मौलिक सिद्धांतांत फरक नाहीं. साधारणतः कर्माकर्माचें विवेचन गीतेमध्यें आलेलें आहे. त्याचा विस्तार कर्म, अकर्म, विकर्म अशा स्वरूपांत भागवत एकादश स्कंधांतहि आला आहे. गीता हा शास्त्रीय परिभाषेचा आणि संक्षिप्त ग्रंथ असला तरी अत्यंत सुबोध आहे. भागवत काव्यमय व रसरूप आहे. गीतेमंधील " **सुखदुःखे समेकृत्वा** " चा विस्तार

**सुखमैंद्रिकं राजन् स्वर्गे नरकमेव च ।**
**देहिनां यद्यथा दुःखं तस्मान्नेच्छेत तत् बुधः ॥**

या श्लोकांत मिळतो. कोणतेंहि इंद्रियजन्य सुख दुःखरूपच असतें. सुखदुःख प्रारब्धाधीन असल्यानें शहाण्यानें त्याची आशा धरूं नये, असा याचा अर्थ आहे. " **आपूर्यमाणमचल प्रतिष्ठम्** । " चा विस्तार

**समृद्धकामो हीनो वा नारायणपरो मुनिः ।**
**नोपसर्पेत शुष्येत सरिद्भिरिव सागरः ॥**

या श्लोकांत सुंदर रीतीनें आलेला आहे. अनेक सुखें प्राप्त झालीं किंवा न झालीं तरी भगवद्भक्त उल्हसित होत नाहीं किंवा कष्टीहि होत नाहीं. याला समुद्राचा समर्पक दृष्टांत दिला आहे. " **युक्ताहार विहारस्य** " याचा अर्थ " **स्तोकं स्तोकं ग्रसेत् ग्रासम्** " यांत येतो. गीतेंतील " स्थितप्रज्ञ " किंवा "गुणातीत" हा "भागवत" होय. कारण "अथ **भागवतं ब्रूत**" याचें स्पष्टीकरण

**सर्वभूतेषु यः पश्येत् भगवत्भावमात्मनः ।**
**भूतानि भगवत्यात्मन्नेष भागवतोत्तमः ॥**

असें दिलें आहे. अशीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील.

आतां इतक्या उच्चतम तत्त्वज्ञानी श्रीकृष्णाच्या अवताराची समाप्ति कशा रीतीनें झाली, अशी जिज्ञासा उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. त्याचेंहि वर्णन याच स्कंधांत आलें आहे. स्वतःच भगवंतांनीं आपली तनु योग्याप्रमाणें " आग्नेयी " नामक योगधारणेनें न जाळतां ते स्वधामास गेले असें वर्णन आहे. या विषयावरील श्रीधरी विशेष महत्त्वाची असल्यामुळें अवश्य पहावी. ( भा. ११-३१-६ ) " **दृश्यते च अद्यापि यदुपासकानां** " असें व्याख्यान लिहून भगवत्तनूला नित्यत्व सांगितलें आहे. श्रीनाथांनीं याबद्दल मार्मिक ओवी लिहिली आहे.

**ज्याचें करतां नामस्मरण । भक्ताचें निरसे जन्ममरण ।**
**तो कृष्ण पावे जैं मरण । तैं भक्तासी कोण उद्धरी ॥**

आतांपर्यंत केलेल्या विषयविवेचनावरून एकादश स्कंधाचें महत्त्व वाचकांच्या लक्षांत येईलच.

शेवटीं गीतेची थोरवी मान्य करूनहि असें म्हणतां येईल कीं गंगेच्या उगमस्थानीं उदकाचा अल्प झरा असतो व पुढील प्रवाहांत जलाची वृद्धि झाली असली तरी पावित्र्याच्या दृष्टीनें त्यामध्यें न्यूनाधिक्य दाखवितां येणें शक्य नाहीं. तथापि प्रवाहामध्यें स्नानादि व्यवहार होतो किंवा कृष्यादि कर्मास तें उदक उपयुक्त ठरतें अथवा तीरस्थ पादपांनाहि त्यायोगें जीवन मिळतें. तें कार्य उगमांतील झऱ्यानें होणार नाहीं. त्याप्रमाणें अनेक साधकांना प्रवाहात्मक एकादश स्कंधाचा विशेष लाभ होईल.

गीतेमध्यें असलेला अस्पष्ट व अपूर्व भासणारा किंवा सूत्रमय शब्दांत असलेला भक्तियोग विस्तारानें सांगण्याचें कार्य एकादश स्कंधामध्येंच झालें आहे.

**वदन्ति कृष्ण श्रेयांसि बहूनि ब्रह्मवादिनः ।**
**तेषां विकल्पप्राधान्यमुताहो एकमुख्यता ॥**
**भवतोदाहृतः स्वामिन् भक्तियोगोऽनपेक्षितः ।**
**तस्मान्मद्भक्तियुक्तस्य योगिनो वै मदात्मनः ॥**

न ज्ञानं न च वैराग्यं प्रायः श्रेयो भवेदिह ।
यत्कर्मभिर्यत्तपसा ज्ञानवैराग्यतश्च यत् ।।

* * *

योगेन दानधर्मेण श्रेयोभिरितरैरपि ।।

* * *

सर्वं मद्भक्तियोगेन मद्भक्तो लभतेऽञ्जसा ।
स्वर्गापवर्गं मद्धाम कथंचिद्यदि वांछति ।।
प्रायेण भक्तियोगेन सत्संगेन विनोद्धव ।

( " प्रायोऽधिक्येऽव धारणे ।"या कोषावरून "प्रायः" शब्द निश्चयार्थी आहे. )

भक्तिं लब्धवतः साधो किमन्यत् अवशिष्यते ।

* * *

बाध्यमानोऽपि मद्भक्तः विषयैरजितेंद्रियः ।
प्रायः प्रगल्भया भक्त्या विषयैर्नाभिभूयते ।।
यथाऽग्निः सुसमिद्धोऽर्चिः करोत्येधांसि भस्मसात् ।
तथा मद्विषया भक्तिरुद्धवैनांसि कृत्स्नशः ।।

* * *

वाग्गद् गदा द्रवते यस्य चित्तं ।
भक्तिं परां परम हंसगतो लभेत ।।

या शेवटच्या श्लोकांतील विवेचनावरून वरील म्हणण्याचा आशय लक्षांत येईल. हा गीतेंतील सूत्रभूत असलेल्या "भक्त्या मामभिजानाति" या श्लोकाचा विस्तार आहे हें सांगावयास नको.

समाहृत्य स्वयोगं तु समस्तोपनिषद्रसम् ।
सख्ये मुख्यतमां भक्तिं मुक्तौ पुनरुपादिशत् ।।

हा श्लोक स्वामीजींनीं अठ्ठाविसाव्या अध्यायाच्या शेवटीं टीकेंत दिला आहे व एकोणतिसाव्या अध्यायाच्या प्रस्तावनेंत ते लिहितात,

ऊन त्रिंशे तु यः पूर्वं विस्तरेण निरूपितः ।
भक्ति योगस्तमेवाह स्वभक्ताय समासतः ॥

इत्यादि विवेचनावरून एकादश स्कंधामध्यें सर्वत्र प्रामुख्यानें भक्तियोगाचेंच विवेचन केलेलें दिसून येईल. कर्म, ज्ञान, वैराग्यादि त्याच्या उपयुक्ततेसाठीं आहेत. हाच भक्तियोग विस्तृत करतांना सुंदर आख्यायिका, मनोहर उपमा, रूपक वगैरेंनीं हा एकादश स्कंध अत्यंत रसाळ बनलेला आहे. असा ग्रंथ अद्याप झालेला नाहीं असें विद्वानांनीं स्पष्ट केलें आहे.

श्रीनाथांच्या लेखणींतून एकादश स्कंधाचें महत्त्व थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे,

जो काया आणि वाचा । विनीत होय नीचा ।
तो अधिकारी एकादशाचा । हा जनार्दनाचा उपदेशु ॥ १ ॥
जंव जंव देहीं ज्ञानाभिमान । जंव जंव योग्यता सन्मान ।
तंव तंव एकादशाचें ज्ञान । सर्वथा जाण अनोळखाचि ॥ २ ॥
टाकूनि संसारास्था । जो लागला भक्तिपंथा ।
तोचि अधिकारी भागवता । परमार्था ग्राहकु ॥ ३ ॥
जंव चित्त नाहीं सुचित । तंव नकळे श्रीभागवत ।
गुरुवांचूनि श्रीभागवतार्थ । नव्हे प्राप्त प्राणियांसी ॥ ४ ॥

याविषयीं जितकें लिहावें तितकें थोडेंच आहे. सारांश, भारतीय भगवद्गीतेंतील भक्तियोगाचा भागवतीय भगवद्गीतेमध्यें असलेला विस्तार म्हणजेच एकादश स्कंध होय व हेंच एकादश स्कंधाचें महत्त्व आहे.

## विषयासक्ति सांडून परमार्थसाधन करावें.

हरीसी जाहले जे अनन्य शरण । ते हरीचे लडिवाळ पूर्ण ।
त्यांचें हरी करी प्रतिपाळण । जेविं जननी जाण तानुलेया ॥

यालागीं जें जें जीविकावर्तन । तेंही करावें कृष्णार्पण ।
हें माझें म्हणोनि अभिमान । भक्त सज्ञान न धरिती कदा ॥

ज्याची आवडी अतिशयें चित्तीं । ज्याची आपणिया अति प्रीती
तें तें कृष्णार्पण करिती । गुरुवाक्यस्थिती विश्वासें ॥

यालागीं आठौ प्रहर । सेवेसी वेंचिती निज शरीर ।
निमिषार्धेंही व्यापार । विषयाकार करिती ना ॥

आयुष्याची अर्ध घडी । वेचितां न मिळे लक्ष कोडी ।
तेणें आयुष्यें परमार्थ जोडी । विषयांच्या कोंडी थुंकोनि सांडी ॥

त्यागोनिया राजसंपत्ति । राजे जाऊनि वनाप्रति ।
स्वयें परमार्थ साधती । विषयासक्ती थुंकोनी ॥

कैशी भक्तीची गोडी संपूर्ण । रिता जावो नेदी अर्ध क्षण ।
अवघे जीवितचि जाण । करी कृष्णार्पण सर्वस्वें ॥

आणि पुत्रदारादिक जें जें घरीं । तें तें भगवत्सेवे वारी ।
स्वयें कृष्णार्पण करी । माझी म्हणोनि न धरी ममता जीवीं ॥

दारा पुत्र देह गेह प्राण । यांसी आत्मा सबाह्य परिपूर्ण ।
तेथें संकल्पेवीण जाण । ब्रह्मार्पण सहजचि ॥

ना. भा. अ. ३-५५६ ते ५९, ६१ ते ६५

# भागवत आणि भक्तियोग

लेखक :

## ह. भ. प. शंकर महाराज खंदारकर

( संस्थान– खंदार व पंढरपूर )

नाथांच्या सर्व ग्रंथांपैकीं नाथभागवताचें अनन्य महत्त्व आहे. उत्तरमीमांसेत उपनिषदें, श्रीमद्भगवद्गीता, ब्रह्मसूत्रें ही प्रस्थानत्रयी मानली जाते, त्याप्रमाणें वारकरी संप्रदायांत ज्ञानेश्वरी, नाथभागवत, तुकाराम महाराजांची गाथा यांना प्रस्थानत्रयी मानली जाते. उपनिषदवाक्यांचा अर्थनिर्णय करण्याकरितां ब्रह्मसूत्रें आहेत आणि ब्रह्मसूत्रनिर्णीत अर्थात् अधिक अर्थाची भर घालून सर्वांकरितां भगवद्गीता आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं जें सूत्ररूपानें सांगितलें, त्याचा विस्तार नाथभागवतांत आहे आणि नाथभागवतांत जो भक्तियोग प्रामुख्यानें सांगितला, त्याचाच श्रीतुकोबांनीं पुरस्कार केला आहे.

नाथभागवत हें एक उत्कृष्ट काव्य आहे. नाथभागवतांत रसात्मकता तर आहेच, पण ‘ रसात्मकं वाक्यं काव्यम् ’ ही भोळी व्याख्या श्रीज्ञानेश्वर महाराजांना मान्य नाहीं. ते म्हणतात,

**वाचे बरवें कवित्व । कवित्वीं रसिकत्व ।**
**रसिकत्वीं परतत्त्व । स्पर्श जैसा ॥** ज्ञाने.

या श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या लक्षणाप्रमाणें नाथभागवतांत साहित्यरस आहे, त्याबरोबरच परतत्त्वस्पर्श, ब्रह्मज्ञानहि आहे. नाथ महाराजांनीं भागवतांत ग्रंथारंभीं सद्‌गुरूची जी स्तुति केली, त्यांतील रसाळपणाबद्दल श्री जनार्दन स्वामी म्हणतात,

**हे स्तुति कीं निरूपण । ग्रंथपीठिका कीं ब्रह्मज्ञान ।**
**साहित्य कीं समाधान । सज्ञानाहि कळेना ॥** ए. भा.

याप्रमाणें नाथभागवत साधें काव्य नसून तत्त्वज्ञानाचा ग्रंथ आहे. परतत्त्वस्पर्शरहित काव्याचा उपयोग मनोरंजनापलीकडे दुसरा कांहीं नसतो. पण नाथभाग-

वतांत तत्त्वज्ञान तर आहेच, पण नाथभागवतासारख्या ग्रंथाचा 'धर्म, नीति, व्यवहार कळण्याच्या दृष्टीनें समाजास अतिशय उपयोग होतो. श्रीमम्मटांनीं काव्याची विविध प्रयोजनें सांगितलीं आहेत.

**काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये ।**
**सद्यः परनिर्वृतये कान्तासंमिततयोपदेशयुजे ।।** काव्यप्रकाश

श्लोकांतील 'अर्थकृते' याचा अर्थ चतुर्विध पुरुषार्थप्राप्ति असा केला तरी चालेल. साहित्यदर्पणकारांनीं 'चतुर्विध पुरुषार्थप्राप्ति' काव्याचें प्रयोजन मानलें आहे.

वरील श्लोकांत सांगितलेल्या फलोद्देशानें श्रीनाथभागवतासारखे ग्रंथ प्रवृत्त झाल्यामुळें भागवताच्या परिशीलनानें चतुर्विध पुरुषार्थप्राप्ति, व्यवहारज्ञान, पापनिवृत्ति, परमानंद प्राप्त होतो.

पण चतुर्विध पुरुषार्थांपैकीं मोक्ष हा नित्य असल्यामुळें परम पुरुषार्थ आहे. मोक्षाकरितांच मूळ भागवतांतील एकादश स्कंधाची प्रवृत्ति आहे असें श्रीनाथ महाराज म्हणतात.

**मागा दहावे स्कंधीं जाण । कथा जाहली नवलक्षण ।**
**आतां मोक्षाचें उपलक्षण । सांगे श्रीकृष्ण एकादशीं ।।**

ए. भा. १-८२

पण मोक्षाकरितां अधिकाराची आवश्यकता आहे. तो अधिकार प्राप्त होण्याचें सुलभ साधन भक्ति आहे.

## भक्तियोगाची व्याप्ति

भागवतांत मुख्य विषय भागवतधर्म अर्थात् भक्तियोग आहे, हें उपक्रमोपसंहारादिकावरूनहि निश्चित होतें. भागवताच्या पाहिल्या आणि शेवटच्या दोन अध्यायांत यदुकुलक्षयाची कथा आहे. एकूण तीन अध्याय सोडून दुसऱ्या अध्यायापासून एकतिसाव्या अध्यायापर्यंत भक्तियोगाचेंच प्रतिपादन आहे. दुसऱ्या अध्यायांत वसुदेवनारदसंवादान्तर्गत निमिजायंताच्या संवादाच्या रूपानें भागवतधर्माचा-भक्तियोगाचा उपक्रम केला आहे आणि त्याच भक्तियोगाचा श्रीकृष्ण उद्धव संवा-

दाच्या रूपानें उपसंहार केला आहे. याप्रमाणें मुख्य प्रतिपाद्य विषय भक्तियोग आहे. याला अनुसरून अनेक विषय सांगितले आहेत.

भागवत धर्मालाच ' भक्ति ' हें दुसरें नांव आहे. विदेहानें आर्षभांना पहिला प्रश्न भागवतधर्माविषयीं केला असतां नऊ आर्षभापैकीं कवी उत्तर देतात,

**दारासुत गृहप्राण । करावें भगवंतासी अर्पण ।**
**हे भागवतधर्म पूर्ण । मुख्यत्वें भजन या नांव ॥**

ए. भा. २-२९२

या उत्तरांत भागवत धर्मालाच भजन-भक्ति हें मुख्य नांव आहे असें म्हटलें आहे.

भक्तीची व्याप्ति इतकी मोठी आहे कीं भगवद्विषयक जें जें असेल त्या सर्वांचा भक्तींत अंतर्भाव होतो. त्यामुळें भगवदर्पण बुद्धीनें नित्यनैमित्तिक वर्णाश्रम-विहित कर्में करण्यापासून सर्वांभूतीं भगवद्भाव या साक्षात्काराच्या अवस्थेपर्यंत ह्या सर्वांना ' भक्ति ' ह्या सामान्य नांवानें उल्लेखिलें आहे. सामान्याची व्याप्ति विशेषांत असते. ' दागिना ' हा विशेष आहे, सोनें सामान्य आहे. त्यामुळें सोन्याची व्याप्ति दागिन्यांत असणारच. त्याप्रमाणें ' भक्ति ' सामान्य आहे आणि देह, इंद्रिय, मन, बुद्धि यांच्या भगवद्विषयक होणाऱ्या क्रिया विशेष आहेत. त्यामुळें निष्काम कर्म, नवविधा भक्ति, श्रवण, मनन, निदिध्यासन इत्यादि सामान्य भक्तीचाच आविष्कार आहे.

## भक्तियोग-वर्णाश्रमधर्म-अष्टांगयोग

भागवतांत वर्णाश्रमधर्माचें प्रतिपादन केलें आहे. मनुष्यानें स्वभावप्राप्त शास्त्र-विहित कर्में अवश्य करावींत.

**मदर्पणें आवश्यक । करावें नित्य नैमित्तिक ।**
**तेंचि चित्ताचें शोधक । साधन मुख्य परमार्थीं ॥**
**एक म्हणती स्वधर्म निष्फळ । वर्म नेणतीच ते बरळ ।**
**स्वधर्में होय जन्म सफळ । परमार्थफळ स्वधर्मीं ॥**

ए. द. २...१५

**यापरी होऊनी अकामात्मा । सुखें आचरावें स्वधर्मा ।**
**तेणें सांडूनि रजतमा । सत्त्वें पुरुषोत्तमा पावती ॥**

ए. भा. १०-६१, ६२, ६८

याप्रमाणें निष्काम बुद्धीनें कर्में केल्यास चित्तशुद्धि होऊन भगवत्प्राप्ति होते. म्हणून मनुष्यमात्रानें वर्णाश्रमविहित कर्में अवश्य करावींत असा भागवताचा आग्रह आहे.

पण वैशिष्ठ्य हें आहे कीं चित्तशुद्धीचें एकमेव कर्मच साधन आहे असें नाहीं, तर भक्तीनेंहि चित्तशुद्धि होते. एवढेच नव्हे तर एकांतिक भक्तीमुळें कर्मांचा संकोच झाला तरी चालतो, असें भागवतांत म्हटलें आहे.

**ज्यासी भगवद्भजनीं विश्वासु । विधिनिषेध त्याचा दासु ।**
**देखोनि निजभजन विलासु । स्वयें जगन्निवासु सुखावे ॥**

**भागवतधर्में राहे कर्म । तंव तंव सुखावे पुरुषोत्तम ।**
**सप्रेम भक्ता बाधी कर्म । हा वृथा भ्रम भ्रांतासी ॥**

वरील ओव्यांत एकांतिक भक्तिप्रेमामुळें वर्णाश्रमधर्मांचा संकोच होतो असें सांगितलें आहे. तो संकोच भगवत्प्राप्तीच्या सोयीकरितां आहे आणि तो अनन्य, अव्यभिचारी, निर्हेतुक भक्तीमुळें होतो, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. लोकवासनेकरितां किंवा व्यावहारिक सोयीकरितां वर्णाश्रमधर्मांचा संकोच भागवताला किंवा इतर कोणत्याहि आस्तिक ग्रंथकारांना मान्य नाहीं.

योग्याला इंद्रियनिग्रहाचे कष्ट होतात, ते भक्ताला होत नाहींत. याविषयीं नाथ महाराज म्हणतात,

**योगी इंद्रियें कोंडिती । ते भक्त लाविती भगवद्भक्ति ।**
**योगी विषय जे त्यागिती । ते भक्त अर्पिती भगवंतीं ॥**

**योगी विषय त्यागिती । त्यागितां ते दुःखी होती ।**
**भक्त विषयो भगवंतीं अर्पिती । तेणें ते होती नित्य मुक्त ॥**

याप्रमाणें अष्टांग योगाचें फळ भक्तीनेंहि प्राप्त होतें.

## भक्तीचें त्रिविध स्वरूप

सामान्य भक्तींत नवविधा भक्तींचा अंतर्भाव आहे. नवविधा भक्तीपैकीं एक एक भक्तिदेखील भगवत्प्राप्तीस पर्याप्त आहे. चिंतामणींच्या समूहापासून जें फळ प्राप्त होतें, तें एका चिंतामणीपासूनहि होतें. त्याप्रमाणें श्रवणादि नवविधापैकीं एक एक भक्तीच्या अनुष्ठानानेंदेखील भगवत्प्राप्ति होते. तरीसुद्धां सोपेपणा, इतर साधन निरपेक्षता, सर्वाधिकार योग्यता, निश्चित फळ या बाबतींत 'नामसंकीर्तन' भक्तीची बरोबरी इतर भक्ति करूं शकत नाहींत. म्हणून नाथ महाराजांनीं प्रसंगानुसार नामाचें महत्त्व पुष्कळच वर्णिलें आहे.

**धन्य भगवंताचें नाम । नामें केलें नित्य निष्काम ।**
**समूळ मिथ्या भवभ्रम । गर्जोनि निःसीम हांक फोडी ।।**

ए. भा. २-६३

याप्रमाणें नामसंकीर्तनाविषयीं नाथांच्या मनांत असलेली आवड ठिकठिकाणीं व्यक्त झाली आहे.

भक्तीचें परम साध्य 'सर्वांभूतीं भगवद्भाव' ही ज्ञानदृष्टि प्राप्त होणें हें आहे. पण ही दृष्टि जगत्सत्यत्वाचे संस्कार असलेल्या जीवाला एकदम प्राप्त होणें शक्य नाहीं. म्हणून त्याचा क्रम सांगितला आहे. त्या क्रमानें गेल्यास मनुष्याच्या दृष्टींत थोडथोडा व्यापकपणा निर्माण होऊन शेवटीं 'सर्वांभूतीं भगवद्भाव' अशी व्यापक ज्ञानदृष्टि प्राप्त होते. ज्या क्रमानें व्यापक ज्ञानदृष्टि प्राप्त होते, तो क्रम तीन प्रकारचा आहे. त्या क्रमांनाहि भक्तिच म्हणतात. ह्या क्रमभक्तीस प्राकृत, मध्यम व उत्तम अशीं नांवें आहेत. ह्या तीन प्रकारच्या क्रमभक्तीचें स्वरूप पुढीलप्रमाणें आहे.

## प्राकृत भक्तीचें स्वरूप

**पाषाण प्रतिमा हाचि देवो । तेथेंचि त्याचा पूर्ण भावो ।**

ए. भा. २-४७

हें प्राकृत भक्तीचें स्वरूप आहे. ईश्वराच्या पाषाण प्रतिमेच्या ठिकाणीं ज्याची देवबुद्धि आहे, तो 'प्राकृत भक्त' समजला जातो. पाषाण प्रतिमेच्या ठिकाणीं

देवबुद्धि ठेवून अनेक पूजा, द्रव्य, भोगोपचार, श्रद्धापूर्वक समर्पण करणें यास 'प्राकृत भक्ति' असें म्हणतात. पाषाण प्रतिमेच्या ठिकाणीं 'देव' अशी श्रद्धा ठेवण्यास मूळ कारण 'शास्त्र' आहे हें विसरूं नये. डोळ्यानें उघड उघड पाषाण दिसत असतां त्यास देव म्हणणें-मानणें ही गोष्ट एखाद्या तार्किकाच्या बुद्धीतून निघालेली कल्पना नसून या श्रद्धेचें मूळ उगमस्थान शास्त्र किंवा साधु-संतांचीं वचनें आहेत.

ज्यांना निर्गुणाचा बोध होण्याइतकी सुसंस्कृत बुद्धि नाहीं आणि सगुण साक्षात्कार होण्याइतकें भाग्य नाहीं, अशा मंदाधिकाऱ्याला पाषाणप्रतिमेच्या ठिकाणीं 'देवबुद्धि' सुरुवातीची भक्ति—प्राकृत भक्ति अत्यंत उपयुक्त आहे.

## मध्यम भक्तीचें स्वरूप

**ईश्वरीं प्रेम पवित्र । भक्तासि मैत्री मात्र ।**
**अज्ञानी तो कृपा पात्र । उपेक्षा निरंतर द्वेषियासी ॥**

अशी मध्यम भक्ताची मध्यम भक्ति असते. पूर्वींच्या प्राकृत भक्तीपेक्षां या मध्यम भक्तींत दृश्य पदार्थाला पहाण्याच्या दृष्टींत थोडासा विकास झालेला असतो. मध्यम भक्ताचें ईश्वराच्या ठिकाणीं पवित्र प्रेम असतें. भगवद्भक्तांच्या ठिकाणीं मैत्री, अज्ञान्याविषयीं कृपा, द्वेषी लोकांविषयीं उपेक्षा, अशी वृत्ति असते. या भक्तींत थोडी व्यापकता निर्माण झालेली असल्यामुळें भूतमात्रांविषयींचा मत्सर नाहींसा झालेला असतो. हें पूर्वींच्या प्राकृत भक्तीपेक्षां मध्यम भक्तीचें वैशिष्ट्य आहे.

## उत्तम भक्तीचें स्वरूप

**सर्वांभूतीं भगवंत पाही । भूतें भगवंताच्या ठायीं ।**
**हें अवघें जो स्वदेहीं । स्वस्वरूपें पाही स्वयें होय ॥**

ए. भा. २-३९

'सर्वांभूतीं भगवद्भाव' पाहणारा भक्त 'उत्तम भक्त' समजला जातो. 'सर्वांभूतीं भगवद्भाव' ही ज्ञानाची आणि भक्तीची पराकाष्ठा आहे. वरील दोन भक्तिप्रकार साधनरूप आहेत. ही उत्तम भक्ति साध्यरूप आहे. जो स्वतः भगवत्-रूप झाला असेल, त्याला 'सर्वांभूतीं भगवद्भाव' पहाण्याची दृष्टि प्राप्त होते. ही

उत्तम भक्ति सांगण्यांतच भागवतशास्त्राचें तात्पर्य आहे. सर्व साधनें उत्तम भक्ति प्राप्त होण्याकरितां सांगितलीं आहेत. या उत्तम भक्ताचें श्रीनाथ महाराज वर्णन करतात,

**तो योगियामाजीं अग्रगणी । तो सिद्धामाजीं मुकुटमणी ।**
**तो ज्ञानियांचा शिरोमणी । हे चक्रपाणि बोलिला ॥**

ए. भा. २-६४

हा भक्त सर्वांत श्रेष्ठ आहे.

सर्वत्र हरिरूपानें पाहण्याची दृष्टि उत्कृष्ट अधिकाऱ्याला गुरुकृपेनें प्राप्त होते. पण इतका अधिकार नसेल तर निदान 'सर्वांभूतीं भगवद्भावना' तरी ठेवावी आणि सर्व भूतांशीं निर्मत्सर बुद्धीनें वागण्याचा प्रयत्न करावा, हें या उत्तम भक्तीचें वैशिष्ठ्य आहे.

## भागवत आणि औपनिषद् तत्त्वज्ञान

मूळ श्रीमद्भागवत 'निगम कल्पतरोर्गलितं फलम्', वेदवृक्षापासून अमृतद्रवानें युक्त, शुकमुखांतून गळालेलें सुपक्क फळ आहे. त्यामुळें वेदाचें जें प्रतिपाद्य आहे, तेंच भागवताचें आहे. उपनिषदांत जो ज्ञानप्राप्तीचा साधनमार्ग सांगितला आहे, तो जसाच्या तसा भागवतास मान्य आहे. भागवतांत चार वर्ण, चार आश्रम, त्यांचे धर्म सांगितले आहेत. निष्काम कर्मानें चित्तशुद्धि होते. शांत, दांत, उपरत, तितिक्षु, समाहित, तीव्र, जिज्ञासु ज्ञानाचा अधिकारी आहे, हें उपनिषदाप्रमाणें भागवतांतहि सांगितलें आहे. ज्यास ब्रह्मज्ञान असें उपनिषदांत म्हटलें आहे, त्यास भागवतांत 'सर्वांभूतीं भगवद्भाव' असें म्हटलें आहे. ज्ञानाकरितां गुरूला शरण जाण्याची आवश्यकता आहे, हें भागवत आणि उपनिषदें या दोहींनाहि संमत आहे. उपनिषदांत जें तत्त्वज्ञान सूत्ररूपानें सांगितलें, तेंच भागवतांत भाष्यरूपानें सांगितलें आणि जें तत्त्वज्ञान मूळ भागवतांत भाष्यरूपानें सांगितलें तेंच नाथमहाराजांनीं वार्तिकरूपानें स्वतःच्या टीकेंत मूळ भागवतांतील उक्त अनुक्त अर्थाचा विचार करून सांगितलें आहे. त्यामुळें उपनिषदांतील तत्त्वज्ञानच परंपरेनें नाथांच्या भागवतांत आलें आहे. तें कसें आलें आहे तें पाहूं. उपनिषदांत गुरूचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे,

**समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ।**

नाथांचें वर्णन,

**जो शब्दज्ञानी पारंगतु । ब्रह्मानंदें सदा डुल्लतु ।**
**शिष्य प्रबोधनी समर्थु । यथोचितु निजभावें ॥**

ए. भा. २-२१८

गुरूंच्या सहवासांत राहून गुरुभक्ति करावी, गुरु उपदेश करतात.

**याचिलागीं सद्गुरुपाशीं । शरण रिघावें सर्वस्वेसीं ।**
**तो संतोषोनिया शिष्यासी । भजन धर्मासी उपदेशी ॥**

ए. भा. ३-३९

नाथांच्या भागवतांत उपनिषदाप्रमाणें माया मानलेली आहे. प्रपंचाचा अध्यास मानलेला आहे. प्रपंच अध्यस्त आहे. प्रपंचाचें अधिष्ठान परमात्मा हरि सत्य आहे. हें कळल्याशिवाय सर्वांभूतीं भगवद्भावाची दृष्टि प्राप्त होणें शक्य नाहीं. अलंकाराचें रूप मिथ्या आहे हें कळल्याशिवाय अलंकार पाहूनहि हें सोनें आहे असा तात्त्विकदृष्टीनें व्यवहार होत नाहीं. अलंकाराचें मिथ्यात्व कळल्यानंतर मात्र अलंकार न आठवितांदेखील 'सोनें' ही दृष्टि प्राप्त होते. त्याप्रमाणें भूतें मिथ्या आहेत हें कळल्याशिवाय अधिष्ठान दृष्टीनें 'भूतें भगवंत' आहेत हें कळणें शक्य नाहीं. कारण नामरूपाच्या सत्यत्वाच्या भ्रमांत अधिष्ठानाची ओळख नसते. यास कारण माया आहे. उपनिषदांत '**मायांतु प्रकृतिं विद्यात् ।**' माया जगाचें प्रकृति म्हणजे उपादान कारण आहे असें म्हटलें आहे. नाथभागवतांत

**हें नसतेनि रूपें रूपा आली । सत्यासत्यें गरोदर झाली ।**
**तेथ असत्याचीं पिलीं । स्वयें व्याली असंख्य ॥**

ए. भा. ३-४३

परमात्म्याचें ठिकाणीं माया आणि मायाकार्य जगताचा अध्यास असला तरी सुद्धां परमात्मस्वरूपाचा उपमर्द होत नाहीं, त्याच्या एकत्वाची हानी होत नाहीं. कारण परमार्थतः दुसरें कांहीं झालें नाहीं.

उपनिषदांत ज्याला तत्त्वज्ञान म्हटलें आहे, त्याला भागवतांत 'शुद्ध भक्ति' असें म्हटलें आहे. ब्रह्मज्ञानाची पराकाष्ठा म्हणजे जीव ब्रह्म आहे या प्रतीति-

बरोबर जगत् ब्रह्म आहे ही प्रतीति येणें होय. ही सर्वांत मोठी अवस्था आहे. या अवस्थेचें उपनिषदांत पुढील प्रमाणें वर्णन आहे,

**यत्र सर्वात्मैवाभूत तत्र केन कं पश्येत् ।**

श्रीनाथ महाराज श्रीकृष्ण उद्धव संवादांत वरील ऐक्याचें वर्णन करतात,

**जीव परमात्मा दोन्ही एक । ऐसें जाणणें तें ज्ञान देख ।**
**ऐक्य तें परमात्मसुख । विज्ञान सम्यक् त्या नांव ॥**
**तेव्हां जेथें देखे जें जें कांहीं । तें मीवांचूनि आन नाहीं ।**
**मग अनन्य भावें तियें ठायीं । भजे पाही भावार्थें ॥**
**यापरी ज्ञानविज्ञानसंपन्न । मजवेगळें न देखती आन ।**
**तैसेंचि माझें अनन्य भजन । शुद्ध भक्ति जाण या नांव ॥**

ए. भा. १९-६५, ६७,७०

याप्रमाणें उपनिषदांत सांगितलेलें तत्त्वज्ञान 'सर्वांभूतीं भगवद्भाव' इत्यादि वेगळ्या भाषेंत सांगितलें आहे. ही 'सर्वांभूतीं भगवद्भावाची अवस्था' ज्ञानाची आणि भक्तीची पराकाष्ठा होय. याकरितांच भागवत ग्रंथाची प्रवृत्ति आहे.

याप्रमाणें साध्यसाधनरूप भक्ति सांगण्याकरितां नाथांच्या भागवत ग्रंथाची प्रवृत्ति आहे. नाथभागवत मूळ भागवती श्लोकांवरील टीकात्मक ग्रंथ असला तरीसुद्धां अनेक कथा संवादांच्या द्वारां गोड भाषेंत परमार्थाची गोडी निर्माण करून बद्धाला मुमुक्षु बनवून मुमुक्षूला मुक्त करण्याकरितां लिहिलेला तो एक महान् ग्रंथ आहे.

## सर्व भावें माझी भक्ति किंवा सेवा म्हणजेच विज्ञान

हृदयीं नित्य माझें ध्यान । मुखीं माझें नामकीर्तन ।
श्रवणीं माझें कथाश्रवण । करी मदर्चन सर्वदा ॥
नयनीं मम मूर्तिदर्शन । चरणीं मदालयागमन ।
रसनें मम तीर्थप्राशन । मत्प्रसाद भोजन अत्यादरें ॥
साष्टांगें मजचि नमन । आल्हादें मद्भक्त आलिंगन ।
सप्रेम माझे सेवेवीण । रिता अर्ध क्षण जाऊं नेदी ॥
ऐसी सेवा करितां पहा हो । सर्व भूतीं देखे मद्भावो ।
हा सर्व धर्मामाजीं रावो । तेथें अपावो कदा न रिघे ॥
सर्व भूतीं माझें दर्शन । तेव्हां वैराग्य वोसंडे पूर्ण ।
तेथ सहजें उठे शुद्ध ज्ञान । देहाभिमान च्छेदिक ॥
संसार मायिक रचना । सत्यत्वें कळलें ज्याच्या मना ।
तैं मनचि लाजे मनपणा । विज्ञान जाणां त्या नांव ॥

ना. भा. अ. २०-३७८ ते ८२, ९०

---

## सद्गुरूवांचून ब्रह्मज्ञानप्राप्ति नाहीं.

सद्गुरूवीण ब्रह्मज्ञान । सर्वथा नव्हे नव्हे जाण ।
हें उपनिषदर्थें प्रमाण । परम निर्वाण सांगितलें ॥
रत्न सांपडलें अवचितें । परि खरें खोटें संशय तेथें ।
रत्नपारखी करी मोलातें । अति यत्न त्यातें मग करिती ॥
तैसें निजस्वरूप आइतें । श्रद्धा सद्गुरूचेनि हातें ।
खरें करूनिया ज्ञाते । निजसुखा पावले ॥

ना. भा. अ. १०-१०७, ११, १२

---

# साधकावस्थेंतील पथ्यें


: लेखक :

**श्री. स. के. नेऊरगांवकर,** बी. ई.; ए. एम. आय्. ई.

( सेवानिवृत्त, सिटी इंजिनिअर, पुणें महानगरपालिका )


**शरण शरण एकनाथा । पायीं माथा ठेविला ॥**

या मृत्युलोकांतील दुःखांतून कायमची सुटका व्हावी व शाश्वत सुखाची प्राप्ति व्हावी म्हणून शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें जे पुरुष प्रयत्न करतात, त्यांना साधक असें म्हणतात व त्यांच्या प्रयत्नांना साधन मार्ग असें म्हणण्यांत येतें. या साधन मार्गांत अनेक बिकट व धोक्याच्या जागा असतात. त्यापासून साधकाला फार सावध राहावें लागतें. ज्याप्रमाणें एखादा रोगग्रस्त मनुष्य आपल्या रोगांतून मुक्त होण्यासाठीं वैद्याकडे जातो व तो वैद्य त्याच्या रोगाची चिकित्सा करून त्याला औषध देतो व त्याबरोबरच अमुक खाऊं नका, उघड्यावर झोपूं नका वगैरे पथ्येंहि कटाक्षानें पाळण्यास त्याला बजावतो, तशीच स्थिति भवरोगानें जर्जर झालेल्या साधकाची असते. या मृत्युलोकांत जन्माला आलेल्या प्रत्येकाला जीवरूपी क्षयाची व्याधि जडलेली आहे. चंद्र क्षयरोगी असलेला आपण पहातोच, सूर्याच्या मागें रोज अस्त लागला आहे, मग बापड्या मानवाची कथा काय ! तो मृत्युग्रस्त आहे. पण या भवरोगांतून मुक्त होण्यासाठीं प्रयत्न करणारे फारच थोडे आहेत. ज्यांचे पदरीं पूर्व जन्मींच्या सुकृताची जोड असेल, त्यांनाच साधु पुरुषाची भेट होते व ते त्याला जीवबुद्धिरूपी क्षयव्याधींतून मुक्त होण्यासाठीं पारमार्थिक ज्ञानरूपी औषध सांगतात व त्याबरोबरच राहणी कशी असावी, काय पथ्यें सांभाळावीं, तीं सांगतात. औषधाबरोबर पथ्य सांभाळलें तरच औषधाचा गुण येतो, एऱ्हवीं नाहीं. कुपथ्य केलें म्हणजे रोग होतो. कुपथ्य केलें व जरी औषध दिलें तरी तो रोग कधींहि बरा होत नाहीं. म्हणून साधुसंतांचा भर या पथ्यावर असतो. त्यांचा ज्ञानाचा उपदेश फलद्रूप होण्यासाठीं ते या पथ्यावर फार भर देतात. जो पथ्य पाळीत नाहीं तो साधकच नव्हे. श्रीएकनाथ महाराजांचें

चिरंजीवपद हें साधकाला सांगितलेलें एक उत्कृष्ट पथ्य आहे. त्यांत त्यांनीं साधकाला अत्यंत मौल्यवान उपदेश केला आहे. प्रत्येक साधकानें त्याचें चिंतन करून त्याच्या प्रकाशांत आपली राहणी ठेवावी, असा हा अभंग दिवा आहे. देव प्राप्त करून घेण्यासाठीं साधक प्रयत्न करूं लागला, त्याचें अंगीं थोडेसें वैराग्य उत्पन्न झालें म्हणजे त्याच्या आसपासची प्रापंचिक स्त्री पुरुष मंडळी त्याची स्तुति करूं लागतात. त्याला घरीं बोलावून त्याचा सन्मान करूं लागतात. चांगलीं गोड पक्वान्नें करून त्यास वाढतात. 'हा हरीचा अवतार आमचा उद्धार करण्यासाठीं आला आहे, अशी स्तुति करून त्याला हरभऱ्याच्या झाडावर चढवतात. अपरिपक्व दशेंतील साधक या स्तुति सन्मानाच्या खड्ड्यांत पडतो, त्याचा साधन मार्ग खुंटतो व मग जे लोक पूर्वीं त्याची 'महाराज' म्हणून स्तुति करीत होते तेच त्याची निंदा करूं लागतात. यासाठीं श्रीनाथ महाराजांनीं साधकांना त्यांच्या साधन मार्गांतील धोक्याच्या सूचना अगोदरच देऊन जागृत करून ठेवले आहे.

साधकाची दशा उदास असावी. त्याला अंतर्बाह्य उपाधि असतां कामा नये. त्यानें फार खाऊं नये, फार निद्रा घेऊं नये व फार बोलूंहि नये. एकांतीं अथवा लोकांतीं स्त्रियांशीं भाषण करूं नये. इंद्रियांना लळा देऊं नये. या रीतीनें साधकानें जपून राहावें म्हणून सर्व संतानीं साधकाला बजावून ठेवले आहे. सामान्य नोकरी-साठीं अर्ज करावयाचा असला तर अंगीं कांहींतरी शैक्षणिक पात्रता जर असावी लागते तर देवप्राप्तीसाठीं जो निघाला, त्याचें अंगीं कितीतरी पात्रता असणें जरूर आहे ! साधक हा जसा अधिकारसंपन्न असावा लागतो, तसा तो नियमबद्धहि लागतो. ही नियमबद्धता म्हणजेच पथ्य पाळणें होय. सर्व इंद्रियांची मोहर आत्म्याकडे लावण्यासाठीं हीं इंद्रियें आधींच लौकिक विषयांमध्यें गुंतलेलीं असतात. त्यांना तेथून युक्तीनें काढून तीं देवाकडे लावावीं लागतात. हें काम फार कठीण आहे. कारण इंद्रियें हीं गुरासारखीं असतात. शिवाय तीं बलवानहि असतात. त्यांना नियमाच्या दाव्यानें बांधून ठेवावें लागतें. पुष्कळ वेळां हिसडा देऊन हीं इंद्रियें दावीं तोडून परत विषयाकडे पळून जातात व साधकाला पुनः पुनः त्यांना आवरावें लागतें. टांग्याच्या घोड्याच्या डोळ्यांना जशीं ढापणें लावतात, तशीं साधकाच्या इंद्रियांना नियमाचीं ढापणें लावावीं लागतात. विषयांचें मोकाट सेवन साधकाला करतांच येत नाहीं. 'आव जाव घर तुम्हारा' म्हणून इंद्रियांचीं कवाडें मोकळीं ठेवलीं तर विषय-

रूपी चोराकडून त्याची नागवणूक होईल. त्यासाठीं संयमरूपी कवाडांत हीं इंद्रियें कोंडावीं लागतात. साधकाच्या इंद्रियांना बंधन नसेल तर तो साधकच होणार नाहीं. मोरीला बोळा व दार उघडें अशी हास्यास्पद स्थिति होईल. खरा साधक हातांत संयमाची काठी घेऊन इंद्रियांवर जागता पहारा ठेवतो. शेवटच्या मुक्काम गांठीपर्यंत साधकाला पथ्य सांभाळावें लागतें. समुद्राच्या तीराजवळ येऊनहि दृष्टि-पथांत आलेली साधुवाण्याची नाव बुडाल्याची कथा आपण वाचतो; तशीच स्थिति साधकानें मध्येंच पथ्य सोडलें व इंद्रियांना लळा दिला तर त्याची होते व त्याची परमार्थाची नाव बुडते.

श्रीएकनाथ महाराज हे फार मोठे सद्वैद्य होऊन गेले. त्यांनीं सर्व साधकांना निरपेक्ष बुद्धीनें फुकट औषध दिलें व त्याचबरोबर कळकळीनें पथ्यहि सांगितलें. असे दयाळु संत फारच दुर्मिळ आहेत. श्रीनाथ महाराज रोज कीर्तन करीत व त्यांच्या घरीं कीर्तनश्रवणास येणाऱ्या श्रोत्यांना ओघराळभर साखर प्रसाद म्हणून वाटीत. यावरून त्यांच्या अंतकरणांत दुःखी, कष्टी जीवाबद्दल असलेली दया व कळकळ दिसून येते. हीच अंतःकरणाची कळकळ व दया एकनाथी भागवतांत साधकाला पथ्यें सांगतांना पदोपदीं दिसून येते. जीवबुद्धीचा क्षय लागलेल्या रोग्यांना ब्रह्म-रसाचा काढा नाथांनीं आपल्या कीर्तनांत व भागवताच्या प्रवचनांत मोफत पाजला व त्याचबरोबर पथ्येंहि सांभाळण्यास बजावलें. श्रीएकनाथी भागवतांत नाथ महाराजांनीं ठिकठिकाणीं पथ्यें सांगितलीं आहेत. साधकांना सुस्पष्ट व अचूक मार्गदर्शन करणारा हा उत्कृष्ट ग्रंथ आहे. प्रस्तुत लेखांत कांहीं थोडा महत्त्वाचा या संबंधीचा भाग नाथ महाराजांच्या शब्दांतच सांगतों.

## पवित्रता

मुख्य पथ्य म्हणजे अंतर्बाह्य शुद्धतेचें. साधकानें सदा आंत बाहेर निर्मळ राहिलें पाहिजे. कर्माचरण करून बाह्य शुद्धि साधते व त्यापेक्षां महत्त्वाची अंतशुद्धि ही विवेकाच्या साधनेनें साधते. निरनिराळ्या वासनेमुळें मलिन झालेलें मन गुरुवाक्यानें धुवावें लागतें. श्रीएकनाथ महाराज म्हणतात,

**मुख्य साधावया परमार्था अवश्य पाहिजे गा शुचिष्मता ।**
**शुचित्वावांचोनि तत्त्वतां । न लभे हातां निजस्वार्थ ॥**

वासनेनें मलिन झालेलें मन शुद्ध केल्याशिवाय नुसती बाह्य पवित्रता मिरवणें हें आंधळ्यानें न्याहाळून पहाण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे.

**मन मळिण वासनामेळें । तें प्रक्षाळूनि सोंवळें ।**
**करावें गा भावबळें । गुरुवाक्यमेळें निजनिष्ठा ॥**
**मन मळिण वासनामेळें । तें न करितां सोंवळें ।**
**बाह्य पवित्रता अहंबळें । ते जाण अंधळे न्याहाळी जैसें ॥**

अंतःशुद्धि झाली कीं बाह्यशुद्धि स्वभावतःच लाभते. लोखंडानें परीस झांकण्याचा जरी प्रयत्न केला तरी तें लोखंडच आपलेपणाला मुकतें. त्याप्रमाणें गुरूच्या उपदेशानें अंतःकरण शुद्ध झालें म्हणजे अंतर्बाह्य अशी पवित्रता प्रगट होते. एखादी मुलगी जरी कितीहि सुंदर असली, पण तिच्या ओंठावर एवढेंसें कोड उठलेलें असेल तर तिला कोणी सज्जन पसंत करीत नाहीं.

**सुंदरी सुकुमार साजिरी । वोठीं कुष्ठता तिळभरी ।**
**जालिया तीतें कोणी न वरी । वरीवरी बरी दिसतांही ॥**
**तेवीं अंतरीं विकल्प असतां । बाह्य जे जे पवित्रता ।**
**ते ते क्रिया नृपनाथा । जाण तत्त्वतां अतिभंडिमा ॥**
**अंतर क्षाळिलें गुरुप्रतीती । बाह्य क्षाळिलें शास्त्रयुक्तीं ।**
**ऐसें शुचित्व निजनिश्चितीं । अद्वैतस्थिति तेथें नांदे ॥**

ए. भा. ३-९२, ९५, ९६

## एकाकी राहावें.

साधकानें दुसरें महत्त्वाचें पथ्य पाळण्याचें म्हणजे 'एकाकी' राहण्याचें. ज्या ठिकाणीं लोक राहतात त्यामध्यें मिसळण्यानें साधनांत विक्षेप उत्पन्न होतो. फार काय, दोन माणसें जरी एकत्र आलीं तरी तेथें गप्पा गोष्टी होतात आणि वायफळ गोष्टींत वेळ जातो व अभ्यास खंडतो. नाथांनीं त्यासाठीं एका उपवर मुलीची फार उत्कृष्ट कथा सांगितली आहे ती मुळांतच पाहण्यासारखी आहे.

**म्हणे दोघांचा संग एके स्थानीं । तेथें सर्वथा न राहे ध्वनी ।**

ए. भा. ९-१०२

**जेथें होय बहुतांची वस्ती । तेथें अनिवार कलहप्राप्ती ।**
**दोघे बैसल्या एकांतीं । वार्ता करिती बहुविधा ॥**
**जेथें गोष्टीमाजीं काळ जाये । तेथ निजस्वार्थ हो न लाहे ।**
**यालागीं मी पाहे । विचरत आहे एकाकी ॥**
**एकाकीं एकाग्रता । साधिल्या थोर लाभ ये हातां ।**

ए. भा. ९-११३ ते ११५

## कनक आणि कांता-आसक्ति नको.

कनक आणि कांता यांच्याविषयीं कडक असें पथ्य सर्वच साधुसंतांनीं सांगितलें आहे. या दोन्ही विषयींची आसक्ति जीवाच्या नाशाला कारण होतें. यांची आसक्ति धरावी तों तों दुःख वाढतच जातें. स्त्री व पैसा यांच्याविषयीं मनापासून उबग आला तरच साधकाची परमार्थांत वाटचाल होऊं शकते. याला वैराग्य म्हणतात. रस्त्यांत चालतांना पायाखालीं काष्ठाची पुतळी जरी आली तरी साधकानें तिला स्पर्श करूं नये. स्त्रीची निर्जीव प्रतिमादेखील साधकामध्यें विकार उत्पन्न करूं शकते. स्वप्नांतील स्त्रीच्या दर्शनानें पुरुष बांधला जातो, मग जागेपणीं स्त्रीचा मोह उत्पन्न झाला तर मग परमार्थ कसा घडावयाचा? स्त्रियांच्या पायीं लागणाऱ्यांचें पतन हें ठेवलेलेंच आहे. साधकानें स्त्रीचा एकांतात सांगात जसा वर्ज्य केला पाहिजे, त्याचप्रमाणें शिष्यिणी करून त्यानें स्वतः खोड्यांत अडकूं नये.

**मूळ नाशासी जीविता । कनक आणि योषिता ।**
**जंव जंव यांची आसक्तता । तंव तंव चढता भवरोग ॥**

ए. भा. ८-११९

**जो सुख इच्छील आपणासी । तेणें नातळावें स्त्रियेसी ।**

ए. भा. ८-१२१

**पुरुष आपणया म्हणविती । शेखीं स्त्रियांचे पाय धरिती ।**
**त्यासीं कैसेनि होईल मुक्ति । स्त्रीसंगतीं अधःपात ॥**

ए. भा. ८-१३१

## कामविकार नको.

अंतःकरणांत कामविकार उत्पन्न होऊं न देण्याविषयीं साधकानें जागरूक

राहिले पाहिजे. तप करण्यासाठीं साधक वनामध्यें गेला व मनांत जर कामवासना असेल तर तेथें भगवंताचें चिंतन व्हावयाच्या ऐवजीं तो स्त्रीचेंच चिंतन करूं लागेल. मनांतील वासना निखालस काढणें हें ध्यानाला अत्यंत अवश्य आहे.

**सकाम वना जाय तपासी । तो वनींही चिंती वनितेसी ।**
**तें तपचि बाधक होय त्यासी । काम आंगेसीं वर्ततां ।**

ए. भा. १९-४५२

## धन, स्त्री व स्त्रैण यांचा मोह टाळावा.

धन आणि स्त्री यांचा मोह ठेवल्यानें परमात्म्याची भेट दुरावते व सद्गुरुहि उपेक्षा करतात.

**जो धनमानी आणि स्त्रीजित । त्यासी विमुख होय हृदयस्थ ।**
**त्यानें सद्गुरुही उपेक्षित । परम अनर्थ अविश्वासें ॥**

ए. भा. २३-३०७

स्त्री जरी विरक्त असली तरी साधकानें तिची संगति करूं नये. अग्नीच्या सहवासानें तूप जसें पातळ होतें, त्याप्रमाणें स्त्रीच्या संगतीनें वृत्ति विकारवश होते. अमृत म्हणून विष खाल्लें तरी तें हटकून मरणच आणील, तशी स्त्री सात्त्विक आहे, विरक्त आहे म्हणून तिचा संग केला तरी तो साधकाला नाडील. सुप्त संस्कार दबलेले असतात, ते जागृत होतात. अग्निमध्यें तूप जर राहील तरच स्त्री-संगतींत साधकाचा परमार्थ घडेल! भांड्यांतील तूप संपून अनेक वर्षें झालीं तरी अग्नीच्या संगतीनें त्या घागरींतील शेष तुपाला पुन्हां पाझर फुटतो, त्याप्रमाणें स्त्रियांच्या सहवासांत म्हातारपणींसुद्धां विषयांची इच्छा उत्पन्न होते व ती पुरुषाला अनर्थांत घालते.

स्त्रीसंगाप्रमाणें स्त्रैण मनुष्याची संगतिहि साधकानें टाकावी.

**जरी स्त्रियेची विरक्त स्थिति । तरी साधकीं न करावी संगति ।**
**अग्निसंगें घृतें द्रवती । तेवीं विकारे वृत्ति स्त्रीसंगें ॥**
**अमृत म्हणोनि खातां विष । अवश्य मरण आणी देख ।**
**स्त्री मानूनि सात्त्विक । सेवितां दुःख भोगवी ॥**

अग्निमाजीं घृताची वस्ती । जरी बहुकाळ निर्वाहती ।
तरी स्त्रीसंगें परमार्थी । निजात्मस्थिति पावते ॥
घृत वेंचल्या वर्षे झालीं साठी । तरी अग्नीसंगें द्रव उपजे घटीं ।
तेविं प्रमदासंग परिपाटीं । वार्धकींही उठी अति कामु ॥
तेथ स्वदारा आणि परदारा । या करूं नेदी विचारा ।
प्रवर्तवी स्वेच्छाचारा । स्त्रैण खरा अति घाती ॥
स्त्रैण जेथें प्रवेशला । तेथें अनाचार वेलीं गेला ।
अधर्म सर्वांगीं फुलला । बाधकत्वें फळला अनर्थ फळीं ॥
या लागीं जो परमार्थी । तेणें स्त्रैणाची संगति ।
सर्वथा न धरावी हातीं । पाडी अनर्थी तो संग ॥

ए. भा. २६-२३८ ते २४४, २४९ ते २५१

अवश्य त्यागावी दुःसंगता । तो दुःसंग कोण म्हणशी आतां ।
तरी स्त्री आणि स्त्रैणापरता । दुःसंग सर्वथा असेना ॥

ए. भा. २६-३०२

## विधीनें युक्त सेवन

साधकानें वेदाज्ञेला धरून विहित विषयाचें परिमितच सेवन करावें. साधकाचा आहार युक्त पाहिजे, विहार युक्त पाहिजे, निद्रा युक्त पाहिजे, साधकाची सर्वच राहणी युक्त पाहिजे. इंद्रियांची प्रवृत्ति स्वभावतःच विषयाकडे आहे. म्हणून निषिद्ध विषय सर्वथा त्याज्य ठरवून विहित विषयदेखील परिमितच सेवन केले पाहिजे, एऱ्हवीं ते अनर्थाला कारण होतात. कापसाला लागलेली आग जशी विझत नाहीं, त्याप्रमाणें विषय का एकदां आंत शिरला म्हणजे प्रथम विवेक नाहींसा करतो. दूध दृष्टीस पडल्यावर हें घर ब्राह्मणाचें आहे का अंत्यजाचे आहे, हें जसें मांजर पाहत नाहीं, त्याप्रमाणें मनांत विषयाचें ध्यान बसलें कीं विषयासंबंधीं सेव्यासेव्य विचार सुटतो. म्हणून विषयाची आसक्ति न धरतां वेदाज्ञेला धरून परिमितच भोग घेतला पाहिजे.

वेदें न करितां प्रेरणा । विषयावरी सहज वासना ।
स्वभावें सकळ जना । सदा जाण सर्वांसी ॥

आगीं लागलिया कापुसा । विझवितां न विझे जैसा ।
तेवीं विषयवंता मानसा । विवेक सहसा उपजेना ॥
दूध मिळालिया मांजर । न म्हणे द्विज अंत्यज घर ।
तेवीं विषय उन्मत्त नर । न करितां विचार सेव्यासेव्य ॥
करितां वधुवरा पाणिग्रहण । साक्षी द्विज देव हुताशन ।
इतर स्त्रिया मातेसमान । स्वदारागमन नेमिलें वेदें ॥

ए. भा. ५-२०८, २११, २१३

## साधकाची बुद्धि सुपाप्रमाणें असावी.

साधकानें सर्वत्र जगतांत पाहतांना आपली बुद्धि सुपाप्रमाणें ठेवावी. चाळणीसारखी ती असूं नये. चाळणींत जें जें पडतें त्यांतील अत्यंत बारीक चांगलें खालीं पडते व खडे वर राहतात आणि खडबड करतात, वाजत बसतात. सुपाची स्थिति यापेक्षां अगदीं वेगळी असते. तें भूस-कोंडा असार म्हणून टाकून देतें आणि अस्सल चांगलें धान्य आपल्यांत ठेवतें.

चाळणीमाजीं जें जें पडे । सूक्ष्म निजतत्त्व तळीं सांडे ।
उरती गुणदोषांचे खडे । करी बडबडे खडबडीत ॥
सुपाची दशा ते ऐसी । त्यजी रजःकण भुसासी ।
निडारल्या निज बीजासी । निज हृदयेंसीं राखत ॥

ए. भा. ७-३३५, ३३७

## साधनेंत खंड पडूं देऊं नये.

सिद्ध अवस्था होईतोंपर्यंत - अविद्येचें बंधन आहे तोंपर्यंत साधकानें वेद-विधान, नियम हे अवश्य पाळले पाहिजेत. आंब्याच्या झाडावरील फळें जोंपर्यंत काढलीं नाहींत तोंपर्यंत त्यांचें दक्षतेनें रक्षण करणें अवश्य आहे. फळें काढून घेतल्यावर राखण आपोआपच थांबतें.

आंबा सफलित जंव असे । तंव नेटेंपाटें राखण बैसे ।
फळ हातां आल्या आपैसें । राखण वायसें राहेना ॥
तेविं अविद्येचें जंव बंधन । तंव वेदाचें वेदविधान ।
अविद्या नाशिलिया जाण । विधीनें तें स्थान सोडिलें ॥

ए. भा. १३-४७४, ४७५

## विवेक व वैराग्य हे सोबती ठेवावे.

श्रवण, कीर्तन वगैरे भक्तीचे प्रकार आहेत. साधनेंहि प्रत्येकाच्या अवस्थे-प्रमाणें निरनिराळीं असतात. पण कोणतेंहि साधन का असेना, त्याला विवेक व वैराग्याची जोड असणें अवश्य आहे. ती नसेल तर साधनांचा उपयोग होत नाहीं. हरिकथा सारेच ऐकतात, पण ईश्वराचें ठिकाणीं दृढ निष्ठा सर्वांच्या मनांत उत्पन्न होतेच असें नाहीं. ऐकणारें जें मन आहे तें विषयासक्त असेल तर ऐकलेले शब्द बाहेरच्या बाहेर जातात. साधकाचें ठिकाणीं वास्तविक तीव्र वैराग्य पाहिजे. मरण दिसूं लागलें म्हणजे मनुष्य जसा बेचैन होतो, त्याप्रमाणें विषय भोगण्याचा प्रसंग आला तर साधक बेचैन झाला पाहिजे.

**येतां देखोनियां मरण । स्वयें होय कंपायमान ।**
**तेविं विषयभोग दारुण । देखोनि आपण चळीं कांपे ।**

ए. भा. २०-८३

## साधकाचें चित्त त्याच्या ताब्यांत असावें.

चित्त परमात्म्याकडे लावावयाचें तर तें प्रथम आपल्या ताब्यांत पाहिजे. चित्त ज्याच्या ताब्यांत असेल, त्याचाच खरा परमार्थ होऊं शकतो. पण वस्तु-स्थिति अशी असते कीं चित्ताला विषयाची ओढ लागलेली असते. त्यामुळें तें परमात्म्याकडे बळेंबळें लावावयाचा जरी प्रयत्न केला, तरी तें पुनः पुनः विषया-कडे धांवतें. यासाठीं नाथ महाराजांनीं साधकासाठीं उत्कृष्ट विचार सांगितला आहे. हिऱ्यानें जसा हिरा कापावा, त्याप्रमाणें मनानेंच मनाला आवरावें. यासाठीं गुरुकृपेची अत्यंत आवश्यकता आहे. गुरुकृपेनें विवेक उत्पन्न होतो व विवेक उत्पन्न झाला म्हणजे विषयाच्या व मनाच्या गांठी सुटतात. या मनाचा एक उत्तम गुण आहे व तो हा कीं त्याला परमात्म्याची एकदां चटक लागली कीं तें वारंवार त्याचीच इच्छा करतें. मग परमार्थांतले कष्ट संपतात. गुरुकृपा ही आपल्या शिष्याला परमात्म्याची चटक लावून चारी मुक्ति त्याच्या दासी करून परब्रह्माला बांधून हातांत आणून देते. मन हें एका दृष्टीनें घातक तर दुसऱ्या दृष्टीनें उपकारीहि आहे. म्हणून साधकानें निरभिमान होऊन गुरुभक्तीनें त्यांची कृपा संपादन करून घ्यावी.

ए. द. २...१६

**जेवि हिरेनि हिरा चिरिजे । तेविं मनेंचि मन धरिजे ।**
**हेंही तेंचि गा लाहिजे । जैं गुरुकृपा पाविजे संपूर्ण स्वयें ॥**
**मन गुरुकृपेची आंदणी दासी । मन सदा भीतसे सद्गुरूसी ।**
**तें ठेवितां गुरुचरणापाशीं । दे साधकांसी संतोष ॥**
**या मनाची एक उत्तम गति । जरी स्वयें लागलें परमार्थीं ।**
**तरी दासी करी चारी मुक्ति । दे बांधोनि हातीं परब्रह्म ॥**

ए. भा. २३-६८५ ते ६८७

## साधकास सर्व ठिकाणीं आत्मभाव पाहतां आला पाहिजे.

साधकानें सर्वत्र आपणच भरून राहिलों आहों, असा अभ्यास केला पाहिजे, म्हणजे क्रोधाचे प्रसंग आले तरी साधक विवेकानें आपला राग आवरतो. बोलतांना किंवा जेवतांना आपली जीभ आपल्या दांताखालीं अवचितपणें चावली गेली तरी त्याबद्दलचा राग तो कोणावर काढणार ? दुसऱ्याचा धक्का लागून आपण पडलों तर आपण त्याच्यावर रागावतो, पण स्वतःच निसरून पडलों तर मागेंपुढें न पाहतां व कोणावर न रागावतां लाजून चालावयास लागतों. त्याप्रमाणें सर्व प्राणिमात्र आपणच आहोंत अशी भावना झाल्यावर जरी दुसऱ्याकडून आपल्याला त्रास झाला तरी आपण कोणावर रागावणार ? हा विवेक गुरुकृपेच्यामुळें साधकामध्यें जागृत राहतो.

**आपुली जिव्हा आपुली दांतीं । रगडिली होय अवचितीं ।**
**तया कोपाची अतिप्राप्ती । कोणाप्रती करावी ॥**
**तेथील कोपाच्या कडाडीं । दांत पाडी कीं जीभ तोडी ।**
**तैसी जगीं एकात्मता धडफुडी । कोप यावया सवडी असेना ॥**
**जो पुढिलाचे ढक्यांनीं पडे । तो त्यावरी कोपें वावडे ।**
**स्वयें निसरोनि गडबडे । तो लाजिला मागें पुढें न कोपतां निघे ॥**
**तेविं मीचि भूतें मीचि भोक्ता । माझ्या दुःखाचा मी दाता ।**
**जगीं मीच मी एकात्मता । कोणावरी आतां कोपावें ॥**

ए. भा. २३-७७८ ते ७८१

## साधकास नित्यानित्य विचार पाहिजे.

नित्य कोणतें व अनित्य कोणतें याचा निवाडा करणें, याला उत्तम ज्ञान म्हण-

तात. या देहांतील अनात्म वर्गाचा त्याग करून त्यांचा प्रकाशक जो आत्मा, त्याला ओळखणें हें साधकाचें साधन असतें. उंसाची प्रथम सालें काढतात, नंतर तो जोरानें पिळतात. तो रस आटवला म्हणजे साखर तयार होतें. नंतर त्या साखरेचा पाक करून नाना प्रकारचीं गोड फळें तयार करतात. त्याप्रमाणें साधक हा स्थूल देहाचा विचाराच्या योगानें निरास करून लिंग देहाचें मर्दन व अहंकाराचा नाश करून ब्रह्मत्वाला पोहोंचतो. ज्ञानाचा अभ्यास म्हणजे तोंडपाटीलकी नव्हे, प्रत्यक्ष कर्कश असा त्रास सोसावा लागतो.

**सेवावया स्वादरस नव्हाळी । प्रथम उंसाचीं पानें साळी ।**
**मग ऊंस तोही बळें पिळी । तोही रस आळी तैं शर्करा लाभे ॥**
**तेही शर्करा परिपाकबळें । तैं साखरचि केवळें ।**
**केळें आणि नारळें । करितां नाना फळें मुळींच्या गोडया ॥**
**तेवीं स्थूलाचें निराकरण । लिंग देहाचें उपमर्दन ।**
**अहंकाराचें निर्दळण । करूनि पूर्णब्रह्म पावती ज्ञातें ॥**

ए. भा. २८-२२१ ते २२४

## साधकानें समदृष्टि ठेवावी.

आपली साधना करतांना दुसऱ्याचे गुणदोष मनांत आणूं नयेत. एक परब्रह्मच सर्वत्र भरलें आहे, त्यांत समविषम नाहीं. साधकाची दृष्टि गुणांवर असूं नये, आंतील वस्तूवर असावी. गुणावर दृष्टि ठेविली म्हणजे वृत्ति क्षुब्ध होते. दुसऱ्याचे गुणदोष मनांत आणणें हाच दोषांतला मोठा दोष आहे. त्यापासून साधकानें स्वतःला सांभाळलें पाहिजे.

**ब्रह्म एक परिपूर्ण । तेथें कैंचे दोष कैंचे गुण ।**
**अविद्या क्षोभली तैं जाण । गुणदोष लक्षण वाढवी ॥**
**जो देखों लागे दोष गुण । त्यासी अविद्या क्षोभली जाण ।**
**जो न देखे गुणदोषभान । तो ब्रह्मसंपन्न उद्धवा ॥**
**पराचा देखावा दोषगुण । हाचि दोषांमाजी महादोष जाण ।**
**गुणदोषा न देखावा आपण । हा उत्तम गुण सर्वार्थी ॥**

ए. भा. १९-५७४ ते ५७६

## साधकानें चार अपाय चुकवावे.

श्रवण अथवा ध्यानाचा अभ्यास करतांना लय, विक्षेप, कषाय आणि रसास्वाद हीं चार विघ्नें आड येतात. यासाठीं साधकानें हे चारी अडथळे चुकवावे. मनाला विषयाची पूर्वींची गोडी लागलेली असते. हरिकथा ऐकत असतांना स्त्रियांचें व शृंगाराचें वर्णन तेवढें चित्तावर राहतें, परमात्म्याकडे लक्ष राहातच नाहीं.

**श्रवणीं ध्यानीं अंतराय । लय विक्षेप कषाय ।**
**का रसास्वादही होय । हे चारी अपाय चुकवावे ॥**
**ऐकतांही हरिकथा । विषयचिंतनीं गोडी चित्ता ।**
**ते श्रद्धा नव्हे गा सर्वथा । मुख्य विक्षेपता ती नांव ॥**
**हरिकथेपाशीं बैसला दिसे । परि कथेपाशीं मनही नसे ।**
**चित्त भंवे पिसें जैसें । तो मर्कटवेषें विक्षेपु ॥**

ए. भा. ११-७०६, ७०७, ७०९

## सद्गुरुरूपी वैद्य

दहाव्या अध्यायाच्या आरंभीं श्रीएकनाथ महाराजांनीं आपल्या गुरूंना धन्वंतरीच्या रूपकानें नमन केलें आहे. हें संपूर्ण रूपक वाचकांनीं अगत्य वाचावें. जीवाला कोणता रोग झाला आहे, त्याची लक्षणें काय आहेत, तो रोग कसा वाढत जातो, त्यावर कोणाचें औषध लागूं पडतें, तें औषध कोणतें आहे, औषध घेतांना पथ्य काय पाळायचें असतें, रोग बरा होत असतांना कशाची काळजी घ्यावयाची असते, रोग बरा झाल्याचें गमक काय, हा सर्व विचार या रूपकांत नाथ महाराजांनीं सुंदर रीतीनें सांगितला आहे. विस्तारभयास्तव त्या सर्व ओव्या देत नाहीं, फक्त चारच ओव्या देतों.

**ॐ नमो सद्गुरु धन्वंतरी । ज्याची दृष्टीच निरुजा करी ।**
**त्या वांचोनि संसारी । भवरोग दुरी न करवे ॥**
**ज्या भवरोगाचेनि दर्पें । फुंफात तापली त्रिविध तापें ।**
**मी माझे येणें संकल्पें । वाग्जल्पें जल्पती ॥**

**दारुण चुकवावया कुपथ्य । वैराग्य राखण ठेवी नित्य ।**
**लावूनि अनुसंधानाचें पथ्य । निर्दाळिला तेथ भवरोग ।।**
**ऐसा सद्गुरु वैद्य गाढा । तेणें अपायापासोनि केले निधडा ।**
**शरण रिघावें तुज पुढां । तंव चहूंकडे तूंचि तूं ।।**

ए. भा. १०-१, २, २३, ३०

## भगवंताचें अनुसंधान

रोग्यानें कुपथ्य करूं नये म्हणून वैराग्याचे राखण ठेवायला पाहिजे आणि भगवंताचें चिंतनरूपी पथ्य सांभाळलें पाहिजे. भगवंताचें अनुसंधान हें सर्व साधनांना अवश्य आहे. श्रीतुकाराम महाराजांनीं एकनाथी भागवताची हजार पारायणें केलीं होतीं. त्यामुळें त्यांचा गाथा वाचतांना अनेक ठिकाणीं भागवताचा साक्षात्कार होतो. साधकाला उपदेश करतांना ते म्हणतात,

**ब्रह्मरस घेई काढा । तेणें पीडा वारेल ।।**
**पथ्य नाम विठोबाचें । आणिक वाचें न सेवीं ।।**

गीतेनेंहि साराचें सार म्हणून द्विरुक्ति करून जी गोष्ट आग्रहानें सांगितली आहे ती याच अनुसंधानाची.

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।**

त्यावर ज्ञानेश्वर महाराजांनीं म्हटलें आहे कीं,

**माझेनि अनुसंधानें देख । संकल्प जाळणें निःशेख ।**
**मद्याजी चोख । याचि नांव ।।** ज्ञाने.

‘ **मामनुस्मर युद्ध्य च ।** ’ हा तर गीतेचा मुख्य मंत्र आहे. भगवंताचें अनुसंधान ठेवलें म्हणजे साधकाची काळजी भगवंतावर जाऊन पडते. ‘ **तयाचि चिंतवणी मजचि पडली ।** ’ अखंड अनुसंधान राखणें हें अत्यंत महत्त्वाचें असें पथ्य आहे. साधकानें कितीहि साधनें केलीं व त्याला नामाचें पथ्य नसेल तर तीं फलद्रूप होत नाहींत, असें सर्व संतांचें सांगणें आहे.

श्रीएकनाथी भागवत वाचतांना साधकांना दिलेल्या सावधगिरीच्या सूचना ठिकठिकाणीं विखुरलेल्या दिसतात. काय करूं नये म्हणून ज्या सूचना दिल्या आहेत त्या साधकांनीं अवश्य पाळल्या पाहिजेत. परमार्थ मार्गावरील आघात चुकवावयाचे

असतील तर त्या सूचना पाळल्याच पाहिजेत. संतांना आम्ही ' माउली ' या प्रेमळ संबोधनानें हांक मारतो. ' माउली ' हे किती गोड व प्रेमळ नांव आहे ! आमच्या आईला आम्ही या नांवानें हांक मारतों. नाथ महाराजांच्यासारखे संत हे साधकाचे खरेखुरे मायबाप आहेत. श्री ज्ञानेश्वर महाराजांचा गौरव करतांना नाथांनीं त्यांना

**साधकाचा मायबाप । दरुषनें हरी ताप ।**
**सर्वांभूतीं सुखरूप । ज्ञानोबा माझा ।।**

अशा अमर शब्दांनीं संबोधिलें आहे. हें वर्णन श्रीनाथ महाराजांना लागूं पडते. गाय जशी आपल्या वत्साच्या मागें मागें राहून त्याचें रक्षण करते, त्याप्रमाणें संत हे साधकाचा सर्वतोपरी सांभाळ करतात. साधकाला आघात होऊं नये म्हणून जपतात. तो दमला तर त्याला कडेवरहि घेतात. साधनमार्गातील खड्डे दाखविण्यासाठीं हातांत ज्ञानरूपी दिवा घेऊन मार्ग दाखवितात. आपल्या स्वतःला आलेला अनुभव इतक्या कृपाळुपणानें व कनवाळुपणानें ' माउली ' खेरीज कोण सांगेल ! असा पोटांतील कळवळा दुर्मिळ आहे.

**ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभावीण प्रीती ।।**

फक्त संत माउलीच हें कार्य करूं शकते.

श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या पाऊलावर पाऊल टाकून संस्कृत भाषेंतील अवघड तीरावर मराठीच्या पायऱ्या करून नाथांनीं ' आबालसुबोधे ' असे सुंदर घाट बांधले. संस्कृतांतील तत्त्वज्ञान व अध्यात्म सरांस सर्वांना मोकळें केलें. ' **भलतेणें येथें सद्भावे नहावे** । ' अशी सोय केली. हे तर त्यांचे महान् उपकार आहेतच, पण त्यांच्या उपदेशाप्रमाणें चालणाऱ्या साधकाचा ते सर्वतोपरी सांभाळ करतात. हा केवढा उपकार आहे ! एके ठिकाणीं उभे राहून ' हा तुमचा मार्ग ' एवढेंच दिग्दर्शन करून ते स्वस्थ बसत नाहींत, तर हातांत अभंग दिवा घेऊन साधकाच्या बरोबर चालतात, वाटेंत लागणाऱ्या कामक्रोधादिक हिंस्र पशूपासून रक्षण करतात. दमल्यावर धीर देतात व साधन मार्गाच्या काळोख्या रात्रीं पहांट होईतोंपर्यंत-मुक्कामाला पोहोंचेतोंपर्यंत त्याच्या बरोबर राहतात व शेवटीं त्याच्यावर अनुग्रह करून त्याला कृतार्थ करतात. नाथांचा स्थूल देह जाऊन

शेकडों वर्षें झालीं, पण एकनाथी भागवताच्या रूपानें ते आपल्यांतच आहेत. कितीतरी साधकांचें त्यांनीं प्रयाणानंतर रक्षण केलें आहे, कल्याण केलें आहे. नाथ जिवंत आहेत याचा तो साक्षात् पुरावा आहे. आतां ते एकदेशी देहानें राहिले नाहींत, जेथें शरण आलेला साधक आहे. त्याच्या पाठीशीं त्याचें सर्वतोपरी हित करण्यासाठीं त्याच्या मागें उभे आहेत.

**काय वानूं आतां संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ॥**

जीवभाव त्यांच्या चरणांवरून ओवाळून टाकून, उगे राहून, त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवावें हेंच भलें.

---

## मीच सर्वरूप व सर्वात्मा आहे.

मीचि डोळा मीचि देखतां । दृश्य द्रष्टा मीचि तत्त्वतां ।
मजवेगळी देखणी अवस्था । नाहीं सर्वथा तिहीं लोकीं ॥
मीचि डोळियांचा निज डोळा । मी सर्वांग देखणा सोज्वळा ।
मजवेगळी देखणी कळा । नाहीं जिव्हाळा आणिकांचा ॥
मीचि शब्दांते शब्दवितां । मीचि श्रवणामाजीं श्रोता ।
ऐशिया एकात्मता पाहतां । शब्द निःशब्दता परब्रह्म ॥
कान वचन मीचि श्रोता । मीचि जाणतां शब्दार्था ।
ऐकणाही मजपरता । नाहीं तत्त्वतां श्रवणाचा ॥
मीचि घ्राण मीचि वास । मीचि जाणतां सुवास ।
मजवेगळा रहिवास । परिमळास असेना ॥
मीचि रसु मीचि रसना । स्वादु सेवितां मीचि जाणा ।
मजवेगळा चवी चाखणा । रसज्ञपणा आन नाहीं ॥
इतर इंद्रियप्रवृत्ती । त्याही मद्रूप जाण निश्चितीं ।
मी सर्वात्मा आत्ममूर्ति । क्रियाशक्ती तेहि मीचि ॥

ना. भा. अ. १३-३४२ ते ४९

---

## अनुभवानंतर प्रपंचादिकाचें भान राहत नाहीं.

जया देहाचेनि मद्भजनें । माझें शुद्ध स्वरूप पावणें ।
त्या देहासी विसरिजे तेणें । मी माझेपणें देखेना ॥
जेविं कां भाडियाचें घोडें । जेणें आणिलें निजधामा रोकडे ।
तें आहे कीं गेलें कोणीकडे । हें स्मरेना पुढें तो जैसा ॥
कां जो दैवयोगें पालखी चढे । तो पूर्वील तुटके मोचडे ।
आहेत कीं गेले कोणीकडे । हें स्मरेना पुढें तेणें हरिखें ॥
त्या दांपत्याचे सुख भेटी । पारके देखतां लाज उठी ।
तेवीं देहाचें भान द्वैत दृष्टीं । मदैक्यपुष्टीं देह कैचें ॥
मी शेष शयनावरी । कीं मातंगाच्या घरीं ।
कीं बैसलों शूळावरी । हेंही न स्मरी सहसा तो ॥
ऐशी ज्ञात्याची निरभिमानता । माझेनि न सांगवे तत्त्वतां ।
जे पावले माझी सायुज्यता । त्यांची कथा न बोलवे ॥
जेथ वेदां मौन पडे । स्वरवर्णेसी वाचा बुडे ।
त्या संतांचे पवाडे । माझेनिही निवाडे न सांगवती ॥

ना. भा. अ. १३-५८९, ९०, ९२, ९४, ६०९ ते ६११

---

## मुक्ताचीं सर्व कर्मे ईश्वररूप होतात.

रसना रस सेवूं जाये । तंव रसास्वादु देवचि होये ।
मग रसनेमाजीं येऊनि राहे । ब्रह्मार्पणे पाहे रसभोगवृत्ति ॥
द्यावया कांहीं देवो जाये । तंव देतां भजन कैसें होये ।
देतें घेतें दान स्वयें । देवोचि होये निजांगें ॥
जेउतें जेउतें चालवी पायें । तो तो मार्गु देवोचि होये ।
मग पाउलापाउलीं पाहे । निजभजन होये ब्रह्मार्पणेसी ॥

ना. भा. अ. २-७९, ८७, ८८

---

# अर्थाचे पंधरा अनर्थ

: लेखक :

कविवर्य दे. ल. महाजन

( मानसविहारकर्ते, नांदेड )

**अर्थमनर्थं भावय नित्यम्** । श्रीमदाचार्य

**एवं हे पंधराहि अनर्थ । मूर्ख अथवा पंडित ।**
**जे अर्थ संग्रह करित । अवश्य तेथ हे उठती ॥** ए. भा.

वेदांत तत्त्वज्ञान आणि लौकिक व्यवहार या दोन्हींची योग्य अशी समन्वयात्मक योजना आपल्या सनातन वैदिक धर्मातल्या पद्धतीनें जशी केली आहे, तशी इतरत्र कोठेंहि आढळत नाहीं. वैदिक धर्मात धर्म, अर्थ, काम व मोक्ष या नांवांनीं जे चार पुरुषार्थ सांगितले, त्यांतच जीवाच्या-मानवजातीच्या परम कल्याणाची दृष्टि अनुस्यूत आहे. '**धर्मादर्थश्च कामश्च सधर्मः किं न सेव्यते ।**' असें श्रीमदाचार्य कळकळीनें विचारतात. या चारी पुरुषार्थांचा समन्वय ज्या क्रमानें केला आहे, तो पाहतां असें स्पष्ट दिसून येतें कीं धर्माच्या अधिष्ठानानें अर्थ आणि काम यांचा वापर झाला तरच परम पुरुषार्थ जो जन्ममरणांतून सुटका करून देणारा मोक्ष, तो जीवाला प्राप्त करून घेतां येतो. "**यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः ।**" धर्माची व्याख्याच मुळीं आचार्यांनीं अशी केली आहे. त्या व्यतिरिक्त '**पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरे शयनम् ।**' ही दुःखद पुनरावृत्ति चुकावयाची नाहीं, म्हणजेच खरें सुख, शांति व समाधान त्याला कदापि प्राप्त होणार नाहीं.

श्रीमद् व्यासमहर्षींनीं देवर्षि नारदांच्या सांगण्यावरून आपल्या मनःशांतीसाठीं भगवद्‌गुणवर्णनपर श्रीमद्भागवताची जी रचना केली, त्यांत त्यांनीं एकादश स्कंधाच्या तेविसाव्या अध्यायांत एका कदर्यूच्या कथेच्या रूपानें अर्थाच्या अनर्थकारकतेचें निवेदन केलें आहे. आमच्यासारख्या प्राकृत अनाथासाठीं श्रीनाथ महाराजांनीं त्याचें विस्तारपूर्वक विवेचन करून स्पष्टीकरण केलें आहे. प्रस्तुत लेखाचा तोच विषय आहे.

अर्थापासून किती प्रकारचे अनर्थ आहेत तें पहा.

**स्तेयं हिंसाऽनृतो दंभः कामः क्रोधः स्मयोमदः ।**
**भेदो वैरमविश्वासः संस्पर्धा व्यसनानि च ।।**

भागवत ११-१८

चोरी, हिंसा, असत्य, दंभ, काम, क्रोध, गर्व, मद, भेद, वैर, अविश्वास, स्पर्धा, व्यसनें-स्त्री, मद्यपान व द्युत हे पंधरा अनर्थ अर्थापासून आहेत. श्रीनाथ महाराज म्हणतात,

**अर्थ सर्वांगें अनर्थभूत । हें माझें वचन त्रिसत्य ।**
**पृथ्वीमाजी जे जे अनर्थ । ते ते अर्थातें उपजवी ।।**

ए. भा. २३-२०३

अर्थ प्राप्त झाला असतां हे अनर्थ प्रायः होतात, हें निश्चित. पण त्याच्या अभावींहि-द्रव्यजवळ नसतांहि तो अनर्थकारक होतो. त्यांतील अनर्थकारक जो 'काम', त्याचे 'इच्छा' व 'विषयवासना' असे दोन अर्थ आहेत. धनाच्या अभावीं जी द्रव्येच्छा, तिजविषयीं श्रीनाथ महाराज म्हणतात,

**धन नसतां अपेक्षा काम । ती सबाह्य करवी अतिभ्रम ।**
**अनेक कष्टांचे विषम । अति दुर्गम भोगवी ।।**

ए. भा. २३-२४८

दारिद्य हें किती कष्टप्रद असतें, याचें स्पष्टीकरण करण्याचें कारण नाहीं. पण तें नुसतें कष्टप्रदच नसतें, तर मनुष्यास दुराचारास प्रवृत्त करून अनेक पापकर्में घडवितें. सात्त्विक माणसाच्या दृष्टीनें पाहतां

**दारिद्य मरण यांतुनि मरण बरें बा दरिद्रता खोटी ।**
**मरणांत दुःख थोडें दारिद्र्यांत व्यथा असे मोठी ।।**

मोरोपंत

आतां प्रस्तुत विषयाचें—अर्थापासून होणाऱ्या अनर्थांचें स्पष्टीकरण श्रीनाथ महाराजांच्या अमृतोपम रसाळ वाणीनेंच क्रमानें पाहूं.

( १ ) **चोरीः**—डोळा चुकवून दुसऱ्याची वस्तु घेणें ही तर चोरी आहेच,

पण

**मार्गीं पडलें धन पराचें । स्वयें जाणूनि अमकियाचें ।**
**नाहीं देणें त्यासी साचें । हेंहि चोरीचें लक्षण ॥**

ए. भा. २३-२०८

विशेष आश्चर्य हें कीं,

**स्वर्णस्तेयें नरकप्राप्ति । ऐसें विवेकीहि चोरी करिती ।**
**मा इतरांची कायसी गति । चोरीवस्ती धनापाशीं ॥**
**देखतांची त्या धनासी । विकल्पी होती संन्यासी ।**
**इतरांची कथा कायसी । चोरी धनापाशीं स्वयें नांदे ॥**

ए. भा. २३-२०९,२११

( २ ) **हिंसाः**–धनप्राप्तिसाठीं वरीलप्रमाणें संधि न सांपडली तर मग धनिकाची गांठ पडतांच त्याला मारण्याची सहज प्रवृत्ति होते. चोऱ्या दरोड्यांत जे खून होतात, त्याला नेहमींच पूर्वींचे हेवेदावे फार थोडे असतात.

**धनालागीं द्वंद्व दारुण । पुत्र पौत्र मारिती जाण ।**
**धनालागीं घेती प्राण । सुहृदपण सांडोनी ॥**
**धनलोभी सांडी बाप माये । स्त्री घेऊनि वेगळा राहे ।**
**तेथही धनलोभ पाहे । वैर होय स्त्रीपुरुषा ॥**

ए. भा. २३-२१३,२१५

हे प्रकार अविभक्त किंवा विभक्त कुटुंबपद्धतींत सध्यां चोहीकडे दिसून येतात. नाथ महाराज म्हणतात,

**जे नवमास वाहे उदरांत । जे सदा सोसी नरकमूत ।**
**ते मातेचा करी घात । द्रव्यानिमित्त निजपुत्र ॥**

ए. भा. २३-२१७

( ३ ) **असत्यः**–

**असत्य जन्मलें अर्थाच्या पोटीं । अर्थबळें तें दाटुगें सृष्टीं ।**
**अर्थासवें असत्य उठी । असत्याची गांठी अर्थेसीं ॥**

ए. भा. २३-२२०

जवळ द्रव्य असतांना किंवा तें पाहिजे असतांनासुद्धां

**तो अर्थ असे जयापाशीं । का अर्थ अपेक्षा जयासी ।**
**तेथ असत्य वसे कुटुंबेसी । धन तें मिरासी मिथ्यात्वीं ॥**

ए. भा. २३-२२१

व्यापारांत, उद्योगधंद्यांत सर्रास पराकोटीचा असत्याचा व्यवहार राजरोसपणें चाललेला सर्वमान्य झाला आहेच म्हणाना ! पण ब्राह्मणाच्या षट्कर्मांतून अध्ययन, अध्यापन, यजन, दान हे नसले तरी याजन आणि प्रतिग्रह हे अखंड चालू आहेतच. तेहि पण कसे तर

**वेदींचा आठव नये पूर्ण । तो संभावनेलागीं जाण ।**
**म्हणवी मी वेदसंपन्न । करावया यजन नीचाचें ॥**
**भाग देऊनि मध्यस्था । मी चतुःशाखी विख्याता ।**
**ऐसें मिथ्यात्वें छळी पंडिता । राज द्रव्यार्थालागुनि ॥**

ए. भा. २३-२२४, २५

पोटभरु प्रापंचिकाचें तर राहोच, पण श्रीनाथ म्हणतात,

**विरक्त म्हणविती परमार्थी । तेथहि असत्यें घातली वस्ती ।**
**नाथिल्या सिद्धि दाविती । अर्थप्राप्तिलागोनी ॥**

ए. भा. २३-२२६

( ४ ) **दंभः**—दंभ हाच प्रकार दंभांत प्रविष्ट करून श्रीनाथ म्हणतात,

**पोटीं नाहीं परमार्थ । धरोनिया अर्थ स्वार्थ ।**
**स्वयें म्हणविती हरिभक्त । या नांव निश्चित भजन दंभ ॥**
**जयापासोनि होय अर्थप्राप्ति । ते समर्थ शिष्य आवडती ।**
**दीन शिष्यातें उपेक्षिती । हे दांभिकस्थिति गुरुत्वा ॥**
**गुरूसी द्यावें तनमनधन । ऐसें उपदेशिती जाण ।**
**जो द्रव्य संग्रहीं आपण । हे दांभिकपण गुरुत्वा ॥**

ए. भा. २३-२३०,३३,३४

श्रीनाथांच्या काळीं समाजांत चाललेले हे सारे प्रकार त्यांनीं बारकाईनें पाहूनच लिहिले आहेत हें तर निर्विवाद, तथापि त्याहि काळीं भक्तिभावनेनें कथा-कीर्तन, प्रवचन, पुराण, यज्ञयाग इत्यादि पुण्यप्रद कार्यक्रम होत होते व त्याबरो-

खर्च त्या निमित्तानें असंख्य लोकांच्या मुखीं समाप्ति-भंडारा होऊन अन्न पडत होतें. सध्यांहि हे प्रायः चालूंच आहे. नाहीं असें नाहीं. पण ते स्वतःच्या पदराला खारहि न लागूं देतां परस्पर लोकांनीं लोकांसाठीं या लोकशाही तत्त्वावर !

**दृष्टि सूनि अन्नसन्मान । संन्यासी करिती शौच स्नान ।**
**शुद्ध न करवेंचि निज मन । वाद व्याख्यान अति दंभें ॥**

ए. भा. २३-२४५

( ५ ) **कामः**–निर्धनाचा नैसर्गिक कामोपभोग म्हणजे केवळ स्वप्नरंजन ! पण द्रव्य जवळ असल्यावर मग काय ?

**धन झालिया उन्माद काम । करूं लागे अगम्यागम ।**
**उपजवी नाना अधर्म । निंद्य कर्म धनवंता ॥**
**काम जडलासे धनेसीं । तो सदा छळी धनवंतासी ।**
**काम खवळे धनापाशीं । अहर्निशीं मुसमुशित ॥**

ए. भा. २३-२४९,५०

कामाचा उन्माद शमविण्यासाठीं धनिक लोक स्वभावतःच व्यभिचारी, बाहेरख्याली किंबहुना अत्याचारी बनलेले आढळतात.

( ६ ) **क्रोधः**–

**कामप्राप्तीसी आडवी काडी । होतां क्रोधाची पडे उडी ।**
**खवळला अति कडाडी । तपाच्या कोडी निर्दळितां ॥**
**धनाकडे कोणी दावी बोट । तेथ क्रोध उठी अचाट ।**
**वाढवी प्राणांत कचाट । क्रोध अति दुष्ट धनेसी ॥**

ए. भा. २३-२५२,५४

कामपूर्तींत विघ्न येतांच क्रोध खवळणें व त्यापायीं अत्याचाराला प्रवृत्त होणें अगदीं स्वाभाविक आहे. त्याशिवाय नाथ म्हणतात,

**होतां कामावरोधु । वा धनव्ययाचा संबंधु ।**
**ते संधी खवळे क्रोधु । अति विरोधु उन्मत्त ॥**

ए. भा. २३-२२५

क्रोधाचे दोन उद्देश या ठिकाणीं यथार्थतेनें दिग्दर्शित केले आहेत.

( ७ ) **गर्वः**- गर्व बाळगण्यासारखे मनुष्याजवळ विद्या, गुण, कला, यापैकीं कांहींहि नसतां द्रव्य मिळतांच त्याला गर्व चढूं लागतो. धनाचा प्रभावच तसा आहे. म्हणून भर्तृहरीनेंहि स्पष्ट शब्दांत म्हटलें आहे,

**यस्यास्ति वित्तं सनरः कुलीनः स पंडितः स श्रुतिवान् गुणज्ञः ।**
**स एव वक्ता स च दर्शनीयः सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते ॥**

सामान्य लुडबुड्या व खुशामतखोर लोकांचा गराडा त्याच्या भोवतीं सारखा घिरट्या घालतो व त्यामुळें धनगर्व पुष्ट होत जातो. त्या मनःस्थितींत

**धनगर्वाचिये पुष्टीं । सखा बाप नाणी दृष्टीं ।**
**मातेसी म्हणे करंटी । इतरांच्या गोष्टी त्या काय ॥**
**सिद्ध साधक तापसी । त्यांतें देखोनि उपहासी ।**
**म्हणे ' करंटे ते होती संन्यासी ' । हरिदासांसी विटंबी ॥**
**आधीं धनाचें समर्थपण । त्याहीवरी जैं झालें ज्ञान ।**
**तैं गर्वाचा ताठा चढे पूर्ण । जेविं आरें धारण गिळिला ॥**

ए. भा. २३-२५७ ते २५९

आधींच मर्कट, तशांतहि अशी अवस्था होते. त्या गर्वाचा उन्माद चढतो.

( ८ ) **मदः**–

**जयासी चढे धनमद । तो उघड डोळां होय अंध ।**
**कानीं नायके शब्द बोध । धनमदें स्तब्ध सर्वदा ॥**

ए. भा. २३-२६९

या धनमदाचा प्रभाव इतका भयंकर असतो कीं तो मनुष्य सारासार विचारापासून भ्रष्ट होऊन बोलूं नये तें बोलतो, करूं नये तें पापकर्म करतो, स्वतःची वागणूक ध्यानीं न घेतां इतरांची निंदा मात्र मनसोक्त करतो, इतकेंच नव्हे तर आपलें कुळशील विसरतो. अभक्षभक्षण, अपेयपान, काळ वेळ न पाहतां कामोपभोग, काय काय सांगूं !

**स्त्रीकामें अति विकळ । न विचारी कुळशील ।**
**न म्हणे सकाळ सांजवेळ । विचारें केवळ खर जैसा ॥**

ए. भा. २३-२७८

( ९ ) **भेदः**– या मदाच्या उन्मत्ततेनें ओघानेंच भेद – आपसांतील दुजाभाव उद्भवतो.

( १० ) **वैरः**–

**पित्यापुत्रांमाजीं विरोधू । पाडितो हा द्रव्य संबंधू ।**
**वैरी करी अति सखे बंधू । तो हा प्रसिद्ध धनलोभ ॥**
**जिचे उदरीं जन्मला आपण । जिचें सदा केलें स्तनपान ।**
**ते मातेस धनलोभें जाण । वैर संपूर्ण चालवी ॥**

ए. भा. २३-२९१,२९५

त्याहून आश्चर्याची गोष्ट म्हणजे आपल्या जन्माचें सार्थक व्हावें म्हणून ज्याचा अनुग्रह घेऊन त्याच्या चरणीं तनमनधन वाहण्याचा संकल्प केला, असा मोक्षदाता सद्गुरु, त्याचीहि तो पर्वा ठेवीत नाहीं.

**ज्याचेनि तुटे भवबंधन । ज्याचेनि बोलें होइजे पावन ।**
**त्या सद्गुरूसी अबोला जाण । धनाभिमान धरवित ॥**

ए. भा. २३–२९७

याप्रमाणें वैर वाढत चाललें म्हणजे त्या माणसाचा विश्वास असा कोठेंहि रहात नाहीं.

( ११ ) **अविश्वासः**–

**अविश्वासा मुख्य कारण । धन आणि दुसरी स्त्री जाण ।**
**तेथ मोहावलें ज्याचें मन । तो अतिसंपन्न अविश्वासें ॥**

ए. भा. २३-३०६

याचा परिणाम काय होतो तें श्रीनाथ महाराज स्पष्टपणें सांगतात,

**जो धनाभिमानी आणि स्त्रीजित । त्या विमुख होय हृदयस्थ ।**
**त्यातें सद्गुरुहि उपेक्षित । परम अनर्थ अविश्वासें ॥**

ए.भा. २३-३०७

**सकल दोषां मुकुटमणि । अविश्वास बोलिला पुराणीं ।**

ज्याच्यावर विश्वास ठेवल्यानें आपलें ऐहिक व पारमार्थिक कल्याण व्हावयाचें,

त्या वाङ्मयाविषयीं अविश्वास, उपेक्षा उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणांत दिसून येते. श्रीनाथांच्या काळींहि प्रत्यक्ष जें घडत होतें तें पाहून ते जें वर्णन करतात तें सध्यांच्या परिस्थितीला कितीतरी लागूं पडतें. श्रीनाथ महाराज म्हणतात,

**अविश्वासें कवळिल्या चित्ता । अभिमानें म्हणे ' मी ज्ञाता ' ।**
**तेव्हां उभ्या उभ्या पळे आस्तिकता । देखे नास्तिकता सर्वत्र ॥**

ए. भा. २३-३१०

**अविश्वास येतांचि पहा हो । सकुटुंब पळे सद्भावो ।**
**मग लोकत्रयीं अभावो । नांदवी निर्वाहो विकल्पेंकरुनी ॥**

ए. भा. २३-३११

**वाडे कोडें विश्वासीं । विकल्पू नांदो अहर्निशीं ।**
**येथ रिगावा अविश्वासासी । विकल्प त्यासी नागवी ॥**

ए. भा. २३-३१२

**आंगोवांगे अविश्वास । परमार्थराष्ट्रें पाडी वोस ।**
**सद्गुरूचेहि दावी दोष । न मानी विश्वास ब्रह्मयाचा ॥**

ए. भा. २३-३१३

**यालागीं सकल दोषांचा राजा । अविश्वासाहूनि नाहीं दुजा ।**
**तो रिगोनिया निजा पैजा । विभांडी वोजा महासिद्ध ॥**

ए. भा. २३-३१४

असें अविश्वासाचें—अश्रद्धेचें वातावरण वाढत गेलें म्हणजे आस्तिकांचा, भाविकांचा, साधकांचा देखील क्रमाक्रमानें बुद्धिभेद होतो. इतकेंच काय पण

**जिकडे अविश्वासें चाली केली । तिकडे परमार्थीं पळणी झाली ।**
**विकल्पाची धाडी आली । ते संधी नागवलीं बहुतेकें ॥**
**सिद्धाचें गेलें सिद्धपण । साधकें सपायीं नागवलीं जाण ।**
**रानभरी झाले साधारण । श्रद्धेचें उद्यान छेदिलें ॥**
**यमनियमांची नगरें जाळी । क्रोधु तापसा करी होळी ।**
**मोक्षफळें सफळिता केळीं । समूळ निर्दळी मोहगज ॥**

**शमदमाचें घरटें । खणोनि सांडिलें आव्हाटें ।**
**वोस विवेकाचे चोहटे । कोणी ते वाटे वागेना ॥**
**व्रतोपवास यांचीं साजिरीं । निष्काम उपवनें चौफेरी ।**
**तीं जाळिती उपराउपरी । नानापरी विकल्पें ॥**

ए. भा. २३-३१५ ते ३१९

धनमदानें उन्माद चढलेल्याची शेवटीं किती अधोगति होते हें नीट ध्यानीं घेण्यासाठीं हे आधिक उतारे मुद्दाम घेतले आहेत.

(१२) **स्पर्धा :–** इतर धनाढ्यांची संपत्ति कःपदार्थ मानून आपला बडेजाव व्हावा ही महत्त्वाकांक्षा अर्थानें बळावते व तो इतरांशीं स्पर्धा करूं लागतो.

**मग जें जें देखे धनवंत । ते हेळूनि सांडी तेथ ।**
**यापरी स्पर्धा अद्‌भुत । धरूनि अर्थ उल्लासे ॥**

ए. भा. २३-३३०

(१३) **व्यसनें:–** आतां शेवटचा अनर्थ व्यसनांचा.

**तिन्ही अनर्थांचा मेळा । एके पदीं झाला गोळा ।**
**तोहि नांदे धनाजवळा । एक वेगळा विभाग ॥**
**स्त्री द्यूत आणि मद्यपान । या तिहींतें वाढवी धन ।**
**हे तिन्ही अनर्थ दारुण । धनवंता जाण आदळती ॥**

ए. भा. २३-३३२,३३३

निर्धन पुरुषाला त्याची स्त्री धिक्कारते. रोज घरीं भांडणें होतात. त्याची निर्भर्त्सना करून त्याला घराबाहेर घालवते. तोच पति धनवंत असला तर

**धनवंता पुरुषासी । स्त्री लवोटवो करी कैसी ।**
**कुटका देखोनि शुनि जैसी । हालवी पुच्छासी कुंकात ॥**

ए. भा. २३-३३६

पण धनलोभानें ती स्त्री अशा धनाढ्याशीं एकनिष्ठेनें वागली तरी त्याचें चित्त कोठें थाऱ्यावर राहातें? उलट

लक्षूनि धनवंत नर । वेश्या मिरवी शृंगार ।
हावभाव चमत्कार । त्यासी धनाढ्य थोर भाळले ॥
वेश्या कामसंगें जाण । अखंड लाचावलें मन ।
तद्योगें मद्यपान । करिती सधन धनमदें ॥
मद्यपानें जो उन्मत्त । तो स्वेच्छे खेळे द्यूत ।
एवं हे तिन्ही अनर्थ । जाण निश्चित अर्थैसी ॥

ए. भा. २३-३४१ ते ३४३

* * *

एते पंचदशानर्था ह्यर्थमूला मता नृणाम् ।

भागवत अ. २३ श्लोक १९

* * *

एवं हे पंधरा अनर्थ । मूर्ख अथवा पंडित ।
जे अर्थसंग्रह करित । अवश्य हे तेथ उठती ॥

ए. भा. २३-३४५

सारांश, संतांचे सिद्धांत सनातन, सत्य व चिरंतन असतात. याची वर्तमानकाळींहि प्रचीति येते. समाजाचें चित्र इतक्या कुशलतेनें विस्तारपूर्वक रेखाटण्यांत श्रीनाथांचा मूळ उद्देश वास्तववादी वाङ्मयनिर्मितीचा नसून श्रीमद् व्यासांचा उपदेश स्पष्ट करून सांगणें हा आहे.

तस्मादनर्थमर्थाख्यं श्रेयोऽर्थी दूरतस्त्यजेत् ॥

भागवत अ. २३ श्लो. १९

मानवानें विशेषतः मुमुक्षु साधकानें अर्थ आणि काम हे पुरुषार्थ आहेत म्हणून त्यांच्याच नादीं न लागतां, केवळ प्रेयाचेच उपासक न बनतां श्रेयाचे उपासक बनावे अशा तळमळीनें श्रीनाथ महाराज या विषयाचा समारोप करतात कीं,

यालागीं जो मोक्षार्थी । तेणें अर्थ न धरावा हातीं ।
काया वाचा चित्तवृत्ति । अनर्थ निश्चिती त्यागावा ॥

ए. भा. २३-३५०

आधुनिक जगांतील प्रगतिपर राष्ट्रें धर्माला धिक्कारून केवळ अर्थ आणि

काम हेंच खरे पुरुषार्थ मानून त्याच्या प्राप्तीसाठीं धडपडत आहेत, विज्ञानानें अकल्पित असे चमत्कार दाखवून इतर राष्ट्रांना ईर्षेनें, स्पर्धेनें भांबावून सोडीत आहेत. हें असेंच चालत राहिलें तर त्याचा परिणाम काय होईल हें भविष्यकाळ ठरवील. चिंता या गोष्टीची वाटते कीं दुर्दैवानें व अंधानुकरणानें भ्रांत झालेली भारतीय जनता तोच मार्ग कल्याणकारक आहे असें समजून प्रवाहपतित न्यायानें त्यांचाच मागोवा घेत आहे. धर्माच्या अधिष्ठानावर आपल्या पौर्वात्य वैदिक संस्कृतीचें अनंत कालापासून अनेक संकटें, आक्रमणें, राजवटी, क्रांत्या इत्यादि विरोधांतून रक्षण करीत आलेल्या व नुकतीच कोठे स्वतंत्रता प्राप्त झालेल्या आमच्या भारतीय जनतेला जगांतील या घडामोडीकडे पाहून किंकर्तव्यमूढ करून सोडलें आहे. अशा परिस्थितींत आपलें चिरकल्याण ( श्रेय ) मिळवूं इच्छिणाऱ्या आस्तिक आबाल, वृद्ध, स्त्री पुरुषांना संतांच्या आध्यात्मिक वाङ्मयाशिवाय दुसरा तरणोपाय नाहीं. मराठवाड्यांत दक्षिण काशी असलेल्या प्रतिष्ठानच्या श्री एकनाथ महाराजांनी

**सर्वेपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित्दुःखमाप्नुयात ॥**

अशी अखिल मानव जातीची तळमळ बाळगणाऱ्या श्रीमद् व्यासमहर्षींचा मनोदय श्रीमद्भागवताच्या एकादश स्कंधावरील टीकेनें विशद करून सांगितला. त्याचें श्रवण, मनन, निदिध्यासन करीत गेल्यास हेच अनर्थकारक अर्थ आणि काम धर्माच्या अधिष्ठानावर ठेवल्यास मोक्षप्राप्तीस उपकारक होतील हें निश्चित समजावें. श्रीएकाजनार्दन महाराज आपणां सर्वांस तशी प्रेरणा करोत अशी त्यांच्या चरणीं नम्र प्रार्थना करतों.



## देवाची भक्तावर अनन्य प्रीती

ऋद्धि सिद्धि त्याच्या घरीं । होऊनि राहती कामारी ।
तरी तो सिद्धिची चाड न धरी । माझे भक्तीवरी निश्चयो ॥
ऐशी देखोनि निश्चये भक्ती । मीही करी अनन्य प्रीती ।
भक्त जेउती वास पाहती । तेउता मी श्रीपती स्वयें प्रकटे ।
भक्त स्वभावें बोलो जाये । त्याचें बोलणें मीचि होये ।
त्याचें बोलण्या सबाह्ये । मीचि राहें शब्दार्थे ॥
तो कौतुकें खेळे खडे । ते खडेचि मज होणें घडे ।
तो कृपाळु आहे जयाकडे । त्याचे छेदी मी गाढे भवबंध ॥
तो वास पाहे जेणें मोहरी । तेउती मी सुखाची दृष्टि करी ।
ते म्हणे जयातें उद्धरी । तो मी स्वपदावरी बैसवी ॥
त्यासी अल्पही विंचंबु पावे । तो सर्वांगें मी करूं धांवे ।
त्याचें नाम जिहीं स्मरावें । त्यासी म्यां तारावे सर्वथा ॥

ना. भा. अ. २४-५३०-५५

---

## भक्त देवाचा प्राण

बहुत बोलीं काय कारण । मी देहो तो आत्मा जाण ।
तो माझा जीव प्राण । हे जाणती खूण निज भक्ता ॥
नांदतां सहज भक्ति आंत । मी देवो तो माझा भक्त ।
येरवीं मी सगळा त्या आंत । तो समस्त मजमाजीं ॥
निज भक्त मज भीतरीं । मी तया आंत बाहेरीं ।
ऐसें साम्यरसें नांदो भारी । वेगळे बाहेरी नाममात्रें ॥
माझिया सायुज्या जे आले । ते मीचि होऊनिया ठेले ।
परी मी होऊनि मज भजले । ते भक्त मानिले म्यां ऐसे ॥

ना. भा. अ. १९-२९५ ते २९८

---

# उर्वशी-पुरूरवा-कथानकाचें प्रयोजन

: लेखक :

श्री. वि. ग. कर्वे, बी. ए.

( अध्यक्ष, सरस्वतीभुवन संस्था, औरंगाबाद )

कथारूपानें बोध करण्यांत एकनाथ महाराज पटाईत. भोळे भाविक कसे तरतील याची त्यांना सारखी चिंता. त्यासाठींच त्यांचें लेखन. त्यामुळें भागवतांतील कथांत सर्वांचें मन रमतें. कथा सांगून तिचा परिपाक उतरवितांना त्यांची वाणी बहरते. भक्ति, विरक्ति, ईशभक्ति नाथ एकरूप मानतात. सर्वांभूतीं भगवद्भाव ही नाथभागवताची बैठक. भजनमार्गींचा मांग असणारा काम जीवास विवेकशून्य करून टाकतो. सद्गुणसंपन्न चक्रवर्ती राजा पुरूरवा, पण त्याच्या आयुष्याचें या निर्घृण कामानें कसें मातेरें केलें हें प्रथम सांगून नंतर त्याच्यावर मात पुरूरव्यानें कशी केली याचें हृदयंगम चित्र नाथभागवताच्या २६ व्या अध्यायांत एकनाथ महाराजांनीं रेखाटलें आहे, तें सांगतों.

## सम्राट पुरूरव्याची उद्बोधक कथा

चक्रवर्ती राजे अनेक झाले व पुढें होतीलहि, पण पुरूरवा हा भागवतोत्तम झाला.

**भाग्यवंत म्हणो तया । शरण गेले पंढरीराया ॥**

या संत तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणें देहाचें सार्थक करून घेण्याचें भाग्य त्याला लाभलें म्हणून श्रीमद्भागवतांत श्रीकृष्ण त्याची स्तुति मुक्तकंठानें करतांना आढळतात.

पुरूरवा हा सम्राट. अनेक राजे करभार देऊन त्यास वंदन करीत. तो प्रभावशाली, तेजस्वी, गंभीर, स्वधर्माचरणी, प्रजापालनतत्पर व गोब्राह्मणप्रतिपालक होता. त्याला सर्व विषयांचा उपभोग सहजसुलभ होता. तारुण्य, सत्ता व संपत्ति यांची जोड असल्यावर ऐहिक सुखाच्या भोगास काय कमतरता ? एकदां मित्रा-

वरुणांच्या शापामुळें लावण्यवती उर्वशी स्वर्गांतून भूतलावर उतरत होती. उतरत असतांनाच सम्राटाची कामुक दृष्टि तिच्यावर गेली. उर्वशी हें इंद्रादिक देवांच्या हातचें एक अमोघ अस्त्रच. तपश्चर्येनें इंद्रपद मिळवूं पहाणाऱ्या मी मी म्हणविणाऱ्या तपस्व्यांच्या तपश्चर्येचा भंग करण्यांत तिचा हातखंडा. सौंदर्यानें रतीला लाजविणाऱ्या त्या स्वर्गीय वारांगनेनें अनेकांना आजवर भ्रष्ट केलें. स्त्रीलंपट पुरूरवा तिच्या सौंदर्याला भुलला यांत काय नवल !

उर्वशीच्या समागमांत तो अहोरात्र रममाण होई. यथाकाल तिला एक पुत्र झाला. तात्काळ ती स्वर्गाला परतली. उर्वशीविरहानें विव्हळ झालेल्या सम्राटाची कींव येऊनच कीं काय, तिनें एकंदर पांच वेळां आपल्या समागमाचा आनंद उपभोगण्याची संधि त्याला दिली. तिला पांच पुत्र झाले. हा संयोग वियोग सुखदु:खमिश्रित असल्यामुळें राजा नेहमीं व्यथितचित्त असे. तेव्हां त्यानें एकदां अखंड समागमाची गोष्ट तिच्याजवळ काढली. तिनें दोन अटीवर त्याला कबूली दिली. पहिली अट, मुलासारखे मला प्रिय असणारे हे माझे दोन एडके ( मेष ) माझ्या शय्येजवळ अखंड राहतील. त्यांना हलवितां कामा नये. दुसरी अट, मी ज्या क्षणीं तुला नग्न पाहीन त्याच क्षणीं तुझा त्याग करीन. अटी कबूल केल्यावर ती त्याच्या समागमांत नेहमीं राहूं लागली. फार काळ सुखांत गेला, पण तो अत्यल्प भासला. एके दिवशीं गंधर्वांनीं काळोख्या रात्रीं एडक्यांचें हरण केलें. उर्वशी जागी होऊन पहाते तो मेष नाहींत. उर्वशी शोकानें डोकें फोडून घेऊं लागली व संतापून सम्राटाला म्हणाली, “ आग लागो तुझ्या शौर्याला, पराक्रमाला ! हाच का तुझा पुरुषार्थ ? शय्यागृहांतून खुशाल वस्तु चोरीस जातात ? हीच का तुझी दक्षता ? ” सशस्त्र राजा चोरामागें धांवूं लागला. त्यानें चोरांचा पराभव करून त्यांना पळवून लावले. धांवतां धांवतां स्त्रीलोलंगत सम्राटाचा पितांबर फिटला. त्याला नग्न पहातांच उर्वशी निघून गेली. नग्न उन्मत्त राजा रडत पडत उर्वशीच्या पाठीमागें धांवूं लागला, स्फुंदस्फुंदून रडूं लागला. हीन दीन झालेल्या राजानें तिची दीन वदनानें परोपरीनें विनवणी केली, पण व्यर्थ. उर्वशीच्या उपभोगांत किती वर्षें गेलीं त्याचें त्याला स्मरण होईना. सैरावैरा पिशासारखा हिंडत असतांना तो कुरुक्षेत्रीं येऊन थडकला. अकस्मात् अंतरिक्षांत उर्वशी दिसली. शोकाकुल होऊन एक वार आलिंगन देण्याची याचना राजानें करतांच तिनें ताडकन् उत्तर दिलें,

" राजा, आम्हां स्त्रियांची आसक्ति कधींहि सुखदायी नसते. आमची जात दुष्ट. आम्ही स्वैरिणी, परपुरुषभामिनी. आमच्यावर शहाण्यानें क्षणभर विश्वास ठेवूं नये.

**स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं । देवो न जानाति कुतो मनुष्यः ॥**

मी तर बोलून चालून स्वर्गीय वारांगना. तेव्हां तूं यापुढें माझा नाद सोड आणि परमार्थीं आसक्त हो. इतकीं वर्षें माझ्याशीं संभोग घेऊनहि अद्याप तुला स्त्रीसंभोगाचा वीट येत नाहीं काय ? तिच्या बोलण्याचा त्याच्यावर कांहींच परिणाम झाला नाहीं. सम्राटाच्या खऱ्या भाग्योदयाचा काळ अद्याप दूर होता. उर्वशीच्या नादानें वेडा झालेला पुरूरवा तिच्या प्राप्तीचा उपाय शोधूं लागला. गंधर्वांच्या सांगण्याप्रमाणें उर्वशीच्या प्राप्तीसाठीं त्यानें यज्ञ याग केले व तिला प्राप्त करून घेतले. उर्वशीसंभोगांत काल व्यतीत करीत असतांनाच पूर्व पुण्याईनें पुरूरव्याच्या भाग्याचा दिवस उगवला व एके दिवशीं त्यास तीव्र अनुताप झाला. यथाकाळ त्याला विवेकसहित वैराग्य उत्पन्न झालें. आत्मज्ञानसंपन्न होऊन ब्रह्मानंदाचा उपभोग तो घेऊं लागला.

स्वधर्माचरण सोडून इंद्रियांच्या ओढीनुसार जर जीव कुकर्मांत दंग झाला तर त्रैलोक्यांतील सर्व पापें व दुःखें त्याला भोगावीं लागतात. म्हणून

**संतांचे संगतीं मनोमार्ग गती । आकळावा श्रीपति येणें पंथें ॥**

हें वचन लक्षांत ठेवून सत्संगतीनें व आत्मसंयमानें परमेश्वरप्राप्तीचा प्रयत्न केल्यास जीवाचें कल्याण होतें.

**ऐसा धार्मिक ऐल चक्रवर्ती । तोही उर्वशीचे आसक्ति ।**
**भुलोनि ठेला भूपति । निजात्मगती विसरला ॥**
**मुख्य आपुली जे सकामता । तोचि दुःसंग सर्वथा ।**
**तो काम समूळ त्यागिता । दुःसंगता त्यागिली ॥**

काम हा पडला मांग. तेव्हां जिवाला ब्रह्मरूपी स्वराज्य उपभोगण्याची संधीच तो लाभूं देत नाहीं. इंद्रियांचें पूर्ण दमन करून मनबुद्धीला कामक्रोधांच्या कचाट्यांतून सोडविण्याचा पुरुषार्थ साधकानें करावा हेंच या कथेचें मुख्य प्रयोजन आहे. कारण अशा दमनानेंच जीव ब्रह्मसाम्राज्यपदारूढ होतो. तें कसें करावें या विषयींचें विवेचन यापुढें करूं.

नाथ हे संसाराच्या भाषेंत सांसारिकांकरितां परमार्थ शिकवतात हा त्यांचा विशेष आहे. " **विषय तो त्यांचा झाला नारायण ।** " या उक्तिद्वारा विषयाचा उपभोग कसा घ्यावा हें सुचविलें आहे, विषयांचा त्याग सुचविला नाहीं. संसारांत पदोपदीं स्त्री व पैसा यांचा संबंध येतो. यांचा उपयोग योग्य रीतीनें, आत्मसंयमनानें विचारपूर्वक केल्यास तो सुखावह होतो. स्त्रीचा मोह व पैशाचा मोह अनिवार असतो.

**मजहृदयीं सद्गुरु । जेणें तरलों हा संसारपुरु ।**
**म्हणोनि विशेषें अत्यादरु । विवेकावरी ।।** ज्ञाने.

सद्गुरुकृपा, संतकृपा हीच या मोहापासून माणसास सोडविते. त्यांची कृपादृष्टिच जीवांच्या-साधकांच्या हृदयांत विवेक जागृत ठेवते. ' **विष कीं आहारीं पडे ।** ' पण त्याचा उपयोग करण्याची कला अवगत असावी लागते.

मनच मनाचें द्योतक, साधक, बाधक अथवा घातक आहे. ( ए. भा. २३-६८४ ते ९३ ) म्हणून युक्ताहारविहाराचा नियम पाहिजे. उच्छृंखल मनाला आवरण्यासाठींच विधिनिषेध आहेत. परमार्थासाठीं—आत्मकल्याणासाठीं अनुताप अवश्य आहे. समर्थांनीं मनाची चपलता लक्षांत घेऊन श्रीरामरायाची करुणा भाकतांना

**अनुदिनीं अनुतापें तापलों रामराया ।**
**परम दिनदयाळा नीरसीं मोह माया ।।**

असा धांवा करुणाष्टकांत केला आहे. आम्ही निषिद्ध कर्में नेहमीं करतों. अनुताप होतो पण क्षणिक. पुष्कळांना तो निषिद्धच वाटत नाहीं. दुष्कृत्य केल्याची जाणीव होतांच यथाकाळ कांहींच्या मनाला सारखे अनुतापाचे धक्के बसतात व त्याचें रूपांतर विवेकांत होतें. विवेकसंपन्नाला वैराग्य प्राप्त होतें. परमेश्वरप्राप्तीसाठीं भक्तीचें साधन सुलभ असल्यामुळें सर्वांना आचरण्यास सुलभ जातें. शुद्ध पुण्याच्या संचयानेंच टिकाऊ विवेकाचा उदय होतो. सद्भक्तीचा शुद्ध कोंभ हृदयांत फुटतो व त्यांतून वैराग्याची सुंदर पालवी इंद्रियद्वारां प्रगट होऊं लागते. भक्तीच्या साधनानें भक्ति, विरक्ति व भगवत्प्राप्ति एकदमच साधकाच्या अनुभवास येऊं लागतात.

वरील विचारप्रणाली लक्षांत घेतल्यावर विवेकाचें महत्त्व व श्रेष्ठत्व पटतें.

संतांच्या ग्रंथांच्या अध्ययनाकडे मन धांव घेऊं लागतें. दयाळु संत दयार्द्रतेनें अशा साधकास अचूक मार्गदर्शन करतात व त्यामुळें त्या साधकाला कृतार्थ होण्याला फारसा अवधि लागत नाहीं. स्वर्गनरकाच्या चोर वाटांकडे तो चुकूनहि ढुंकून पाहात नाहीं. शुद्ध पुण्याचा राजमार्ग चोखाळित असल्यामुळें 'व्यवसायात्मिका बुद्धि' त्याच्या ठिकाणीं स्थिर होते व त्यामुळें त्याला अपरंपार आनंद वाढत्या प्रमाणांत उपभोगावयास मिळतो.

पुरूरवा नीतिमान् सद्गुणसंपन्न खरा, पण भक्तीशिवाय साधन हें रेशमाच्या किड्याप्रमाणें स्वतःला बंधनांत घालणारे असतें. (ए. भा. १४-३०० ते ३०६) भगवत्प्राप्ति भक्तीनेंच तत्काळ होते. "नैतिक गुणांची परमावधि म्हणजे भक्ति नव्हे. नैतिक गुणांहूनहि भक्तीची थोरवी अधिक आहे. हा नाथांचा स्वतंत्र व बहुमोल विचार त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचा चांगलाच प्रत्यय आणून देतो." (पांच संत कवि—प्रा. शं. गो. तुळपुळे)

स्त्रीलंपटतेमुळें स्वर्गीय सुखाला लांचावलेल्या सम्राटाला केवळ नैतिक बळ आत्मबळसंपन्न करूं शकलें नाहीं. अध्यात्मनीतिद्वारांच अंतःकरणांत भक्ति उदय पावते, वाढते व तिचें रूपांतर अल्प काळांत तीव्र अनुताप उत्पन्न करण्यांत होतें. परमार्थासाठीं अनुताप अवश्य आहे. श्रीमद्भगवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायांत वर्णि-लेल्या दैवी संपत्तीनेंच मुक्तिबाला प्रसन्न होऊन भाग्यवान् श्रीमंताला वरते. पण सद्बुद्धि उत्पन्न झाल्याशिवाय व निष्काम कर्म ब्रह्मार्पण बुद्धीनें अखंड घडूं लागल्याशिवाय भगवंताची प्रसन्नता साधकास लाभत नाहीं.

वासनाच जन्ममरणाचें मूळ आहे. जन्ममरणचक्र हाच खरा संसार.

**वासना संस्थित काम । पुरुषास करी सकाम ।**
**कामक्षोभें पाडी भ्रम । कर्माकर्म सरेना ॥**
**वासना काम संगती । बाधक होय परमार्थी ।**
**आवराव्या बाह्यइंद्रियवृत्ति । तैं मनासि शांति हळूंहळूं ॥**

ए. भा. अ. २६

तेव्हां साधकानें अव्यंग सगुण मूर्ति हृदयांत चिंतावी, तिची अद्वैत भावानें पूजा करावी, मूर्तिध्यानानें तन्मय स्थितींत ऐक्यत्वानें निश्चल रहावें. हीच मुख्य भक्ति होय.

ए. द. २...१८

आर्ततेनें पांडुरंगाला हांक मारतांच तो धांवून येतो हा सामान्य माणसालाहि अनुभव अल्पस्वल्प प्रमाणांत येतो, थोडेसें निरीक्षण हवें हें खरें. पण ही आर्तता टिकत नाहीं. यावर उपाय म्हणजे मनबुद्धीला योग्य खाद्य देऊन साधकानें आत्मानंदाची खरी चटक त्यांना लावावी.

राजा पुरूरवा पायरी पायरीनें प्रगति करीत गेल्यामुळें त्यालाहि ज्ञानोत्तर भक्तीचा सोहळा पहावयास मिळाला.

**राजा निवाला ब्रह्मरसीं । मग सांडूनियां उर्वशी ।**
**त्यजोनियां स्वर्गलोकासी । निजबोधेंसी निघाला ।।**

असें नाथांनीं स्पष्ट वर्णन केलें आहे.

वृद्धा नारी पतिव्रता आहे असें म्हणण्यांत काय स्वारस्य ! तारुण्य मुसमुसत असतां विलोभनीय परिस्थितींत पातिव्रत्य सांभाळणाऱ्या युवतीचें खरें कौतुक ! त्याचप्रमाणें

**अप्राप्त विषयें योगी । बहुत देखिले विरागी ।।**

पण स्वर्गांत सर्व प्रकारचे भोग उपलब्ध असतांना स्वर्गांगनेच्या संभोगाचा त्याग करण्यांत वैराग्याचें अलौकिकत्व आहे व म्हणून नाथ महाराज म्हणतात,

**पुरूरव्या ऐसी विरक्ति । नाहीं देखिली आणिकांप्रति ।**
**धन्य पुरूरव्या त्रिजगतीं । स्वमुखें श्रीपती वाखाणी ।।**

अभ्यासूंनीं एका २६ व्या अध्यायाचें कसून अध्ययन केल्यास त्यांचे कितीतरी विकल्प नाहींसे होऊन त्यांना नवी दृष्टि लाभेल. सद्ग्रंथांतील एकहि शब्द अर्थहीन नसतो. कारण संत हे स्वानुभवसंपन्न जगांत वावरणारे बोलके देवच आहेत.

ही गोष्ट लक्षांत ठेवून वाचल्यास नाथांच्या कृपेनें संपूर्ण नाथभागवताची गोडी चाखण्याची प्रेरणा साधकास होईल व भक्तिप्रेमाचा पूर या ग्रंथांत कसा आलेला आहे याचेंहि दर्शन सद्भाग्यानें अभ्यासूला झाल्याशिवाय राहणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# भागवताचा उपसंहार

: व्याख्याता :

## पूज्य आचार्य विनोबा भावे

श्री नाथांनीं भागवताची जी समाप्ती केली ती वाचण्यासारखी आहे. त्या समाप्तीला त्यांनीं भगवान् कृष्णाचेंच चरित्र वर्णन केलें आहे.

कृष्णचरित्राचा अत्यंत मनोहर भाग म्हणजे बालकृष्णाचें चरित्र. तो दशम स्कंधांत आला आहे. ज्यावेळेस भगवान् द्रौपदीसाठीं अंबरावतार घेऊन धांवून आले, तो कृष्णचरित्राचा मधला एक रमणीय भाग महाभारतामध्यें आला आहे आणि नंतर प्रौढवयांतला त्यांच्या जीवनांतला सर्वांत रमणीय प्रसंग महाभारतांतल्या भीष्म-पर्वांत आला आहे. ज्यावेळेस एखाद्या एकांतांतल्या गुहेमध्यें शांत आणि सुखासीन होऊन जें ज्ञान शिष्याला द्यायचें असतें तें ज्ञान भर रणांगणामध्यें बाणांचा वर्षाव सुरू होण्याच्या तयारीमध्यें भगवंतांनीं अर्जुनाला दिलें. या एका गीताग्रंथावर सबंध हिंदुस्थान कायमचा टिकूं शकतो. त्यानंतर कृष्णचरित्राचा सर्वांत रमणीय भाग म्हणजे त्यांच्या निर्वाणीचा प्रसंग. तो एकादश स्कंधांत आला आहे आणि नाथांनीं तो वर्णन केला आहे.

भगवान् कृष्ण सर्व यादवांचा संहार झाल्यानंतर एकांतांत एका झाडाला टेकून बसले होते. त्यांची ध्यानमुद्रा लागली होती. इतक्यांत जराव्याध दुरून आला आणि हरीण बसलें आहे असें वाटून त्यानें बाण मारला. बाण लागतांच प्रभूच्या चरणकमलांतून रक्ताची धार वाहूं लागली. तो जराव्याध जवळ आला आणि पाहून भयभीत झाला कीं, आपल्या हातूंन केवढें मोठें पाप झालें आहे! त्यावेळीं भगवान् त्याला म्हणाले, भिऊं नकोस. अरे, ही माझी कामनाच होती ती तूं पूर्ण केलीस, तुला भिण्याचें कांहींच कारण नाहीं, तूं योग्याच्या गतीला जा.

याप्रसंगीं नाथ लिहितात कीं अगदीं शेवटच्या घटकेला भगवान् श्रीकृष्ण आम्हां भक्तासाठीं परम क्षमेचा आदर्श ठेवून जात आहेत. नाथांच्या

डोळ्यासमोर बहुधा तेंच चित्र सतत राहात असलें पाहिजे. कारण नाथ अत्यंत क्षमाशील होते. नाथांनीं शेवटीं लिहिलें कीं कृष्ण आम्हां भक्तांसाठीं आपल्या कृतीनें हें शिकवून जात आहेत कीं जो अपकार करतो त्याला कृष्णानें मुक्त केलें, सद्गति दिली म्हणजे तो परम क्षमेचा आदर्श आहे.

( दि. १८-७-५८ ला एकनाथ संशोधन मंदिरांत केलेल्या भाषणांतील उतारा )

REFBK-0011014

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 37228 दि: 5/2/71
क्रमांक ... नों दि: ...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 99094